पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

२८

बाळाजी बाजीराव : कर्नाटक

(१७४०—१७६०)

[किंमत—६ रुपये २ आणे किंवा १० शिलिंग]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी. ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३३

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मते यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

EXPANSION OF MARATHA POWER INTO KARNATAK
(1740–1761)

1. It is a well-known fact that the Maratha expeditions were frequently undertaken, not in pursuance of a set plan of campaign, but as a result of various political forces, which operated on the vacillating mind of Shahu, the nominal figurehead, whose will the Peshwa skilfully and gradually contrived to divert towards the accomplishment of his own purposes. The Peshwa's position was often anomalous. There were the older sardars like Fatesingh and Raghoji Bhonsle or the Pratinidhi and Babuji Naik, whom the Peshwa could not directly control and who often persuaded Shahu to make commitments in defiance of his policy. To avoid friction of this kind, the Peshwa took care to keep a member of his own family in constant attendance on the King. Bajirao's brilliant successes first against the Nizam-ul-mulk and afterwards against the Imperial armies in Malwa and Bundelkhand, only served to excite the jealousy of the stay-at-home advisers at Shahu's court. When Bajirao's successes in the North had come to a climax, his opponents, Raghoji Bhonsle, Babuji Naik, Murarrao Ghorpade and others, headed by Fatesingh Bhonsle, persuaded Shahu to allow them to undertake a rival scheme, namely, the conquest of the South, popularly known as the Karnatak, i.e., peninsular India south of the river Krishna. It must be remembered at the outset that, by the treaty of Warna, Shahu had already yielded this field of Maratha expansion to his cousin Sambhaji of Kolhapur. The Nizam-ul-mulk had also cast a covetous eye on the same sphere of action, as he claimed the South to be a Mogul possession ever since its conquest by Aurangzeb and Zulfikarkhan. Once in 1721 the Nizam had entered the Karnatak but was prevented from realising his aims by a peremptory recall from the Emperor to Delhi. Thereafter Bajirao appeared on the scene and allowed the Nizam no leisure to direct his attention to the South. A further factor in the situation, not always fully borne in mind by students of this period, was the Maratha kings of Tanjore, whom Shahu looked upon with particular affection, as they were his near cousins and were struggling to maintain their existence in the midst of powerful enemies all around them in a far off corner of the country. Thus the struggle which is described in the following papers is principally between the Marathas and the Nizam in Southern India, and it is difficult to distinguish one particular field of campaign from another; chronologically studied, these papers doubtless yield a lucid, eloquent and connected story.

2. When Sidi Sat was killed in the summer of 1736 and Shahu's objective at Janjira almost accomplished, he turned his attention to the South. The situation is well summarised in the discussion at Shahu's court in 1736 reported to the Peshwa in the first papers of this section. Nothing, however, came of the project for the next two years. Shahu himself undertook a campaign in the southern direction; but his progress during two years did not go beyond Miraj, and he returned to his capital

after despatching Fatesingh and Raghoji Bhonsle towards Arcot and Tanjore. When Chimaji Appa achieved his life's ambition by the conquest of Bassein, he and his brother turned their attention to the South chiefly for the sake of curbing the aggressive spirit of Raghoji. Bajirao's death, however, in the summer of 1740 and his brother's a few months thereafter, facilitated the plans of Raghoji, who led his forces right up to the gates of Pondicherry and brought Chandasaheb captive to Satara, thereby greatly enhancing his prestige with Shahu. Venkaji Shivdev's detailed letters of the early part of 1741 describe these events and prove that the exploits of Raghoji did not finally settle the subject of Karnatak. For a time Babuji Naik obtained from Shahu the field of the Karnatak for himself, but he too was unable to accomplish any tangible results owing to the opposition of the Peshwa. In 1747 Murarrao Ghorpade came to Satara and setting aside Babuji Naik claimed the Karnatak for himself, the Peshwa taking this opportunity to befriend Murarrao and oust Babuji Naik. The whole subject however remained in abeyance for some two years more, owing to Shahu's death in the end of 1749. The movements of Nizam-ul-mulk for the few years before his death in 1748 will be found minutely described in these papers and they will form a fresh addition to our present knowledge. Upon the death of the King, the Peshwa now had a free hand in executing his plans, as the detailed letters of Shamrao Yadav will show. Ramchandra Bavaji was the Peshwa's agent in the extreme south-west for the conquest of Bednur. Complications increased owing to the jealousy raging between Nasirjang and Muzaffarjang : their invasion of the South and their sudden death are famous topics of Anglo-Indian history, as the English and the French appeared on the scene each supporting one of the rival claimants. In the meantime Sambhaji of Kolhapur and his spirited Rani Jijabai called in Murarrao and through his instrumentality tried to assert their claim to that region. Ramchandra Jadhav also claims attention at this juncture as a person of some prominence. Thus during the two years 1750-51 the Karnatak was the scene of a terrible scramble for power, echoes of which reverberated throughout India, chiefly owing to the exploits of Clive, Dupleix and Bussy. The last quieted the situation by placing Salabatjang on the Nizam's *musnud* and protecting him with his well-trained French troops, thereby bringing about a great revolution in the art of war in India. It will thus be noticed that during the years 1751-52 fighting was almost incessant in both theatres of war, in the northern dominions of the Nizam and in the Southern Karnatak. The state of affairs is well illustrated by the profuse papers here presented. As a counterpoise to Bussy, the Peshwa contrived to call in Ghaziuddin from Delhi to Aurangabad, but failed in his scheme owing to the assassination of that remarkable personality in October 1752. This incident at once led the Peshwa to befriend Salabatjang by contracting with him the treaty of Bhalki (November 1752).

3. This treaty, however, was a temporary makeshift. The real causes of friction had neither been settled nor removed. The field of activity was for a time transferred from the Deccan to the far south in the direction of Arcot and Pondicherry. The keen rivalry between Dupleix and Clive

extended to all the neighbouring potentates and split them into two hostile camps. The Peshwa sent his trusted agent Shamrao Yadav to report the actual state of things, and fortunately this agent's letters are full and clear for the year 1753, in which many severe engagements which were hitherto unknown to history were fought. Murarrao Ghorpade and Nandraj of Mysore are found figuring prominently in these battles on the side of the French. The whole Karnatak was astir with the din of war; and the shrewd Peshwa, ably assisted by his cousin the Bhausaheb, in order to make the best use of the situation in the interest of the Maratha cause, started, with well equipped forces, his long and brilliant series of Karnatak campaigns in 1753, which brought the whole region under his sway so completely within the next five years that by the beginning of 1759 he stood at the zenith of his power. His attention to the South, however, naturally created laxity and confusion in the northern scene of operations, to remedy which he had suddenly to abandon his projects in the Karnatak and send succours to the north. Panipat intervened to arrest Maratha progress as has been already mentioned in the introduction to the Campaign of Udgir.

4. Unfortunately ample papers for the years 1754-56 are not forthcoming, probably because the Peshwa was himself on the spot during that period and no news-letters were despatched to Poona, beyond some desultory items. The outstanding events of the two years 1756-57 were the conquest of Savanur and the winning over of Gardi Muzaffarkhan and Murarrao Ghorpade with whom a permanent treaty of offensive and defensive alliance was contracted on 11th May 1757. At the same time Salabatjang was induced to dismiss Bussy and thus remove the only cause of friction. Mukund Shripat, Tubaji Anant, Visaji Baburao are some of the news-agents employed by the Peshwa whose reports are ample and clear. During 1758 Murarrao Ghorpade, Gopalrao Patwardhan and Balwantrao Mehendale, all acting in intimate concert, subjugated the various turbulent spirits and completed the conquest of Mysore, Bednur, Kadappa, and other places.

5. For the accounts of Mysore and the early exploits of Haidar Ali, the papers printed in this selection will be found to make a considerable addition to the information already contained in Wilkes' History. The state of Mysore was on the point of dissolution and the Peshwa had very nearly annexed it to his dominions and would have completed the conquest if the disaster of Panipat had not intervened. This was Haidar's opportunity and how dexterously he availed himself of it, is well illustrated in the letters presented here for the first time. Altogether this selection contains letters from many eminent persons who took an active part in the war and diplomacy of the period, such as Murarrao Ghorpade, Visaji Krishna Binivale, Gopalrao Patwardhan, Malharrao Bhikaji Raste, Mukund Shripat and others. Mukund Shripat's long and eloquent letter towards the end of this selection lucidly summarises the situation in the southern region.


The following interesting extract from a paper read before the H. R. Commission in 1930 is here presented in order to elucidate the activities of Babuji Naik in the Karnatak region in the years 1744-45.

"Nawab Anwaruddin fought with Bapu Naik, the Sardar of the Marathas who under the orders of the Peshwa advanced into the South with the object of collecting Chauth, and he is said to have given battle to the Marathas at Andol (Hindoli) and defeated and driven them away to Poona. The Peshwa thereupon collected a large army and surrounded Nawab Asaf Jah who had returned from the Carnatic after having settled its affairs in 1743-44.

"Anwaruddin then effected the recovery of all arrears of tribute from the Raja Pratapsing of Tanjore. Bapu Naik, the Maratha leader, advanced into the South with a large body of horsemen, when Asaf Jah wrote an urgent letter to Anwaruddin to come to his help. In spite of his being 70 years old he immediately marched north with a body of 12,000 cavalry and was joined by his son Hazrat Ala Mohammad Ali from Hyderabad. The rulers of Kadappa, Karnool, Savanur, Sira, Bednur, Mysore and Adoni all joined Anwaruddin, totalling in all 69,000 men. The two armies met face to face near Basawapatan. The fight went on for one week and Bapu Naik was pursued in the direction of Trichinopoly and the Nawab defeated him for the third time at Basawapatan after fighting hard for three days and nights. Finally the enemy ran away in the direction of Poona and the victorious Nawab turned back and reached Arcot safely.


"A Madras despatch dated 15th February 1745 states, in December 1744 'Anwaruddin marched against Bapu Naik. Though the armies are near each other, no action has as yet taken place. The Nawab offers a sum of money but the Marathas demand Trichinopoly.'" (Dodwell's Madras despatches and the Diary of Ananda Ranga Pillay.)

No. 114



Facsimile of the handwriting of Visaji Krishna Biniwale. *(Died in 1785)*

No. 160



Facsimile of the handwriting of Murarrao Ghorpade. *(Died in 1777)*

No. 1] [8-3-1739]

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीच
सेवेसी

सेवक दौलतराव मुरार कृतानेक साष्टांग दंडवत प्रणाम विनंती. येथील कुशल तागाईत छ ८ जिल्हेज मुकाम म्हसाळ श्रीमंत राजश्री नानास्वामीजवळ सुखरूप असों विशेष. श्रिंगेरीतून श्री स्वामींनीं राजश्री सुभराव कितेक राजकारण सांगोन व पुरवणींत सूचनार्थ लेहून श्रीमंत राजश्री रायांकडे पाठविलें होते ते खेडराजुरीवर येऊन रायाचें दर्शन जाहालें. कितेक बोलीचाली होऊन पुन्हा त्या स्थलास पाठविलें. तो प्रसंग ठीक करून आले. राजश्री नानासहि भेटविलें. त्यांहीं स्वामीस पत्र लिहिलें आहे त्यावरून कळों येईल. सारांश, ह्या राजकारणांत श्री स्वामी आहेत; त्यांचेंहि कार्य आहे आणि आपलेंहि कार्य मातबरच आहे. तेथें मातबर मनुष्य जावा लागतो तेविशी नानासाहेबीं लिहिलें आहे त्याप्रमाणें करावें. आमचें जाणें ते प्रांतीं मातबरीनें जालियास हेंहि राजकारण होऊन येईल. आणीक आमचे आजे राजश्री शामजी बावा तेथें राजश्री संभाजी माहाराजांकडून आहेत त्यांहीं कितेक राजकारणें मातबर सांगोन पाठविलीं आहे(त) तीं राजश्री नानास श्रुत केलीं आहेत, कागदींपत्रीं ल्याहावीशीं नाहींत. तीं ठीक करून राजश्री वेंकटराया रुजूं करून देऊं. त्यांतहि कार्य विशेषच आहे येविशी विस्तारें ल्याहावेंसें नाहीं. वरकड सविस्तर वर्तमान राजश्री सुभराव व राजश्री मल्हारपंत निवेदन करितां श्रुत होईल. विशेष काय लिहिणें? कृपा असो दिली पाहिजे हे विनंती.

¶*Doulatrao Murar to Chimaji Appa reporting his visit to Nana Saheb and the arrival of Subharao after having visited Bajirao in connection with certain undertakings in the Karnatak. The letter shews how skilfully the Peshwa and his brother and son were developing the subject of pushing on Maratha conquests in the South.*

No. 2] [19-6-1739?

श्री

विनंती सेवक महिपतराव प्रल्हाद कृतानेक सा। नमस्कार सेवेसी विज्ञापना. तागाईत छ २३ रावल पावेतो स्वामीचे कृपाअवलोकेकरून येथास्थित असो

विशेष. राजश्री बाबूजी नाईक याचा मजकूर तर आज छ मजकुरी प्राथकालापासून दोनप्रहरपरयेंत मजकूर राजश्री येमाजीपंत आणा व रा सचिवपंत व रा घनबा व लाला व रा येशवतराव देवराव नागोजीराव अपा चिटनिवीस व सुकानंद सुकल राजश्री सिवाजीपंत व लखमोजी वगैरे मंडली इतक्यास राजश्री स्वामीनी आज्ञा केली की तुम्ही येकांती गजराबाईच्या घरांत बैसून रा बाबूजी नाईक याचे समजाविसीचा येक करार सिधांत करणे. यावरून येणेप्रो अवघे जण मिलोन गजराबाईचे घरात बैसले आणि मागती नाईक मारनिलेचा मजकूर ह्मापासून आजपावेतो कोणेकोणे प्रकारे कैसा जाला याचा नीर काढावयास लागले. राजश्री स्वामीनी नाईकास काये लेहून दिल्हे आहे ते पाहावे. त्यात काही कर्ज तुमचे वारू यैसे लेहून दिल्हे असिले तर तो दस्तायैवज काढावा म्हणजे नाईक म्हणतात हे खरे प्रमाण, नाही तर सालगुतस्ताच नाईकाचा करार जाला होता की आपण मामला अवंदा मात्र करितो, पुढे काही करणार (नाही), म्हणून राजश्री येसूदादापासी नाईकानी करार केला. यैसे असता सरकारचे रुपये तीन वरशाची बाकी त्याजकडे असून तेच म्हणतात की आमचे कर्ज फेडावे. हा मजकूर येणेप्रो सर्व अगोधर राजश्री स्वामीस विदित करावा की आम्ही नाईकासी येणेप्रो त्यास बोलाऊन आणून पुसतो. त्यावरून अवघ्यानी रा. देवराव यास राजश्री स्वामीस अर्ज करावयास पा की राजश्री येमाजीपंताची येक गोस्ट माहाराजास आर्ज करावयाची आहे. त्यावरून राजश्री स्वामीच उठोन गजराबाईचे खोलीत आले आणि सर्वत्रास पुसू लागले की आम्हास काये पुसता? त्यावरून राजश्री येमाजीपंत बोलिले की नाईक मारानिलेची समजावीस कोणे रीतीने काढावी. माहाराज हुकु(म) करीतील त्याप्रो वर्तणूक करू. त्यावरून राजश्री स्वामी बोलिले की आम्ही काही बोलत नाही. तुम्ही अवघे जण मिलोन माझे घरी ब्रम्हहत्या करिता, हा उठऊन देणे, इतके अवघ्यास मी मागतो. नाईक मारनिलेची आमची काही बहूतसी वलख नवती. अगोधर त्यानी येक आम्हास घोडा विकत दिल्हा होता ते वलख, की दुसरी वलख भिऊबाईची आमची धाकुटपणापासून आहे. आपण खेळवली आहे. ते वलखीने यास आपण मामला सांगितला. आता ही भिऊबाई आसती आणि आम्हास हाती धरून सांगती की हे मजला तुम्ही द्या तर आमच्यान काही नाही देवत यैसे म्हणवताना. तिजपुढे आमचा विलाज चालताना. आम्ही काही बेइमान नव्हे. नाईक मारनिलेसी आपले वचन जाले आहे की तुमचा मामला आपण काढूं नये; परंतु त्यानीच आपणासी बेइमानी केली. त्यावरून आपण त्यासी बोलिलो कीं यात तुमचें बरें नाहीं. फजित व्हाल. परंतु त्यानी आमची गोष्ट आयेकली नाही.

त्यावरून नाईक फजित पडले, म्हणून राजश्री स्वामी कितेक प्रकारे बहुतच फिरफिरू बोलिले. त्यावरून राजश्री येमाजीपंतानी अर्ज केला कीं पुढे समजावीस कोणे रीतीने काढावी. त्यावरून राजश्री स्वामी बोलि(ले) की पूर्वी कारभार औघा आम्हापासीच होता. परंतु आता नाव राजा मात्र मी आहे. वरकड खावंद राज्याचे तुम्ही. तुम्ही चवघे जण येकत्र जाला तर राज्य नवे कराल. यैसे असून मी येकला बोलिलो तर तर माझे कसे चालते. तुम्ही सरकारकून अवघे मिळाला आहा. याचा विचार जो काढावयाचा आसल तो काढावा. नाईक मारनिलेनी मामला आपला केला तर काही पहिले वर्षी रुपये दिल्हे. काही दुसरे वर्षी दिल्हे. सरकारची चाकरी केली. निजामनमुलुक याचे डेरियासी तनाव देऊन राहिले. त्याचा हस्ती येक पाडाव करून आणिला तो सरकारांत दिल्हा. त्यास मामला सांगितल्याने तऱ्ही काये वाईट केले. आता तुम्ही खावंद आहा. मामला सांगा; नका सांगू. तुमचे चिता(स) येईल ते करा. यैसे कितेका प्रकारे राजश्री स्वामी बाबूजी नाईक याचा प्रतिपक्ष धरून बोलत. त्यावरून रा। येमाजीपंत बोलिले की नाईक मारनिलेस उभयेता बंधूस बोलाऊन आणून च्यार गोस्टी विचाराव्या, पुसाव्या की तुम्ही आपला मामला पुढें करिता की नाही. तुमची समजावीस कैसी काढावी यैसे पुसावें. त्यावरून राजश्री स्वामी बोलिले की मी उठोन सदरेस बसतो आणि तुम्हीच त्यास बोलाऊन आणून च्यार गोस्टी पुसा. त्यावरून नाईक मारनिलेस बोलाऊ पा। ते येईनात. त्याणी रा। हरबाजी+ व सिवबा (ना)ईक पा। दिल्हे. त्यास राजश्री स्वामीनीहि उभयेतास यावयाची आज्ञा या उभयेता नाईकापासी केली. त्यावरून हे मागती उभयेता बंधु नाइकास बोलाविले. परंतु ते येईनात. म्हणो लागले की तुम्हीच अवघी मंडळी येथे या. आपणास उपासाकरिता चालवत नाही; उठवत नाहीं. त्यावरून अवघी मंडळी बाबूजी नाईक जेथे बैसिले होते तेथे गेले. त्यास च्यार गोस्टी सांगितल्या. परंतु त्यानी उतर दिल्हे की मी काही ह्या बाजारात अवघ्यादेखता बोलत नाही. त्यावरून रा। येमाजीपंत व सिवाजीपंत व आबाजी नाईक यैसे येकीकडे बायेकांचे डेरियांत जाऊन बैसिले. परस्परे बोलने जाले. परंतु काही निकालावर आबाजी नाईक येईनात. त्यावर अवघी मंडळी व बाबूजी नाईक तेथे गेले. मागती सर्व मजकूर परस्परे जाला तेव्हा बाबूजी नाईक बोलिले की राजश्री पंतप्रधान जबरदस्त म्हणून दोन वर्षे येथे राहिले होते. तुम्ही त्यास निरोप द्यानात. याजकरिता त्याणी फौज दाहाहजार मिळेऊन जबरदस्तीनेच निघोन गेले. कर्जाचे रुपये येथे येक कबूल केला नाही. राजश्री गोविंदरावजीस

+ नाईक रास्ते.

खानदेशपावेतो घेऊन गेले. तैसे आपण काही जबरदस्त नाही.
आपण आहो. आपणास कर्ज पनास लक्ष रुपये जाले आहे ते फेडावे.
काही मागत नाही. मामला करावयाचे तर आपण काही अद्यापि हिमत
नाही. *तुम्ही कृपाळु होऊन आपले नवाजून मामला सांगितला तऱ्ही*
आपला कर्जाचा निर्गम जालियाविना दुसरा कोन्ही मामला करून वस्त्रे घेईल
तो कधी होणार नाही. आपण ते वेलेसच ब्रम्हहत्या करू. त्यावर रा
पंत बोलिले की तुम्हास मामला कोणे विचारे आम्ही द्यावा, तुम्ही कोणे
करावा, याचा विचार बोला. त्यावरून नाईक बोलिले की, मी येकांती
त्यावर आवघ्यानी राजश्री बाबूजी नाईकासी करार केला की दोन रोजानी
निकाल आपण काढितो. त्याजवरून त्यानी मान्य केले. हे अवघे
राजश्री स्वामीस अवघ्यानी विदित केले; आणि निरोप घेऊन भो
आपलाले घरोघर गेले. सारांश की राजश्री स्वामीचे चितात आहे की
मारनिलेस मामला सांगावा, हे अंतरयामीपासून मर्जी आहे. पुढे काये हो
पाहावे. राजश्री रघोजीबाबा व राजश्री फतेसिंगबावा यास वस्त्रे करनाट
देत होते ती राहिली. आपणहि अवघ्या मंडलीमध्ये बैसलो होतो.
वर्तमान विदित जाले पाहिजे. बाबूजी नाईकानी आद्यापि स्नान केले
निऱ्हाराचा फराल सरबत अगर काही फल मिलेल ते करावे. विदित
पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. सारांश राजश्री स्वामीची मर्जी
नाईक याची समजावीस करावी. मामला देऊन करावी अगर कर्जाचं
ज्या रीतीने निघेल त्या रीतीने काढावी. परंतु समजावीस करावी हे मनोद
आंतरयामीपासून आहे हे विज्ञापना.

¶*Mahipatrao Pralhad describes in detail how Shahu tried to satisfy B Naik who had gone on hunger-strike for his money and how he settle question of his debts by granting him a 'mamla' in the Karn Incidentally the writer also refers to the way in which Shahu came to kn Babuji Naik through Bhiubai, the daughter of Balaji Vishvanath.*

No. 3] [*Received on 3-5*

छ ३ जमादिलौवल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसी

विनंती. रघोजीबावा व फत्तेसिंगबावा यास कर्नाटक थोरले बाईनी
दोघांस येक करून फत्तेसिंगबावास बाहेर काढलें. बावा खेडावर जाऊन

3790

त्यास रघोजीबावानीहि जावें तों मशारनिलेची स्त्री वारली. या याजकरितां आठ-पंधरा दिवस गुंता जाहला. फत्तेसिंगबावावर धाकटी बाई इतराज; बावाला तोंडघसी पाडावें हे वासना. त्यास रकारनामकास धाकटे बाईनी साफ सांगितलें कीं तुम्हीं कर्नाटक केलत तर मी तुमची नव्हे. त्यावरून रकारनामक मागें सरले. फत्तेसिंगबावास रकारनामकानी साफ सांगितलें कीं तुमचा आमचा बनाव बसत नाहीं. आम्ही कर्नाटक करीत नाहीं. त्यावरून बावा फसलेसे जाहले आहेत. थोरले बाईस हें वर्तमान कळलें. ती बहुत रकारनामकावर बेमर्जी जाली आहेत. रकारनामकावर रायाजी भोसल्याचे वगैरे कजिये उठविले आहेत. येवंच कर्नाटकाचा मजकूर असा नासला. फत्तेसिंगबावा तोंडघसीं[१] पडले. थोरले बाईनी केले तें मोडलें, चा(ल)लें नाहीं. बाईसहि पटकी बसली. परस्परें कलहे माजला आहे. परिणाम कळला तो मजकूर लिहिला आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Nana Purandare to Sadashivrao Bhau reporting how Rani Sakwarbai's arrangement to dispatch Raghuji and Fatesing Bhonsle to the Karnatak was upset by the younger queen Sagunabai.

No. 4] [July 1735

श्री.

राजश्री बाजीराव पंडित प्रधान गोसांवी यांस

शिक्का

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नो राणोजी घोरपडे सेनापति[२] दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीये लेखन केलें पाहिजे. सांप्रत पत्र पाठऊन परामश केला नाही हे वडीलपणास विहित नव्हे. सदैव पत्रप्रेषण करून पूर्वस्नेहाची अभिवृधि केली पाहिजे. यानंतर आम्ही रायेचुर प्रांते स्वारीस जात आसतां मार्गीं कृष्णातीरी चिरंजीव दौलतराव[३] यासी युध्यप्रसंग जाहला तो परभारें श्रवण जाहलाच असेल. तदोतर राजश्री आपाजी सितोले सैन्यसह खडकलाटेस आले. आम्ही जेरारे[४] मनोलीस गेलो होतो, तेथें मास पक्ष राहून पटणकुडीस आलो. राजश्री स्वामीनी दर्शनास यावयाविशी आज्ञा केली आहे. श्रावण मासीं प्रतिपदा करून करवीरास जात आहो. यानंतर राजश्री वेंकटराव[५] यांस आपण फौजसह स्वारीस रवाना केलें होते, तिकडे उत्तरेची कैटी[६]

---

१ तोंडघशी पाडलें. २ करवीरच्या. ३ चुलतबंधु. ४ सडे.

५ घोरपडे, बाजीरावाचा मेहुणा. ६ कजाख.

फौज चालून आली होती ते नामोहरम होऊन स्वस्थलास गेली; हे महद कृत्य आपले प्रतापे जाहाले. हे वृत श्रवण होऊन सतोषावाप्ति जाहली. पुढें आपण मनसाबियाचा प्रसंग काये योजिला आहे तो विचार व वरकड कुशलार्थ लिहून परामृश करावयास आपण वडील आहेत. विशेष राजश्री वेंकटराव नांदणीस येणार म्हणोन यैकिले. यैसियास आमची वासना आहे की त्यांची आमची भेटी व्हावी हा विचार आपणाकडूनच घडून येईल. बहुत काय लिहिणे? कृपा आसो देणे हे विनंती.

लेखन
सीमा

¶*Ranoji Ghorpade to the Peshwa informing him of a skirmish between himself and Daulatrao. He further requests him to arrange for an interview between him and Vyankatrao.*

No. 5] [*1753*

श्री

श्रीमंत राजश्री राऊसाहेबाचे सनिधानासी

आश्रित कृष्णाचार्य कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम जाणून आपला सांब्रज्येवैभव लेखनाज्ञा केली पाहिजे. यानंतर भंगारयममनायेड संस्छान वेंकटगिरी हे या प्रांतीं उमदे मनसबदार पंजहजारी साहेब नौबत मातबर घराणेदार आहेत. आपली आगमनवार्ता यैकून मातबर वकील पाठवणेचा योजिला आहेत. इतकेंत राजश्री आमृतराऊजींचे येणे चंनापटणासी जाहले. येथे नायेडचा वकील मातबर ग्रहस्त राजेश्री त्रिमलराऊ येऊन राऊजीस भेटून संस्छानाचे पूर्वोत्र साकल्य सांगितले. पूर्वीपासोन श्रीमंत साहेबासी कागदपत्रामुळें श्नेह व निष्ठा राखितात आणि प्रस्तुत आपली दया संपादोन त्यामुळें श्रीमंताचे कृपेस पात्र व्हावे यैसी अपेक्षा यांची आहे. या प्रांतासी खासा स्वारी येईल ते समयीं आपली व त्यांची संदर्शन लाभ व्हावें, तेहि वांछा आहे. प्रकृत आपणासहि पत्र लिहिलें व वस्त्रें पाठविलीं असत. चितास आणून याजविषयी दया ठेऊन श्रीमंताची दयाहि वाढऊन यांचे उर्जित होयेसे कृपा केली पाहिजे. यांविशीं दयारूप कडून चालविले जे यांकडून सरकारचे बहुत काही उमदे काम घडून येतील. चितास आणून त्याचा जवाब व नायडाचा वकील त्रिमलराऊ

येथे आहेत त्यांचें नावींहि कागद दया करून पाठवितेसे करविले पाहिजे. बहुत काय लिहिणे? कृपा असों दिजे हे विनंती.

¶*One Krishnacharya recommends to the favour of the Peshwa a certain panchhazari sardar of Venkatgiri.*

No. 6] [*1740*?

श्री

राजश्री चिमाजी राऊ गोसावी यासी



ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री सुबराऊ सिंदे साहेबसुभा दंडवत विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीय लेखनज्ञा करीत गेले पाहिजे. यानंतर आपण स्मरणयुक्त वार्तिकासमवेत पत्र पाठविले ते उतम काली पावोन लेखनार्थ- श्रवणे समाधान पावलो. याच प्रकारे पत्री परामृष करीत गेले पाहिजे. पत्री लेख केला जे, टोपीकराचा उपमर्द करावयास पूर्वी राजश्री वेंकट- रायास रवाना केले होते. परत अवरंगाबादेहून नसरतजंग जात होता त्यास अवरोध करावा येदनिमित्य बोलाऊ पाठविले. मोहिमेस विलंब जाला. मागती फौजेनिसी रवाना करीत आहो. त्यास तुम्ही अनकूल व्हावे म्हणोन लेख केला तर हा किला मामला तुमचा असता तुम्ही लिहिलें. कार्यास आम्ही अंतर करूं की काये? हे गोष्ट सहसा घडणार नाही. अजरेचे मोकामाहून राजश्री वेंकटरायाचे पत्र येताच आम्हाकडील फौज रवाना केली तो तुम्हाकडे जाणे जाले. मागती



रवानगी करीत आहो म्हणोन लिहिले तर यापेक्षां उतम ते काये आहे? आम्हापासून साहिता होईल त्यास दुसरा विचार होणार नाही. अजरेचे ठाणेकरीता लेख केला तर आपले ठाणे तेथे असता कोण तसा विचार करणार आहे? ज्या गोष्टीचें आपणास आवष्येक ते आम्हासहि परम अवष्येकता आहे, दुसरा विचार होणार नाही. आम्ही तुमचे आहो कळले पाहिजे. बहुत लिहिणे न लगे. लोभ असो दिला पाहिजे हे विनंती.



¶*Subrao Sindia to Chimaji intimating compliance with his instructions to proceed and join Vyankatrao in holding Nasarjang in check.*

श्री

यादी राजपत्रे :—

हिंदूराऊ घोरपडे यास पत्र जे, राजश्री नारो राम मंत्री व राजश्री कुसाजी भोसले यांची तुमची भेटी जाली. तुमचे निष्टेचा अर्थ याणी स्वामीस विदित केला त्यावरून स्वामी बहुत संतोषी जाले. तुमी पुरातन येकनिष्ट सेवक, तुम्हापासून निष्टेस अंतर होणार नाही हा स्वामीस भरोसा आहे. तुम्ही राजश्री मुरारराऊ घोरपडे यास हुजूर स्वामीसनिध पाठवावयाचा करार केला आहे, म्हणून राजश्री नारो राम मंत्री यासी करार केला आहे. तरी त्यांचीहि रवानगी लौकर करणे. स्वामीस तुमचे हातून महदकार्यें घेऊन ऊर्जित करावें हे अवशक आहे. तरी चितात दुसरा विचार न आणिता राजश्री मुरारजीराऊ घोरपडे यास हुजूर पाठवणे. राजश्री नारो राम मंत्री तुम्हासी बोलिले आहेत त्याप्रमाणे स्वामी तुमच्या मनोदयानरूप ऊर्जित करून देतील. वरकड कितेक आज्ञा करणे ते राजश्री नारो राम मंत्री यास केली आहे. लिहितील त्यावरून कलेल. म्हणून पत्र १

राजश्री बलवंतराऊ+ यास पत्र जे, राजश्री नारो राम मंत्री याणी जमावानसी तुम्हास कोपल प्रांते ठेविले आहेत. आणि येतेसमई तुम्हास त्या प्रांतीच बदोबस्ताविसी आज्ञा

राजश्री गोविंदराऊ मोरे व सुभानजी मोरे यांस पत्र जे, तुम्ही किले कोपल येथे स्थल रक्षून होता. सांप्रत राजश्री नारो राम मंत्री त्या प्रांते फौजेनसी गेले. तुम्ही येऊन त्यांची भेट घेऊन स्वामीच्या पायासी निष्ठा धरिली. तो अर्थ मारनिलेनी स्वामीस विदित केला त्यावरून स्वामी तुम्हावर बहुत संतोष जाले. तुम्ही कदीम राज्यातील सेवक. तुम्हापासून निष्टेस आंतर घडो पाहेल की काय? पुढेहि तुमचे सर्व प्रकारे ऊर्जित करणे स्वामीस आवशक आहे. तुम्ही आपले समाधान असो देणे. राजश्री नारो राम मंत्री याणी किले मारिं राजश्री बलवंतराऊ ठेवले आहेत. ते व तुम्ही येका विचारें राहोन त्या प्रांते चौका बसऊन सेवेचा मुजरा करून घेणे. तुमचे चिरंजीव राजश्री मानाजी मोरे आले. हुजूर स्वामीसनिध सुखरूप आहेत. त्याचे स्वामी सर्वाप्रकारे चालवितात, चिंता न करणे. वरकड कितेक आज्ञा करणे ते राजश्री नारो राम मंत्री यास केली आहे. ते लिहितील त्यावरून कलेल म्हणून पत्रें २

+Agent of Naro Ram.

केली त्याप्रमाणें त्या प्रांतीचा बदोबस्त करून स्थल जतन करून त्या प्रांतीचे वर्तमान वरचेवरी लिहीत जाणे. म्हणून पत्र १

¶*These are orders issued by King Shahu. One is addressed to Hindurao Ghorpade giving him assurance of promotion in return for his loyalty, and asking him to send Murarrao for an interview with the King. The other two refer to the occupation of the fort of Kopal by Balvantrao and Govindrao More. This letter refers to a successful Karnatak expedition by Naro Ram at the beginning of Shahu's reign, and further shews how Shahu strengthened his position by winning the confidence of the old sardars of the South.*

No. 8] *[6-1-1740 ?*

पौ छ २८ सवाल

श्री

पुरवणी राजश्री राऊ व तथा राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरि. छ १७ सवालीं रविवारीं प्राथःकालीं राजश्री फत्तेसिंगबावा यानी राजश्री स्वामीचा निरोप घेऊन सातारियास गेले. राजश्री रघोजीबावाहि सातारियास होते. याउपरि उभयेतांचा विचार होऊन सातारियाहून कूच करून ज्या रोखें जातील तें वर्तमान आलियावर स्वामीचे सेवेसीं लेहून पाठऊं. राजश्री पंत प्रतिनिधि व उभयतां घोरपडे येकत्र होऊन सगर प्रांते गेले म्हणोन वर्तमान आलें होतें. सांप्रत वर्तमान आलें नाहीं. आलियावर लेहून पाठऊं. राजश्री पंत प्रतिनिधि याचीं पत्रें राजश्री फतेसिंगबावास व राजश्री रघोजीबावास आलीं होतीं कीं आम्हांकडे येणें. त्याचीं उत्तरें यानी काये पाठविलीं तें कललें नाहीं. रविवारीं राजश्री फतेसिंगबावा गेले तेव्हां राजश्री येमाजीपंत याच्या डेरियास गेले होते. उभयेतानी खलबत केलें. मग निरोप घेऊन गेले. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare to Bajirao informing the latter that Fatesing and Raghuji had started for the South.*

No.9] [*6-2-1741*
छ २८ जिल्हेज

श्री

श्रीमंत महाराज राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक वेंकाजी सिवदेव कृतानेक सां। नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तो धर्म माहाराजांच्या कृपाकटाक्षेंकडून छ ३० जिल्काद पावेतों सेवकाकडील वर्तमान येथास्तित असे विसेष. श्रीमंत आपा स्वामीस कैलासवास जाहालियाचे वर्तमान आलें त्याजपासून श्रीमंताकडील द्यावयास यैवज नाहीं म्हणताहेत. आम्हींहि येक दोनीदां रदबदली केली कीं आरकाट प्रांतीची चौथाई व सरदेषमुखी श्रीमंतास आहे. आम्हीं कांही पैका सोडणार नाहीं, आणि तुम्हांसहि दिल्यावेगळें सुटणार नाही. रकारपूर्वकांस व वरकडास संमंध काये आहे? राजश्री स्वामींनी आमचे ताळूक आजी दाहापांच वर्षापासून आमचे स्वाधीन केला आहे, चालत आले आहे. आमचा तगादा सहसा सुटत नाहीं, यैसी रदबदल बहुत केली. सफदरआलीखान व रकारपूर्वकांसी आंतरंगें आण-भाष क्रिया जाहली आहे कीं निजामनमुळुकाचें भये आहे, इकडे आलियावरी पांचा वर्षांचा पैका साठी लाख परियेंत देणें आहे आणि आधिकाराचीहि घालमेली करून नवे जुने करील. तरी त्याविसईहि भरवसा रकारपूर्वकाने दिला आहे जे, येकंदर निजामनमुळूक चालोन आला तर त्यांसी कजिया करून परिहार करितों, आणि तुमचा अधिकार तुम्हांसच होये, यैसा विचार करून स्तापना होये ते करीन. आरकाटीची चौथाई व सरदेसमुखी आपणास जाहली आहे. श्रीमंतास संमध नाही यैसे वरचेवरी लेहून पाठवितो. श्रीमंत आपा स्वामीचें भये रकारपूर्वकाचे चित्तीं फार होतें, ईश्वरे थोर गजब केला. उभयेता श्रीमंताचे ठायीं माहाराज समर्थ आहां. यैसे समयीं अभिमान चित्तीं धरूण दुष्टाचें मर्दन करून गर्वहत करावयाचा समये आहे. जें करणे तो विचार निजामनमुक करीतच आहे. परंतु माहाराजानी मनी धरून अरकाट व त्रिचनापली देखील दोनी संवस्तानेचा मामला माहाराजांचे मारफतीने चाले यैसा केला पाहिजे. इतके निमित्य करणे माहाराज म्हणतील तरी रकारपूर्वकाचे चित्तीं षक्र[१]हि ठेंगणा आहे, आपणासमान सरदार भारी ये समयीं दुसरा कोण आहे? इतरांच्यानें होणें जाणें काये आहे? यैसा दुराभिमानास बहुत चढोन द्रिष्टि असमानास गेली आहे. फतेसिंगबावास तो गणनेत आणीतच नाहीं. त्यांची गोष्टी तिलतुल्या

१ शक्र=इंद्र.

चालीं देत नाहीं. जैसे चौथे सरदार तैसेच पांचवे हे आहेत. त्यांची गोष्टी येकंदर मानीत नाहीं. वरकड कितेक येथील अर्थ तान्हाजी जासुदास सांगितलें आहे, आणि येथील तमाम हकीकतहि पाहून आला आहे. विस्तारें सेवेसी निवेदन करितां चितारूढ होईल. सर्वज्ञाप्रति विसेष लिहिणें षक्ती नव्हे हे विज्ञापना.

¶*Venkaji Shivdev sends news to the Peshwa from Arcot about the movements of Raghuji Bhonsle and his dealings with Nawab Safdar Ali Khan, adding that the attitude of Raghuji Bhonsle was extremely defiant, setting at naught the authority of the Peshwa and of Fatesing Bhonsle.*

No. 10] [*February-March 1741*

श्री

श्रियाविराजित राजमान्य राजश्री आयाबा
स्वामीचे सेवेसी

पोष्ये वेंकाजी सिवदेव कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम जाणोन स्वामीनी आपणांकडील स्वानंदातिये कुषललेखन सदैव करीत असिले पाहिजे विसेष. पोष्य सुध दसीमीचे पत्र रा॥ कृस्णाजी नाईक जोसी यानी आपले गुमस्त्यास लिहिले कीं श्रीमंत आपा स्वामी दुर्वार्ता लिहिली तें वर्तमान तमाम मुळकात जाहालें. येथील आधिकारी सफदरआलीखानाने हे वार्ता यैकून पहिले द्रव्य देतो म्हणत होता. रिकामे निरोप देत नाही म्हणोन बहुत प्रकारें समाधानपूर्वक बोलत आला. आलीकडे श्रीमंत आपा स्वामींचे वर्तमान आल्यापासून उतर देतो कीं आपणापासी काये आसें ? तमाम राज्य वैरान जाहले. आपणापासी द्रव्य द्यावयास अनकूल नाही म्हणोन उतर देतो. किं-निमित्य म्हणाल तरी रा॥ रघोजी भोंसले यानी आरकाटकरांचा स्नेह करून भाकभरवसा दिला आहे कीं येथें कोणाचा उपसर्ग लागू देणार नाहीं. कदाचित निजामनमुळुक येऊन नवे जुने करून आरकाट सुभ्याची घालमेली करील तरी सकळविषयी आपण आहो यैसा भरवसा सफदरआलीखानास दिला आहे. त्या भरवसियावरून बसले आहेत. श्रीमंत नाना स्वामीची व निजामनमुळुकाची भेटी जाहली आहे यैसे समयी आरकाट सुभ्याची घालमेली करून नवे जुने करावयासी घालमेली केलिया उतम आहे. आणि येथील सुभ्यास येक पत्र निजामनमुळुकाचें पाहिजे कीं सुदामत श्रीमंत राव स्वामीचे विद्यमाने बारा वर्षापासून चालत आले आहे, तरी आताहि त्याचप्रमाणे श्रीमंत नाना

स्वामीचे मारफितीने आरकाटीची चौथाई व सरदेसमुखीचा मामला चालत आला आहे त्याचप्रमाणें आतांहि देत जाणे म्हणोन येक पत्र पाठविलिया द्रव्याचे कार्यभाग करून आलें जाईल. श्रीमंत राऊ स्वामीनी संपादिले स्तल आपले हतीचें दुसऱ्याकडे सहसा जाऊ न देणें. श्रीमंत आपा स्वामीचे वर्तमान रकारपूर्वकानी यैकून बहुत हर्ष मानिला आहे. यैसे समयीं निजामनमुलुकाकडून सुभ्याची घालमेली केलियां चौहू मुळीकी नांव होऊन आरकाटचा मामला येथाप्रकारे आपला होतो. वरकडाचे दंतभग्न केलेसारीखे होईल. सकलविषयी आपण चतुर आहां. जैसें कलेले तैसे रितीने आपणाकडील मामला हातीचा जाऊ न देता राहिला पाहिजे. विसेष कार्य लिहिणें हे विनंती.

¶*Venkaji Sivdev informs Ayaba that on receiving news of the death of Chimaji Appa, the ruler of Arcot has changed his attitude and has begun to give evasive replies to demands for Chauth and Sardeshmukhi. This recalcitrance of the Nawab the writer attributes to the instigations of Raghuji Bhonsle to whom the news of Chimaji's death was welcome.*

No. 11] [*1-2-1741*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

सेवेसी आज्ञाधारक वेंकाजी सिवदेव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तो धर्म माहाराजांच्या कृपाकटाक्षेंकडून ता छ २५ जिल्कादपावेतो सेवकाकडील वर्तमान येथास्थित असे विसेष. श्रीमंत राऊ स्वामीनी आरकाटकर सादुलाखानापासून स्नेह धरून आभिमानपूर्वक चालविलें. आरकाटकर सादुलाखानानीहि श्रीमंत राऊ स्वामीसीं स्नेह संपादून साल दरसाल येक लक्ष पंचाहतर हजार करार करून राजश्री स्वामीचीहि पत्रें आरकाटकरास श्रीमंत राऊ स्वामीनी करून दिल्ही कीं करार केला त्याप्रमाणे चौथाई व सरदेसमुखी देखील मोकरर केल्याप्रमाणें श्रीमंताचे विद्यमाने राजश्री स्वामीस प्रतिवर्षी देत जाणे. यैसा तह जाहालियावरी आठ दाहा वर्षें चालत आलें. सादुलाखान निवर्तल्यावरी अलीदोस्तखानांनेहि त्याचप्रमाणें चालत आला. राजश्री फतेसिंग भोंसले व राजश्री रघोजी

भोंसले हे उभयेता येऊन अलीदोस्तखानाचा आर्थं व प्राणं गेलें व तमाम राज्य लूटून फना केलें. सफदरअलीखान ते समयीं त्रिचनापलीकडे राहिला होता. हंगामा होऊन गेलियावरी मागून आला. त्याची आमची भेटी वेरूरीं+ जाहली. जे जाहलें ते ईश्वरास करणे ते होऊन गेले. श्रीमंत राऊ स्वामीनी बहुत दिवसापासून अभिमान धरून चालविलें आहे. त्यास आलीदोलाखान गेले म्हणोन श्रीमंताच्या श्नेहास आंतर तिलतुल्य पड्डू देणार नाही. पहिल्यापरीस विसेष श्रीमंताची कृपा संपादून घेईन. प्रस्तुत राजश्री फतेसिंगबावा व राजश्री रघोजी भोंसले या उभयतानी जबर्दस्ती करून च्यालीस लाख परियंत करार केले आहे. त्यांजकडील मोकदमा फरीर्क[१] जाहलियावरी श्रीमंताकडील कार्यभाग करून रवाना करीन म्हणोन ठेऊन घेतलें. वरचेवरी श्री(मं)ताकडील पत्रें येत गेलीं तों इतकियांत वर्तमान आलें की श्रीमंत राऊ स्वामीस कैलासवास जाहला. येथ रकारपूर्वकास बहुत हर्ष जाहला. हें वर्तमान रकारपूर्वकानी यैकतांच खुशहाली बहुतच केली. परंतु राव स्वामीचे ठायीं श्रीमंत आपास्वामी व माहाराज आहेत हा वचक रकारपूर्वकाचें चितीं बसला होता. रात्रींदिवस भयें वागवीत होता. तों इतकियांत सातारियाकडून कितेकाचें लिहिलें आलें आहें कीं श्रीमंत आपा स्वामीस व्येथा प्राप्त होऊन बहुत संकट आहे म्हणून पहिलें लिहिलें आलें. त्यामागून राजश्री कृष्णाजी नाइकानी आपले गुमास्त्यास पत्र लिहिलें की पोष्य सुध दसिमी दिवसीं श्रीमंत आपा स्वामीस कैलासवास जाहला म्हणोन लिहिलें आलें. तेंच पत्र सफदरआलीखानास गुमास्ते यानी वाचून दाखविलें आणि रघोजीचे लस्करास लिहिलें. त्याजवरून रघोजी भोसल्याने नाना प्रकारची कुस्याली केली, कीं आजी आपले चितानरूप जाहलें. जें सल्य वागवीत होतों ते ईश्वरें आनयासें वारिला. यैसा अहंभाव निर्माण जाहला आहे कीं आजी आपणासमान दुसरा कोण आहे? जें आहे ते आपणच आहे; वरकड किती असिले तरीं त्याच्यानें काये होणे आहे? म्हणोन अभिमानास चढला आहे. सफदरअलीखान यांसी व रकारपूर्वकांसी प्रमाणपूर्वक करारमदार जाहला आहे कीं कदाचित निजामनमुळुक येऊन सुभ्याची घालमेली करून नवें जुने करील, निजामनमुलुकाचे जाहागिरीबाबती सतर लाख रुपये देणें आरकाटकरांस आहे, त्यास घालमेली करील तरी ते विषयींची भाकभरवसा दिला आहे कीं कोणे विषयींची तोसीस लागों देणार नाही. कर्नाटक

+ Vellore.

१ चुकता; पावता.

प्रांतास निजामनमुलुक आला तरी रघोजी भोंसले व आरकाटकर मिळून निजामनमुळुकासीं टकर द्यावी यैसा तह केला आहे. आरकाट प्रांती चौथाई व सरदेसमुखीचा मामला आपणाकडे आहे, श्रीमंतास द्यावयास गरज नाही, म्हणोन यैसी पत्रें सफदरआलीखानास आली. श्रीमंत आपा स्वामीची दुर्वार्ता आलियावरी आम्ही येक दोनीदा सफदरआलीखानास द्रव्याविषयीं हटिकिलें. त्यास उतर यैसें दिल्हें की उभयेता श्रीमंत गेले. आतां आपणास द्रव्य द्यावास गरज काये आहे? सकल राज्य रकारपूर्कांनी आटोपिले आहे. द्रव्यहि च्यालीस लाख परियंत देणे आहे; त्यांचे हातीतून निर्गम जाहालियावरी मग पुढील विचार पाहून घेतल जाईल. प्रस्तुत उभयेता सरदार फौजेनसीं मुलुक सोडून गेले नाहीत. आद्यापिवरी राज्यांत धामधूम करीताहेत. तसियानसीं उभयेता श्रीमंतास कैलासवास जाहला. ज्याणी ज्याणी श्नेह केला ते सर्वहि गेले. आतां आपण कोणासी श्नेह करून सार्थक काये आहे. आपल्याच्याने द्रव्य द्यावयास आनकूल पडत नाहीं. यैसे स्पष्ट उत्तर सफदरआलीखान देतो. आम्हीहि उत्तर दिल्हें कीं उभयेता श्रीमंतापेक्षां माहाराज अधिक आहेत. कोणेविषयीं नून्य काये आहे? तमाम हिंदुस्तान प्रांतीचा मामला देखील दाखल जाहला आहे आणि सार्वभौमानें कृपा करून बहुमानाचा सिरपाव पाठविला. माळवा दरोबस्त दिला. निजामनमुळुक याची बहुत कृपा आहे. श्रीमंत राऊ स्वामीचा जेणेप्रमाणे निजामनमुळुक गौरव करीत आला आहे त्याहिपेक्षा विसेष श्रीमंतास करून समागमे ठेऊन घेतले आहे. यैसा विचार आसोन काये निमित्य द्रव्य द्यावयास आनकूल नाहीं म्हणता? हे गोष्टी उक्त नव्हे. आपण कांही चौथाई व सरदेषमुखीचा करार जाहला आहे त्याप्रमाणे द्रव्य दिल्याखेरीज सुटणार नाही म्हणोन उत्तर दिल्हे. सफदरआलीखानाचे चितीं आहे जे, येकंदर श्रीमंताकडील श्नेहांस अंतर करून रकारपूर्वकांसी श्नेह केला आहे, वरकडाच्याने काये होणे आहे यैसा त्याचे चितीचा भाव दिसतो. आनयासें माहाराजांचा व निजामनमुळुकाची भेट जाहली आहे. आरकाटची सुभ्याची नवी जुनी तगीरी बहालीचे विचार करीत असतील तरी माहाराजानी चितीं धरून श्रीमंत राऊ स्वामीनी संपादिलें संवस्तान तें रकारपूर्वकाकडे जाऊं न द्यावें. यैसें समयीं जें वचन माहाराज निजामनमुळुकास सांगतील तें तात्काल करून देईल. बहुता दिवसापासून चालत आलें आहे तें सहसा न सोडावे. कदाचित सुभ्याची व्रालमेली केली तरी उतम आहे आगर हेच करार जाहाले तरी निजामनमुळुकाची ताकीद यैसी पाहिजें की सुदामत श्रीमंत राऊ स्वामीची कृपा संपादून घेऊन जैसे देत आलेत तैसेंच आतांहि माहाराजांच्या मारफतीने आरकाटीचा यैवज देत जाणें.

ये इषयी गर्व कराल तरी कार्यास येणार नाहीं. यैसी दबावणीची ताकीद आलियाविना द्रिष्टी उघडणार नाही. सर्वज्ञाप्रति विसेश लिहिणे षंकी[१] नव्हे हे विज्ञापना.

¶Venkaji Sivdev reports to the young Peshwa the mischievous activities of Raghuji Bhonsle who had invaded the Karnatak. When in the midst of the campaign news reached him of the death of Bajirao and Chimaji Appa, the only persons who could curb him and of whom he theretofore stood in great awe. Being thus relieved of this check on his activities, Raghuji made himself master of the situation, wrung large amounts of money from the Nawab, Safdar Ali, by promising him help in difficulty. The Nawab being advised not to recognise the Peshwa's claims of Chauth and Sardeshmukhi was evading payment. The writer advises the Peshwa to bring pressure to bear on the Nawab through the Nizam.

No. 12] *[3-3-1741*

पौ २६ मोहरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री राऊंजी[+] स्वामीचे सेवेसी

विनंती वैजापूरचे मुक्कामाहून पत्रे स्वामीकडे पाठविले आहेत पावोन अर्थ चित्तात आला असेल. आलीकडे वर्तमान. नवाब बारी चढलियावरी संगमनेर जुन्नराकडे जावे हे अवाई टाकून वैजापुरावरून पुणतांबियास आले. तेथें सोभागसिंग वगैरे इकडील ग्रहस्तानी अर्ज केला कीं नाशिकाकडे कित्येक काजे कामे आहेत, गनिमानी किल्ले घेतले आहेत, हजरत तिकडे आलियावर हस्तगत होतील. अकोल परगणियांत गेल्यासी अबदुल आजीजखां जुनरास बलावला आहे, त्यासी शह पोहोचेल, यैसे कित्येक अर्थ दर्शऊन तो रोख टाकून तामसवाडीचे मुकामास आणिले. तदनंतर नाशिकाकडील विचारहि टाळून सिन्नरावरून मुक्काम मजकुरास छ १२ जिल्हेजी आले आणि सोभागसिंगाबाार पांचसे पाये माणूस सहा हजार स्वार देऊन किल्ला बितिंगो[२] येथें रवाना केले. अगोधर गंगातीराहूनच आपण राजश्री हरिकृष्ण व राजश्री बहिरजी बलकवडे यास सावध केलेच होते. त्याणी कल्याणाकडे राजश्री संकराजी केशव यासी लेहून तिकडूनहि जमाव आणविला व आपण किल्लोकिल्ली

---

१ षक्त=शक्त=शक्य ?. + पत्र नानासाहेबांस असावें. २ इगतपुरीजवळ.

बलकटी केली होती. तो बितिंगियास हे जाऊन फौज तो खालीं दो कोसावर पाण्याचे आसरियानें राहिली. पायेचे माणूस सोभागसिंग घेऊन किल्ल्याचे बरोंडीस[१] जाऊन तीतर्फा मोर्चेबंदी केली. वरचे लोक सावधच होते. त्याणी दगड धोंडा एक वेळ मार केला. तेव्हा तैसेच दडोन असरा पाहून मोर्चेकरी राहिले. खालून मार जेजला रेकिले याचा करतात. परंतु कारागीर होत नाहीं. गडकरी तरी मजबुद बसले आहेत. गला व दारु गोली सामान पोख्ता आहे. आजी बारा रोज जाले, सोभागसिंग कस्त करितात; परंतु एकदोन माणूस जायाच होते. वरी शह पोहचत नाहीं. हरि कृष्ण व बहिरजी बलकवडे याणी कावनेई[२] मदनगडची मजबुदी करून अलंगकुरंगेवरील कांहीं माणूस व कोकणांतून खंडो चिमणाजी पांच सासे माणूस कांहीं स्वार घेऊन आले त्यास घेऊन बितिंगियाचें उपरालियासी चोकोसावरी रानांत येऊन राहिले आहेत. किल्ल्यावरी माणूस युक्तीनें पाठवून हरद्र मनास आणिले, तो वरील लोक हिमतीनें आहेत; कोणेविषयीं डगमगत नाहीं. नवाब या मुक्कामी तेरा रोज जाहले, इरेस पडिले आहेत. किल्ला घ्यावयाचा अत्याग्रह मांडिला आहे. पहिलेच आम्ही कोठूनहि यासी गेलो होतो, तेव्हां नवाबानीं बलाऊ पाठवून नेले. आपण लष्करास आल्यावरी नवाब ते दिवशीं पटा किल्ला पहायासी गेले होते. खान सैद लष्करखान याणी आम्हास बोलाऊन नेऊन फर्माविले कीं किल्ले आमचे गनिमानी घेतले आहेत, ते किल्लेदारास लिहून खाली करून देवणे; यां[३] राजश्री मल्हारपंत या तालुकियाचे जिल्हेदार आहेत किल्ले व जागिरी किल्याच्या त्याचे स्वाधीन आहेत त्यास लिहून किल्ले कावनाई, अलंग, मदनगड, बितिंगा चारी देवणें म्हणोन मुख्यानीं आज्ञा केली आहे, याचा जाब खानानी पुसिला. ते समई आपण उत्तर प्रत्योत्तर केले कीं आम्ही वकील. काजकाम असले तरी खावंदास लिहावे. ते धनी आहेत. आज्ञा करितील तैसी वर्तणूक करावी. आपल्याच्यानें किल्ले देवत नाहीं व आमचे बोले किल्लेदार किल्ले देतील हा अर्थ नाहीं. मलारपंत तरी सरदेशमुखीचा मात्र तालुका करून अमल करितात. किल्लेजात त्याचे निसबत तिलतुल्य नाहीं. किल्यावरी माणूस हुजुरचे आहे. ते विना श्रीमंताची आज्ञा किल्ला देतील हे गोष्ट नाहीं. यैसी कित्येक उत्तरें दिल्यावरी खान बोलिले कीं आम्हास खामखा किल्ले घ्यावे लागतात; हरयेक यत्नें किल्ले घेऊन, यैसे बोलिले. तेव्हां आम्ही जाब दिल्हा कीं श्रीमंताचा नवाबाचा सख्याचा विचार. किल्ले मागणेच होते तरी येदलाबादेवरी भेटी

---

१. माची. २ इगतपुरीजवळ.

जाल्या, तेव्हांच मजकूर करावा होता ते गोष्ट न केली, आणि ते तिकडे गेल्यावरी मागें हे विचार करितात, तरी सल्ला कैसा राहतो ? बिगाड करितांसे दिसोन येते. खानानीं उत्तर दिल्हे कीं गनिमानी किल्ले घेतले ते सलुखांतच घेतले आहेत. आपण फिरोन घेतल्यास सल्ला काशानें बिघडेल, या प्रकारे बोली जाली. दुसरें दिवशीं खाश्यानेहि बोलाऊन नेऊन हाच मजकूर केला. ते वेलेसहि तोच जाबसाल केला. हे वर्तमान श्रीमंत मलारपंतास लिहिले व तुम्ही कोणेविषीं चिंता न कीजे म्हणोन लिहिले; त्यासी पंतानीं काये विचार केला न कले. छ १४ रोजीं रात्रौ उठोन बावीवरून सांवरचोलाचे घाटानें देसास गेले. भिवरातीर पावल्याचे पत्र आले. पुढें पुण्यास पावले असतील. आलीकडे नवाब वरच्यावरी[1] कुमकहि पाठवितात. मावले लोक चाकर ठेऊन दोनतीनसे पाठविले व मदनगड कावनाईकडे मावले पाठविणार. सोभागसिंग वरचेवरी अर्जी देतो कीं किल्ला जेर केला, आजी उध्यां हस्तगत करितो, त्याजवरून यांस आशा लागली आहे. किल्ला तरी आजीवर मेचर्ते नाहीं. याउपरी पहावे. राजश्री हरि कृष्ण यास लेहून एकवेल रात्रौ मोर्चेकरियास नसीयत पावावयाचा विचार करविला आहे. तो विचार जाल्या, यांचे डोले उघडतील. सोभागसिंग लिहितो ते मिथ्या होऊन हर एखादा निकाल काढून येथून कुचाचा विचार करितीलसे दिसते. खानाचे विचारेही येथून कूच दारमदार करून करवावे ऐसे आहे. परंतु अबदुल अजीजखान राऊ जानोजी पुढील प्रसंगी आहेत ते वृत्त आलाहिदा पुरवणीवरून कलेल. बहुत काय लिहिणे ? मिति फालगुन वा। १२ भौम हे विनंती.

¶*This is a news-letter by Baburao Malhar Barve narrating the attempts made by the Nizam and Subhagsing to recover the forts taken by the Peshwa. The forts were reinforced by Balkawade, Sankraji Keshao and others and therefore could hold out against the attacks of the Nizam. The letter also gives the substance of a conversation between the Nizam and the writer who tried to bring home to the Nizam that the attack on the forts was a violation of the treaty of Edlabad.*

No. 13] [*11-3-1741*

श्री

राजमान्य राजश्री जिवाजी गोसावी यांसी

सेवक सदाशिव चिमणाजी नमस्कार सु।। सन इहिदे आर्बैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्र पाठविलें ते पावलें. लिहिले कीं आज्ञेप्रमाणें राजश्री रामचंद्र

१ स्वाधीन होणें.

हरि यांजपासीं आहों म्हणून लिहिलें उत्तम. त्याचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करणे. याउपरी संगमनेर वगैरे येथें तालुक सियादतखान याचा जाहला. त्यास मौजे असी उंबरी येथें पागा सरकारची राहते, ते गावीच्या बंदोबस्तास त्याजकडील च्यार माणसे राजश्री शामजी गोविंद याचें पत्र घेऊन येतील ते मौजे मजकुरीं राहोन अमल ते आपला करतील. त्यास तुम्हाकडील तेथें मौजे मजकुरी असेल त्यास तुम्ही लेहोन पाठऊन ते चौघेजण त्याजकडील गावात घेऊन त्यांचा अमल सुरळीत चाले ते करणे. त्यासी कोणी खटखट न करीत ते करणें. पेस्तर वर्तमान लेहोन पाठवणे. येथून आज्ञा कर्तव्य ते केली जाईल. संगमनेर प्रांते पागेची वगैर ठाणी पाडावयाचा नवाबांनी हुकूम केला, तेव्हां मौजे मजकुरीचें ठाणेहि पाडावयाची फौजेस आज्ञा केली. त्यावरून राजश्री शामजी[1] गोविंद याणी रदबदल करून सदरहूप्रमाणें करार करून येथें लेहोन पाठविलें. त्याजवरून आम्ही रा। मानसिंग यांचे नावे पत्र लेहोन दिल्हे आहे ते पत्र घेऊन खानमारनिलेकडील लोक आमलास मोजे मजकुरास येतील त्यास गावात घेऊन त्याचा अमल चालवणे. तुम्हीहि तेथें तुम्हाकडील असतील त्यांस लेहोन त्याचा अमल चाले आणि नालीस कुंची[2] न करीत ते गोष्टी करणे. कथला जाहलिया ठाणेयासी कजिया होईल. जाणिजे छ ४ मोहरम.

¶*Sadashiv Chimnaji to Jiwaji communicating orders on the settlement of the dispute about Sangamner with the Nizam's Officers.*

No. 14] [*4-11-1744*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक नेगोजी पा। सां। दडवत विनंती उपरी. येथील क्षेम ता। छ १० माहे सौवालपावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. साहेबांची आज्ञा घेऊन आलों ते छ ४ सौवाली लस्करास रा। संकराजी निकम याजवळ पावलों. दुसरे दिवशी छ ५ रोजी मंगळवारी प्रातःकाळीं मोगल तळावर चालोन आला, मग आपणहि चालोन गेलो. ते प्रातःकाळचे प्रहर दिवसास मोगलाची आमची गाठी पडिली. ते प्रहर दिवसापासून संध्याकाळपावेतो युध्य जालें. साहेबाचे पुन्यप्रतापेकरून मोगल सिकिंदा करून सोडून कसबियांत घातला. ऐसियासी मोगल आपणावर चालोन आला तेव्हां त्याचा मुद्दा जे यांजला

---

१ श्यामजी गोविंद निजामाकडे वकील पेशव्यांचा. हरि जिवाजी कोण? २ चेष्टा.

3804

पिटून गंगापार करावे आणि तमाम परगणियांतील मातबर गाव पाडावे आणि कुली पाटील व रयत धरून न्यावी, ऐसे करार करून चालोन आला, त्यासी साहेबाचे पुन्येकरून आपणासच यश आलें. मग सर्व गोष्टी राहिल्या. ऐसियासी आपण आइकिले कीं नवाब नासरजंग याजकडून अर्जबेगी साहेबाकडे येणार आहे म्हणोन आपण आइकिले. तर खोजे हशम याणे खंडाळे व वैजापूर मिळोन इजारा रुो. तेवीस हजारास केला आहे, तरी साहेबी कृपा करून दो परगणियाचे तेवीस हजार रुपये मोगलाची निशा करून मोगल दूर होय ते गोष्ट जाली म्हणजे सर्व परगणा राहतो. नाही तर परगणकरी तों मोगलास रजावंत नाहीत; म्हणतात की मोगल येथून गेला तर आपण राहतो, नाही तर आपणास लक्षाची जोड जाली तर राहत नाहीं. मोगल राहिला म्हणजे आपणास सहकुटुंब बंदीस घाल(णार) आणि संगमनेर परगणा वैराण जाला तैसाच होईल ऐसे म्हणतात. यास्तव हे विनंतीपत्र सेवेसी लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति. तथापि हा मोगल दूर करावा; नाही तर हा दूर करून दुसरा आणावा. परंतु याजला राहू न द्यावा. सेवेसी बहुत विस्तारें विनंतीपत्र ल्याहावें तर साहेब खावंद आहेत हे विज्ञाप्ति.

¶Negoji Patil to the Peshwa reporting a skirmish with the Nizam's forces on 4th August somewhere near Vaijapur and negotiations started by Nasarjang.

No. 15] *[21-1-1748*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामी व तथा राजश्री
भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो विठ्ठल दिमत राजश्री नागो राम चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागाईत छ १ सफर प्रातःकाल मुकाम शेहर अवरंगाबाद येथें स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. नवाब असबज्याह व नासरजंग काल छ ३० मिनहूस तिसरें प्रहरीं शेहरांत हवेलीदाखल जाले. लष्कर काले चबुत्रियाचें आसपास उतरलें आहे.

सुलतानजी निंबाळकर करणपुऱ्यावर उतरला. पठाण भावसिंगपुऱ्यावर उतरले. सुभेदार कंचेनवाडीवर उतरले आहेत. भिकाजी वाकडा याचे जबानीं बातमी लिहिली असें. राजश्री नागोराम सातारियास दीक्षिताचे घरीं आहेत. स्वामीस कळावें. विशेष काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*Naro-Vithal informs the Peshwa that the Nizam-ul-mulk and Nasarjang are encamping near Aurangabad.*

No. 16] [*21-1-1748*

छ ४ सफर रविवार

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नागो राम चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागाईत छ १ सफर मुकाम सातारे नजीक शहर येथें स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. नवाब असफज्या व नासेरजंग तमाम फौजेनशी शहरास काल दोन प्रहरास दाखल जाहाले. तमाम लष्कर व सरदार व तोफखाना वगैरे शहराबाहेर काले चबुत्र्यावर आहे. उभयेता पितापुत्र शहरांत आपले हवेलींत दाखल जाहाले. राजश्री पिलाजी जाधवराव नक्षेत्रवाडीचे व कंचेनवाडीचे * * ध्यं नदीवर राहिले आहेत. शहरांत वार्ता तव आहे कीं स्नेह जाहाला; परंतु वरचेवरच जाहाला; यास कांहीं चिंता प्राप्त जाहाली म्हणोन हा उठोन शहरांत येऊन राहिला हे वार्ता आहे. हस्तनापुरचें वर्तमान काल सायंकाळीं शहरांत येकां दो जागां सावकारियांत ऐकिलें कीं, हस्तनापूरकर राजा तांब्र यास देवआज्ञा जाहाली; वेथा नळगुद जाहाली. म्हणोन दो चव जागा वर्तमान फुटलें; सत्तेंमिथें ईश्वर जाणें. बहुधां हें सतें वर्तमान असेल म्हणूनच हा तांब्र शहरांत आला. हा न येतां हे वार्ता फुटतीच तर येथें शहरांत पातशाहागर्दी होती. याजकरितांच हे उभयेतां शहरांत दाखल जाले. ऐकिलें वर्तमान सेवेसी लिहिलें; आणखीं येक दोन लिहिलीं येतील तेव्हां सतें मानावें. आपण वार्ता ऐकिली म्हणून सेवेसी लिहिलें. आपण सातारियास राजश्री वासुदेव दीक्षित यांचें घरीं राहिलों. शहरचें वर्तमान राजश्री नारो विठ्ठल यांनीं सर्व लिहिलें त्यावरून कळेल. सेवेसी श्रुत होय. मज जशी आज्ञा येईल तशी वर्तणूक करीन. येथें सांप्रत वर्तमान लिहावयास फार आहेत. आज्ञेप्रमाणें वर्तणूक करीन हे विज्ञापना.

¶*The arrival of Nizam-ul-mulk and Nasarjang at Aurangabad is communicated to the Peshwa by Nago Ram. The rumour of the death of the Emperor is also reported.*

No. 17] [About 17-12-1745 ?

पो छ १४ जिल्हेज.

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं

कृतानेक विज्ञापना. छ १ जिल्हेजीं [1]पांचोडचे मुकामीहून कूच करितेसमई नवाबानें आज्ञा केली कीं आम्ही सोमवंसियाचे कर्जाचे मजकुरांत रावजीस खत लिहिलें आहे व तुम्हीं कितेक मजकूर सांगितलेत, त्या मजकुराचें येक खत लिहिलं आहे. खतें तयार आहेत. आम्ही शहागडचे मुकामीं जातांच खतांवर मोहरा करून थैली तुम्हांकडे शहरास मुजरद माणसाबरोबर पाठवितों. आमची थैली तुम्हांजवल पोंहचलियावर तुम्हीं खतें लिहिलीं आहेत ते रवानगी करणें. दरम्यानें न करणें म्हणोन बोलोन स्वार जाले. सेवक शहरीं आलियावर दोन तीन दिवस प्रतीक्षा केली तों थैली न आली. याजकरितां विनंतीपत्राची रवानगी हुजूर केली आहे. सेवकासमागमें जासूद जोडी येक आहे ते रवाना करावी तर लस्करास जावयास कोण्ही माणूस बराबर नाहीं, याजकरितां अंजुरदार करून पाठविला आहे. सेवक छ ८ जिल्हेजीं शहरींहून स्वार होऊन नवाबाजवल जातों. सेवकाजवल सरंजाम केवल नाहीं. घोडी स्वारीची आहे ते वृध्ध, सुधी चालत नाहीं, व जीन आहे तो अगदीं गळाला. स्वामीनें सकलाद दिली आहे तिणें जीन आछादून स्वारी करीत असतों. प्रस्तुत लस्कारास जाणें याजकरितां येथें येक राहुटी सिध्ध करविली व राहुटींत येक जाजम करविलें व स्वयंपाकाकरितां लाहानसी येक कनात करविली. सेवकाजवल कंठालेचा येक तटु आहे. त्याजवर ओझे सर्व न चाले, याजकरितां येक बैल भाडेयानें केला. या प्रकारें बेगमी केली. जर याप्रमाणें न करावें तर स्वामीचा नांवाचा लौकिकहि राहिला पाहिजे. वरकड मालाचा [2]मोल आहे तोच आहे. सर्व प्रताप स्वामीनें भूषण दिधलें त्याचा आहे. समागमे पोरगे दोगेजण आहे. कचेरीस जावें तेव्हां येक घोडे धरावयास पाहिजे व येक समागमें असावा. तेव्हां मागें कंठालेजवल येक ब्राह्मण मात्र राहतो. सेवकाचें वर्तमान या प्रकारचें आहे. पुढें सर्व उर्जित करावयास व परवर्दा करावयास स्वामी समर्थ आहेत. येथें खर्चवेंच होईल त्याचा हिसाब मागाहून हुजूर लेहून पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter from Nasarjang's camp. The writer describes his humiliating position for want of funds.*

---

१ पाचोरा, पूर्वखानदेश. २ दुर्दशा.

No. 17-A] [17-12-1745?

पो छ १४ जिल्हेज

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

कृत्‍वानेक विज्ञापना. नवाब नासरजंग यांचा पेशखाना[1] निघाला. नवाब असाफज्याहाचे भेटीस जातात हें वर्तमान पूर्वी विनंतीपत्रीं लेहून सेवेसीं पाठविलेंच आहे. येैशास छ २७ जिलकादीं नवाब नासरजंग शहराहून कूच करून जसवंताचे तलेयावर डेरेदाखल जाले. कुचाचे समई सेवकास खलबतांत बोलाऊन आज्ञा केली कीं तुम्हीं जसवंताचे तलेयावर तिसरे प्रहरीं येणें. ते जागां तुम्हांजवल जाबसाल केला जाईल. नवाबाचे आज्ञेप्रमाणें तिसरे प्रहरीं जसवंताचे तलेयावर डेरेयास गेलों. सेवट ते दिवशींहि काहीं मजकूर न जाला. नवाबानें आज्ञा प्रहर रात्रीस खलबतांत बलाऊन केली कीं आज बोलावयास अनुकूल पडत नाहीं. उदैक आमचा कूच आहे, तुम्हीं मजलपावेतों येणें. तेथून तुम्हांस रुसकत देऊन. दुसरे दिवशीं छ २८ जिलकादीं नवाब कूच करून चिखलठाणे[2]यास गेले. सेवकहि तेथें गेला. तेथेंहि रात्रौ खलबतात बोलाऊन आज्ञा केली कीं येथें अनकूल पडत नाहीं. पुढील मजलीस रुसकत देऊन. छ २९ जिल्कादीं नवाब कूच करून चित्तेपिंपलगावावर मुकामास गेले. ते दिवशीं रात्रौ नवाबानें सेवकास खलबतांत बोलाविलें. येथें दुसरें कोणी नव्हतें. तमाम लोक दिवाणखान्यांत होते. नवाबानें सेवकास आपणासमक्ष बसऊन वर्तमान विचारिलें. स्वामीचे आज्ञापत्राप्रमाणें सविस्तर अर्थ निवेदन केले. यावर तुम्हांस रावजींची पत्रें आलीं तीं रुजू करणें म्हणोन आज्ञा केली. तेव्हां स्वामीचे खासदस्तुरें पुरवणी होती ते रुजू करून वाचून दाखविली. बहुत संतोष पावले. त्याचे प्रत्योत्तरांत नवाबानीं मजकूर सांगितले आणि आज्ञा केलीं, आम्हीं सांगितल्याप्रमाणें तुम्ही कलमबंद करून प्रात:कालीं आइकवणें. मग तुम्हांस रुसकत देऊं, शहरास जाणें. नवाबाचे आज्ञेप्रमाणें रात्रौ सविस्तर अर्थाचें विनंतीपत्र लेहून सिद्ध केलें. प्रात:कालीं दिवाणखानेयांत गेलों, तों नवाबानीं खलबतांत बोलाऊन आज्ञा केली कीं येथें ऐकावयास अनकूल पडत नाहीं, पुढें मजलीस येणें. छ ३० जिल्कादीं नवाब कूच करून पाचोडेचे मुकामास गेले. तेथें रात्रौ खलबतांत बोलाऊन मुख्य

---

१ डेरे वगैरे सामान. २ चाळीसगांव तालुका.

विनंतिपत्रीं सविस्तर अर्थ लिहिले आहेत ते सविस्तर श्रवण करून अक्षरशा अर्थ मनास आणिला. याजवर बहुत संतोष पावले. वरकड वर्तमान अल्लाहिदा पुरवणी-पत्रीं लिहिलें आहे त्यावरून सेवेसी विदित होईल हे विज्ञापना.

¶*News-letter from the camp of Nasirjang, who read and approved the letter drafted by the writer, probably Raghunath Ganesh.*

No. 18] *[5-9-1749*

छ ११ शौवाल.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणांवरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामींचे कृपादृष्टीनें सेवकाचे वर्तमान तागाईत छ ३ माहे सवाल पावेतों मुकाम औरंगाबाद येथास्थित असें. खंडोपंत कारकून राजश्री बापूजी महादेव हिंगणे यांजकडून राजश्री रामचंद्रबावाचे मारिफतीनें येथें नवाबाजवळ आला आहे. अबदल हुसेनखान यांचे मारिफतीनें रात्रौ खलबतांत नवाबाची मलाजमत जाली. बहुत रात्रपर्यंत खलबत जालें. पश्चात् रात्रौ मकई दरवाजा उघडऊन मशारनिलेस बेगमपुरियांत पोंहचविले. काय जो मजकूर जाला हें कळलें नाहीं. सर्वांस हे गोष्ट अगम्य. सर्व पुसत असतात. मशार-निले रामचंद्रबावाचें आगमनाची प्रतीक्षा करीत आहेत. नवाबजवल जाबसाल जालियावर येक जोडी रामचंद्रबावाकडे पाठविली. या मजकुरास दाहा बारा दिवस जाले. गोष्ट तहकीक ठिकाणीं लागली नव्हती म्हणोन पेशजी विनंती लिहिली नाहीं. सेवेसी श्रुत जालें पाहिजे. रामचंद्रबावा बऱ्हाणपुराअलीकडे आले म्हणोन येथें वर्तमान आलें आहे. सैदलष्करखान व अबदुल रजाकखान अद्याप कृष्णेअलीकडेच आहेत; पार जाल नाहीं. त्यांचे तैनातीस राजश्री सुलतानजी निंबाळकर व जानोजी निंबालकर यांचे राऊत होते. ते रोजमरा न पावे म्हणोन उठोन आले म्हणोन वर्तमान आहे. कळलें तें सेवेसी विनंती लिहिली आहे. छ ३० रमजानीं दरबार बरखास्त जालियावर काजी दाईम व मुसवीखान मुसवी या उभयतांनीं राजश्री बनाजी माधवराव व सेवकास दिवाणखान्यांत येकीकडे नेऊन मजकूर केला कीं रावसाहेबाची मर्जी मुजफरजंगाविशी कशी आहे हे गोष्ट तुम्हांस कळलीच असेल, जाहीर करणें. त्यांचा वकिलहि रावसाहेबांचे खजमतेस आला होता, त्याची बिदाई जाली म्हणोन आईकितों. त्यास उतर केले की हे गोष्ट आम्हास काही दखल नाही. वकील आला होता तो माघारा गेला, इतके

3809

आइकतो. दुसरें ठावकें नाहीं. मशारनिले उभयतांनीं बहुत प्रकारें आम्हां उभयतां सेवकांजवळ पुशिलें, परंतु सदरहूप्रमाणेंच बोलिल्यावर बनाजीपंतास बोलिले कीं तुम्हांवर नवाब बहुत मेहरबान आहेत. तुम्हांस बहुत चाहतात, तुम्हास रुकसत करितात, परंतु तुम्ही तेथें जाऊन सदहू गोष्टीचा शोध करून मर्जी कोणे प्रकारची आहे ती मनास आणून लेहून पाठवणें. वकील लोकीं दुतर्फाही येकसानी धरून परस्परें स्नेह वाढवावा म्हणोन कितेक प्रकारें बोलिले, तें सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. बनाजीपंतास निरोप लवकरच होईल. मशारनिले हुजूर आलियावर सविस्तर वर्तमान विदित करतील. सेवेसी श्रुत जालें पाहिजे. रामचंद्रबावा आज पैठणदाखल होणार म्हणोन वर्तमान आहे हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reporting to the Peshwa the arrival of Ramchandrababa beyond Burhanpur and that Said Lashkar Khan and Abdul Razak Khan had crossed the Krishna preparatory to marching into the Karnatak.*

No. 19] [*20-10-1746*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. राजश्री गोविंद सिद्धेश्वर नवाब असफज्याहा जवलोन खानदेशांतील नव माहाल इजारा करून आले तें वर्तमान पूर्वी विनंतीपत्रीं सेवेसी विनंती लेहून पाठविलीच आहे. नवा माहालांपैकी [१] जलोद परगणेयांत खान अजम सैद लष्करखानाची जागीर गांव च्यार; पैकी कसबें जलोद व कसबें नांदेड व सोनखेडवी तीन गावीं हिसा आहे व मौजे धावडे हा गांव दरोबस्त आहे. परगणें मजकुरीं गोविंदपंताचे इजारेयाचे गांव येकुणीस आहेत. येकुणीस गावांत सदहू खानांचे जागिरीचे हिसेयाचे गांव तीन आहेत. त्या गावांत गोविंदपंताचे इजारेयाची तकशीम आहे. ऐशास गोविंदपंतीं जलोद परगणेयांत आमील पाठविला. त्याणें खानाचे जागिरीचाहि अमल जप्त केला. हें वर्तमान खानाचे आमिलानें खानास लेहून पाठविलें त्यावरून छ १९ सवालीं खानांनीं गोविंदपंतांस कचेरीस बोलाऊन आणून बहुत फजित केला. शिवागाळ बहुत केली. तिसरा पाहर पावेतों बैसविले होतें. कटारी हिराऊन घेतली होती. तृतीय प्रहरानंतरें मग समजावीस केली. कटारी दिली. पानें दिली. बिराडीं जावयास निरोप दिला. सेवेसी विदित व्हावयाकरिता विनंती लिहिली आहे.

---

१ पूर्वखानदेश.

बहालकर जमीदार कोठींवाले यांचे पारिपत्याकरितां खानाजवळ आले आहेत. वर्तमान सेवेसी विदित आहेच. सेवकानेंहि खेडगावकर पाटलाचे दगाबाजीचा अर्थ खानांस सांगितला त्याजवरून बोलिले कीं गोविंद सिद्धेश्वरास ताकीद करितों. त्यानें फौज धरली आहे. पारिपत्य करतील. छ १४ सवालीं खानांनीं गोविंद-पंतास बोलाऊन ताकीद करावयाची ते केली. बहालकर जमीदारहि त्याचे हातांत दिले. मग छ १९ मिनहूस गोविंदपंतास फजित केलें. स्वहस्तें मुखावरहि मारिलें. गोविंदपंतांचे अवसान गेलें आहे. सेवेसी श्रुत व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. श्रुत होय हें विज्ञापना.

¶*A complaint to the Peshwa about the insult offered to Govind Sidheshwar, Kamavisdar of Pargana Jalod in Khandesh, by Said Lashkar Khan.*

No. 20] [*14-11-1746*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. खान अजमानी कबुतरें दिलीं तीं छ १७ सवालीं हुजूर स्वामीचे सेवेसीं रवाना केलीं. प्रविष्ट जालींच असतील. छ १० सवालचीं आज्ञा-पत्रें पूर्वी सादर जालीं त्यांत आज्ञा, कीं घेरणी कबुतरें खामखा मेलऊन पाठवणें. येशास पूर्वी खान अजम शहरीं असतां त्यांहीं घेरणी कबुतरांचा बहुत प्रयत्न केला; तथापि मिलाली नाहीं. याजकरितां जीं मिलालीं तींच हुजूर रवाना जालीं. किले जुनर चाकणचे भजकुरांत स्वामीने खानास पत्र पाठविलें होतें तें पत्र नवा-बाचे आज्ञेवरून जासुदाबराबर खानाकडे पाठविलें. त्याजबराबर सेवकानेंहि खानास पारसी अर्जी लिहिली. बेकारपूर्वकाचा[1] व रकारपूर्वकाचा[2] मजकूर व आणिखी स्वामीनें सेवकास आज्ञापत्रीं आज्ञा केली होती ते अर्थ, व येथें नवाबा-जवळ त्या गोष्टीचा जाबसाल जालियाचे अर्थ, व गुलशनाबाद खानास जाली त्याची मुबारखबादी[3] स्वामीने सेवकाचे पत्रीं लिहिली तो अर्थ व घेरणी कबुतरांची मुकरर ताकीद आली आहे म्हणोन सविस्तर खानास लेहून पाठविलें होतें. त्याचा जाबसाल खानाजवलोन घेऊन जासूद परभारेच हुजूर आले असतील. त्या अर्जीचे जाबान खानानी सेवकास लेहून पाठविलें, तें पत्र काल छ १० जिलकादीं पावलें. त्यांत लिहिलें आहे की तुम्ही लिहिली हकीकत तपासिलें विदित

---

१ बाबूजी नाईक ? २ रघूजी भोसले ? ३ आनंदीआनंद.

जाली. गुलशनाबाद सिपुर्द[1] जाली हे खुशवख्ती रावसाहेबास जाली म्हणोन तुम्ही लिहिलें; तर उचित आहे कीं खजमतीचा सरबरा हरयेक कार्य रावसाहेबाचे आहे. रावसाहेबांस करणें जरूर आहे; परंतु प्रथमता हे गोष्ट होतां किले आवढे-याचा मुकदमा दरम्यानें येऊन पडिला की हे खजमत होतांच येक रोजहि आम्हांस घरीं आराम सांपडला नाही. शहराहून लांब मजला करून आलों. अद्याप समागमचे लोकांची मांदगी[2] उतरली नाहीं. रावसाहेबांस हेच गोष्ट लाजिम आहे कीं, हे काम आपले जाणोन ताकीद व कोसीस फर्मावावी. घेरणी कबुतरांविसीं लिहिलें तर आम्हीं शहरीं आलियावर प्रेत्न करून मेळऊन देऊन. किले मजकूरहि सत्वरच फते होईल म्हणोन सेवकास लेहून पाठविलें, ते सेवेसीं विदित व्हावया-करितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. शहरींहून हजारामल म्हणोन वैद्य राजश्री पिलाजी जाधवराव येही वाघोलीस नेला होता; त्यास कांहीं भ्रंश जाला म्हणोन त्रिबकपंत कमाविसदार दिमत मशारनिले याज-बराबर शहरास रवाना केला. मार्गी घोडनदीचे कांठीं सुरूर गांव आहे तेथें त्रिबकपंत संध्याकाळीं संध्या करित असतां, वैद्य मजकुरानें तरवारेनें त्रिबकपंतास जिवें मारिलें, ते वर्तमान हुजूर विदित जालें असेल. प्रस्तुत तो वैद्य ये जागां आणिला. कैदींत ठेविला आहे. पुढें होईल वर्तमान तें सेवेसीं विनंती लेहून पाठवितो. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh sends news from Aurangabad reporting the dispatch of pigeons for the Peshwa and the pleasure Said Lashkar Khan expressed at Gulchhanabad (Nasik) having been handed over to his officer.*

No. 21]

[24-10-1746

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान तागायत छ १९ माहे सवालपावेतों मा। शहरीं येथास्थित असे. खानवालाशान सैयद लस्करखान किले आवढे याचे माहासरे यास छ १७ सवालीं कूच करून गेलियाचें वर्तमान सविस्तर विनंतीपत्रीं लेहून सेवेसीं रवानगी जाली. खान अजमानी सेवकास

---

१ ताब्यांत आली.

२ थकवा.

समागमे नेलें नाहीं. नवाब नासरजंगाजवळ ठेविलें. तेव्हां सेवकानें विनंती केली कीं आम्हास ये जागां कोण्हांस सोंपून जावें? ते समई ख्वाजे नजमुदिनखान खानाजवळ होते. त्यास खानानी सांगितले कीं तुम्ही नसीबयारखान नवाबाचे अर्जबेगी[१] यास सांगणें कीं हे पंत प्रधानचे वकील आहेत, याचे तर्फेचे कामकाज आम्ही सरबरा करीत होतो. याउपर तुम्ही करित जावे. याची गौरपरदास्त करावी. त्याप्रमाणे नजमुदीखानानी सेवकास समागमे नेऊन नसीबयारखानास निरविलें. खान मशारनिले बोलिले कीं तुम्ही दिवानखान्यांत येत जाणें. कामकाज आम्हांस सांगत जाणें. सरबरा करित जाऊन व आम्हांविषई रावसाहेबाचे खजमतेस अर्जी करणे कीं आमचे जागिरीचे गांव बेटावद परगणेयांत तीन आहेत. मौजे दसवेल व मौजे होळ व मौजे कळंबखेडे वगैरे आहेत. तेथें जानोजी ढमढेरे यांचे कमाविसदार आहेत ते वाजबी पैका देत नाहींत. त्यांस येक ताकीद रावसाहेबांची असावी की वाजिबी अमल देत जाणे म्हणोन बोलिले. त्याजवरून विनंती लिहिली आहे. कृपाळु होऊन सदरहूप्रमाणें येक विनंतीपत्राप्रमाणें ताकीदपत्र बेटावदेस जानोजी ढमढरे याचे कमाविसदारास द्यावयाची आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत व येक पत्र नसीबयारखानास पाठवावयाची आज्ञा जाली पाहिजे, कीं सरकार तर्फेनें वकील आहेत; हरयेक काजकाम सरबरा करित जावें. नसीबयारखान बहुत नेक माणूस आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports the departure of Said Lashkar Khan for commencing the siege of the fort of Avdha.*

No. 22] *[1-11-1746 ?*

छ २ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपाद्रष्टीने सेवकाचें वर्तमान तागायत छ २७ माहे सवालपावेतों मोकाम शहर औरंगाबाजेस येथास्थित असे. स्वामीचें आज्ञापत्र छ १६ मिनहूचें बराबर सुकदेव चोपदार छ २२ तेरी (यापुढे पत्राची एक ओळ

---

१ लोकांचे अर्ज हुजूरास सादर करणारा.

फाटली) * * शान सैद लस्कर खान यांस पारसी लखोटा होता तोहि पावला. छ १० सवालचीं आज्ञापत्रें बराबर रंगोजी मकाजी व कालोजी विठोजी जासूद नाइकी जोत्याजी नाईक छ २४ रोजीं तिसरे प्रहरी प्रविष्ट जालीं. नवाबाची थैली व खान अजमाचा पारसी लखोटाहि प्रविष्ट जाला. छ १६ तेरिखेचें आज्ञापत्रीं किले आवंढे याचे मजकुरांत नवाबाचे खजमतेमध्यें व खान अजमास इतला द्यावयाची आज्ञा. खान अजम फौजसुधां किले मजकूरचे माहासरेयास रवाना जालियाचें वर्तमान सविस्तर छ १७ मिनहूस विनंतीपत्रीं लेहून सेवेसीं रवानगी केली आहे, तीं विनंतीपत्रें प्रविष्ट होऊन सविस्तर अर्थ सेवेसीं विदित जाला असेल. किलेयाचा मजकूर सविस्तर आज्ञापत्राप्रमाणे खलबतामध्यें नवाबाचे खजमतेस इजहार[१] केला. याजवर नवाब येहीं आज्ञा केली कीं रावजीचें खत तुम्हांस आलें आहे तेच बाजिनस रुजू करून वाचून दाखवणें. सेवकाचे जेबिनें[२] आज्ञापत्रें व खान अजमाचा लखोटा होता तो काढून आज्ञापत्र वाचून दाखविलें. नवाब बहुत संतोषी जाले. खान अजमाचा लखोटा नवाबानी आपणांजवल घेतला. आज्ञा केली कीं किला घेतांच किलेयाचे माहासरे यास फतेसिंग सिनरकर व सौभाग्यसिंग व दलपतसिंग व मीर महमद अली व अडगडवाला व मिरजा बकर वगैरे जाऊन महासरा केला. सैद लस्करखान बफौज सिनरास दाखल जाले आहेत. पुढें आपण जातील अगर फौज पाठवितील. इनशाल्लाहुतआला[३] थोडकेच रोजीं किला फते होईल. आमचे स्वारीचा मजकूर तर मनसबा जाणोन स्वारी फर्माविली जाईल. रावजीने तुम्हांस लिहिलें आहे कीं किला सिरके यानी घेतला तर जलद महासेरा[४] करून किला घ्यावा. कदाचित राजे यानीं कुमक पाठवावयास आम्हास आज्ञा केली तर चाकरीचा पेशा जाणोन कुमक पाठवावी लागेल. येशास राजेयाजवल कुमक पाठवावयाची येनमान करावयाचा जाबसाल रावजीजवल आहे. कोण तो म्हणाल तर नवाब साहेब हैदराबादेस आहेत. आम्ही शहरीं आहों. खान व फौज माहासरेयास गेले. नवाबसाहेबी कूच करून धारूर तर्फेस[५] येणार, याजकरितां कुमक गेलियाने निभाव कैसा होईल? आमच्या फौजा मालवेयांत राहिल्या याजकरितां कुमक करावयाची मसहलत दिसत नाहीं. यैसा जाबसालास जागा आहे. रावजीनें राजेयास खतल पाहावयाचा मजकूर दरपेश केला. त्याजवरून आम्ही राजेयांस पत्र लिहिलें आहे तो मुसविदा तुम्ही आइकावा. त्याप्रमाणें रावजीस ल्याहावें यैसे म्हणोन मुसविदा स्वमुखे सेवकास वाचून दाखविला. त्यांत मजकूर लिहिला आहे कीं आवढा किला सिरके याचे लोकानी घेतला याजबदल फौज पाठऊन किलेयास माहासरा केला. सैदलस्करखानहि बफौज रवाना जाले

१ जाहीर. २ नांवचीं(?) ३ देव इच्छील तर. ४ वेढा. ५ पुढें.

आहेत. मागाहून किले घ्यावयाचे सामनानसी आणिकहि फौज रवाना होत आहे. इनशालाहुतआला किला थोडकेच रोजीं फते होईल. बदमामली लोक खराब होतील, लेकिन आपण आपले लोकांस लाहान मोठियांस ताकीद करावी कीं यैसी बेज्या[1] वर्तणूक न करीत. सबब कीं यैशा बेज्या गोष्टी जालियानें येखलास कसा राहेल. तुम्हांकडून आम्हांजवळ यैसा कोण्ही माणूस नाहीं कीं त्यास आम्ही हरयेक गोष्ट सांगावी पुसावी. पूर्वी आनंदराव होते त्यांजवल जाबसाल होत होता. आताहि तसा कोण्ही माणूस ठेवावा जे हरयेक मजकूर त्यांजवल सांगितलियानें तुम्हांजवल जाबसाल करील म्हणोन पत्र लिहिलें आहे. तें वर्तमान सेवेसीं विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. पुढें सेवकानें आज्ञापत्राप्रमाणें बकार व रकारपूर्वकाचे मजकुराचा उपक्रम केला कीं, बकोरपूर्वक[2] प्रस्तुत बारामतीस आला आहे. कर्जदार बहुत जाला. पत उडाली. याजमुळें पदरची फौज तुटली. खराबींत बाकी राहिली नाहीं. आव मात्र राहिला आहे. प्रस्तुत सातारेस यावें तर राजश्री संभाजी माहाराजाकडील वगैरा लचांडे यास्तव न आला. आबाजी नाईक साताऱ्यां आहेत. याजकरितां नवाबानी कर्णाटक जिलेयांतील सरदारांस येनायेतनामे सादर करून येव्हांपासोन फौजा हुशार करवाव्या. सालगुदस्तां पैका देवविला तो मना करविलाच आहे. तो न द्यावा, पुन्हां त्या प्रांती याचा पराश्रम होय तें न करावें म्हणोन विस्तरें विदित केलें. याउपर नवाब बोलिले कीं रावजीनें बहुत उत्तम लिहिलें. आम्ही याप्रमाणें नवाबसाहेबांस अर्जी करून बंदोबस्त करविलाच आहे. मागतीहि अर्जी करितों. अनवरुदीखान व बहादरखान व अबदल नबीखान वगैरा सरदार तमाम फौजा तुंगभद्रेचा किनारा तयार राहतील यांत संदेह नाहीं. पैका मना करविला तो करविलाच. त्यास पावतो यैसे नाही. याप्रमाणे रावजीस लेहून पाठवणे. व बाबू नाईक याचा मनसबा पैदरपै रावजीनें आम्हांस इतळा देत जावा त्या मोजीब वरचेवर बंदोबस्ती जियादा केली जाइल. रकोरपूर्वकाचा[3] मजकूर विदित केला कीं, त्याणें वराड प्रांते मनमाने तैसा उपद्रव केला आहे. त्याचाहि गलाटा तूर्त बाबू नायकाप्रमाणे आहे याचा विचार नवाबाने चित्तांत आणून पैरवी करावी. यावर नवाब बोलिले कीं रावजी या गोष्टी यकलास जाणोन बोलतात. यैशास रकारपूर्वकाचा विचार कोणेप्रकारे करावा तें रावजीनें खोलून आम्हांस ल्याहावें. जसें लिहितील त्याप्रमाणें मनसबा केला जाईल, याप्रमाणे लिहिणें म्हणोन सांगितलें. स्वामीनें जुनरकर व चाकणकराचे मजकुरांत नवाबास थैली पाठविली ते रुजू केली. नवाबानें स्वमुखे पत्र वाचून पाहोन मुनसियास आज्ञा केली कीं या खताचा जवाब

---

१ अनुचित. २ बाबूजी नाईक. ३ रघूजी भोसले.

रावजीस लिा कीं, लिहिला मजकूर मालुम जाला. आम्ही हरदो जागा इनायतनामे सादर करविले आहेत कीं, बेज्या वर्तणूक न करावी, नारायणगावचा पाटील आणिक ब्राम्हण कैद केले आहेत, याचा बायेस[1] काय याची हकीगत तपसिलें लेहून पावापीठ, त्याप्रमाणे खातिरेस आणोन आज्ञा केली जाईल व तुम्हीहि आपले आमिलांस ताकीद करावी कीं मुलकांत वाजवी पैसा घेत, ज्यादा तलबी न करीत. पाटेल ब्राम्हण काय सबंध धरून नेले ते हकीकत तपसिलें लेहून पाठवावी. जर चाकणकर जुनरकराजवलीन बेज्या वर्तणूक जाली येैसे दिसोन आलियास त्यास नसिहतनामे सादर करविले जातील, याप्रमाणे लिहिणें व हरदो जागाहि ताकीद लिहिणें म्हणोन सागितलें. सेवकानेहि या मजकुरांत तपसिलें नबाबास सांगितलें. नबाब बहुत संतोषी जाले कीं हे गोष्ट रावजीनें आम्हांस लिहिली याजवरून संतोष जाला, हरयेक गोष्टीचा आम्हांस इतला द्यावा, आम्हांजवलोन पारपत्य करावें हे गोष्ट येकलासाचे जागा उचित आहे. येणेकरून दिवसेंदिवस श्नेहाची वृधि आहे. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. किले आवढयाचे मुकदमेयांत खान अजमांस स्वामीचें पत्र होतें तें नवाबानी खानाकडे रवाना केलें. वरकड वर्तमान यथास्थित आहे. नवाब सेवकास बोलिले कीं आणिकहि कितेक गोष्टी तुम्हांजवळ खलबतामध्यें बोलणे आहेत. बोलोन मागाहून तुम्ही रावजीस लेहून पाठवणें म्हणोन आज्ञा केली. नवाब स्वामीच्या स्नेहाचा स्तव बहुतच बहुत करित असतात, ते अर्थ कोठवर ल्याहावे वरकड नवाबाचाहि विचार बाहेर निघावयाचा दिसतो. गावखाना व सितेरखाना[2] वगैरा सरंजाम आणविला आहे. बाहेर पडतील असें आहे. सेवेसी शृत होय हे विज्ञापना. चाकणकर व जुनरकरास नवाबाही इनायतनामे पाठविले. ते मुजरद सजावलाबराबर पाठविले आहेत. सेवेसी शृत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports from Aurangabad the dispositions made by the Nizam-ul-mulkh and the movements of Raghuji Bhonsle, Babuji Naik and others anxious for a share in the affairs of the Karnatak.*

No. 23]

[5-11-1746

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपाद्रष्टीने सेवकाचें वर्तमान ता। छ २ माहे जिलकाद

---

१ बयाज, अर्ज.

२ उंटाचे स्वार.

पावेतों मो। शहरीं येथास्थित असे. किले आवढेयाचे मजकुरांत स्वामीने खानवाला-शान सैयद लस्करखान यास पत्र लिहिलें होतें. तो लखोटा नवाबाही खानाकडे पाठविला होता. त्याचा जबाब खानानी नवाबाकडे पाठविला. तो लखोटा नवाब येही स्वामीचे सेवेसी रवाना करावयाकरितां सेवकाजवळ दिला. तो लखोटा सेवेसी रवाना केला, त्याजवरून सविस्तर विदित होईल. खानाजवलोन कासीद आला तो सांगत होता कीं खान सिनरास आहेत. फौज मात्र किलेयाचे माहासरे-यास पाठविली आहे. किलेयावर कोळियाचे लोक आहेत तेहि थोडकेच पंधरा-सतरा जाहेत. किलेयावरून येक गोसावी बोलीस येत असतो. तूर्त बोली लागली आहे म्हणोन वर्तमान सांगत होता, ते सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. नवाब निजामनमुल्क छ २२ सवालीं कूच करून डेरे दाखल जाले. धारूरतर्फेस येणार म्हणोन आवाई आहे. सेवेसी विदित जाले पाहिजे. सेवकाचे बराबर जासूद जोडिया च्यार त्यापैकी राजश्री बनाजी माधवराव याजबराबर येक जोडी रवाना आली. येक जोडी कबुतरांबराबर रवाना जाली. येक जोडी छ १७ सवालीं हुजूर रवाना जाली. व येक जोडी सेवक-जवळ आहे. सेवेसी विदित जालें पाहिजे. अलचपूरवाला सैद शरीफखान रघोजी भोसले यास भेटले म्हणोन वर्तमान आलें, ते सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh reports the movements of Said Lashkar Khan against the fort of Avadha and the departure of Nizam-ul-mulkh in the direction of Dharur.

No. 24] [*9-11-1746*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक मलार दादाजी साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ ६ जिलकाद रविवारपावेतों मुकाम कसबे पुणें स्वामीचे कृपाद्रष्टी-करून यथास्थित आसे. यानंतर राजश्री वासुदेव हरि स्वामीची आज्ञा घेऊन आले त्याणी सविस्तर वृत्त सांगितलें, त्यावरून कललें. तेच क्षणी त्यास गंगातीर प्रांतें रवाना केलें. आपणहि आठा चों दिवसीं स्वार होऊन जाऊं. चिरंजीव बापूजी नारायण याचें पत्र मार्गसीर सुध ३ मंगलवारचें सिनरीहून आलें. त्याणी वर्तमान किले आवंढा येथील लिहिलें आहे कीं सैद लस्करखान दोन हजार

फौजेनसी शहरीहून आले. ते सिनरीचा मुकाम करून राहिले आहेत. किलियाखालीं महसरियास मिर्जा बकर आमील परगणे नासीक, व राजश्री फतेसिंग व पटेकर किलेदार जाऊन बसले आहेत. गडावरून लुमा कोली याणे फतेसिंग याकडे पैगाम् दाहा हजार रुपये द्यावे व आपल्या वाटेस कोणी न जावें, किला देतों यैसा लाविला आहे. थोडकियाच दिवसांत किला घेतील. किलियावर सामान चढों पावत नाहीं म्हणून लिहिलें आहे. शेवेसीं विदित होये. पुढें येईल वर्तमान तें लेहूं. ताकीदपत्राविसीं चिरंजीव राजश्री बाबा व चिरंजीव आपा विनंती करितील त्याप्रमाणें द्यावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*The preparations made by Said Lashkar Khan to capture the Avadha fort are communicated to the Peshwa by Malhar Dadaji.*

No. 25] *[14-11-1746*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपाद्रष्टीनें सेवकाचें वर्तमान तागायत छ ११ माहे जिल(का)दपावेतों मों शहरीं येथास्थित असें. किले आवढा छ ८ मिनहूस मंगलवारीं पाहाटेस मिरजा बकर याचे मारिफतीनें मोगलांहीं घेतला. निशाण चढलें. छ ९ मिनहूस प्रातःकालीं खान अजम सैदलस्करखान यांहीं युजाबाषी नादिरशाही याजबराबर नवाब नासरजंगास किला फते जालियाचें वर्तमान लेहून पाठविले. युजाबाषी मजकूर छ १० मिनहूस सा घटिका दिवस प्रातःकालचा जाला असतां आठा नवा प्रहरांत येऊन नवाबाजवल दाखल जाला. त्याजवरून नवाब संतोषी होऊन त्यास वस्त्रें दिलीं व तेच क्षणी नवाब निजामनमुलुक यास वर्तमान लेहून सितुरस्वार रवाना केला. खान अजम सिनरासच आहेत. लवकरच शहरास येतील. नवाबाकडील वर्तमान मनास आणितां नवाब हैदराबाजेस गोशेमाहालांत आहेत. अद्याप बाहेर पडिले नाहीं. मागें वर्तमान आलें होतें कीं नवाब हैदराबाजेहून कूच करून वराडचे रोखें सा कोशांवर मुकामास गेले. तें वर्तमान विनंतीपत्रीं सेवेसीं लेहून पाठविलेंच होतें. परंतु नवाबाचा कूच भागानगरींहून जाला नाहीं. नवाबास शरीरीं समाधान नाहीं म्हणोन आवाई

आहे. नासरजंगाचे दिवाणखानेयांत येक मातबर मोगल, येकाजवळ जोडव होता कीं नवाबास कोण्ही सांगितले कीं सांवरीचे दोरियांतील बीजांची क्षीर करून भक्षिलेंयानें शरीरीं कामाची वृध्धि होते. याजवरून नवाबानें त्या बीजाची क्षीर तीन दिवस भक्षिली. भक्षितांच पोट फुगोन हातापायास सूज आली. इतका पदार्थ होयपर्यंत संकोचास्तव नवाबानें वैद्यांस सांगितले नाहीं. व्यथेचे प्राबल्य जालि-यावर वैद्यास सांगितले. यावर वैद्यानें ढाळक दिल्हें. आतां कांहीं नाहीं. उतार आहे म्हणोन सेवकानें वर्तमान आईकिलें तें सेवेसीं विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. नवाबाकडून दोघे मातबर माणूस सुरतेस जावयास नवाब नासरजंगाजवळ आले. नवाबास भेटोन सुरतेस रवाना जाले. त्याजवळ कागद-पत्र आहेत. कोणे कार्यास्तव रवाना जाले हें कळले नाहीं. आढलें वर्तमान सेवेसीं विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. शहरी जिनसास पाड दर रुपयास तांदूल साडे सा पावणेसात सेर, गहूं आठ सेर, बाजरी साडेतेरा चौदा सेर, हरभरे तेरा साडेतेरा सेर, जोंधले बारा सेर तेरा सेर, तेल तीन सेर, तूप दोन सेर नवटाक सवादोन सेर, दाल बारा सेर, याप्रमाणें पाड आहे. सेवेसीं विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh sends news that the Nizam was ailing at Hyderabad, that his forces had captured the fort of Avadha, and that he had despatched his agents to Surat, with what object has not been known.

No. 26] [16-11-1746

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक मलार दादाजी साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत मार्गसीर सुध १५ रविवार दोन प्रहर दिवस पावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून मुकाम पुणें वर्तमान यथास्थित आसे. यानंतर किले आवढा सैदलस्करखा याणी छ ९ जिलकादी हस्तगत केला. कोली किलियाखाले उतरले. खानाचे लोक निशाण किल्यावर चढलें. सविस्तर राजश्री वासुदेव हरि याणी सिनरीहून पत्र सेवेसीं लिहिलें तेंच बजिनस पाठविलें आहे त्यावरून निवेदन होईल. आम्ही उदेक स्वार होऊन गंगातीरप्रांते जाऊन. श्रुत जालें पाहिजे हे विनंती.

¶Malhar Dadaji (Barve) informs the Peshwa of the capture of the fort of Avadha by Said Lashkar Khan.

No. 27] [22-11-1746

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपाद्रष्टीनें सेवकाचें वर्तमान तागायत छ १९ माहे जिलकाद पावेतों मो शहरीं येथास्थित असे. हुजरून कासीदजोडीबराबर नवाब नासरजंगास थैली पाठविली ते छ १६ मिनहूस दोहों घटका रात्रीस प्रविष्ट जाली. कासिदाही स्वामीची आज्ञा सांगितली कीं आम्हांस जलद रवाना केलें साडे चौ रोजां आम्हीं शहरदाखल जालों. काम नाजूक आहे. थैली वरचेवर नवाबांस दाखल जाली पाहिजे. सेवकाचें नांवें स्वामीचें आज्ञापत्र नव्हतें. कासिदाचे जबानीवरून तेच क्षणी चोपदार कासिदाबराबर देऊन थैली नवाबाकडे प्रविष्ट केली. प्रात:कालीं नवाबानें सेवकास बोलाऊन नेलें. आज्ञा केली कीं आम्हांस रावजीनीं श्नेहवृध्धीचे अर्थीं बहुत कांहीं लिहिले आहे त्याजवरून बहुत समाधान पावलो. तुमचे पत्रीं काय लिहिलें आहे? सेवकास आज्ञापत्र नव्हतें तथापि बोलिलों कीं, सेवकास इतकेच लिहिलें आहे कीं नवाबानें आम्हांस श्नेहाचे जागां बहुत प्रकारें लिहिलें होतें त्याजवरून येथूनहि तदन्वयें सविस्तर लिहिलें आहे. आम्हांस नवाबाचे श्नेहापेक्षां दुसरें अधिकोत्तर आहे यैसें नाहीं, म्हणोन विदित केलें. त्याजवरून संतोष पावले. नवाबाने प्रत्योत्तर लेहून दिलें ते थैली कासिदबराबर सेवेसीं (दोन ओळी फाटलेल्या) सा कोश कुहिरी म्हणोन गांव आहे तेथपावेतों कूच करून आले. तेथोनहि च्यार कोशांचा कूच केला हें वर्तमान नवाब नासरजंगास छ ९ तेरिखेचीं पत्रें आलीं त्यांत लेहून आलें. नवा(ब) बिदराकडून शहरचे रुखें येत आहेत म्हणोन वर्तमान आलें. नवाबाची जोहरा बेगम प्रसूत पावली, पुत्र जाला म्हणोन आवाई वर्तमान आहे. नवाब नासरजंग आजच प्रात:काली कूच करून रोजेयास गेले. पेशखाना तों मागेंच रोजेयास गेला हें वर्तमान पूर्वील विनंतीपत्रीं सेवेसीं लिहिलें गेलेंच आहे. खानदेशामध्यें माणकोजी भापकर व गोविंद सिध्धेश्वर यांचा युध्धप्रसंग जाला. भाबकराचा भाऊ मारला गेला. सिकस्त बहुत जाला म्हणोन वर्तमान आलें ते सेवेसी विदित व्हावयास लिहिलें आहे. खान वालाशान सैदलस्करखान यांहीं घेरणी कबुतरें अमानुलाबेगास लेहून तलास करविला. त्याणें प्रयत्नपूर्वक दोन जोड मेलविले. आजच सेवकास सांगोन पाठविलें. येका दो रोजां मागाहून कबुतरांची रवानगी करितों. कबुतरें केवल जासुदजोडीसमागमे रवाना केलियानें सुरक्षित सेवेसीं

प्रविष्ट होणार नाहीं. याजकरितां अमानुलाबेगाजवळोन येक मनुष्य जनावराची दास्त करी यैसा नेमून, त्यास खर्चास लागेल तें देऊन, सत्वरच रवाना करितो. सेवकाबराबर जासुदजोडिया च्यार; पैकीं तीन हुजूर रवाना जाल्या. बाकी येक राहिली ते कबुतरांबरोबर सेवेसी रवाना करितो. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports that the Nizam is marching towards Aurangabad from Bedar, and that Govind Sidheshwar has defeated Bhapkar in the Karnatak.*

No. 28] *[26-10-1749*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान तागाईत छ २५ जिलकादपावेतों मो लस्कर नवाब नासरजंग येथास्थित असे विशेष. लस्करचें वर्तमान आढळल्याप्रमाणें तागायत छ २० माहे मिनहू सविस्तर विनंतीपत्रीं लेहून सेवेसीं पाठविलें आहे त्याजवरून विदित जालेच असेल. छ २० मिनहूस नवाब कूच करून सेळक्याचे धानोरें प्रांत धारूर येथे मुकामास आले. तेथें ता छ २२ मिनहू मुकाम जाले. छ २१ रोजीं दिवाणखान्यांत कमालदीअलीखान यास नवाबाचें औरंगाबाजेस जावयास रुखसत केलें ते छ २२ मिनहूस शहरास रवाना जाले. त्यास शहरचें पारपत्य सांगितलें. याचें वर्तमान सविस्तर पूर्वील विनंतीपत्रीं सेवेसीं विनंती लेहून पाठविली आहेत. मोरोपंतीं विसाजीपंत बंधु निर्गमले म्हणोन बहुत शोक केला. प्रपंचत्याग करून परमार्थावलंब धरावा म्हणोन आग्रह होता. नवाबानें बहुत प्रकारें समाधान केलें. छ २१ मिनहूस दिवाणखानेयांत मोरोपंतासहि शालजोडी मातमपुरसीची[१] दिली. औरंगाबाजेस अबूलखैरखानास पाठवावयाचा मनसबा नवाब योजीत होते. मागती मजकूर श्लैथ[२] पडिला आहे. छ २३ रोजीं नवाब कूच करून च्यार कोश मौजे गोरजवलके परगणे तेरढोकी येथें तेरणातीरीं मुकामास आले. तेच दिवसीं नवाबाने उमाबाई दाभाडी यांजकडे सा रोजाचें वाइद्यानें कासीदजोडी पाठविली. यावर छ २४ रोजीं मुकाम जाला. ते दिवसीं दरबार जालाच नाहीं. खलबतच तृतीय प्रहर उलंघ होयपर्यंत जालें

---

१ दुखवट्याची. २ ढिला.

मोरोपंत मात्र खलबतांत होते. आणखी येक दोघे मुसाईब होते. खलबत बहुत जालें. खलबतानंतरें मोरोपंत बाहेर येऊन मुजरद येक जोडी रघोजी भोसले यांजकडे पाठविली व सैदशरीफखानाकडेहि रवाना केली. सैदशरीफखान व रघोजीबावा मिलोन येणार म्हणोन आवाई होती. प्रस्तुत मुजरद जोडिया गेल्या आहेत व येक जोडी सातारियास अबदलहुसेनखानाकडे गेली आहे. सैदलस्कर-खान व शाहानवाजखान कृष्णापार जाले. त्यांची अर्जी नवाबास आली कीं मुजफरजंग आरकाटदाखल होऊन तिरचनापली चंदावरचे रुखें चालिले. त्यांची फौज आवाई खाऊन बेइस्तीकलाल[1] जाली. त्याची तंबी करणें ते आम्ही व पठान मिलोन करितों. याजवरून नवाब बहुतच खुश जाले. प्रस्तुत नवाबाचें लय-लक्ष सर्व सातारियास श्रीमंताकडे लागलें आहे. माहाराज स्वामीचे शत्रूस व्यथा बहुत. राज्यांत गडबड आहे. या संधीस नवाब दुर्बुधि योजणार. नवाबाचा मनसबा प्रस्तुत अरकाटाकडे जावयाचा दिसत नाही. माहाराजाचा विचार काय कैसा तो पाहावा. राणीचे व प्रतिनिधीचें अनुसंधान नवाबाकडे लागलेच आहे. प्रतिनिधी-कडील नरसिंगराव वकील नवाबानें उमेद्वार करून अबदुल हुसेनखान याजबराबर पूर्वीच रवाना केला आहे. स्वामीचे प्रतापाचा उत्कर्ष नवाबास बहुत असाह्य जाला आहे. नवाबाचा विचार कीं प्रस्तुत मन्वतरीं आहों ते आपणच आहों. राज्यांत तों गडबड जाली. वरकड सर्व आपले पायनाम आपले आज्ञेमध्यें आहेतच. सरकश म्हणावयास येक पेशवे आहेत. यांचा विचार पहावा म्हणजे आपणाहून थोर कोण आहे? पूर्वील मन्वंतरीं नवाब आसफज्याने कैलासवासी राव स्वामीस हातीं धरून वाढविलें. आताहि आम्ही च्याहूं त्यास वाढऊं. हे काय आहेत? परंतु पूर्वी आसफज्यानें संभाजी माहाराजांस हाती धरून दुर्बुधि योजिली होती ते समई कैलासवासी यानी काय काय पराक्रम करून नवाबास जरबेंत आणून केला मनसबा मोडविला, मागतीहि येक दोन वेलां सिक्षा बरीसी केली ते गोष्ट स्मरत नाहीं. आपण[2] आसफज्याने हातीं धरून वाढविलें म्हणतात. असो. याचा मनसुबा प्रस्तुत या गोष्टीचा दिसतो. येथें नवाबाजवल बोंजीकार[3] प्रस्तुत मोरोपंतच आहेत. याजपेक्षां दुसरा विशेष कोण्ही आहे यैसें नाहीं. पंत मशारनिले बाह्यात्कारें उत्तम गोष्टी बोलतात, परंतु अंतरंगें सरकारतर्फेसी चित्त शुध नाही, हें वर्तमान स्वामीचे सेवेसीं विदित आहेच. नवाब प्रस्तुत याच जिलेयांत काल-क्षप करणार. करकमभोसे पंढरपूर इकडेच चळ द्यावा, दबाव पाडावा, दबावानें ठाणी लुटलीं तर उत्तमच जालें. इतक्यांत अबदल हुसेनखानाचें लिहिलें काय येतें, माहाराजाचा विचार कसकसा होतो, या दुर्बुधीवर नवाब आहेत. प्रस्तुत-

१ इस्तिक्लाल=जोर. २ आपल्याला म्हणजे पेशव्याला. ३ कारस्थानी.

कालीं नवाबास मोठासा अभिमान जाला आहे. संधी पाहात आहेत, वरकड बत्तीससिराले यास बाजीराव[१] रामचंद्र आहेत त्यांचे पारिपत्यास राणीनें येमाजीपंत पाठविले होते ते सिकस्त खाऊन आले. अंतरंगें श्रीमंताकडील साहित्य जालें म्हणोन व राणीनें येमाजीपंताचा लेक सातारेयावर ठेऊन सातारा किला आपले तालुकेयांत करावा म्हणोन तजवीज योजून विचारणा केला तेहि फळद्रूप न जाली. श्रीमंतासी राणीची चित्तशुद्ध नाहीं म्हणोनहि येथे वर्तमानें आलीं आहेत. या गोष्टीचा अर्ज नवाबासहि जाला. रोजचा रोज सातारेयाचें वर्तमान नवाब आणवीत आहेत. या प्रकारचे येथील वर्तमान आहे. कितेक मुजफरजंगाचा उत्कर्ष सांगतात. कितेक सदरहूप्रमाणें म्हणतात. असो. आवाई वर्तमान आइकिल्याप्रमाणें सेवेसीं विनंती लिहिली आहे. सत्यमिथ्य म्हणवत नाहीं. नवाबाचा मुकाम छ २९ मिनहूसहि जालाच आहे. आणखीहि दोन च्यार मुकाम तेरणातीरीं होणार म्हणोन आवाई आहे. अबदल हुसेन येथून नवाबानें पाठविले ते केवल श्रीमंताकडे पाठविले असें नाहीं. आणिक कितेक पर्याय योजून पाठविले आहेत. सेवेसीं विदित जालें पाहिजे. नवाब छ २४ रोजीं खलबत संपूर्ण जालियावर संध्याकालसमईं जनानासुधां सडेच स्वार होऊन मौजे माहू म्हणोन गांव दोन अडिचक कोश माघारा आहे, तेथें दरगाह पिरांचा आहे, त्यांचे दर्शनास गेले. छ मजकुरीं तेथेच राहिले छ मजकुरींही तेथेंच राहातीलसें दिसतें. आज तेथून सिकारीस गेले आहेत. सेवेसी विदित जालें पाहिजे. वरकड येथें नवाबाचे समीपवासी सर्व हतप्रभ श्रमी आहेत. दबाव तों मोठा दिसतो. परंतु कोण्ही येखादा साहस करून आलाच तर मग येथील विचार कलतच आहे. स्वामीचे आज्ञापत्र छ १० जिलकादचें बराबर रंगोजी सुलतानजी हुबे वगैरा जथे बावाजी नाईक जासुदजोडिया तीन याज बराबर आतांच विनंतीपत्र लिहितां सादर जालें. कृपाळु होऊन सेवकास खर्चास रुपये दोनशें पाठविले ते पावले. पोरगा येक जाजती ठेवावा म्हणोन स्वामींने सेवकाची आबाल जाणोन आज्ञा केली. आज्ञे-प्रमाणे ठेवितों. उंट पडथलाकरितां स्वामीनी कृपा करून पाठविला तो छ २३ मिनहूसच पावला. पडथलाकरितां सेवकाची मोठी आबाल होती. स्वामि कृपाळु म्हणोन सेवकाचे श्रम परिहरले. सेवक तों सर्व पदार्थें प्रवासास गैरवाकीफ व या कामाविषईं अज्ञान आहे. परंतु स्वामीचा प्रताप प्रवासी संरक्षण करितो व स्वामीची पूर्ण कृपा सेवकाचे सेवेचा निर्वाह करिते. दुसरा पदार्थ नाहीं. स्वामीनी कृपाळु होऊन कृपेस पात्र केलें म्हणोनच सेवकाचें अज्ञपणहि सेवेसीं सरतें होतें. वरकड यैशा कार्यभागांत सेवकाचा निर्वाह व्हावा इतकें सामर्थ्य

---

१ भगवंतराव.

सेवकास नाहीं. सेवक आपले विचारास बरा जाणतो. स्वामी प्रजापालक समर्थ आहेत. श्रीप्रभूचा अवतार स्वामी आहेत. दुष्टनिग्रह सिष्टपालणास्तव हा अवतार जाला आहे. येक वेळ या यवनास बरीसी सिक्षा जाली पाहिजे. सिक्षा जालियाविरहित याची उन्मत्तता उपशमास येत नाहीं. अज्ञानपणें विनंती केली आहे. क्षमा करावयास स्वामी धणी समर्थ आहेत. सेवेसीं शृत जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶News-letter from Raghunath Ganesh to Sadashivrao from the Camp of Nasirjang, reporting that (1) Visajipant, brother of Moropant, was dead ; (2) that the Nizam had dispatched his agents to Umabai Dabhade, Raghuji Bhonsle and to Satara ; (3) that Mujaffarjung was marching towards Tanjore, and that (4) the Queen and the Pratinidhi were intriguing with the Nizam. In short the Nizam was reported to be entirely hostile to the Peshwa.

No. 29] *[25-12-1746 ?*

छ ९ मोहरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना . राजश्री गणेशपंताचे पुत्र सिध्धेश्वरपंत यांचे मुक्ततेविषईं स्वामीनें नवाबास पूर्वीं लिहीलें होतें. त्याचा जाब खानानी घेऊन थेली सेवकाजवल दिली. ते कासिदाबराबर सेवेसी पाठविली आहे. त्याजवरून विदित होईल. खान बोलत होते कीं, मुरारजी घोरपडे यास नवाबानी बोलाविलें आहे. ते अद्याप आले नाहीं. परंतु येतील. सिध्धेश्वरपंत सोडून द्यावयाबाबे नवाबाचा येनायेतनामा अनवरुदीनखानास सादर जाला आहे, ते सोडून पाठवितील; म्हणौन तुम्ही आपले धण्यास लेहून पाठवणे व जाबहि पाठवणे म्हणोन बोलिले. त्याजवरून सेवेसी विनंती लिहिली आहे. सुरापूरकराने नवाबाचा भला माणूस नेऊन खंडणी दोन लाखावर चुकविली. त्याजमध्ये नवाबानें येक लाख रुा घेतले. येक लाख हिदायेत मोहिदीनखानास देवाविले. याप्रो मुनकता (?) जाला. राजश्री नागो राम बोलत होते की, मनसुबा तीन लाख बाविसा हजारावर चुकला. त्याजमध्ये नवाबानें येक लाख रुा हिदायेत मोहिदीनखानास दिले. बाकी सरकारी घेतले. परंतु मनास आणितां दोन लाखांवर चुकलें हें खरें. सेवेसी शृत व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. दिलीहून जासूदजोडी आली

आहे. पातशाह झिलेस स्वारीस गेले होते ते दिलीदाखल जाहाले. प्रस्तुत काळीं अलावरदीखान मकसुदाबादेहून निघोन पटणेयाकडे चालिला. रघोजी भोसले याची व त्याची युध्धाची सुरुवात मांडिली आहे; म्हणौन वर्तमान आइकिले. ते सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिा आहे. सेवक छ ७ जिल्हेजी लस्कर दाखल जाला. यावर छ १२ जिल्हेजी नागो राम यांचे मारिफत येक रवानगी सेवेसी केली व राव प्रतिनिधींचे हरकारे यांबराबर रवानगिया दोन येक छ १७ मिनहू व येक छ १८ मिनहू व बावजी नाईक स्वामीनें जाबसाल आणावयाकरितां सेवकाजवळ पाठविले त्यांस आज्ञेप्रो जाबसाल देऊन सेवेसी पाठविले ती रवानगी छ २३ मिनहूची, येकूण च्यार रवानगिया जाल्या आहेत. हालींची पांचवी रवानगी आहे. आढललयाप्रों वर्तमान विनंतीपत्री लिहितो. सेवेसी शृत होय हे विज्ञापना. हिदायेत मोहिदीनखानाबराबर फौज देऊन रवानगी केली. छ ३० मिनहूस रवाना होतील. उदाजी चव्हाण बराबर दिला नाही. बाकी तमाम मराठे सरदार बराबर दिले. सुलतानजी तैनात होऊन जात नाही. त्यांस नवाबाने ठेविले. त्याची फौज बराबर दिली. आज्ञा केली की, बाबूजी नायकाचा पिछा करून तंबी करावी. जेथवर जाईल तेथवर पाठलाग करावा. तिकडून अनवरदीखान वगैरा येत आहेत. सेवसी शृत होय हे विज्ञापना.

¶*The news of the release of Siddheshwarpant, son of Ganeshpant, by the Nawab and the settlement of certain monetary affairs, and that of an impending battle between Raghuji Bhonsle and Alivardikhan is communicated to the Peshwa.*

No. 30] [*27-11-1749*

पो छ ६ मोहरम

श्री

श्रीमंत रजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामींचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान तागायत छ २७ माहे जिल्हेज मुकाम लष्कर नवाब नासरजंग येथें येथास्थित असें. लष्करचें वर्तमान आढलल्याप्रमाणें ताा छ २१ माहे मिनहू विनंतीपत्रीं लेहून पाठविलें आहे. छ २२ रोजीं कसबें अलंदावर लष्करचा मुकाम जाला. छ २३ रोजीं लष्करचा कूच आला. लस्करची बहीर कलबुर्गेयासमीप तीन कोशांवर मौजें पाटणांस राहिली. नवाब जनानासुद्धां छ मजकुरींच सडे स्वारीनिशी कलबुरगेयास दाखल जाले. ताा छ २५ रोज बहीर पाटणावर होती, नवाब कलबुर्गेयासच होते. छ २६ रोजीं

बहीरचा कूच जाला. कलबुर्गयांचे दक्षण नैरुत्याश्रयीं मुकाम करविला. नवाब छ मजकुरीं कलबुर्गेयासच राहिले. सेवेसी विदित जाले पाहिजे. गुटकालवाले याचा गुमास्ता सातआठेकशें पावप्यादेयानसी छ २४ रोजीं बहीरदाखल जाला. छ २९ रोजीं कलबुर्गेयास येऊन नवाबाची मलाजमत केली. चंदाखान अरकाटवाला याचा दिवाण पांचेकहजार स्वारांनिशी तिरचनापलीस गेला होता. किल्ल्यासमीप मुकाम करून राहिला. रात्रौ तिरचनापलीवाला बाहेर पडोन छापा घालोन लुटिला म्हणून लष्करांत आवाई वर्तमान आलें तें सेवेसी विदित व्हावया-करितां विनंती लिहिली आहे. दामोदर माहादेव वकील यांस अद्याप रुसकत जाली नाहीं. समागमेंच आहेत. मशारनिलेचे दोनशें रुपये छ २४ रोजीं पाटणचे मुकामावर चोरानें नेले म्हणोन वर्तमान कळलें. तें सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. मशारनिलेसमागमें काळगणनेचा तास होता तोही चोराने नेला. सेवेसी विदित होय. अबदलहुसैनखानांस स्वामीनें छ १९ रोजीं रुकसत केलें. येक हत्ती दिला व महाराज स्वामींनी येक हती दिला. आज उद्यां लष्करदाखल होतील. नवाबचे कुमकेस फौज द्यावयाचा निश्चय स्वामीनें केला म्हणोन येथें आवाई वर्तमान आलें आहे. वरकड वर्तमान राजश्री बनाजी माधवराव येही सेवेसी विनंती लिहिली आहे त्याजवरून विदित होईल. छ २७ रोजीं नवाबाने कलबुर्गेयाहून कूच केला; बाहीरदाखल होतील. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हें विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh to Peshwa, informing him that (1) Chanda Saheb's agent had attacked Trichinopoly but failed to capture it; (2) that Nasirjang had started from Kalburga; and (3) that the Nizam's agent Abdul Hussein Khan had visited Satara and was received with great distinction by Shahu and the Peshwa.*

No. 31] *[3-1-1747*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंति. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान तागायत छ २ माहे मोहरमपावेतो मोकाम लस्कर आसफज्याहा येथास्थित असे. छ २९ जिल्हेजचीं विनंतिपत्रें सेवेसीं रवाना केलीं ते दिवसीं नवाबाचा कूच चौं कोशांचा जाला. दुसरे दिवशीं कूच तीन कोशांचा जाला. छ २७ जिल्हेजापासोन आजपावेतों

ये जागां नवाबाचे मुकाम आहेत. छ २७ जिल्हेजीं नवाब आसफज्याहा येही सडी फौज निवडून खासा स्वारी गोटाबाहेर करून तमाम फौजेचा मोहला घेतला. नवाब नासरजंगाबराबर द्यावयाचे फौजेची नेमणूक होत आहे. च्यार रिसालदार नेमून दिल्हे. वीस हती दिले. याखेरीज बाणांचे उंट वगैरा सरंजाम दिला. कोण्हीकडे रवानगी होते हा अद्याप निश्चय नाहीं. अरकाटतर्फेकडील व वराडाकडील यैसा दुतर्फा दबाव घातला आहे. मग कोण्हीकडे रवाना होतील तें न कळे. मागाहून सविस्तर विनंतीपत्रीं लेहून पाठवितो. राजश्री जानोजीराव निंबाळकर येही शादीचे निमित्तानें नवाबास दोन हती व पांच घोडे * * * * * * पक्वान्न पदार्थ यैसी नजर केली. घोडे माफ करून बाकी नजर कबूल केली. राव मशारनिलेवर नवाब बहुत संतोषी आहेत. रघूजी भोसले यानी वराड प्रांतें बहुतच धुंदाई मांडली आहे. त्याचा परामर्ष करावा हेंहि नवाबास आवस्यक आहे. सेवेसीं विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. सेवकासहि आज पांच रोज व्यथेनें उपसर्ग केला आहे. स्वामीचे पुण्यप्रतापानें आरोग्य होईल. सेवेसी श्रुत होय. सेवकाची खर्चावेचाविषई आबाल आहे. बेगमी करावयास स्वामी समर्थ आहेत. नवाब नासरजंगाचे विचारें सेवकास हुजूर स्वामीचे सेवेसीं रवाना करावें यैसें आहे. कदाचित रवानगी केलीच तर हुजूर येईन हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports from the Nizam's camp to the Peshwa that it was uncertain whether Nasirjang was being sent into Karnatak or Berar and gives news that Raghuji Bhonsle was creating trouble in Berar.*

No. 32] *[19-2-1747*

पो छ ४ रबिलावल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपाअवलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान तागायत छ २० माहे सफरपावेतों मो। लस्कर नवाब आसफज्याह, समीप किले यादगिरी भीमातीरीं येथास्थित असे. स्वामीचें आज्ञापत्र छ ६ सफरचें छ १७ सफरीं प्रविष्ट जालें. त्याजमध्यें कृपापूर्वक सेवकास गौरऊन आज्ञा केली तेणेकरून समाधान पावोन ऊर्जितास पात्र जालों. येथील वर्तमान तर नवाब आसफज्याह यांचे पुत्र

मीरशरीफ यांस देवी निवाल्या. याजकरितां आज दाहा दिवस ये जागां मुकाम करून आहेत. नवाबाचा कबिला इसलाम माहाल ब्राह्मणीण याच मुकामीहून आपले माहेरास गेली. तिचें माहेर सगर प्रांतें येथून समीपच आहे. रुस्तुमराव पांढरे आपले पुत्रास आणावयाकरितां नवाबाजवळीन रुसकत होऊन बिदर प्रांतें रवाना जालियाचें वर्तमान पूर्वी सेवेसीं विनंति लिहिलीच होती. प्रस्तुत वर्तमान आले कीं केयाजी पांढरे याचा पुतण्या गोविंदराव याणे बिदरासमीप येक गाव रुस्तुमरा(व) याचे जागीरपैकीं आहे तो मारिला. इतकियांत रुस्तुमराव जाऊन पावले. त्यांचें यांचें युध जालें. गोविंदराव यास मोडून येका गांवांत घातले. त्याचे हती व पालखिया वगैरा सर्व संपत्ति याचे हातास लागली. हे वर्तमान सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. अबदल नबीखान कडपेकर नवाबास भेटावयास या मुकामाहून बारा कोशाचे अंतरायानें आले. त्यांनीं मुजफरजंगास सामील होऊन त्यांजबराबर यावे ते गोष्ट न केली याजकरितां नवाबास विषम वाटलें. म्हणोन नवाबानें त्याची अर्जी आली होती तेहि न घेतली. येतराजी केली. प्रस्तुत अबदल नबीखान माघारे मुजफरजंगाकडे जात आहेत. मुजफरजंगहि सगरासमीप आले म्हणोन वर्तमान आलें आहे. नवाब असफज्याहा बाबूजी नाईकाचे येणेयांचे इतिजार[१] बहुत आहेत. नाईक हा काल-पावेतो येत नाहीं. याअर्थीं श्रमी होऊन बोलिले कीं लवकर येते म्हणजे त्यांचा फैसला करून आम्हास जाणें तेथें जातों. अंबड प्रगणेयांत सोमवंसी यासी व बालाजी भिकाजी यासी खटखट जाली याजकरितां सैद लस्करखान बाहेर निघोन गेले आहेत. म्हणोन वर्तमान आलें तें सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh reports from the Nizam's camp at Yadgiri the encounter between Keyaji's nephew Govindrao and Rustum Rao Pandhre and the defeat of the former. He adds that the Nizam refused to receive the Nawab of Kadappa as he did not join Mujaffarjung, and that the Nizam was waiting to meet Babuji Naik.

No. 33] *[31-3-1747*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपाद्रष्टीनें सेवकाचें वर्तमान तागायत छ ३० माहे

१ इंतिसार—प्रतीक्षक.

रबिलावल मो। लस्कर नवाब आसफज्याह कृष्णातीर येथास्थित असे. नवाब नासरजंग छ २७ मिनहूस नवाब आसफज्याह जवलोन रुखसत होऊन आघाडीस येऊन राहिले. तृतीय प्रहरीं सेवकास बोलाऊन स्वामीचे सेवेसीं ल्याहावयाची आज्ञा केली कीं नवाबसाहेबीं आम्हांस औरंगाबादेहून बोलाविलें. आम्ही येऊन धारूरचे मुकामी नवाबसाहेबांची मुलाजमत हासील केली. नवाबसाहेबीं कितेक प्रकारें मेहरबानी फर्माविली, गौर केली, तो मजकूर येथूनहि लेहून पाठविला व परस्परें रावजीस जाहीर जालाच असेल. यैशास आम्ही आजपावेतों नवाबसाहेबांचें खजमतेमध्ये होतों.. फिरोन आम्हांस औरंगाबादेस रवाना करार होता. लेकिन दरम्यान कितेक मजकूर भा[१]तभांत पेचाचे दे[२]रपेश जाले, त्याचा तपशील कोठवर ल्याहावा? त्या सबबेकरितां आम्हांस नवाबसाहेबीं अरकाटेस रवाना करावयाचा करार केला. हमरा[३]ईस मातबर फौज वगैरा पुख्त सरंजाम देऊन रवानगी केली. अरकाटची मामलियत हरकुल आम्हांस सोपिली. इनशा[४]ल हुतआला आम्ही अरकाटेस दाखल जालियावर त्या जिलेयाचा बंदोबस्त वाके[५]ई होणे तो होईल ते मजकूर रावजीसहि जाहीर होतील. आम्ही दूर गेलों म्हणून रावजीने खतख[६]तूत पाठवावयास फरा[७]मोश न व्हावें. हमेशा कलमजारी राखोन दीनबदीन येखलासाची तरकी(ब) होय तेच गोष्ट अमलांत आणावी, इतका मजकूर सांगोन बोलिले कीं सांगितल्याप्रमाणें लेहून आणणें. मजकूर आइकिल्यावर आणिकहि तुम्हांजवल मख[८]फी मजकूर बोलणे आहेत तेही बोलोन त्याप्रमाणे लेहून खत लेहून तयार करणें. आम्हीहि खत लेहून देतों. रवानगी करणे म्हणोन बोलोन रुसकत केलें, ते समई मुजफरजंग समीप होते. छ २८ मिनहूस सांगितल्याप्रमाणें पत्र सिध्ध करून दरबारीं गेलों. मलाजमत जाली. तेव्हां बोलिले कीं आज पत्र श्रवण करावयास व आणखी बोलावयास अनकूल पडत नाहीं. उदैक येणे. छ २९ मिनहूस नवाब आसफज्याह कूच करून कृष्णातीर सोडून भीमातीरीं मुकामास गेले. नासरजंग कृष्णातीरेच तीन कोशांचें कूच करून मुकामास आले. छ मजकुरीं तृतीय प्रहरीं दर्शनास गेलों. ते समई खलवतामध्यें नेऊन पत्र रुजू केलें. ते समई बोलिलें कीं रावजी राजेयाजवलोन पंढरपुरास यावयाचा बाहाना करून रुकस[९]त होऊन निघाले, याउपर परभारेंच पुणियास जाणार. मग राजे वाईट मानितील तर मानूत, परंतु अतःपर सातारेयास जाणार नाहीं म्हणोन वर्तमान कललें. परंतु हे गोष्ट सहसा रावजीजवलोन होणार नाहीं. असो. रावजीस रुकसत जाली असें आम्हांस पूर्वीच कलतें तर

---

१ नानाप्रकारचा. २ पुढें. ३ बरोबर. ४ परमेश्वर कृपा करील तर. ५ योग्य.
६ कागदपत्र. ७ विसरलेला. फरामोशी = विसर. ८ गोष्ट. ९ गुप्त. १० परवानगी.

3829

आम्हीं सहसा अरकाटास जावयाचा विचार न करितों. खामखा औरंगाबादेसच जातों. रावजीची व आमची भेट व्हावी हें आम्हांस अवस्यक होतें. पुढे कितेक मनसबे योजावयाचे होते. असो काय करावें? आमची रवानगी अरकाटास जालियावर राव रुसकत जालियाचा मजकूर आम्हांस कळला, यास काय करावें या प्रमाणें लिहिणें व आम्हांबराबर फौज मातबर दिली आहे म्हणोन लिहिणें म्हणोन बोलिले. तेव्हां बोलिलों कीं फोजेचा आबेवाब[1] (?) किती लिहावा? तेव्हां बोलिले कीं प्रस्तुत जे तुमचे नजरेस फौज आली असेल तितकी लिहिणे. अद्याप आम्हांबराबर फौज जमा जाली नाहीं. पुढें अबदल नबीखान कडपेकर व बहादरखान कर्नोलकर येतील व अबदल मजीदखान येतील व अनवरुदीखानाकडून फौज येईल व बाज[2] जमीदारहि सामील होतील तेव्हां फौज मातबर होईल म्हणोन बोलिले. छ ३० मिनहूस मुकाम करूनच आहेत. प्रस्तुत यांजबराबर फौज पांच सा हजार तेहि श्रमी आहे. बलत्कारें या दिवसांत लोक निघाले आहेत. मराठा सरदार तों कोण्ही बराबर नाहीं. तमाम मोगली फौज आहे. प्रस्तुत सगर प्रांतें कृष्णा उत्तरतीरीं आहेत. पुढें काय काय मनसबा योजितील तो पाहावा. नासरजंगाची शरीरप्रकृतहि स्वस्थतेची नाहीं. सदैव श्वास टाकीतच असतात. यांची स्वारी सिरेपावेतों होईल यैसें दिसतें. मुजफरजंग व कडपेकर्नोलकर यांचे समागमे द्यावयास संतोषी नाहींत. कडपेकर्नोलकर उभयता मुजफरजंगास बहुत राजी आहेत. मुजफरजंग त्या उभयतासी सुहलियेतीने[3] आहेत, त्याजकरितां योग पडिला आहे. नासरजंगाचा पातशाही तुजुला (?) आहे व प्रकृतहि जलद यास्तव विषम मानितात. मुजफरजंगावर नवाबाची कृपा व दोन्ही संस्थानिक त्यांचे स्वाधीन. यास्तव हे गोष्ट नासरजंगास असाह्य[4] म्हणोन बाबूजी नाईकाचे मजकुरांत नवाबास नानाप्रकारें समजाऊन त्यांजवर अवकृपा करविली. या प्रकारचें वर्तमान आहे. सेवेसीं श्रुत व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. जे जें वर्तमान होत जाईल तें तें सेवेसीं लेहून पाठऊन हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh writes to the Peshwa from the Camp of the Nizam-ul-mulkh, reporting the differences which had arisen between the Nizam and his son Nasirjang and the latter's anxiety to befriend the Peshwa.*

---

१ अदमास, संख्या (?). २ इतर, अवांतर. ३ स्नेहानें, मैत्रीनें.

४ असह्य.

No. 34] [Recd. 4-6-1747

छ ६ जालाकर

श्री

पुा तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामींचे सेवेसी

विनंती उपर. स्वामींनी लिहिले कीं कर्नाटक राजजी (श्री) रघोजी भोसले व फतेसिंगबावा याजकडे करून दिल्हे. त्यास त्याही पैकियाची निशा कसकसी केली, रोख रुपये काय दिल्हें, उभयेताची वाटणी पहिले जाली होती त्याचप्रमाणें काईम राहून पुढें कर्तव्यार्थ मनसबा करणार किंवा त्यात कांहीं चलबिचल जाहाली आहे, परस्पर उभयेतांचा नखालसता कसी आहे, कर्नाटक रघोजी भोसले याजकडे न व्हावें येतद्विषई तुम्हीं काही चालणा केली की नाहीं, सालजाब कसकसा जाला, पुढें तेथील विचार काय, कर्नाटकच्या मनसब्याची उभारणीं करून उभयेतांस रवाना करावे हे सर्वोत्कर्ष थोरले बाईस अगत्य व थोरले बाईचा मनसबा शिधीस जाऊं देऊ नये हे धाकटे बाईस अगत्य, त्यास हा प्रकार कसकसा येक जाला किंवा दुईच आहे ते लिहून पाठवणें, धाकटे बाईच्या मनांत न व्हावेसे होतें त्यास फतेसिंगबावापासून नजर घेऊन समाधान जालियाचे वर्तमान लिहिले, परंतु नजर काय पडली हे लिहिले नाहीं तर लिहिणें म्हणून आज्ञा व रघोजी बावा व नाईक यास दोघासहि मामला जालियास आमचा नफा नाहीं, बाबूजी नाइकाच्या मामलियांत पेच पडावा यासाठी पदरचा पैका फार खर्च करून फार फौज नफा नसतां पाठविली, हाली बोलीचालींत तुम्हीं काही खटपट कसकसी केली हे तपशीलवार लिहिणें म्हणून आज्ञापिलें. यशीयासी रघोजीबावा व फतेसिंगबावा यास कर्नाटकचा मामला पूर्वीच आम्ही स्वामीपासीं असतांच मामला थोरले बाईनीं सांगितला होता. कर्नाटक या उभयताकडे जाहले म्हणून नाईकानी अतिशय करून दरबारी गोंधनीच्या झाडाखालीं बसले होते, तें वर्तमान पूर्वीच लिहिलें होते. असो. फतेसिंगबावावर धाकटे बाईचा क्रोध होता यास्तव रघोजी-बावांनीं समजावीस करून पंचवीस हजार रुपये नजर बाईस देऊन समजावीस केली. रागरोस चट वारला. चार दिवस फतेसिंगबावावर क्रोध बाईचा होता यास्तव रघोजीबावास कर्नाटक करूं नका म्हणत होती. आतां चट रागरोस वारला. कर्नाटक या उभयतांकडे जाहाले. नाईक तों तोंडघसीं पडले आहेत. कोठे थाक नाहीं. नाइकाच्या गोष्टी थोरली बाई आम्हास पुसतात कीं तुमचे घरीं असेच बाबूजी नाइकाने ढंग केले होते म्हणून पुसले व कसकसे जाहाले म्हणून पुसिलें. आम्ही माहीत होतोंच. सविस्तर सांगितलें. दुसरें बाईस म्हटलें कीं

गतवर्षीं साहेब नाईकाची पाठ राखून आम्हासी भांडत होती. ते सर्व प्रत्यास आले कीं तो तो (?) बाई म्हणतात खरे, पुर्ता बाबूजी नाईक कलला. सारांश नाईकाचे ठिकाण कोठे लागल म्हटल्यास लागत नाहीं, व आम्हीही लागू देणार नाहीं. थोरले बाईपासी ठीक रान बांधून ठेविले आहे, व धाकटे बाईसीहि बोलून ठेविले आहे. नाइकाची सुधी गत होत नाहीं. कलले पाा हे विज्ञापना.

¶Purandare's letter to Sadashivrao Bhau, informing him of the intrigues at Shahu's court by his Ranis, for the proposed assigning of the Province of Karnatak to Fatesingh and Raghoji Bhonsle, depriving Babuji Naik of the same.

No. 35] *[3-4-1750*

विठलराज प्रसन्न

श्रीमंत महाराजाधिराज गोब्राह्मण-
प्रतिपालक राजश्री
स्वामींचे सेवेसीं

आज्ञाधारक नारायेण तुकदेव साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम तागायत छ ६ जमादिलावल स्वामींचे प्रतापें यथास्थित असे. यानंतर येथील वर्तमान सविस्तर काल सेवेसीं लिहून पाठविलें असे, पावलें असेल. आजचें वर्तमान तर राजश्री वजारतमाब यानी बहुत प्रकारें स्नेहाच्या गोस्टी सांगितल्या. मुख्य अर्थ हाच कीं राजश्री रघोजी भोसले यास तमाम वराड प्रांत दिधला व राजश्री उदाजी चव्हाण यास नवा मुलुक दिधला; आनिक आपना लोकांचें ऊर्जित स्वामीनी केलें आनि करनाटकचा येक पैसा येत नसतां आम्हांस न द्यावें हे कोन गोष्ट आहे? हे आपल्याकडे आल्यानें वीस हजार फौजेनसी जे समई स्वामी म्हणतील ते समईं चाकरीस चुकणार नाहींत. आपण उत्तर दिधलें कीं करणाटक जोरतलब[1] आहे, आजपावेतों तुम्हीच करणाटकामधें आहांत, परंतु तुमचे लश्करपावेतों वाट फुटत नाहीं. तेथें अमल कैचा? येक दोन वरशें श्रीमंत खुद येऊन अमल बसऊन सुरलित जालियावर तुमचीहि तरतूद द्रष्टीस पडेल. मग तुमचे मनोदयानरूपहि होईल. हिंदुस्थानामध्यें पूर्वी येक दोन समई श्रीमंतानी जाऊन बंदोबस्त केला. आतां वारंवार काही जात नाहींत तैसेच हेंहि होईल. तुम्ही उतावली न करणें. आतांच तुमचे स्वाधीन केलियानें अमल करारवोके[2] बसतो यैसा अर्थ नाहीं. गतवरशीं तुम्हीं श्रीनिवास-

---

१ जोरतलब = पुंड. २ करारबद्ध.

राव पाठविले कीं राजश्री बाबूजी नाईक नसावे तें श्रीमंतानी कबूल केलें. राजश्री नाईक न पाठविले. येंदाचे वरशीं तुमचे तुम्हींच अहांत. परंतु काये बंदोबस्त जाला? विना श्रीमंत येक दोन वरिश आल्यावितरिक्त इकडील बंदोबस्त होत नाहीं. यैसे जाबसाल बहुत जाले ते कोठवर ल्याहावे? परंतु याची द्रिष्ट अवघी विठल अनंत व राजश्री केशोरायाचे उत्तरावर आहे. तेथून उत्तर आलि-यावर काय बोलतील ते पहावें, तदनुसार सेवेसी लिहिलें जाईल. बहुत काय लिहिणें? वरकड वर्तमान छ ९ रोजी सविस्तर लिहिलें असे.. श्रुत होईल. यानी स्वामीचे लस्करापासून स्वारांची डांक बसविली असे. वरचेवर वर्तमान आनितात. राजश्री रामदासपंत तांब्राकडून स्वामीजवळ आले म्हणोन वर्तमान आलें. बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*The Peshwa's Vakil Narayan Tukdev reports the conversation between himself and Murarrao Ghorpade, in which he claimed the same freedom of action in the Karnatak as was given to Raghuji Bhonsle in Berar.*

No. 36] [*29-5-1747*

विठलराज प्रसन्न

श्रीमंत माहाराजाधिराज गोब्राह्मण
प्रतिपालक राजश्री
भाऊसाहेबाचे सेवेसीं

आज्ञाधारक नारायण तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम तागायत छ २९ जमादिलावल स्वामींचे प्रताप करून यथास्तित असे. यानंतर येथील वर्तमान वरचेवर सेवेसी लिहीत गेलों श्रुत जाले असेल. तदनंतर राजश्री नाइकाचा व नवाब नासरजंगाचा बिगाड जाला. नासरजंगाने सिरियामधें बाहिरबुनगें ठेऊन जरीदे[1] फौजेनसी रतनगिरीस गेले. नाईक राजश्री मुराररायाचा गड घेतला होता ते जागा गेले. नासरजेंगहि कूच करून पाच कोसाचे तफावताने उतरले. हें वर्तमान यैकून राजश्री नाईकानी गडावर ठाण घातले होते तेहि लोक बोलाऊन कूच करून आपले मुलकाची वाट धरली. राजश्री नाईकाचे लोक यकंदर तनच देत नाहीत. कोने वाटेने जातातीं हें पाहावें. यानंतर येथील वर्तमान तर नबाब साहेबांस बर वाटत नाहीं. आज चौदा पंधरा दिवस जाले की बाहेर निघत नाहींत. पहिले पांच सात दिवस तो गाव मारले त्याचे दुखाखालेच चूर होते. त्या उपर राजश्री

---

१ सडे.

श्रीनिवासराव लग्नाकारण गेले त्यास आठ नव रोज लागले. मग नवाब साहेबांस बरे वाटणासें जालंमुळें हरकैसें कालहरण करिताती. आतां श्रीनिवासराव म्हणतात कीं नवाब बाहेर आले म्हणजे नव हजार रुपयांची वाट करून देतों. बाकी राहातील त्याची पेरनी जालियावर निकाल काहाडितों. अमलामधें येईल तेव्हां खरें. नवाब बाहीर निघालियावर जें काहीं ठहरेल तें खरं. सोंधियाचे पैसियाचाहि अदियापि कांही वांट नाहीं. राजश्री महिमाजीरामासीही रोज बजिदी कांही नरम कांहीं गरम करितो. ते म्हणताती की पैसियाची विल्हे जाली तर उत्तम, नाहीं तर जिवापास आनवितों. कदानचित पैसियाची कांहीं वाटच न होये तर जिवापास येथें आणावें की काय व येथें आनलियावर हजूर कैसा पोहोचतो येविशई जैसी आज्ञा ते केली जाईल. व सिरहटीचे रुपयापैकीं हजार रुपये आले. बाकीहि राजश्री महिपाजीरामाचेथ लग्न आहे तें जालियावर घेतों. सिरहटीचे रुपये येतीलसे दिसतें; व बिदनूरचे हुंडीचें वर्तमान तर राम पाटील नरसपास लिा (पुढें गहाळ).

¶*Narayan Tukdev to Bhausaheb, reporting the estrangement between Nasarjang and Babuji Naik and also the illness of the Nawab.*

No. 37] [*4-10-1747*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल आश्विन सुध १२ द्वादसी पावेतो स्वामीच्या कृपावलोकनेकडून सावणुरी सुखरूप आसो विशेष. सन सबामधे संभाजी माहाराज यानी स्वामीस हा जिला सांगितला होता, त्यास येथे दरसाल पनास हजार रुपये संभाजी महाराजास नवाब देत आसतात. सन सबामधे सनद संभाजी माहाराजाची नवाबास होती की श्रीमंत राजश्री पंतप्रधान यास दरसालचा यैवजाप्रो सन सबाचा यैवज पावता करणे मणून सनद होती. त्यास सालाबाद आपल्याच तालुक्यामधे संभाजी माहाराज याच्या वकिलास यैवज करून देत असतात. ते साली भगवंतराव व तमाजी वकील निा संभाजी माहाराज यानी सवीस हजार रुपये अधीच वसूल केले होते. बाकी चौवीस हजार रुपये राहिले त्यास श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीची फौज आली तेसमई चौवीस हजार रुपयाची वाटणी करून जमीदारावरी परवाने दिल्हे, तेचसमई जमीदाराकडून पंधरा हजार रुपये वसूल होऊन पोतास

रुपये पावले आहेत. त्या यैवजी नौ हजार रुपये कितूरकर व डंबलकर व कुरबेटकर व कौजलगीकर या चौघा जमीदाराकडे रुपये राहिले आहेत. जेथे यांची फौज गेल्याविना यास पैसा प्राप्त होत नाही तेथे परवाने करून दिल्हे होते. सांप्रत नवाबाही कूच करून जमिदारावर स्वारी करणार आहे. परवानेहि घेतले आहेत ठाईचे ठाई परवानेहि पोहचाऊन ताकीद करिताहेत. सारांश सरकारच्या बाकीचा निकाल होत आला आहे. सादुलाखान बागडकोट्याचा आमील याजवरी वरात दिली आहे. बागडकोट्यास सेवकाचे जाणे होईल तेथे गेलियानंतर पैकाच निकाल करून लौकरी सेवेसी पोहोचतो. सेवकासहि निरोप देणार आहेत. सीघ्रच निरोप होईल. सिवराव शंकर व बरगी नरासिंगराव उभयेता कोल्हापुरास जाऊन स्वामीस नवाबानी तहनामे लिहून दिल्हे होते ते माघारे आणवावे, स्वामीची फौज या प्रांतास न यावी, मणून बहुत उर्मीकडून[1] उभयेता येणार आहेत. तहनामे अगर[2] माघारे स्वामीकडून संभाजी माहाराज यानी आणऊन सिवराव याच्या हवाली केलिया पंचेवीस हजार रुपये विशेष सालाबादपेक्षा सावणूरचे संभाजी राजे यास द्यावे यैसा करार केला. ईश्वरइछा प्रमाण. येथील दरबार बहुत दीर्घसूत्री, कालोचितावरी नजर फार त्यास्तव दिवसगति लागली. सेवकाचा काही आपराध नाही. राजश्री रघोजी भोसले याजकडून गिरमाजी राम मणून वकील आला आहे. नवाबाची भेटी जाहाली. रा। रघोजी भोसले यानी नवाबास लिहिले आहे की माहाराजानी आम्हास कर्नाटकचा जिला सांगितला आहे, त्या प्रांतास दुसऱ्यास यावयास कारण नाही. दसरा जालियावरी आमची फौज येते, यैसियास आपल्याकडील मातबर वकील बोलीचालीस पाठवणे मणून पत्र लिहिले होते. सांप्रत त्या वकिलास निरोप दिल्हा, तो बिदरूरच्या राज्याकडे स्वार होऊन गेला. जे समई रघोजी भोसले येतील ते समई पाहून घेऊ मणून त्याला निरोप दिल्हा. बहुत लिहिणे शक्त नव्हे हे विज्ञापना.

¶*Trimbak Girmaji reports that the balance due from the Nawab of Savnur has been realized. He reports the Nawab looks on with disfavour on the Peshwa's entry into Karnatak and is trying to bring about his withdrawal from that region.*

No. 38] [*Before 1745*

श्री

नकल

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री दादोबा

स्वामी गोसांवी यांसी

पो व्यंकटराव+ नारायेण कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। जाणून स्वकीये कुशललेखन केले पाहिजे विशष. नवाब अबदुल मजीदखान

---

१ त्वेषानें. २ जर. +Died in 1745.

व राजश्री दौलतराव घोरपडे व राजश्री सुभानजी सिंदे सेनाखासखेल राजश्री राणोजी घोरपडे सेनापति यांचे व आमचे फौजेवरी चालोन आले. त्यांचा पराजये जालेयाचे वर्तमान पूर्वी लिहिलेच होतें. आलाकडील वर्तमान छ ७ जिल्हेजी रा। गोविंद राम व हरि राम याणी सांवचीपर्यंत जाऊन राजश्री सुभानराव सिंदे सेनाखासखेल यांस लस्करास घेऊन आले. त्यांजकडील जिजाजी वागमोडे याचा हती पाडाव आला तो देऊ केला व त्यांचा संरजामाचा अमल बसऊन द्यावा व माहाराज राजश्री स्वामीचा तोफा[१] येणे असेल तेथें साहित्य करावें यैसा करार करून सेनाखासकेल यांचे व रा। माहादाजी मकुंद वकील दि॥ माहाराज राजश्री करवीरवासी स्वामी व हुजरे रामजी माने व अनंत सेट व सिदोजी निकम दि॥ मजकूर व जेष्ट माहाराज राजश्री स्वामीकडील मानाजी मोरे व कुसाजी गोडसे व खलोजी मोरे राजश्री फतेसिंगबावा यांकडे आले होते. यांचे विद्यमाने नवाब अबदुल मजीदखान याजकडील दिवाण रा। श्रीनिवास गिरधरराऊ यांसी दबाव देऊन माहाराजांच्या तोफा याचा आधीं निकाल पाडून मग घांसदाणयाची बोली केली. आम्हांवरी माहाराजानी व सौ बाईसाहेबीं कृपा करावी येदर्थीच्या साहित्याकरितां सेनाखासकेल यांकडील नारो रामजी मातबर मनुश्य येत आहेत हें वर्तमान अगोधर तुम्हास कलावें यास्तव लिहिलें असे. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Vyankatrao Narayan after communicating to Dadoba (Purandare) the result of an affray between his forces and those of Abdul Majidkhan, Ghorpade, and Sindia, etc., supplies him the news regarding the agreement between the Nawab and the Raja of Kolhapur.*

No. 39] [*20-12-1747 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्रीपंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. छ १७ जिल्हेजी नवाबाचा मुकाम भिवरेवर जाला. छ १६ मिनहूस सध्याकाळीं दरोगे यास आज्ञा केली कीं, उदैक तोफखाना नजरगुजार करणें आहे तर खासा स्वारीबराबरच तोफखाना लावणे यैसे बोलिले होते. छ १७ मिनहूस कूच करून येतां मार्गी तोफखाना नजरेनें पाहातच आले. मोकाम-मजकुरी आलियावर छ १९ मिनहूस भिवरेमध्यें गुंडगलें व रेहकले वगैरा तोफखाना भरून तयार केला. नवाबाचे डेरे भिवरेचे दक्ष(ण) तीरीं किनारेयावरच आहेत.

---

१ तोफा = नजराणा.

नदीमध्ये कनाता येकीकडोन चिरून बायकांस कौतुक पाहावयाकरितां आणिले आण सें दीडशें हती आणून तोफखानेयावर घातले. तोफखानेयास आग दिली. कितेक हती पळाले. कितेक राहिले. याप्राो संध्याकालचे सा घटिका दिवसापासोन संध्यासमय होयपर्यंत पाच सात मुठी (?)तोफखाना सोडिला. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. नवाब कृष्णेअलीकडे मुलकात दोन महिने गुजरान करणार, असे हरकारे याचे दरोगे दरगाह कुलीखान यांजकडे बोली आहे. नवाबाने वाघीणगिरे याकडील मार्ग हरकारे पाठऊन ठीक केले आहेत. व मिरजेकडलि रोखाचा मार्गहि पाहविला आहे. मग कोणीकडे जातील पाहावें. ये जागा आणीकहि दोन च्यार मुकाम आहेत. जानोजी निंबालकर तुळजापुरावर आले म्हणौन वर्तमान आलें आहे. बहीरजी सलगर सें सवासें राउतानसी छ १९ मिनहूस आला. भिवरेचे उतरतीरीच राहिला आहे. सुभानजी थोरात पारनेरकर याचा लेक राजजी थोरात सें दीडकसे राउतानसी छ २० मिनहूस लस्करदाखल जाला. तोहि सरगराचे सेजारीच राहिला आहे. हिदायेत मोहिदीनखान याची फौज नवाबानी छ २० मिनहूस नजर गुजार करावयास भिवरेचें उतरतीरास आणविली. पाहिलेयावर जागाचे जागा गेले. सेवसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News that the Nizam is encamped on the Bhima, and a report upon a demonstration of the power of his artillery, together with the movements of various sardars are forwarded to the Peshwa.*

No. 40] [10-12-1749?

छ ९ मोहोरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

कृतानेक विज्ञापना. छ २४ जिल्हेजीं प्रात:कालीं राजश्री तुकोपंत व सेवक खानाकडे जावायास निघालों तों नवाब पेरोजाबादेस[१] स्वारीस जावयास निघाले. स्वारी तयार जाली होती. आम्ही उभयतां नवाबाचे मजूरियास गेलों. नवाब अंदर होते. हाजी हुसैन अर्जबेगी तगीर जाला हें वर्तमान छ २३ मिनहूचें विनंतीपत्रीं सेवेसीं लिहून पाठविलेंच होतें. हाजीहुसेन याचा अगत्यवाद नवाबाचें अंतर्गृहीं जोहराबेगमेस बहुत, याजबद्दल त्याजविषईं तिणें नवाबास अर्ज केला.

---

१ गुलबर्ग्याचे द. सुमारें ३० मैल.

नवाबाची परवानगी जाली नसतां बेगमेचे दासीनी चोपदारांस सांगितलें कीं हाजीवर नवाब मेहरबान जाले मजुरेयास घेऊन येणें. याजवरून चोपदार धावोन येऊन अर्जबगीस घेऊन गेले तों नवाब * * * दिवाणखाने-याजवल येतांच अर्जबेगीनें मजुरा केला. परंतु नवाबानें करार केला नाहीं. येतराजीच केली. मागती निघोन आपले डेरियास आला. उभयता सेवकांनीं नवाबास मजुरा करून नवाब स्वारीस गेलियावर अबदुल खैरखानाकडे गेलों. खानास वस्त्रें राव प्रतिनिधि यानीं तुकोपंताबराबर पाठविलीं होतीं तीं माारनिले येहीं रुजूं केली नव्हती. खानाचीं ठाई नवाबाची कांहीं वैक्रत जाली असें जाणोन माारनिलेयहीं ती वस्त्रें मुरसीदकुलीखानास द्यावयाचा विचार करून ठेविलीं होतीं. परंतु वस्त्राचा मजकूर खानाचे पत्रांत राव प्रतिनिधीयानीं लिहिलाच होता. याजकरितां खानानी छ २२ मिनहूस मुनसीजवलोन तुकोपंतास विचारिलें होते. तेव्हां बोलिले कीं नवाबास वस्त्रें गुजरलीं नव्हती, याजकरितां न आणिली. तो तेच दिवसी नवाबास वस्त्रे गुजरली. याजकरितां खानास वस्त्रें होतीं ती तुकोपंती रुजूं केलीं. मंदील पैठणी मोतीचूर सरासरी यक व शाल गुलाली येक जामेवार महमुदी चिकणदोजी येक व दुपटा लाल येक व कमखाब येक येकूण पांच वस्त्रें दिली. देवराव प्रतिनिधिकडील खानाचे मिसलेसच राहत असतात तेहि आले. थेलिया रुजू केल्या. खानानी आपलें पत्र वाचून पाहिलें व यां उभयतांस पत्र होते तें यानीहि वाचून दाखविले. यावर खान बोलिले कीं प्रतिनिधीचे दर जवाबांत येथून लिहिलें होतें त्याचा मजकूर काहींच लिहिला नाहीं. निंबालकरांचे हातें कर्नाटकाचा बंदोबस्त होत आहे, जाला तर उत्तम नाही तेव्हां माहाराज नवाबाची खातीर राखतील म्हणौन लिा आहे याचा मजकूर काय? निंबालकरानी बंदोबस्त काय करणें आहे? बाबू नायकानें दुसाला कर्नाटकाबाबत चौदा लक्ष रुपये राजे[१] यास द्यावे. त्याजमध्यें येक लक्ष राजे यानीं माफ केले म्हणौन आइकतो. दोन लक्ष मात्र राजे यास दिले, बाकी अकरा लक्ष राजे याचें देणें राहिले. यासिवाय बाबूनायकाचा सिबंदीखर्च व पोट आहे. येकूण मबलगा पैका बाबूनायकास पाहिजे. नवाब जें देतील तें कलतच आहे. पैलाडचें सालीं नवाबास बाबूनायकचा भ्रम होता व राजे याची खातीरदारी असतां नवाबानें सात लक्ष रुपये दिले. आतां दुसाला पैका देणें. यैशास साल गुदस्तां तर नायक मजकुरानें फसाद केली. गुदस्तांचा पैका पावणार नाहीं. साल माारचा तह होणें

१ राजे म्हणजे शाहू राजे.

येशास प्रस्तुत बाबू नायकाचा श्रम गेला. हालीं सात लाख रुपये नवाब देतात येसे नाहीं. त्याजमध्यें दोन लाखांची तिरचनापली गेली. तेव्हां पांच लाख राहिले. त्यासहि नवाबानें कमीच करावे. जाजती हरगीज होणार नाहीं. तुमची खातीरदारी जाणोन लिहिलें होतें. सेवट तुमचा जाब येकतऱ्हांचा आला. तुम्हीं उमदे लोक प्रथमच राजेयास समजाऊन नायकास मोकूफ करून बंदोबस्त केला असता तर सिबंदीखर्च न पडता. तुम्हास बैसले जागा पैका मिलता. आतां बाबूजी नाईक फौजबंदी करून बाहेर निघाला. आतां नवाब त्यास तंबीच पोंहचावितील, तुम्हास पैका मिलणार नाहीं. असो. सालमारचा बंदोबस्त तुम्हास न होय तर न हो, पेस्तर सालचा तऱ्ही करून घेणें. तुम्हां तिघां जणानी जाबसाल करावा म्हणोन आमचे पत्रांत लिा आहे तर काय जाबसाल तो करणें, आम्हीं नवाबास काय सांगावें ते सांगणें म्हणौन बोलिले. यावर सेवक तों कांहीं बोलिलोंच नाहीं. उभयतां बोलिले कीं आपण बोलतात या प्रों आम्ही धण्यास लेहून पाठवितों. सारांश उभयताहि श्रमी जाले कीं येथें किंचित् विश्वास होता तोहि जाईलसा दिसतो. मग उभयतानी प्रत्योत्तर लिा की खान बोलत होते जे, जाबचा स्वाल यथास्थित आला नाहीं. नवाबास खानानी विदित केलियावर काय बोलतील पाहावे. मागती नवाबाच्या व खानाच्या थेलिया स्वामीस येतील म्हणौन लिहून पाठविलें. सेवकानेंहि आपलें पत्राचें प्रत्योत्तर लिा कीं कर्नाटकचे बंदोबस्ताचा मजकूर आजपावेतो आपणास ठावका नाहीं. सातारेयाहून रवानगी जाली तेव्हां स्वामीनें व श्रीमंत राजश्री प्रधानपंतीं आपणास आज्ञा केली नाहीं. या गोष्टीचा जाबसाल सेवकानें काय करावा? पांढरे यांचे संस्थानाबाबत मजकूर पडलाच तर पाहिजे तैसा जाबसाल करून परिमार्जन करितो म्हणौन लिहून पाठविलें. छ २९ मिनहूस जासुदांची रवानगी केली व या मजकुरांत प्रतिनिधि येहीं नासरजंगासहि लिा आहे. त्यांची अर्जी नवाबास आली आहे. काय जाबसाल जाला कलत नाहीं म्हणौन राजश्री नागो राम[१] सेवकाजवल बोलत होते. सेवसी श्रृत होय हे विज्ञापना. अबूल-खैरखानाची ठाईं नवाबाची काही वैक्रत जाली होती खरीच, परंतु तिचें परिमार्जन जालें. मागती यथापूर्व आहेत. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.[+]

¶*News-letter from the court of Nizam-ul-mulk, reporting daily occurrences and the intrigues of various persons.*

---

१ देवराव मेघशामाचा भाऊ?

+ पत्र निजामुल्मुल्कच्या हयातींतलें म्हणजे २१-५-१७४८ पूर्वीचें दिसतें.

No. 41] [Before 1745

छ २९ जिल्हेज नकल

श्री

सकलगुणालंकरण अखंडलक्ष्मीअलंकृत
राजमान्य राजश्री सदासिवपंत
स्वामी गोसावी
यासी

पोष्ये व्यकंटराऊ नारायेण कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशललेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपणाकडून बहुत दिवस वर्तमान कलत नाहीं येणेकडून चित सापेक्षित आहे. तरी यैसे नसावे. सर्वदा पत्रे पाठऊन चित सानंदवित गेले पाहिजे. यानंतर लस्करचें वर्तमान तरी राजश्री हरि राम व रा। गोविंदराम याणी लिहिले त्या पत्राच्या नकला करून राजश्री दादोबाकडे पाठविल्या आहेत त्याव(रू)न कलो येईल व तेहि आपणाकडे पाठवितील त्यावरून सविस्तर कलो येईल. त्या अलीकडील वर्तमान तरी युध्याचा प्रसंग जालियावरी राजश्री सुभानजी सिंदे याची बोलाचाली होऊन आमचे फौजेत आले व सावणूरकर आबदुल मजीदखान याजकडील फौज व रा। दादाजीराऊ याजकडील रा। धोंडोबा लस्करात आपले फौजेसहवर्तमान आले. येकत्र होऊन पुढें मुळकगिरीस सोंधे प्रातें गेले. हे वर्तमान आपणास कलावे याजकरितां लिहिले आहे. व राजश्री स्वामी करवीरवासी याच्या राज्यातील म्हणावयापैकीं येक राजश्री दौलतराऊ घोरपडे मात्र निराले आहेत. नाही तर सर्वत्र येकत्र जाहले आहेत व राजश्री सेनाखासकील याची पत्रें व मातबर कारकून आमच्या व राजश्री स्वामी करवीरवासी याच्या समाधानास्तव रवाना करितात म्हणोन रा। गोविंद राम व हरि राम याणी लिहिले आहे तेहि येतील. या उपरी जें वर्तमान होईल तें मागाहून लेहून पाठवितों. त्यावरून कलो येईल. सारांश उभयेता श्रीमंताचे पुण्य पदरीं आहे. तेथे येशास नुन्य आहे यैसे नाहीं. राजश्री नानाकडील व आपणाकडील सविस्तर वर्तमान लिहून पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. श्रीमंत राजश्री आपानी गला किल्याचे बेगमीस देविला होता त्यास न्यावयास अनकूल पडले नाहीं. हली रा। नारो चिमणाजी लस्कारात आले आहेत ते फोंडे प्रांती गेल्याउपरी गला नेहतील. त्यास प्रस्तुत गला च्यार रोज अधिक उणे लागतील वलवाचे प्रजन्य लागतील आणी गला नासल याजकरीतां रा। खंडोजी माणकर यासी आपण पत्र देऊन गल्यावर घर बांधे तो अर्थ केला पाहिजे. आम्हाकडील गल्याचें संरक्षणार्थ दुलबाजी बलाल कारकून ठेविला आहे तरी घर बांधऊन

देविल्याने गला जतन करतील. घरात गला साठऊन ठेवावयास खंडोजी माणकर यासी आज्ञा केली पाहिजे. गलाहि रा नारो चिमणाजी यासी ताकीद करून जलमार्गे लौकरीच नेवितो. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Vyankatrao Narayan to Sadashivrao Bhau giving him information relating to Abdul Majidkhan and Sambhaji of Kolhapur. He further writes that Khandoji Mankar should be ordered to protect the granaries from damage by rain. This should be read along with No 38.*

No. 42] [*1747?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. शिरेकर दिलावरखान नासरजंगास भेटावयास येणार म्हणोन वर्तमान आइकिलियाप्रमाणें सेवेसी विनंती लिहिली होती. प्रस्तुत शिरेयाचा येक गृहस्थ लष्करांत भेटला. त्याणी सांगितलें कीं देवनहलीस श्रीरंगपटणवाले यानें मोर्चेबंदी केली आहे. फौज भारी आहे. तेथें दिलावरखान सातशें राउतांनसी गेला आहे. श्रीरंगपटणवाले याचे फौजेस सामील जाला आहे. श्रीरंगपटणकर राऊतांस रोज निमरुपयाप्रमाणें देतात. नासरजंग येतात हें वर्तमान आइकोन दिलावरखानानें आपला कबिला शिरेयांतून काढून आपणांजवळ नेला. साडेबारा लाख रुपये दिलावरखानाकडे नवाबाची इजारेयाबद्दल बाकी; त्याजपैकी प्रथम येक लाख रुपये नवाबास पावले. बाकी साडेअकरा लाख रुपये राहिले आहेत. याप्रमाणे दिलावरखानाचे वर्तमान आहे. श्रीरंगपटणची मामलियेत अद्याप फैसल नाहीं. श्रीरंगपटणवाले याचे जिलेयांतील किले बेडूर व येल्हूर दोन किले पाहाडी आहेत. त्यांचे तलाशांत नाईक आज तीन सालें होते. शंकराजीपंत म्हणोन ब्राह्मण शिरेयांस राहत असतो, तो नाइकाकडे चाकर आहे. त्याणें आज तीन सालें त्या किलेयांचे लागांत राहोन किलेयांत भेद केला. दोहो किलेयामध्यें अंतर कोशा येकाचें आहे. सालमजकुरीं नाइकानीं शंकराजीपंतास हनुमंतसागराजवलोन रवाना केला. समागमें येक स्वदेसी ब्राह्मण दिला. त्यास सांगितलें कीं तुम्ही त्या प्रांतांतील बेरड मेळऊन किले घेणें तों आम्ही फौजेनसी येऊन पोहचतों. शंकराजीपंतांनी किला घ्यावयास लोकहि ठीक केले होते. नाईकाचा कांहीं पैकाहि खर्च झाला होता. शेवट शंकराजीपंतानें च्यार पांच हजार बेरड मेळऊन छ २२ रोजीं दोहो किलेयांत लाग केला. किले भेदल्ये होते

तरी नाइकाचे तर्फेचे लोक चढलेयावर कांही भेदाखेरीज लोक होते ते भांडले. दोहो किलेया मिळोन शंभरेक लोक ठार जाले, कांही जखमी जाले. किले घेतले. प्रस्तुत बेरडांनीं घेतले म्हणोन नांव आइकिले. यावर सामान दारुगोली व तांदूळ मेंबलगा[१] आहे. पाणी बहुत आहे. प्रस्तुत शंकराजीपंत या लष्करांत आला, येथून नाईकांजवळ जाणार. शंकराजीपंताबराबर स्वदेशी ब्राह्मण नाइकांकडील मोर्चास होता तो सेवकाचा परिचई. त्याणें गुप्तरूपें हें वर्तमान सांगितलें तें सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली असें, हें विज्ञापना.

¶*A letter to Sadashivrao reporting the movements of the several Nawabs in the Karnatak and the doings of Babuji Naik, particularly the capture of the forts of Yelur and Bedur.*

No. 43] [*19-1-1748*

छ २ सफर शुक्रवार

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामी व तथा
राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नारो विठ्ठल दिंमत राजश्री नागो राम चरणांवर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागाईत छ २९ मोहरम मुकाम शेहर अवरंगाबाद येथें स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. स्वामीहीं सेवकास आज्ञापत्र सादर केलें कीं शेहरींच राहोन शेहरचें वर्तमान बातमीचें लिहीत जाणें म्हणोन आज्ञा केली. यास्तव आपण लष्करांतून माघारें अवरंगाबादेस आलों. नवाब असबज्याहा व नासरजंग फिरोन माघारें पैठणास आले. रोज्यास जाणार आहेत, उपरांतिक परभारेंच सुरतप्रांतास जाणार म्हणोन वदंता आहे. नासरजंगास अवरंगाबादेस ठेवावें ऐशी बोली मात्र आहे. स्वामीचें व नवाबाचें सखेत्व जालें म्हणोन चर्चा शहरीं आहे. हरकारियाचा दारोगा दरगाकुलीखां याचा भाचा नवाबाचे लष्करांतून अवरंगाबादेस येत होता. समागमें दाहावीस राऊत होते, तों वाटेंत नक्षेत्रवाडीजवळ आला तों कोणीकडून दक्षणी राऊत सा आले; त्यांनीं खाशासच तरवारीनें जखमी करून घोड्याखाले पाडिला, आणि घोडा घेऊन गेले. मोगलाई राउतांहीं त्यांचा पिछया केला; परंतु ते हातीं

---

१ पुष्कळ.

3842

न लागले निघोन गेले; आणि घोडाहि घेऊन गेले. घोडा किंमत हजारा रुपयांचा होता. हे वर्तमान छ २७ मजकुरीं दोन शहरापासून ती कोसांवर जाहलें. मागून हिदायेतमोहिदीखां हजारा राउतांनशी शहरात येऊन दाखल झाला. नक्षेत्रवाडीचे पाटील खुदावंदखां सुभा शहरचा करून नवाबाहीं ठिविला आहे. त्यानें जमीदारास कैद केलें आहे व तेथील फौजदार यासहि तष्ट लाविलें आहे कीं घोडा पैदा करून देणें, ऐसें वर्तमान आहे. हिदायेदमोदीखां व खुदावंदखां हें वर्तमान ऐकून फारसें विस्मित जालें कीं शहरानजीक गनिमाही घोडा घेऊन गेले ते आजी दारोग्याच्या भाच्यास जखर्मा केले म्हणोन अपूर्व त्यास वाटलें; व नवाबास अर्ज जाली कीं यैसे वर्तमान नक्षेत्रवाडीजवळ जालें. स्वामीस कळावें. विशेष काय लिहिणें हें विज्ञापना. भिकाजी वांकडा लष्करांतच आहे अद्याप शहरास आला नाहीं. श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Naro Vithal to the Peshwa writing about the arrival of the Nizam and Nasarjang at Paithan and their intention to proceed to Surat. The writer also reports how some Deccani troopers wounded the envoy of the Nizam and carried off his horse.*

No. 44] *[21-1-1748]*

छ ३ मोहरम+

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांस

श्रीमंताखिलसद्गुणनिधान कृपाविधान प्रतापवरिष्ठाभिधान स्नेहांकित माहाराऊ जानोजी जसवंत निंबालकर दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत छ १ सफर मुकाम आवरंगाबाद जाणोन निजानंदलेखन कीजें, विशेष. पत्र पाठविलें ते उत्तम समयीं पाऊन समाधान जालें. पत्रीं लेखन केलें कीं नवलविशेष वर्तमान लिहीत जाणें. ऐसियास नवल विशेष जें आढलतें तें वरचेवर लिहितच आहों, अवगत होत असेल. यानंतर पत्राशय कीं बेलभंडाराचा मजकूर राजश्री मल्हारपंत खिजमतराऊ यांस सांगितला आहे; त्यांच्या लिहिल्यावरून कळूं येईल. ऐसियास मशारनिलेच्या पत्रांत बेलभंडाराचा मजकूर कांहींच नाहीं; इतकेंच लिहिलें आहे जें श्रीमंतीं सांगितलें कीं खान गेले. नवाबसाहेबांची मुलाजमत

+ सफर पाहिजे.

जाली. येकांती लोकांती काय बोलले दरबारीं बोलतां काय बोलले, त्यांच्या चित्ताचा आशय काय, नवाबसाहेबांची मर्जी कशी, नवाब निजामुद्दवला यांचें काय मानस, मुत्सद्दियांचें मनोगत कोण्या प्रकारचें हें तपशिलें खबर लिहिणें. याच गोष्टीचा तपशील होता, आणीक मजकूर नव्हता. हस्ताक्षरें लिहिलें होतें कीं सांप्रत राजश्री सुभेदारास व राजश्री बगाजीपंतास लिहिलें आहे, ते व आपण बोलून नवाबसाहेबांस अर्ज करणें तो करावा. ऐसियास राउतांच्या लिहिल्यावरून राजश्री सुभेदार यांच्या डेरियांत जाऊन उभयेतांस विचारलें; त्यांनी उतर दिधलें कीं आपणांस पत्र आलें नाहीं; घराऊ वर्तमान लिहिणें म्हणोन लिहिलें तर वरचेवर लेखनांत येतच आहे. नवाब निजामुद्दवला यांसी कसें बोलला व त्यांनीं कोणत्या मजकुराचे कसे जाबसाल केले हें लिहावें, ऐसा पत्रार्थ; तर नवाब नासरजंगबाहादर यांस मजकूर करणें म्हणोन मुख्यांनीं काही आज्ञा केली नाहीं की त्यासी मजकूर करणें. आज्ञेवितरिक्त कसा मजकूर करावा? यास्तव त्यांसी कांहीं मजकूर केला नाहीं. गंगेच्या तळावर इतकाच हुकूम जाला कीं त्याची मुलाजमत करणें; त्यांवरून त्यांस भेटून मुजरा मात्र करून आलों. त्यांची मर्जी तर ते तिकडून फौज घेऊन आले आहेत; त्यांच्या मरजीचा थांग लागतो ऐसें नाहीं. राजश्री बगाजीपंताची व त्यांची दरबारांत बोली जाली; व राजश्री बगाजीपंत त्यांच्या डेरियासीहि गेले होते. सारांश येक दोन वेळां ह्यासी व राजश्री बगाजीपंताशीं बोली जाली, हें वर्तमान राजश्री पंत मशारनिले यांच्या लिहिल्यावरून अवगत जालें असेल. अमिरांची व मुतसद्दी यांची मर्जी व दरबारचा मजकूर कसा हें लिहिणें म्हणोन लिहिले, तर बाह्याकार मजकूर जो होत येतो तो आपण लिहितों; व राजश्री बगाजीपंतहि लिहितात. बातनीचे हरकारेहि सांगत असतील. अवगत मजकूर लिहावा म्हणोन लिहिलें तर त्यांच्या अंतरगतचा मजकूर भिडेस घालून पुशिलियानें म्हणतात कीं खिलवतीचा मजकूर सांगावा हा दस्तुर नाहीं. प्रस्तुत वर्तमान तर नवाबसाहेब दाखल दवलतखाना (?) जालें. नवाबसाहेबांचे लष्कर कांहीं शहरांत गेलें व कितेक लष्कर व झेंडे काळ्या चौक्यावर उतरले व नवाब नासरजंग इदगियावर बफौज उतरले आहेत. हिदायेत मोहिदीखान बायेजीपुरियाच्या शेजारीं आपल्या गंजावर राहिले. राजश्री सुलतानजीराऊ निंबाळकर करणपुरियाशेजारीं उतरले आहेत. वरकड ज्यांस जेथें जागा मिळाला तेथें राहिले. पुढें जें वर्तमान होईल तें लिहिणियांत येईल हें विनंती.

¶*Janoji Jasvant Nimbalkar to the Peshwa reporting news of the movements and camping arrangements of the Nizam.*

3844

No. 45] [22-1-1748

छ २ सफर

श्री

सेवेसी सेवक विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ २ सफर मुक्काम कसबे गांडापूर येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते छ २९ मोहरमी टोकियास आलो. तेथें राजश्री हरि विठ्ठल याची भेटी जाली. त्यास आज्ञापत्रे होती ते देऊन त्यास आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावयास सांगितली. आज्ञेप्रमाणें ते कार्यास गेले. आम्ही टोकियाहून कूच करून छ १ सफरी कसबे गांडापुरावर आलो. तेथें राजश्री त्रिंबक कृष्ण पथके घेऊन आले. त्याची भेट जाली. छ २९ मोहरमी नवाब शहरास दाखल जाला. आपण व त्रिंबकपंताबरोबरील पथके सारे येकत्र आहो. राजश्री सुभेदार याजला पत्रे दिल्ही होती ते त्याजकडे रवाना केली आहेत. त्याची उत्तरे आली म्हणजे सेवेसी रवाना करितो. जेऊर गांवावरून बेलापुरावरून डाक बसविली आहे. आम्हीहि फौजसुद्धा डाकेच्या मार्गावर गांडापूरच्या आसपास आहो. नवाबाच्या जासूदजोड्या टोकियावर बातमीस आल्या होत्या त्या आम्हास भेटल्या व गांडापुराकडेहि आल्या आहेत. तमाम गांवगन्ना ताकीद करितात कीं दाणादुणा लौकर गांवांत नेणे. नवाब नासरजंग याची स्वारी इकडे होणार मग सत्यमिथ्य नकले. ऐकिले वर्तमान सेवेसी लिहिले असे. पुढें आज्ञा होईल त्याजप्रमाणें वर्तणूक करून. मागोन येईल वर्तमान ते सेवेसी लिहून पाठवू. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna reports the movements of Nizam-ul-mulk after leaving Gandapur.*

No. 46] [22-1-1748

छ ३ सफर सनवार

श्री

सेवेसी विनंती. सेवक विसाजी कृष्ण व त्रिंबक कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २ सफर संध्याकाळ दोन घटका दिवस मुकाम माजरगांव परगणें गांडापूर स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकांचें वर्तमान येथास्थित आसे विशेष. छ मजकुरी गांडापुरीहून कूच करून दोन प्रहरां डाकेच्या मार्गावर मौंजे मजकुरास आलो. त्यास काल त्रिबकपंताकडील राऊत

स्वामीचीं पत्रें घेऊन राजश्री सुभेदाराकडे गेले होते ते येच समई सुभेदाराचीं पत्रें स्वामीस घेऊन आले ते बजिनस पत्रे लखोटे डाकेच्या राउताबराबर सेवेसी रवाना केले आहेत. पावतील. त्याजवरून तेथील सविस्तर अर्थ विदित होईल. यानंतर मोंगलाचे लस्करचें वर्तमान राजश्री सुभेदार बोलत होते ते वर्तमान राउतानें जबानी सांगितले की मोंगल सडा होत आहे आणि फौजहि आणखी ठेवीत आहे. रोंखही इकडेच दिसतो. याप्रमाणें वर्तमान आहे. राजश्री भवानजी जाधवहि शहरीहून सुभेदारापासून छ मजकुरी आम्हांपासी आले. त्यास त्याच्या रोजमुरीयाची बेगमी करून दिल्ही होती ते सरली. त्यास स्वामीनी रोजमुरियाची बेगमी करून पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. याजउपर कोठे रहावें, पुढें जावें किंवा येथेंच असावें, जसी आज्ञा होईल त्याजप्रमाणें वर्तनूक करूं. लक्ष्मणराऊ आटोला येथें आला नाहीं. वाटेनें राऊत डांक बसविली आहे. येथेही राऊत पाहिजेत याजकरितां आम्हांकडील पथकाच्या लोकास आज्ञा करून पाठविली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna reports news of the movements of Nizam-ul-mulk.*

No. 47] *[22-1-1748*

छ ४ सफर रविवार

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामी व
तथा राजश्री भाऊ स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक नारो विठ्ठल दिमत राजश्री नागो राम चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागाईत छ २ सफर प्रात:काळ मुकाम शेहर अवरंगाबाद येथें स्वामींचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. रुस्तुमराव पांढरा छ १ मजकुरीं शेहरास येऊन दाखल जाला. समागमे राऊत पांचशें व हत्ती साहा आहेत. मुलाजमत नवाबाची अद्याप जाली नाहीं व खान अलम दखणी व सवंतकर सातशें रावतांनशीं येऊन शेहरदाखल जाला. यासी आणावयासी पेशवा मोहतशेमखा बक्षी गेला होता. खान अलमची व नवाबाची मुलाजमत छ १ मिनहूस प्रहरां रात्रीं जाली. नवाबाचे नजर मोहरां ५ व रुपये २५ गुजरानले. यांपैकी मोहर येक व रुपये पांच घेतले. बाकी त्याचे त्यास फिराऊन दिधले. नवाबांहीं काल मिठाई अवघे अमीरांस पाठविली.

सुभेदारांसहि तीन खोन मिठाई पाठविली. महमदशाहा पातशाहा शरीरेंकरून फार कष्टी आहे, म्हणोन नवाबाचे देवढीवर वर्तमान ऐकिलें; व दरबारीं बोली हेंच ऐकिली जाती. स्वामीची फौज सुमार आठ हजार जमा जाली आहे; व समागमेचे लोक स्वामीसी अजुरदा आहेत. फौज जमा होत नाहीं म्हणोन नवाबास अर्ज होत आहे, म्हणोन बोली देवढीवर यैकिली; यास्तव लिहिलें जातें कीं स्वामीस कळावें. विशेष काय लिहिणें हें विज्ञापना.

¶*Interviews between the Nizam and Rustumrao Pandhre and Alam Khan are reported to the Peshwa. A reference is made to the illness of the Emperor Muhammad Shah.*

No. 48] [*24-1-1748*

छ ६ सफर

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी

विनंती. सेवक नागो राम चरणांवरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागाईत छ ४ सफर वार रविवार आंवशीची+ च्यार घटका रात्र मुकाम शहर औरंगाबाद येथें स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. आज प्रातःकाळीं पत्रें पाठविलीं तीं सेवेसी पावोन वृत्तांत निवेदन जाहालाच असेल. काल छ ३ मिनहूस खानाचे घरीं बगाजीपंत व आपण गेलों. स्वामींनीं छ २९ मोहरमचें पत्र बगाजीपंताचें नांवचें लिहिलें त्यांत कितेक मजकूर लिहिला होता. तो सर्व मजकूर खानास वाचून दाखविला. खानांनीं त्याच समयीं त्यां पत्रांचीं पारसी करविली. आणि बगाजीपंतास व आपणांस सांगितलें कीं तुम्ही उदयिक येथें आपणाजवळ येणें. आज आपण दरबारास जाऊन नवाबास हेंच पत्र दाखऊन याचें प्रातिउत्तर जें होईल तें उदयिक तुम्हास सांगू. याप्रमाणें आम्हास सांगोन आज्ञा दिली. बगाजीपंत आपले घरास आले. आम्ही आपलें बिऱ्हाडास आलोंत व सायंकाळचे चव घटका दिवसास खान व जानबा दरबारास गेले. त्यावर सायंकाळीं बगाजीपंतास बलाऊ पाठविलें. त्यावरून बगाजीपंत गेले. रात्रीस दीड प्रहर रात्रवर दरबारीं होते. नासेरजंग यांजवळ अनवरखान व सैदशेरीफखान व अबदुलखैरखान व मीरकासमखान वगैरे दरगाकुलीखान वगैरे आणीकहि उदेउंदे[१] मनसबदार ऐसें येकीकडेस बसले होते. सैद लस्करखान व

+ रात्रीचा पहिला प्रहर. १ उमदे उमदे.

जानबा ऐसे उभयेतां येकीकडेस बसले. त्यावर नासेरजेंगानीं जानबास मात्र येकव्यास बलाऊन दोन घटका खलबत जाहालें. मग सैयद लस्करखान यास बलाविलें तेव्हां यांनीं पत्राचा मसोदा करून नेला होता तो बजिनस नासेरजेंगाचे हातीं दिला. नासेरजेंगानीं आपलेंच स्वमुखें तो मसुदा वाचून हासला, आणि बगाजीपंतास बलाविलें आणि पुसले कीं हें मतलब लिहिले यात तुमची सल्ला काय आहे? यांनीं उत्तर दिलें कीं आमची सल्ला काय कार्याची? खावंदानीं जें लिहिलें तें बजिनस तुम्हास दाखविलें. आपले चित्तास येईल तें आपण उत्तर द्यावें, याप्रमाणें बगाजीपंतीं उत्तर दिलें. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶Nago Ram reports to the Peshwa that Nasarjang, Said Lashkar Khan and others conferred together and discussed the contents of a despatch from the Peshwa.

No. 49] [*24-1-1748*

छ ९ मोहरम रविवार (?)

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नागो राम चेरणावरी मस्तक ठेऊन सांष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागाईत छ ४ सफर रविवार प्रातःकाल मुकाम शहर औरंगाबाद येथें स्वामींचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. आपण आजवर सातारियास होतों. त्यास नवाब आसफज्या छ १ मिनहूस शहरांत दाखल जाल्यावर आपण छ ३ मिनहूस येथें आलों. सयैद लस्करखान याची भेट घेतली. राजश्री पिलाजी जाधवराव याची व बगाजीपंत यांची भेट घेतली. स्वामींनीं छ २९ मोहरमचें पत्र बगाजीपंतास लिहिलें होतें तें बगाजीपंतांनीं जानबास व खानास वाचून दाखवि(लें) सर्व अर्थ उभयेतांस कलला. आपणांसहि खान च्यार गोष्टी सांगोन रवाना काल करणार होते. त्यांस हें पत्र बगाजीपंतीं वाचून दाखविल्यावर खानांनीं आपणांस येक दिवस राहाविलें. आज निरोप देणार आहेत. येथन आज्ञा जाहाल्यावर सेवेसी येऊन पोहचेन. येथील सर्व अर्थ ऐकिलेला सेवेसी निवेदन करीन. वरकड वर्तमान चिरंजीव राजश्री नारो विठ्ठल यांनीं बातमीचें सर्व वर्तमान सेवेसी लिहिलें त्यावरून श्रुत होईल. नवाबाचा व नासेरजेंगाचा विचार स्नेहाचाच फार करून दिसतों. येथें सांप्रत फौज तव तमाम मिलाली. कोणी सरदार यावयाचा राहिला नाहीं. तमाम शहरांत व शहराबाहेर बाजारबुणगे व

तोफखाना वगैरा किरकोल मनसबदार व मऱ्हाठी फौज व पठाण शहराबाहेर राहिले. लस्करांत नित्य शिवार लुटून शाळू व गहूं हरभरा कापून आणितात. नवाबांनीं ताकीदहि केली; परंतु लस्कर नित्थे पांच सात गांव दाहापंधरा कोशीं कही भरून आणितात. मोठा प्रलये शहराभोवता जाहाला. सर्वां लोकांस आश्चीर जाहालें कीं या मागें उदंड बिघाड जाहाले; परंतु शेहराजवल इतकी फौज कधीं जमा जाहाली नव्हती. म्हणून सर्वांस आश्चर्य होऊन भयाभीत जाहालीं आहेत. आणीक आठ पंधरा मुकाम जाहाले तर येवढ्या सैन्यास वैरण मिळणें कठीण आहे. वैरणीचा थोर काहार आहे. वरकड वर्तमान सेवेसी आल्यानंतरी श्रुत होईल. हें विज्ञापना.

¶*Nago Ram to the Peshwa reporting that he was detained by Said Lashkar Khan and that he would shortly return. The writer also says that both the Nizam and Nasarjang profess a desire to maintain friendly relations with the Peshwa, and that they had concentrated their forces near Aurangabad.*

No. 50] [*24-1-1748*

छ ९ माहे सफर

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामी व तथा राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसीं

विनंती. सेवक नारो विठल दिमत राजश्री नागो राम चेरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागाईत छ ४ माहे सफर प्राथःकाल रविवार मुकाम सेहर अवरंगाबाद येथें स्वामीचे कृपाद्रष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. नवाब असबज्याह यानी छ २ मजकुरी प्राथःकाळापासोन येक प्रहर परियंत खलबत केलें. त्या खलबतींत नवाब व नासरजेंग व सैद लस्करखा व सेद सरीफखां व मिरकासमखां व अबदुल खैरखां यैसे बसून विचार काय केला तो न कळे. ते समईस हरकारियांचे दारोगियास रुबरू बोलाऊन सांगितलें कीं वाटा सोडवायाबद्दल बोली जासूदजोड्या चहूं मार्गानें जेलद पाठवणें; त्या आज्ञेवरून दारोगियानें चहूं मार्गीं जासूदजोडी १६ रवाणा केल्या. टोक्याचें मार्गानें जासूद-जोडी ४ व पुंतामियाचे मार्गीं जोडी ४ व वैजापुराचे मार्गें जोडी ४ व कांसाडीचे मार्गें जोडी ४ येकूण जासूद जोडी १६ रवाना केल्या. नासरजेंग सेहरीहून कूच्य करून कोनीकडेस जाणार आहे, व नवाब असबज्याह सेहरींच राहणार यैसी वदंता दरबारी यैकिली जाती. चंद्रसेणाची फौज पांज हजार आज उदईक सेहरीं दाखल होणार आहे. दौलताबादचा किला घ्यावा यैसा हेत नासरजंगाचा आहे.

सवाई जयेसिंगाचा लेक ईश्वरसिंग पंधरा हजारा फौजेनसी हस्तनापुरास दाखल जाला. पातशहाची मुलाजमत जाहाली. पातशाहाजीही त्यांस सिरपाव वस्त्रें ६ व समशेर व कलगी[1] व तुरा यैसा दिधला म्हणोन नवाबास अर्ज जाहाली. स्वामीकडील फौजेची बातमी नवाबास गुजरली कीं बारा हजार फौज जमा जाली आहे. आसपासचे जवारचे गांव दाहा कोसी लस्करचे कहीकरितां पायेमलीखालें आले. शाळू व गहू वगैरे जिनस तमाम लस्करचे लोक घेऊन येतात हें वर्तमान नवाबास कळलें की लस्करचे लोक फार धामधूम करितात; आणि माल कापून घेऊन येतात, त्यास ताकीदहि करितात; परंतु कोन्ही ताकिदीस मानीत नाही. स्वामीस कळावें. विशेष काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*Naro Vithal informs the Peshwa that the Nizam has held a consultation with Nasarjang and some of his sardars and despatched messengers in all directions. "It is rumoured"—he says—"that Nasarjang assisted by Chandrasen Jadhav wishes to capture the fort of Daulatabad". The writer also reports an interview between the Emperor and Ishwarsing at Delhi.*

No. 51] [*25-1-1748*

पौ छ ६ सफर

श्री

श्रीमत राजश्री नाना स्वामी व तथा
राजश्री भाऊ स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक नारो विठ्ठल दिंमत राजश्री नागोराम चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागाईत छ ५ सफर प्रातःकाळ वार सोमवार मुकाम शहर अवरंगाबाद येथें स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. छ ४ मजकुरीं प्रातःकाळापासून तिसराप्रहरपर्यंत सैद लष्करखान व बगाजीपंत व नागोराम ऐसें जानबा निंबालकराचे घरास बसले होते. खानाही व जानबायाहीं सुभेदारास तेथें बोलाविलें. सुभेदार न आले. खानाचा चोपदार फिरोन आला; उपरांतिक दुसऱ्यानें चोपदार सुभेदाराकडे नवाबांहीं व खानांहीं पाठविला. मग सुभेदार तेथें आलें. काय विचार बसून त्यांहीं केला तो आपणांस न कळला. नागोरामजीस मजकूर तेथील विदित आहे; मग अवघे जन उठोन तिसऱ्या प्रहरीं दरबारास गेले. पाहावें तेथें तह काय ठहेरतो

(1) A gem studded ornament for the turban.

बोली चाली काय होती तें नागोराम लिहितीलच. नवाब असबज्याह यांना पंधरा हजार फौज नासरजंगाचे तैनात केली व पठाण व दखनियांची फौज नासरजंगाचे समागमेंच आहेत. ऐसी चाळीस हजार फौज नासरजंगासमागमें देऊन नासरजंगास शेहरीहून सत्वरच रवाना करणार आहे. अवाई रोज्यास जावयाची आहे, परंतु मनसुबा झुंजायाचा दिसोन येतो ऐसी वदंता ऐकतों. नासरजंग सत्वरच येकां दो रोजांत शेहरीहून निघणार आहे. सुर्तेस जावयाची अवाई टाकली आहे; परंतु सुर्तेस जातां दिसोन येत नाहीं. स्वामीकडेच बहुतकरून येणार आहे. कोण्या मनसुब्यावर येईल तें पाहावें. रुस्तुमराव पांढरा व केयाजी पांढरा दोन अडीच हजार फौजेनसी नवाबास छ ४ मिनहूस प्रातःकाळीं भेटले. चंद्रसेनहि येकां दो रोजां शहरास दाखल होणार आहे. तमाम फौज शेहरचे बाहेर काले चबुत्रियाचे असपास उतरली आहे. स्वामीस कळावें. विशेष काय लिहिणें हें विज्ञापना.

¶*Naro Vithal reports to the Peshwa a consultation between Said Lashkar Khan, Bagajipant and Janba Nimbalkar, and also the mobilization of the army by the Nizam who—he adds—has planned an expedition against the Peshwa though he pretends that his objective is Surat.*

No. 52] [26-1-1748

श्री

सेवेसी विनंती. सेवक विसाजी कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ ६ सफर मुकाम गांडापूर स्वामीचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असें विशेष. राजश्री सुभेदाराकडील लाखोटा छ मजकुरीं साइंकाळीं मुजरद राऊत घेऊन आला. तो लाखोटा बजिनस सेवेसी रवाना केला आहे. त्याजवरून तेथील वर्तमान विदित होईल. राऊत येथून मुजरद गेले होते त्यांनीं जबानी वर्तमान सांगितलें कीं नवाबाचे व नासरजंगाचें डेरे काळ्या चौकियावर जाले. टोंकियावर येणार यैसें लष्करांत बोलतात, व टोंकियास जासुदाच्या जोड्या येऊन जागा पाणी पाहून गेल्या हें तों आम्ही पाहिलें. यैकिलें वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे; सत्यमिथ्या न कळे. राजश्री सुभेदाराच्या पत्रावरून वर्तमान कळेल. सेवेसी शृत होये हें विज्ञाप्ति. गुरुवार सुक्रवार हे दोनी त्याचे इदीचे दिवस आहेत; ते जाले म्हणजे मुकाम खाराडीवर येणार. जासूद तेथील जागा पाणी पाहोन गेले. आज बातमीस पुढें राऊत गेले होते त्यांनीं वर्तमान ऐकिलें तें सांगितलें त्याजवरून सेवेसी लिहिलें असें. हें विज्ञाप्ति.

¶*Visaji Krishna reports the movements of Nasarjang towards Toka.*

No. 53] [31-1-1748

श्री

सेवेसी सेवक विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ ११ सफर मुकाम लासुर परगणें गांडापूर स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचा मुकाम कोलारावर होता तोंपर्यंत जेऊरगांवचे मार्गें डांक बसऊन सिवनद तीरीं काल व घलगांव परगणें मजकूरपर्यंत आलों. काल तिसरा प्रहरीं वर्तमान येकिलें कीं स्वामीचा मुकाम देवठाणावर आला. त्याजवरून आज प्रात:कालीं कूच करून कसबे मजकुरावर येऊन राहिलों. त्यास काल रात्रीं राऊत बातमीस पेंडापुराकडे पाठविले होते ते येच समईं बातमी मोंगलाची घेऊन आले कीं निंबालकराची फौज दोन हजार, हती नोबत निशाणें सुधा पेंडापुरावर आले. आमच्या राऊताची त्याची गाठ पडली. परस्परें राऊत बोलिले कीं फौज तिसगावास जाते. इतकें बोलोन फौज कूच करून आमच्या राउतादेखत तिसगावच्या रोखें गेली. आमचे राऊत जलदीनें बातमी सांगावयास आले. दुसरें वर्तमान नवाब नासरजंग रोजियास आले होते तेथून माघारे शहरास गेले. त्याजबरावर फौज होती, त्यापैकीं दोन हजार फौज रोजियापासीं उतरोन या रोखें आली आहे. हें वर्तमान दुसरे बातमीच्या राऊतानी सांगितलें म्हणून सेवेसीं लिहिलें आहे. येविसीचा अर्थ स्वामीस विदित असेल. राजश्री बगाजीपंतहि सेवेसीं येऊन पोहोंचले आहेत. स्वामीचें कूच होते तिकडे व मोंगलाच्या रोखेचा रस्ता राखोन येथपर्यंत आलों. पुढे स्वामीची आज्ञा होईल त्याजप्रमाणें वर्तणूक करून. येथें लोक आहेत त्याचेहि लोक लस्करांत आले आहेत त्याच्या कारकुनास आज्ञा होऊन झाडून लोक निशाणापासी येत तें करणार स्वामी धणी आहेत. ऐकिलें वर्तमान सेवेसीं विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Krishna reports the movements of Nimbalkar and Nawab Nasarjang.*

No. 54] [Recd. 24-3-1748 ?

पौ छ ९ रबिलाखर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. लस्करांत जें जें वर्तमान आइकिलें तें तें सेवेसी विनंती लिहिले आहे. सत्य मिथ्य विचार करावयास स्वामी समर्थ आहेत. राजश्री

बगाजीपंत येही सविस्तर वर्तमान सेवेसी विनंती लिहिली आहे, त्याजवरून विदित होईल. श्रीमंत भाऊ बिदनुरचा फैसला करून श्रीरंगपटणास गेले, म्हणोन नवाबाकडे बातमी आली आहे. स्वामीची खासा स्वारी पंढरपूर जिल्हेयांत होणार. खासा मुकाम वडुतावर जाला म्हणोनहि वर्तमान आहे. नवाबास[1] शरीरीं सावकाश नाहीसें जालें आहे. शरीरावस्था बहुतच गलित जाली आहे. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh to the Peshwa reporting news of Sadashivrao Bhau's return and the illness of Nawab Nizam-ul-mulk.*

No. 55] *[29-4-1748 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांप्रति वासुदेव दीक्षित अनेक आसीर्वाद उपरी. येथील क्षेम चैत्र शुध ११ जाणऊन स्वकींये कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. बहुत दिवस आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाही तरी येणारासमागमें सविस्तर लिहीत असावें तेणेकरून संतोष आहे. यानंतर सैदलस्करखान यास आपण आम्हाविषीं पूर्वी निर्वणूक केली होती त्यावरून आजपावेतो त्याणे आम्हासी स्नेह बहुत केला. त्याचे भरोसियावर निश्चित होतो. सांप्रत मुख्यांने त्यास बोलाविलें आहे व नासरजंग यांसही बोलाविलें हे समागमेच जाणार. अबदुल खैरखान[2] म्हणून येथें अधिकारी होऊन आला आहे त्यासी आम्हांसी परिचये नाही. शाहारांतील कितीक ग्रहस्तांची वर्तणूक आहे ते आपणास विदित आहे यास्तव लिहिलें असे. तरी आम्हाविषीं येक पत्र अबदुल खैरखान यांस पाठवावें कीं सैदलस्करखान स्नेह करीत होता त्यापेक्षा हा अधिक करी. हा नवा आहे. यास बहुत अन्वये करून लिहिले पाहिजे. वरकड कितीक राजश्री शंकराजी नाईक भिडे निवेदन करितील त्याप्राा साहित्यपत्रे पाठवावी कीं निरोप प्रविष्ट सुखरूप राहों बाहुत+ काय लिहिणें हे आशीर्वाद.

¶*Vasudeo Dikshit writes to the Peshwa to supply him an introduction to Abdulkhair Khan, the new governor of Aurangabad.*

---

१ निजामुल्मुल्कानें ? २ औरंगाबादचा अंमलदार.

+ हीं अक्षरें बाळबोधींत.

No. 56] [16-6-1748

पा छ २४ जमादिलाखर+

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री फतेसिंगबावा याजकडील मुलुकगिरीचे वर्तमान तरी स्वामीस विदित जालेच असेल. वराडपर्यंत जाऊन माघारें फिरोन तुलजापुरावरून मोहलेस आले. तेथून अकलकोटास छावणीस जावयाचा विचार चितात आणिला. त्यास रा रामाजीपंतं[1] कोनापा नाईक वगैरे सामादिकाचे मते अकलकोटाकडे न जावे. तेव्हां दिवाणानी रा गोविंदपत यांस सागितलें की तुम्ही कूच करून मार्ग काढा. त्यावरून यांणी बावाकडे चोपदारासमागमे सांगोन पाठविलें की आम्ही करकंबेस जातों. त्यावरून राजश्री फतेसिंगबावा याचे चितात आले की आम्हीं सर्व प्रकारे आश्रय राजश्री पंतप्रधान याचा केला. काय निमित कीं राज्य या प्रकारचें जालें. समर्थाच्या आश्रय असल्या कार्यी आणि बलकुबलीस कामास येईल यैसे जाणोन श्नेह संपादून फौज समागमे आणिली. त्यांस आम्ही अकलकोटास जातों यैसे म्हणताच आम्हास * * * (न च) कळले बरे आम्ही जातो न जातो पाहावे होते. गेलो * * * री तेथें पाठऊन निरोप मागावा होता. बरे * * असों. चोपदाराबराबर सांगोन पाठवावेसे कायें हो * * * ण येऊन निरोप घेऊन जावे होतें. वस्त्रे पात्रे बहु * * * * * * कल्पना चितात आणिली होती. त्यास चोपदारासमागमे सांगोन पाठविले म्हणोन आपले ठायी विमनस्क जाले. हे कूच करून पुढे आले तेव्हा त्यांचे कारभारी यानी समजाऊन सांगून अकलकोटाकडील रोख दूर करून पंढरपुरास आणिलें तो येथून थोरले वाड्यातील पत्रे बावास गेली कीं, तुम्हीं अकलकोटी छावणी करणें, येथे न येणें. सराईस आपला मनसुबा करून मुलुकगिरीस जाणें. ते समयी दिवाणजीस शब्द लाविला की याचा विचार काय करावा? तेव्हा दिवाणानी मलोली म्हणोन पिलवाजवल पंढरपुराहून आलीकडे येक मजल बावाचे पागेचे ठाणे आहे तेथे राहाण्याचा विचार सांगितला. बावा तेथें राहिले. दिवाण व जयसिंग सिर्के रामजी नाईक

+ रजब असावा.

१ रामाजीपंत गाडगीळ? याचा मुलगा आपाजी राम असावा.

यांचे पुत्र भगवंत नाईक सातारियास आले. बावा राहिले यामुळें राजश्री स्वामी किंचित विरुध भाशण करूं लागले. काय निमित्य वाडियातील आज्ञेने, यावे राहावे जावें यैसें येवढें मातबर सरदार चालो लागलें हे अनुचित. त्या उपरी दिवाणास हे कलोन वाडियात मजकूर केला की बावास मलोलीस राहून कार्यभाग काही नाही व त्याचे स्वरूपासहि योग्य नाही. तुम्हीं समर्थ व सी * * * निरोप लौकर दिल्हास कार्यास येईल. परंतु * * * * * नाही त्यास जाणवावें हे उचित आहें * * * * * * णोन बोलली. त्यास राहिल्यासारखें मातबर * * * * से सांगितल्यास राबांस पावविला * * * * आपणाकडील व राजश्री स्वामीस विनंती करून हुजूरचे राजश्री यशवंतराऊ यैसे पाठऊन बावास आणावयाचे केलें, त्या समयात येक दिवस रामाजी नाईक यांचे पुत्र दरबारास गेले होते. त्यास राजश्री देवराऊ यांणी येकीकडें काढून बोलले की राजश्री बावा आपणास बहुत च्याहात आहेत. तुमचे वडिलाचा आपला श्नेहभाव आहे. त्यास तुम्हीं इतकेच करा की थोरले वाडियात सांगोन यशवंतराऊ यांस पाठवावयाचे केलें आहें ते आपणास पाठवावयाचे करा. म्हणजे आपण जाऊन बावास घेऊन येतों. बावाचे पदरी बाबूजी नाईक यांस बांधतों. राजश्री स्वामीची मर्जी बावावरी उतम प्रकारची होय ते करिता संपूर्ण कर्नाटक त्रिचनापली बावांचे हांती येईसे करितो. म्हणोन भाशण केले. हे उगेच राहिले. याणीं वाडियात कांही सांगितले नाही. राजश्री सिवाजी हरि व यशवंतराऊ छ ११ जमादिलाखरी स्वार होऊन गेले. बंसपा[1] माहादेवी आहेत, त्यास तिंकडूनच घेऊन जाणार. राजश्री बावाहि येतील. त्यास येंदा बाबूजी नाईक यांचा वेल[2] जिरला आहें. काही बाकी नाही राहिली. मुखेंकरून धटाई करितील इतके मात्र, वरकड काही नाही. आणि त्यास कळलेहि आहे की याउपरी आपण येकव्यास हे साध्य होत नाही. त्यास कदाचित राजश्री फतेसिंग बावा यांस येक करून घ्यावयाचा विचार करूं लागल्यास फतेसिंगबावास त्यांस येक होऊ देतां तरी येत नाही. बावाची वृत्ति आपले ठायी कायमच आहे. येदां स्वामीच्या आश्रयेकडून च्यार टकेही मिलालेच आहेत, त्यास पुढील कर्तव्य मनसुबा पुसिल्यास कोण्हे रीतीचा बोलावा ? येंदा तहनामा करून दिल्हास अंतर काहीसे वाटणीत पडले आहे. त्यास रामाजीपंत यास आम्ही पुसिलें. त्याणी उत्तर केले कीं येथे येऊन तुमची भेटी जाल्यावरी त्याचे तुमचे विचारें होऊन येईल. त्यास हिसेबाप्रमाणे तेहि करून देतीलच आणि

---

१ बसवंत खोजा.

२ जोर ; वळवळ.

आम्हीहि होऊच. परंतु पुढील उपयोग रचिला पाहिजे. स्वामीचे राहाणे त्या प्रांती जालेसे दिसते. यैशियास सालमजकूरचा मनसुबा याणी कैसा करावा ? स्वामी कैसा परिणामास नेतात याचा विचार आम्हास कळला पाहिजे. काय निमित्य विचार ती * * * * रून उपस्थित केले पाहिजे. जवल * * * * * वरचेवरी बोलावयास अथवा पुण्या * * * * * लिहिण्यांत येते तेथें आइते समयी लेहून जाब * * * * * * पल्यांस दोन तीन महिने पाहिजेत. यास्तव अगोधर संज्ञापूर्वक लिहिले आहे. तरी सर्व ध्यानास आणून आज्ञा कर्तव्य ते करावी. येतद्विशयी श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीस व राजश्री दादा यांस लिहिणें ते ल्याहावे. आमचे मतें राजश्री फतेसिंगबावाची सरदारी आपले लगामची जाऊ न द्यावी. बाबूजी नाईक यांची आणखी कोण्हाची गाठ येंदाचे वर्ष न पडता नाईकच गेलेसे जालें तरी पुर्ताच परिणाम लागतो. लोक कोण्ही राजी नाहीत. गुदस्ताप्रोहि येंदा फौज जमा होता आमच्या तर्कानी दिसत नाही. पाहावें. हे सर्व विचार स्वामी सर्वज्ञापुढे आम्हीं काय ल्याहावें ? सर्वहि विविक्तपणें पाहून आज्ञा समर्पक सविस्तर लेहून पाठवावी, तदनरूप उत्पात करणें तो स्वामीचे प्रतापे होऊन येईल. बाबूजी नाईक यांचे वकील थोरले वाडियात लाघावळ लावणार. नाईकाचा विचार स्वामीस अवगत नाहीसा नाही. कार्यापुर्तें जे म्हटले ते मान्य करितील. त्यास ते समयीं भलते प्रकारें मनसुबा चालविला पाहिजे. त्यास याविशयी स्वामीची मर्जी जसी असेल तसी आज्ञा करावी. याचे उतर सत्वर सादर * * * विदित जाले पाहिजे. रा फतेसिंगबावा * * * * णावयांस यशवंत-राऊ, सिवाजी हरि रवाना होणार * * * * (व) र्तमान बावास कल-ताच त्यांणी विचार केला की * * * * नाही जे यांणी यावे आणि आम्हास घेऊन जावें म्हणोन त्याणीं आशाढ शुध द्वितीया गुरुवारी कूच करून म्हसवडास आलें. तेथून मजल दर मजल येत आहेत. हेहि गुरुवारीच येथून निघाले. त्याच्या याच्या भेटी खटावामाजी होतील सप्तमीस राजदर्शनास येतील. विदित जाले पाहिजे. बहुत काय लिहिणे ? कृपा असों दिल्ही पाहिजे हे विनंती.

¶*Letter of Trimbak Sadashiv Purandare from Satara to the Peshwa reporting the attitude of Fatesing Bhosle and the intrigues of Babuji Naik and their concerted efforts to secure the Karnatak for themselves. The writer asks for directions to proceed in the affair.*

3856

No. 57] [September 1747 ?

श्रीसुबराज

राजश्री बालाजी पंडित
प्रधान गोसांवी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीा मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब दंडवत विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये क्षेमातिशये लेखने चित प्रमुदित करीत आसिलें पाहिजे विशेष. आपण स्मरणपूर्वक कृपा करून वार्तिकासमागमे पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन परम समाधान जाहलें. सांप्रत आपणाकडील वर्तमान काये सविस्तरे लिहिणे म्हणून. तर राजश्री भाऊचा आमचा निरोप परस्परें होऊन आम्ही डंबलस आलों. राजश्री बाबूजी नाईक आम्हा उभयेतांच्या आंगावरून नदीपार होऊन गेले हें वर्तमान परस्परें आपणहि यैकिलेंच आसेल. नाईकी किले मडकसिरे प्रांते जाऊन महदुपद्वाप आरंभिला, याकरिता त्याचा परामर्श करणे आवश्यक होऊन चिरंजीव राजश्री सुभानराव घोरपडे यास फौजेनिसी त्या प्रांते ठेविलेच होते. नवाब नासरजंग यांस लिहिणें ते लिहून चिरंजीवाची त्यांची मुलाजमत करविली. नवाबहि आम्हाठायीं अत्यंत आस्छर धरितात. चिरंजिवास सकलविषयीं साहित्य करून दिल्हे. चिरंजिवाने बहुतसी मेहनत करून नाईक यांस पूर्वपद्धतिप्रमाणेच बहुमानपूर्वक निरोप देऊन नदीपर्यंत बोलवीत आले. नाईकहि आपल्या संप्रदायाप्रमाणेच आश्वादि पदार्थ देत देतच जिल्हा टाकून स्वस्छानास गेले हे वृत आपणहि परस्परे यैकिलेच असेल. नवाब नासरजंग याणी वरचेवरी पत्रे पाठविलीं जे परस्पर भेटी होऊन महत्कार्यभाग तुमच्या विचारे करावे यैसे लिहितच आले. तिकडील संदर्भ राखून समागमे चिरंजीव राजश्री सुभानरायास भारी फौजेनिसी ठेविले. कर्नोल कडपे आरकाटकर सुभेहि येऊन भेटले. मातबरीने पटणच्या मुलुकांत गेले आहेत. परंतु पटणकराचा विचार नेणता नाही. निग्रहास प्रवर्तले आहेत. हा साहेबसुभा यांस त्या संस्छानास नसियेत करावयाचे काये आगाध आहे? सांप्रत पटणास दोनी गावावरी जाऊन मोकाम केला आहे. अशा अमिरासी विरुद्धाचरण पुरी पडते असे नाही. सलाहि अचिरे चूर (?) केले. सांप्रत मागती नवाब नासरजंग याचीं पत्रे आलीं आहेत. चिरंजिवानीहि लिहिले आहे. पटणचा सलाह करून बिदरूरच्या सरहदेने होऊन त्या संस्छानचा सला उरकोन बसवपटण प्रांते दिवाली इतके येतात. तेथे आपली भेटी होऊन येकमते मनसबा कर्तव्य ते आपले मते करावे. जिल्याची बंदोबस्ती करून श्नेह संपादावा असे बहुत काही नवाबाचे चिती आहे. तोहि योग

बादबरसात घडोन येईल यैसें चिरंजीवानी लिहिले आहे. आस्तु. तीर्थरूप राजश्री राव ममलकतमदारसाहेबं+ याणी हकदार कर्जदार सर्वहि येख्तियारी आम्हावर सोपोन दिल्ही आहे. नदी अलीकडील जिल्यांत टोंगे होऊन स्वामी-सेवकपणाची मर्यादा काहीं राहिली नाही. याकरितां करवीरवासी माहाराजानी बंदोबस्तीबदल राजश्री राव ममलकतमदार यांस लिहिल्यावरून वडिलीं आम्हास आज्ञा केली जे राजदर्शन घेऊन स्वामिसेवा करणे. त्यास श्रीमत्सकल-सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेबी तोरगलेस येऊन बोलाऊं पाठविल्याकरिता आम्ही तोरगेलेस दर्शन घेतलें. यानी अतिशये केला जे करविरास येऊन राजदर्शन घेऊन जाणे. त्यावरून तोरगलाहून सर्वहि मिलोन आम्ही जरारे पांच सातसे स्वारानिसीं करविरास आलो. राजदर्शन सन्मानपूर्वक जालें. या उपरी जो मनसबा होईल तो लिहिला जाईल. राजश्री नागो राम यानी व आपण लिहिले होते जे आपणाकडील मातबर विश्वासू कारकून पाठवणे. कितेक मनसब्याचा विचार करणे आहे यैसे लिहिले. तर याहून विशेष काये आहे? आमच्या चितीहि तोच आशये होता. आलबता विश्वासू कारकून सत्वरीच पाठवितों. उभयेपक्षीचा श्नेह परस्परे दिनप्रतिदिनी अभिवृधमान व्हावा हाच आमचा मनोधर्म आहे. तदनुसारच आपणहि लोभ करितां तर कृपेस पात्रच आहों. आमची स्थिति गति सर्वहि राजश्री भाऊनी निवेदन केलीच असेल. आम्ही आपल्यासिवाये किमपि नाही. कितेकार्थ राजश्री केशवराऊ सांगता व लिहिता चितास येईल. उतर समर्पक पाठविले पाहिजे. आमी आपणा-सिवाय नाही. जेणकडून दौलतेचा बंदोबस्त होये आपणास यश ये ते करावे. इतक काय निमित्य लिहिणे ग्रहकृत्य येक याकरिता लिहिण जरूर. बहुत लिहिण तर गोसावी सूज्ञ असेत. कृपा लोभ असो दिला पाहिजे हे विनंती

राजते लेखना वधि

¶*Murarrao Ghorpade discusses the complicated situation in the Karnatak.*

+ हा दौलतराव घोरपडे गजेंद्रगडकर असावा, हा मुरारराबाहून वडील.

No. 58] [6-10-1748 ?

श्री

राजश्री बालाजी पंडित प्रधान
गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो फतेसिंग भोंसले रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत असिलें पाहिजे विशेष. राजेश्री बाबूराव आपणापासून अलियावरी आम्ही तिकडे यावयाचा सिधांत करून डेरेदाखल जालो हें वर्तमान पूर्वी, आपणाकडे लेहून पाठविलेंच आहे. तदोत्तर कूच करून पुढे यावें तों राजश्रीचा मुकाम त्रिपुटीवरी जाला याकरितां च्यार दिवस गुंता पडिला. तेव्हा राजश्री भाऊ यांकडे राजश्री बाबूराव यांस पाठविलें होतें. त्यास त्यानी सांगितलें की, पुणियास जावयाचा करार आहे त्याप्रमाणें जावें यैसें सांगितलें. त्यांस राजश्रीच्या मरजीचाहि प्रसंग पुसिला. तेव्हां त्यानी उतर दिल्हें कीं, आपणास हे गोष्टी काहीं कलत नाहीं. राजश्री प्रधानपंत यांचें पत्र येईल त्याप्रमाणें वर्तावे यैसें उतर दिल्हे. त्यास आम्हास सर्वाविसीं आपला भरवसा आहे. आपण दुसरें जाणत नाहीं. सविस्तर राजश्री बाबूराव व राजश्री त्रिंबकपंत यां उभयेतांस लिहिलें आहे ते आपणास निवेदन करितील, त्याप्रमाणे मनास आणून आम्हांस जें लिहिणें तें ल्याहावें. आपलें उत्तर येईल तदनरूप विचार करूं. कललें पाहिजे. रा छ २३ सवाल. आम्हास तुमच्या वचनासिवाय दुसरे करणे नाही. काये ते मनास आणून लिहावे त्याप्रमाने वर्तणूक करू. बहुत काये लिहिणे लोभ असो दिजे हे विनंती.

¶*Fatesing Bhonsle expresses full confidence in the Peshwa and his readiness to act upon the latter's advice.*

No. 59] [22-2-1750

श्री

श्रीमंत् राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवसी

विनंती. सेवक शामराऊ यादव कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील क्षेम ता। माघ वद्य १२ मु। लस्कर नवाब मुजफरजंग येथास्थित जाणऊन कृपापत्री सनाथ केले पाहिजे विशेश. पूर्वी चंदावरचे मुकामीहून कासिद जोडिया २ नवाब

मुजफरजंग याच्या सरकारच्या वाइदियाच्या पाठविल्या त्या आद्याप आल्या नाहीत त्याजबरोबर सविस्तर वृत लिहिले आहे त्याजवरून श्रुत जाले आसल. स्वामी-पासून येक जोड जासुदाची सवनुरीहून पत्रे लिहीली होती त्याचे उत्तर घेऊन आलीं. साताराहून छ ९ जिल्हेजी रवाना केले ते जासूद छ २ माहे सफरी चंदावरचे मुकामी आले. पाउणे दोन महिनियानी येथे आले. त्याची घरे सावनूर प्रांती होती. आपले स्वइछेने आले. हालीचे वर्तमान तर चंदावरकरानी तीस लक्ष रुा सध्या द्यावे. उरलियासी परगणे दिल्हे आहेत. तसि लाखपैकी पंधरा लाख आठा दिवसानी द्यावे. पंधरा लाखास वोल[1] मातबर देऊन यानी येथून कूच करावे. तेहि रुपये विसा दिवसानीं द्यावे. यैसा करार जाला होता. त्यास पहिल्याच पंधरा लक्षास दोन महिने त्यानी लाविले. सात लाख रुपये वसूल नकद व रुपे, सोन व जव्हायेर यैसे मिळून भरणा केला. मग त्यानी हातां-पायावर घातले. कूच करून जाणे दिरंगाईवर घातले. मग बाकीचा पैका देऊ यैसे म्हणत. याचा सबब आनवरदीखान याचा जेस्ट पुत्र महमदआलीखान त्रिचनापलीस किलियामधे आहे तो चंदावरकरास लिहीत जाये की, पैका न देणे. नवाब नासरजंग सिताब[2] येऊन पोहचतात. नासरजंगाकडेहि चंदावरकराची लिहिली जात आसत. त्याची पत्रेहि येत की, सिताब येतो. त्या आसरियाकरतां पैकियास दिरंग लाविला. यामुळे तमाम चंदावरचा मुल्क खराब जाला. सोली[3] या मुलकांत फार. तमाम साळी व घरे कोठे राहिली नाहीत. नवाब मुजफरजंग व हुसेन दोस्तखान यांसी विशाद आला. फिरून मोर्चे लाविले की, तसि लाख रुपये घेऊन, नाही तर किला घेऊन. फिरंगियानी तोफा व घरनाला मारूं लागले. किलीयाच्या चरिया तोफाखाले पाडू लागले. गावातहि गोळे घरनालाचे मारू लागले. चंदावरकराहि झुंझू लागले. यैसे दाहाबारा दिवस झुंझले. मागती फिरंगियाकडील मुजफरखान जमातदार व सैद करीम जमातदार नवाब मुजफरजंग याजकडील दरमियान चंदावरकरानी घातले. पहिले सात लक्ष हाली कापड व नकद मिलून चऊ लक्षाचा भरणा करावा. काही दिल्हे काही देतो यैसा करार-मदार जाला. पंधरा लक्षांपैकीं च्यार लाख रुपये मुजफरखान दिा फिरंगी त्याचा निशा केला. कूच जालियावर द्यावे यैसा करार करून मोरचे उठविले. चंदावरचा मोठा मुदई[4] हुसेनदोस्तखां त्याच्या मनात किला खामखा घ्यावा. चंदावरकरानी दिनचर्येवर घालून दगा केला. सिबंदीहि उभयेतावर चढली आणि त्रिचनापलीहि कायम राहिली. आपणास पैका दिल्हा आसता तर फुरसत होती. तों त्रिचनापली घेतों. आता हें स्थल तऱ्ही घ्यावे: नवाब मुजफरजंग यांचा

---

१ जामीन. २ लौकर. ३ भात. ४ शत्रु.

आग्रह तो कांहीं नवता. आम्ही बहुत प्रकारे सांगितले. त्यानी मान्ये केले. परंतु हुसेनदोस्तखानाची नजर बहकली आहे. त्याच्या चितास न ये. परंतु फौजने हाटले. नवाब नासरजंग खुद देवनहाली बालापूरचा गाव सिरे प्रांती आहे तेथे आहेत. पुढे फौजा रवाना केल्या. तमाम मऱ्हाटे व काही मोगली फौज बरोबर सरदार काजी दायेम व मोरोपंत दिल्हे आहेत. पंधरा हजार फौज आहे. हे वर्तमान यैकून दार मदार करून कूच केले. काही चंदावरकरानी दिल्हे काही न दिल्हे. यासी तो कूच करणे जरूर जाले कूच करून फुलचरीकडे जातात. फुलचरीच्या फिरंगियाने यासी लिहीले आहे की, चंदावरी न आटकणे. चंदावरचा पैका येईल. पुढे समजून घेऊन. तुम्ही कूच करून इकडे येणे. कांहीं तोफा मागून चंदावरचे मुकामी पाठविल्या. च्यार मोठ्या, दाहा १० लाहान होत्या. आणीकहि सामान त्याने फा(र) केले आहे. त्याचा भरवसा यासी फार आहे. नवाब मुजफरजंगाचे ग्रहस्तपण पाहून तो यांचा रुणी पूर्वजन्मीचा जाला आहे तेथे जातात. छ १८ माहे सफरी गुरुवारी कूच जाले. पुढे फौज येते. त्यासी यासी पनास कोसाचा तफावत आहे. जाहिरा म्हणतात की, सला करायासी येतात. कुंफिया[1] तो जैसे बनल तैसे करावे यैसा विचार आहे. हेहि त्याचा इतबार करीत नाहीती. नवाब मुजफरजंग याचेथे आठ दिवस सिबंदीने दंगा क(रून) धरणी पारणी फार जाली. काही तंबा[2] राहिला नवता. परंतु याचे आद्दत (अद्दष्ट) चांगले. तमाम जमातदारास म्हणू लागले की, लडाईचे काम आता येऊन बनले आहे. हा हागामा केलियाने मुदई सेर होईल. तुमचा हक तो मजला देणे आहे. जर सबुरी आसली तर पैका आदवानीस आहे तो मार्गी-करतां येत नाही. उतावलीच आसिली तर जव्हायेर मातुश्री व बेगमचे आहे. हाती, घोडे मालमालीयेत घेऊन जाणे. आपला तो निछये जो आहे तोच आहे. लडाईत जिणे मरणे जे होणे ते हो. याचे भलेपण पाहून मातबर जमातदार होते त्यानीच तमाम लोकास समाजाविले कीं, याचे नसीब बरेच आहेत. तर लडाई जालियावर हक घेऊन. थोर मनुशे आहे आणि उजूरहि करवत नाही. याचे दौलत बहुत खादले आहे. यैसे समजावीस करून दंगा उठविला. लोकी म्हटले की, खायास मात्र देणे. बाद लडाई पैका देणे. तेव्हा करार केला की, फुलचरीस गोलियावर पैका खायास देऊन. फौजहि बरी आहे. पाहावे ईश्वर काये करील. जे होणे ते पंधरा दिवसात होईल. मुजफरजंग यासी पुत्र छ १२ सफरी सुक्रवारी दोन प्रहर दो घटकास दिवसा जाला. त्याचे मुबारकबादीचे[3] पत्र लिहिणे. वरकडहि समाधानाचे पत्र लिहीणे. श्रमिंत स्वामीचे

---

१ अंतस्थ. २ तथ्य. ३ अभिनंदनाचें.

3861

वर्तमान यासी कळले. श्रमी जाले. म्हणों लागले मोगलाईत बंदगौनआली होते. मऱ्हाट रा(ज्या)त शाहू राजे होते. यैसे माणूस पुढे होणार नाहीत. सर्व राज्ये स्वामीस सोपून गेले. हे वर्तमान बातमीचे हरकारे घेऊन आले. सेवकास म्हणू लागले की, आम्हास सर्व भरवसा प्रधान पंतांचा. तेच आता सर्व येख्तियारी आहेत. पुढे राजीं श्रीमंत राजश्री राजाराम बसविले हेहि वर्तमान यासी कळले. बरे श्री इछा प्रमाण. छत्रपतिसारखा राजा होणे नाही. राज्ये बरे नांदविले. अजातशत्रु होते. श्री इछेने त्यांचा आवतार समाप्त जाला. पुढे राज्याची फिकीर येऊन स्वामीस पडिली. लोकांच्या भाग्यें स्वामीस चिरकाल आयुशे हो. करनाटक प्रांत आपल्याकडे राजश्री बाबासाहेबाचे नावे करून घेणे. स्वामीच्या नावावरून आमलहि बसल. मुलुकहि आबाद होईल. चंदावरचे स्वस्थान फार खराब जाहाले. त्यासी आबाद होयासच दिवसगत लागल. राजश्री प्रतापसिंग राजे भोसले यासी येक पत्र लिहून पाठवणे की, तुमचे वर्तमान सविस्तर रामराऊ यानी लिहिले (त्याज वरून) कळू आले. मुलकास कौल देणे, आबाद करणे. मोगलाईतून बंदोबस्त करून घेऊन समाधानाचे पत्र लिहीणे. हुसेन दोस्तखान यासीहि पत्र लिहिणे की, मुलूक खराब केला तो केला. जेथील पैका तुम्ही घ्याल, तेथील आमचा यैवज आम्हासहि देणे. उरला मुलुक आमचा आम्ही समजून घेऊन. आरकाट व चंदावर, आदवानी येथील कागदपत्र आम्हाकडे पाठऊन देणे. फुलचरीच्या फिरिंगीयासी येक पत्र समाधानचे चितास येईल तर पाठवावे. स्नेह आसावा. आनवरदीखान याचा पुत्र महफुजखान याजकडे लडाईत सापडला होता, त्याने मीरमहमुदखान बक्षी याचे हाते राजकारण केले. त्रिचनापलीचा मुलूक आकरा लाख शायावर इजारा केला. दीड दोन लाख रुपयांच्या कबजाची या(दी) याच्या यासी आणून दिल्ह्या. याचा चाकर झाला. मुजफरजंग यानीहि त्याजवर कृपा केली. त्यासी त्रिचनापलीच्या मुलकात गेला. समागमे पाचसे स्वार ५०० यानी दिल्हे होते. येक जमातदार २५० आडचसे स्वाराचा. आडचसे स्वार किरकोळ. त्याचा बंधू महमदआ-लीखान याने सांगोन पाठविले की, किलियासी न येणे. परभारे आमल मुलकात करणें. येथे येऊ देणार नाही. तो मुलकात फिरत होता. त्याने परभारे नावाब नासरजंग याजकडे कागद पाठऊन सांगाते स्वार होते हे फोडून परभारे नवाब नासरजंग याजकडे गेला. समागमे स्वारहि गेले. महफुजखान याची मुलाजमत जाली. जमातदार याचीहि जाली. तेथे चंपतराये दिवाण

---

(1) The Great Nizam.

आनवरदीखानाचा आहे. लडाईतून पलून पालेकराचे मुलकात गेला होता. तो परभारे जाऊन भेटला आहे. महफुजखान भेटल्यावर पाचा सा रोजा दरबारात नासरजंग यानी मजकूर केला. येकाचे निमक खाल्यावर यैन [पुढील दोन ओळी कसरीनें खाल्या आहेत. त्यामुळें पत्र पूर्ण कीं अपूर्ण हें समजण्यास मार्ग नाहीं.]

¶*Shyamrao Yadav, Peshwa's news-writer, sends news from the camp of Muzaffarjang near Tanjore and Trichinopoli. He describes in detail the movements of Nasarjang, Muzaffarjang, and the sons of Anvaruddin and their intrigues with the French.*

No. 60] *[27-2-1750 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शामराऊ यादव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील क्षम ताा फालगुन सुद ३ मंगलवार मुाा नजीक वेंकटपेठ येथास्थित जाणऊन कृपापत्री सनाथ केले पाहिजे विशेश. सेवेसी पत्र लिहून तयार केले परंतु मार्ग न चाले. झाडी मोठी, पालेगर त्याच्या मुलकात कलह (रू ?) म्हणऊन चोर आहेत. मार्ग चालू देत ना; याजकरिता पत्र तसेच राहिले. पुढे वर्तमान आणीकच जाले. चंदाखानाचा कारभारी शेशाराऊ आरबा ब्राम्हण होता. तो चंदावरच्या मुलकांत दोन हजार फौज घेऊन पैका वसूल करायासी गेला होता. लोकाच्या वराता करून दिल्या होत्या. गौरीमायूर व कनारगुढी दोन सुबे आहेत तेथे गेला होता. लस्कर चंदावरीहून कूच जाले. वर्तमान यैकून च्यारसे रावतानसी लस्करास सामील होण्यास येत होता. प्राा चितंबर करुपे-वालियाची जागीर आहे. फुलचरीच्या मार्गात आहे. चितंबर च्यार कोस राहिले. येका खेडियापासी राहिला होता. वरकड त्याचे फौजेचे लोक वराता वसूल करायाचे बहाणियाने तिकडेच राहिले. राजश्री जानोजी निंबालकर व मुरारजी घोरपडे व सुलतानजी निंबालकराचे पुत्र व रामचंद्र जाधवाकडील दोन हजार फौज यैस सात आठ हजार सडी फौज या लस्करच्या परामृशास येत होती. त्यास आकल्पित गाठी शेशारायासी पडली. त्याच्या डेरियावरच हे फौज गेली. ते थोडे हे फार, तेथे युध्ये मोठे जाले. पायेउतारा जमातदार झुंझले. शेशारावहि बरा माणूस होता. याजपासीं करोलाचे सामान फार गोल्याखालेच

जाया केले. दोन अडीचसे पठाण ठार पडिले. से पनास माणून जखमी जाले. चालीस पनास राऊत मात्र पळाले. जानोजी निंबालकर वगैरे यांचेहि दाहावीस माणू(स) ठार पडिले. चालीस पनास माणूस जखमी जाले. खुद जानोजी निंबाल(कर) यासी तिराची जखम मानेस वेझुटीं[1] लागली आहे. मुरारजी घोरपडे यासी हातास गोली लागली आहे. त्या फौजेत नव हाती, जमातदाराचे ७ व चंदाखानाचे दोन शेशारायाबरोबर होते. त्यास दोन हाती जमातदारानी पोटे फाडून मारले. सात हाती तीन च्यारसे घोडे व वस्तभाव लुटून घेऊन गेले. त्याची स्वारी साधली. यास तीन च्यार दिवस जाले. नवाब मुजफरजंगाचा मुकाम चितांबरापासून चौ कोसावर जाला होता. फालगुण सुध १ रविवारी कूच जाले. तलापासून दोन कोस आले तों सव्या फौजानी येऊन गाठी घातली. तों मुजफरजंग यांनी बंदोबस्त केला होता. दुमदारीस[2] चंदाखान व फिरंगी व त्याच्या तोफा, मध्यें खुद आपण आपले हारोलीस सैदकरीमखान वगैरे तीन हजार फौज. चंदाखानामधे व आपल्यामधे बुनगे उजवे बाजूस मीर महमुदखान बक्षी वगैरे तीन हजार फौज, प्यादे दोन हजार त्यात फिरंगी व बाण व जजाला, डावे बाजूसहि मीरमुसाचा पुत्र व आणिक सरदार याच प्रकारे ठेविले होते. ते दिवसी जुंझ बरे जाले. प्रातकालापासून साईकाल पावतो जुंझ होतच आले. भुवनगीर पावेतो आले. तेथे मुकाम जाला, परंतु त्यांचे तोंड कोठेंहि लागले नाही. बारा घोडी त्याजकडील पाडाऊ आली. दोघे जीत धरले. दोनतीन मारले गेले. घोडीहि तीन च्यार मारली. साइंकाली तेहि दाणापाणी करायासी गेले. पाचा सा कोसावर काजी दायेम व मोरोपंत व कांही फौज व या फौजेचे बुनगे आहे. रविवारी प्रहरात्र बाकी राहतां पाच बाण लस्करात टाकले, परंतु कोणास लागले नाहीं. सोमवारी सुद २ मुजफरजंग यानी कूच केले. मागती फौजा मऱ्हाटियाच्या आल्या. भोवताले उभे राहिले. दुमदारीस जुंझ झाले. दोन च्यार माणसें फिरंगीयानी मारली. मग काहीं बाजूने आ * * * चितीस साईकाल पावतों कांहीं दाटी केली नाहीं. भोवताले उभे आसत. फिरंगियाचा तोफाचा व बंदुखाचा मार मोठा, पुढे फिरंगी जात, ते मागे मागे सरत जात. पाच कोसाचे कूच झाले. नवाब नासरजंगासी याचे फौजेसी, विसा पंचवीसा कोसाचे आंतर आहे. फुलचरीपासी बारा कोस राहिली आहे, वर्तमान यैकतो. दोन हजार फिरंगी व दोन तोफा कोसावर टपा खात यैशा रवाना फिरिंगियाने याचे कुमकेस पाठविल्या आहेत. आद्याप आले नाहीत. नवाब नासरजंगासी व यासी वाटेसच गाठी पडील की फुलचरीच्या मयेदानात पडील हे कलत नाहीं.

---

१ ओझरती. २ पिछाडी.

आतां कांहीं बहुतसी आवध राहिली नाही. जे होणे आठा दिवसात होईल. फौज पुढे आली आहे. याच्याने काही याची वाट बंद करवत नाहीं. यानी त्याला तोलून पाहिले, त्यानी याला तोलून पाहिले. जे होणे ते खुदाखुदासीच गाठ पडलियावर होईल. नवाब दलेलखान यासी नवाब नासरजंग यानी फार बेजिदी[१] केली. भले माणूस पाठविले की तुम्ही येणे. त्यानी लिहिले कीं आपण येतो, तोंवर तुम्ही सिरियाहून कूच न करणे. आपण सांगू ते तुम्ही यैकावे. तुमची आमची मरजी मिलाली तर आपणच मुजफरजंगापावतों जाऊन तुमचा त्याचा सलुक करून देऊन पुढले वरसी त्याची तुमची भेटी करून. दलेलखानानी कूच करून भेटीस येत होते. पंधरा कोसाचा त्याचा याचा तफावत होता. नासरजंग यानी कूच करून मदगिरीस आले, तेव्हा दलेलखान तेथेच पाचसात मोकाम करून माघारे गेले. हे मामे ते भाचे त्यास मारायास चालले आहेत आपण न जावे. पारखा कोन्ही आसता तर लडाईस सामील होतो यैसे म्हणऊन बराबर तुंगभद्रा तीर तेथे गेले. पाच हजार फौज आहे म्हणतात, आणिक ठेवितात म्हणऊन वर्तमान यैकिले आहे. पुढे होईल ते खरे. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Shyamrao Yadav writes that fighting between Nasarjang and Muzaffarjang has begun in earnest. Shesharao, the Brahmin Diwan of Chandasaheb, was surprised by a party of Nasarjang and put to death.*

No. 61] [15-9-1750

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब व भाऊसाहेब
स्वामींचे सेवेसी

आज्ञाधारक सेवक रामचंद्र बावाजी कृतानेक साष्टांग दंडवत प्रणाम विज्ञापना. स्वामींचे कृपादृष्टीकडून सेवकाचें वर्तमान तागाईत छ २४ शौवालपर्यंत यथास्थित असें. येथील साद्यंत वर्तमान मुदाम जोडीसमागमें सेवेसी लिहिलें आहे त्यावरून विदित जालें असेल. अलीकडे येथील बंदोबस्तीकरितां राजश्री नारायणराव व विठल विश्राम यांजकडून स्वार प्यादे देविले आहेत, तीं पत्रें त्याजकडे रवाना केलीं आहेत. ते आलियावर सेवेसी वर्तमान लिहून पाठवितों. यांस यंदा येथें जबरदस्तीची

---

१ याचना.

कमी पाहून रहादारी मार्ग बहुत करून परभारें जातात, तन्मुळें हांशील कमी व नवी रयत येणें अगर परगण्याखालील कांहीं खेडींपाडीं सुटणें हे गोष्ट घडली नाहीं. आहे ते व बसवपटणचीं पांच खेडीं हाताखालीं घातलीं आहेत. तीं सांभाळून सेवक स्वामीसेवेवरी खबरदार असें. राजश्री मुराररायांकडील फौज रायदुर्गप्रांतांत मुलुकगिरी गढ्या सोडवणें, खंडण्या घेणें तेणेंप्रमाणें उद्योगतत्पर आहेत. मुजफरजंगाकडील पैगाम बरा दाट लागला आहे. श्रावणमासीं मुरारराव चित्रदुर्गास येणार. प्रस्तुत स्वामींनीं येथील सरंजाम उत्तम प्रकारें करविला, फौज प्यादे देविले हे आवई उठोन वरकडांस वचक व येथील यांस भरोसा होत चालिला आहे. तदनुरूप येथील उस्तवारी होऊन इबरत वाढे ते आज्ञा करणार स्वामी धणी मायबाप समर्थ आहेत. हल्याळाकडे राजश्री देवजी मोहिते यांसी रवाना केले आहेत. इकडील गडबडीकरितां या दिवसांत जागा सोडून आज्ञेविना सेवकास हुजूर येतां नये, या करितां राहिलों. राजश्री नारो मोरेश्वर फडनीस यांसी सेवेसी पाठविले आहेत. येथील साद्यंत प्रारंभापासून सर्वहि सेवेसी निवेदन करितील. साहित्य सरंजामाची यादादास्त सेवेसी पाठविली आहे. सविस्तर पेजशीं व हल्लीं राजश्री महिपतराव यांसी लिहिलें आहे ते विनंती करितील तदनुरूप साहित्य सरंजाम दीजें. आज्ञा कर्तव्य ते करणार स्वामी धणी मायबाप समर्थ आहेत. आयुष्य शेष स्वामीचे आश्रयें क्रमून स्वामिकार्य गतप्राण या प्रकारें सेवेवरी सादर असावें, हा हेतु सेवकाचा आहे. कृपा करून श्लाघ्यतेनें सेवा घेणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramchandra Bawaji (Prabhu) to Nana Saheb and Bhausaheb, explaining the situation of the various chiefs and the movements of Murarrao Ghorpade. As Muzaffarjung is mentioned, the letter evidently belongs to a time before his death, which occurred in January 1751.*

No. 62] *[11-12-1750*

पैवस्ती छ २७ सफर

श्रीरामोजयति

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामी गोसांवी यांसी

पोष्य रामचंद्र बावाजी कृतानेक साष्टांग दंडवत प्रणाम विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ २२ मोहरमपर्यंत येथास्थित जाणोन स्वकीये कुशललेखन केलें पाहिजे. विशेष प्रस्तुत आपणाकडील पत्र येऊन वर्तमान कळों येत नाहीं तरी

ऐसें न करावें. इकडील वृत्त बिदरूरकरांनीं मिर्जानगडास वेढा घातला. लढाई जाली व दुर्गकर लटकें कलप रचून मनस्वी वर्ततो वगैरे इत्यादि वर्तमान राजश्री राऊजीस लिहिलें आहे त्यावरून कळों येईल. मुख्य गोष्ट दुर्गकराचा गर्व हत केल्याविना आम्हांस चैन पडत नाहीं. सध्यां रिपू येथें हाच आहे. फौज श्रीमंतांनीं आणविली म्हणोन वार्ता ऐकोन चित्त परमखिन्न जाहालें, हें मिथ्य सत्य कळत नाहीं तरी साद्यंत लिहिलें पाहिजे. आम्हांकडील हिशेब सिध्दच आहे. लष्कर दूर, दुर्गकर लबाड, यामुळें येथील स्थळें सोडून येतां नये. आपलें येणें समीप जालें म्हणजे दर्शनास येतों. आम्ही सर्व प्रकारें पदरचे आहों. पूर्वव-त्प्रमाणें साभिमान धरून आज्ञा कर्तव्य ते करीत जावी. वरकड कितेक अर्थ भेटीनंतर निवेदन करूं. लष्कर कोठें आहे इकडे कधीं येणार हें सविस्तर ल्याहावें. बहुत काय लिहिणें कृपा असावी हें विनंती.

¶*Ramchandra Bawaji in his despatch to Naropant Nana describes the aggressive attitude of the Raja of Bednur.*

No. 63] *[14-12-1750*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ

साहेबाचे सेवेसीं

विनंती सेवक राजो तमाजी कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २९ माहे मोहरम साहेबाचे कृपाकटाक्षकडून सेवकाचे वर्तमान येथास्थित जाणौन साहेबी आपले स्वकुशललेखनआज्ञा निरोपिली पाहिजे विशेष. या प्रांताचे वर्तमान राजश्री मुराराव घोरपडे होनूर प्रांत * * * दुर्गी आहेत. बराबरी फौज तिनी हजार स्वार आहे. त्याचा मनसुबा करवीर स्वामी कडे कारकुनास व दोनी जोडे हरकारे यासमागमे पत्र पाठविले होते ते पत्र प्रविस्ट करून करवीर स्वामीचे तर्फेन राजश्री सिवाजी त्रिमल म्हणोन कारकुनास घेऊन सवणुरास आले होते ते राजश्री सेवकाचे घरी दोनी तिनी दिवस राहिले होते. त्यानी सविस्तर वर्तमान सांगितले कीं स्वामी व बाईसाहेब उभयेता तजविजे-करून घोरपडे यास तोरगले व दोनी लक्ष रुपये देऊन वीस हजार फौज ठेऊन कर्नाटक सर कराव याप्रकारे मनसुबे घाटून बंदोबस्त करावा म्हणौन घोरपडेस वस्त्रे व कारकुनाबराबरी चितानरूप पत्र व सनदा पाठविल्या आहेत. घोरपडे चितीं आहे की सर्व प्रकारे येऊन स्वामीची भेटीं घेऊन कर्नाटकांत दुसऱ्याच पाया घालू देऊ नये, या मनसुबेत आहे. सिवाजी त्रिमल जाऊन भेटले. त्यासहि वस्त्र देऊन सत्वरी स्वार होऊन तोरगलास येतो ते सौवती मातुश्री

बाईसाहेबास घेऊन येणे म्हणौन निरोप देणार आहेत. तेहि सवणुरचे मार्ग सात आठ दिवसात येणार आहेत. अलियानं(तर) वर्तमान विचारून सेवेसी लेखन केले जाईल. सवणुरकराचे चितहि काही डौल करवीर स्वामी कडे आहे, परंतु डौल घडून आलियान त्याकडे सवणुरकर मनसुबा करतील. नवाबासहि स्वस्त नाही. तिनी च्यार रोजात येकदा बाहेर येऊन दोनी घटिका बसत असतो. सिबंदीहि स्वाराचे सत्येतालीस लाख रुपये देणे जाले आहे. कर्नाटकाकडे खानजादेस पाठविले आहेत. त्याबराबरी सातसे स्वार गेले होते. त्यास खर्चास पावेनासे जाले, ते उठून येतात. म्हराठे ? से सवासे आहेत ते राहिले आहेत. त्यास खर्चास दरमाहे अकरा हजार होन पाठवीत असतांती. येलीकडे दोनी महिने जाले त्यास पाठवीत नाही. त्यानी खानजादे सांगून पाठवितातीं की खर्चास पाठविलियाने राहू नाहीतर उठून येऊ, याप्रकारे पत्र वरचेवर पाठवीत असताती. स्वार कहेत नाहीसे जाले. सिबंदीकरिता काही सुचेत नाही. सर्व कारभार बकषी करीत असतो. दिवाणे ब्राह्मणाचे प्रबल नाही. साहेबास कर्नाटक जाले म्हणौन येथिल्या अधिकारानी यैकूण काही संतुष्ट काही असंतुष्ट आहेत. दोनी मजल फौज साहेबाची आलियाने रा॰ सिवरायास रवानगी करतील; केलियान प्रसंग पाहून कार्य करणार. घोरपडेचे पत्र वरचेवर येत असताती. नवाबाचे चितांत रुचले की जबरदस्ताचे पाया या प्रांतीं पडला म्हणौन आपले ठाई मनसबेत आहेत. कर्नाटकाकडे पाऊसे फार लागले आहे. अद्यापि पाऊसे राहिला नाही. चंदीचे किलेचे फिरंग्यानी रस्त पाठविले होते ते वर्तमान नासरजंगानी यैकून जानोजी निंबालकर याजबराबरी दाहा हाजार फौज पाठऊन रस्त परतून त्याजकडील सरदारास पडाऊ घेऊन आले. चंदीचे किलेत जकिरा नाही. फिरग्यानी सलाच पैगाम लाविला आहे. हे यैकत नाही, या प्रकारे वर्तमान लिहिली येत असताती. साहेबास कर्नाटक जाला म्हणौन यैकून सेतोषांत पावलो. देवब्राह्मणाचे पुजास पुण्यपात्र जालेत. सर्वत्रास संतोष जाला आहे. कर्नाटकात सवस्थान त्रिचनापली व चंदावर या दोनी सवस्थानचे जीर्णउधार केला पाहिजे. बहू ब्राह्मण आहेत. सर्व पुण्यास पात्र जालेत. त्या प्रांतास सेवकास रवानगी करावयाचे ते आज्ञा निरोपली पाहिजे. सेवकाचे चितांत सेवा करून दयेस पात्र केले पाहिजे. विशष काये लिहिणे, कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Rajo Tamaji from Savanur to Bhausaheb, giving news of Murarrao Ghorpade's movements and of the plans of the Raja of Kolhapur for acquiring possession for himself of the Karnatak districts. The French, the writer says, have proceeded against Tanjore. The writer is delighted over the decision of the King of entrusting the Karnatak to the addressee.*

3868

No. 64] [24-12-1750

श्री

सेवेसी केशवराव लक्षुमण कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ ९ माहे सफर पावेतो मुाा करवीर जाणून येथास्थित आसें विशेष. येथील कारभाराचा मजकूर तरी राजश्री हरि राम याचे पत्री तपसिलवार लिहिला त्यावरून विदित होईल. मातुश्री ताराबाई याचीकडील आंत्र सौ मातुश्री जिजाबाईचे माहेरचें सिंदे याचें मुखांतरे थोडकेस लागलें आहे, परंतु आमच्या राजकारणामुले ते त्यास शास्वत वाटत नाहीं. राजश्री मुरारजी घोरपडे याचें लस्कर सावनूर प्रांते आले. राजश्री नासरजंग याची व फिरंग्याची लडाई जाली ते समई हारोलीस[1] पठाण सावनूरकर व कनोलकर व कडपेकर व आदवाणीकर ऐसें होतें. दुमदारीस[2] नासरजंग होते. फिरंगी मजकूर यानी दुमदारीस येऊन खाशासी युध्य केले ते दिवसी उभयेपक्षी काईम राहिले. दुसरे दिवसी नासरजंग यानी चितात आणिले की दक्षणप्रांतीचे सुभे हारोलीस आसता पिछयाडीवर झुंज पडले. तस्मात हे फितुरात होतें ऐसे जाणून पठाणावर हाला केली. त्याचे याचें युध्य जालें ते समई नासरजंग यास येक तीराची जखम व येक गोली लागोन मृत्य पावले. पठाणानी सिरकमल कापिले आणि त्याच्या पदारूढ हिदायेदमोदीखान यास केले. येणेप्रमाणें लिहिलें सावनूरकर पठाणाचे राजश्री स्वामीस आले. ती वाराचा मजकूर. किल्याच्या सनदा घेऊन किल्यास पाठविल्या आहेत. स्वाधीन जाल्याचें वर्तमान मागाहून सेवेसी लिहितो. आम्हास निरोप द्यावयाचें मानस येथील ग्रहस्ताचें आहे. किले हास्तगत येक-दोन जाले म्हणजे आणि स्वामीची आज्ञा आलियावर सेवेसी येतो. राजश्री स्वामीकडून कारभार थोडा बहुत निदर्शणास आला. आपणाकडून करारप्रमाणे निभाव करणार स्वामी समर्थ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶Keshavrao Lakshman from the court of Kolhapur reports to Poona the news that Nasarjang has been killed by the Pathans who betrayed him during the battle with his rival, Muzaffarjang.

No. 65] [26-12-1750

श्रीसुबराज

राजश्री सदासिवराव गोसांवी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब दंडवत उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल-

---

१ आधाडीस. २ पिछाडीस.

लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण हरकारे जोडियांबराबरी पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन व राजश्री केशवराव रघुनाथ यानी लिहिल्यावरून भावार्थ कलों आला. आपला मुकाम कोणे जागा आहे काये मनसुबा योजिला आहे, नवाब नासरजंग यांकडील काय मजकूर, पुलचरीवालेची गरमी कसी आहे हे कुल वर्तमान आपणाकडें येत असेल. सविस्तर लिहिलें पाहिजे म्हणून लेख केला. तर आम्हीं सोंडूर हिरेहाल किले नजीक मुकाम केला होता. तेथून कूच करून फौजचा जथ भारी पाडोन दर कूच हणमसागर होनगुंद रायेचूर देवदुर्ग यानी चिरंजीव राजश्री दौलतराव व सुभानराव घोरपडे व राजश्री बलवंतराव सिंदे कितूरसहवर्तमान मुकाम करीत आहो. नवाब नासरजंग यांकडील फुलचरी-कडील अर्थेत प्रथक पत्री लिहिले आहे त्यावरून कलेल. सांगोले आदिकरून ठाणीं सर्व खाली करून घेऊन राज्यभारास उपयुक्त बंदोबस्त करणे तों राजश्री स्वामीच्या मर्जीनरूप केला आणि राजश्री स्वामीजवळून कर्नाटक अहद कृष्णा तहद रामेस्वरपर्यंत देखील त्रिचनापली व श्रीरंगपटण दरोबस्त मुकासी राजश्री पंतप्रधान यांचे नावें करून घेतला. याचें कारण येक तों नाईकाकडे असल्यां आपणास उपयुक्त नाहीं. दुसरें थोरले नवाबापासून व नवाब नासरजंग हे कामें करून घ्यावयाविशीं वारंवार उतेजन देतात. तिसरें गतवर्षापासोन उपरालियास बोलवितात. आम्हीं उपराला न करावा तरी कोणीं करावा ? भारी फौजनसी जावें तर पचंवीस तीस लाख खर्चदाखल देतील. त्यावर फौजचा सेवट कसा लागतो ? यास्तव हा प्रकार योजून त्या प्रांती यावयाचा उद्योग केला म्हणून दर्शविलें. तर राजश्री पंत प्रधान यांस पूर्वीपासोन राज्यभार दिल्हाच आहे. सांप्रत श्रीनें सर्व राज्यभार दिल्हा. याप्रसंगी कर्नाटक आदिकरून दुसरियास द्यावयाचे सामर्थ्य आसतां कर्नाटक मुकासा करून घेतला म्हणून लिहिलें हेच अपूर्व आहे. कर्नाटक नाइकास अगर दुसरियास दिल्हीया त्याचा विधनिषेध काय आहे ? सारांश मागें आपली आमची भेटी जाली ते समयीं कितेक मनसबियाच्या व कर्तव्यतेच्या उमद्या उमद्या गोष्टी बोलीलें आहां त्याप्रमाणें पुढें सर्व प्रकारें ममता-पुरसर कर्तव्यतेंत आणून श्नेहाचे दृढीवकरण विशेषात्कारें व्हावें हे दिवस ईश्वरें योजिले आहेत. राजश्री श्रीनिवासराव याचें मुखें नाईक पुर्ते नसावे हे कळल्यावरून नाईकास चाकर ठेऊन निर्वेध दरोबस्त आपलेकडे करून घेतलें. काम करून घेतलें, कार्य करून देणें आपणाकडे म्हणून. तर मागें भेटी जाली



ते समयी आपणहि आम्हांसी बोलिलें आहा. आम्हींहि बोलिलो आहों. त्याचे दृढीकरण होऊन तदन्वये निदर्शन घडावें याअर्थे राजश्री श्रीनिवासराव यांस आपणांसनिध ठेविलेच आहे. त्यानी आमचा मनोधर्म सांगितलाच असेल. आपण बोलिला त्याचे स्मरण आम्हांस आहेच. आपणासहि असेलच त्याप्रो योग घडवाल हा चिताचा निशा आहे. नवाब नासरजंग याकडील मनसबियास व कर्नाटक प्रांतीच्या विचारा अचारास आपण माहीत आहें. हरयेक प्रसंग आपल्या विचारें करावा येतद्विषयींचा कितेक अर्थ राजश्री केशवराव रघुनाथ यांस सांगितला आहे. बोलितील व निश्चयात्मक राजश्री श्रीनिवासराव आल्यावर लेहून पाठऊ म्हणऊन लिहिलें तर आपणच निश्चये लिहिला नाहीं तेव्हा आम्ही काये म्हणून ल्याहावें ? हा कर्नाटक देश काटकी मुलूक, येकास पदरीं घेऊन येकावर प्रयोग करावा तेव्हां च्यार टके साधतात. त्यास दिवसहि बहुत पाहिजेत. मनसबे करावयाचे दिवस कोठे आहेत, कागदी पत्रीं कोणता कर्तव्यार्थ कलत नाहीं. याकरितां राजश्री केशवराव आपणासनिध आहेतच व राजश्री श्रीनिवासराव पुणेहून आले असतील अगर येतील व आपणाकडील मातबरास समागमें देऊन त्रिवर्गास निश्चयात्मक सांगोन आम्हाकडे पाठवावें म्हणजे सर्वहि कलेल. आपण आम्हांस बंधू म्हणविलें आणि आमचा सर्व भार आपणावर. हे दौलत देवाब्राह्मणाची आहे, याची उभारणी करून आपणास यश ये ते गोष्ट केली पाहिजे. आम्हीं आपणासिवाये नाहीं. राजश्री पंडित प्रधान गुजरातेच्या मनसबेस जाणार. नाईकास पोटापुरते देऊन बरोबर घेऊन जावयाचे केलें आहे म्हणून लिहिलें. तर गुजरातचे मनसबेस जाणें युक्तच आहे. नाइकानी सर्व सोडोन संनिध असल्यावर आल्प लोकहि आहेत त्यांचे चालवणें विहितच आहे. वरकड अर्थ राजश्री केशवराव व राजश्री श्रीनिवासराव याचें पत्रीं लिहिला आहे ते दाखवितील त्यावरून निवेदन होईल. याचे उत्तर समर्पक पाठवावे. बहुत लिहिणे तर सूज्ञ असा. रा छ ७ सफर हे विनंती.

राजते
लेखना-
वधि.

¶*Murarrao Ghorpade's letter to Sadashivrao complimenting his cousin, the Peshwa, on his cleverness in securing the transfer of the whole of the Karnatak to him, as his sphere of action, from Babuji Naik and assuring him of his hearty support in his southern enterprise.*

No. 66] [December 1750

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीकडे संभाजी माहाराज यानी जिला देऊन सनदा देखील दिल्ह्या. त्याचा वसूल देणे मणून आम्ही यास विचारिले. तरी यानी उतर दिल्हे की संभाजी राजे याजकडील वकील भगवंतराव तमाजी येथे आहे व त्यांची पत्रे येत आहेत की आपल्या वकिलास सालाबादप्रो वसूल देत जाणे मणून; तरी यैसियास संभाजी राजे यानी सनदा कोणत्या प्रकारे दिल्ह्या आहेत ? वरचे-वर कुचोद्याची पत्रे पाठवितावेत की आम्ही कांही श्रीमंताकडे जिला दिल्हा नाही व सिवाजी त्रिमल मणून मुराराव याजकडे कारकून पुढील बंदोबस्तीकारणे कुचोद्य करण्याविशी पाठविला आहे यैसा प्रकार आहे. तेणेकरिता आम्हासहि बल पोहचत नाही. ज्या गोष्टीत फितवा जाहालियावरी अमल कसा चालतो ? सांप्रत स्वामीकडे निश्चयेपूर्वक सनदा आलिया असल्या तरी अगत्य पाठविल्या पाहिजेत. सनदा पाहिल्याविना याचा गर्व परिहार होत नाही. संभाजी राजेकडून हुजरे वगैरे येताहेत. तेणेकरिता वकिलास बल पोहचते. येक नवे ताकीदपत्र की श्रीमंताकडे सावणूर दिल्हे आहे. उजूर न करिता अमल देणे मणून व सनदा अगत्य पाठविल्या पाहिजेत. तेणेकरून वाजिबी अमल घेऊ. ताराबाई-कडून हुजरे वस्त्रे घेऊन आले होते त्याजबराबरी आपला वकील वस्त्रेसहवर्तमान सातारियास पाठवणार आहेत. सांप्रत बाई गडावरी आहे. त्याचे बल फार आहे यैसी लटकी कल्पना. बहुतकरून कालोचितावरी द्रिष्टि दिली आहे हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Girmaji informs the Peshwa of the unwillingness of the Nawab of Savanur to pay the tribute, which the Raja Sambhaji of Kolhapur had authorised the Peshwa to collect.*

No. 67] [December 1750 ?

श्री

सेवेसी विज्ञापना. पूर्वी सन सबामधे स्वामीस नवाबानी साल दरसाल यैसी हजार रुपये द्यावे यैसा करार करून तहनामा लिहून दिल्हा. त्यास यांजकडे तीन लक्ष वीस हजार रुपये जाहाले. श्रीमंताची पत्रेही आणली होती. द्याव-यास गति नाही म्हणून लबाडी करीत होते. सांप्रत स्वामीचे आगमन या प्रांती जाहालियाचे वर्तमान यैकून सिवरायाची व आमची रवानगी करावी. तेथे आलियावरी जो विचार होणे तो होईल मणून कालोचितावरी द्रिष्टी देऊन बसले आहेत. फौज आलियाविना बाकीचा निकाल होत नाही. अगत्य फौज आली

पाहिजे. स्वामीनी सिवराव यास पत्र याप्रो पाठविले पाहिजे कीं त्रिंबकराव याजबराबरी चौ साला बाकीचा यैवज पाठऊन देणे म्हणून लिहिलेच आहे, त्यास काही रुपया सुटणार नाही म्हणून साफ लिहिले पाहिजे. तेणेकरून कार्य होऊन येईल. सर्व काम व बंदोबस्ती तुमच्याच विचारे करूं म्हणून स्वामींचे पत्र येते. तेणेकरून यास गर्व प्राप्त होतो की आम्हास याप्रकारे लिहिताहेत. निष्ठुरपणेंच यैवज लौकरच घेऊन येणे मणून लिहिले पाहिजे. येथे काही बल नाही. तिघे माणसे मिळून वोझ्यास सेंपटी उठविताहेत यैसे घोडबल आहे व अन्यायेही फार वर्तिलाच आहे. मुराराव याचे कुचोद्यांत ही आहेत. हेही काबूचीपणास चुकत नाहीत. फौज आलिया सर्व गोष्टी उतम आहेत. नवाबास कागद न लिहिता बातमीच्या जोड्या पाठविल्या तरी बातमी वरचेवरी लिहून पाठऊ. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Girmaji informs the Peshwa of the unwillingness of the Nawab of Savanur to make payment of the tribute and asks what steps are to be taken in the matter.*

No. 68] [February 1751

श्री

सेवेसी विज्ञापना. महिमाजी राम याचा पुत्र येशवंतराव याजकडे सोंध्याबा[1] अठरा हजार रुपये होते. त्यास श्रीमंताचे पत्रेहि आणिले होते. त्यास पूर्वी स्वामी-कडील गोविंद बलाल मणून सेणवी येक जासूदजोडीसहवर्तमान बसला आहे. त्याला येऊन आठ महिने जाहाले, परंतु स्वामीकार्ये जाहाले नाही. आम्ही आलियावरी येशवंतराव यास निकट केली. नवाबास पत्रहि आणिले होते. बल बरेंच पोहचाविले. जीवणाहि येथे आणिला आहे. पैक्याची वाट निमे रुपये पावेतो सावकारी निषा करून देऊ मणताहेत. स्वामीचे अभयेपत्र नौ हजार रुपये सोडी दिली मणून आलियाने निषा नौवांची[2] होते यैसा विचार आहे. येशवंतराव देखील व जीवणा सेवेसी येऊन सर्व माफ करून घेऊ येसे बोलताहेत. निमित्य गोविंद बलाल फितव्यात आहे. त्याजला येक आज्ञापत्र पाठविले पाहिजे की येशवंतरायाकडील गुंता त्रिंबकराव वारील. तुम्ही देखत पत्र स्वार होऊन येणे मणून लिहिले पाहिजे. हरप्रकारे स्वामीकार्ये व्हावे परंतु सेणवी सेणवी येक. सेवकासहि एक पत्र पाठवावे की जासूदसहवर्तमान गोविंद बलालास पाठऊन देणे. त्याप्रो पाठऊ. नौ हजारावरी भागवणे मणून आज्ञा आली तरी त्याजप्रो करूं, नाही

---

१ सोंधे. २ नौवाची=नऊ हजाराची.

तरी सर्वांस हुजूर पाठऊन देणे मणून आज्ञा आलिया हुजूर पाठऊन देऊं परंतु तेथे आलिया निकाल होता दिसत नाही. येथे घरदार वलखीदेखी आहे. कांहीं वाट होईल. जसी आज्ञा येईल त्याप्रा॥ वर्तणूक करूं हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Girmaji to the Peshwa: gives news from Savanur.*

No. 69] *[December 1750*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य गजश्री

रामाजीबावा गोसावी यासी

पोष्यांतर्गणनीये त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. पत्र पाठविले ते पावोन बहुत संतोष पावले. लिहिले की जाबसालाची चिंता कां करिता ? बहुत शाहाणे आहा मणून शब्द ठेऊन आज्ञा केली. यैसियास आम्ही कांही स्वामीसेवेसी अंतर करीत नाही. स्वामिकार्यी तत्पर असता तुम्ही आम्हावरी शब्द ठेविला अपूर्व आहे. श्रीमंताच्या पत्रावरून सर्व अर्थ नवाबास विदित केला. राजश्री सिवरावजीस व आम्हास रवाना करणार आहेत. लौकरींच स्वार होऊन येतो. महिमाजीराम याजकडील पैक्याविशीं विष्णू नाईक याजकडील गोविंद बलाल मणून पूर्वीच आला आहे. आम्हास पैका वसूल करून देत नाही. फितवा करितो. याजकरिता श्रीमताचे पत्र गोविंद बलालाचे नावे अगत्य पाठविले पाहिजे की तुम्ही देखतपत्र स्वार होऊन येणे. पैक्यांत खलखल करिता तो पैका त्रिंबकराव यास वसूल करावयास सांगितला आहे. ते वसूल करितील, व येशवंतराव महिमाजीस पत्र की गोविंद बलालास निरोप देणे. झाडून पैका त्रिंबकरायाचे स्वाधीन करणे मणून पत्र आलिया पैका वसूल होतो. नाही तरी फितवा होतो. काम बंद होते. सूज्ञाप्रति विशेष काये लिहिणे हे विनंती.

¶*Trimbakrao Girmaji to Ramaji Bava, asking for orders from the Peshwa in the case of recovery of dues from Yashvantrao, son of Mahimaji Ram.*

No. 70] *[1-11-1759*

श्री

श्रीसकलगुणालंकरण परोपकारपरायेण राजमान्ये राजश्री कृष्णरावजी

स्वामीचे सेवेसी

विनंती. पोश्ये आपाजी जिवाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता॥ छ १० रबिलवल मुकाम फुलचरी जाणून स्वामीनी आपले स्वानंदलेखन अज्ञा केली पाहिजे विशश. या प्रांतीचे राजश्री गोपाळराव व राजश्री मलारराव

याची स्वारी गेलियाउपर इंगरेज व फरासी याचा कजिया फारच वाढला. काही बल फरासी करीता काही इंगरेजाचे होते. फरासियाची जाहाजे आली. इंगरेज माघारे सरोन गेले आहेत. सरकारची फौज या प्रांते नाही. फरासियाची कुमक करून संस्थाने घाट तोंडीची फरासियानी तीन लेहून दिली ती हातास येती. त्रिपतसि आमल बसता. त्याजकडीलहि तह वारता. तेथून फौजेचा यावयाचे जाहाले तरी फरासियास हाताखाली घेऊन मुलकात चौथाई सरदेसमुखीचा अमल बसल. फरासियानी आजीपर्यंत फौजेची वाट पाइली. फौज न ये याजकरिता येथून मुसा भुसी व नागोराव यास नवाब बसालतजंग याजकडे रवाना केले व दलावरजंग पादरी यास राजश्री मुरारराव घोरपडे याजकडे रवाना केले. त्यास घोरपडेची फौज घाटमाथा आली. त्याचा वकील व पादरी येथे येऊन पावले अद्यापवरहि त्यास आस्तिनास्ती म्हणत नाहीत. श्रीमंताकडील फौजेचा मार्ग लक्षित आहेत. आम्हास राजश्री गोपालराव यानी पाठविले त्याचा जाबसाल व जिनस तुंगभद्रेस ते येऊन पावले. तेथे येऊन करार जाहाला त्या यादीच्या तालका व नजरेचा जिनस पावता करून त्यानी फरासी यास बहुमान दिल्हा तो घेऊन (रा)येचुरास आलो. तो मधे काही लोकोपवाद जे नागोराव व कृष्णराव निरोप घेऊन देशास जात होते त्यास अटकाविलें. याजकरिता वर्तमान कढून घेऊन जावे म्हणून राहिलो. तो नबाब रजाखान तेथे आले. त्यानी घेऊन येऊन ललीसाहेब व गोरंदर याची भेटी करून जाबसाल लाविला. त्यास राजश्री गोपालराव तेथे पावलेउपर श्रीमंताकडील जाबसाल न आला याजकरितां राहविले असे. आम्ही स्वामीचे बोलीन स्थल रक्षून राहिलो असो. दया करून श्रीमंतास अर्ज करून पत्रे आमच्या नावे पाठविलिया यास विश्वास पडेल. कामकाज होईल. पुढे बोलीचा प्रसंग चालल. आम्ही आपलेच जाणून दया केली पाहिजे. कृपा निरंतर असो दिजे हे विनंती.

पो राजोबसो कृतानेक सां नमस्कार कृपालोभ आसू दीजे हे विनंती.

¶*Appaji Jivaji to Krishnarao, giving news from Pondicherry about the fighting between the English and the French and a reverse suffered by the English arms. He also speaks of the men deputed by the French to Basalatjang and Murarrao to secure help from them.*

No. 71] [*8-2-1751*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल माघ वद्य ९ नवमी पावेतो स्वामीचे कृपाकटाक्षावलोकनेकडून सावणुरी

तरी सर्वांस हुजूर पाठऊन देणे मणून आज्ञा आलिया हुजूर पाठऊन देऊं परंतु तेथे आलिया निकाल होता दिसत नाही. येथे घरदार वलखीदेखी आहे. कांहीं वाट होईल. जसी आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक करूं हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Girmaji to the Peshwa: gives news from Savanur.*

No. 69] [*December 1750*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
रामाजीबावा गोसावी यासी

पोष्यांतर्गणनीये त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. पत्र पाठविले ते पावोन बहुत संतोष पावले. लिहिले की जाबसालाची चिंता कां करिता ? बहुत शाहाणे आहा मणून शब्द ठेऊन आज्ञा केली. यैसियास आम्ही कांही स्वामीसेवेसी अंतर करीत नाही. स्वामिकार्यी तत्पर असता तुम्ही आम्हावरी शब्द ठेविला अपूर्व आहे. श्रीमंताच्या पत्रावरून सर्व अर्थ नवाबास विदित केला. राजश्री सिवरावजीस व आम्हास रवाना करणार आहेत. लौकरीच स्वार होऊन येतो. महिमाजीराम याजकडील पैक्याविशीं विष्णू नाईक याजकडील गोविंद बलाल मणून पूर्वीच आला आहे. आम्हास पैका वसूल करून देत नाही. फितवा करितो. याजकरिता श्रीमताचे पत्र गोविंद बलालाचे नावे अगत्य पाठविले पाहिजे की तुम्ही देखतपत्र स्वार होऊन येणे. पैक्यांत खलखल करिता तो पैका त्रिंबकराव यास वसूल करावयास सांगितला आहे. ते वसूल करितील, व येशवंतराव महिमाजीस पत्र की गोविंद बलालास निरोप देणे. झाडून पैका त्रिंबकरायाचे स्वाधीन करणे मणून पत्र आलिया पैका वसूल होतो. नाही तरी फितवा होतो. काम बंद होते. सूज्ञाप्रति विशेष काये लिहिणे हे विनंती.

¶*Trimbakrao Girmaji to Ramaji Bava, asking for orders from the Peshwa in the case of recovery of dues from Yashvantrao, son of Mahimaji Ram.*

No. 70] [*1-11-1759*

श्री

श्रीसकलगुणालंकरण परोपकारपरायेण राजमान्ये राजश्री कृष्णरावजी
स्वामीचे सेवेसी

विनंती. पोश्ये आपाजी जिवाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १० रबिलवल मुकाम फुलचरी जाणून स्वामींनी आपले स्वानंदलेखन अज्ञा केली पाहिजे विशश. या प्रांतीचे राजश्री गोपाळराव व राजश्री मलारराव

याची स्वारी गेलियाउपर इंगरेज व फरासी याचा कजिया फारच वाढला. काही बल फरासी करीता काही इंगरेजाचे होते. फरासियाची जाहाजे आली. इंगरेज माघारे सरोन गेले आहेत. सरकारची फौज या प्रांते नाही. फरासियाची कुमक करून संस्थाने घाट तोंडीची फरासियानी तीन लेहून दिली ती हातास येती. त्रिपतसि आमल बसता. त्याजकडीलहि तह वारता. तेथून फौजेचा यावयाचे जाहाले तरी फरासियास हाताखाली घेऊन मुलकात चौथाई सरदेसमुखीचा अमल बसल. फरासियानी आजीपर्यंत फौजेची वाट पाइली. फौज न ये याजकरिता येथून मुसा भुसी व नागोराव यास नवाब बसालतजंग याजकडे रवाना केले व दलावरजंग पादरी यास राजश्री मुरारराव घोरपडे याजकडे रवाना केले. त्यास घोरपडेची फौज घाटमाथा आली. त्याचा वकील व पादरी येथे येऊन पावले अद्यापवरहि त्यास आस्तिनास्ती म्हणत नाहीत. श्रीमंताकडील फौजेचा मार्ग लक्षित आहेत. आम्हास राजश्री गोपालराव यानी पाठविले त्याचा जाबसाल व जिनस तुंगभद्रेस ते येऊन पावले. तेथे येऊन करार जाहाला त्या यादीच्या तालका व नजरेचा जिनस पावता करून त्यानी फरासी यास बहुमान दिल्हा तो घेऊन (रा)येचुरास आलो. तो मधे काही लोकोपवाद जे नागोराव व कृष्णराव निरोप घेऊन देशास जात होते त्यास अटकाविलें. याजकरिता वर्तमान कढून घेऊन जावे म्हणून राहिलो. तो नबाब रजाखान तेथे आले. त्यानी घेऊन येऊन ललीसाहेब व गोरदर याची भेटी करून जाबसाल लाविला. त्यास राजश्री गोपालराव तेथे पावलेउपर श्रीमंताकडील जाबसाल न आला याजकरितां राहविले असे. आम्ही स्वामीचे बोलीन स्थल रक्षून राहिलो असो. दया करून श्रीमंतास अर्ज करून पत्रे आमच्या नावे पाठविलिया यास विश्वास पडेल. कामकाज होईल. पुढे बोलीचा प्रसंग चालल. आम्ही आपलेच जाणून दया केली पाहिजे. कृपा निरंतर असो दिजे हे विनंती.

पो राजोबसो कृतानेक सां नमस्कार कृपालोभ आसू दीजे हे विनंती.

¶*Appaji Jivaji to Krishnarao, giving news from Pondicherry about the fighting between the English and the French and a reverse suffered by the English arms. He also speaks of the men deputed by the French to Basalat-jang and Murarrao to secure help from them.*

No. 71] [*8-2-1751*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल माघ वद्य ९ नवमी पावेतो स्वामीचे कृपाकटाक्षावलोकनेकडून सावणुरी

सुखरूप आसों विशेष. कासीदजोडीसमागमे आज्ञापत्र सादर जाहाले तें सिरसा वंदून सनाथ जाहालो. तेथे आज्ञा की विनाफौज नवाब अबदुल मजीदखान चौसालयैवज निकाल करून देत नाहीत. बेजीद[1] होऊन जा * * * पडेल तो विचार करणे व रो महिपाजीराम यांच्या पुत्राकडून सौंध्याबाबत अठरा हजार रुपयेपैकी निमे न घ्यावे, घेऊन कांही सिधि नाही मणून आज्ञा केली. तदनसार तो मजकूर मोघम ठेविला. चौ सालाचा यैवज यांस विचारिला त्यास हे हैगई करिताहेत. कालोचितावरी द्रिष्टि. विनाफौज द्रव्य प्राप्त नाही. जे समई स्वामींचे आगमन या प्रांती होते मणून भंडारकविठ्याहून[2] वर्तमान आले ते वेळेस रो सिवराव यास व अम्हास कार्य सेवेसी रवाना करावें यैसा निश्चये केला होता. फौज पुण्याकडे जातांच रवानगीची गोष्टी राहिली. फौज कांही या प्रांतास येत नाही यैसे स्पष्ट समजले आहेत. फौज येऊन उपद्रव करील तरी सांप्रत मातुश्री ताराबाई साहेबासी अद्याप विरोध आहे. परस्परे सख्यहि होत नाही. तेव्हा फौजेचे अगमन कैचें यैसे समजले आहेत. पुढें सिवराव यास व अम्हास रवाना करावें यैसे बोलतात परंतु विश्वास येत नाही. अरकाटाहून यांची कासीदजोडी आली ती खबर हिदायेत मोहिदिनखान फुलचेरीहून कूच करून अरकाटाआलिकडे लालपेठेस उतरला आहे. चंदाखानास अरकाटचा सुबा दिल्हा परंतु तो अद्याप फुलचेरीस आहे. लेकास अरकाटास पाठविले. सांगाते फिरंगीहि आहेत. नासरजंगाचे बंधु मऱ्हाठ्याच्या फौजेसहवर्तमान मुजफरजंगाचे हरोलींत चालताहेत व तिघे पठाण मिळून येके ठाई उतरताहेत. येकाचा विश्वास येकास येत नाही. परस्परे चितशुद्धि नाही. तिघे पठाणास मिळून काही खर्चास दिल्हे मणून वर्तमान आले. हिदायत मोहिदिन याचे विचारें यैस होत की पठाण (तिघे) व निंबाळकर वगैरे यासहवर्तमान अरवंगाबादे जावें. इतकियांत श्रीमंतांची फौज तिकडेस गेली तेणेकरिता सलाबत मानिली. आदवानीस जाऊन पुढे मनसब्यानसार भागानगरास जाणार मणून वर्तमान आले व अबदुल मजीदखानजीस सिऱ्याचा सुबा व कोल्हार प्रांत देखील व केरूर व बादामी व रटेहली व बेलगाव येथील किलेदारी दिली. सुब्याची सनदेची नकल व किलेदारीच्या सनदेच्या नकल्या येथे पोहचल्या. त्या भरवश्यावरी यानी छ ११ रबिलौवली पेषखाना[3] बाहीर दिल्हा. छ २९ डेरे रबिलौवली दाखल होणार. मग कूच करून सिऱ्याकडे जावें यैसा निश्चये जाहाला आहे. स्वार होऊन जातील ते समई सेवसी लिहून पाठवितो. याजबराबरी दोनी हजार स्वार पावेतो जमाव

---

१ बजीद—निकड लावणार; आग्रही. २ भंडारकवठें.

३ पेशखाना—प्रवासांत अगोदर पुढें पाठवावयाचें डेरे वगैरे सामान.

3876

आहे. येथे अबदुल कादरखान मणून बखषी तो बहुत पेषे[1] आहे. त्याजला येक पारसी लाखोटा आगत्य पाठविला पाहिजे. त्रिंबकराव ज्याप्रकारे सांगितील त्या त्या प्रमाणे सरकारचे कामांत कोषीसे[2] करून उभयेपक्षी स्नेह अधिक होये तो विचार करणे. सेवकास आद्याप येक पत्र यैसे आले नाही की तुम्हास जाऊन बहुत दिवस जाहाले. पैक्याची वाट केली नाही, आपूर्व आहे मणून दबकावणीचे पत्र आलियाने कांही कामास बल पोहचल. ते पत्र यांस दाखविलिया चौ साला यैवजाचा मजकूर होऊन येईल. हे मणतात की श्रीमंत कांही तुम्हास लिहीत नाहीत. तुम्हीच उपद्रव करितां. मणून यास्तव दबकावणीचे पत्र यांस देखिल की चौ साला तीन लाख रुपया मार्ग करून त्रिंबकरायास व सिवराव यास लौकरी रवाना करणे मणून लिहिले पाहिजे व शाहू पटीबाा सोला हजार रुपये देणे मणून लिहिले पाहिजे. येथे फौज आलिया काम भारी आहे. नाही तरी सेवेसी ज्याप्रो विनंती लिहिली त्याप्रों समर्पक उतरे आलियां ते यांस दाखऊन कार्य केलें जाईल. महिपाजी राम याजकडील सौंध्याबाबत यैवज येणे त्यास अठरा हजार रुपये सख्ती करून घेणे मणून आज्ञा आलियां जबरदस्ती करून रुपये वसूल करूं. येथे स्वामीकडून विष्णू नाईक याचे मारफतीने गोविंद बालल मणून सेणवी पूर्वी महिपाजीराम याचे पुत्राकडे आला होता. त्याला येऊन वर्ष येक जाहाले. निकाल होत नाही. आम्हासहि रुपया वसूल करून देत नाही. फितवा करितो. यास्तव त्याजला पत्र सादर जाहाले पाहिजे की तुम्ही तो रुपया वसूल करीत नाही. त्रिंबकराव रुपया वसूल करितील तुम्ही हुजूर स्वार होऊन येणे व येशवंतराव महिपाजी यांस पत्र कीं अठरा हजार रुपये त्रिंबकरायाचे हवालीं करणे. बहुत दिवस जाहाले काही रुपया सुटणार नाही व त्याजप्रो सेवकासहि पत्र की अठरा हजार रुपये जबरदस्तीने वसूल करणे. कदाचित त्याची हिमायेत[3] जो करील तो रुपयाचा जाब करील मणून लिा पाहिजे. स्वामीनी दोनच्यार पत्रें सिवराव यास येण्याविशी लिहिली परंतु याचे येणे होत नाही. निमित्य कीं जे समई लस्कर येईल ते समई पाहून घेऊ. सध्या सरकारांत पैका नाही. पैका देणेहि लटके मणून नाना प्रकारे बोलत असतो. याजकरिता याजला येक पत्र कीं त्रिंबकराव याजबराबरी पत्र पाठविले होते की सरकारचे कर्ज तीन हजार रुपये घेतले ते पाठऊन देणे मणून लिहिले होते. आद्याप वाट दिसत नाही. * * * ता देखत पत्र तीन हजार रुपये त्रिंबकराव याचे स्वाधीन करणे व आम्हासहि पत्र की तीन

१ पेश—वजन्दार. २ कोशीस—मेहनत; प्रयत्न.

३ हिमायत—संरक्षण, आश्रय, आधार.

हजार रुपये सिवराव याजकडील वसूल करणे मणून लिहिलिया दबऊन सरकारच्या कामात मन घालून निकाल करून देतो. आम्हासहि दबकावयास जागा होते. या लोकास यैसे लिहिलियावेगळे हे समजत नाहीत. बहुत काबूची[1]. आम्ही कांही स्वामीसेवेसी अंतर नाही करीत व कामामधे फितवाहि फार. याजकरिता चाकर लोकावरी शब्द येतो. क्षमा केली पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Trimbak Girmaji informs Bhausaheb how the Nawab of Savanur is evading payments of arrears. He incidentally refers to the movements of Muzaffarjung and Chandasaheb.*

No. 72] [*8-2-1751*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल माघ वद्य ९ नवमीपावेतो स्वामीचे कृपाकटाक्षावलोकनेकडून सवनुरी सुखरूप आसो विशेष. कासीदजोडीसमागमे आज्ञापत्र सादर जाहले ते सिरसा वंदून सनाथ जाहलो. तेथे आज्ञा कीं चौसाला यैवज काही फौजेविना येत नाहीं. परंतु बजीद होऊन कांहीं निकाल पडेल तो विचार करणे मणून व रा महिपाजीराम याजकडील सोंध्याबा सोळा हजार रुपये पैकी निमे न घ्यावे. निमे घेऊन सिधि नाही मणून आज्ञा केली त्याप्रो तो मजकूर मोघम ठेविला; व अबदुल मजीदखान याजकडील यैवजास विचारिले तरी हैगईची गोष्टी सांगताहेत. विनाफौज द्रव्य प्राप्त नाही. फौज या प्रांतास येत नाही हे स्पष्ट समजले आहेत. येथे खबर आहे कीं आद्यापि मातुश्री ताराबाई साहेबामध्यें व स्वामीमधे सख्य जाहले नाहीं; व फौजहि अवरंगाबादेकडे गेली. तेणेकरिता हे काबूपण करिताहेत. श्रीमंत राजश्री भाऊ स्वामी इकडे येणार यैसी आवाई होती. तेसमई सिवराव यास व आम्हास सेवेसी पाठवणार होते. फौज तिकडेस स्वार होऊन जाताच ते गोष्टी राहिली. अरकाटीहून याची कासिदजोडी आली. ती खबर सांगत होते कीं हिदायेत मोहिदीनखान फुलचेरीहून कूच करून अरकाट अलीकडे लालपेटेस उतरला आहे. चंदाखानास अरकटाचा सुबा दिल्हा, परंतु तो अद्यापि फुलचेरीस आहे. त्याला याचा विश्वास येत नाही. आपल्या पुत्रास

---

१ काबूची = लबाड, कपटी.

पाठविले आहे. सांगाते फिरंगीहि आहेत. नासरजंगाचे भाऊ मऱ्हाठ्यांचे फौजेसहवर्तमान मुजफरजंगाचे हरोलींत चालताहेत. तिघे पठाण निराले उतराहेत. परस्परें कांहीं चित्तशुद्धि नाही. येकाचा विश्वास येकास येत नाही. हे अवघे घाट चढोन येतील ते समई चंदाखान अरकाटास येणार. तोंपावेतो येत नाही. अबदूल मजीदखानजीस सिऱ्याचा सुबा दिल्हा व कोल्हारदेखील स्वाधीन केले व बदामी व रटेहली व केरूर येथील किलेदारीही दिली व सुब्याच्या सनदा व किलेदारीचे सनदेच्या नकला येथे येऊन पोहचल्या. त्या भरवश्यावरी यानी छ ११ रबिलोवली पेषखाना बाहीर दिल्हा. छ २७ रबिलोवली डेरेदाखल होणार. मग कूच करून सुब्याच्या बंदोबस्तीस जाणार आहे यैसी आवाई आहे. तिघा पठाणास खर्चासहि दिल्हे मणून आवाई आहे व हिदायेत मोहिदीनखान यानी तजवीज यैसी केली कीं पठाण व मऱ्हाटे व आणखी फौज मिलून अवरंगाबादेस यावे. इतकियांत स्वामीची फौज त्या प्रांतास गेली. तेणेकरिता सलाबत खाऊन अदवानीस जावे. तेथून मनसब्यानसार भागानगरास जावे, यैसा निश्चये केला आहे, मणून येथे खबर आली. येथे दिवाण आदिकरून महिपाजीराम याच्या पुत्राकडे कांहीं यैवज नाही. निमे यैवजाचा निकाल केलिया उतम गोष्टी आहे. श्रीमंतास विनंती लिहिणे मणून आम्हास बलाऊन सांगितले. कदाचित आज्ञा होईल, तरी नौ हजार रुपयाची वाट करून घेऊन निमे रुपये माफ केले मणून त्याजला पत्र पाठविले पाहिजे. व त्याच प्रमाणे आम्हासहि पत्र की त्याजपासून निमे यैवज घेणे मणून लिहिले पाहिजे व आम्हास पत्र की सिवराव याजकडे तीन हजार रुपये आहेत. त्यास बहुत दिवस जाहले ते अगत्य वसूल करणे मणून लिहिले पाहिजे. तेणेकडून रुपये वसूल होतील. सिवरायासहि पत्र कीं फार दिवस जाहले अद्यापि रुपये पाठविले नाहीत. अपूर्व आहे. देखत पत्र त्रिंबकरायाचे स्वाधीन रुपये करणे. चौसालाचा यैवज बाकी राहिला आहे. यैवजचा निकाल करून त्रिंबकराव व तुम्ही मिलून लौकरी येणे मणून अगत्य लिहिले पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Girmaji informs the Peshwa of the movements of Muzafarjang and of Chandasaheb and the various Nawabs.*

No. 73] [*9-2-1751*

श्री

श्रीमंत महाराज राजश्री पंतपधान स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ २३ रबिलोवलपावेतो स्वामीचे कृपाकटाक्षावलोकनेकडून सवनुरी

सुखरूप असों विशेष. आम्हास आज्ञापत्र सादर जाहाले पाहिजें की तुम्हास जाऊन बहुत दिवस जाहाले अद्याप अबदुल मजीदखान चौसालाचा यैवज निकाल करून देत नाहीत अपूर्व आहे. काये समजलेत आहे कीं न कलेत * * *

दिल्ह्यावर काही पैका सुटत नाही येसे सम * * *

मोकदमा फारिख केला असता तरी उतम गोष्टी होतील त * * फौजेची तिकडे स्वारी होईल तेच समई द्यावे यैसे असेल तरी फौजेमुले मुलकाची खराबी होईल. त्यानी जमानसाजीवरी द्रिष्टि दिल्ही आहे. बरे तुम्ही रदबदली करून निकाल करून घेणे व सिवरायास पत्र लिहिले पाहिजे कीं तुम्ही काही सरकारचे कामात मन घालून येवज पाठवीत नाहीत. नवाबास समजावीत नाही, अपूर्व आहे व तुम्हाकडे तीन हजार रुपये सरकारचे कर्ज आहेत ते अद्याप पाठविले नाहीत व तुमचे येजमानाची गोष्टी व तुमची गोष्टी देखील कालोचितावरी दिसते. हाली त्रिंबकरायाचे स्वाधीन कर्जाचे रुपये स्वाधीन करणे जाणून आम्हास पत्र कीं सिवराव याजपासून कर्जाचे रुपये वसूल करून जिनस रुपयाचे व सोन्याचे करून पाठऊन देणे म्हणून लिहिलिया हा ग्रहस्त दबाऊन सरकारचे कामकाज करून देतो. नाहीतरी मगरुरीने बहुत कामास हरकत करितो व नवाबासहि पत्र की लौकरी येवजसुधा त्रिंबकराव यास व सिवराव यास रवाना करणे. पैका काही सुटणार नाही म्हणून लिहिलिया कामास बल पोहोचते. आम्हास रदबदली करावयास जागा होते. कदाचित आम्ही बोलिलो तरी श्रीमंत काही तुम्हास लिहीत नाही व तुम्हीच उपद्रव करिता मणून बोलताहेत यास्तव याप्रकारे लिहिले पाहिजे. इतक्या गोष्टी ल्याहावयास कारण हेच की फौजेच बल नाही. स्वामिकार्य तो जाहाले पाहिजे. आमच्या पत्रांत येसे लिहिले न पाहिजे कीं तुम्ही याप्रकारे ल्याहावे माणून विनंती केली त्याजप्रो लिहिले आहे म्हणून न ल्याहावे. तेथून कल्पना करून लिहिल्याप्रो यांस भासले पाहिजे. राजश्री महिमाजी राम याच्या पुत्राकडे सोंध्याबाबत अठरा हजार रुपये आहेत. अद्यापि देत नाही. बेमुलाहिजा जबरदस्तीने वसूल करणे, अनमान न करणे, व त्याजप्रो येशवंतराव मयाजीस पत्र की देखत पत्र अठरा हजार रुपये त्रिंबकराव याचे स्वाधीन करणे इतकी * * * * * * * होणार नाही मणून स्पष्ट लिहिलिया वसूल * * * * * देतो. नासरजंगास मारण्यामुळे याचे दृष्टीस कोणी नाही. पूर्वी बाबूजी नाइकाचे रुपये बुडविले त्यास कोणी काये केले त्याप्रो हेहि करू. मातुश्रीबाईसाहेबासी व स्वामींसी विरोध आहे, फौज काही येत नाही, मणून समजले आहेत. छ २७ रबिलोवली कूच करून सिन्याकडे जाणार व बहिरंगे खुषामतीच्या गोष्टी सिवराव नवाब देखील लिहीत असतील.

परंतु सरकारचे काम काही करीत नाहीत व करून देत नाहीत. बातमी मात्र राखताहेत. काबूपण्यास चुकत नाहीं. याजकडे दीडहजार तैटे आहेत. कांही फौजेचे बल नाहीं. चालीस लाख रुपये तलब झाली आहे. गर्व तरी पृथ्वीमध्ये आपल्याबरोबरी कोणी नाही माणून समजले आहेत. याचे समर्पक उतर आलिया बल पोहचते. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶Trimbakrao Girmaji informs the Peshwa how Abdul Majidkhan, the Nawab of Savanur, was trying to evade the payment of tribute and what measures should be adopted to exact the payment.

No. 74] [2-3-1751

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल छ १४ रबिलाकर पावेतो स्वामीचे कृपाकटाक्ष्यावलोकनानेकडून सवनुरी सुखरूप आसों विशेष. आबदूल मजीदखानजीचे कासीदजोडी समागमे आज्ञापत्र सादर जाहाले तें सिरसा वंदून सनाथ जाहालों. तेथें आज्ञा कीं हिदायेत मोहिदीनखान यानी कसा बंदोबस्त केला व पठाण काये तजवीज करिताहेत. अवरंगबाद प्रांतिक * * येणार मणून लिहिणे मणून आज्ञा केली त्यास येथें छ २९ * * * वली आबदूल मजिदखानजी यांची कासीद जोडी तहकीक खबर घेऊन आली. तो मजकूर हिदायेत मोहिदिनखान व पठाण व मऱ्हाटे सारे घाट चढून कडाप्याच्या मुलकांत आले. सांगाते फिरंगीहि होते. पठाण चंडोलीस राहिले होते. तेथें फिरंगियानी रथ चालविला. तो एका पठाणाच्या राहुटीवरून गेला. राहुटीस धका पोहचून पठाण बाहीर निघाला. त्या फिरंगियास मारिले ते समई सारे फिरंगी एक होऊन हिदायेत मोहिदीनखानास सांगून पाठविले कीं, आम्ही तयार होऊन पठाणावरी जातो. आमचे अगत्य आसेल तरी साहित्य करा. नाहीं तरी आम्ही काही वांचत नाही. मणून सांगून पाठवून सिध जाहाले. हें वर्तमान तिघा पठाणास जासुदानी सांगितले की फिरंगी तयार जाहाला आहे. यैसे यैकताच त्रिवर्ग सिध होऊन फिरंगियावरी चालून घेतले. लडाई मातबर जाहाली. ते समई बहुतेक फिरंगी मारिले गेले, व पठाणाकडीलहि

---

१ तट्टे.

लोक मारिले गेले. इताकियात मुजफरजंग तयार होऊन फिरंगियाची हिमायेत करावी म्हणून तयार होऊन आला. तेच समई कनोलकर यानी व सवनूरकरानी बहुत कस्त करून हतीस हती भिडवून हिदायेत मोहिदीनखान याचा गला कापिला. बहादरखान कर्नोलकर यानें मारिले व कनोलकरास जंबुऱ्याची गोली कपालास लागून ठार जाहाला, व अबदुल मजीदखान याच्या पुत्रास जोडगोली लागली. ठार जाहाला. व अबदुल नबीखान कडपेकरास पायांस गोली लागली वांचला. सिघवट मणून किला आहे तेथे पळून गेला. व तिघा पठाणाचे लस्करातून येक सिपाई लडाईतून वांचून बाहीर निघाला नाही. सारे मारिले गेले. व करनोलकर व सवनूरकर यांचा नाश होवयास कारण कडपेकर, अगर कडपेकर पळून न जाता तरी यांचा बंदोबत जाहाला होता. तो पळताच त्यामागे मऱ्हाटे लागले. तो निघोन गेला व सवनूरकर व कनोलकर दोनसे स्वारानिसी राहिले. ते समई मारिले गेले. सवणूरकर मूल होऊन बहूत * * केली. याप्रमाणे येथें वर्तमान आले. त्यांच्या लस्करातून हिस * * वर्तमान आले असेल ते निश्चये सांप्रत नासरजंगाचे भाऊ मसनतिसीन जाहाले असतील. अबदूलमजीद-खान बोलिले कीं कडपेकरासाखा आपला पुत्र पळून गेला नाही. कामास लडाईत आला हेच थोर गोष्टी जाहाली मणून बहुत धैर्याच्या गोष्टी बोलिले. सारांश स्वामीच्या श्नेहापेक्ष्या दुसरा विचार मानीत नाहीत. थोड्याच दिवसांत सेवेसी राजश्री सिवराव यांस व आम्हास पाववणार आहेत. लौकरीच स्वार होऊन येऊ. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Girmaji gives the Peshwa graphic details of the murder of Muzafarjang by the Nawabs of Karnool and Savanur near Kadappa.*

No. 75]

[*3-3-1751*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल फालगूण वद्य द्वितीयापावेतो स्वामीचे कृपाकटाक्षावलोकने सवनूर सुखरूप आसो विशेष. हिदायेत मोहिदीनखान घाटावर आले. फिरंगियासी व पठाणासी युध्य जाहाले. फिरंगीयांचा पक्ष धरून मुजफरजंग पठाणावरी चालून आला. युध्य मातबर जाहाले. सवनूरकर व करनोलकर यानी हिदायेत मोहीदीन

खान यास जिवे मारिले. उपरांतिक करनोलकर व सवनूरकर मारिले गेले. कडपेकर यास गोली लागली. तो आपल्या ठिकाणास गेला. आद्यापि नासरजंगाचे भाऊ कडप्याजवल राहिले आहेत. आद्यापि भागानगराकडे जावयाची तजवीज नाही मणून येथे वर्तमान आलें व आणखी स्वामीकडे त्याच्या लस्करचे वर्तमान आले आसेल. सांप्रत सेवेसी सिवरावजीस व आम्हास सत्वर रवाना करणार आहेत. जेथे आज्ञा होईल त्या स्थलास सिवराव व आम्ही येऊ. बाकी वर्तमान आपूर्व होईल, ते सेवेसी लिहून पाठवितो. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Girmaji reports to Bhausaheb news of Muzaffarjang's death.*

No. 76] [6-3-1751.?

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल फालगूण वद्य ५ पंचमी पावेतो मो सावनूर जाणून स्वानंदाभ्युदय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आबदूल मजीदखान यांची कासीद जोडी हिदायेत मोहिदीनखान याच्या लस्करातून आली. ते खबर सांगत होती कीं, हिदायेत मोहिदिनखान व अबदूलमजीदखान यांचा पुत्र व करनोलकर व कडपेकर व फिरंगी आदिकरून परस्परे कलह प्राप्त होऊन जिवे मारिले गेले, मणून वर्तमान सांगितले. निश्चये वर्तमान आहे. सांप्रत सिवराव यास व आम्हास सेवेसी लौकरीच रवाना करणार आहेत. सत्वरीच स्वार होऊन येतो. येथे आज्ञा होईल तेथे सिवरायास घेऊन येऊ. द्रव्यविषईहि रदबदली लागली आहे. स्वामिकार्यविशी काही अंतर नाही. हे काबूची याजकरिता च्यार रोज विलंब आहे. मागाहून सेवेसी वर्तमान लिहून पाठवितो. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Girmaji to Bhausaheb: reporting the battle between Muzaffarjang and the Pathan Nawabs.*

No. 77] [March 1751 ?

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री बाबासाहेबाचे[१] सेवेसी

विज्ञापना यैसीजे. नवाब बसालतजंग येतात हे वर्तमान तेथें कसें आहे, व मुरारराव यांजकडील काय वर्तमान, घाटाखालें फौज आहे त्यांचें वर्तमान, मुरारराव यांचा यांचा स्नेह विरुद्धभाव कसकसा आहे, हे सविस्तर मनास आणून लिहिणें म्हणून आज्ञा सादर जाली. त्यास सलाबतजंगाकडीलहि पत्रें आलीं. कनोलासमीप आले. तेहि येणार. त्यांजकडील पत्रें यांजला आलीं आहेत. स्नेहभाव दाखऊन लिहिलें आहे. बाकीचा निर्वाह करणे म्हणून लिा आहे. त्यांहीं विचारांत पडले आहेत व आम्हाकडील फौजेचाहि शह समीप आला. आम्हींहि येऊन बसिलों. मोगलाकडील कोण्ही मातबर अद्याप आला नाही तों आगोधर आम्हीं पावलों. आमचा आधीं निर्वाह करावासा जाला आहे या फिकीरींत आहेत. तिसरे मुरारराव यांची बाकी संस्थानांत आहे. त्याजकडील वकील आपाजी नाईक म्हणून आले आहेत ते जवाबसाल करितात कीं आम्हास सलाबतजंगाकडें जाणें जरूर आहे तर तुम्ही आमचा पैका देणें. पुढे यैसा विचार करवितों कीं श्रीमंताकडील फौज इकडे येऊं नये. कांहीं कर्नाटकचें मोकरर करून बाबूजी नाइकाप्रमाणें ठिकाणी प्रविष्ट करावयाचा विचार करितों म्हणून लिहितो, वकीलहि बोलतात. परंतु त्याचा इतबार यांस येत नाहीं. हे गोष्ट होणार नाहीं यैसेंहि समजले आहेत. नंदराज सर्वाधिकारी श्रीरंगी आहेत त्यानी घाटावर येऊं नये हाच संकल्प केला आहे. फिरंगीयानीं आठरा महिनियावर घातलें. दीर्घसूत्रावर घालून तूर्त तिकडें कजिया मकूफ केला आहे. दोनसे फिरंगी याजपासी फुलचेरीकर आहेत. तसेच इंगरेज त्रिचनापलीस आहेत. महमद अलीखानाने किल्याची बेहबुदी अशा प्रसंगांत येथास्थित करून घेतली. चंदावरकर वगैरे आपलाले स्थळीं स्वस्थ आहेत. येकून पेंच मातबर यांजवर आहे. सारांश कोण्हाच्यानेंहि या प्रसगीं बिघाड स्वामीच्या फौजेसी करवतो यैसा अर्थ दिसत नाहीं. इतकेंच कीं गतवर्षास कांहीं अधिक उणें पाठ पोट दाखऊन करितील तितकेच. परंतु केवल विरुद्ध करणा(र) नाहीं. सुचला अर्थ येथील भावगर्भ कळों आला तों सेवेसी लिहिला आहे. आणखी वरचेवर सेवेंत लिहून पाठवीन. श्रृत होये हे विज्ञापना.

¶*This is a news-letter giving information from various quarters in the Karnatak—from Salabatjang, Murarrao, the French, the English and Nandraj of Seringapatam, and finally assuring the Peshwa that there would be no opposition to his armies from any of them.*

१ बलवंतराव मेहेंदळे.

No. 78] [5-4-1751

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल चैत्र वद्य ५ पंचमी पावेतो स्वामीचे कृपाकटाक्षावलोकनाने सावनुरी सुखरूप असो विशेष. सरकारचे कासीदजोडीसमागमे आज्ञापत्र सादर जाहाले ते सिरसा वंदून सनाथ जाहालो. तेथे आज्ञा कीं सर्व पत्रार्थ नवाबास विदित मणून आज्ञा. आज्ञेनसार पत्रार्थ विदित केला. त्यास नवाबानीं उत्तर दिल्हे की सिवराव यास व तुम्हास लौकरीच रवाना करितो मणून उतर दिल्हे. ईश्वरइच्छेन सत्वरीच स्वार होऊन येतो. वरकड वर्तमान मागाहून सेवेसी लिहून पाठवितो. सिवराव यानी लिहून पाठविले आहे त्यावरून सर्व अर्थ चितारूढ होईल. विशेष लिहिणे शक्त नव्हे हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Girmaji to the Peshwa from Savanur: reports the delivery of letters to the Nawab.*

No. 79] [30-11-1751 ?

छ १० सफर

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २२ मोहरमपावेतो स्वामीचे कृपाकटाक्षावलोकनेकरून सावणुरी सुखरूप आसो विशेष. आज्ञापत्र सादर जाहले तें सिरसा वंदून सनाथ जाहलो. तेथे आज्ञा की, पूर्वी राज (श्री भाऊचे) अगमन या प्रांती जाहाले होते ते समयी नवाब बहुत कांही बोलत होते. त्यास ईश्वरइछेने कर्नाटक प्रांत जाहला यांचे मनोगत काये व राा सिवराव याचे व सेवकाचे येणे लौकर होये, व रो मुरारराव घोरपडे कोणत्या खेळयांत आहेत व बिदरूरकर व सोंधे येथील वर्तमान बातम्या आणून लिहून पाठवणे मणून आज्ञा. यैसियास स्वामीकडे कर्नाटक जाहलियाचे वर्तमान नवाबानी ऐकोन बहुत संतोषी जाहलियाचे वृत लिहिता पुरवेना, निमित्य की, राा बाबूजी नाईक याचा पाया या मुलुकातून निघाला. ईश्वरे श्रीमंतास हा प्रांत दिल्हा. इतकियावरी बिदरुर व श्रीरंगपटण येथील बंदोबस्ती आमच्या विचारे करितील मणून बहुत भरवसा मानिला आहे. स्वामीचे आगमनाचे पत्र

येताच राजश्री सिवराव शंकर यास व आम्हास रवाना करावे यैसा निश्चये जाहला आहे. लौकरीच रवाना होऊ. राजश्री मुराररात्र घोरपडे बहुत कुच्योद्यांत आहेत. या प्रांतची फौज कांही मिलवावी व सोंधे व बिद्रुर व रायेदुर्ग व चित्रदुर्ग येथील कांही फौज मिळून व देसकांकडील प्यादे जवादे सिंदे व नारगुंदे यैसे स्तोम करून कुचोद्या करावे यैसा हेत धरून सोंडुरी बसला आहे. याजकडेहि पैगाम याजप्रकारी चालविला होता. त्यास यानी उत्तर साफ सांगून पाठविले कीं कदाचित रा बाबूजी नाईक याचे आगमन या प्रांती होते तरी तुमच्या मनसब्यास आम्ही (सा)मील होतो. सांप्रत श्रीमंताकडे कर्नाटक जाहले आहे. त्याच मनसब्यानसार आम्हास उमदी कामे करणे जरुर मणून लिहून पाठविले. त्याजकडील वकील नरसिंगराव काही येथें नाही. आपल्या येजमानाकडे गेला आहे. राजश्री बाबूराव दादाजी बिद्रुरास पावले. संस्थानिकाच्या भेटी जाहल्या. रा नरसिंगराव बारगी यास समागमे देऊन सेवेसी रवाना करणार होते इतकियांत काये अनमान जाहला कीं न कले. सांप्रतहि लौकरीच उभयेता सेवेसी येणार आहेत, यैसे वर्तमान येथे यैकिले. वरचेवर वर्तमान सेवेसी लिहून पाठवितो. सरकारचे कामात सेवकाकडून अंतर नाही. दरबार सुस्त याजकरिता विलंब क्षमा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Girmaji informs Bhausaheb that Murarrao Ghorpade was setting out on an expedition and invited the Nawab of Savanur to join, but the latter turned down the proposal.*

No. 80] [*6-1-1752?*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे
शेवेसी

सेवक विस्णु नायक प्रतापराव सरदेसाई मामले फोंडे सां नमस्कार विनंती उपरी. माघ शुध प्रतिपदा मुा डंबलपरयंत स्वामीचे आसीर्वादें वर्तमान यथास्थित असे विशेष. निरोप घेऊन आलों तें शरिरीं समाधान न होऊन आजवेर राहणे जाहले. यानंतर राजश्री माहादाजी राम निा राजश्री मुराररात्र घोरपडे यानी आम्हास बरोबर घेऊन आणिले आहे. कितेक कार्यभाग सांगितला तो मजकूर राजश्री हरिपंतास लिहिला आहे. विदित करतील त्याप्रों उतरें पाठवावया स्वामी समर्थ आहे. यास घेऊन यतों. दोन हजार फौज यांची आहे. राजश्री श्रीनिवास-

राव व राजश्री मोरोपंत याची पत्रें अंतस्ती आली तोहि मजकूर विदित करतील. सिरहटी, डमल, नवलगुंद, कितूर याचे वकील बरोबर आणिले आहेत. कोपाळचे रोखे हे आलेवर पुढां यतों. कृपा असो दीजे विज्ञाप्ति.

¶*Vishnu Nayak Sardesai of Phonda writes to Bhausaheb that he is accompanying Murarrao Ghorpade on his tour along with the vakils of the various chiefs.*

No. 81] [*7-2-1752?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक राणोजी नाईक मुकाम श्रीरंगपटनाहून चरनावर मस्तक ठेऊन दंडवत व्रिनंति. येथील वर्तमान माहे छ २ रबिलाकरपावेतों स्वामीचे कृपादृष्टीकरून स्वेस्त असो विसेस. संवस्थानाचे वर्तमान तरी पेसजीं विनंतिपत्र लिहिले आहे, अनि येथील वर्तमान माहे छ १ सफर रोजींपासून बातमी भागानगरीहून आली कीं श्रीमंताची व नवाबाची लडाई होनार आहे. या उभयेतामधे केसी वर्तनूक होती की पाहावी लहान जूज दलवाही व सामादिक मिलून तजवीज केली आहे कीं याकारितां पका धीर द्यावा आनि बनाजी माधवराव यानी दरवाजा बंद करून कितीयेक निष्टुर गोस्टी केल्या म्हनऊन पैकास विलंब लाविला. त्याजवर बनाजी माधवराव यानी दरबारास जाऊन रजा मागितली. त्यानी विडे दिधले. मग रागें रागें उठोन आपले हवेलीस आले. मग लढन्येची सामग्री करून कार्तिक वद्य १० दसमीचे लइने ? करून माहे मार्गेस्वार सुध ७ सप्तमीचे दिवसीं स्वार होऊन सोमवार पेठेस जाऊन राहिले. तेथून देवदरसेनास किलेयांत जाऊन आले. तेथें रामराव वकील दोनदां आले कीं दलवाही बोलले कीं आपली भेट घेऊन जानें. यानीं कबूल केलें नाहीं. ऐसे मुतसात केले. मग तेथून मयेलकोट ८ कोस आहे तेथें गेले व जाताना आम्हास थेयेली दिधली कीं दळवाईयास देऊन तेयाचा जाबसाल घेन. मग आम्ही मागती फिरून येऊन अगरालेया राहिलों. मग थयली घेऊन आम्ही व विठल शामराज मिलून दलवाईपाशी गेलो. थेली गुजरानली. मग त्यांनी वाचून पाहून आम्हास बोलले कीं तुम्हा बातमीस ठेविले आहे, तर तुम्ही सुखी राहावे. आम्ही बोलिलो कीं एकंदर परवानगी एकंदर होये. त्यानी आम्हापासी जोडा २ दोन तयनात करून दिल्या की हे कोनाचा घरास दरबारास जातील तर कोन्ही अटकाव न करी. मग आम्ही दोन

चार दिवस सरवाचेथ व दरबारास जात येत होतो. मग दलवाईयास थेलीचा जाब मागितला. त्यानी बोलिले कीं थैली तयार करून पाठवितो. त्याजवर बनाजी माधवराऊ चेनरायपटनाहून फिरून आले. माहे छ २६ रबिलावल रोजीं येऊन दाखल जाले. यानंतर बनाजी माधवराव दलवायाची भेट घेऊन नजर दिधली, अनी बसून सोमीचे[१] पत्र दिधले, ते वाचून पाहिले. बहुत संतोस मानिले. मग बोलिले कीं याचा जाब समजून देऊं. त्याजवर दोनतिनींदा जाबासाठीं सांगून पाठविले कीं तुम्हा जोडी पाठवायाची असेल तर रवाना करने, असे बोलले. कलले पाहिजे. याउपरी वेदमूर्ति दक्षेनामूर्ति स्वामी येथे आले आहेत. दलवायाची भेट जाली अनी त्यास कागद देऊन रवाना करतील. वेदमूर्ति कुस्णाचारीये येथें आले आहेत, त्यासी दळवायास भेट जाली. व सामादिकास कुल यास वस्त्र दिधली, अनि दलवाई यानी वस्त्र देऊन खर्चासहि देऊन निरोप दिधला व येथून कुनीकडे जात आहे तेही लिहून पाठवू. या उपरी महमदअली तो अरकाट प्रांती आहे व त्याचे भाऊ माफूर्जखान मदरामधी आहे, तेथे जमाव करीत आहेत. याजवरी येथून हयेदर अली नाईक याचे जमाव स्वार तीन हजार व पेंदे तीन हजार व बारगीर (?) हजार दोन यैसे सरंजामानशी दीडकोसावरी आहे. घाटाखाली आहे. आनि मागून लोक पाठवीत आहे. तरी येथें शिपाई रोज खाटखट दंगा करीत आहेत. विज्ञेप्ति श्रुत होये.

¶*Ranoji Naik to the Peshwa : sends news from Seringapatam about the plans of the Dalvai and Haidar—the former was the Commander-in-Chief of the Raja of Mysore. The movements of Mohammad Ali and his brother Mafurjkhan are also mentioned.*

No. 82] *[15-7-1752*

पो छ १२ सौवाल

श्री

श्रीमंत माहाराजे मातुश्री आईसाहेबाचे सेवेसी

विनंती. अज्ञाधारक जानोजी घारगे मो सावनूर सेवेसी विज्ञापना विनंती. ताा छ १४ माहे रमजानेपावतो साहेबाचे कृपाद्रष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशष. साहेबाची आज्ञा घेऊन निघालो ते मजल दरमजलेने नवाब वालाशान यांच्या लस्करास परगणे कोकामवर पावलो: भेटी तेच दिवसी जाली.

---

१ स्वामीचें.

आज्ञेप्रमाणे पत्रे व पदक व सिकारखाना पावता केला. उपरांतिक बहुत खुश होऊन साहेबाकडील सविस्तर विचारिले. हुकुमाप्रमाणे वर्तमान सांगोन पुढे साहेब ज्याप्रमाणे आज्ञा करतील त्या प्रा वर्तणूक करू यैसे बोलिले. त्याउपरी कूच करून मजल दरमजले सावनूरचे रोखे आले तो चौ दिवसा शरीरास बरे वाटेनासे जाले. आज महिना दीड महिना बाहीर निघत नाही. प्रस्तुत उतार आहे. भेट जालियावर आज्ञा मागतो. रो सिवराव शंकर निघणार यैसे आहे. आम्हास म्हणता की बराबर निघो. त्यास भरवसा दिसत नाही. विचारानसार निघतील. आम्ही आज्ञा सांगोन येतो. मीर सिकारी आज्ञा न घेत आले. त्यास नवाबास बरे वाटत नवते. उतावलीने माघारे आले आहेत. त्याची रवानगी येथे न केली त्यास रुा ३० तीस व पागोटी तीन दिली ते आम्हापासी आहेत. येते-समयी सेवेसी घेऊन येतो. या प्रांतीचे वर्तमान तरी चंदाखाने हे त्रितनापलीस भांडत होते. त्यास रा मुरारराव व चंदावरकर व श्रीरंगपटणेवाले यानी जेर करून बुडविला. खासा मारिला गेला, लस्कर लुटले यैसे वर्तमान आहे. यानंतर पेशव्याकडील जासूदजोडी येथें आली. नवाबास पत्रें लिहिली आहेत की दिलीहून गाजुदीखान दक्षणेस सुभा होऊन आलें. बराबर मलारजी होलकर व जयाजी सिंदे आहेत. त्यास नवाबास लिहिलें की तुम्ही मातबर फौजेनिसी तयारी करून गाजुदीखानाचे साहित्य करणे यैसी पत्र आली आहेत. सेवेसी श्रुत होये. पुढे ज्याप्रमाणे साहेब आज्ञा करतील त्या प्रो वर्तणूक करू हे विज्ञापना.

¶Janoji Gharge reports to Tarabai his visit to the Nawab. He also gives her news of the death of Chandasaheb while carrying on the siege of Trichinopoly and Ghaziuddin's advance to the south with Sindia and Holkar.

No. 83] [*14-9-1752*

श्रीराम प्रसन

श्रीमंत राजश्री भाऊ-
साहेबाचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक रामराये नागनाथ त्रिकाली सां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ताा छ ९ जिलकादपावेतो अरकाट जाणोन माहाराजाचे दयेकडून क्षेम आसो. माहाराजी वैभवलेखनआज्ञा केली पाहिजे. यानंतर छ ३ रमजानच पत्र छ ९ जिलकादी अरकाटी कासिदाने आणून दिल्हे. मााअली-

3889

खानास परभारे पत्र पावत करून उतर घेऊन कासीद अरकाटास आला. तेव्हा पत्र पावत केल. माआलीखान यास वरचेवरी पत्र चंपतरायेजीची व कपितानाची पाठविली जे, सलाबतजंगास कुमक न जाये. पायेलग होयेस करणे. यैस लिहिलेवरोन मा आलीखान पुदचेरी असपास फिरतो. चंदावरचे[1] प्रतापसिंगास कपितानाने पत्र लिहिली जे, नवाब गाजुदीखा येणार. मा आलीखान व आमचा जमाव देऊन नदी तुंगभद्रावरी पाववितो तुम्ही काही कुमक मानाजीबा[2] पाठविणे. बाजे जमाव भारी करून पुढ पाठऊ. सीघ्र पुदचेरीस येणे म्हणून लिहिल आहे. पुदचेरी सोडून फौज यावी तरी मुल्लक जातो. मनास आलेसारिख किले घेऊन मुल्लक बळकाऊन बसतो. पुढ सोडवणे कठीण पडत. पुदचेरीच खाणून काहडितो. यैस मजपुढ फार शेफत केली आहे. नवाब गाजुदीखानाकडे जमाव पाठऊन त्याची दया संपादावी यैस द्रढता धरिली आहे. पुदचेरीवालेस खानून काहाडिलियाने पुढ आपला पईस इतका वकार+ राहाणार नाही. यैसे कितेक लोक त्याचे अत तजविजा देताती. नवाब गाजुदीखानाकडे कपितानाचे पत्राचा राबिताहि बरा आहे. नवाब माआलीखानाकडे जाऊन त्याचा मनोभाव नीट कळून घेऊन विस्तार लिहितो. पहिली चाकरी मेहनत करणे यैसे निरोपिल. माहाराजाच अन खाऊन सवते करणार नाही. चाकरीस चुकणार नाही. येकदा चाकरी नीट करून दाखवावी, सरफराजीस पावावे, हा मनात निस्चये केल आहे. माआलीखानाची पत्र राबिता गाजुदीखानाकडे फार आहे. निस्च(य)हि तैसच आहे. परंतु सिपाह खाले दबला आस. मुल्लक सोडून येता नये. आलियाने मुल्लक जातो. यैस नानापरी विचारात पडला आहे. सेवट त्याचा भाऊ आबदूल वाहबखानाबा जमाव घेऊन नदीवरी पावेस करितो. कपितानानेहि यैसच करार केला आहे. मा अलीखानाचे फौजेस रोज पावला पावण कठिण जाहल आहे. रास ८८९ तादूळ ८८९ कुलथी आहे. जिनस अरणीस ठेऊन माआलीखानाकडे गेलो. पुढ होईल ते लिहिल जाईल. सरकारचे हरकारेपैकी मुकुंद नाईक दिा सुभानजी त्याने रोजमरेकरिता मनास आलेसारिख बोलून नव वकील घेऊन येतो आला आहे. यैस हलके बोललियाने वकार कवणेपरी राहील ? वरकड हरकारे गरीब कसिबी. सुभानजी नाकसबी आहे. पुढ तरी त्यास ताकीद जाहली पाहिजे. कासीद बितैना जालिया उतम आस. माहाराजी आज्ञा केलीप्रो घेऊन पावतो. येक दिवस माघ पुढ. कडपेवाला सिपायाचे दगेकडून पळून गांजिकोटेस गेला. सेवाचोर होणार नाही हे विनंती.

¶*Ramrai Nagnath sends news from the court of Mohammad Ali, who is reported to be bent upon destroying the power of the French.*

---

१ तंजावर. २ मानाजीराव जगताप, तंजावरच्या प्रतापसिंहाचा सेनापति. + दबाव, इभ्रत = Prestige.

No. 84] [18-9-1752

छ २२ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शामराऊ यादव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना यैसीजी. येथलि क्षेम ताा भाद्रपद सुद १० मुाा नारायेण पेठ येथास्थित जाणऊन स्वकीये क्षेम लिही ती आज्ञा केली पाहिजे. विशेश :—पूर्वी पत्रे सेवसी पाठविली आहेत ते पावली आसतील. त्याजवरून वर्तमान श्रुत जाले असल. तर नंतर फुलचेरीस आलो. कपिधान गोरदोर याची भेटी जाली. परसपरे बोलणे जाले. कारभार तो आवघा विस्कळीत जाला. परंतु उपद्वापात परसपरे आहेतच. आम्हादेखता दोन जहाजे त्याच्या पातशाहापासून आली. मालहि सकलाद व रुपे वगैरे जिनस आला. त्यात फिरंगी पाच सातसे नवे आले. आणख जाहाजे येणार आहेत म्हणतात. आठ जाहाजे येणार आहेत. सत्येमिथ्ये देव जाणे. येथून तर पूर्वी सा जाहाजे गेली होती. पाच हजार फिरंगी येतात यैसे म्हणतात. काही फिरंगी आले. वरकडी येणार आहेत यैसी वार्ता आहे. येक जाहाज माहीबद्र येथून गाडदी याचे आले. हिंदू गाडदी आहे, परतु नामी आहेत यैसे म्हणतात. त्यात च्यारसे माणसे आली. यैसी जमा होत जातात. वरचेवर नवाब सलाबतजंग याची पत्रे व मुसे बुसी याची पत्रे येतात. नवाब गाजुदखिान याचे वर्तमान लिहितात. त्याजवरून दोन जाहाजे फिरंगी येका जाहाजामधे तीनसे व माही बंदरचे गाडिदी मछलीबंदरे मार्गे भागानगरास पाठविले. आणीकहि पाठवावयाच्या विचारात आहेत. आम्हादेखता तर इतकेच वर्तमान जाले. मागे आणिक पाठविले किंवा नाही हे कलत नाही. परतु तिकडल्याच विचारात फार पडिले आहेत. परंतु करनाटकचा कारभार सुस्तीखाले पडिला आहे. भागानगराकडीलच उपद्वाप येऊन पडिला आहे. जे ठाणी फुलचेरीवालियाची आहेत ते फुलचरीकराकडेच आहेत. जे चेनापटणवालियाकडील ठाणी आरकाट प्रांतीची आहेत ते त्याजकडेच आहेत. फुलचरीवाला माणूस पाहून निगादास्त करितो. स्वार ठेवायाचा भर फारसा नाही. आगत्याआगत्ये ठेवितात. पायेचेच ठेवितात. मोठे वोढे भागानगराकडील येऊन लागले आहे. सलाबतजंगास आसरा तितकाच आहे. [१]चंकारपूर्वकाचे पुत्राचे स्त्रीचे समाधान केले की, चकारपूर्वक आहे आपण नाही

+ चंदासाहेब.

यैसे समजण. जिवात जीव आहे तोपावतों सोडनार नाही. चंदावरकरानी कौल देऊन विस्वासघात केला आहे. त्यासीहि समजल. यैसे म्हणून समाधान केले. पुढे होणजाणे श्रीआधीन आहे. दुसरे वर्तमान महमदआलीखानाकडील नंदराज बिरादर देवराज दळवाई पटण व मुराराऊ घोरपडे हे त्रिचनापलीस आहेत. त्याचा व महमदआलीखानाचा कजिया आहे. त्रिचनापलीचा किला घ्यावा आगर पैका घ्यावा. आवल तर किलाच घ्यावा. दुसरे जरूरीस पैका घ्यावा. त्यास महमदआलीखानास तो दोन्हीहि आनकूल पडत नाहीत. दरमिया लोक घालून ठराव केला की, दोन महिनियात किला देऊ अथवा पैका देऊ. यैसी रदबदली करून किल्याची बदोबस्ती करून त्याजपासून निरोप मागितला की देवनापटणास जातो. इगरेजास समजाऊ किला तऱ्ही देतो. आथवा पैका आणूण देतो. यैसा परसपरे निरोपानिरोपी ठीक करून बरोबर इगरेस व आपली फौज घेऊन देवनापटणास येतां वाटेमधे त्रिवादी गरूडनदीचे तिरी मातीचा किला आहे तेथे फुलचेरीवालियाचे ठाणे होते ते घेतले. दुसरे त्रिवणामल म्हणजे आरुणाचळ त्याचा देवलाचाच किला केला आहे तेथेहि ठाणे फुलचरीवालियाचे होते तेहि घेतले. महमदआलीखान व आबदूलवाहबखान दोघे भाऊ बरोबरच त्रिचनापलीहून निघाले. येक तिसरा भाऊ व इंगरेज वगैरे त्रिचनापलीस ठेविले आहेत. नंदराज व मुराराऊ घोरपडे त्रिचनापलीसच बाहीर आहेत. त्रिवादीस महमदआलीखानाचा मुकाम होता. त्यास देवनादपटणाचा कपिथान यास बरे वाटत नवते तो मृत्ये पावला. दुसरा त्याचा यैवजी चेनापटणाहून ये तोंवरे त्रिवादीस महमदआलीखानाचा मुकाम होता. पहिला कपिथान देवनादपटणाचा तोच मुरबी महमदआलीखानाचा होता. नव्या कपिथान देवनादपटण यांची व मा। आलीखानाची भेटी जाली. त्यास म्हणू लागला की, तुम्ही जहाजे समुद्रातून घालणे व आपणाबरोबर जमियेत देणें. खुशकीहून आपण होतो. फुलचरी घेऊ. याने उतर दिल्हे की, त्याच्या पातशाहा व आमच्या पातशाहाचा सलूख आहे. त्याची जाहाजे आमची जाहाजे समुद्रामधे येका बंदरावरून येकाची जातात. फुलचरीवालियासी बिगाड करनार नाही. तुम्हास जाणे आसल तर फुलचरीस जाणे. आमचे लोक तुमचे चाकर आहेत, ते तुम्हाबरोबर येतील. परतु फुलचरीवालियाची तुमची लडाई होईल. आमचे लोक काही त्यासी भांडणार नाहीत. यैसा जौबूसाल जालियावर ते सुस्त पडले. मग काही दिवस त्रिवादीस राहून चंदीस गेले. चंदीमधे फुलचरीवालियाने बरे सामान केले होते. त्यास चंदीकरानी येऊ दिल्हे. पेठेतहि सिरले. जागाजागा लोक दबे धरून होते. राजगडावरहि लोक तयारच होते. मग येकायेकीच बरा मार जाला. लोक

महमदआलीखानाकडील मारले गेले. जखमीहि फार जाले. मोड जाला. मागे ते लागले. काही बुलगे लुटिले. येक हाती घेतला. च्यार ब्राह्मण पालखीपदस्त पालखीसगट धरले. चंदीपासून च्यार कोसावर येक पाले आहे तेथें माा आलीखान गेले. मागे हेहि गेले. दुरून हे लोक होते. तेथेहि टिकाव न जाला, दुसरे त्रिवादीसच गेले. त्रिवादी देवनापटणाहून पाच कोस आहे. देवनापटणाचे पछमेश आहे. फुलचरीवालियाचे लोकहि दुरून दुरून आहे[त]. इगरेजाची माा आलीखानाची रजबजल काये पडली आहे हे कलत नाहीं. प्रस्तुत करारवाकहि पुस्तपन्हा माा अलीखानाची चितापासून करीत नाहीत. परंतु आसरा इगरेजाचा आहे. मिसर किलीस चेनापटणवालियाचा बबरचीखानाचा दरोगा होता तो त्यानी वाढऊन त्रिचनापलीचे कुमकेश पाठविला होता, त्यानीच दोन लडाया मारल्या. त्याचाच कारभारांतच हा विल्हे लागला. फुलचरीवालियाकडील लोकहि त्याने धरले. त्याची वस्तभावहि त्याचे हातीं लागली. बरा वाढला. नावलौकीक बराच जाला. त्यास तो मागती चेनापटणवालियाचे भेटीस गेला. त्यास गर्वहि फार जाला. वस्तभाव तफावत केला येसे त्यास दिसून आले. येकाचे येक मुदई. दुसरे चंदा हाती सांपडिलियावर कसा मारला? मातबर माणूस सापडलियावर आनुमोदन कसे दिल्हे? येसे दोनच्यार आरोप त्याजवर आणूण त्याचा सेंदूर उरला (उडला?) चेनापटणांतच आहे. हलका केला आहे. आबदूल वाहबखान आरकाटात आला आहे. तेथे पहिले ठाणे इंगरेजाचे होतेंच. परंतु अद्याप आमल कोणाचाहि सुखरूप चालत नाहीं. अद्याप उपद्रापच आहे. येकास गाजुदीखानाचे बल. येकास सलाबतजंगाचे बल. मुलूख खराब पडिला. कोन्ही खावंद नाही. नंदराज व मुरारजी बो त्रिचनापलीस आहेत. त्याचा वायेदाहि पुरा जाला. त्रिचनापलीस रसद पटण्याच्या मुलुकातून येते. ते पटणवालियानी बंद केली. त्रिचनापलीस महर्ग आहे. माा आलीखानाचे भावाने बहुत मिनत केली. तेव्हा मुराररराऊ यानी दोनसे गोणियाची परवानगी देऊन किलियात जाऊ दिल्ह्या. माा आलीखानावरहि सिबंदीचा फार कजिया आहे. आम्हादेखता इतके वर्तमान जाले. मागे काये वर्तमान जाले आसल ते कलत नाही. सरकारात वरचेवर बातमी येत आसल. सेवकाचे वर्तमान फुलचरीमध्ये आसतां कपिथानास पुसिले की, सोला महिने तुम्हापासी जाले. कार्येकरून देतो म्हटले त्यास दिवसे दिवस हे अवस्था होत चालली. पुढे येजमान स्वामीपासी आपली आबरू कसी राहील? त्यास म्हणो लागला की, चंदा+ जिवे गेला. आपण आर्थेकरून बुडालो. हा बंदोबस्त जालियावर कार्ये

+ चंदासाहेब.

मजबुती केली. लस्करात न गेला. येक येक जमातदार बोलाऊन बोलीचाली करितो. यैसे वर्तमान येथील. खुद त्याचेहि सिबदीचा हाच कजिया. उपासी मरतात. दंगा करितात. ताल कोठे राहिला नाही. मुसे बुसेकडून येक हाती गोरदो यानी देविला आहे. तोहि त्याने दिल्हा तर घेऊन येतो. आले ते काशास टाकावे. तमाम करनाटकचा विचार मनास आणिला आहे. सत्वर सेवेसी येतो. जयेराम सदासिव हुसेन दोस्तखानापासी होते त्यास सोडले तेव्हा बरोबर गेले होते. च्यार पाच वरसे त्या प्रांते होते. मातबर आहेत. वाकीफ मनसुबेबाज आहेत. तेहि बरोबर आहेत. सेवेसी येतात. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ती.

¶Shamrao Yadav to the Peshwa giving news from Karnatak: the arrival of a fresh contingent of French soldiers, the constant correspondence which the French carried on with Salabatjang, the differences that had arisen between Mohammad Ali and Murarrao over the payment of tribute and the possession of the fort of Trichinopoly, Muhammad Ali proposing to the English to lead an attack on Pondicherry and the English refusing help; a skirmish between Muhammad Ali and the French at Gingee, the successes attained by Clive over the French and his subsequent elevation in the service, the French Governor finding fault with Ramdaspant for creating ill-will towards the Peshwa and the standing discord between the several petty states in the Karnatak are the main items mentioned in this letter.

No. 85] [*Received on 17-10-1752—written in August.*

पौ छ ९ माहे जिल्हेज सुा
सलास खमसैन मयां व
अलफ अश्विन शुध विज-
येया दसमी

श्रीसुबराज

श्रीमन्माहा मातुश्री आईसाहेब
साहेबाचे सेवेसी

सेवक मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब कृतानेक शेवेसी विज्ञापना विनंती. येथील क्षेम ताा श्रावण वदी पावेतो साहेबाचे कृपाकटाक्षेकडोन सेवकाचें व सेनेचे वर्तमान येथास्थित असे विशेष. वाा राजश्री जीवणभटबावा व राजश्री जिवाजीपंत यानी साहेबाच्या कृपा अंतःकरणाचा आशय विस्तारेकडोन लिहिल्यावरून, परम संतोश जाहाला. अशास पूर्वीपासोन या घराणियावर कृपा करून वडीलवडिलादारभ्य सेवा घेऊन, उर्जित करीत

आलां. पुढेहि ममतायुक्त सेवकाचे हातून सेवा घेऊन, चालवणार साहेब धणी समर्थ आहां. तिरचनापली व चंदावर देवब्राह्मणांचे राज्य, यास चंदाखानानें उपद्रव केल्याकरितां सेवकानें पटणकर व नवाब महंमदआलीखान यास सामील करून घेऊन, चंदाखानासी युध्यप्रसंग केल्यास, साहेबाचे पुण्यप्रभावेंकडोन पातशाःजादेप्रमाणें चंदाची दौलत होती. दौलतसहित अमित्र हतप्रभ जाहाला. साहेबांस येश येऊन देवब्राह्मणराज्यास निरोपद्रव जाला. याउपरी इकडे गुंता नाहीं. इतःपर साहेबाच्या दर्शनास येऊन, दर्शन घेऊन, सेवा करून दाखऊन, उर्जित करून घ्यावें हाच आहिर्णीसी ध्यास लागला आहे. तदनरूप अविलंबेच येत आहो. मुख्य गोष्टी हे दौलत वोढीस पडोन, कसालियाखालें आली आहे. दौलतचा व सेवकाचा उधार करून, कृपा करणार साहेब धणी मायेबाप असां. वरकड कितेक अर्थ उभयेता माारनिलेस लिहिला आहे, ते विनंती करितील; तदनसार समर्पक करून सेवकास आज्ञापत्र सादर करावया धणी आसा. सेवेसी स्रुत होय. मुख्य विचार सेवकावरी दया करून, सेवा घेणार साहेब समर्थ आहेत. हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade to Tarabai announcing his victory over Chandasaheb.*

No. 86] [*16-11-1752*

छ १० मोहरम

श्री

सेवेसी आज्ञाधारक नागोराम चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. सेवकाचें वर्तमान छ ९ रोज गुरुवार दीडप्रहर रात्र स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालो ते ती घटका रात्रीस लष्करदाखल जाहालो. लष्करांत येताच परभारेंच नवाबाच्या डेरियास गेलो. राजश्री परशराम माहादेव याची मुलाजमत करविली. आपला स्नेह होणार म्हणोन आम्ही आल्या आगोधरच त्यास त्याचे बातमीबद्दल वर्तमान आलें. दुसरें पातशाही फरमान आला याजमुळें नवाब आपले जागां बहुत आनंदात होते, त्यामुळे लोकाही नजरा दाखविल्या, ते समयीं आपणहि रुपये ५ नजर केंले; ते समयीं शाहानवाजखान व मुसाभुसी व मुस्तेदखान त्रिवर्ग जवळ होते. रुमीखान यांणीं वर्तमान निवेदन करावें तों नवाबांनी आपले फरमानीयाचे हर्षाचे वर्तमान सांगो लागले. आम्ही (मुबारिख[१])

---

१ शुभ.

म्हणोन उत्तर दिलें. त्यांजवर मुस्तेदखान यास मुख्यांनीं आज्ञा केली कीं नागोराव यास परवाना वाचून दाखवणें. मग परवाना वाचतेसमयीं नवाब आपलें स्वमुखें सांगेत. मर्दुमीची तारीफ फारशी व सुभेदारी तुमची तुम्हास बाहाल. तुम्ही व राव पंडित प्रधान येकदिल राहोन मुलकाचा बंदोबस्त करणें; त्यासहि आलाहिदा फर्मान रवाना केला आहे याप्रमाणें आम्हास समजाविलें. मग कपितान व रुमीखान ऐसें त्रिवर्ग बैसोन सर्व वर्तमान ध्यानास आणिलें. मग शाहानवाजखान यास बोलाऊन आणून आम्हासी उत्तरें प्रतिउत्तरें जाहालीं. स्वामींनीं ज्याप्रमाणे आज्ञा केली व * * * दिली होती तिचा पारशी मसुदा करून दाखविला. मग त्यांणीं दोन तीन कलमांची रदबदल घातली. त्यांत सरदाराचे गांव मात्र न द्यावे म्हणोन आम्हासी जाबसाल करूं लागले. मग आपण उत्तर दिल्हें कीं या गोष्टीनें परिणाम (शे)वटास जाणार नाहीं. आम्हास आधीं त्या गोष्टीचें अगत्य; (तो) मजकूर होऊन आलियाउपर उभय पक्षीं योग्यता घडेल; त्याजवरून त्यांनीं ते गोष्ट कांहींशी साहालीसी जाहाली. बाकी मुख्य खानदेश व संगमनेर व जुन्नर हे जाहागिरा मुदाबरहुकुम गाजदीखान याचे बरहुकुम सनदा करार केल्या. सरदारांच्या गांवाची मात्र रदबदल आहे तेहि होऊन येईल. बाकी मुदे रकारपूर्वकाचा व तत्वाचा हात व परिछिंन होत नाहीं. करनाटकचा वाजबी चवथाईचा रुपया द्यावासा करार जाहाला. याप्रमाणें करार मदार होऊन कपितान आम्हास आपल्या * * * * घेऊन येऊन स्नेहाचा भाव परस्परें उभयेपक्षीं बोलतां रुमीखान यांणींही स्वामीचा स्नेहाचा व शूरत्वाचा फारसा सांगितला. फिरंगी संतोषांत पावला. कितेक आपलें भाषण रुमीखान यास सांगितलें कीं * * मेस्वर करितों कीं त्याचा आमचा मिलाफ जाहालिया उत्तम गोष्ट आहे. उदयिक शुक्रवारीं प्रहर दिवसास रुमीखान यास घेऊन सेवेसी येतों; सेवेसी आल्यानंतर मुख्याचा व कपितान याचा स्नेहभाव सर्व मजकूर निवेदिला जाईल. आपण बहुत सावधपणें असत जावें. कपितान याजकडील तो निसदेह आपणांस जाहाला आहे; परंतु दुसरेंकडील मोगली मसलत कलत नाहीं; आणि निमित्यास मात्र मी आहे; याजकारितां बहुत सावधपणें राहात जावें. उदयिक नवाबाचें कूच होऊन नारंजानदीवर (?) येथून कोसावरी मुकाम आहे. सेवेसी श्रुत व्हावें याजकरितां लिहिलें आहे हें विज्ञापना.

¶*Nago Ram writes to the Peshwa describing the delight of Salabatjang on receiving the firmans from the Emperor, which he read out to the writer. The Emperor—he adds—bestowed the Subhedari on Salabatjang, and asked him to administer it in consultation with the Peshwa. The writer refers towards the end to some other jagirs and jamidars regarding which the Nizam held a talk with Rumikhan and Bussy.*

3898

No. 87] [12-5-1753 ?

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेबाचे
संनिधानास

सेवक लक्षुमण तिमाजी व वेंकटराव तालुक कृष्णाचार्य वकील चंनापटण कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ताा वैशाख सुाा १० वास्तव्य बंदर चंनापटण साहेबाची कृपा जाणून साहेबी आपलें सांब्राज्यवैभव लेखनाज्ञा केली पाहिजे. यानंतर येथील वर्तमान. नवाब माहंमद आलीखान तधीपासोन चंनापटणासमीपच आहेत. मोहीम आरकाट प्रांतेस निघणेस बरोबर जमाव नाही. खर्चाची सरंजामी नाही. यास्तव नवाब यानी गोरंदुरास अनुसंधान लाविले कीं जाहाजे बंगालेहून जंगी आले आहेत. त्यासमई हजार फिरंगी व खर्चाची मदत करून देणे म्हणजे पाळेगार व फरासीस यांवरी मोहीम करूं म्हणालें. त्यास गोरंदुरानी जवाब दिल्हे कीं पूर्वीपासोन हिसेब करून वसूल बाकी ठराऊन मागील गुंता वारणे म्हणजे अंईदेस येक गोस्टी केली जाईल. सर्वदां याच प्रकारी हिसेब न पाहतां पैके कोठ पावेतो घ्यावे म्हणून या प्रकारीं जबाबस्वाल जाहला. यैस असतां येकायेकीं इंगरेजाची व फरासीसाची लडाई पडली. आगोधर फरासीस यानी पाण्यात बारा १२ जाहजें जंगी तयार करून देवणापटणचा किला घ्यावा म्हणून हे बारा जाहजें बिलंगर+ करून देवणापटणासमीप राहिले. हे वर्तमान इंगरेजास कळून सामानसहित जंगी जाहजें ९ निघालें त्यापैकीं च्यारी जाहजें मागें राहिले. बाकी पांच जाहज आठ मकटसहित (?) देवणापटणासमीप पोहचले. हे जाहजें पाहतांच फरासीसाची बारा जाहजवालेनी लंगर काहडून मावे सरकले. इंगरेजांची पांच जाहजें त्यांचे बारा जाहजावरी नजीक पोहचोन पाण्यावरीच बरी लडाई जाहली. फरासीसाची दोनी जहाजें तोफाचे माराने फुटू(न) तमाम पाणी भरून बुडाले. येक सरदारहि ठार जाहला. बाकी १० दहा जाहजें थरून राहाणेस ताकत न होतां पुलचेरीपावेतो राहिले नाहींत. लडाईचे समईं दिवस चारी घडी बाकी राहिली होती. अणिखी च्यारी घटका दिवस असता म्हणजे फरासीसाचे जाहजें तमाम चंनापटणास धरून आणणेचा योग होता. चुकला. पाण्यात इंग्रजाचा बहुत चमत्कार चालतो. यैसे असतां फरासीसाचे जाहजें पुलचरीस पोहंचल्यानंतर त्यामधील लोक अवघे उतरून खुषकीने दीड हजार फिरंगी व च्यारी हजार बार व तोफा २० व स्वार

+ नांगर टाकून.

होईल. तुम्ही राहणे. यैसे म्हणू लागला. सर्वा गोस्टीची प्रतिकूलता. ते तो आपल्या फिकिरीत आहेत. निरोप तो दईना. म्हणो लागला रामदासपतास आपण बहुत लिहून हायेराण जालो की, श्रीमंत प्रधान पंडित बहुत थोर मनुश आहेत, त्यासी बिगाड न करणे. नाहक बिगाड केला. सेवटी आपण मरून गेला. सलाबतजंगाचे घर बुडाविले. त्यानी गाजुदीखान आणिला. आता कोन्ह्याप्रकारे विवेक होये तर बरे. आपण त्याचे आज्ञेवेगळे नाही. आणीकहि कितीक बोलण चालणे उभयेता स्त्रीपुरुशाचे जाले. आपण उतर दिल्हे की, तो समये गेला. ठिकाणीच ग्रहस्त आसता तर उतर प्रतिउतर होते. परतु त्याचा आग्रह फार. निरोप जाला पाहिजे. तुम्ही भागानगरास जाऊन, मुसे बुसेची भेटी घेऊन मग धण्याकडे जाल तर निरोप देतो. जरूरीस मान्ये. येजमान स्वामीकडे जाऊन मग भागानगरास जाईन म्हटले तर नायेके. तीन दिवस रदबदल पडिली. निरोप देईना. प्रधानपंतास आपण लिहितो. तुम्हावर इतराजी करणार नाहीत. येथे जाहाजात बसून मछलीबंदरावरून भागानगरास जाऊन जाणे. उतर दिल्हे आपण आथवा आमचे वडीलहि बसले नाहीत. जसे तसे मोडिले, परतु स्वामीचे पायाची आण वाहून घेतली. आणिक सफथा उदंड घेतल्या. भागानगरास जाऊन मुसे बुसेस भेटण. ते काये उतर सागतील त्याजप्रमाणे पंडित प्रधान सांगणे. आमचा पांडित प्रधान याचा स्नेह होये ते करणे. जरूरीस मान्ये केले. काही बाकी मुसाफीची राहिली आहे ते पुरती व्हावी आहे. बरोबर त्याची माणसे आहेत. वाटेतूनच परभारे यावे तर स्वामीच्या पायाची शपत घेतली आहे. त्याचे करतुत्व तर कोठे दिसत नाही. परतु बेईमानी आम्हावर ठरावितील. याजकरिता जरीदा भागानगरास जातो. येथून भागानगर नव गावे आहे. आभिप्राव तेथीलहि कलल. होणार ते जाले. पुढेहि होणार ते होईल. सर्वत्र बोली हेच जाली. तमाम लोक म्हणतात की प्रधानपंतासी बिगाड केला. त्याचे फळ हेच की, त्यानी पातशाह यास लिहून पाठविले. होलकर सिंदे यासी लिहून पाठविले. नवाब गाजुदीखानास घेऊन आले. त्या प्रांतीचे वर्तमान तमाम मनास आणिले आहे. येतेवेळी आरणी, वेलूरचे किलेदार मूर्तजाखान व सातगडचे किलेदार हिरासदनखान याशी भेटी जाली. तेथून कडपेयासी आलो. उभयेता पटाणाची गोस्टीमात आभिप्राव कलला. राजश्री श्रीपतराऊ विठल याची भेटी जाली. वर्तमान कलले. कर्नोलावरून मार्गेच. तेथे मुजफरखान याची भेटी जाली. तेथीलहि आभिप्राव सर्व कलला. त्याचे वकील गोपीनाथपंत त्याची पत्रे व सरकारचा आवघा आभिप्राव सागितला. कितीक बोलणे आहे ते सत्वरच सेवेसी येतो; विनती करणे लागते. वकिलानी

मुजफरखानास लिहिले आहे की, श्रीमंतानी खर्चास देतो म्हणऊन कबूल केले आहे. मतालबहि नवाब गाजुदीखास लिहून पाठविले आहेत. होलकरासहि लिहिले आहेत. लवकरीच करून पाठवितो ; म्हणऊन लिहीले आहे. ते सर्व त्यानी सागितले. बजिनस पत्रेच दाखविले. त्याचा निरोप घेऊन गदवालास आलो. मार्गेच गदवालावरून. रामराऊ गदवालकर याची भेटी जाली. हे आवघे स्वामीच्या पायासी रुजू आहेत. परतु मजला सेवेसी येऊ देणे. मुजफरखानाचे भाऊ धाकटा हसनुदीखान देवनापटणास त्रिचनापलीहून गेला आहे. तो त्याचे आटकेत आहेत. कलले पाहिजे. फुलचरीकराची माणसे गुप्तरूपे आतेस्ते चेनापटणास जातात. त्याचीहि येतात. काये विचार तो कोणास कलत नाही. कितीक गोष्टी या दिवसात साधल्या पाहिजेत. समये हाच आहे. सर्व लोक पालेकर वगैरे स्वामीचे लगामी लागणार आहेत. परतु त्याचे विचार वेगले आहेत. ते काही कागदीपत्री लिहीता येत नाहीत. गड्यानें गडी साधून करनाटक आपले करावे. समये हाच आहे. कडपेकरावर सिबंदीकरानी फार दंगा केला. आबरू काही ठेविली नाही. सेवटी घरात भावाबंदात भेदभाद करून, जमातदार फोडून त्याचा जीवघात करावा, दुसरियासी उभे करावा, यैसा विचार जाणऊन तो रात्री पळाला. तो कसबे माहाल प्रात कर्नोल ते ठाणे मुनवरखान बिरादर हिमतबाहादरखान याचे हाती आहे. तेथे येऊन गढीत लपाला. पाच सात दिवस ठिकाणच लागना. परतु मुनवरखानास ठाऊक होते. हायेगणपलीच्या किलियासी जाऊन वेढा घातला होता. तेथेच खेळ रचिला. मग मुनवरखान दरमियान पडिला. चौथाई तलब सोडावी. जे लोक ठेवणे ते ठेवीन. दूर करणें ते करीन. हाजिरी गैरहाजीर पाहीन. स्वार जमातदारानी लिहवावे, आणि पुढें दाखलादुखला काही नाही. त्याजप्रमाणे डक (?) भरून द्यावा. जातीचा कारभार. कोन्ही कोणास मानीत नाहीत. त्याजमुले त्याची फौज कितीक उठून कडपियासी गेले. फौजचा कारभार विस्कलित जाला आहे. सिराले कसबा नबलीयाहून पाच कोस कडपियाचे वाटेत आहे. तेथे फौज उतरली आहे. लोक उपासी मरतात. उठून जातात. मातबर आहेत ते सिरालीजवल उतरले आहेत. तेहि ठाणे मुनवरखानाचे आहे. आबदूल नबीखान यासी मुनवरखान बोलीचाली करून जमातदाराकडे येत होता. त्यास वर्तमान कलले की तमाम पठाण जमातदार यानी विचार केला की, मुनवरखान याच्या गला पडावे की, पलविलेहि याने आणि आपल्या गढीत ठेविले आहे, आणि आपणच मध्यस्ती करितो. यैसे वर्तमान कळून सिरालीयाचे गढीत येऊन मुनवरखान दोप्रहरारात्रीं येऊन राहिला. ठाणे त्याचेच आहे. दरवाजियावर

मजबुती केली. लस्करात न गेला. येक येक जमातदार बोलाऊन बोलीचाली करितो. यैसे वर्तमान येथील. खुद त्याचेहि सिबदीचा हाच कजिया. उपासी मरतात. दंगा करितात. ताल कोठे राहिला नाही. मुसे बुसेकडून येक हाती गोरदो यानी देविला आहे. तोहि त्याने दिल्हा तर घेऊन येतो. आले ते काशास टाकावे. तमाम करनाटकचा विचार मनास आणिला आहे. सत्वर सेवेसी येतो. जयेराम सदासिव हुसेन दोस्तखानापासी होते त्यास सोडले तेव्हा बरोबर गेले होते. च्यार पाच वरसे त्या प्रांते होते. मातबर आहेत. वाकीफ मनसुबेबाज आहेत. तेहि बरोबर आहेत. सेवेसी येतात. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ती.

¶*Shamrao Yadav to the Peshwa giving news from Karnatak: the arrival of a fresh contingent of French soldiers, the constant correspondence which the French carried on with Salabatjang, the differences that had arisen between Mohammad Ali and Murarrao over the payment of tribute and the possession of the fort of Trichinopoly, Muhammad Ali proposing to the English to lead an attack on Pondicherry and the English refusing help; a skirmish between Muhammad Ali and the French at Gingee, the successes attained by Clive over the French and his subsequent elevation in the service, the French Governor finding fault with Ramdaspant for creating ill-will towards the Peshwa and the standing discord between the several petty states in the Karnatak are the main items mentioned in this letter.*

No. 85] *[Received on 17-10-1752—written in August.*

पौ छ ९ माहे जिल्हेज सुा
सलास खमसैन मयां व
अलफ अश्विन शुध विज-
येया दसमी

श्रीसुबराज

श्रीमन्माहा मातुश्री आईसाहेब
साहेबाचे सेवेसी

सेवक मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब कृतानेक शेवेसी विज्ञापना विनंती. येथील क्षेम ताा श्रावण वदी पावेतो साहेबाचे कृपाकटाक्षे-कडोन सेवकाचें व सेनेचे वर्तमान येथास्थित असे विशेष. वाा राजश्री जीवणभटबावा व राजश्री जिवाजीपंत यानी साहेबाच्या कृपा अंत:करणाचा आशय विस्तारेकडोन लिहिल्यावरून, परम संतोश जाहाला. अशास पूर्वीपासोन या घराणियावर कृपा करून वडीलवडिलादारभ्य सेवा घेऊन, उर्जित करीत

आलां. पुढेहि ममतायुक्त सेवकाचे हातून सेवा घेऊन, चालवणार साहेब धणी समर्थ आहां. तिरचनापली व चंदावर देवब्राह्मणांचे राज्य, यास चंदाखानानें उपद्रव केल्याकरितां सेवकानें पटणकर व नवाब महंमदआलीखान यास सामील करून घेऊन, चंदाखानासी युध्यप्रसंग केल्यास, साहेबाचे पुण्यप्रभावेंकडोन पातशाःजादेप्रमाणें चंदाची दौलत होती. दौलतसहित अमित्र हतप्रभ जाहाला. साहेबांस येश येऊन देवब्राह्मणराज्यास निरोपद्रव जाला. याउपरी इकडे गुंता नाहीं. इतःपर साहेबाच्या दर्शनास येऊन, दर्शन घेऊन, सेवा करून दाखऊन, उर्जित करून घ्यावें हाच आहिर्णीसी ध्यास लागला आहे. तदनरूप अविलंबेच येत आहो. मुख्य गोष्टी हे दौलत वोढीस पडोन, कसालियाखालें आली आहे. दौलतचा व सेवकाचा उधार करून, कृपा करणार साहेब धणी मायेबाप असां. वरकड कितेक अर्थ उभयेता माारनिलेस लिहिला आहे, ते विनंती करितील; तदनसार समर्पक करून सेवकास आज्ञापत्र सादर करावया धणी आसा. सेवेसी स्रुत होय. मुख्य विचार सेवकावरी दया करून, सेवा घेणार साहेब समर्थ आहेत. हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade to Tarabai announcing his victory over Chandasaheb.*

No. 86] *[16-11-1752*

छ १० मोहरम

श्री

सेवेसी आज्ञाधारक नागोराम चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. सेवकाचें वर्तमान छ ९ रोज गुरुवार दीडप्रहर रात्र स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालो ते ती घटका रात्रीस लष्करदाखल जाहालो. लष्करांत येताच परभारेंच नवाबाच्या डेरियास गेलो. राजश्री परशराम माहादेव याची मुलाजमत करविली. आपला स्नेह होणार म्हणोन आम्ही आल्या आगोधरच त्यास त्याचे बातमीबद्दल वर्तमान आलें. दुसरें पातशाही फरमान आला याजमुलें नवाब आपले जागां बहुत आनंदात होते, त्यामुले लोकाही नजरा दाखविल्या, ते समयीं आपणहि रुपये ५ नजर केले; ते समयीं शाहानवाजखान व मुसाभुसी व मुस्तेदखान त्रिवर्ग जवल होते. रुमीखान यांणीं वर्तमान निवेदन करावें तों नवाबांनी आपले फरमानीयाचे हर्षाचे वर्तमान सांगो लागले. आम्ही (मुबारेख[१])

---

१ शुभ.

म्हणोन उत्तर दिलें. त्यांजवर मुस्तेदखान यास मुख्यांनीं आज्ञा केली कीं नागोराव यास परवाना वाचून दाखवणें. मग परवाना वाचतेसमयीं नवाब आपलें स्वमुखें सांगेत. मर्दुमीची तारीफ फारशी व सुभेदारी तुमची तुम्हास बाहाल. तुम्ही व राव पंडित प्रधान येकादिल राहोन मुलकाचा बंदोबस्त करणें; त्यासहि आलाहिदा फर्मान रवाना केला आहे याप्रमाणें आम्हास समजाविलें. मग कपितान व रुमीखान ऐसें त्रिवर्ग बैसोन सर्व वर्तमान ध्यानास आणिलें. मग शाहानवाजखान यास बोलाऊन आणून आम्हासी उत्तरें प्रतिउत्तरें जाहालीं. स्वामींनीं ज्याप्रमाणे आज्ञा केली व * * * दिली होती तिचा पारशी मसुदा करून दाखविला. मग त्यांणीं दोन तीन कलमांची रदबदल घातली. त्यांत सरदाराचे गांव मात्र न द्यावे म्हणोन आम्हासी जाबसाल करूं लागले. मग आपण उत्तर दिल्हें कीं या गोष्टीनें परिणाम (शे)वटास जाणार नाहीं. आम्हास आधीं त्या गोष्टीचें अगत्य; (तो) मजकूर होऊन आलियाउपर उभय पक्षीं योग्यता घडेल; त्याजवरून त्यांनीं ते गोष्ट कांहींशी साहालीसी जाहाली. बाकी मुख्य खानदेश व संगमनेर व जुन्नर हे जाहागिरा मुदाबरहुकुम गाजदीखान याचे बरहुकुम सनदा करार केल्या. सरदारांच्या गांवाची मात्र रदबदल आहे तेहि होऊन येईल. बाकी मुदे रकारपूर्वकाचा व तत्वाचा हात व परिछिंन होत नाहीं. करनाटकचा वाजबी चवथाईचा रुपया द्यावासा करार जाहाला. याप्रमाणें करार मदार होऊन कपितान आम्हास आपल्या * * * * घेऊन येऊन स्नेहाचा भाव परस्परें उभयेपक्षीं बोलतां रुमीखान यांणींही स्वामीचा स्नेहाचा व शूरत्वाचा फारसा सांगितला. फिरंगी संतोषांत पावला. कितेक आपलें भाषण रुमीखान यास सांगितलें कीं * * मेस्वर करितों कीं त्याचा आमचा मिलाफ जाहालिया उत्तम गोष्ट आहे. उदयिक शुक्रवारीं प्रहर दिवसास. रुमीखान यास घेऊन सेवेसी येतों; सेवेसी आल्यानंतर मुख्याचा व कपितान याचा स्नेहभाव सर्व मजकूर निवेदिला जाईल. आपण बहुत सावधपणें असत जावें. कपितान याजकडील तो निसदेह आपणांस जाहाला आहे; परंतु दुसरेंकडील मोगली मसलत कलत नाहीं; आणि निमित्यास मात्र मी आहे; याजकारितां बहुत सावधपणें राहात जावें. उदयिक नवाबाचें कूच होऊन नारंजानदीवर (?) येथून कोसावरी मुकाम आहे. सेवेसी श्रुत व्हावें याजकारितां लिहिलें आहे हें विज्ञापना.

¶*Nago Ram writes to the Peshwa describing the delight of Salabatjang on receiving the firmans from the Emperor, which he read out to the writer. The Emperor—he adds—bestowed the Subhedari on Salabatjang, and asked him to administer it in consultation with the Peshwa. The writer refers towards the end to some other jagirs and jamidars regarding which the Nizam held a talk with Rumikhan and Bussy.*

No. 87] [12-5-1753 ?

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेबाचे
संनिधानास

सेवक लक्षुमण तिमाजी व वेंकटराव तालुक कृष्णाचार्य वकील चंनापटण कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ताा वैशाख सुाा १० वास्तव्य बंदर चंनापटण साहेबाची कृपा जाणून साहेबी आपलें सांब्राज्यवैभव लेखनाज्ञा केली पाहिजे. यानंतर येथील वर्तमान. नवाब माहंमद आलीखान तधीपासोन चंनापटणासमीपच आहेत. मोहीम आरकाट प्रांतेस निघणेस बरोबर जमाव नाही. खर्चाची सरंजामी नाही. यास्तव नवाब यानी गोरंदुरास अनुसंधान लाविले कीं जाहाजे बंगालेहून जंगी आले आहेत. त्यासमई हजार फिरंगी व खर्चाची मदत करून देणे म्हणजे पाळेगार व फरासीस यांवरी मोहीम करूं म्हणालें. त्यास गोरंदुरानी जवाब दिल्हे कीं पूर्वीपासोन हिसेब करून वसूल बाकी ठराऊन माघील गुंता वारणे म्हणजे अईदेस येक गोस्टी केली जाईल. सर्वदां याच प्रकारी हिसेब न पाहतां पैके कोठ पावेतो घ्यावे म्हणून या प्रकारीं जबाबस्वाल जाहला. यैस असतां येकायेकीं इंगरेजाची व फरासीसाची लडाई पडली. आगोधर फरासीस यानी पाण्यात बारा १२ जाहजें जंगी तयार करून देवणापटणचा किला घ्यावा म्हणून हे बारा जाहजें बिलंगर+ करून देवणापटणा-समीप राहिले. हे वर्तमान इंगरेजास कळून सामानसहित जंगी जाहजें ९ निघालें त्यापैकीं च्यारी जाहजें मागें राहिले. बाकी पांच जाहज आठ मकटसहित (?) देवणापटणासमीप पोहचले. हे जाहजें पाहतांच फरासीसाची बारा जाहजवालेनी लंगर काहडून माघे सरकले. इंगरेजांची पांच जाहजें त्यांचे बारा जाहजावरी नजीक पोहचोन पाण्यावरीच बरी लडाई जाहली. फरासीसाची दोनी जहाजें तोफाचे माराने फुटू(न) तमाम पाणी भरून बुडाले. येक सरदारहि ठार जाहला. बाकी १० दहा जाहजें थरून राहाणेस ताकत न होतां पुलचेरीपावेतो राहिले नाहींत. लडाईचे समई दिवस चारी घडी बाकी राहिली होती. अणिखी च्यारी घटका दिवस असता म्हणजे फरासीसाचे जाहजें तमाम चंनापटणास धरून आणणेचा योग होता. चुकला. पाण्यात इंग्रजाचा बहुत चमत्कार चालतो. यैसे असतां फरासीसाचे जाहजें पुलचरीस पोहंचल्यानंतर त्यामधील लोक अवघे उतरून खुषकीने दीड हजार फिरंगी व च्यारी हजार बार व तोफा २० व स्वार

+ नांगर टाकून.

२०० याप्रकारीं येऊन देवणापटणास मोहसरा देऊन मोर्चे लाविले आहेत. गुडलुरांत इंगरेजाचें ठाणा होता तो वलंदीवालेस इंग्रेजानी दिल्हे तेथें वलंदीवालेचा निशान ठाणा आहे, यास्तव फरासीसानी आपणाकडूनहि तें जागा वलंदीवालेस दिल्हे. पुढें देवणापटणावरीच शाहा पडून मोर्चे लाविले आहेत. यैस असतां आठ रोजाखाले देवणापटणचे किलेंतील लोक निघून मोर्चेवरी पडोन पंनासजण फिरंगीस ठार मारिले व कितेक बारहि मारले गेले. इतकेंत फरासीसाकडील सरदारास खबर कळून कुमक करितांच इंगरेजाचे लोक परतून किलादाखल जाले. परंतु फरासिसाचें जमाव फार आहे. इंगरेजाची कुमकहि पोहचत नाही. फरासीस देवपटणचे किलेवालेस सांगून पाठविले कीं आमचा जमाव बहुत आहे, तुम्हाकडून ज़ुज निर्व्हा होणार नाही. किला सोडून निघून जाणे, म्हणून सांगून पाठविले. त्यास तेथील कपितानाने त्यासी पांच दिवसाचा वाईदा करून येथें चंनापटणास गोरंदुरास लिहिला. त्यास गोरंदुरानी जवाब लिहीले कीं कुमक पाठऊन देतो. हिमत न टाकितां धीर धरून किलेंत राहणें, म्हणून जवाब लिहिला. कुमक अद्याप पोहचला नाही. किला अमाळसें जेर जाहला आहे. यास गोरंदूर आम्हास म्हणूं लागले की पूर्वींपासोनं आम्ही श्रीमंतासी व राजश्री रावसाहेबासीं येखलासी केल्यास या समयास कुमक केली पाहिजे. रावसाहेबी सर्वदां काळे माणसावरीच मोहीम करितात, परंतु गोरे माणसाची तंबी करून त्याकडून यैवज घेत नाहीत, यासमई खामखा त्यानी कुमक केलियां मामला बंदोबस्त होऊन येईल म्हणून गोरंदूर म्हणू लागले. त्यास आम्ही जवाब दिल्हे कीं गोस्टीने फौजा येणार नाहीत. नजरन्याज मातबर व सिपाई लोकांचा खर्चाचे येक तह करून लिहून पाठविलिया फौज येऊन फरासिसाचे तंबी करून तुमचा मामलाहि बंदोबस्त करून देतील म्हणून जवाब दिल्हें. हाली गोरंदूर यांचे पत्र थैली येक पाठविलें असें. त्यांनीं थैली आम्हाकड देऊन आठ दहा दिवस जाहाले. आचार्य यानी निवर्तले कारितां येकास येक पाठवणेस जाहालें नाहीं. अतां मुजरद जोडी सटवाजी व नरसिंगभाज कासद यासमागमें देऊन पाठविलें असें. चितास आणून जवाब निरोपिले पाहिजे. तिरपतीचें वर्तमान राघवाचारी व रो बाळकृष्णशास्त्री हे कितेक फौज जमा करून तिरपती ठाणा बसवावें म्हणून तजवीज करून गोविंदराज पटणासमीप उतरले असतां तिरपती श्रीनिवासाचारीने तीनीसेहे बार व कर्नाटकी प्यादे पांच सातसे हें जमाव करून लडाईस गेला. त्यांचे व यांचे ज़ुज होऊन राघवाचारी मारले गेले. रो शास्त्रीबावा पलाकड निघून गेले. या प्रकारीं नवाबजीचेथें वर्तमान आला. या विचारास गोरंदूर म्हणूं लागले कीं, आम्ही राजश्री रावसाहेबाचे स्नेहे संपादून साल्हासाल चौथाईची मामलत करीत जातों.

मध्यें या प्रकारीं किरकूळ उपद्रव करणेचा निमित्य काये? त्यास आम्ही जबाब दिल्हें कीं जेथपावेतो पुण्यक्षेत्र देवाब्रांम्हणाचीं स्थळें असतील तें सर्वांही उत्धार व परिपाळ करणेस्तव श्रीमंत साहेबीं अवतार केला आहे. या गोस्टीचा खेद न मानणें म्हणून जवाब दिल्हे; व नवाबहि याच प्रकारीं म्हणूं लागले. तो मजकूर सर्वांही रो अपाजी जिवाजी यानी लिहिले आहेत त्यावरून विदित होईल. आजीचें रोजी रो मुरारीराऊ घोरपडे ममलकतमदार यांकडील जोडी गोरंदुराचे नावीं कागद घेऊन आले, त्याचें मतलव काही कळले नाहीं तेही मनास आणून सेवेसी लिहून पाठवीत असों. विदित होये. वेदशास्त्रसंपन कृष्णाचार्य यांचे मजकूर प्रत्येक पुर्वणी विनंती लिहिली असे. अम्ही साहेबांचे म्हणऊन चनापटणांत राखून असों. पुढें अम्हास काये आज्ञा ते निरोपिलें पाहिजे. रो आनंदराऊ कैवारकर यांसमागमे सुलतानी बनात ताके २ व मखमल गज १३ व बागड कोटंबास व पसेटचिं नजर बा दुरंगी पिवळे तांबड्या रंगाची बनात उतम गज ३ व सुजनी १ याप्रकारें पाठविलें होतें, ते साहेबाचे संनिधिस पावलें अद्याप न पावलें कळत नाहीं. पावले असलियां जवाब निरोपिलें पाहिजे. साहेबी आपशानी कागद पाठवणे म्हणून निरोपिलें होतें. येथें तलाष केलें मिळत नाहीं. तलाष करून पाठऊन देत असों. पिस्तोल पूर्वी पाठविलें होतें आणिखी पाहिजे असलियां खरिदी करून पाठवीत असों. मागें अमृतरावजीकड च्यारी वडियालें पाठविलीं होती संनिधीस पावले न पावले कळत नाहीं. अणीक पाहिजे असलियां पाठऊन देऊं. अतां बंगालाहून नवे तोफ वगैरे जिनस बहुत आले आहेत. परंतु माहाग फार; काहीं जिनस पाहिजे असलियां संनिधीस पाठवीत असों. हे वर्तमान सर्वांही चितास आणून पुढे आम्हास काय आज्ञां ते निरोपिलें पाहिजे. अभिज्ञाप्रति बहुत लिहिणे शक्त नव्हे. कृपा करावी हे विनंती.

¶*News-letter from Madras. The letter speaks of a sea-fight between the English and the French in which the latter were worsted.*

No. 88] [*1753?*

हे गोष्टी तुमच्या स्नेहापासोन दूर आहेत. जैशा येकनिष्टतेच्या गोष्टी बोलतां तैसी वर्तणूक केली नाहीं. तुमच्या पूर्वस्नेहावर दृष्ट देऊंन फौज इकडें न पाठविली. तुमचा विचार ध्यानास आणायास्तव मजला आधीं तुम्हाकडें पाठविलें. आतां तीन साला मामलत विले लाऊन माझी रवाणगी केलिया उतम. नाही तर

आम्हावर शब्द नाहीं. पुढें फौज येईल मुलक खराब होईल. यैशा कितीक प्रकारें साहेबाची सल्लाबंत व दाब दाखऊन जवाबस्वाल केला व साहेबाची मुखोत्तिरशब्दरत्नें हृदयपेटींत निक्षेपिली होतीं तें खानाचें कर्णारूढ[1] करून भूषणार्थ केली. सर्व गोष्टी यैकोन उतर दिल्हें कीं आम्ही आतां त्याच तजविजींत आहों. सत्वरीच तुमची रवाणंगी करितों. खा(तरजमा)असों देणें. पठाणी दरबार, बोलण्याचे (फार, करण्याचे) मानसिक[2] आहे, पुढें प्रसंगानसार रूपास येईल ते खरे. त्या उपरी पटियाँ[3] देऊन आम्हास निरोप दिल्हा. थैली[4] व वस्त्रें आबदुलमजीदखान दरबार करून बसले होते तेथें येऊन त्यांस दिल्ही. पत्र वाचून पाहिलें व वस्त्रेंहि सोडून पाहिलीं व बोलले कीं ज्याप्रमाणें आमच्या वडिलांही तुम्हासी जवाबस्वाल केला त्याचप्रमाणें सत्वरीच तुमची रवाणगी करितो. त्या उपरी त्यांचाहि निरोप घेऊन ब्रिन्हाडास आलो. परस्तुत चार हजार फौज चाकर आहे. त्यात दोन हजार फौज निसबत सिलेमखान कारभारी. ते खाऊनपिऊन खुशाल घरचे दुरे (?) आहेत. बाकी दोंन हजार हजुरात[5] खानाकडील. ते लोक भुमे[6] खराब आहेत. तिसाला तलब[7] सरकारांत चढली आहे. त्याचा निकाल यैसा जाला कीं चौथाई तलब लोकांही सूट द्यावी. बाकी तलब राहिली ते दोन सालांत मुलकावर तनखा करून द्यावी यैसा तह[8] जाला आहे. सिधोटेंत पहिल्यापासोंन आबदुलमजीदखानाचा अमल आहे. त्याच्या परवानगीखेरीज मणुश किल्यात येत जात नाहीं. खानावरहि त्याची चौकी. घडिघडि क्षणंक्षणची बातनीं राखीत आहेत. यैसी खबरदारी आहे. पठाणांचा कुल मुल्क बावीस लक्ष रुपयाचा. पांच सरकारा. सरकार गुती व खमम व गुरंकुंडा व गंजीकोटा व सिधोट यैशा पाच सरकारा. मिळून बावीस लक्षाची तनखा आहे. त्यापैकी पाळेगराखाले[9] दाहा लक्षाचा मुलक आहे व बारा लक्षाचा खानांचे कमायेशींत आहे. कुल पाळेगरसुधा बारा लक्ष वसूल होत आहेत. परंतु अमलाची * * * याकरिता पालेगर करारवाकई[10] पैसा देत नाहीत, बल्के[11] जबरदस्तीनें खानांचा मुलक व ठाणीं हिरूण घेतात. गुतियाचे ठाणे व मुलक असता जबरदस्तीनें मुरारराव घोरपडे यांहीं ठाणें हिरून घेतलें. आधीं मुरारराव याहीं महमदआलीखानासी स्नेह करून दोन लक्ष रुा त्यापासोन घेतले व फुलचरीकर फिरंगी यांचे पारपत्य करितों म्हणौन फुलचरीस गेले व

१ कान उपटले. २ अल्प; जवळजवळ नाहींच. ३ विडे.
४ लखोटा पत्राचा. ५ हुजरात, खाशी फौज. ६ लुटारा; लुगारू; पेंढारवजा.
७ पगार; बाकी. ८ ठराव. ९ जहागिरदार संस्थानिकासारखा कर्नाटकांतील एक वर्ग.
१० घडल्याप्रमाणें; बरोबर; अचूक. ११ बल्के = किंबहुना.

3902

त्यांचा मुलक खराब केल्यानंतर फिरंगियाही मुराररायांसी स्नेह केला. तेव्हां त्यांतच मिळून महमदअलीखानांस बुडवितों म्हणून दोन लक्ष रुपये द्यावयाचा तह केला. येक लक्ष रुा फिरंगियाही नगद दिल्हे, बाकी लक्ष रुा कार्यसिधि जाल्याउपरी देऊं म्हणून करार केला. त्यावरून मुरारराव सात हजार फौजेनसा फुलचरीचे फिरंगियास समागमे घेऊन अरकाटेवर आले. तेथें महमदअलीखानांचे ठाणे व देवनापटणचे फिरंगी होते त्यासी व मुरारराव फुलचरीकर फिरंगी समागमे होते त्यासी युध्यप्रसंग जाला. मुराररायाचा मोड जाला. पळून गेले. म्हणून येथे वार्ता आहे. महमदअलीखानहि आपल्या फौजेनसी बाहेर निघाले आहेत. नवाब सलाबतजंग यांच्या शैन्याहून काली आमचे वकिलाचे पत्र आले कीं शेख अलीखान जुनेदिन नवाबाची मातुश्री अवरंगाबादेस होती तिजला आज्ञेप्रमाणें समागमे घेऊन येऊ लशकर दाखल जाले. लषकरचा मुकाम राजूर नजीक निरमल येथें मुकाम आहे. निरमलकराचा मुकर्दमा[1] फैसल[2] जाल्यानंतर भागानगरप्रांती जाणार यैसा मजकूर लिहिला होता. काली रात्री खानाकडील जासूदजोडी साहेबाच्या शैन्यातून बातनी घेऊन आली कीं रायेदुर्गची खंडणी पंचेवीस लक्ष रुपये मुकरार करून पुढे चित्रदुर्ग व सिऱ्याकडे श्रीरंगपटणचे रुखें लशकर गेलें. पूर्वी हुनूरप्रांती शमशेरबाहादुर वगैरे फौज आली होती तेव्हा पठाणांहीं बहुतसी सलाबत[3] मानली होती. हे लोक काबूची[4], जैसा शहचा रोख पाहातात तैसा जवाब स्वाल करितात. दाहा हजार फौज मातबर सरदार उगाच या प्रांती चालीपनास कोसी शह असता तर येथील पालेगर लाखो रुपये देत यैसी संस्थानें आहेत. साहेबाचा पुण्येप्रतापकटाक्ष थोर आहे. येथामतिप्रमाणें जवाबस्वाल करून सत्वरीच येथील वकील समागमें घेऊन येतो. खानाचे दिवाण, नांवाचे त्रिमलराव नामे पणतू अंतो साबाजीचे आहेत. कुलकारबारी सिलेमखान व बाकरअलीखान आहेत. आम्हीं त्यांच्याच विद्यमानें आपला जवाबस्वाल करितों. येथील निरखवजन पके दर रुपयास हरभरे पंधरा सेर व कुलथी वीस सेर व तूप तीन सेर, गुळ सा सेर, मीठ वीस सेर, गहू पाच सेर, जोरी बाजरी वीस सेर, या प्रमाणें निरख आहे. परंतु चाऱ्याची बहुत कमती आहे. पावल्यास गवताचा भारा यैसा मिलतो कीं येक्या घोडियाचे पोट न भरे. अबदुलमजीदखानास सरदारी दिल्ही म्हणून सरवरखाननामे खानाचे पालकपुत्र[5] व गनिमियाखानाचे पुत्र जे कडपियात आहेत, याणी तेथील बंदोबस्ती करून

---

१ प्रकरण. २ निकाल. ३ जरब खाली.
४ लुच्चे; फसवे. ५ मानीव.

आपल्या जागा खबरदार आहेत. येथे जवाबस्वालाची गोष्ट येकावर येक झोकितात. घरचा फिसाद येकाच्या गोष्टीत येक नाहीत. आजी आम्ही जवाबस्वालाची बहुतसी निकड केली कीं आमच्या खाविंदाचा हुकूम दोन रोजाहून ज्यादा राहायाचा नाहीं. त्यास च्यार रोज आम्हीं तुमची वाट पाहीली. उदईक हरगीज[1] आम्हीं राहात नाहीं. त्यावरून बाकरआलीखां कारबारी म्हणूं लागले कीं च्यार गोष्टी नवाबास समजाऊन सागतो. जलदी न करणे परंतु हे लोक काबूची. याच्या बोलण्याचा इतबार नाहीं. नाक धरावे तेव्हा तोंड पसरितात. वकील समागमे देऊन सत्वरीच रवाणगी करितो यैसे बोलतात श्रीनिवासराव नामे वकीलहि समागमे देयास नेमिला आहे. जे काही बोलतात त्याची पैरवी[2] करीत नाहीत, यावरून इतबार येत नाहीं. साहेबाचा पुण्यप्रताप थोर. सत्वरीच सेवेसी येऊन सविस्तर वर्तमान विनंति करितों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter to the Peshwa from his Vakil with the Nawab of Karnool. The paper contains two sheets, Nos. 3 and 4 ; the first two are missing.*

No. 89] [*Just after 30-5-1753?*

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेबाचे संनिधिस

सेवक लक्षुमण तिमाजी व वेंकटराव मोकाम बंदर चंनापटण तालुक[3] कृष्णाचार्य कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती उपरी. वेदशास्त्रसंपन कृष्णाचार्य यानी अमृतरावजीकड जाणेस्तव व फळशोभनास्तव चनापटणाहून जाताना नवाबसाहेब व गोरंदूर यांकडील जवाबस्वालास्तव अम्हास चंनापटणांत ठेऊन आपण तिकड गेले. फळशोभन जाहल्या आठवे दिवसीच उभयेतासहि येकच मुहूर्ती हिंवज्वर आला तोच पंधरा दिवसाने बाईको निवर्तली. तदनंतर आचार्य यांसहि शरीरास स्वस्त नसतां आरकाटासी आले. तेथोन कंचीस आले. कंचित उखद पथ्य जे काये करणेचें केलें. परंतु रोग प्रबळ होऊन आरोग्य न होता चैत्र बहुळ १२ दिवसीं देवज्ञा जाहले. आचार्य यांचे चिती होतें जे लस्करासी येऊन साहेबासीं भेटून पुढें काहीं उमदा मनसुबा करावा म्हणून होता.

---

१ बिलकूल. २ व्यवस्था. ३ दिमत.

दुसरें साहेबाची कृपाहि पूर्ण संपादिली होती. आयुष्यमर्यादा व सत्य संकल्प याप्रकारी असतां आम्हाकडून काये होऊ सकल ? आचार्य यानी चंनापटणाहून गेले तागाईत च्यारी महिनेपासोन येथील जवाबस्वालास आम्ही असों परंतु अचार्य यांचा बहुत काही भरवसा धरून बहुत दिवसापासोन समागमीं होतों. त्यानी सर्वासहि दगा देऊन गेले. येथें साहुकाराकड कर्जवाम फार आहे. सरकारची जिनस व हती वगैरे सुदसहीत साडे पंधरा हजार रुपये होतात, यासिवायें त्यांची खासगत कर्ज दीड दोनी हजार रुपये पावेतो आहे. याचा हिसेब साद्यंत रा अपाजी जिवाजी यांकड दिली असे. त्यानी साहेबास लिहितील. हे कर्ज अगदी चंनापटणांत बागडकोट बसवद सेटी म्हणून साहुकार मातबर त्याचे गुजारतीने केली असें. या यैवजास अमृतरावजी असतां दोंम राजपाळेची तर्फरीक[1] पंधरा हजार रुपये देविले होते, व साहेबाचे पत्रेंहि याच प्रकारी अचार्य यांची नावची आली होती. दोंमराजपाळेवालेनी अद्याप पैक्याचा मार्ग काहीच केलें नाही. रा अपाजीपंत आलेवरीहिं नवाब यांची ताकीद पाठऊन प्रयेत्न केला असत. परंतु यैवजाचा मार्गच दिसत नाही. साहुकारांचा तगादा बहुत जाहला आहे. आचार्य यांनी साहेबास सर्व विषंई पातेजून या स्छलीं राहिल्यास कर्जाकडून मुक्त करावें. आचार्य यानी चेंनापटणास आले तागाईत यानी खर्चास कपर्दिक दिल्हे नाहीत, यास्तव हजार दीड हजार रुपये कर्ज खाऊन आज्ञानसार येथें राहून होते. सरकार तालुकचा कर्ज बहुत आहे. यास नवाब यास व रा आपाजीपंतास कोणे प्रकारीं ल्याहावें ते जोर ताकीद लिहून यैवज पावेसें आज्ञा करणेस साहेब समर्थ आहेत. आम्ही उभयेता सर्व प्रकारी साहेबाचे चरण पातेजून चंनापटणांतच गोरंदुराजवली राहून यांकडील जवाबस्वाल वरचेवरी पाठवीत असों. आम्हासमीप जासूदजोड्या दोनीच्यारी आहेत. फिरंग्या कडून खर्चास पावत नाहीं. सर्वासहि साहेब खावंद आहेत. आज्ञानसार वर्तणूक करूं. आतां रा आपाजी जिवाजीहीं पत्र लिहीले आहेत, त्यावरोन सर्वहि विदित होईल. इकडील सर्वहि वर्तमान सटवाजी जबानी श्रुत करितां चितास येईल. सर्वज्ञाप्रति बहुत लिहीणे शक्त नव्हे. कृपा करावी हे विनंती.

¶Lakshman Timaji and Vyankatrao to the Peshwa, communicating the death of Krishnacharya who was the Peshwa's agent at Madras and the news of his having left behind huge debts. The writers urge that their wages be paid.

---

१ वांटणी.

No. 90] [22-1-1753

१

श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शामराऊ यादव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील क्षम ता॥ पौशे वद्ये त्रितीया सह चतुर्थी इंदुवासरे मु॥ घाट कडपनाथ नजीक सातगडी येथास्थित जाणऊन कृपापत्री सनाथ केले पाहिजे विशेश. स्वामीची आज्ञा मार्गेस्वर वद्ये १० मंदवासरे तें रोजी घेऊन मंतगिरी किलियापासी राहिलो. दुसरे दिवसी पुरत्या मजली करीत गदवलावरून आलपुरापासी तुंगभद्रा उतरून कडपियातून मुां मजकुरास पावलो. येथून ६ रोजी फुलचेरीस जाऊन पोहचतों. गोरंदोराचे हरकारे स्वामीकडे त्यानी पाठविले ते येथे भेटले. स्वामीस पत्रे उभयेता स्त्रीपुरुशानी लिहिली आहेत. मजलाहि लिहिले आहे; आपण श्रीमंतासी श्नेह केला आहे तो आक्रुत्रिम केला. पहिले रामदासपंताच्यामुले काये आंतर पडिले आसल ते खरें; आतां दुसरी गोस्टी होणे नाही. तुम्हीहि राऊ प्रधान त्यासी विनंती करणे. त्यास वर्तमान कोण्हे सांगितले आहे कीं महमद आलीखानाची (सा) हेता करून त्याचा उपराला आपण येऊन करावा. त्यास होणार ते होतच आहे, परंतु गोरंदोर व जानबेगम त्यासी समाधानाची पत्रे लिहून पाठवणे. आपलीहि कामेकाजे त्याजकडून होणे आहेत. शामरायाने पहिलेहि तुमची हकीकत वचनप्रमाणाची सांगितली आहे. आतां शामराऊ तुम्हापासी पाठविले आहेत. येथीलहि हकीकत तुम्हापासी सांगितील. तुमच्या म्हटल्यावरूनच सलुक सलाबतजंगासी केला, यैसे समाधान पत्र पाठवणे. आपण तेथे पावल्यावर सर्व वर्तमा (न) सेवसी लिहून पाठवितो. आथ (वा) मीच येतो. यैकतो कीं, मुरारायासी सलुक करून फुलचरीस आणून श्नेह करून त्रीपदीस फिरंगी तोफा देऊन पाठविले आहेत. मा॥ आलीखानाकडे इंगरेज आहेत. ठिकाणास गेलियांवर तथ्ये वर्तमान कलल. मदनतपंत मुनसी आहे, ब्राम्हण आहे, दुभाशाहि आहे. आपलीकडील गोस्टमात समजाऊन सांगत आसतो. त्याने सेवसी पत्र लिहिले त्यास उतर समाधानाचे लिहिणे. तुमचे वर्तमान कर्तेपणाचे व येकनिस्टेचे शामराऊ यानी सांगितलेच आहे. तुम्ही आमचेच आहात. समाधान आसू दीजे. आतांहि शामराऊ पाठविले आहेत. सांगतील त्याजप्रमाणे कार्येभाग करून देणे. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Shamrao Yadav, Peshwa's agent at Pondicherry, goes back to his post after visiting the Peshwa. He is advocating a conciliatory attitude on the part of the Peshwa towards the French.*

3906

No. 91] [26-1-1753 ?

श्री

पुा श्रीमंत

सेवसी विज्ञापना येथे त्रिवर्गाचा ग्रंथ आणीक प्रकारेच जाला होता, परंतु स्वामीचे पुन्ये थोर, नावाचा प्रताप मोठा, आवघे वारापाणीच जाले. आता स्वामीचीच कृपा इछितात. कागदीपत्री काही समाधाना वेगले लिहितात जाले. आता लोकहि फार देईन म्हणतो. तोफा दारूगोली सरंजाम करीत आहे. या चौ रोजात वाटे लावितो म्हणऊन बोलतो. आपण रोज उठून तगादा करितो. देहावर आला आहे. नंदराज पटणकर त्याने मुरारराऊ यासी लिहिले की आपण श्रीरंगामधें व जंबुकेस्वरामधे ठाणी देऊन मौजे करून येथे जातों. त्रिचनापलीचाच गांव करूर आहे, ते पटणेवालियानी घेऊन बांधले आहे. पटणेवालियाचे सरंदेस आहे. पौष्ये वद्ये ९ गुरूवारी जाणार होता परंतु गेला नाही. जरिंदा[१] होऊन श्रीरंगामधेच आहे. त्याच्या बातम्या रात्रंदिवस वर्तमान घेऊन येतात. जरी सडी फौज धावली आणि त्यास वेढा घालून धरले तर चितानरूप काये होईल. आपण येथे आणीक सा महिने राहिलो नही सोमउपचारे काही कार्याची वाट होत नाही; यासी येथे दरमाहा देणे लागतो. वरकड आपल्या लोकासहि देणे सवा लाख रुा दरमाहा आहे. त्याच कारभारात आहे. जेव्हा निकड लागेल तेव्हा होणे ते होईल. मुसे बुसीने त्यास लिहिले नाही आमका पैका देणे. कराराची नकल मात्र दाखविली. जो सरंजाम जमियेतीचा व त्याचे तरफेने येक भला माणूस घेऊन येतो. तेथे आलियावर रूबरू जे विनंती करणे ते करून; हे विज्ञाप्ति.

¶Shamrao Yadav to the Peshwa, writes news of the movements of Nandraj and the other chiefs engaged in the Karnatak contest.

No. 92] [8-2-1753

श्री

श्रीमत राजश्री पत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनती सेवक शामराऊ यादव कृतानेक साा नमस्कार विनती उपरी विज्ञापना यैसीजे :—येथील क्षेम ताा माघ सुद ९ गुरुवार मुाा फुलचेरी येथास्थित जाणऊन

१ सडा.

स्वकीये क्षम लिहिणे. विशेश. फुलचरीस पावलो. वस्त्रे त्यानी समारंभेकडून वाजतगाजत नेली. भेटी जाली. संकलित बोलणे जाले आहे. तथ्ये गोस्ट होणे आहे. ते उभयेतासी बोलून सवंच लिहून पाठवितो. स्वामीस येथे पावलियाचे वर्तमान कलावे म्हणऊन लिहीले आहे. स्वामीचे ठाई याची आस्ता तो फार दिसत. बोली चालीत काये निवाडा होतो ते सेवसी लिहून पाठवितो. मुरारराऊ घोरपडे त्रिवादीस आहेत. श्रुत जाले पाहिजे हे विज्ञाप्ती.

¶Shamrao Yadav announces to the Peshwa his arrival at Pondicherry and the ceremonial presentation of the dresses he had brought for the French Governor.

No. 93] *[13-2-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवसी

विनती सेवक शामराऊ यादव कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना येसीजे. येथील क्षम ता। माघ सुध १० मंगलवार मु। फुलचेरी येथास्थित जाणऊन स्वकीये क्षम लिहीती आज्ञा करणे विशेश. फुलचेरीस पोहचल्याचे वर्तमान कासिदाबराबर लिहून * * * * आहे * * * * * जी वस्त्रे दिल्ही होती त्यास आपले फिरंगी पालखीनसी व कारभारी पाठविले. से दोनसे माणसे व वाजांतरी पाठऊन वाजत गाजत पालखीत घालून वस्त्रे नेली. दोघे उभयेता स्त्रीपुरुश येकेठाई बसून तमाम फिरंगी बोलाऊन मजलस करून वस्त्रे पुढे येऊन घेतली. मस्तकीं वंदिली. त्याच्या दंडकाप्रमाणे कर्तव्याहून आधिक मानमर्यादा केली. त्यास भूशणच * गोस्टीचे आहे. कागदपत्र दिल्हे. वर्तमान सांगितले. पहिले दिवशी बोलीचालीमधे सख्तीच जाली. एका दो विचाराकरतां नजर बहकली देखून आपणहि काही मुलाहिजा केला नाही. स्वार होऊन यावे येसा विचार होता. त्यास मागती देहावर येऊन, भले माणूस पाठऊन बो(ला)उनु नेले. बहुत आसतेच्या गोस्टीमाता सांगोन आपले स्वकीये मुखच सांगितले. आम्ही फरासीस, राऊ प्रधान यासी श्नेह केला तो दुसरे होणार नाही. आमचा दुसमन तो त्याचा दुसमन, त्याचा तो आपला दुसमन, आसे आसता महमदआलीखानाचे विषई आपणास सिपारस लिहिली. मा।आलीखाने सर्वस्वे आपणास बुडविले, त्याच्यामुले जीवहि गेले. दोन करोडी रुपयानी धरणार नाही. सरंजाम जो गेला तो तुम्हासच ठाऊक आहे. मजहून

तो काही मातबर नाही. आपण तो सर्व गोस्टींने राऊ प्रधान याचे शेरीक आहेत. येैसे उंदड बोलणे जाले. सेवट लोक, दारूगोली, तोफा, पाठवायाचा विचार; त्यास उतर दिल्हे की, तमाम फिरंगी व स्वार व गाडदी व मुरारराऊ याची फौज तमाम लोक त्रिपदीस माआलीखानाचे लडाईस गेले आहेत. ते लोक तेथून पाठवावे तर आपली आबरू राहात नाही. बाजी वोछा[1] पडते याजकरितां पाच सासे गाडदी व च्यार पाचे तोफा देतो. फिरंगी तो तेथे गुतले. जाहाजाची खबर आली आहे दाहाफ्लैतीयात[2] तीन जाहाजे आपली येतात. त्याजवर फिरंगी आले आहेत. जाहाजे आलियावर देईन. पैकियाचा विचार तर * * * डच सांगितला. सेवट हे गोस्ट * * ली, पहिले-पासून दंडकहि आहे. तमाम किलेदार व जागीरदार सुभे आरकाट याजवर पटी करून देतात व सरकारचा खालिसीयावरहि पटी बसते. येैसी करून भरती करून देतात. प्रस्तुत मूर्तजाखानाच्या नावे सलाबतजंगापासून सनद सुबेदारीची आणविली आहे. परंतु त्यास वस्त्रे आदियाप दिल्ही नाहीत. त्यास पयेदरपये माणसे वेलुरास बोलावयासी गेली आहेत. तो आलियावर तीन लाखाचा मार्ग करून द्यावा म्हणऊनू आपणास राहविले आहे. आमलहि ज्याचा त्यास ताकीद करून परवाने लिहून द्यावे. सरकारातहि जेथे जेथे आपला आमल आहे तेथे आमिलास ताकीद लिहून द्यावी. आरकाटच्या तालुकियांची ठाणी व किले इंगरेज व माआलीखान यानी घेतली आहेत. तेथल्याहि जमिदाराचे नावे परवाने करून देतो. तुमच्या आमलास उजूर कोण करणार? आपण काम चाली लावितो. परंतु इतकियाहिं गोस्टी मूर्तजाखान आलियावर करून देतो. वेलूर फुलचेरीहून तीन दिवसाचा मार्ग आहे. लवकरच येईल. मुर्तजाखा-नासहि आसरा स्वामीकडीलच आहे. सरकारच्या कार्यास आंतर करणार नाही. फिरंगियाचा भरवसा काये? याजकरितां स्वामीचाच आसरा मूर्तजाखा धरितात. सादुलाखान याचा नातू आहे. नवा इतीयात[3] आता मातबर तोच आहे. नंदराज श्रीरंगपटणेकर करूर म्हणऊनू येक जागा त्रिचनापलीच आहे, पटणियाचे सरदेस आहे, ते जागा पटणेकरानी बांधली आहे, तेथे जाऊन राहिला आहे. ठाणेमात्र श्रीरंगस्वामीच्या देवाईलात ठेविले आहे. मधून कावेरी नदी आहे, दक्षण प्रांतात किला त्रिचनापली, उतरेस देवाईल तेथे ठाणे आहे. मुरार-राऊ याचेहि लोक तेथे आहेत. त्रिचनापलीत माआलीखानाचे ठाणे व इंगरेजाचे लोक आहेत * * * आहे. माआलीखानानी तमाम बुनगे डेरे व

---

१ कमी. २ Flotilla. ३ इतिहात ; स्नेह.

सामान वगैरे हती तमाम कूच करून देवनापटणाचे आसरियात नेऊन ठेऊन सडा होऊन मागती त्रिपदीस आला आहे. तेथे देवाईलाचा किला पहिलेच कोणी केला आहे. देवनापटणास जाता लडाई देतच गेला. झाडी होती. घोडी माणसे मुराररराऊ याजकडील जाया जाली. पहिलीहि लडाईत घोडी माणसे येक दोन सरदार पडले. याची सिपाईगिरी घोडियावरील त्याची लडाई आरबियाची याजकरिता लोक घोडी जाया होतात. रसद व चारा बंद करितात. मााआलीखानाचे लोक रात्री चोरी छबीने रसद व चारा आणितात. श्रुत * * पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶Shamrao Yadav reports his arrival and reception at Pondicherry. He then gives full details of the situation of the various parties in the Karnatak and mentions the cordial attitude of Dupleix, the French Governor.

No. 94] [*22-2-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शामराऊ यादव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील क्षम ताा माघ वद्ये ९ गुरूवार मुाा फुलचेरी येथास्थित जाणऊन स्वकीये क्षम लिहावयासी आज्ञा करणे. स्वामीची दोन पत्रे येऊनु पावली. गोरंदोरास येक पत्र छ २१ रबिलावलचे ते छ १५ राखरी पावले. रोजा २४ पावले. दुसरे पत्र छ २७ राावलचे छ २७ राखरी पावले. नवाब गोरंदोर यानी जमियेत पाठवावयासी तयार करितात. सत्वरच रवाना करितील. स्वामीचे ठाई याची ममता फार आहे. पटणेवाला नंदराज यासी पत्रे लिहिली आहेत, कीं श्रीमंत राजश्री राऊ प्रधान याचा मामला खातरखा चुकऊन त्याची रजावंदी करणे; नाहीतर आम्ही ते येक व्हावे लागते; त्याचे उतर आले नाही. प्रस्तुत पटणेवालियासी हे काही आसरा देत नाहीत. जान बेगमहि स्वामीच्या कार्यावरच फार मनापासून आहेत. राजश्री मुराराव घोरपडे व गोरंदोर यांचे फिरंगी व गाडदी व तोफा वगैरे सामान त्रिपदीपासी आहेत. त्रिपदीपासून दीड दोन कोस याच्या तफावताने आहेत. मुलकात रसद व कहीकबाडे मना करीत फि(र)तात. तेहि वेल अवेल पाहून नेतात. माा आलीखानहि जरिदा त्रिपदीस आहे. तेहि बाहीर निघत नाही. नवाब गोरंदोर याचे लोक यासी येऊन खबर सांगतात. दो चौ रोजात माा आलीखान त्रिचनापलीस जातो. त्याजकडील लोक पळपळू जातात. काही स्वार मुराररराऊ याचा कौल घेऊन गेले आहेत यैसे म्हणतात.

खरें खोटे श्री जाणे. गोरंदोर म्हणू लागले कीं आम्ही फरासीद, आपण कागद लिहून दिल्हा ते वर्तमान आपण आपल्या पातशाहास लिहून पाठविले. पिढी दरपिढी आम्ही तुमचे, दुसरें होणार नाही. दो चौ रोजात मा। आलीखानाचा जाणे त्रिचनापलीस जातो. हा निवाडा होतो आणि कुली फौज पाठवितो. खातरखा पैका द्यावा. जलदीने फैसल करू नये. पैकियासी ठिकाण तेव्हडेच; पटणेकरहि पैका देतील. स्वामीच्या नावाचा प्रताप थोर आहे. (फार) से ल्याहा म्हटले; बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶Shamrao Yadav assures the Peshwa of the support of the French Governor for his measures.

No. 95] *[27-2-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शामराऊ यादव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील क्षम ता। माघ बहुल १० दसमी भोमवासर मु। फुलच्येरी येथास्थित जाणऊन स्वकीये क्षेम लिहिती आज्ञा करणे विशेश. पहिले दोन पत्रे सेवसी पाठविली ते पावली आसतील. मजलाहि दोन पत्रे पाठविली तेहि पावली. गोरंदोर याजपासी सर्व कार्येकर्ती जानबेगम ते स्वामीच्या कार्यास बहुत तत्पर; गोरंदोर यांस सांगोन आपणच मसुदा करून सैदलस्करखानास पत्र लिहिले आहे, त्याची नकल बजिनस पाठविली आहे त्याजवरून श्रुत होईल. वरचेवर कागद गोरंदोर व जानबेगम यासी येऊ लागले. त्याजवरून यासीहि फारसी माया निर्माण जाली. तोफा तयार करविल्या तीन च्यार गाडियावर चढविल्या; आणिक चढवीतच आहेत. पहिले सामान मा। आलीखानाचे लढाई गुंतले; आतां नवेच दुसरे करून पाठवावे. त्यास कारखाने हमेशा चालतच आहेत. ताकीद करताच गाडे तयार जाले. गाडदी फिरंगी जागाजागाहून आणिले. इतकियामधें यासी वर्तमान दिलावरखान सिरेकर व आणिकहि लोक ज्याचें मनी स्वामीचें आगमन या प्रांतात न व्हावे ते या शोधांतच आहेत यानी लिहून पाठविले की ताराबाई-साहेबी सातारियाकडे हंगामा केला आहे. बाबूजी नाईकास फार वाढविले. कितीक सरदारहि त्यास मिळाले. याजकरिता तातडीने श्रीरंगपटणचा मामला वकीलाचे विद्येमाने आठरा लक्षावर चुकऊन मजल दरमजल फिरून सावनूरच्या

प्रांतास पावले आसतील यैसे वर्तमान आले. त्याजवरून आपणास बोलाऊन हे वर्तमान सांगितले कीं आम्ही किती भरवसा मानिला होता कीं या प्रांतास आलियांवर पुढे जाऊन त्यास घेऊन येऊ. त्याचा सन्मान करून त्याच्या आल्याने सर्व कुशल होईल, रयेत नांदल. त्यास आपला हरूष मंद जाला. दुसरे तोफा दारूगोली लोक जमियेत पाठवावी, त्यास पैका देणे लागतों तो पैका वेर्थ होऊन जाईल. तकरार वर्तमान खरे खोटे आलियावर त्याजसारखी रवानगी करून म्हणऊन ठेविले आहे. पत्र पावताच उतराची आज्ञा केली पाहिजे. स्वामींच्या ठाई उभयेताची प्रीति बहुत आहे; परंतु दिवसेदिवस अधिकच प्रकार होतो. या करनाटकांत अमल बसावयाचा समये हाच होता; परंतु जरूर कार्यें आसल ते आगत्ये करावे. मुलुक कोठे जात नाही. समयोचित आवघेच होऊन येईल. मा। आलीखान त्रिपदीस आहे. याचेहि लोक दुरून दुरून राखोन रसद चारा बंद करून आहेत. किती दिवस हे पुरवल कलत नाही. मा। आलीखानाकडेहि सिबंदीचा हंगामाच[1] आहे. ईश्वर कोणे गोष्टीस राजी आहे कलत नाही. राजश्री मुराराराऊ घोरपडे यासी रोजमुरा दरमाहा सवालक्ष रू॥ द्यावे. प्रथम भेटीस दोन लक्ष रु॥ द्यावे, जातेसमई दोन लक्ष रु॥ निरोपसमई द्यावे, यैसी बोली; येथे आले ते समई हती व जव्हाईर वस्त्रे भूशणे बहुमान फारच केला. करारापैकी दोन दरमाहा दोन लक्ष पैकी येक लक्ष त्यांस पावले. आतां येक लक्ष रू॥ व येक दरमाह चढला आहे, तो तयार करितात. कांहीं तयार केले, कांही होणे आहे. नंदराज श्रीरंगस्वामीचे स्थलीच आहे. त्यासहि जोर जाला. आम्हास बोलाऊन सांगितले कीं तुम्ही नानासाहेबास लिहिणे की दोन तीन रोजात तोफखाना व दारूगोली व जमियेत रवाना करितो म्हणऊन लिहून पाठवणे यैसी आज्ञा केली आहे. स्वामीच्या नावावरून उभयेताहि दया करितात. नित्ये कृत्यास सामग्री पाठवितात स्वामी कार्यें काही गोष्टी मातने * * होत नाही. ज्याजती आधीन प्रस्तुत कार्येभाग ते सध्या करावे लागते. कलले पाहिजे. बहुत काये लिहिले हे विज्ञाप्ति.

¶*Shamrao Yadav informs the Peshwa that the Governor of Pondicherry and his wife have been won over to the Peshwa's cause and are manufacturing ammunition to meet the Peshwa's needs.*

---

१ गडबड, हकाक.

No. 96] *[3-3-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शामराऊ यादव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील कुशल क्षेम ता छ २७ माहे राखर माघ बहुल १४ मंदवासर मुा फुलचेरी येथास्थित जाणऊन स्वकीये क्षेम लिहीती आज्ञा करणें विशेश. पत्र पाठविले ते छ २६ रोजी सायंकाली पावले. छ ७ राखरचे पत्र आहे. येथून तीन जोडिया ज़ासुदाच्या सेवसी पाठविल्या आहेत, पावले असतील. येथे चहूकडून लोकी, यासी वर्तमान लिहीत कीं फौज फिरून गेली त्याजवरून हे सुस्त पडिले. तोफा व लोक रवाना करावें त्यास ढलि केली. कांहीं समाधान काही असमाधान. या प्रांतास येते तर कलह तुटता, आमचा बंदोबस्त (क)रून देते, येणेकरून दिलगीर. दुसरी गोष्टी दुस्टच दुस्ट मिलाले आहेत; त्यास संतोश की हे कार्ये आपणच करून. जे समई मजला पत्र आले तेच वाचून दाखविले, तेव्हाच घाबरी जालीं. वर्तमान यैकिले. याजकरितां दोन दिवस ढील जालीं. आता तूर्त रवानगी करितो. पत्र सेवसी त्यानी लिहिले आहे, येक फिरंगी सरदार मोकरर केला आहे. त्यास पाठवावे. तो आम्हासी भेटविला, जलद रवाना करितात. आपण घेऊन येतो. मा आलींखा त्रिपदीस आहे. सडा आहे. मुराररराऊ घोरपडे व गोरंदोर याचे लोक फिरंगी गाडदी व स्वार त्रिपदीपासून दीढा दो कोसावर आहेत. रोज उठून स्वारी आहे. काजिया होतच जातो. मां आलीखानाचा भाऊ आबदुल वाहबखान आरकाटात आहे. अवघा जोर मा आलीखानास इंगरेजाचा; त्याचीच ठाणी जागाजागा आरकाटच्या मुलकात आहेत. कितीक मुलुक त्याच्याहि हाताखाले आहे. नंदराज श्रीरंगांमधे आहे. त्रिचनापलीच्या किल्यांत मा आलीखानाचे ठाणे व इंगरेज आहेत. इंगरेजानी येक हिकमत केली आहे, नंदराज याचा सरदार त्याच्या हवाला मुदगल व कितीक मुलुक त्रिचनापलीचा पहिले हुसेनदोस्तखां धरलियावर त्यानी घेऊन बलकाविला आहे. दोन तीन हजार फौजेचा सरदार. त्याचे नांव वेंकटराऊ बारकी. त्यास चेनापटणवालियाने बोलाऊ पाठविले कीं मा आलीखानाचा तुमचा कजिया वारून देतो यैसे करून बोलाऊन नेले. नंदराजयानी पाठविले ते चेनापटणात आडकाऊन ठेविले आहे. त्रिचनापलीमधे किलियांत पाचसे माणूस येक सरदार मातबर किलियात पहिलेच मा आलीखान याने ठेविले होते. त्यास येके दिवसी इंगरेज किलियात होते. यानी हिकमत करून तमाम नंदराजाच्या लोकाची हत्यारे

हिरऊन घेतली. सरदारास कैद केले. मा आलीखानाच्याहि लोकाची हत्यारे हिरऊन घेतली. मागती त्याचीं गुप्तरूपे फिरून दिल्ही. नंदराजाच्या माणसास बाहीर निघू देत नाहीत. दो जागा, दोन सरदार गोविले आहेत. नंदराज यानी श्रीरंगस्वामीचे स्थल व जंबुकेस्वर स्वामीचे स्थल हे दोन्ही स्थले बलकाऊन बसले आहेत. मधून नदी कावेरी आहे. दक्षणेस किला त्रिचनापली, उतरेस देवाइले आहेत. जागे मातबर आहेत. नंदराजासहि कुवत मुराररायांचीच; गोरंदोर व मुराराराऊ व नंदराज तीन वर्ग येकास येक हमेशा पत्रे लिहितात. परंतु स्वामीचे प्रतापाचे भये निर्माण जाले. नंदराजाचा वकील वेंकट नारायण येथे आहे; कलले पाहिजे बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Shamrao Yadav writing to the Peshwa gives him some idea about the relative strength of the two sides, one represented by Murarrao, the French and Nandraj, the Raja of Mysore, and the other by Muhammad Alikhan and the English. He further describes how the English had treacherously imprisoned a Sardar of Nandraj and deprived his men of their weapons.*

No. 97] *[8-3-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शामराऊ यादव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षम ता छ २ माहे जावल फाल्गुण सुध ३ गुरुवार मु फुलचेरी यथास्थित जाणऊन स्वकीये क्षम लिहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. पहिले च्यार पत्रे पाठविली ते सेवसी पावली असतील. मधे वर्तमान उठविले की फौज फिरून गेली, त्याजकरिता काम सुस्त पडिले होतें. मागती पत्रे माझ्या नावे आलियावर मागती जलदी केली. जाहाजेहि दोन आली. त्याजवर जिनसहि आला व फिरंगीहि आले; व बंदुखा फिरंगी आल्या. तोंडानें उपरी म्हणतात परंतु आल्या हे खरें. फिरंगी दोनसे तांबडे असल व गाडदी दीड हजार; दोन म्हणतात परंतु दीडच. च्यार तोफा पंचरसी गाड्यांवर घालून तयार केल्या. आणीक येक दोन तोफाची रदबदल आहे. तयार करितो म्हणतात. दोन गाडियावर दारूगोलिया व गोले(च)रसे वगैरे सामान घालून तयार केले आणि काही येका दो गाडियावर सामान घालणार. फुलचेरी बाहीर झेंडा उभा करून डेरा दिल्हा व पनास राहुटिया फिरंगी राहण्यास जाऊन दिल्या आहेत. फिरंगी वगैरे सामान चोखट[१] आहे. पाचसे स्वार

---

१ उत्तम.

बरोबर द्यावे त्यास राजश्री मुरारराऊ घोरपडे यांजकडून पाचसे स्वार आणविले आहेत ते आले म्हणजे रवानगी करतात. आणीकहि मागून वरचेवर सामान पाठवीत जाईन, व जमियेत ही * * * * * आंतर करणार नाही यैसे म्हणतात. त्रिपदीस फिरंगी गाडदी तोफा मुरारराऊ देखील मा। आलीखानाचें कजियात गुंतले आहेत. तो जाणार म्हणतात. त्रिचनापलीस किंवा कोठे जाईल तर हे सामान देखील घोरपडे आववेच पाठऊन देतो. दोघेहि म्हणतात नानासाहेबाच्या श्नेहात आंतर करनार नाही. बोलता चालतां उभयेता नानासाहेबाचे म्हणाऊन उतर प्रतिउतर करीत असतात. छ २९ राखरी सायंकाली आम्हास बोलाऊन ते म्हणू लागले, आम्ही नानासाहेबासी दुसरी गोष्टी धरीत नसतां आमचे मुर्दई[1] इंगरेज, त्यास देवनापटणास सिरपाव वकिलाबरोबर पाठविला हे काये ? त्याचा आपणास खरेपण वाटत नवते, परंतु आपला फिरंगी येक मातबर आला, त्याने सांगितले कीं खरेच आहे. त्याजवरून आपूर्व वाटले की आमच्या मुदयासी श्नेह आम्हासी श्नेह, दोन्ही कसा चालतील ? आम्ही फरासीद लिहूनच दिल्हे आहे. जीव जाईल तर आंतर करणार नाही. मा। आलीखानाकडील वर्तमान येते त्याजवरहि मेहरवानगी आहे. त्या भरवसियावर तो बसला आहे. देवनापटण चेनापटण हेहि लिहिल्यावरून व सिरपाव पाठवितात, त्याजकरता ते मगरूर आहेत यैसे वर्तमान यैकून आपण दिलगीर होतो. त्यास उतर प्रतिउतर देयाचें ते देतो. मूर्तजाखान वेलुरीहून निघाले. चेनपटच्या किलियासी आले; येथून तीन मजलीवर आले आहेत. ते येताच, त्याची आमची व तुमची बोली चाली करून रवाना करितो. येक आपले तरफेने भला माणूस दुभासी देतात. नंदराज श्रीरंगी आहेत. मुरारराऊ व फिरंगी त्रिपदीच्या आसपास आहेत; कलले पाहिजे. मा। आलीखानाबाबत च्यार लाख रु। आपण देईन यैसे गोरंदोर म्हणतात. त्यास आसरा न देणें. मुलकाचा बंदोबस्त करून देणे. चौथ सरदेशमुखी व मोगलाई पैका सुरक्षित पावल, रयत नांदल यैसे करून द्या म्हणतो. तुम्हा * आणीक थोर कोणं येणार आहे. रयेत नांदे यैसे करावे म्हणतो. पहिले नंदराज व मुरारराऊ व गोरंदोर यैसे त्रिवर्ग येकत्र जाले होते. आता स्वामीचा प्रताप देखोन आपले आपले ठाई आहेत. विचार पडिले आहेत. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Shamrao Yadav informs the Peshwa of the arrival of a French contingent and ammunition on the East Coast and of Murarrao having joined them with his squadron. Murarrao and the French complain against the Peshwa for keeping friendly intercourse with the English who are their enemies.*

---

१ शत्रू.

No. 98] [4-4-1753

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवसी

विनंती सेवक शामराऊ यादव कृतानेक सांा नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील क्षेम ताा चैत्र सुध १ सौम्येवासर मुाा किले चेनपट येथास्थित जाणऊन स्वकीये क्षम लिहीत आज्ञा केली पाहिजे विशेश. कृपापत्र पाठविले ते चंदीहून येतवेलेस मार्गी पावलें. छ २७ माहे जावली पावले. छ २७ माहे राखरचे पत्र येका महिनियानी पावले. स्वामीनी जे जे लिहिले ते कार्याच्याच गोस्टी लिहिल्या, परंतु त्याच्या होणारास उपाये काये ? येथील वर्तमान तर पहिले मुसे बुसी नवाब सलाबतजंग याजपासी आसता गोरंदोर त्यानी लिहून करनाटकाची सनद गुलाम मूर्तजाखां साददुलाखानाचे नातू पुतन्याचे पुत्र वेलूरचे किलेदार त्याच्या नावे सनद आणविली, ते सनद फुलचेरीस आली. त्यानंतर गुलाम मूर्तजाखानास बोलाऊ पाठविले. ते वेलूरीहून आले त्यास सिरपाव व परवाना दिल्हा. चंदाखानाच्या पुत्रांचा अभिमान न धरला. चंदाखान मूर्तजाखा साडूहि होत. चंदाखानाच्या पुत्रास गोरंदोर म्हणू लागले कीं बाहीर फितूर[१] मोठा आहे. तुम्ही धाकटे, नेकबंद जाली तर काये करावे, याजकरितां यांच्या नावे सनद आणविली. बंदोबस्त जालियांवर तुमचेच हवाला करून यैसे धातुपोशन केलें. गुलाम मूर्तजाखान यानी तूर्त तीन लाख रुा गोरंदोरास द्यावे त्याजपैकी तूर्त लाख रुा दिल्हे. बाकी द्यावे करार जाला आहे. कालहरणावर घालून आजपावेतो आम्हास ठेऊन घेतले. आज वाटे लावितो, उद्या वाटे लावितो, मूर्तजाखा आलियावर वाटे लावितों, जमीयेत देतों, तोफा देतो, यैसे करून ठेविले. उगेच उठून यावे तर दरवाजियावर फिरंगी अक्षराची चिठी फिरंगियास व्हावी. किलियात जाता ही चिठी तपसिलवार असावी. येतांहि याचप्रकारे चिठी असावी. दिवसगतीवर घालून सरंजाम करून दिल्हा. फिरंगी २०० व गाडदी १५०० व तोफा च्यार ४ त्याचे सामान दारूगोली गोले सा सात गाड्यांवर घालून रवाना केले. फिरंगी नवे जाहजावरून उतरले आहेत.

---

१ फितुरी; हरामी.

दिवसांत दोनतीन कोश चालतात. तीन कोस चालले तर मोठी मजल केली. जेथे उस्ण लागते तेथेच राणात राहतात. पाचसे स्वार रा। मुराररराऊ घोरपडे याचे दिल्हे. यैसी चालीने फिरंगियास पाच सात महिने येयासच पाहिजेत ऐसे जाणूनच हे कर्म केले, तोंवर पटणीचा मामला काही राहात नाही. खासा फौज पटणियासीच आली आहे. कमबेश मामला फैसल होईल; पटणेवालियापासी आपला श्नेह राहील. जर फौज या रोखे आली तर लोक जाऊन रुजू होतील; नाहीतर फौज घाटाखाली न आली, तर आपले लोंक घाटाखालेच राहातील. शामराऊ आले वाटेंने जातील. फालगुण वद्ये ९ नवमीस निरोप घेऊन सडेच मुराररराऊ याचे भेटीनिमित्ये गेलों. गुलाम मूर्तजाखा यासीहि निरोप दिल्हा. ते वेलूरास जातात. त्याजबरोबर चंदीचे मार्गे फौज व तोफा रवाना केल्या. आम्ही मुराररराऊ घोरपडे याची भेटी घेऊन वेलुरास यावे. मार्ग तोच. तेथून मूर्तजाखाजीचा निरोप घेऊन जावे. फालगुण वद्ये ९ भोमवासरीं मुराररराऊ याच्या लस्करास येऊन भेटी घेतली. परस्परे इस्टलाभाच्या गोष्टी जाल्या. गुरुवारी दसमीस त्यानी राहविले. त्रितीये प्रहरी ते आपण येकांती बसून गोष्टी-माता जाल्या. त्याचा आशये सर्व कलला. सुक्रवारी येकादसीस प्रातकालीं वर्तमानें मुराररायासी आले कीं महमद आलीखानाची स्वारी तयार जाली आहे; न जाणो कोठे जातात. यानीहि आपली स्वारी तयार केली. खासाहि तयार जाले. त्या गडबडेत आपण जाऊन निरोप घेतला. ताळतंत्र कळले. उगेच राहून कारण काये? महमद आलीखान तयार होऊन देवणापटणास गेले. वाटेमधे याची लडाई होत हेहि गेले. ते देवनापटणा पावले. हे फिरून त्रितीये प्रहरी गोटास आले म्हणऊन वर्तमान मजलीस आपणास कलले. येकादसी द्वादसी दोन दिवस मा। आलीखान देवणापटणी राहिले तेथे चेनापटणाहून मिसर किलीस व फिरंगी आले होते. त्यांची भेटी होऊन काये त्यांचे बोलणे चालणे होते ते करून स्वार जाला. फालगुण वद्ये १३ रविवारी त्रिपदीस येण्यास तेथून निघाला. मुराररराऊ यासी वर्तमान कलले. हे खासा फौज देखील तोफखाना व फिरंगी आपल्या सामानासी गेले. वाटेत महमद आलीखान मिसर किलीस याची गाठ पडली. मोठी लडाई होतच आली. हजारें हजार तोफा सुटल्या. घोरंदर युध्ये जाले. से सवासे घोडे पडिले. से दोनसे माणूस मेले. जखमी

---

१ मोठें.

जाले. भुजंगराऊ घोरपडे मुराराऊ यांचे बंधु सतरा अठरा वरशाची उमर होती, फार दाटी जाली तेव्हा लोक कचे पके होऊ लागले. तेव्हा बेजरब घोडा चालविला. लोकास सिव्यागाली करून झुंज सावरले. इतकियात आकस्मात गोला येऊन खोपडीच उडून गेली. भुजंगराऊ मृत्ये पावले यैसे वर्तमान जाले. महमद आलीखान व मिसर किलीस येऊन त्रिपदीस पावले. मोठा दबाव इकडे पडिला होता. जेव्हा यानी यैकिले की पटणियाचा मामला चुकला, फौज माघारे गेली, त्याजवरून कितीकास सणतोस कितीकास दिलगिरी जाली. बरे स्वामीवर राज्येभार आहे; जसे देखलें तसे केले. मी येथे वरीस सामहिने राहिलो तऱ्ही कांही सार्थक नाही. येथील प्रसंग येकप्रकारचा जाला आहे. कायें जबरदस्तीवांचून होत नाही. तीन लाख रुपयाचे परवाने आर्काटच्या मुलकावर करून दिल्हे. कोठे रयांत[1] कोठे आकस, कोठे नावच नाही, यैसे केले परंतु आपण वाकीफ होयानिमित्ये कागद मात्र घेतले. उगीच मोघमे गोस्टी होती ते ठिकाणें कलली. आपण उदंड शाहाणपणाच्या गोस्टी सांगितल्या तर कोण पुसतो? शंकराचार्यासारखे संच्यार करीत फिरलियाने साहेबकाम काही होता दिसत नाही. पत्री आज्ञा होतीं की रंग राखून च्यार दिवस आसणे; मागून जो विचार होईल तो लिहून पाठवितों. याजकरितां मात्र वेलूरी गुलाम मूर्तजाखाजीपासी आहे. त्याचा जीव मात्र स्वामीपासी आहे. त्यांनी आसरा स्वामीचा केला आहे. फुलचेरीकर ते हे येकच आहेत. येथून कागद तेथे जातात, तेथून येथे येतात. स्वामीच्या आज्ञेप्रमाणे वर्तनूक करतों तर इतका भारी मनसबा न पाडिता आणि फजीतहि न होतें. उभयेपक्षी थोरले बाईचा बस जाला आहे. बहुत दिवस निभत नाही. इतकियात ज्याचा ज्याचा मृत्ये आहे तो होतो. फुलचरीकरास त्याचें स्त्रीच्या हाते त्यास वाटेवर आणिलें. उदंड उडणे, पडणे, राग लोभ करून सेवट ठिकाणास आणिला. स्वामींचे मरजीप्रमाणे करावें. स्वामीनी त्यास ठिकाण नेमिले आहे ते द्यावें; परंतु स्वामीनी यासी पत्र ल्याहावें. जसा मुसी बुसी सलाबतजंगाचे दरमियान येऊन करारमदार केला, तसे स्वामी या गोस्टीमधे आसलियाने नवेदिगर[2] होणार नाही. हे कर्म स्वामीसारखे पुन्येश्लोक दरमियाने आसलियाने आज्ञेप्रमाणे वर्तणूक करावी. गरीबगुरीबाचे काम नाही. याचें समयासी येणे जाले नाही. स्वामीचे इकडे येणे घडत नाही. करनाटकाचा भोग सरला नाही. मुलुक उज्याड पडिला. रयेत परागंदा जाली. वांटमाथां फौज येती तर येथे आमल बसता. आवघे पादाक्रांत होते. आवघी गुंज विसकटून जाती. येथल्या

---

१ कींव; कृपा. २ हरकत.

प्रसंगाप्रमाणे सेवकाने लिहिले. तेथला प्रसंग मजला ठाऊक नाही. स्वामीच्या चितास येईल तैसे करतील. वर्तमान मात्र विज्ञापना केली आहे. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति. मुसा बुसी हैदराबादेहून मछलीबंदरास गेले आहेत. तेथे जाहाजात बसून फुलचेरीस येतील. लग्नहि होणे आहे; धनहि संपादले आहे. ते जतन करून आणावे हे विज्ञाप्ति.

¶*Shamrao Yadav to the Peshwa, writes that through Bussy's influence at the court of Hyderabad a sanad for the Karnatak has been secured in the name of Murtaja Khan who in return for the favour has promised the French Governor a sum of 3 lacs. He then describes a skirmish between Muhammad Ali assisted by Clive and Murarrao Ghorpade in which the latter lost his brother and sustained a defeat.*

No. 99] [*21-4-1753*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
पंत प्रधान स्वामी

विज्ञापना यैसीजे. चैत्र वद्य ४ शणवार छ १६ जाखर ते रोजी आबदुल वाहबखान बिरादर महमद आलीखान यानी फौज स्वार ९०० व फिरंगी ९० व गाडदी हजार दीड हजार व तोफा २ दारूगोल्याचे गाडी येक १ व बाण व जजाला यैसे कुपम म्हणून येक खेडे वेलूर आरकाटच्या मार्गामधें आहे, तेथे येक गढी होती ते पाडायानिमित्ये बेलदार व कामाठी पाठविले. वेलूर आरकाटास सा कोस आहे. तीन कोसांवर ते खेडे कुपम होतें ते गढीस पाडायास बेलदार लाऊन फौज त्या खेड्याहून पुढे येऊन उभी राहिली. गुलाम मूर्तजाखानास हे वर्तमान कळले. यानीहि आपली फौज पाठविली. च्यार घटका दिवस असता लडाई सुरू जाली. तीन च्यार सरदार आबदुल वाहाबखानाकडील आले होते. बरे जुंझ जाले. साईकाल होता होता आरकाटची फौज मोडली. तोफाचे जुंझ राहिलें. तरवारा तरवारी जुंझ जाले. सरमिसळ जालें. आबदुल वाहाबखानांकडील मोड जाला. तोफा २ यानी पाडाऊ केल्या. दीडसे दोनसे बंदुखा घेतल्या. दारूचे गाडी आणली. नगारियाचा उंठ बमये नगारा घेतला. इंगरेजाचा सरदार तोफाबरोबर आला होता तो पाडाऊ केला.

त्याजबरोबर पंधरा सोला फिरंगी सापडिले. पाचसांत मेले. दाहाबारा घोडे सांपडिले. साठी सत्तर माणूस ठार जाले. सें पनास माणूस जखमी होऊन पलालें. गुलाम मूर्तजाखानाकडील वीस माणूस ठार जाले. पनास साठी माणूस जखमी आहे; त्यात काये मरल, काये वाचल ते न कले. सात घोडी गोल्याखालें पडली यैसे वर्तमान जाले. इतकियात च्यार सा घड्या रात्र जालीं. आपले पारखे[1] कलेना. आंधारांत चहुकडे पळू लागले. हेहि काही मागे लागले. आंधारी रात्र याजकरितां फिरून आले. जर दिवस असता तर याचा नाश फार होता. मोड जालियावर सांभालणे कठीण. सुज्यायेतखान वकिलीस गोरंदोराकडून आला आहे. बोलीचाली आवघी मजसी जाली आहे. तो जलदी करून पुढे आला आहे. दरशणास येयाचा उदोग करील तर त्यास हेच आज्ञा करणे, शामराऊ आलियावर भेटी होईल. मज आगोधरच त्याची भेटी जाली तर परिकी दरबारात आम्हा लोकाचा वकर[2] राहाणार नाही. यावर स्वामी खावंद आहेत. विनंती मात्र लिहिली आहे हे विज्ञाप्ति. सैद तकी म्हणऊन सरदार आरकाटावालियाचा पाडाऊ यांजकडे आला आहे; त्यास चौदा जखमा लाहान मोठिया आहेत परंतु वांचल. तिकरी म्हणऊन येक किला आरकाटाजवल आहे तेथल्या किलेदाराचा जावाई होये हे विज्ञाप्ति.

¶*Shamrao Yadav describes an action between Abdul Wahabkhan, brother of Muhammad Ali, and Gulam Murtajakhan at Kupam ; the latter assisted by the French was victorious.*

No. 100] *[22-4-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शामराऊ यादव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। चैत्र वद्य ९ रविवार छ १७ माहे जाखर मुा। किले वेलूर प्रांत करनाटक येथास्थित जाणऊन स्वकीये क्षेम लिहिती आज्ञा केली पाहिजे विशेश. किले चेनपट येथले मुकामीहून कासीद रायेमल मिर्धा याचे जोडी १ त्याजबरोबर विनंतीपत्र सेवसी पाठविले ते पावले असल; त्याजवरून या प्रांतीचे वर्तमान श्रुत जाले असेल. हाली वर्तमान तर भुजंगराऊ घोरपडे लडाईत वारलियावर

---

१ शत्रू. २ बोज.

लस्कराने इबरत[1] खांदली, त्याजवरून बुलगे तमाम किले वरधांवर येथे आले. सेडीं फौज मात्र तेथे राहिली. पहिलेच लस्कराभोवतां खंदक खांदून वांटा ठेवल्या होत्या तेथ तेथे बुरूजे बांधून तोफां ठेविल्या होत्या व बरकंदाज बारवाले चौकिया होत्या त्यास महमद आलीखान याची बाजू शेर जाली. याजकरितां त्रिपदी सोडून पुढे येऊन उतरले. पाठीमागे त्रिपदी टाकली. गोल्याचा मारा चुकऊन येऊन उतरले. त्याचा मुदा कीं मुराराराऊ घोरपडे याची बाजू कमी पडली. भाऊ व लोक मारले गेले. आतां काही त्यांच्याने टिकवत नाही. तीन दिवस लडाई बरी जाली तोफाची लडाई जाली. महमद आलीखानाचा मतलब मुराराराऊ घोरपडे यांजपासून जागा सोडवावा; त्या जागियावर आपण जाऊन राहावे यैसा मतलब होता. त्यास मुरारराविहि आपल्या जिवावरच उठले. जाता जावो, राहतां राहो, आपण जागा सोडिनार नाहीं. भाऊहि मारला गेला आतां कोठें जाऊन तोंड दाखवावे? मारीन, मरन, हाच हट धरला. जागा जागा लोकहि रसद बंद करावयासी गेले होते तेहि जमा जाले. शेरमोशेरीमी[2] फिरंगीहि टिकले. जागा सोडिली नाही. महमद आलीखान मयेदानांत येऊन राहिले होते. रसद येऊ पावना; मुराराराऊ घोरपडेहि जागा सोडून जातना. मग मागती फिरून त्रिपदीस गेलें. त्रिपदी देवनापटणाहून पाच कोस आहे. दरमियान झाडी नाले आहेत. रातबिरात रसद येऊन पावते. मयेदानात येऊ पावत नाही, याजकरिता त्रिपदीस असरियासी गेले. जाते वेलेस काही होईल. येक दोन तोफ दारू गोली यासी सापडली. जातेवेलेस घालमेल जाली. मुराराराऊ यानी जागाजागा घाटावर माणसे पाठऊन लोक बोलाविले आहेत. त्यांचे लोक जागाजागा होते; आणिक नवे चाकर ठेऊनहि आणविले आहेत. इरेस गोस्टी येऊन पडली आहे. मुंडासे बांधत नाहीत. दिवसे-दिवस जमाव अधिकच होतो. स्वारी त्रिपदीभोवती कोसी दुकोसी होत असते. आता गोरंदोर याचाहि येख्तियांर मुराराराऊ यांजकडेच पडिला आहे. स्वामीच्या फौजाचा मोठा दबाव पडिला होता. श्रीरंगपटणाकडे फौज आली आहे. तेथील मामला चुकलियावर घाटमाथा फौज येईल म्हणऊन दुस्टच दुस्ट याजवर इबरत पडली होती. फौज फिरून गेली यैसें वर्तमान यैकून दुस्टास समाधान, गरिबास दिलगिरी जाली. नंदराज पटणेकर यानी त्रिचनापलीवर मोठा हंगामा केला आहे. रुपयासी च्यार सेर तांदूल जाले आहेंत. मिलत नाहीत याजकरिता गरीबगुरूब बाहीर जातात, यैसे वर्तमान येथे यैकिले आहे.

---

१ दहशत. २ लाजेकाजेस्तव.

सत्य मिथ्ये श्री जाणे. पहिले येक वर्तमान यैकिले ते सेवसी लिहिले ते लटके जाले. मा। आलीखानास जखम व सरदार मारले गेले हे लिहिले होते तें तहकीक करतां मिथ्या जाले. जसे यैकिले तसेच लिहिले होते. फुलचेरी-कराकडील वर्तमान तर दोनसे फिरंगी, दीड हजार गाडदी च्यार तोफा त्याचे (सा) मान पाचसात गाडियावर घालून रवाना केलें. सुज्यायेतखान म्हणऊन दुभाशां रूमीखानाचा भाचा रूमीखानापासी होता. त्यास रूमीखानासी बे (ब) नाव जाला. तो उठून फुलचेरीस गोरंदोर याजपासी आला. पाचसात महिने येथे होता तो फिरंगियाच्या स्वधर्मात मिलाला. त्याचे भक्ष खाऊं पिऊ लागला. देखणाहि आहे. तों आम्हाबरोबर वकिलीस दिल्हा व गुलाम मूर्तजाखांन यासीहि वेलूरास जावयासी निरोप दिल्हा. यैसे आवघे मिलून वेलूरास आले. सुज्यायेतखानाबरोबर वस्त्रें दिल्ही. साहेबास व राजश्री भाऊ-साहेबास व जानबेगम यानी सौभाग्यादिसंपंन मातुश्री बाईसाहेबास वस्त्रे दिल्ही आहेंत ते अवघी सुज्यायेतखानापासीं आहेत. साहेब फौजसहवर्तमान फिरून माघारे गेले, हे वर्तमान यैकून गोरदोर यानी लोक फिराऊन बोलाविले. तिकडे हंगामाहि जाला आहे. ते लोक फिरून गेलें. सुज्यायेतखांन मात्र वेलूर पावतों आला. मी आरणीस होतो. आरणी वेलूरीहून बारा कोस मागें, तेथे च्यार दिवस राहिलो होतो. शेरीरास सावकास नवते. दोन तीन लंघणे जाली. तेथून वेलूरास आलो तो सुज्यायेतखान स्वार होऊन पुढेच गेला. न जाणो, ठिकाण पावतो येतो किंवा वाटेतूनच फिरून माघारे येतो हें न कले. येकादो रोजा आपणहि गुलाम मूर्तजाखाजीचा निरोप घेऊन त्रिपदीवरून श्री चे दर्शेण घेऊन कडपियावरून कर्नोल गदवाल पंचमाहाल या मार्गें येतो. लस्कर गेले त्यामार्गें निर्वाह होणार नाही. स्वामीचे पुन्ये समर्थ पदरी आहे. या मार्गें येतों. या प्रांतीचे वर्तमान फार सेवसी निवेदन करणे आहे. सत्वरीच येतो. कदाचित सुज्यायेतखान तेथे आला तर त्यास स्थळ मात्र राहयास देववणे. भेटी मी सेवसी आलियावर होईल म्हणऊन आज्ञा करणें. उतावली करून शामरायासी मागे टाकून आलेत, आठदाहा दिवसात शामराऊहि येईल, यैसे सांगणे. मुसा बुसी अद्याप मछलीबंदरीच आहे. अद्याप फुलचेरीस आले नाहीत. आबदुल वाहबखां महमद आलीखाचे बंधु आरकाटात आहेत. आरकाट शहर किल्यांपासून गोल्याच्या मारियावर पाडून सांफ मयेदान करून टाकले. त्याचीहि स्वारी वेलूरच्या मुलकात येते. गुलाम मूर्तजाखांजीची स्वारीहि त्याजवर जातें. लडाई होती. दुतरफा माणसें जखमी होतात. ते फिरून जातात,

हे फिरून येतात यैसे नित्ये उठून लागले आहे. श्रुत जाले पाहिजे. बहुत कार्ये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶Shamrao Yadav writes news from Vellore regarding a skirmish between Muhammad Alikhan and Murarrao in which the former was repulsed. " Murarrao is determined to rout him completely and then make use of his head gear and not till then." " The French have deputed Sujayatkhan to the Peshwa with robes of honour for him and Bhausaheb. He should not however be called in for interview until my arrival," says he.

No. 101] [23-4-1753 ?

२

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री

पंत प्रधान स्वामी

विज्ञापना. महमद आलीखान त्रिपदीस होते त्यास चैत्र वद्य ५ सोमवार ते दिवसी देवनापाटणास गेले. त्रिपदीस ठाणे ठेविले. मुरारराऊ घोरपडे यानी आपली फौज व फिरंगियाचा जमाव तोफा वाट बांधायासी पुढे पाठविले कीं देवनापटणीहून रसद घेऊन येतां वाटेमधे लडाई करावी. त्यास सोमवारी साईकालपावेतों देवनापटणानजीक राहून रात्रीस कूच केले. त्रिपदीचा मार्ग सोडिला. रातोरात चिदंबर येथे येऊन पावला. त्रिचनापलीस जावयाचा उदेग केला. चिदंबर म्हणजे कडपेवालियाचे ठाणें. देवनापटणवालियाचा चिदंबर-कराचा स्नेह. त्यानीहि आपले गावांत इंगरेज आणू पाठवेले आहेत. त्याचे ठाणे त्याचा झेंडा लाविला आहे. महमदआलीखानांचा चिदंबरकराचाहि स्नेह. ते ते आवघे एकच आहेत. तेथे श्री चे देवाईल मोठे आहे. त्याचाच किला त्यानी केला आहे. त्या आसरियावर तेथे येऊन राहिले. मुराररायाचे लोक वाट धरून दिवस उगवेपावेतो होते. दिवस उगवलियावर मनास आणिले तो देवनापटणीहि झेंडे दिसत नाहीत. त्रिपदीस फिरून आला नाही. काये जाले तहकीक करतां दिवस उगवता मंगलवार चिदंबरास जाऊन पावले. फौज मुरारराऊ याजपासीं फिरून आली. बातमी चिदंबरचीहि आली, तेव्हा यानी आपली फौज व गोरंदोर याचे लोक त्याजकडे रवाना केले. आपण मात्र खासा तीनसे स्वारानसी दोनसे फिरंगी व गाडदी व कांही तोफा गोरंदोराकडील घेऊन तलावरच राहिले. नंदराज पटणेकर त्यास पुढे हूलस्वार ५ पाठविले की

3923

महमदआलीखान त्रिचनापलीस येतो; तुम्ही सावध राहाणे. आपले फौजेस सांगितले की तुम्ही पाठलाग करणे. आपण त्रिपदीचे ठाणे घेऊन मागून येतो. पाचसे माणूस त्रिपदीच्या ठाणियात मा। आलीखानाचे आ(हे). याची त्यांची खटपट होत आहे. येक मुकाम चिदंबरी करून दुसरे दिवसी कूच करून कावेरी उतरून मा। आलीखान चंदावरच्या मुलकात चंदावरकराच्या ठाणियाच्या आसरियासी गेला. चंदावरकरांही काहीं फौज कुमकेस पाठविलीं, खर्चीविचाहि परामृश केला. त्रिचनापलीस नंदराज यानी जेर केले होतें. तेथूनहि लिहिली आली होती; सेतुपति करवर व तोडमान व चंदावरकर याचीहि लिहिली मा। आलीखानास येऊन पावली की सत्वर इकडे येणे. नंदराजाचे ठाणे मारून काहाड, खर्चासहि देऊ. त्यासहि आपले आपले स्वस्थानाचे भयेच आहे, याजकरिता सामील होणार. याच्या फौजा भोवताल्या हाका बोंबा मारीत जातात. मा। आलीखान त्रिचनापली पावला असल किंवा पावल. हे विज्ञाप्ति.

¶Shamrao Yadav sends news to the Peshwa about the plans of Murarrao against Muhammad Ali who was proceeding to Trichinopoly. The rulers of Tanjore and Mysore and some adjoining chiefs are mentioned as taking part on one side or the other.

No. 102] *[28-4-1753*

३

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
पंत प्रधान स्वामी

विज्ञापना ऐसीजे. मुजफरखान याचे बंधु हसनुदीखान देवनापटणात कैदेत होते. त्यास श्री ने कृपा केली. चैत्र वद्य १० शणवारी प्रातकाली होता येऊन फुलचेरीस पावले. सुक्रवारचे रात्री त्यास श्रीने वाट दिल्ही. दोघे भोई व हमेशा[१] पकवान्ये व भक्षायांस फुलचेरीहून प्रतेहि घेऊन जात आसत. खिजमतगारहि येक पालीप्रमाण जात होते. अगोधर ठीकठाक करून ठेविले होते. तटाबाहीर घोडा आणूण ठेविला होता. चौकीदारासी बहुत खायापियास दिवसवड[२] उदंड देऊन त्यास राजी ठेविले. फारसी खबरदारीहि नवती. मा। आलीखान गेलियांवर प्यादेहि बहुतसे सावधतेमधे नवते. भोईयाची पांघुरणें चिंध्या आपले

---

१ दररोज. २ रोजमुरा; रोजचें वेतन.

आंगी घातल्या. आपल्या जागियावर येक चाकर निजविला. खाणेपोश[१] डोईवर घेऊन रात्री निघाला. तटावरल्या प्यादियासीहि पहिलेच राजी ठेविले होते. हमेशां राबता भोई याचा होता. परवानगी त्यास येयाची जायाची होती. रात्री खाणा घेऊन यावा, दिवसा जावे; दिवसा यावे रात्री जावे. येक वेल मोकरर नवती. येकलाच डोईवर खाणपोश घेऊन तटाबाहीर पडिले. कोण आहे म्हटले तर हसनुदीखानाचा भोई आहे म्हटले. येक भोई व येक खिजमतगार मागून आंतऱ्यानें आले. तटाबाहीर पडलियावर घोडियांवर बसले. याप्रकारे फुलचरीस येऊन तटावर पावले. प्रातकाल होताच गोरंदोरास समाचार कलला. फार संतोश मानून लोक पुढे पाठविले. मोठे समारंभाने घेऊन गेले. फार खुशवेख्ती केली. तोफा फार सोडल्या. इतका तपसील यैकिला तसाच लिहिला आहे. सारांश हसनुदीखान फुलचरीस येऊन पावले. श्रुत जाले पाहिजे, हे विज्ञाप्ति.

¶*Graphic details are given by Shamrao Yadav of the escape of Hasan-ud-din Khan to Pondicherry from the confinement of Muhammad Ali. Hasan-ud-din was the brother of Muzaffarkhan, probably the first artillery expert trained by Bussy.*

No. 103] [*4-5-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनती सेवक शामराऊ यादव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता। वैशाक सुद १ भृगुवार मु॥ किले वेलूर येथास्थित जाणऊन स्वकीये क्षेम लिहीत आज्ञा केली पाहिजे. विशेश :—कृपा करून आज्ञापत्र पाठविले ते छ २३ जाखरी पावले. छ २० जमादिलवलचे पत्र होते त्यास जासूद परभारे फुलचरीस गेले. तेथील कागदाचा जाबू घेऊन फिरून वेलुरास आले. तेव्हा पत्रे दिधली. त्यास पूर्वीच किले चेनपटचे मुकामीहून रायेमल मिर्धियाचे कासीद-

---

१ खानपोश=ताटावरचें आच्छादन.

जोडी रवाना केली त्याजपलीकडेहि पाच सा कागद पाठविले त्याचे उतरच नाही. हली वेलूरचे मुकामीहून भिकाजी नाा याचे नाईकीची जोडी छ १८ जाखर चैत्र वद्ये ६ रवाना केली आहे. तेहि सेवसी पावल. स्वामींनी कृपा करून श्रीरंगपटणाचे वर्तमान व माघारे जावयाचे लिहिले त्याजवरून कळ आले. आज्ञा केली की च्यार महिने तुमचे राहाणे जाले, तर सेवकास आज्ञा प्रमाण. परंतु पत्री आगोधरच फुलचेरीहून निघालो. कितीक वर्तमान कागदीपत्री लिहिलियाने बनून येत नाही. रुबरूच विनंती केली पाहिजे. या प्रांतीचा प्रसंग येक प्रकार जाला आहे. गोरंदोर याचा वकील सुज्यायितखाननामे पुढेच आला आहे. त्याचे वर्तमान सेवेसी लिहिले आहे. गोरंदोर व ज्यान बेगम उभयेता स्वामीचे आज्ञेवेगळी नाहीत. त्यास जे सांगावयाचे ते सांगितले आहे. ते सर्व प्रकारे स्वामीचे आहेत. तोफ येक मागून घेणे म्हणऊन आज्ञा. तर येक तोफ काये दोन तोफा देतील, परंतु आतां देसास पावणार नाहीत. फौज इकडे आलियाने जे आज्ञा कराल ते हाजीर आहेत. तोफाचे सरंजामीचे माणसे व गोलंदाज मागोन घेऊन पाठवणे म्हणऊन आज्ञा केली त्यास मी तर आगोधरच तेथून आलो. तेथे आसतो तर पाठवितो. आताहि त्यांस लिहिले. तेथे येक कारकूनहि आपाजी राम म्हणऊनु ठेविले आहे. जे वर्तमान होई ते वरचेवर लिहून पाठवीत जाईन. त्यास तीन च्यार जोडिया या प्रांतीच्या ठेवावयासी सांगितले आहे. गुलाम मूर्तजाखान वेलूरी आहेत. त्याजपासीहि येक ग्रहस्त ठेवितो. त्यास आरकाट (क)चा तालुका जाला आहे. ते सादतुलाखानाचे नातू. त्याच्या पुतन्याचा पुत्र बहुत मातबर आहे. त्यास स्वामीचा भरंवसा फार. पूर्वी वडिलाचा घरोबा आहे. याजकरिता त्यास भरवसा फार आहे. फौज इकडे यावी. त्यामुळे कामकाज होऊन यावे. सरकारचेहि काम व्हावें. आपलाहि बंदोबस्त करून घ्यावा. यैसा त्यास भरवसा आहे. गोस्टीमातेने काही कामकाज होत नाही. सर्वा गोस्टीस भयाची प्रीत आहे. प्रस्तुत या प्रांतीचा कलह तुटत नाहीं. कजियाच आहे. मजला पंधरा दिवस राह्यास कारण शेरीरास उपाध निर्माण जाली. त्यास यैाशध करून उपचार केला. वैशाक सुद ३ रविवारी येथून स्वार होऊन मजल दर मजल सेवेसी येतो. स्वामीचे कृपेकरून वेथेस उतार पडला. श्रुत जाले पाहिजे बहुत काये लिहीणे हे विज्ञाप्ति.

¶*Shamrao Yadav reports the friendly attitude of the French Governor Dupleix and his wife and their readiness in helping the Peshwa with guns and ammunition.*

3926

No. 104] [26-5-1753 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

सेवक विठल विश्राम साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायेत छ २२ जमादिलाखर मुकाम भादुरबांडा स्वामींचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें. यानंतर स्वामीकडून आज्ञा घेऊन आलों ते आठवें रोजीं येथें पावलों. मार्गी पावसामुळें व बुनगे फार तन्मुळें गुंता पडला. येथ पावतांच लष्कर परभारें भादुरबांडानजीक ठेऊन आम्ही बिसहलीस जाऊन राजश्री चिमणाजी कृष्ण यांस भेटून त्यास बरोबर घेऊन लष्करास आणून रा। तात्याची व सर्वांच्या भेटी करून मशारनिलेस घेऊन किल्लेस जाऊन राजश्री खंडोजी मोरे व नरोजी मोरे यांस आणून लष्करामध्यें सर्वांस भेटऊन दुसरें दिवशीं प्रहर दिवसास सुमुहूर्ते सरदार आदिकरून समागमें घेऊन निशाण चढविलें. नौबत व तोफा सरबत्ती करून पेशजीं लोक होते त्यास व राजश्री खंडोजी मोरे व नरोजी मोरे यांस कबिलेसुद्धां किल्लेखाली उतरून ठेविले, आणि येतेसमयीं खानदेशीं लोक व खासबारदार आणले होते त्यांस तटावर व बुरुजांनीं व दरवाजेस नेमणुका करून किल्लेवर जावजी जाधव यास ठेविला. किल्लेचा बंदोबस्त केला, दारूगोळी आणिलेप्रमाणें चढविली. गैरकबजी मुलुक आहे. तो दबामुळें हारी यावा, त्यास प्रस्तुत फौज थोडकी, येवढे फौजेनें मातबर कामें कैशी होतील ? याविशी कितेक तपाशिलें लिहावें तें राजश्री तात्याचें पत्रीं लिहिलें आहे त्यावरून सर्व विदित होईल. तो मजकूर सर्व समजोन जी आज्ञा करणें ती करावी त्याप्रमाणें वर्तों. मुख्य गोष्ट स्वामीचें आगमन हे स्थळीं होतें म्हणजे कितेक काजकामेंहि होतीं, व किल्लेची बंदोबस्ती होऊन सर्व वृत्त ध्यानीं येतां किल्लेवर व शाहार कोटांत येकूण हजार प्यादा पाहिजे ; त्यास लष्करास असतील तर रवाना करावें. नाहींतर सेवकास आज्ञा जाहाली तर त्या प्रांतांतील विश्वासू मर्दाना ऐसें पाहून जामीन घेऊन लोक ठेऊं. किल्लेवर पेशजी सामान काय आहे त्याची अलाहिदा याद व तट घेरा व बुरुज व वरील घरें आहेत त्याचा तपशील लिहून मागाहून पाठवितों. आठा रोजांचा अवकाश करून येणें जाहलेंवर सर्व बंदोबस्त होऊन आणखीं ठाणियाचा विचार होईल ऐसें आहे. रायदुर्गास स्वार व कागद पाठऊन पैका आणवितों. त्याच्या बोली स्वामीसंनिध आहेत, त्यास आज्ञा करून येथवर रवाना करावें. स्वस्तान जातें. आज फार खराब जाहाले याजकरितां कांहीं सोड द्यावी. ऐसा

त्याचा अर्ज आहे. याविशी राजश्री तात्यांनीं लिहिलें आहे त्यांस आज्ञा करणार स्वामी समर्थ आहां. यादवाडची वोळे[१] नवाबाजवळ तिसा हजारास पडली आहे त्याविशी विनंती करणें ती केलीच होती. शावणुरचे बोलीमध्यें तीस हजार रुपये वजा करून त्याची वोळ राजश्री रामचंद्र आणाजी व पांडुरंग शामराज व विसाजी नारायेण यांणी करार केलेप्रमाणें सोडून आणवावी, तोहि बंदोबस्त करावा लागतो. सदर्हू वोळ व त्याचे कतबे नवाबांकडून आणावया स्वामी समर्थ आहां. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*Vithal Vishram, the Minister of Savantwadi, writes to the Peshwa from Bahadur Binda on the project of capturing Bisehalli and other places.*

No. 105] *[1753?*

श्री

पुरवणी सेवेसी विठल विश्राम विनंती. कुडालाहून फौज कूच करून अजरेस आली. समागमें तीर्थस्वरूप राजश्री पांडुरंग बावा दोन हजार प्यादा व साहाशें स्वार घेऊन आले. आणाबगांवचें ठाणें घेतलें. सरकारचें ठाणें ठेऊन फुढां शाहापूर बेलगांव कितुर प्रांतीं तमाम गांवखेडीं मारून खंडणी घेत घेत राजहंस-गडाखाली तळ देऊन बैसले आहेत. इकडून स्वामीचीं पत्रें गेलीं फौज येणेविशीं, तेव्हां तिकडील मनसबा राहिला. तीनशें राऊत विसाजीपंत याबराबर ठेविले आहेत तेवढे राहतील. वरकड बेलगांवचें काम बोलीचाली जाहाली आहे. परंतु आपण जात आहूं. गेलेनंतरी कसकसा विचार होऊन येतो तो पाहून, जर करितां कार्य प्रस्तुत उरकून येतें ऐसें असेल तर उरकून स्वामीस लिहून पाठवितों. तैसेंच मर्दनगडच्या कामास नारो गणेश याबराबर कृष्णपा कलबुलकर पाठविला होता दाखला घ्यावयास, तोहि तेथील दाखला ज्या ज्या प्रकारचा होऊन यावा त्या प्रकारचा होऊन आला. वाडीस आहेत. तेंहि काम करावें लागतें. कोकणांत जाते-क्षणीं दोन्ही मनसबे कसकसे विचार होतो तें सविस्तर सेवेसी लिहून पाठवितों. मुख्य गोष्ट कोणतेहि धणीकाम या प्रांतीचीं आपण करावीं आणि निसबतदार इतर होतात. तेव्हां याचा अभिमान स्वा(मी)स असावा. आपला हेत जे, धणीकाम करून मजुरा करून घ्यावा हाच हेत येहून दुसरें चित्तीं आहे ऐसें नाहीं. याचा सविस्तर भावगर्भ सेवेसी पहिलाच श्रुत केला आहे. कां तर तो प्रांत आमचा. सर्व प्रकारें माहीत आम्ही. जे सेवा घ्यावी ते आम्हांकडून घ्यावी ऐसें आहे.

---

१ ओलीस दिलेले लोक.

एतद्विशीचा अर्ज स्वामीचें येणें पुण्याप्रांत जहालें तर विदित होईल. बहुत काय लिहूं ? चिरंजीव गुणबा स्वामीसंनिध आहेत. त्याचें सर्व प्रकारें ऊर्जित करणार स्वामी आहेत. रोजमरेचे त्याचें चालीस लाऊन द्यावया स्वामी आहेत. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Vithal Vishram to the Peshwa, informing the addressee of the tributes the writer exacted from Belgaum and territory round it and requesting him to come to those parts personally.*

No. 106] [2-5-1753]

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक विठल विश्राम साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायेत छ २७ जमादिलाखर मुकाम पराक्रमगड स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें. यानंतर सांडणीस्वाराबरोबर आज्ञापत्र पाठविलें. पावोन संतोष जाहाला. किल्ला मात्र घेतला. पुढां वरकड तरतूद व्हावी येतद्विशीचा विचार पेशजी स्वामीस लिहिलेंच आहे. हाली कोपलचा मजकूर येथील कितेक तपाशिलें लिहावें तें सर्व राजश्री तात्याचें पत्रीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. याजउपरी स्वामीकडून आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तों. सर्व मजकुराची पुरवणी अलाहिदां लिहून राजश्री नारायेणराऊ याचें नावीं सेवेसी पाठविली आहे. तें मनन करून जे आज्ञा कर्तव्य ते करावी. किल्ले मजकूरचा घेरा व टाकी व वरील सदर दरवाजे पाहारे वगैरे मोजदाद करून आलाहिदा याददास्त सेवेसी पाठविला आहे, त्यावरून विदित होईल. किल्लेवर पेशजीचे मोऱ्याकडील सामान कांहीं होतें तें त्याजकडून घेतलें. त्याची मोजदाद आजच्या उदैकच्या रोजांमध्यें करून सेवेसी लिहून पाठऊं. कांहीं दारू व शिसें व * * * * व मीठ हुके वगैरे ऐसें सामान किंचित आहे तें सर्व घेतलें आहे. त्याची याद मागाहून पाठवितों. मुख्य गोष्ट स्वामीचे पाय येकवेळ येथें लागलेनंतर सर्व मनोरथ सिध्दीस जातात, आणि सरकारचेंहि स्वहित होतें. पत्रीं पालाळ आलाहिदा पुरवणी लिहिल्या आहेत त्यांवरून सेवेसी श्रुत होईल हे विनंती.

¶*Vithal Vishram reports to the Peshwa his capture of the fort of Parakramgad with all its belongings.*

No. 107] [5-5-1753 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

सेवक विठल विश्राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ १ रजेब मुकाम बाहादुरबांडा जाणोन स्वामीचे कृपेंकरून सर्व वर्तमान येथास्थित असें विशेष. येथील बंदोबस्त थोडाबहुत जाहला. याजउपरी येथील भले लोकांस हुजूर आणून कराराप्रमाणे बहुमान करावा लागतो. स्वामीचें आगमन या प्रांतें होईल म्हणोन बहुतांस भरोसा होता. परंतु परस्पर ऐकिलें कीं, याजउपरी मजल दरमजल देशास जाणें होतें. यैसेयास ज्याप्रमाणें आज्ञापत्र येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. दारूगोळी व तूपतेल व जेजाला वगैरें पाठविले-प्रमाणें पावले. याची याददास्त तपशीलवार मागून सेवेसी लिहून पाठवितों. सामान येतेंक्षणीं किलेवर चढऊन जमा केलें. यानंतर राजश्री रामचंद्र आणाजी व पांडुरंग शामराज उभयेतांस कागद पाठऊन येथें आणविलें. ते प्रांतींचा सविस्तर मजकूर सांगितलेवरून कळला. ते प्रांतींचें नाजूक कामाचे संदर्भ राखोन धरावें त्याप्रमाणें धरिलेच आहेत. परंतु त्याप्रांतीं दोन तीन हजार फौज घेऊन गेलेविना कामकाजें होऊन येत नाहीं, या गोष्टींचा कितेक मजकूर आहे तो पत्रीं लिहो नयें, हुजूर येऊन सेवेसी श्रुत करावा लागतो. प्रस्तुत राजश्री विसाजी नारायण यास यादवाडामध्यें ठेऊन उभयेतां आम्हाकडे आले. यादवाडकर व गोकाककर देसाई यांसहि आणविले आहेत. ते येतांच त्यांस बराबर घेऊन हुजूर आणून त्याचा करारमदार विसाजी नारायण व पांडुरंग शामराज यांणीं दिल्हेंप्रमाणें बहुमान व वोलीचे सुटकेचा विचार करून द्यावा लागतो. यांचा वोलीप्रमाणे गुता उरकोन दिल्हेवर आणखी ते प्रांतींचे येक दोघे देसक पदरीं पडतात. परंतु यादवाडकरांचा कोणत्या प्रकारें निभाव होतो यैसें पाहात आहेत. धारवाडचाहि प्रसंग पूर्ववतप्रमाणें आहे तैसाच आहे. तेथीलहि दोघे चौघे मख्ताशीर आम्हाकडेस येथें आले आहेत. ते दिवशीं रामचंद्र आणाजी व पांडुरंग शाम स्वारी घेऊन गेले ते दिवशीं शिंदे याणींच दगाबाची केली त्यामुळें कार्य न होतां मावारां आले. फुढां ज्यासमयी होणें होऊन येईल; आगाध नाहीं. प्रस्तुत धकारनामकाचे संदर्भी आठ आसामी येथें आणिली आहे. भेटीअंतीं सेवेसी श्रुत होईल. हे विनंती.

¶*Vithal Vishram to the Peshwa, reports his doings and his disappointment at the prospect of the Peshwa's return to Poona direct and not through the western parts where the writer is administering.*

No. 108] [2-6-1754

श्रीसुबराज

राजश्री माहादाजीपंत पुरंदर
गोसावीं यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो॥ मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे. यानंतर पत्र पाठविलें पावोन लिहिला भावार्थ कलों आला. राजश्री श्रीनिवासराव चिटनीस यास आपणाकडे जाऊन स्वालजाब करून लेहून पाठवणे म्हणूनं मारनिलेकडे मुदाम जासुदाची जोडी पाठविली आहे. आपणाकडे येऊन सांगितल्याप्रमाणे स्वालजाब केलाच असेल. या घराणियाचे जरूर आपणास असतां लेहून जाणवणे काये? मारनिलेची आपली भेटी होऊन बोलणे जाल्याचा वृत सविस्तर लेहून पाठवावया सूज्ञ असा. रा छ १० माहे शाबान. बहुत काये लिहिणे.

¶*Murarrao asks Purandare to report to him the outcome of the joint deliberations between him and Shrinivasrao Chitnis who is specially deputed for the purpose.*

No. 109] [Recd. 9-6-1757 ?

छ २१ रमजान

श्रीराम

पुरवणी सेवेसी विज्ञापना. स्वामींनीं आज्ञापत्रें सादर केलीं तीं पावलीं. फौजेचा वगैरे अर्थ लिहिला तो कळों आला. यैसियास स्वामींनीं आमचे बेगमीची नेमणूक आधींच निमे करून दिली. त्यांतहि पांच लाख कमी. त्यामध्येंहि स्वामीच्या प्रतापें सिवायें मुलूख तीसबत्तीस लाख रुपये आजपर्यंत मेळविलें. परंतु फौज संभाळून मोठा वोढा श्रीरंगपटणकरांकडील ठाण्याचा वोढा वोढणें लागला. सिबंदी खर्च बेमबलग+ न करावा, त्यांस खर्चास न द्यावें, तरी ठाण्यांतून लोक उठोन येतील; शह टळेल. तेव्हां सर्व प्रकार ध्यानांत आणून ठाण्याकडें रुपया देणेंच पडला. तो खर्च जरी नसतां तरी कांहीं रुपया मागें पडतां. नालबंदी समजाविशीचा प्रकार तरी गुदस्तां स्वामींनीं शंभर राउतांच्या पथकास दाहा हजार रुपये दिल्हे. त्याचा सुमार पाहून आम्ही शंभराच्या

+ भरपूर.

पथकास येक हजार कमी करून नऊ हजारच दिल्हें. या लक्षानें वर्तणूक करून रवानगीचा प्रकार तैसाच राखणार. सेवेसी लोक आल्यावरी स्वामीच्या मर्जीस आलें तरी देतील. न ये तरी न देतील. या प्रमाणें त्यांतल्यात्यात कराखेत करून हे दिवस गुदरून अद्याप स्वामीच्या जुन्या मुलुकास ढका न लावितां दुर्ग पर्यंत आलों. यांत बिदरूरचा यैवज कांहीं नालबंदीस लागणें तो लागला आहे. पटणचे फौजेनें गाड्यांनीं बेमुबलग पैका खादला. यास आमचा उपाये काये आहे? आम्हाबराबरली फौज जे होती तिचे कबज देखील स्वामींनीं भरून द्या म्हणतील तर देऊं. या गोष्टी चाकर लोकांनी काय निमित्य बोलाव्या? परंतु ठाणियास खर्च व छावणीस कमनेमणूक जाली यामुळें मिळाला पैसा खर्च जाला म्हणून पांचसापावेतों बिदनूरपैकी खर्च होईल. बाकी यैवज घेऊन येत आहों. व बाकी तीन च्यार पावेतों गोपाळराव याजकडें रुजूं करून देऊं. फौजेस नालबंदी अकलहिशेबीं गुदस्तां स्वामींनीं नालबंदी दिली. त्याप्रमाणें येथील गणतीप्रमाणें नालबंदीचा यैवज तकूब गुदस्तांप्रमाणें ठेऊन बहुदा थोडेसें अधिकच तकूब ठेऊन तूर्त यैवज दिल्हा. तकूब परवानगीचा यैवज स्वामीजवळ ठेऊन ज्याप्रमाणें स्वामीचे मर्जीस येईल त्याप्रमाणें निर्गम होईल. छावणीस लोक राहिले म्हणून व झुंजले, जखमी जाले, दोन वर्षे मेहनत केली, मोर्चे फार जागां लावले म्हणून कांहीं आम्हावर उपकार नाहीं. चाकरानें चाकरी केली म्हणजे कांहीं उपकार नव्हे. हें ध्यानांत आणून अक्कलहिशेबीं यैवज दिल्हा व याप्रमाणें कचें वर्तमानहि सेवेसी लिहिलें आहे. तर पुढें रवानगीचें वेळेस मोघम द्यावें न द्यावें हें लौकर सांडणस्वाराबराबर आली पाहिजे. त्याप्रमाणें वर्तणूक होईल. पत्राचें उत्तर सत्वर यावयासी आज्ञा जाली पाहिजे. मार्ग लक्षीत आहों. सेवेसी श्रुत होयें हें विज्ञापना.

¶*The writer, probably Balvantrao Mehendale, complains about the shortage of funds for the maintenance of the army at Seringapatam.*

No. 110] [*1-2-1755?*

श्री

श्रीमंत राजश्रीं पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शेषो नारायेण साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम माघ वद्य चतुर्थी मंदवासरपर्यंत स्वामीचे कृपावलोकने येथास्थित जाणून स्वकीयें संतोष लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामींनी दया करोन स्मरणपूर्वक

पत्रीं आज्ञा निरोपिली. सुसमयी पत्र प्रविष्ट होऊन सेवकास संतोष जाहला. तेथें लिहिलें जे तुम्ही सर्वप्रकारें पदरचे आहां, राजश्री विसाजीपंत धण्यासंनिध ठेविले आहेत. धण्याचे आज्ञेप्रमाणे होईल वर्तमान तें मशारनुलेस सांगत जाणें. तेणेप्रमाणे ते लेहून पाठवितील म्हणऊन पत्रीं लेखन करविले. आज्ञेप्रमाणें सेवेसी सादर आहों. सांप्रत मशारनुलेस धण्यानी आज्ञा करोन स्वामीकडे पाठविले आहेत. धण्याची आज्ञोतरे निवेदितील त्यावरून श्रुत होईल. इकडील अर्थ श्रीमंत राजश्री भाऊसाहेबीं धण्याचे मनोगतानरूप निवेदन केलेच असतील. तदनरूप स्वामीचे आगमन घडोन दर्शनाचा योग घडावा येविशी मशारनुले विनंती करतील त्याजवरून सेवेसी श्रुत होईल. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Shesho Narayan to the Peshwa, communicating the writer's wish to come and visit the Peshwa in person. The writer's identity cannot be fixed.*

No. 111] [*24-2-1755*

श्री

सेवेसी विठल विश्राम कृतानेक सां। नमस्कार विज्ञापना. ता। छ १२ जमादिलावल मु॥ नवलगुंद जाणून स्वामीचे कृपेकरून क्षेम असों. यानंतर तोफखाना व राजश्री शामराव यांची आमची भेट आज जाहाली. आम्हास त्यास दोन कोशाची तफावत आहे. आम्ही तोंडावर आहों. ते मागा दोन कोश आहेत. उद्यां कूच करून आम्हाजवळ आणू यैसेयास वाणीं तों अद्याप कोणी आले नाही. धारवाडी तीन हजारपर्यंत व नरगुंदी दोन अडीच हजारपर्यंत भरताड येणेप्रमाणे गेले आहेत. कांही मनोलीस वगैरे प्रांती गेले आहेत. अद्याप आले नाहीं. चौ रोजामधे कुलीं येतील. तोफा तो आणावयाची निकड, यास कैसी तजवीज करावी ते आज्ञा होईल त्याप्रमाणे कूच करून येक मजल हरदू वाटा नेमिल्या आहेत त्यामध्ये येक वाटेने येत आहों. जे वाणी बराबर येतील ते घेऊन येऊ. तोफा वाण्याकरितां तटून ठेविता नये, याकरितां येत आहों. आणखी येक प्रसंग सरलस्कर समीप आले असेत. तेहि बहुतेक हुबलीचे मार्गे येतील. यैसेयास आम्ही ते येकत्र जमा होऊन भारीपणें यावे कीं दुसरा कितुरच्या हशमी वगैरे जमाऊ येतो, * धारवाडच्या रस्ता व पैका येणेचा येणार. हुबलीं पावेतों या वाटेने गेलेने रस्तेचे वाणी येकड दुकड येऊन मिलाले तर फिकीर नाही यैसे आहे; आणि स्वामीनी निरोप दिले या समई हुबलीचें ठाणे घेणेस येईल. फार तर

येक मुकाम पडल. इतकेने रस्ता येणेजाणेस रान मोकलेच जाहाले. तोफखाने च्यांस सत्वर लस्करास जावयाची तांतड. कुंदगौलावरूनच यावें तरी काही फौज रवाना करावी. हुबळीविसी आज्ञा जाहालेने विल्हेस लाऊनच येऊ. हुबली काही मजबूद ठाणे न्हवे. चालते स्वारींत येका दिवसानें हस्तगत होईल. कुंदगोलावरून यावें तर बराबर कापला जुलला नाही. वाटेने फुडा जाहालों म्हणजे मागील येणारास वाट फुटणार नाही. कुंदगोल, सवांसी[१], येलवती, सिरहटी येका बारीनेच आहेत. त्यांचाहि जमाऊ भारी, कुंदगोलावरील वाटेस पाण्याचा तोटा, तोफखाना तीन कोश चालतो. बैलांचा तोटा, अधिक जावत नाही; सांगितले मार्गाने जाणेस हेका करितात. कुंदगोलावरील वाटच कोणी बिदविली (?) आहे; परंतु त्यांत आपण कैसे जावें हे उमजत नाहीं. कुंदगोलचे गळीं सध्या पडावें तर फौज भारी पाहिजे. गडीहि मजबूद; आठ च्यार दिवस लागतील. दुसरे जामदारखाना व कातवार बराबर आहे. हे पला पाऊन मग गलां पडावें यास्तव हुबलीवरून यावे तें गडी घेऊन मोकलें करावें म्हणजे धारवाडपासून पटी मोकली जाहाली. फुढा कुंदगोल सांवसीस आणखी फौज आणून नेहमी तेंच काम विल्हेस लावावे म्हणजे चोरटे राऊताची जागा मोकली जाहाली. दोन वाटानी यावयाची तजवीज केली; [यापुढील पत्रांचा बंद गहाळ आहे.]

¶*Vithal Vishram writes about the movements of the army in the Karnatak, roundabout Dharwar, Hubli and Kundgol, and asks which way he should proceed.*

No. 112]

[*8-3-1755*

श्री

श्रीमंत राजश्री बाबासाहेब स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक बनाजी माधवराऊ कृतानेक सां। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २४ माहे जमादिलौवल पावतों कृपाकटाक्षें जाणून स्वानंदातिशय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. मार्गीं सावणुराहून आलिकडें कडुरांस पावलियांची पत्रें वरचेवर पाठविलीं, पावलीं असतील. कडूरी गढी चिठी यावयास दिवसगतीमुळें पंधरा दिवस राहणें जालें. गढी चिठी आलियानंतर मार्गीं पाच सात दिवस येऊन येथे अष्टमी फालगुण वद्य बुधवारीं पावलों. आज च्यार

---

१ सावसी.

3934

दिवस जाले. अद्याप दलवाई यांची भेटी जाहली नाहीं. दिनसुधी नहुती याजकरितां रामरावजीची भेटी होऊन सर्व वर्तमान त्यांस विदित जालें. वरचेवर बालपाकडील पत्रें येतात, त्याजवरून त्यांस लस्कर समीप आलें हेहि कळलें आहे. रामरायांसी यांसी बोलणेंहि जाले आहे, परंतु संस्थान वोढीखालें पडलें. दुसरें मोगलाचा शहहि आहेच. घाटाखालील फौजेस खर्चास पाठवावें. चौकडूनहि यास फिकीरच आहे, यास्तव संकटांत पडले आहेत. आमच्या फौजेसी बिगाड करावा. दुसरी गोष्टी सांगवते यैसा तों अर्थ नाहींच; परंतु आठ च्यार दिवस मागें पुढें निर्वाह करतील. स्वामींनी वरचेवर पत्रांची रेज लावावी. सांडणी-स्वार पाठवावे. कसीद जासुदांस लौकर आम्हाकडे पाठवीत नाहींत, याजमुळें सांडणीस्वार पाठऊन देत जावे. स्वामी येशस्वी आहेत. येश स्वामीस येईल याविषयीं काहीं अनमान आहे यैसें नाहीं. जितकें आपलें आगमन समीप होईल तितके कार्य साधतें यास्तव तुंगभद्रातीरीं आलियाचें वर्तमान सीघ्र लिहून पाठविलें पाहिजे. स्वामीकडील पत्रें कासीदासमागमीं आलीं तेंच बजिनस दलवाई यांस पाहावयास पाठविलीं. त्याजवरून बरेंच आवगत जालें. सारांश निकट फौज आली यावेगळें सीघ्र गुंता उरकत नाहीं. पर्जन्यकाल समीप आला, माघारें सीघ्र जातील, गतवर्षीहिं यैसाच अर्थ घडला, याजकारितां च्यार दिवस दीर्घ-सूत्रावर घालवावे यैसें कितेक दुर्मंत्री विचार सांगतात. यास्तव फौज समीप आलीं यैसें कलले म्हणजे पांया पडून कार्य सत्वर करून देतात. कलावें म्हणून सेवेसी लिा आहे. श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Banaji Madhavrao to Mahadoba Purandare writing from Kadur says that he was unable to see the Dalwai. He then describes the monetary difficulties of the state and asks the addressee to direct forces at once to the river Tungbhadra.*

No. 113] [*4-5-1755*

पौ छ २९ रजब

श्री

श्रीमंत महाराज राजश्री भाऊसाहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २१ माहे रजबू पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र आले ते मस्तकी वंदून सनाथ जालों. तेथे आज्ञा कीं इकडील सविस्तर वर्तमान लिहिणें, त्यास सोंधे, बिदरूर, बसवपटण,

चित्रदुर्ग येथील कारभार उरकला. लस्कर वालीयाचे नदीवर आले. सावनूरचे खंडणीची निमे बाकी राहिली आहे तिचा निर्गम करून घेऊन अधिकमास सरतां सेवेसी येऊन पोहचणे होईल. श्रीमंत राजश्री बाबाच्या शरीरास आठपंधरा दिवस फार वेथा झाली होती; परंतु महाराजाचे कृपेकरून प्रस्तुत थोडेबहुत आरोग्य जाले आहेत. इकडील सविस्तर वर्तमान सेवेसी श्रीमंत राजश्री बाबानी स्वामीस लिहिले आहे त्याजवरून सविस्तर विदित होईल. स्वामीच्या चरणाचे दर्शनाची उत्कंठा फार लागली आहे दर्शन होईल तो सुदिन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती.+

¶*Visaji Krishna to Sadashivrao Bhau, informs him of the settlement of the affairs of Bednur, Basavapattan and Chitradurg.*

No. 114] *[2-6-1755*

पौ छ १२ रमजान

श्री+

श्रीमंत राजश्री नानासाहेब व
तथा राजश्री भाऊसाहेब स्वामीचे
शेवेसी

आज्ञाधारक विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २१ माहे शाबान मुकाम देवनहली स्वामीचें कृपाद्रष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी पेसजी गुमनाडपालेच्या मुकामीहून सेवसी लिहिलें आहे त्यावरून विदित जाहाले असेल. त्या आलीकडे कूच करून बुरुकुंथ्यास आलो. बुरुडकुटे ठाणे चिकबालापूरकरांचे, त्यास हला करून ठाणे घेतलें, आणि तेथं सरकारचें ठाणे बसऊन चिकबालापुरानजीक मुकाम करून राहिलो. तेव्हां मातबर वकील येऊन संस्थान माारची खंडणी येक लाख चालीस हजार करार केली, त्यापैकी निमे सध्या द्यावे व निमे दोन महिनियानी द्यावे, याप्रमाणे करार करून बोली चांगल्या दिल्हा. तेथून कूच करून देवनहालीस आलो. मोर्चे लावावे, हाला करावी, हे तजवीज होती; त्यास स्वामीचे प्रतापेंकरून देवनहालीकर गावासमीप जाताच कौलास आले. कौल देऊन बाहर काहाडिले आणि सरकारचे ठाणे देवनहालीत बसविले. राजश्री मुकुंद श्रीपत याचे स्वाधीन ठाणे केले. राजश्री बनाजी माधवराव या तळावरी

+ कर्नाटकस्वारींतून पत्र. अधिकमास ज्येष्ठ शके १६७७.

आले, तेथील वर्तमान येकता काही जीव दिसत नाही. कनबडी वेकटपंतीं सोडून आधिकार द्यावयास नेले आहेत व दलवाई मैसुरास आले आहेत. ते व हे येकत्र जालियावर काही जाले तरी कलेना; परंतु काही होता दिसत नाही. चित्रदुर्गकर याणी आणापाचे मारफतीने राजकारण लाविले आहे. आणापाहि लस्करात आले आहेत; परंतु राजश्री गोपालराव आजपावेतो आले, आसते तरी दोनी फौजा मिळोन चित्रदुर्गास बरी जरब देतो, आणि स्वामीचे मर्जीप्राा कार्य करून घेतो; परंतु ते आद्याप तुंगभद्रा उतरूनच आले नाहीत. कृष्णेपलीकडील पत्रे आली होती. आता दिवस पाऊसालियाचे समीप आले फौज छावणीस राहिली. घोडी खराब, उंटे खराब, आणि आधिकामुले येक महिना ज्याजती पडला, वरसाचा जेष्ट आला याप्रकारेचे वर्तमान आहे. तथापि होईल मजकूर तो करून घेतच आहो. जसा प्रसंग पडल तसा गुंता उरकून घ्यावा लागेल. इतकियात राा गोपालराव आले भेटी जाली आणि दोनी फौजा मिळोन जरब बसली; तरी बसवीत आहो. जर त्याचे येणे नच होये तर जसे कलेल तैसे उरकून घेऊ, आणि देशास फौज घेऊन येऊ. सेवेसी विदित होये. वरकड इकडील सविस्तर आर्थ राजश्री बलवंतरावजी याणी लिहिला आहे. त्याजवरून विदित होईल सेवसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Krishna to the Peshwa, announcing the capture of various places in Mysore territory and awaiting the arrival of Gopalrao Patwardhan.*

No. 115] [*3-7-1756*

श्री

सेवेसी मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत. सेवसी विज्ञापना. छ ४ सवालीं हलीहाल येथून कूच केले तें तिसरे प्रहरी मौजे सिपूर येथे पागासुधा सेटीबा देखील आज येथे मुकाम केला. उदयेक प्रात:काली राजश्री बालोजी सिंदे यांस पागा सुधां सेवेसी रवाना करितो. सेवकास सुतकाचा अवरोध आहे यास्तव सेवेसी येता नये. महमद आलम व सुमेरसिंग उभयेताहि समागमे आहेत. आज संध्याकाळपावेतो येथे येतील. मुजफरखान बहादरबिंडियास आले म्हणून बाजारी वर्तमान कृष्णातीरी आले आहे. परंतु सत्ये वाटत नाहीं. तुलसाजी नाईक व जासूदजोड्या त्याजवल ठेविल्या आहेत. जर बाहादरबिंडियास येते तर रामचंद्रपंत याचे पत्र व सरकारचे जासूद पत्रे घेऊन येते. आले वर्तमान लटिकेसे वाटतें. नारायेणकिरेयावर त्यांस सेवकानीं सोडिले. बाहादरबिंडियास

दाखल जाहल्यावर येक जोडी मुजरद त्याजकडे पाठविली होती त्याचे जाब आले आहेत, तें सेवेसी पाठविले आहेत, त्याजवरून विदित होईल. नारायेणकिरेहून त्याणी कूच करून हुसपेठेवर मुकाम केला होता. आदवानीचे रोखे जातात हे प्रमाण. कदाचित आमचे मागे सुबुध उपजोन आलेच तर वीस हजार रुपये पावेतो त्यास देऊन, तोफा वगैरे तेथें ठेऊन सडे पुणियास रवाना करावें म्हणोन राजश्री रामचंद्रपंत यासी बोलोन आलो आहो. त्याणीहि मान्ये केले आहें. त्याणींहि पत्रे पाठविली आहेत. येका दो दिवसी तिकडील पत्रेंहि येतील. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat reports the news of Muzaffarkhan's movements and attitude. Sumersing, the murderer of Narayanrao Peshwa, is here mentioned for the first time.*

No. 116] [*1756*

श्री

सेवेसी विज्ञापना. आहे यांत तुमचे बरे आहे म्हणोन सांगितल्यावरून कांहीं जाबसाल केला नाही. तथाप सदरहू बोलावे यैसी स्वामीची आज्ञा नवते; परंतु बोलिलो. यैशांस येविसी स्वामींची मर्जी जैसी असल तैसी आज्ञा केल्याने यांसी बोलोन जो मनोदये याचा कलल त्याप्रा सेवेसी लेहून पाठऊन. येविसी सेटिबा खराडे याणी सेवेसी लिा आहे त्याजवरून विदित होईल. पत्राचे उत्तर येईल त्याप्रमाणे वर्तणूक करून. सेवेसी श्रृत होईल हे विज्ञापना.

¶*Negotiations with Murarrao Ghorpade of Gutti are the subject matter of this letter of which the writer and the addressee are not known.*

No. 117] [*1-1-1756*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी नारायेण कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम ताा मार्गषर्षि वदी १४ पावेतो स्वामीच्या कृपेंद्दस्टीकडून सेवक लोकांचे वर्तमान येथास्थित आहे. इकडील सविस्तर विनंतीपत्रें पाठविलीं पाऊन विदित जाहलेंच

असेल. राजश्री नारोशंकर यानी मुंाात[१] विज्ञापना केली त्यावरोन श्रुत होईल. सांप्रत इकडील वर्तमान राजश्री मुरारराव घोरपडे वजारतमाब घाट चढोन कोल्हार प्रांते आलें. मडगसिरेस येणार. त्याणी सावनूरकरास पत्रें पाठविली जे तुमची आमची भेटी व्हावी. कडपे कनोल आदवानी वगैरे एकत्र होऊन भारी फौजेनिसी मनसबा करावा. नाहीतरी या दक्षणदेशचा वक्र[२] जातो. तेव्हां कळतच आहे म्हणोन लिहिले. त्यास याणी प्रतिउत्तर समर्पकतेन देऊनच लिहिले आहे म्हणोन वर्तमान आलें. वजारतमाब याणी राजश्री भगवंत गोविंद यांस पांच हजार फौज ठेवणे म्हणोन रवाना करून पाठविले. तेहि सवणूरास आलें. सेवेसी कळावें म्हणोन लिहिले आहे. सवणूरकर बाहीर डेरेस दाखल जाहलें. डंबळ सिरहटी हावनूरप्रांतास येणार आहेती. आदवानीकर नवाब न्यामदुलाखानहि फौजेची समजाविसी करून तेहि बाहीर निघणार. स्वामीची खास स्वारी जाहाली म्हणिजे सर्वेहि आपली स्थळे जवळ करून राहणार. कोपलकराकडील मााराविसी अगोदर विनंती लिहिली आहे त्याप्रमाणें आज्ञा करावी. बगर पेंठ घेतलेविना मार्गास येत नाहीं. स्वामीची खास स्वारी जाहालियास वेंच विलेस लागेल. परंतु खेडी खराब होतील. थोडी बहुत फौजच रवाना करून पाठविलिया इकडील पाळेगार वगैरे एकत्र करून पेठ घेऊन कार्याकारण फौज प्यादे ठेऊन घेऊन, दोन तीन म्हैनत गोस्टी विलेस लागेल. बहुताले ठाणी सरकारची जाहाली आहेती. रात्रीचे चोरीने खेडियास उपद्रव होतो त्यामुळे रयेतेस भरवसा वाटत नाहीं. पूर्वी या रांनी[३] त्याची ध्धशत पडिली आहे. लोकिक येक प्रकार होतो. आणि येथ राहणारासहि नाकर्तेपण येते. सुचला अर्थ सेवेसी लिहिले आहे. यावरी आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक केली जाईल. उगेच आहे. या सामा(ना)-निसी येथे बसल्यानें स्थळ जेर होत नाहीं. त्याचा उपद्रव राहत नाही. येविसी दोन च्यार वेळा श्रीमंत राजश्री तात्यास+ विनंती लिहिली आहे. आज्ञा करणार स्वामी समर्थ. प्रथमता पेठ घ्यावयास पाच सात हजार जमाव पाहिजे. उपरां-तिक हजार स्वार दोन हजार प्यादे जाहले म्हणजे महिने दोन महिनेत विलेस लागते. स्वामीची आज्ञा जाहलिया च्यार हजार प्यादे व स्वार दोन हजार मिळतील. सेवक जमा करील. सरकारातील एक हजार फौज आल्याने सहजच कार्य होते. या रानचे मिळतील त्यावरी दबा असावा यास्तव येक पतक असावे. पेठ घेतल्याने तर फिरोन फौज पाठवावयाची आज्ञा जाहली (तर) पाठवावयास येईल. त्यात अज्ञानपणे विनंती लिहिली आहे. आज्ञेप्रमाणें सेवक वर्तेल. विनाकार्य दरमाहे रुाा पंधरा हजार खाऊन येथे बसावे लागते. आज्ञा जाहलियानें

---

१ मुक्कामांत ?   २ प्रतिष्ठा, लौकिक.   ३ प्रदेशांत.   + विठ्ठल शिवदेव.

खामखा स्वामीच्या पुण्येकरून त्याचे ठिकाण लागेल. सेवक सेवेस अंतर करणार नाहीं. स्वामीसेवेवरी सरीराची आस्ता नाहीं. दया करणार धणी आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter from Visaji Narayan to the Peshwa, informing him of the intended combination of Murarrao and the Nawab of Savnur.*

No. 118] [*Recd. 9-1-1756 ?*

पौ छ ६ रबिलाखर

श्रीसुब्रम्हण्य

राजश्री सदासिवराव भाऊ

गोसावी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंक्रुत राजमान्य श्नों दौलतराव हिंदुराव घोरपडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल-लेखन करित गेलें पाहिजे विशेष. आम्हास ये(ऊन) साहा महिने जाहाले. अद्याप कोणतेहि गोष्ट निर्गमांत येत नाहीं. आपण येथें असतेत तरी हरयेक गोस्टीचा निर्गम होऊन येता. येथें स्वालजाब येथास्छित होत नाहीं. आम्हांस आपणाविना दुसरा आधार आहे असे नाहीं. मुख्य गोष्ट ज्यांत आमचा परिणाम आणि सेवा घडोन येई ; तिसरी गोष्ट भावाबंदात हांसे न होये; आणि आमचे मनोदया-नरूप आमचे हातोन सेवा घडे ते आपण करावें. आम्हांविसी राजश्री पंतप्रधान याणीं आपणांस लिहिलें आहे म्हणऊन यैकिलें. अशास ज्यांत आमचा परिणाम तें करावें. वरकड राजश्री जि(वाजी)-दामोदर विनंती करितां वि(दित) होईल. +उचित ते करावया (सूज्ञ) असा बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Daulatrao Ghorpade requests Sadashivrao Bhau to settle his affair finally and thus to give him an opportunity to serve the State.*

No. 119] [*13-1-1757*

पो छ १० जमादिलौवल

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी बाबूराव क्रुतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ २२ रबिलाखर पावेतो मुा गुतीत येथास्तित असो विज्ञापणा यैसीजे.

+ येथून पुढें अक्षर निराळे वळणाचें.

राजश्री अमृतरावजी छ ११ रबिलाखरी दो प्रहरा दाखल जाले. राजश्री राव ममलकतमदार गुतीहून चेनमपली सा कोसावर ठाणे पाहवयास गेलेच होते. रायाकडील समादिक जाऊन सनमानेकरून यास अनिले. रायास पत्र लेहून पाठविलिया रायानी सांडनीस्वाराबरोबर पत्र पाठविलें जे. पौश वद्य ९ गुरुवारी अठा घटिका उपर राव ममलकतमदार व अमृतरावजीची बहुत आदरे करून भेटी जाली. सरकारची पत्रें वस्त्रे तेच क्षनी जाली. दुसरे दिवसी राव ममलकतमदार अमृतरावजीचे सनमाने करून समादिक घेऊन याच्या डेरियास आले. पाच सात घटका बैसोन कितेक ममतेच्या व प्रीतीचे बोलने होऊन रावजीस वस्त्रे विडे देऊन, दुसरे दिवसी तलकोटात हवेलीस बोलाऊन, येकांती स्वामीची व राजश्री मलारजी होलकर याची पत्रे वाचोन बहुत संतोश जाहले. राव बोलिले जे उभयेताची प्रीत ममता आम्हावर आहे याजकरिता मातबर आम्हास न्यावयास पाठविले. चितात दुसरा विचार नाही हे पूर्ण ठाऊक आहे. जावयाची तयारी करून निघतो. कितेक कल्पणा अंतकर्णाच्या व कोन्ही लाहन मनुशाने सांगितल्यावरून चितात संवशये होता. ग्रहकृत्य व फौजेचे नदी अलीकडील पलीकडील व ठाणे जाती मानपान व बुंजरुखी[१] ममतेची व कितेक अनेक कल्पणा होत्या तितक्या, व राजश्री मल्हारजी होळकर गेले म्हणोन बोलिले. त्या राजश्री आमृतरावजीनी ध्यानास आनून, त्याचे उतर रावजीचे चितात दढ होऊन, निशा जालीसे बोलणे जालियानंतर, जावेसे करार वचन करून, छ २१ रबिलाखर प्राथकाली ब्राह्मण पंडित व शास्त्री बोलाऊन मुहूर्त करून, पत्रे लेहविली. माघ सुद ९ पंचमी सोमवारी प्राथकालीच खासगत अंगप्रस्थानेंकरून, बाहेर निघावे दुसरे दिवसी कूच दरकूच जावे, दुसरा विचार नाही याजकरिता च्यार दिवस गुंता जाला. राजश्री नागोजीपंती तेथील कितेक युक्ति प्रयुक्तीचे ममतेचे व मल्हारजी होलकर याजकडील रायासी बोलोन रायाच्या चितात खुशा होऊन स्वामीकडे जावयाचा दढभाव राव ममलकतमदार याच्या चितातील संवशये व कुन्हा न राहेसे बोलणे नागोजीपंती चार दिवस परियेत रायाच्या चितातील संवशये दूर होयेसा निशा करून, मार्गावर आनिले. नंतर राजश्री अमृतरावजीनी लिहिले त्यावरून श्रुत होईल हे विज्ञाप्ति.

साहेबाचे सेवेसी निबाजी नाईक चव्हान सां। दंडवत.

¶*Visaji Baburao reports to Nana the result of Amrutrao's visit to Murarrao Ghorpade. Amrutrao was specially deputed to Gutti to conciliate Murarrao Ghorpade and, according to the letter, has succeeded in his task.*

---

१ गौरव.

No 120] [2-2-1756 ?

श्री

साहेबाचे सेवेसी मानाजी पायगुडे सां दंडवत विज्ञापना ताा १ जमादिलावल इंदुवार प्रात:काल मुकाम हावेरी वर्तमान येथास्थित आसो विशेष. साहेबाचे आज्ञापत्र सादर जाहाले तेथें आज्ञा की तुम्ही तिकडे गेला. त्यास कहीकबाड बंद व्हावयाचा विचार कसा केला ते सविस्तर लिहिणे. अशास आम्ही ह्या तोंडास आलियावरी कहीकबाडाचा बंदोबस्त जाहलाच आहे. ह्या तोंडास कही यकंदर निघो देत नाही; परंतु राा विठलराव यास साहेबी लिहिले होते, त्यावरून काल रविवारी हावेरीचि पेठेवर आलो; परंतु पेठ आगदी अगोधर आठदाहा रोज पलोन गेली. येथें निरर्थक आलों; परंतु आज फिरोन माघारे कहीचे बंदोबस्तास आलो. आज्ञेप्रा बंदोबस्त करितो. येथे पेठेवरी आल्यास सड्या दांडग्यावरी दाहावीस माणूस जाया जाहाले येवढाच मात्र नफा जाहला. वरकड सविस्तर अर्थ राजश्री विठलराव साहेबास लिहितील त्यावरून कलेल. जाग्यावरून आमची फौज उठोन आलियावरी तिकडे कही जालो. अशास तेथे चार पाच हजार फौज पाठवून तिकडील बंदोबस्त होई तो अर्थ केल्यानें उत्तम आहे. इकडे मेहनत करावयास आम्हापासून आंतर होणार नाहीं. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Manaji Paygude to the Peshwa about arrangements at Haveri.*

No. 121] [8-2-1756

श्री

राजश्री जावजी गोली
गोसावी यांस

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेो जनार्दन बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. श्रीमंताचे पत्र आठवे रोजीं लष्करांतून आले. तेथें लिहिलें आहे कीं सावनूरकर व मुरारजी घोरपडे व मुजफरखान याणी येकत्र होऊन बखेडा केला, त्याच्या पारपत्यास सडे फौजेनसी पाठीवरी चालिलों, तेव्हां त्याच्यानें टिकाव न धरवसें जाहालें. तेव्हां सावनुराजवल गावचा आश्रा करून राहिले आहेत. आम्ही सभावता गराडा घालितों. लौकरच जेर करून पारपत्य उत्तम प्रकारें केलें जाईल म्हणोन लिहिलें असे. हें तुम्हांस कलावें म्हणून लिहिलें आहे. सारांश श्रीमंताचे सलाबतीनें त्याच्यानें टिकाव धरवतो येसें नाहीं. लौकरीच पारपत्य होईल. तुम्ही तिकडील

कार्यसिधी लौकर होये ते करणें. राजश्री खंडोजी माणकर व तुम्हीं येकविचारें राहून स्वामिकार्य होय तें करावें. कार्य करावयाचा समय हाच आहे. अवघे येकचित्त होऊन दुसरा भावगर्भ चित्तांत न आणितां कार्य करणें. रवाना छ ७ जमादिलावल. बहुत काय लिहिणें हें विनंती.

¶*Janardan Ballal Fadnis to Javji Gavli, communicating to him the news of the investment of Savanur and the efforts of the Peshwa to capture it.*

No. 122] *[11-1-1756*

छ ११ माहे जावल

श्रीसोमेश्वर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री जगन्नाथपंत स्वामीचे सेवेसी पोा माधवराव सोमनाथ कृतानेक नमस्कार विनंती. येथील क्षेम मिति पौष शुध दशमी मुा लस्कर प्रांत सावनूर यथास्थित असो विशेष. आपण कृपा करून पत्र पाठविलें तें पावोन सविस्तर वर्तमान कळले. शब्द लाऊन लिहिले कीं कांहीं वर्तमान गेलियातागाईत कांहीं न लिहिले. त्यास तुम्हापासून अलियास पाचवे रोजी पुणियास पोहोचलो. तेथें वीस बावीस रोज होतो. तदनंतर तेथून स्वार होऊन लस्करास आलो. ते गलगल्याच्या मुकामी मार्गशीर्ष वद्य द्वितीयेस लस्करास पोहोचलो. उपरांतिक श्रीमंताची दर्शने जाहली. मग तेथून दरकूच बागडकोटास आलो. तेथें मोर्चे लाविले. ते फते जाहले. आता राजश्री मुराराव घोरपडे व सावनूरकर नवाब व मुजफरजंग गार्दी व हरपनहलीवाले भुमे, ऐसे दहा बारा हजार फौज व दहा पंधरा हजार गार्दी व फिरंगी व प्यादे ऐसे जमाव करून युधास म्हणोन आले आहेत. यासी त्यासी पंचवीस तीस कोशाचा तफावत आहे. या प्रकारे इतके दिवस जाहले. अद्या(प)वर आमचा कांहीं जाबसाल जाहला नाहीं. तीन चार वेळा इतक्या दिवसांत दर्शन जाहले आहे. तशामधें कांहीं जलदी करून जाबसाल करावा कीं पर्जन्य गेला आहे तर आम्ही दोही महालाची मामलत टाकली, याजमुळें कांहीं काळजी नाहीशी जाहली. बाकी फार गुंतली आहे ते उगविली पाहिजे. त्याची चिंता आहे. त्यास बोदवडच्या बाकीची तर येथें साहुकारी निशा करून घेतली आहे. माहालात रुजवात होईल त्याप्रमाणें पैसा द्यावा. रावेरची बाकी आहे त्याचाहि

3943

कांहीं ईश्वरे उपाय रचिला असेल तेहि उगवेल. पुढे धंदा मामलत नाहीं. त्याची चिंता ईश्वरास आहे. बोदवडची मामलत गणेश विष्णु याणी केली आहे. त्यास तुम्ही तगादा केला म्हणजे (अपूर्ण)

¶*This is the first sheet of a longer letter from Madhavrao Somnath to Jagannathpant informing him that the Peshwa had besieged Bagalkot and that Murarrao Ghorpade, Muzaffarkhan and the Nawab of Savanur were preparing to oppose the Peshwa.*

No. 123] [*2-3-1756 ?*

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजमान्य राजश्री

पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक राघोबा नाईक वेणालाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना ऐशीजें. माहाराजाचें आगमन दक्षिण देशास होत आहे म्हणोन मशारनिले राजे प्रतापसिंग राजियांनीं समाचार ऐकून बहुत संतोष मानून मार्ग रक्षून होते. बागडकोट फत्तें करून सवणूर बंकापुरासमीप लष्कर मुकाम करून तेथील मनसुबा चुकऊन घेऊन कर्नाटकास येताती म्हणोन सेवकाचे गुमास्ते यानी वर्तमान लिहिलियावरून महाराजियास श्रुत करितां मुजरद जासूदजोडे रवाना करून समाचार आणवणें म्हणोन निरोपितां सेवेसी विज्ञापनापत्र प्रविष्ट केलें असें. सेवकावर कृपा करून या प्रांतास आगमनाचा मजकूर राजकीय मजकूर सविस्तारें ल्याहावया आज्ञा निरोपिलें पाहिजे. येथील राजकारण चेनापटणचें इंग्रेज फुलचेरीचे प्रांवस उभये फिरंग्याचें आठरा महिनियाचें करार सल्याच होते, त्यापैकी महिना दीड येक बाकी आहे. उभयेतांहि लढाईचे सरंजामी तयारी करिताती. त्रिचनापल्लीचा तालुका कालेरीस दक्षिण देशें इंग्रेज व नवाब महमद अलीखान या उभयेतांचें ठाणें आहे. उत्तर देश श्रीरंगापासून उटानुर तालुके फुलचेरी मावासकाराचें ठाणें आहे. अरकाट सुभाचे तालुके कितेकीं इंग्रेज व महमद अलीखान कितेक फुलचेरीकर ऐसें राज्यें आक्रमून आहेत. नवाब महमद अलीखान इंग्रेजकराचे आज्ञाधारक होऊन आहेत. सविस्तर वर्तमान श्रुत व्हावें म्हणोन विज्ञापना लिहिली असें. विनंतीस चित्त देऊन सेवकास जैशी आज्ञा निरोप कराल कीं तैसा निरोपिलिया तेणेंप्रमाणें वर्तणूक करितों. सेवक माहाराजाचे असों. कृपा केली पाहिजे. विशेष काय लिहिणें हें विनंती. इव संवत्सर फाल्गुन शुध्द २ अंगारकवार मुकाम चंदावर.

¶*Raghoba Naik in the service of Raja Pratapsing writes to the Peshwa about the activities of the French and the English in the Karnatak and declares that the Raja is anxiously awaiting the arrival of the Peshwa in the South.*

No. 124] [After 7th March 1757

२

—ची फौज बारा हजार पालेस्वर प्रांतास आली आहे. हें वर्तमान यैकून मुसा मुसींनी मुसालास[1] व सुकुरलाखान याजबरोबर फिरंगी २०० दोनशें व गारदी ९०० व तोफा ९ देऊन मुधोजी भोंसलें याचे फौजेस सामोरें छ १८ जमादिलाखरीं रवाना दो प्रहरां केलें. मच्छलीबंदरीहून फिरंगी २०० व गारदी ५०० व राजहंमदरीहून फिरंगी १०० व गारदी ५०० व तोफां यैशा मुसालास याजला देविल्या आहेत. मच्छलीबंदरचा सरंजाम फिरंगी गारदी राजहमंदरीवर मुसालास सुकरलाखान याजपाशीं येईल. व राजमंदरीकडील व सिकाकोलाकडील पालेकरी मुसालास व सुकुरलाखान यांचें मदतीस दिल्हे आहेत. हा सरंजाम व पालेकरी घेऊन मुसालास व सुकुरलाखान राजश्री मुधोजी भोंसलें याचे फौजेस सामोरं गेले आहेत. मुसा मुसी सिकाकोलास जाणार आहेत. राजमंदरीच्या मुकामीहून सिकाकोल १० दाहा कोस आहे. छ १६ माहे जमादिलाखरीं दिल्लीहून वर्तमान आलें आहे कीं पठाण यानें दिल्लीवर चढाई केली. दिल्लीस मोर्चे लाविलें. तीन दिवस लढाई झाली. पठानांनीं जोरेंकरून दिल्ली घेतली. पातशाहा धरला आहे, म्हणोन वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*A mutilated letter giving news of the disposals made by Bussy and his despatch of Las and Shukurulla Khan. The letter makes a reference to the capture of Delhi by Ahmad Shah Abdali.*

No. 125] [March-April 1756

श्रीशंकरप्रसन्न

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे शेवेसी

पोष्य मल्हार नाईक रास्ते कृतानेक नमस्कार विज्ञापना. येथील कुशल जाणोंन स्वकीयें लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाा त्यांत आज्ञा जे, बागडकोटास मोर्चें लाविले होते तेव्हा राा जानोजी भोसले यांचे गोटची उंटे गुलतगुंडकराने नेली तीं गुलतगुंडकरास ताकीद करून देणे म्हणोन. त्यास गुलतगुंडकरास ताकीदपत्र पाा. तो ताकीदपत्रास उंटे देत नाहीं. पुढे पारपत्य जाहल्यावर उंटे येतील. बहुत काये लिहिणे? कृपा असो दीजे हे विज्ञापना.

¶*Malhar Naik Raste informs the Peshwa of the refusal of Gulatgundkar to send back camels belonging to Janoji Bhonsle which he had captured when Bagalkot was invested.*

---

(1) Monsieur Las.

No. 126] [Recd. 11-3-1757

छ २० जमादिलाखर

श्रीराम

पुा सेवेसी विज्ञापना यैसीजे. हे पठाण लोक बहुत कुर्फरानी[1]. दोन दिवस लांब गेलों, इतकियांत ठायींठायीं आपलाले जागां हजार तजविजा करू लागले. गनुमिया याणें जमलमडूस वेढा घातला, हें यैकोन तिकडून खमना प्रांतें येऊन पुढें फौजा रवाना केल्या. यानी जाऊन त्याचें पारपत्य चांगलें रीतीनें केलें. आम्हीहि दरकूच येऊन सिधवटास दाखल जाहालों. आणि सेवटील निकड चित्तांत आणून साऱ्याचे मतें तयारीनसी जाऊन पेठ घ्यावी, किल्यास मोर्चे लावावे, हा इत्यार्थ करून तोफखान्यासुधा समीप उभे राहिलों. हा निष्कर्ष त्याणी चित्तात आणून सिलीमखान व राजश्री त्रिमलराव यांस पाठविलें. बोली-चालीचा प्रकार घातला. गोलागोली मिनतीनें तकूब करविली. हे वर्तमान अलाहिदा पत्रीं लिहिलें आहे त्यावरून सेवेसी कलेल. पठाणी कारभार चिकट; कांही केल्या ताल्यावरी न येत. वोढावयाचें ते वोढावयास कांही कोताई केली नाहीं. सेवट घरोबियाचे रितीनें कांही त्यावरी नजर देऊन कारभार करणें लागला. दुरंदेशी पाहातां हे पठाण घरंदाज, याजवरी स्वामीचें येहसानच[2] असावें, याअर्थें त्याजकडील निमेनिम मुळूक सरकारांत घेतला त्यापैकीं दीड लाखाचा मुळूक त्यास दिल्हा; व गुरुमकोंडा किलाहि सरकारांत घेतला. पहिली बोली रुपये घ्यावे हे होती. परंतु यैवज पाहातां पठाणाजवल रुपया आहे यैसा अर्थ नाहीं. आणि आम्हास जप्तीमुले वगैरे दीड दोन लाख रुपयेपर्यंत आले. खंडण्या त्याच्या तालुकियांतील घेतल्या हें तें कांही चितांत आणून व पुढील कार्यावरी नजर देऊन निमे मुलुक दीड लाख कमी व गुरुमकोंडा किला सरकारांत घेऊन तह केला. मुलकाची याद आलाहिदा पाठविली आहे त्याजवरून सेवेसी कलों येईल. इकडील नव्या मुलकातील कोणकोण्हा सरदारांस संरजाम घ्यावा म्हणौन आज्ञा. त्यास आज्ञेप्रों थोडा बहुत जे घेतील त्यांस देऊ. मुळूक जो सुटला आहे तो कोणताहि नाकारा नाहीं. अस्त्या पदार्थीत उतम आहे. असो. याउपरी येथून आज उद्या कूच होऊन येखादा रोख धरीत असों. मुसा बुसीच्या मुलकांत उपद्रव न करणें, फौज गेली असेल ते आणवणें, त्यांचा आमचा स्नेह; याकरितां यांच्या तालुकियास उपद्रव लागों नये, म्हणौन तीन च्यार आज्ञापत्रीं निरोपिलें; त्यावरून त्यांच्या जागिरीस उपद्रव न देतां फिरलों.

---

[1] भांडगे. [2] कृपा.

राजश्री गोपालराव व राजश्री मलारराव फौजासहवर्तमान लौकरीच रवाना होतात म्हणौन आज्ञा. यैसियास बहुत उतम. सत्वर आलिया स्वामिकार्य येखादे होऊन येईल. येथून सुताकरितां व गोलेकरिता बहुत तारांबल तेथून यावयास्तव लिहीत गेलों. सेवटीं येऊन पावलें नाहीं. असो. आल्यास पुढें इकडे राहतील त्यांच्या उपयोगी पडेल. आज नव महिनेयांस येकेहि गोष्टीचे साहित्य न जाले. दारू गोला सूत हे पदार्थ काही इकडे मिलावयाचे नव्हते. स्वामींचे प्रतापे भलतसे चाललें गेले; व तीन महिने राहिले तेहि जातील. वर्षास खानदेश गुजराथ कोकणातून गोले सूत फताऱ्या मेलऊन आणावे लागते तो कारखाना येथे छावणीस राहिला; परंतु सरंजाम तिकडून न आला, यामुले जी तारांबल जाली ती कोठवर ल्याहावी? तोफास पागोटी खरीदी करून रसे करून लावावे परंतु या गोष्टीस राजश्री येशवंतराव यानी बहुत प्रयेत्न करून काम खोलंबा होऊ दिल्हा नाही. या प्रा कारखानियाची बंदोबस्ती व गाड्याची चौकसी हजीरी मेहनत फारच केली. प्रस्तुत वर्तमान आहे की, स्वामींनी संरजाम रवाना केला तो सिरियास येऊन पावला. तेथून इकडे येत आहे. याप्रा तेथून साहित्य जालियास राबणाराची अबरू कसी राहील? अमर्यादा करून विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The campaign against the rebellious Pathans of Kadapa (Karnatak) and the subsequent treaty in which a large slice of their territory with Gurumkonda was ceded to the Peshwa are reported to the Peshwa probably by Balvantrao Mehendale.*

No. 127] [*4-5-1756*

श्री

सेवेसी मुकुंद श्रीपत विज्ञापना. ता छ ४ शाबानपर्यंत स्वामीचे कृपेकडून येथील वर्तमान येथास्थित आसे विशेष. काल सोमवारी राजश्री मुरारराव घोरपडे व सेटिबा खराडे हे सलाबतज्येंग याचे लस्करात रातचे गेले होते. ते दोन प्रहर रात्रीस फिरोन आले. तेथील सरदाराच्या भेटी होऊन मुरारराव याचा बहुमान येणेप्रा केला:

रामचंद्र जाधवराव	दाजिबा निंबालकर	मुसा भुसी
१ हती	१ घोडा	१ सिरपेच

१ घोडा	१ सिरपेच	१ वस्त्रे
१ वस्त्रे	१ वस्त्रे	१ घोडा
—	—	
३		

शाहा नवाजखान	हैदरज्येंग
१ सिरपेच	१ सिरपेच
१ वस्त्रे	१ वस्त्रे

येणे प्रा राव मारनिले याचा बहुमान जाहाला. मुसा भुसी याचे व रायांचे खलबत फार जाहाले. परस्पर ममता फार. त्यास संकट पडले तर यांणी साहित्ये करावे, यास पडेल तर त्याणी साहित्ये करावे यैसा त्याचा याचा बेलभंडारा जाहाला. सेवकास कलले वर्तमान सेवेसी लिा आसे. मुरारराव याचा मुकाम सात पाच दिवस आहे. बंकापूरचे झाडीत वगैरे जागा जागा फौज आहे ते आणविली आहे ते सारी जमा जाहालियावर कूच करणा(र). प्रस्तुत पाच साडेपाच हजार पावेतो फौज येथे जमा आहे. बाहेर होती. ताजीच आहे. कदीम फौज आहे तिचा गवगवा बहुतसा नाही. च्यार हजार पठाण नवे ठेविले आहेत. त्याचे तलबेचा दंगा आहे. त्याची समजावीस सेंडुरास गेलियावर थोडे बहुतानी करावी यैसे आहे. च्यार हजार बार आहे. त्याची तलब बहुतेक दिली आहे. बाकी राहिली तेहि देतील. सालाबाज लोकाची समजावीस पाईचे लोकांची डेऱ्याजवल बलकटी करून करीत असतात. हालीं तो फौजेचा गवगवा आहे. यास्तव पाइचे लोक याचे समाधान राखिले आहे. सेंडुरास गेलियावर बहुतेक दंगा थोडी समजावीस करावी यैसे वर्तमान आहे. मुजफरखान याणी फकिरी घेतली आहे. खापर होऊन राहिले आहे. गाडदी फिरंगी याचे तलबेचा दंगा बहुत आहे. पदरी पैसा नाही. सरकारचा यैवजाचा गुंता त्याजकडे होता तो मुरारराव याणीच वारिला. मुजफरखानाचे हाल फारच आहेत. मुरारराव याजकडील यैवजाचा गुंता काही जव्हाईर व हती व तीस हजार रुपयाचे दोन मडकसिरेयाहून येणे. तिकडे काही राऊत पागेचे व आपणाकडील पाठऊन सदरहू प्रा आणऊ म्हणौन सेटिबा खराडे म्हणतात. येविसी स्वामीची आज्ञा होईल त्या प्रा वर्तणूक होईल. नारोपंत याजसमागमे आज्ञापत्र पाठविले ते पावले. दोन हजार रुपये मल्हार मुकुंद याजकडून सावनूरचे यैवजी देविले ते वरात त्याजकडे पाठविली आहे. दाहा जासूद जोड्या पाठविल्या आहेत म्हणौन आज्ञा. त्याजपैकी च्यार जोड्या येथे आल्या. बाकी सा जोड्या येणे, त्यास ताकीद करून पाठविणार धणी समर्थ आहेत. येथील बातमी

बारीक मोठी वरचेवर लेहून पाठवणे म्हणौन आज्ञा. आज्ञेप्रो वर्तमान होईल ते सेवेसी लेहून पाठऊ. जासूद येथे आले आहेत त्याचे रोजमरियाची आज्ञा करणार धणी आहेत. पोटास नाही म्हणतात. सेवेसी श्रुत होई हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat writes about an interview between Murarrao Ghorpade and Salabatjang and the dresses of honour that were presented to the former. "Murarrao also tried to remove the difficulties of Muzaffarkhan by himself paying off the Government dues."*

No. 128] [*May 1756 ?*

३

प्रकार वाटेल. म्हणत असतात जे, बामणी चाकर, बामणी फौज. गणतीचे लुगारे ह्या बोल्या आम्ही नवलास. घोरपडे आम्हापुढा उभे राहू सके कोण ही धमक ईस्वरास मानिती कैसी? विस्वासघात करून दंगा करावा ऐसे याजवल होते. आम्हास यामुले दरकार काय होता? आज सोंधेचे सरदेस जाऊन पनास साठ हजार रुपये मिलविले असते. काय करावे ! स्वामीस मनस्वी लिहिणार म्हणून जाहाला करीणा सेवेसी लिहिले आहे. या उपरी यादवाड प्रांतांत स्वारीसिकारी करून गुर बखरी न्यावी या विचारांत आहेत. आम्हीहि ठाणेचा बंदोबस्त करावा तो केला आहे. परंतु रानाचा बंदोबस्त कोठवर करावा? तो दोन आडीचसी स्वार व प्यादा चार पांचसी जागजागी ठाणेनी ठेविला आहे. वरकड फौज घेऊन शाहापूर बेलगाव प्रांती गेलो. तिकडील धंदा उरकून लौकरच सेवेसी येतो. पुणेस येथील साऊकारी होऊन नालबंदीच्या ऐवजी कधी हुंड्या केल्या त्यास पांडुरंग शामराज दुखणैन पडला आहे. स्वामियासी विनंती करणार तेथें नाहीं. याकरितां पुणेंची वरात साठ सत्तर हजाराची आगत्यरूप पाठविणार स्वामी समर्थ आहेत. नाहीं तर पतीस अंतर पडते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*A mutilated letter mentioning activities near Sondha, written probably by Gopalrao Patwardhan.*

No. 129] [*May 1756 ?*

श्री

सेवेसी मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना. ता। साबानपर्येंत स्वामीचे कृपादृष्टीकडून येथास्थित असे. सावनूरचे खंडणीचे यैवजी दोन हजार रुपये

3949

रा मल्हार मुकुंद स्वामीने देविलें. ते होन देऊ म्हणतात. येथे तो नित्ये चार पाच दिस लागतात. दोन पाइलीची धारण. माप उणे. दोन पायली कोणी घेत नाही. लस्करात कोणी सराफ मातबर राहतो. गाडदी याणे रुपये देणे होतें ते सराफ मागो लागले. त्या सराफास गाडदियानें मारामार केली, यास्तव होतें ते हाली गेले. यैसा प्रकार येथील आहे. याजकरिता नारोपंत सेवेसी पाठविले आहेत. तर दोन हजार रुपये पोताहून स्वामीने पा। पाहिजेत. दोन हजार रुपयाचे होन येथे घेतले नाही पाहिजे. याचे चंदीपैकी आपले लस्करचे ठाणियाचे चौदा रुपये देणे तो ठाणीं रुपयेकरिता येथे येऊन बसला आहे. * * चे चौदासे रुपये दोन हजार रुपयापैकीं दिल्हे पाहिजेत. बाकी सासे रुपये शाबान महिन्याचे बेगमीस राहिले * * याजसमागमे येक मास लागल. बेगमी पोख्ती पाहिजे. आणखी दोन हजार रुपयाची बेगमी करणार धणी आहेत. येथे कोणी वलख्या नाही. निर्उपाये गोष्ट * * यास्तव सेवेसी विज्ञापना लि। आहे. वरकड येथील आलाहिदा पत्री लि। आहे त्याजवरून विदित होईल. बाबूराव माणकेस्वर याजकडे सनद दरसाल येते, त्याची याद आलाहिदा लेहून पाठविली आहे, तेणे प्रा। सिवाजी बलाल यास सनद द्यावयाची आज्ञा करणार धणी समर्थ आहेत हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat requests that he may be supplied with funds.*

No. 130] [*May 1756*

श्रीव्यंकटेश

पुरवणी राजश्री नाना स्वामी-
चे सेवेसीं

विनंती उपरी. फौज सावणूर सोंधे प्रांते रवाना केली. याचा मजकूर पूर्वी आपणांस पत्रीं लिहून पाठविलाच आहे. सांप्रत सवनूरच्या मोगलासी युध्य होऊन, स्वामीच्या पुण्यप्रतापे येश आलियाचे वृत साकल्य राजश्री गोविंद राम याणीं पत्रें आम्हांस पाठविली, त्याच्या बजिनस ता[1]लिका पाठविल्या आहेत, त्यांजवरून सविस्तर कलो येईल. कैलासवासी राव व आपा याचे पुण्य स्वामीच्या पदरीं आहे. त्यांच्या आसीर्वादे करून स्वामीस व स्वामीच्या सेवकांस फौजांस येश येऊन चतु:समुद्र आदिकरून त्रैलोक्यांत नंगना[2]मोश होत असे. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*The writer congratulates the Peshwa on his success in the action with the Nawab of Savanur.*

---

१ नकला. २ कीर्ति.

3950

No. 131] [*7-5-1756*

१/४

श्री

सेवेसी मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना. जासुदासमागमे आज्ञापत्रे तीन पाठविली ती काल छ ६ शाबानी संध्याकाली पावली. राजश्री मुरारराव घोरपडे याजकडील व मुजफरखान याजकडील बारीक मोठे कचे वर्तमान लेहून पाठवीत जाणे म्हणौन आज्ञा. यैशास मुजफरखान याणी पेशजी गोव्यास फिरंगियाकडून फिरंगी व हातगोली व बंदुखा आणविल्या होत्या पैकी बंदुखा तीनसे व दारू येक खंडी पाठविली ती काल येथे पावली. बंदुखा गाडदियाच्या गोल्या होत्या त्यास वाटून दिल्या. फिरंगियासी खर्चास पाठवणे; पाठऊन देऊ म्हणोन लिहिले आले. मुजफरखान याचे लोकानी तलबेकरिता हंगामा बहुत केला होता. त्याजवरून मारिनिले व त्याचा दिवाण गोविंदराव मुरारराव याजकडे येऊन च्यार घटका खलबत होऊन आपले डेऱ्यास गेले. त्याउपर गोविंदराव येऊन कांही येवज घेऊन निममाहा रोजमरा दिल्हा आणि लोकांची दिलभरी फार रीतीने केली. फकिरी तो घेतली आहे, लोकास तो पाहिजे त्याप्रमाणे त्याचा अर्थ आहे. मुरारराव यास म्हणतो की लोक व तोफा आपणाजवळ ठेवणे. आपण हनगलास जातो, फकिरी करितो हे अर्थ बाहेरकसी बोलतो. परंतु लोकाची समजावीस दिलभरी सदरहू प्रो करितो. समय पाहून मनसबा करावयास चुकणार नाही. मुसा भुसी याजकडील जासूदजोडी पत्रे आली होती. याणीहि सांडणीस्वार व दोघे राऊत मुसा भुसीकडे पाठविले आहेत. हैदरजंग यासहि पत्रे पाठविली आहेत व कारकूनहि गेला आहे. विदित व्हावे. मुरारराव याजकडील मजकूर सावसीस फौज होती ती काल येथे आली. किरकोल जागा फौज होती तेहि काही आली, येत आहे. सात हजार पावेतो फौज जमा प्रस्तुत आहे. तीन हती आपले लस्करचे त्यानी नेले होते तेहि आले. उंटेहि संभर-पावेतो आली. आणखी राहिले ते येतच आहे. हजार बारासे बैल तोफाचे व कोठीचे बंकापुरापलीकडे होते ते आणविले होते, त्यास राजश्री गोपालराव सोंध्ये प्रांते फौजसुधा गेले. त्याचे फौजेने सारे लुटून घेऊन गेले. त्यामुळे रविवारी कुचाचा मजकूर होता तो राहिला. याउपर ते बैल आल्यासिवाई कूच होत नाहीं. त्याजकडे येथून राऊत व दारकोजी वाग खिजमतगार पाठविला आहे. सरकारचेहि पत्र त्यास प्रविष्ट होऊन बैल व तटे सुटत ते करणार धणी समर्थ आहेत. मुरारराव याजकडे फौजेचे तलबेचा दंगा फार आहे. काल येक उपोशण जाहाले. परंतु साऱ्यास दिलभरीच्या गोष्टी सांगोन समाधान करितात. आल्या फौजेपैकी

3951

कोणास काहीं देऊन येकहि सरदार निरोप देऊन गेला नाहीं. मुरारराव याचे निष्ठेचा अर्थ स्वामीचे ठाई कैसा आहे तो मनास आणून लेहून पाठवावा म्हणोन आज्ञा. यैशास लौकिकात बोलणे निष्ठेचे दिसते. परंतु अंतरयाम कलत नाही. बगर यांचे फौजेची गुंज फुटल्यासिवाई कराराप्राा वर्ततील येसे म्हणवत नाही. आठाचह्रू रोजी मानिलेचा अर्थ कलल. मुजफरखान याची ममता यास अद्याप सुटली नाही. तेव्हा याचे निष्ठेचा भरवसा काये आहे? सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat, the Peshwa's agent, accompanies Murarrao Ghorpade back to Sondur, and gives details of the movements of Murarrao and Muzaffarkhan. The writer suspects Murarrao's loyalty towards the Peshwa.*

No. 132] *[8-5-1756*

श्री

सेवेसी मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना. ताा छ ८ शाबान पावेतो स्वामीचे कृपेद्रष्टीकडून वर्तमान येथास्थित असे विषश. येथील वर्तमान मुरारराव याजकडे तलबेचा दंगा नित्ये बहुत होतो. सिलेदार बरे वाईट बोलतात; परंतु त्यास देतो म्हणोन बोलोन कालहरण करितात. मुजफरखान याजकडे काल संध्याकाली तलबेकारिता दाणादाण खाशावरच व्हावी यैसी बनली होती; परंतु त्याजवल लोक होते, त्याणी पुढे होऊन त्याचा बच्याव केला; परंतु लोक चौघे जखमी जाहले. त्याउपर सर्वांचे समाधान केले की तुमचे तलबेकरिता आपण येथे आहो. जाहला पैसा तुमचा देऊन. आपण दरगियास आणोन म्हणोन समाधान करीत आहे. तुलसाजी नाईक याजवल बोलिले की आपण फकिरी घेतली. याउपर कोणाची सेवा करावी यैसी नाही. आपले सिपाईगिरीची शर्त जाहली, की दोनी पादशाहा आम्हावर चालोन आले, त्यासी जुजलो. याउपर फकिरीच उतम; परंतु साहेबानी आपला गौर करून येखादी सेवा घ्यावयाची होती. हाली पोटास मिलते तर इकडे काशास येतों? याउपर फकिरीच करावी; याकरितां नानासाहेबानी आपला गौर करून दाली बांधविली तरच करावी, नाहीतर करणेच नाही म्हणोन दोन घटका बोलत होता. मुरारजी व पठाण यांचे तोंड काये की याणीं नानासाहेबासीं लढाई करावी; मी मुजफरानेच केली म्हणोन आपले मर्दुमीचे अर्थ व पुढे आपला गौर करावा हे अर्थ बोलत होता. स्वामीस विदित व्हावे. सावनूरकर पठाण याणी काल फर्मानबाडी केली. गावाबाहेर डेरे देऊन फर्मान

घेऊन गेले. फर्मानें काये म्हणोन आलें, त्याचा शोध करिता वर्तमान कलले की सलाबतजंग यांस व स्वामीस पादशाहाची वस्त्रे आणविली कीं हे पठाण पातशाई बंधू आहेत, याचे सर्वप्रकारें चालवावे, मुलकास उपद्रव न द्यावा म्हणोन वर्तमान कलले. फर्माने मोर्चेबंदीतच आले होते. परंतु छपाऊन ठेविले होते. हली या प्रो जाहले. वर्तमान विदित व्हावे. मुजफरखान याणी जोडी आज मुसा भुसी याजकडे पाठविली आहे. याचा लगा तिकडेच आहे. मुरारराव याचे कूच या तलावरून पाच सात दिवस होत नाहीं. बैल गेले आहेत ते येतील तेव्हां तोफा चालतील. दाणा अडीच पाइली धारण आहे तेहि पुर्ते मिलत नाही. वैरण तो नाहीच. या प्रा वर्तमान आहे. सेवेसी विदित व्हावें हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat reports to the Peshwa his conversation with Muzaffar-khan Gardi, who shewed great regard for the Peshwa and his willingness to serve him. The Nawab of Savanur is also alluded to.*

No. 133] [*12-5-1756*

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना. छ ११ शाबानी मुजफरखान याच्या ढाला पूर्वेच्या रोखे गोटाबाहेर बाणाच्या टप्यावर जाहाल्या. मुरारराव याच्याहि काल तेथेच जाहल्या. काही गाडदी फिरंगी दोन तोफा पाठविल्या. फिरंगी मुरारराव याजकडील तलबेकरिता रुसून कोसावर गेले होते. ते आणावयासी भला माणूस पाठऊन आणविले. आण काल संध्याकाली आपण खासा त्यांचे डेऱ्यास जाऊन येकांती लोकांची समाधान बहुता रीतीने केले. थोडेबहुत पोटासहि देविले. बाकी तलबेचा झाडा सेंडुरास करून देऊ म्हणोन करार केला. सिलेदार लोक व पठाण लोक यांचेहि समाधान कोणास देऊन कोणास न देऊन करीत आहेत. माग साराच दंगा नित्ये बहुत आहे. राजश्री गोपालराऊ याजकडील फौजेने मुरारराव याचे बैल नेले आहेत. त्याजकरिता द्वारकोजी खिजमतगार व आम्हा-कडील चौघे राऊत गेले आहेत ते अद्याप आले नाही. जाऊन साहा रोज जाहाले. मुरारराव याजकडे आम्ही व सेटिबा रात्रीस गेलो होतो त्यास विचारे सांगोन कोणी बैसले होते त्यासहि च्यार गोष्टी सांगोन आज छ १२ शाबानी येथून कूच करावयाचा मजकूर करून कुचाचा नगारा करविला. येथून दोन कोसावर मुकाम आहे. मौजे येलकीवर मुकाम आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat reports a mutiny in Murarrao's forces for arrears of pay.*

श्री

सेवेसी मुकुंद श्रीपत विज्ञापना. ताा छ १३ शाबानपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकडून येथील वर्तमान यथास्थित असे विशेष. काल मुराराव याचे कुचाचा नगारा जाहाला. बुलगे काही गेले. तोफा साऱ्या मुकामास गेल्या. डेरे पडो लागावे इतकियात वागमोडे व पठाण याणी येऊन आण घालून तलबेकरिता[१] घेरून संध्या(का)ल पावेतो उपवासी बसविले. (आ) मर्यादा बोलले त्याजमुले काल मुकाम (जा) हाला. राती सेवक व सेट्याजी खराडे (या) जकडे जाऊन वागमोडे पठाण यास च्यार गोष्टी सांगितल्या की, धण्याचा हुकूम आम्हास आहे की, यास नेऊन सेंडुरास पोहचवावे. कितेक काजकाम सांगितले आहे ते करावें. यैसी आज्ञा असतां तुम्ही येऊन असे करिता हे कार्याचे नाहीं. तलबा विचारे करून मागोन घेणे. यैसे कितेक बोलोन आज कूच करावे यैसा विचार करून आलो. त्याजवरून आज कुचाचा नगारा करविला आहे. येथून दोन कोसावर मुकाम आहे. सेवेसी श्रुत व्हावे. मुजफरखान याचे बुलगे तोफा येथेच आहेत. आज कूच त्यांचेहि होऊन समागमे येतो. सेट्याजी खराडे काल त्यांचे डेऱ्यास गेले होते. लोकांचा दंगा त्याजकडेहि नित्ये आहेच. प्रज्येन्न दोन दिवस लस्करावर फार पडला. लस्करची हैराणागत फार आहे. माहागाई. वैरण नाहीं. घोडी बैले मरतात विदित (व्हावें). याजबराबर आमची घोडी वैरणीकरिता उपवासी वैरण मिलत नाहीं. दाणा माहाग. घोडी रोड फार जाहाली. खर्चाची तारंबल जाहाली आहे. हे लस्कर कंगाल. उसने व कर्जहि मिलत नाही यास्तव पोख्ती बेगमी करून नारोपंत कारकून याची रवानगी सत्वर करणार धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat to the Peshwa informing him that Murarrao was willing to start, but was prevented by Vaghmode and Pathan who wanted to receive their arrears. The writer says that he settled the affair and arranged for Murarrao's departure. The monetary difficulties of Setyaji Kharade and the writer and the consequent straits to which his detachment was reduced are described by the writer.*

---

१ पगाराकरितां.

No. 135] [14-5-1756

श्री

सेवेसी मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना. छ १४ शाबानपर्यंत स्वामीचे कृपेंकडून येथास्थित असे विशेष. मुरारराव याचे कुचाचा नगारा कालहि जाहला. परंतु कालहि राहणे जाहले. कबिला व बाजार पुढे लाऊन दिल्हे. आज छ मजकुरी कूच करऊन येथून दोन कोसावर मुकाम आहे. विदित व्हावे. मुजफरखान याचे लोकानी काल हैराण त्यास फार केले. त्याजवरून त्याणी सेटिबास व सेवकास बोलाऊन पाठविलें. त्याजवरून तेथे जाऊन च्यार गोष्टी त्यासहि सांगितल्या. लोकांचे समाधान करून कूच करविले. त्याउपर त्याणी येकीकडे काढून आपलें निष्ठेच्या पूर्वीच्या गोष्टी कितेक सांगितल्या. हालीहि धण्याने आपलें समाधान करून, आपले हाती काम घ्यावयाचे होतें ते न जाहले. उतम. याउपर कोणाची चाकरी करणे नाही. फकिरीच उतम. त्याजवरून आम्ही बोललो की तुम्हास वाईट न वाटे तर आम्ही बोलतो; परंतु यातच तुमचे बरे आहे. याउपर तुम्हास कोण ठेवितो ? सावनूरकराने ठेविले त्याचे घर बुडाले. आमचे धण्याची अवकृपा यैसी लोकात जाहले. त्याजमुले तुम्हास कोठेहि जागा नाही. याउपर तुमचे स्वहिताचा अर्थ सांगतो तो यैका म्हणोन बोललो की तुम्हीं याउपर रजबदली न करावी. धणी सांगतील तैसे यैकावे. पाचाने पंचविसाने ठेवितील तैसे मान्ये करावे. धन्याजवल निष्ठेने सेवा करावी. धण्याचें कसोटीस उतरला म्हणजे दौलतीस तुम्हास वाण काये ? कसोटी नवी तुमची पाहावी लागत नाहीं. मर्द माणूस जे काम धणी सांगतील ते बज्याऊन आणाल; परंतु आलीकडे तुमचे पदरी दोश आला, त्याचा परिहार होई तोपर्यंत धणी सांगतील त्याप्रा वर्तणूक करावी हे उत्तम.

¶Mukund Shripat reports his efforts to win back Muzaffarkhan Gardi into the Peshwa's service.

No. 136] [18-5-1756

श्री

सेवेसी सेव्याजी खराडे कृा दंडवत विा विज्ञापना यैसीजे. साहेबी आज्ञापत्र पाठविले ते उतमसमई पावोन लेखनार्थ ध्यानास आला. राजश्री मुरारराव यांच्या कुचाचा मजकूर त्याच्या लोकानी दाहाबारा रोज मोठा हंगामा[१] गेला होता. त्यास

१ दंगा.

लोकांचे समाधान करून मग कूच करावे यैसे जाहले. तों तोफास बैल नाहीत. मग काही कामाठे काही बैले यैसे करून कूच केले. छ १६ शाबानी कूच करून श्रीमंतगडापासून चौकोसावर आलीकडे मुकाम जाहाला. सोमवारी चतुर्थीचे दिवसी तुगभद्रा उतरोन हरपणहल्लीच्या मुलकांत मुकाम केला. नदीतून तोफा उतरावयासाठी आजी मंगलवारी मुकाम केला. दोन प्रहर पावेतो तोफाहि उतरोन आलीकडे आल्या. आम्ही कूच जाहलियावर पत्र साहेबाकडे रवाना करीत होतों परंतु हिंदुरायानी सांगितले की नदीपार जाहलियावर पत्रे रवाना करू त्याजवरून सेवसी पत्र न पाठविले. उदईक कूच करून मजल दरमजल सेंडुरास पोहचतो. त्याच्या घोडियांत व उंटात जीव नाही याजमुले मजली हालकिया होतात. लाखा रुपयाच्या यैवजासाठी रायांचा कारकून व आम्हाकडील येक कारकून व स्वार पांच व दोघे बाणदार मडकसिरियास पाठविले आहेत, त्यास बारा रोज जाहाले. मागाहूनहि दोन ताकीदपत्रे गेली. सांप्रत या मुकामीहूनहि आजी प्राथकाली पत्रें रवाना केली. आम्ही काही निकड करावयास अंतर करीत नाही आणि त्यासहि मोठी कालजी आहे कीं आपली प्रामाणिकता राहिली पाहिजे. रायांचे मानस तों स्वामीच्या पायासी येकनिष्ट आहे. वारंवार बोलतात कीं साहेबाच्या पायांसी येकनिष्ठेने सेवा करून आपले उर्जित करून घ्यावे. मुसाफरजंगाविसी लिा त्यास उतमप्रकारे ठिकाणीच ठेवले आहेत. हिंदुरावहि जे बोललेत त्यांत आंतर करीत नाहीत. सांप्रत त्याची मोठी लोकानी फजिती केली. देखील शागीर्दपेशा पोटावाचून उपासी मरतात. भोई पालखिया तलावर टाकून गेले, मग लोकाचा हंगामा जाहला. यास्तव त्यानी आम्हास बोलाऊन नेले होते. समागमे रा मुकुंदरावहि होते. लोकास चार गोष्टी सांगोन धतेरफतर[१] करून कूच मात्र करविलें. पालख्या व कितेक सरंजाम सावनुरात आम्ही पाठऊन दिल्हा. त्याचे फजीतीस जोडा नाही. कफणी घालून फकीर होऊन बैसला आहे. त्याजविसी पूर्वीहि विनंतीपत्र पाठविले ते सेवेसी पावले आसेल. साहेबा-कडून माारकडील रा कोनेरराव आले त्यानी कितेक वर्तमान सांगितले त्याजवरून त्यानीहि आम्हास बोलाऊन सांगितले. आम्ही निषेध जितका करणे तो केला. येकच गोष्ट सांगितली की आपलियास * * * जागा कोठे नाही. श्रीमंतच कृपाळू होऊन * * * पदरी घेतील तर सेवा करीन. नाही तर फकीर तों जाहालो. मकेस जाईन, हा निश्चये केला आहे. त्यास पदरी ठेवावे यैसे खावंदाचे मानस आसलिया आज्ञापत्र आलियावर मुसाफरजंगास समागमें

---

१ धातुरमातुर.

3956

मुकुंदरायास देऊन आम्हासच आज्ञा जाहाली तर घेऊन सेवेसी येऊ. राजश्री मुराररायाचे बुनगे पुढे चार रोज रवाना केले होते ते लक्ष्मेस्वरावरून मार्गाने जाताना तेथील ठाणेदारानी रवेतून[१] घोडी आठ व त्याच्या सबनिसाचे बैल कंठाळा-सुधा पांच घेऊन गेले. त्यास आम्ही दोन कागद पाठविले व हाजुरचा पुताजी साबळाहि पाठविला परंतु त्यानी सोडली नाहीत. लटकेच म्हणतात की आमची गुरे सवासे व बकरी पनास नेली. तर त्याच्या लस्करात घोडे धावावयाजोगे तो येक राहिले नाही. हाती धरून मात्र वाटेने चालवावी. रोज वाटेने से दीडसे घोडी उंटे बैल मरतात. यैसा मजकूर आहे. रा। गोपालरायानी हजार अकरासे बैल नेले तेहि दिले नाहीत. ते बैल सोडवावयास हजूरचा दारकोजी खिजमतगार पाठविला आहे. तोहि अद्याप आला नाही. बैल आले नाहीत याजमुले तोफा न चालेत. याजमुलेहि दोन च्यार मुकाम जाहले. राजश्री हिंदुराव बहुत श्रमी आहेत व आम्हाकडील लोकाची घरे फार करून त्या प्रांतीच आहेत आणि श्रीमंताची ठाणी सावनूरप्रांती व धारवाडप्रांती आहेत. लोक जातील त्यास यैसेच लुटतील तर जे लोक माघारे जातील त्याचा निभाव कैसा होईल ? येविसी श्रीमंतास विनंति लिहिणे म्हणून सांगितले. त्यास लक्ष्मेस्वरच्या ठाणेदारास ताकीदपत्र कीं जे वस्तभाव घेतली ती देणे व तमाम ठाणियास ताकीद की हिंदुरायाकडील लोक जातील येतील त्यास सुखरूप जाऊ देणे, कोणी मुजाहीम न व्होणे, यैसे ताकीद करणार धनी समर्थ आहेत. सिरेटीचा मजकूर तर रा। रायानी त्यास बहुताप्रकारे बोध केला परंतु त्यानी आपली नादारीच मात्र सांगितली. त्याचे मानस कीं मुलुक व ठाणी आपलियाकडेच राखावी आण शक्तीनसार रु॥ घेऊन कृपा करावी. कोन्हे गोष्टीचा सिधांत नाही. रायानी मात्र सांगितले की तुम्ही श्रीमंताच्या आज्ञेप्रा। वर्तणूक येकनिष्ट केलियावाचून कूच होत नाही यैसे परिछिन सांगितले. रायाच्या चितात की सिरेटीकर याचा आपला स्नेह आहे, याजपासून सेवा घ्यावी, कामाचा माणूस आहे, परंतु श्रीमंताची मर्जी जी आसेल तेच करावी. कोन्हे गोष्टीचा आपला आग्रह नाही. साहेबाचे राहणे या प्रांते कितेक दिवस होईल ? आम्ही कोठे यावे ? कदाचित कामामुले आम्हास च्यार दिवस जाजती अटकाव जाहाला, माघोन येणे पडले तर तुंगभद्रा व कृष्णा नदी याचे दस्तके व बहादुरबिंडियाच्या ठाणेदारास येक आज्ञापत्र पाठविले पाहिजे. राजश्री सुभेदारानी पंधरा रोजाचा रोजमुरा दिला होता त्यास तो उडाला. येथे कोठे मागावयास जागा नाही. रायास मागावे तर तेच उपासी

---

१ रांग.

मरतात. कर्जेहि कोठे मिळत नाही. तर कृपावंत होऊन खर्चाची बेजमी केलिया स्थित राहाती. इकडे सर्व जिनस माहाग, गवत देखील विकत घ्यावे लागते. बेजमी करणार धनी समर्थ आहेत. हे विज्ञापना सेवेसी श्रुता होये.

¶Detailed letter from Setyaji Kharade giving news about the return march of Murarrao Ghorpade from Savanur to Sondur. It also gives information about the Peshwa's scheme to persuade Muzaffarkhan to accept service with the Peshwa.

No. 137] [*25-5-1756 ?*

श्रीगजानन

सेवेसी विनंती. सेवक शामराव भिवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। छ २९ साबान मुकाम नजीक मुदगल येथास्थित असे विशेष. आज्ञेप्रमाणे मलप्रभातीरी मुसा बुसीजवळ येऊन दाखल जालों. नदीस पाणी यामुळें दोन दिवस पलीकडे होते. उतार जालियावर जानिहाळासमीप हतीवरून उतरून अलीकडे आले. आपली व त्यांची भेटी जाली. तदनंतर कूच करून मजल दरमजल मलप्रभातीरास कृष्णा उतरावयासी जावे यैसा निश्चय जाला. त्यासी दुसरे दिवशीं बातमी आली की कृष्णेस पाणी आलें. मलप्रभासंगमी टोकरे वगैरे साहित्य नाहीं आणि येथे कृष्णा उतरलियाने मागती भीमा उतरणे लागेल. यास्तव काडलूर संगमास जावें ऐसा निश्चय जाला. टोकरे वगैरे साहित्य मिळेल आणि मग नदीचा गुंता नाही ऐसें जाणून तिकडे जात आहेत. येथून बतीस कोस आहे. पाच सहा मजलीने जातील. काल छ २४ साबानी मौज करंडी पा। मुदगल येथे लस्कर मुकामास आलें. गावकरी यानीं गोळागोळी केली. वैरणीस अगर लाकडास हात लाऊ न दिल्हा. दोन माणसें जखमी जालीं. दोन च्यार वेळा सांगोन पाहिलें परंतु त्यानी ऐकिले नाहीं. मग त्यानी च्यार तोफा नेऊन एक रंजक करून गाव घेऊन लुटून फंन्ना केला. गारदियाचा एक जमातदार मेला व दहावीस माणूस गारदी फिरंगी जाया जाले. हा कालपरियेंत जे आपणासी बोलिलेत त्यांत अंतर दिसत नाहींसा रंग दिसतो. परभारे वार्तामात्र आहे कीं नवाबाकडील तोफा च्यार मात्र देणे आहेत व हैदराबादेस आपणाकडील जिनसाना[1] आहे तो घ्यावयाकरितां शहरासमीप इदेग्यासमीप[2] जाऊन राहावे. आपला जिनसा व मुलेलेकरे जे असतील ते घेऊन जावी. आपणाकडील तहाचे

---

१ जकीरा, माल, असबाब.
२ ईदचे समारंभ करण्याची जागा.

वर्तमान सर्व आपले पातशहास ल्याहावें. त्याची आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करावी. जाहागीर आपणाखाले जे आहे त्यास कोण्ही मुजांहीम[१] होत नाही तथापि कोण्ही जाले तर न द्यावी ऐसी ध्वनि मात्र यैकतोंत. कृष्णा उतरून गेलियावर जे वर्तनुकेत येईल ते सेवेसी लिहून (यापुढील मजकूर नाही.)

¶*Shyamrao Bhivrao describes his visit to Monsieur Bussy near the junction of the Bhima and the Krishna. The second sheet is missing.*

No. 138] *[5-6-1756*

पौा छ २६ रमजान

श्री

राजश्री बालाजीराव पंडित
प्रधान गोसावी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेाा मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणौन स्वानंदातिशये लेखने चित प्रमुदित केलें पाहिजे विशेष. गोसावियाणी वार्तिकासमागमें पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ आवगत जाहाला. सांप्रत आपण कोठें आहा? सोंडुरास पावला किंवा नाहीं म्हणोन लिहिलें. सवणुराहून दरमजल नदीपार होऊन सोंडुरास दाखल जाहालो. लोकाची समजाविसीकरिता किले मजकुरास न जातां बाहीर लस्करास राहून मनोती प्रारंभिली आहे. आठच्यार रोजामधें समजाविसी होईल. बसवापटण तालुका राजश्री रामचंद्र बावाजी याचे स्वाधीन आहे. त्यांची पत्रे येतील; त्यांजकडील साहित्य पुरवावें म्हणोन लिहिलं त्याची पत्रें आलीं नाहींत. आल्यानंतरे तदनरूप साहिता घडेल. परस्परें दुसरा विचार काये आहे? श्रावणमासानंतरे आपलें आगमन होऊन उमदे मनसुबे रुबकार व्हावे यैसे लिहिलें. आमचेहि मानस तेंच आहे, येतद्विषईचा अर्थ राजश्री सेटिबा खराडे यांस सांगोन समागमें आम्हाकडील राजश्री नागोजी श्रीनिवास चिटनीस यांस रवाना केले आहे. राजश्री मल्हारजीबावा होलकर याच्या विचारे आपणास सकलार्थ श्रवण होईल. आम्हास सर्वप्रकारे आपण वडील; ममता अधिकोत्तर दिनप्रति करीत जावी. आपणाविना आम्हीं काये आहों? राा विसाजी बाबूराव यांस तेथें राहून वर्तमान ल्याहावयास पाठविलें आहे म्हणून दर्शविलें; तरी काये

---

१ अडथळा करणें.

चिंता आहे? मारनुले अद्यापि आले नाहींत. च्यार रोजां येथे येतील म्हणिजे राहतील. राजश्री गोपाळराव गोविंद व राजश्री मल्हरराव रास्ते वगैरे दाहा हजार फौज छावणीस राहिल्याचे लिहिले उचितच आहे. सदैव पत्रद्वारा कुशलार्थ लेहून तोषवीत असावें रा छ ६ रमजान. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade reports his arrival at Sondur from Savnur and promises co-operation in the Peshwa's schemes regarding Karnatak.*

No. 139]

[*18-6-1756*

पो छ २६ रमजान

श्री

सेवेसी सेव्याजी खराडे कृतानेक विनंती विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान ताा छ १९ माहे रमजान मुा तुंगभद्रातीर पार नजीक बहादुराबिंडा येथें आसों. राा मुरारराव घोरपडे यानी छ १४ रोजी निरोप दिल्हा. त्याजकडील गुंता त्यानी याद लेहून दिली आहे त्या यादीबरहुकूम लाखा रुपयाचा भरणा मात्र केला आहे. साहेबाची आज्ञापत्रें आलीं कीं मुसाफरखान निकालस होऊन सर्व अभिमान सोडून धणियाचे आज्ञेत राहून ठेऊ तैसे राहावे इतके कबूल केले तर घेऊन येणे म्हणून आज्ञा. त्याजवरून मुसाफरखान यास आम्ही राा मुकुंदरायानी नाना युक्तिप्रक्ती बोध करून सर्वा गोष्टीचा उमज करून सांगितले कीं धण्याचे पदरी पडे आण त्याचे उर्जित होये यैसे सांगोन ताळावर आणिला. मग त्यानेहि निश्चयेकरून आम्हास सांगितले कीं आपण तुम्ही सांगितले ते मान्ये केले. सर्व अभिमान सोडून पुणियास धन्याच्या पायाजवळ तुमच्या वचनावर आपण येतों. मग खावंद वाईट अथवा बरें करोत. परंतु आपली भारबरदारी कैसी चालती ? वाटेस पोटास मात्र द्यावे वरकड भारदारी बहादुराबिंडियांत टाकावी. सडे मात्र खासा व कबिले व मुले दोन हती पालख्या व दोनसे गारदी इतके घेऊन तुम्हासमागमे येतो यैसा निश्चय केला; परंतु माझ्या लोकाचा गवगवा आहे तो वारावा लागतो, दोन मुकाम करणे आण तुम्ही आम्ही मिळोन लोकाचा तंटा वारूं, मग कूच करूं. त्यास आम्ही आपले लस्कर मुहूर्तेकरून पुढे तीन कोसावर मुकाम करविला. आम्ही व मुकुंदराव दोन दिवस त्याजसी राहून त्याच्या लोकाचा गुंता उगविला. वोझि-

यास हती येक दिल्हा, दोन जमातदार मात्र समजावयाचे राहिले होते तों संध्या जाहाला. आपलियास सोमवार होता. देवपुजा पुढे आली होती. याजमुले लस्करात प्रहर रात्री आलो. मुकुंदरायास तेथे त्याजजवल ठेविले आहे. त्यास दुसरे दिवसीं दोन प्रहरपर्यंत तलावर मुकाम केला. तों मुकुंदरायानी चिठी पाठविली कीं नदीस पाणी थोडके आहे यैसी खबर आली आहे. मुसाफरखानास आजिचा दिवस लागल तर तुम्ही कूच करून नदीपार लस्कर उतरोन मुकाम करणें तों आपण खानास घेऊन येतों; त्याजवरून कूच करून नदीपार होऊन मुकाम येक केला. काल संध्याकाली चिठी आली होती कीं कुचाचे दोन (न)गारे जाहाले होते. आम्ही वाटेने खर्चास द्यावे यैसा करार केला आहे. इतकियावर काही त्याचे मतलब कलत नाही. बोलल्या गोष्टी सेवटास जातील तेव्हा खऱ्या. जाहले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. मुसाफरजंगामुले मात्र दोन रोज गुंता होईल नाही तर मजल दरमजल येतो. रा मुरारजी घोरपडे यानी येताना कितेक येकनिष्ठेच्या मायावादाच्या सांगितल्या. साहेबाच्या वचनावर विस्वास ठेऊन (पुढील बंद गहाळ)

¶*Letter from Setyaji Kharade: Setyaji on behalf of the Peshwa persuades Muzaffarkhan to enter his service.*

No. 140] *[22-6-1756*

पो छ १८ जिल्हेज

श्री

श्रीमंत मातुश्री सगुणाबाई वडिलांचे सेवेसी

विनंती. सेवक जनार्दन बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील ताा छ २३ रमजानपावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण दोन च्यार पत्रें पाठविली ती पावली. श्रीप्रयागास पावोन तेथे त्रिरात्र राहून, पुढे श्रीवाराणसीस गेलो म्हणोन पत्र पाठविले तेहि पावले. बहुत संतोष जाहाला. श्रीमंतास पत्रें लिहिली होती ती लस्करास रवाना केली. श्रीमंताकडील वर्तमान तर श्रीमंत कर्नाटक प्रांती गेले तो मुरारराव घोरपडे याणी युध्याचा मजकूर आरंभिला. श्रीमंताची फौज मातबर जमा होतांच मुरारराव व मुजफरखान व सावनूरकर मोगल यैसे येकत्र होऊन सावनुरांत जाऊन बसले, आणि युद्ध करू लागले. श्रीमंतानी

वेढा भोवता घातला. सावनूर जेर केले. सावनुरांतील लोक फार मेले. इतकियांत नवाब सलाबतजंग श्रीमंताचे कुमकेस आले. त्याणीहि सावनुरास मोर्चे लाविले. फार जेर जाले. तेव्हां सावनुरवाला कौलास आला, आणि अकरा लक्ष रुपये खंडणी केली, त्यापैकी कांही रोख कांही मुदतीनें पाच लक्ष रुपयास बंकापुरचा किला श्रीमंताकडे गहाण ठेविला. तेथे श्रीमंताचे ठाणे बसले. सावनूरचा निमे मुलुक घेतला. मुरारराव व मुजफरखान येऊन श्रीमंतास भेटले. मुराररावयाणी च्यार हजार फौजेनसी चाकरी करावी याप्रो करार जाहाला. मुराररावनिरोप घेऊन आपले गावास गेले. श्रावणमासीं पुणियास येतो म्हणोन करार केला आहे. याप्रो सावनूरचा गुंता उरकून नवाब सलाबतजंग यास समागमे घेऊन श्रीमंत तुंगभद्रापार गेले. तिकडे बिदनूरची खंडणी बारा लाख जाली व हरपनहली व रायदुर्ग व चित्रदुर्ग वगैरे लाहान मोठी संस्थाने आपोआप येऊन भेटोन खंडण्या दिल्या. कोणी उचलून गोष्ट सांगितली नाही. श्रीरंगपटणास वकील गेले आहेत, तेथून स्वारी माघारी फिरोन तुंगभद्रेचे आलीकडे आले. सोंध्यास फौज रवाना केली होती तेथील खंडणी आठ लाख रुपये जाली. त्यापैकी कांही रोख कांही हवाले. बाकी यैवज राहिला त्यास फौज मर्दनगड श्रीमंताकडे गाहाण ठेविला तेथे श्रीमंताचे ठाणे बसलें. बसवापटणचे ठाणे मातबर होते ते श्रीमंतानी घेऊन तेथे ठाणें बसविलें. याप्रों कर्नाटक प्रांतीचा मजकूर. नवाब सलाबतजंग याणी श्रीमंतासी फारच घरोबा संपादिला. मोगलाचे भावाभावात कजिया होता, चितसुधी नवती, त्याचा बंदोबस्त श्रीमंतानी करून दिल्हा. येकमते चालावे याप्रो करार जाला. मोगलास निरोप दिल्हा तो भागानगरास गेला. मोगलाजवळ मुसा भुसी फिरंगी होता, त्याचे मोगलाचे बनत नवतें, याजकरितां श्रीमंतानी मुसा भुसीस सांगितलें की तूं आपले देशास जाणे, पुढे येणें, मग आम्ही चाकर ठेऊं. मोगलाकडे जावयास गरज नाही, त्यावरून मुसा भुसीबराबर श्रीमंतानी फौज देऊन देशास फुलचरीस रवाना केले. पुढे आला तर चाकर ठेवितील. याप्रों कर्नाटक प्रांतीचा गुंता उरकून स्वारी माघारी फिरली. कृष्णा उतरोन आलीकडे मिरजेजवळ आले. तेथून पत्रें आली. दरमजल पुणियास येतो म्हणौन लिहिलें. जेष्ठ अखेर अथवा आशाढ शुध पंचमी इतके श्रीमंत पुणियास येतील. आपणांस कळावें म्हणून लिहिलें असे. कोकण प्रांतीचे वर्तमान तरी तुळाजी अंगरे याचे सारे किले घेतले. विजेदुर्गीत इंग्रेज सिरला आहे तो किला देत नाही. काही आपला मतलब साधून घेऊन किला हवाली करणार यैसे आहे. इतकियांत श्रीमंत पुणियास येतील इंग्रेज किला देईल असें करिता लबाडीस आला

तरी किला ध्यावयास श्रीमंतास अगाध आहे यैसे नाही. यथासांग पारपत्य होईल. तुलाजी आंगरे पुणियांत आणून ठेविले आहेत. सविस्तर वृत आपणांस कलावे म्हणोन लिहिलें असे. बहुत काये लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*A very lucid account of the Peshwa's achievement in the Karnatak, his capture of Savanur, his friendship with Salabatjang and the dismissal of Bussy from the Nizam's court, with a promise on the part of the Peshwa to re-employ him on his return, is given in this letter by Janardan Ballal Bhanu (father of Nana Fadnis) to Sagunabai (wife of Janardan Baba).*

No. 141] [*Recd. 24-6-1756?*

पौ छ २९ रमजान

श्री

सेवेसी विज्ञापना. मुरारराव घोरपडे येथे दाखल जाहाले तेच दिवसी कनवेहाली म्हणौन गडी चौबुरजी बारीनजीक आहे, ती रातीचे जाऊन राहिले. गाडदी फिरंगी प्यादे चौकीस बसविले. परवानगीसिवाई कोणी जाऊ न शके. पठाण लोक याचे तलबेचे कजिये बहुत. येक दिवस याणी गडीवर चालोन घेऊन, कजिया मातबर जाहाला होता. कांही तोडातोड जाहाली. दोनच्यार जखमी जाहाले. याजउपर मध्येस्थ पडोन कजिया तूर्त वारिला. पठाण लोक वगैरे याचा हिसेब तमाम करून कोणास निमे कोणास तीन तक्षिमा जाहाल्या. हिसेबापैकी देऊन कजिया फैसल केला. तोफखाना कदीम आहे त्याची तयारी केली. ज्याजती दोन तोफा तयार केल्या. स्वारीस जावे यैसा सिधात आम्हास कलल्यावर सेटिबास घेऊन, रायाकडे गेलो. पुसिले की, श्रीमंतासी मध्येस्तमुखे करार केला श्रावणमासी पुणियास जावें. आपला मतलब श्रीमंतानी फैसल करून द्यावा यैसा करार असता, स्वारीची तयारी होते हे काय? त्याजवरून त्याणी उतर केले की, पालेगारावर आपले कर्ज आहे. चौथाईपैकी यैवज येणे त्याचा वसूल करावयाकरिता इनजखान यास फौजसुधा पाठवितो. आपण जात नाही. आपण केला करार बमोजिब श्रावणमासी पुणियास येणे. आपले बुदरूखी+ प्रा॥ श्रीमंतानी चालविले तर सरदारी करणें; नाही तर सरदारी सोडून घरी बसणे म्हणौन त्याजवरून राव मारनिलेचे समाधान बहुता रीतीने केले की, तुम्ही मातबर राज्यातील, तुमचे स्वरूपाप्रा॥ चालऊन. मातबर काम हातून घ्यावे हे मनोदये असता वारंवार यैसे

+ योग्यता व सामर्थ्य.

आम्ही व रा मुकुंदराव दोन रोज सडे राहून त्याच्या लोकाचे समाधान केले. सारे लोक समजाविले. दोघे जमातदार मात्र समजावयाचे राहिले. तो संध्याकाल जाहाला. आम्हास सोमवार होता. देवपुजा पुढे लस्करात गेली होती याजमुळे सर्वांनी आग्रह करून लस्करांत जाणे म्हणून अतिशये केला. खानानी करार केला की आपण प्राथकालीच कूच करून येतो. मुकुंदरायास येथे ठेवणे आण तुम्ही जाणे. मग आपण प्रहर रात्रीस लस्करांत आलो. दुसरे दिवसी मुकाम केला तो दोन प्रहरा मुकुंदरायाचे पत्र आले कीं तुंगभद्रेस पाणी थोडके आहे यैसे वर्तमान आले आहे, तर तुम्ही लस्कर घेऊन नदीपार होऊन मुकाम करणे, तों आपण खानास घेऊन येतो. मग आम्ही कूच करून नदीपार होऊन च्यार मुकाम केले. मुसाफरखानानीहि सेंडुरीहून कूच करून दोन मजली आलीकडे आले. तुंगभद्रेच्या पलीकडे चौकोसावर मुकाम केला. मग मुकुंदरायास बोलाऊन नेऊन सांगितले कीं आपणास लोक काही येऊ देत नाहीत. लोकांचा निर्गम जाहलियावाचून आपल येण होत नाहीत. तर तूर्त आपणास नख्त रुपये पाऊण लक्ष देणे, तर आपण येऊ. नाही तर परिछिन येत नाही. यैसे सांगून मुकुंदरायास निरोप दिल्हा. महमद अलम व सुमेरसिंग यैसे दोघे जमातदार घेऊन आलों. तीन हजाराच्या यैवजात हती आणिला. महमद अलमास व सुमेरसिंगास दोन हजार रुा खर्चास दिल्हे. मुसाफरजंगाची अनुसंधाने जागा जागा वकील गेलेत. सलाबतजंगाची व फुलचरीवालियांची पत्रे येतात. मोगला-कडे जावयाचा फारसा मनसुभा आहे. त्याची बुद्धि शाश्वत नाही. आम्ही जितका उपाये करणे तितका केला. अंतर केला नाही. राजश्री मुराररायापासून तो तोडच करून काढून दिल्हा. या रीतीचा मजकूर जाहला तो सेवेसी लिहिला असे. मुा मजकुरीहूनहि मुराररायासहि पत्र पाठविले. साहेबी इनसखानाचा मजकूर लिहिला होता तो भाव दर्शऊन सामोपचारेंच उमजोन लिहिला आहे. कृष्णापार जाहालियावर मजल दरमजल सत्वरच सेवेसी येऊन पोहचतों. मुसाफरखानाचें वर्तमान तपसीलवार राजश्री मुकुंदरायाचे पत्री लिा आहे त्याजवरून श्रुत होईल. हे विज्ञापना. सेवेसी श्रुत होये.

¶*Setyaji Kharade, an officer in Holkar's service, writes to the Peshwa complaining about Muzaffarkhan's procrastination in the matter of entering the latter's service.*

No. 143]

पौ छ ३ सवाल [*Recd. 2-7-1756*

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना. सविस्तर आलाहिदा पत्रावरून विदित होईल. मुरारराव श्रावणमासी येतात. त्याचे भाव कितेक मुखोतरे बोलावयाचे आहेत.

मुजफरखान याचेहि अर्थ बारीक बारीक विदित व्हावे लागतात, ते स्वामीचे दर्शनाअंती विदित होतील. सारांश स्वामीचे आज्ञेप्रां खानास सडे कबिलासुधा घेऊन यावे हे गोष्टीचा प्रेत्न बहुत केला; परंतु सेवटी तैसा प्रकार त्याणी केला. तीन हजार रुपये सेवकानी देविले होते, ते धणियाचे पुण्येकडून उगवले. त्या यैवजी हती घेऊन आलो. महमद अलम याचाहि कतबा घेतला आहे. चिंता नाही. सदरहू खत सेटिबाजवल सेवकांनी दिल्हे आहे. सुमेरसिंग, महमद अलम, सिदी अबर तिघे सुभेदार समागमे घेऊन यावे म्हणोन स्वामीची आज्ञा. त्याजवरून या उभयेतास जमावसुधा घेऊन आलो. दोन हजार रुपयाचे सोने त्यांस द्यावे लागले. दिल्यासिवाई त्याचे येणें न घडे. लोकास खर्चास नाही. तीन तीन फाके पडो लागले यास्तव सदरहू दोन हजार सेवकानी कबूल करून यास घेऊन तुंगभद्रापार घेऊन आलो. सेटिबास सांगोन यैवज देविला. सदरहूचे खत घेतले आहे. पुणियास पावलियावर दुसरे दिवसी माहाद सेटीजवळून निशा करून देतो म्हणोन लेहून दिल्हे आहे. याजवल च्यार हजारांचा हतीहि आहे. यैवज पाहून दोन हजार रुपये दिल्हे; आणि यांचे हुकुमासिवाई चाकर लोकी काडी मात्र वर्तणूक करू नयें हे खरेच आहे; परंतु प्रसंग पाहून आज्ञेसिवाई वर्तणूक केली आहें. क्षमा करणार धणी समर्थ आहेत. याचा अर्थ दर्शनाअंती सेवेसी निवेदन होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापनां. सिदी अंबर पेशजीच जमावसुद्धा सेवेसी आला आहे हे विज्ञापना.

¶*The writer reports to the Peshwa his success in winning over Sumersing, Muhammad Alam and Sidi Ambar, all captains of guard under Muzaffarkhan, into the Peshwa's service though Muzaffarkhan withdrew his consent at the eleventh hour. As regards Murarrao, he desires to talk over the matter in a personal interview with the addressee.*

No. 144] [*Recd. 2-7-1756*

पौ छ ३ सवाल

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना. अशाढ सुध द्वितीयेस कृष्णापार जाहलो. सेटिबा पलीकडे आहेत, ते दोन दिवसी उतरतील. येथे आल्यावर सेवकाची मातुश्रीस देवआज्ञा जाहलियाचे वर्तमान आलेयाउपर दाहा दिवस येथे गुंता पडला. सेटिबा पुढे येतील, मागांहून सेवेसी येतो. लोकास नालबंदी व कापड येंदा दिल्हे नाही.

म्हणावे उचित नाही. थोरले साहेबाचे चिती येक सरदार मातबर हिंदुस्थानात ठेवावे, येक मातबर कर्नाटकात ठेवावें आणि आपण पुणियास आनंद करीत राहावें यैसें मानस आहे. जर करितां तुमचा लाभकाल असिला तर हेहि गोष्ट घडल. तुम्हासिवाई मातबर आणखी कैसे असतात म्हणौन बहुताप्रो समाधान करून बोलिलो. श्रावणमासची तयारी करावी. दिवस राहिले नाही. त्यावरून राव बोलिले की, आपण फौजसुधा येणे नाही. से पनास राऊत शागरीतपेशा मात्र घेऊन येणे. जाजती खर्च कशास पाहिजे, म्हणौन निश्येरूप बोलिले. श्रावणमासी येतात यैसे दिसते. चहू पाचा दिवसी याची फौज बाहेर जाते. पुढे काये मनसबा होईल हे पाहावें. याजकडील लाख रुपये यैवज कराराप्रा तूर्त यावा. त्यास आजी पाऊणमास येथ जाहाले, आज उद्या म्हणौन खर्चाखाली आलो. निकड जा * * दररोज करीतच होतो. त्यास मडकासिरेयास माणसे पाठविली होती ती आली. त्याजसमागमे हती, सोने, जवाहीर आले. दुसरे दिवसी सेटिबा आम्ही जाऊन सदरहू लाख रुा भरणा त्याणी दिल्याप्रा घेतला. त्याचा तपसील सेटिबानी सेवेसी लेहून पाठविला आहे, त्याजवरून विदित होईल. सोने व जवाहीर व तीन हती मिलोन लाख रुपये आपले जागा करून दिल्हे आहेत. परंतु किमत पुणियास होता तोटा येईल. सुभेदाराचे विचारे तोटा येईल तो, आपण भरून देईन म्हणौन दस्तायैवज लेहून दिल्हे आहे. घोडी तीन सरकारची मेली. सेटिबाकडील पाच मेली, खराबी जाहाली, उपाये नाही. मैंदासी गांठ यास्तव हातास आल्याप्रा निकाल करून निघालो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Letter from Sondur to the Peshwa reporting the attitude of Murarrao Ghorpade and his intended departure for Poona in August.

No. 142] *[1-7-1756*

पा छ ३ सवाल

॥ श्री ॥

सेवसी सेव्याजी खराडे कृतानेक दंडवत विनंती विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान ता छ २ माहे सवाल पावेतो मुा श्रीकृष्णातीर हालीहलच्या घाटावर येऊन पोहचलों. येथे दोन मुकाम जाहाले. पाणी फार आले आहे आणिक च्यार पांच रोज उतरावयास लागतील. नदीपार जाहालिया सत्वरच हजूर येऊन सेवेसी पोहचतों. तुंगभद्रेच्या मुकामीहून सेवेसी विनंतीपत्र प्रेशिले होते त्याचें उतर मुा मजकुरी पावोन बहुत संतोश जाहाला. राजश्री मुराररायाकडील मजकूर

3964

लाखा रुपयांची याद सरकारात लेहून दिल्ही त्याप्रमाणे भरणा मात्र करून दिल्हा आहे. सोने व जवाहीर व हती दिल्हे याजविसी आम्ही जितकी कोशीस करावयाची ते केली. रायानी येकच गोष्ट सांगितली की जो वाजवी निरखामुले तोटा येईल तो आपण भरून देऊ. येविसी त्याच्या स्वदस्तुरे लेहूनहि घेतले आहे. आम्हासमागमे राजश्री नागो श्रीनिवासराव चिटणीसहि दिल्हे आहेत. आम्ही त्याची मर्जी रक्षून जैसा निकाल निघाला तैसा करून घेतला. त्याच्या मनातील कितेक संदेहबोध करून निवारण केले. पुणियास यावे हा निश्चये केला. रावहि बहुत येकनिष्ठतेने आहेत. साहेबाच्या आज्ञेवरून मुसाफरजंग यासहि निरोप दिल्हा. तेथेहि आम्हास जे सुचले ते तजवीज करून उभयेतात परस्परे विक्षेप आणिला. आम्ही जितका उपाये करणे त्यास आंतर केले नाही. मुसाफरखानाविसी सा(हे)बाची दोन आज्ञापत्रें आली कीं निराभिमान होऊन काही मुदे न घालता धन्याचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करून येईल तर घेऊन येणें. त्याचे धनी गौर करितील म्हणून आज्ञा. याजवरून येकमासपर्यंत याच उदेगांत राहून नाना युक्तीने त्यास समजाऊन वाटेंवर आणिला. त्यानेहि सर्व गोष्टी बोललिया बरहुकूम मान्ये केल्या. आपण खामखा तुमच्या वचनावर खावंदाच्या पायाजवल येकदा जाऊ. मग धनी बरे अथवा वाईट करोत यैसा निश्चयेरूप करार जाला. परंतु म्हणो लागला की आपला गलाटा फार आहे. लोकांचा दंगा तुम्हास विदितच आहे. आण तोफा व भारदारी कैसी चालेल? वाटेने खर्चास पाहिजेत मग आम्ही खावंदाच्या आज्ञेवितरिक्त त्यास वाटेस खर्चास वीस पंचवीस हजार रुा पावेतो द्यावे यैसा करार केला. तोफा वगैरे सरंजाम बाहादुरबिंडियात टाकावा, मग पुणियात गेलियावर त्याची बेजमी करून पाठवावी. मुसाफरखान खासा व कबिले व दोनसे गारदी इतकियानसी मात्र आम्हासमागमे चालावे, याप्रकारे सिधांत ठरला. राजश्री मुरारराव याचे व मुसाफरखानाचे कटाक्ष वाढले. त्यास खानानी आम्हास सांगितले की रायांचा आमचा भाऊपणा आण आपण निरोप न घेता उठोन जावे तर यैसीच बदनामी जागाजगा येती; तर तुम्ही रायापावेतो जाऊन आपणास समाधाने निरोप मात्र देवणे. मग आम्ही उभयेताचे सोरश करून खानास निरोप देविला. मग कूच करावे तो लोकानी हंगामा केला. मग आम्हाजवल तीन हजार रुपये मागितले आण तुम्ही बसोन लोकांचे समाधान करणे, लोक तुमचे यैकतील म्हणून लागला. त्यास तीन हजार रुपयाचे सोने दिल्हे. त्यास जामीन महमद अलम घेतला. या ग्रहस्ताचा इतबार नाही म्हणून महमद अलमाचा कतबा घेतला. मग यैवज दिल्हा.

आम्ही व रा मुकुंदराव दोन रोज सडे राहून त्याच्या लोकाचे समाधान केले. सारे लोक समजाविले. दोघे जमातदार मात्र समजावयाचे राहिले. तो संध्याकाल जाहाला. आम्हास सोमवार होता. देवपुजा पुढे लस्करात गेली होती याजमुले सर्वानी आग्रह करून लस्करांत जाणे म्हणून अतिशये केला. खानानी करार केला की आपण प्राथकालीच कूच करून येतो. मुकुंदरायास येथे ठेवणे आण तुम्ही जाणे. मग आपण प्रहर रात्रीस लस्करांत आलो. दुसरे दिवसी मुकाम केला तो दोन प्रहरा मुकुंदरायाचे पत्र आले कीं तुंगभद्रेस पाणी थोडके आहे यैसे वर्तमान आले आहे, तर तुम्ही लस्कर घेऊन नदीपार होऊन मुकाम करणे, तों आपण खानास घेऊन येतो. मग आम्ही कूच करून नदीपार होऊन च्यार मुकाम केले. मुसाफरखानानीहि सेंडुरीहून कूच करून दोन मजली आलीकडे आले. तुंगभद्रेच्या पलीकडे चौकोसावर मुकाम केला. मग मुकुंदरायास बोलाऊन नेऊन सांगितले कीं आपणास लोक काही येऊ देत नाहीत. लोकांचा निर्गम जाहलियावाचून आपल येण होत नाहीत. तर तूर्त आपणास नख्त रुपये पाऊण लक्ष देणे, तर आपण येऊ. नाही तर परिछिन येत नाही. यैसे सांगून मुकुंदरायास निरोप दिल्हा. महमद अलम व सुमेरसिंग यैसे दोघे जमातदार घेऊन आलों. तीन हजाराच्या यैवजात हती आणिला. महमद अलमास व सुमेरसिंगास दोन हजार रुा खर्चास दिल्हे. मुसाफरजंगाची अनुसंधाने जागा जागा वकील गेलेत. सलाबतजंगाची व फुलचरीवालियांची पत्रे येतात. मोगलाकडे जावयाचा फारसा मनसुभा आहे. त्याची बुद्धि शाश्वत नाही. आम्ही जितका उपाये करणे तितका केला. अंतर केला नाही. राजश्री मुराररायापासून तो तोडच करून काढून दिल्हा. या रीतीचा मजकूर जाहला तो सेवेसी लिहिला असे. मुा मजकुरीहूनहि मुराररायासहि पत्र पाठविले. साहेबी इनसखानाचा मजकूर लिहिला होता तो भाव दर्शऊन सामोपचारेंच उमजोन लिहिला आहे. कृष्णापार जाहालियावर मजल दरमजल सत्वरच सेवेसी येऊन पोहचतों. मुसाफरखानाचें वर्तमान तपसीलवार राजश्री मुकुंदरायाचे पत्री लिा आहे त्याजवरून श्रुत होईल. हे विज्ञापना. सेवेसी श्रुत होये.

¶*Setyaji Kharade, an officer in Holkar's service, writes to the Peshwa complaining about Muzaffarkhan's procrastination in the matter of entering the latter's service.*

No. 143] [*Recd. 2-7-1756*

पौ छ ३ सवाल

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना. सविस्तर आलाहिदा पत्रावरून विदित होईल. मुरारराव श्रावणमासी येतात. त्याचे भाव कितेक मुखोतरे बोलावयाचे आहेत.

मुजफरखान याचेहि अर्थ बारीक बारीक विदित व्हावे लागतात, ते स्वामींचे दर्शनाअंती विदित होतील. सारांश स्वामीचे आज्ञेप्रां खानास सडे कबिलासुधा घेऊन यावे हे गोष्टीचा प्रेत्न बहुत केला; परंतु सेवटी तैसा प्रकार त्याणी केला. तीन हजार रुपये सेवकानी देविले होते, ते धणियाचे पुण्येकडून उगवले. त्या यैवजी हती घेऊन आलो. महमद अलम याचाहि कतबा घेतला आहे. चिंता नाही. सदरहू खत सेटिबाजवळ सेवकांनी दिल्हे आहे. सुमेरसिंग, महमद अलम, सिदी अबर तिघे सुभेदार समागमे घेऊन यावे म्हणोन स्वामीची आज्ञा. त्याजवरून या उभयेतास जमावसुधा घेऊन आलो. दोन हजार रुपयाचे सोने त्यांस द्यावे लागले. दिल्यासिवाई त्याचे येणें न घडे. लोकास खर्चास नाही. तीन तीन फाके पडो लागले यास्तव सदरहू दोन हजार सेवकानी कबूल करून यास घेऊन तुंगभद्रापार घेऊन आलो. सेटिबास सांगोन यैवज देविला. सदरहूचे खत घेतले आहे. पुणियास पावलियावर दुसरे दिवसी माहाद सेटीजवळून निशा करून देतो म्हणोन लेहून दिल्हे आहे. याजवळ च्यार हजारांचा हतीहि आहे. यैवज पाहून दोन हजार रुपये दिल्हे; आणि यांचे हुकुमासिवाई चाकर लोकी काडी मात्र वर्तणूक करू नयें हे खरेच आहे; परंतु प्रसंग पाहून आज्ञेसिवाई वर्तणूक केली आहें. क्षमा करणार धणी समर्थ आहेत. याचा अर्थ दर्शनाअंती सेवेसी निवेदन होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. सिदी अंबर पेशजीच जमावसुद्धा सेवेसी आला आहे हे विज्ञापना.

¶*The writer reports to the Peshwa his success in winning over Sumersing, Muhammad Alam and Sidi Ambar, all captains of guard under Muzaffarkhan, into the Peshwa's service though Muzaffarkhan withdrew his consent at the eleventh hour. As regards Murarrao, he desires to talk over the matter in a personal interview with the addressee.*

No. 144] *[Recd. 2-7-1756*

पौ छ ३ सवाल

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना. अशाढ सुध द्वितीयेस कृष्णापार जाहलो. सेटिबा पलीकडे आहेत, ते दोन दिवसी उतरतील. येथे आल्यावर सेवकाची मातुश्रीस देवआज्ञा जाहलियाचे वर्तमान आलेयाउपर दाहा दिवस येथे गुंता पडला. सेटिबा पुढे येतील, मागांहून सेवेसी येतो. लोकास नालबंदी व कापड येंदा दिल्हे नाही.

आम्ही व रा मुकुंदराव दोन रोज सडे राहून त्याच्या लोकाचे समाधान केले. सारे लोक समजाविले. दोघे जमातदार मात्र समजावयाचे राहिले. तो संध्याकाल जाहाला. आम्हास सोमवार होता. देवपुजा पुढे लस्करात गेली होती याजमुले सर्वांनी आग्रह करून लस्करांत जाणे म्हणून अतिशये केला. खानानी करार केला की आपण प्राथकालीच कूच करून येतो. मुकुंदरायास येथे ठेवणे आण तुम्ही जाणे. मग आपण प्रहर रात्रीस लस्करांत आलो. दुसरे दिवसी मुकाम केला तो दोन प्रहरा मुकुंदरायाचे पत्र आले कीं तुंगभद्रेस पाणी थोडके आहे यैसे वर्तमान आले आहे, तर तुम्ही लस्कर घेऊन नदीपार होऊन मुकाम करणे, तों आपण खानास घेऊन येतो. मग आम्ही कूच करून नदीपार होऊन च्यार मुकाम केले. मुसाफरखानानीहि सेंडुरीहून कूच करून दोन मजली आलीकडे आले. तुंगभद्रेच्या पलीकडे चौकोसावर मुकाम केला. मग मुकुंदरायास बोलाऊन नेऊन सांगितले कीं आपणास लोक काही येऊ देत नाहीत. लोकांचा निर्गम जाहलियावाचून आपल येण होत नाहीत. तर तूर्त आपणास नख्त रुपये पाऊण लक्ष देणे, तर आपण येऊ. नाही तर परिछिन येत नाही. यैसे सांगून मुकुंदरायास निरोप दिल्हा. महमद अलम व सुमेरसिंग यैसे दोघे जमातदार घेऊन आलों. तीन हजाराच्या यैवजात हती आणिला. महमद अलमास व सुमेरसिंगास दोन हजार रुा खर्चास दिल्हे. मुसाफरजंगाची अनुसंधाने जागा जागा वकील गेलेत. सलाबतजंगाची व फुलचरीवालियांची पत्रे येतात. मोगलाकडे जावयाचा फारसा मनसुभा आहे. त्याची बुद्धि शाश्वत नाही. आम्ही जितका उपाये करणे तितका केला. अंतर केला नाही. राजश्री मुराररायापासून तो तोडच करून काढून दिल्हा. या रीतीचा मजकूर जाहला तो सेवेसी लिहिला असे. मुा मजकुरीहूनहि मुराररायासहि पत्र पाठविले. साहेबी इनसखानाचा मजकूर लिहिला होता तो भाव दर्शऊन सामोपचारेंच उमजोन लिहिला आहे. कृष्णापार जाहालियावर मजल दरमजल सत्वरच सेवेसी येऊन पोहचतों. मुसाफरखानाचें वर्तमान तपसीलवार राजश्री मुकुंदरायाचे पत्री लिा आहे त्याजवरून श्रुत होईल. हे विज्ञापना. सेवेसी श्रुत होये.

¶*Setyaji Kharade, an officer in Holkar's service, writes to the Peshwa complaining about Muzaffarkhan's procrastination in the matter of entering the latter's service.*

No. 143] *[Recd. 2-7-1756*

पौ छ ३ सवाल

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना. सविस्तर आलाहिदा पत्रावरून विदित होईल. मुरारराव श्रावणमासी येतात. त्याचे भाव कितेक मुखोतरे बोलावयाचे आहेत.

मुजफरखान याचेहि अर्थ बारीक बारीक विदित व्हावे लागतात, ते स्वामींचे दर्शनाअंती विदित होतील. सारांश स्वामीचे आज्ञेप्रां खानास सडे कबिलासुधा घेऊन यावे हे गोष्टीचा प्रेत्न बहुत केला; परंतु सेवटी तैसा प्रकार त्याणी केला. तीन हजार रुपये सेवकानी देविले होते, ते धणियाचे पुण्येकडून उगवले. त्या यैवजी हती घेऊन आलो. महमद अलम याचाहि कतबा घेतला आहे. चिंता नाही. सदरहू खत सेटिबाजवल सेवकांनी दिल्हे आहे. सुमेरसिंग, महमद अलम, सिदी अबर तिघे सुभेदार समागमे घेऊन यावे म्हणोन स्वामीची आज्ञा. त्याजवरून या उभयेतास जमावसुधा घेऊन आलो. दोन हजार रुपयाचे सोने त्यांस द्यावे लागले. दिल्यासिवाई त्याचे येणें न घडे. लोकास खर्चास नाही. तीन तीन फाके पडो लागले यास्तव सदरहू दोन हजार सेवकानी कबूल करून यास घेऊन तुंगभद्रापार घेऊन आलो. सेटिबास सांगोन यैवज देविला. सदरहूचे खत घेतले आहे. पुणियास पावलियावर दुसरे दिवसी माहाद सेटीजवळून निशा करून देतो म्हणोन लेहून दिल्हे आहे. याजवल च्यार हजारांचा हतीहि आहे. यैवज पाहून दोन हजार रुपये दिल्हे; आणि यांचे हुकुमासिवाई चाकर लोकी काडी मात्र वर्तणूक करू नयें हे खरेच आहें; परंतु प्रसंग पाहून आज्ञेसिवाई वर्तणूक केली आहें. क्षमा करणार धणी समर्थ आहेत. याचा अर्थ दर्शनाअंती सेवेसी निवेदन होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. सिदी अंबर पेशजीच जमावसुद्धा सेवेसी आला आहे हे विज्ञापना.

¶*The writer reports to the Peshwa his success in winning over Sumersing, Muhammad Alam and Sidi Ambar, all captains of guard under Muzaffarkhan, into the Peshwa's service though Muzaffarkhan withdrew his consent at the eleventh hour. As regards Murarrao, he desires to talk over the matter in a personal interview with the addressee.*

No. 144] *[Recd. 2-7-1756*

पौ छ ३ सवाल

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना. अशाढ सुध द्वितीयेस कृष्णापार जाहलो. सेटिबा पलीकडे आहेत, ते दोन दिवसी उतरतील. येथे आल्यावर सेवकाची मातुश्रीस देवआज्ञा जाहलियाचे वर्तमान आलेयाउपर दाहा दिवस येथे गुंता पडला. सेटिबा पुढे येतील, मागांहून सेवेसी येतो. लोकास नालबंदी व कापड येंदा दिल्हे नाही.

गवगवा बहुत केला आहे. यास मिरजेहून निरोप दिल्हा पाहिजे. यास्तव तूर्त ला मिरजेस अथवा पुणियाहून ८००० येथे स्वामीने रवाना करावे. लोकाची समजावीस करून सेवेसी येऊ. पुणियास आल्यावर बेगमी होईल म्हणोन धणी आज्ञा करीतील तर लोक मिरजेस राहतील. त्यास रोजमरा दीडमाही दिल्हा पाहिजे यास्तव सेवेसी विज्ञापना लिा आहे. यांत धणियाची मर्जी असल त्याप्रा आज्ञा करणार धणी आहेत. वर्तणूक केली जाईल. हली आज्ञापत्र छ २ सवाली जासुदासमागमें पाठविले ते पावलें. आज्ञेप्रा कललें. मुरारराव याजकडे येक जोडी रवाना केली. धण्याचे मर्जीचा भाव त्यास लिा आहे. सेवेसी श्रुत होई. मुजफरखान याजवल तुलसाजी नाईक व जोडी १ येणेप्रमाणे ठेविली आहे. कोणे रोखे जातो कोठे पावतो हे पुर्ते मनास आणून लेहून पाठवावे म्हणोन सांगितले आहे. हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat requests the Peshwa for funds to pay off his men in order to expedite his return to Poona; he also mentions arrangements he has made to watch the movements of Muzaffarkhan.*

No. 145] [*8-10-1756*

पाा छ २२ सफर

श्री

सेवेसी विज्ञापना मुजफरखान येऊन पदरीं पडला त्यास ठेवावा कीं न ठेवावा हे लिहिणें म्हणून आज्ञा. त्यास ठेवावा न ठेवावा हा विचार कर्तव्य तो स्वामीनीच करावा. वडिलांचे बुधिपुढें आमची बुद्धि विशेष नाहीं. जे स्वामी करितील ते योग्यच करितील. राा छ २३ मोहरम. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Raghunathrao to Peshwa Nanasaheb, refusing to give a decisive answer to the query referred to him for opinion whether Muzaffarkhan, the artillery expert, should be engaged or not.*

No. 146] [*10-10-1757*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
महिपतरावजी गोसावी यांसी

श्नो विसाजी कृष्ण आसीर्वाद विनती उपरी. येथील कुशल ताा छ २९ मोहरम आस्विन वद्य १२ त्रयोदसीपावेतो मुाा कसबे कडपे सुखरूप असो विशेष. आप-

णाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान किमपि कळत नाही याजकरिता चित उदास आहे, तरी असे न करावे. सदैव येणारा माणसासमागमें पत्र पाठऊन संतोषवीत गेले पाा. आम्ही छावणीस राहिल्यापासून आपणास दोन च्यार पत्रें पाठविली ती पावली किंवा नाही हे न कळे. आपली दोन वेळा पत्रे मागें आली होती त्या आलीकडे स्मरण करून पत्र न पाठविले; तरी तुमचा आमचा श्नेह असा नाही. मनोमन साक्ष आहे. तरी सदैव पत्र पाठऊन परामर्ष करीत गेले पाहिजे. काटोकूल (कटकोळ?)च्या मुकामीहून सविस्तर वर्तमान राजश्री बलवंतरावजी याणी व आम्ही तुम्हास लिाा होते त्यावरून कळले असेल. राजश्री शामराव भिवराव यास कडपियास वकिलीस पाा होतें, त्यास येथे न लिहिता लाख रुो खंडणी कबूल केली; आणि बलवंतरावजीस लिहिले की आम्ही लाख कबूल केले. त्यावरून राजश्री बलवंतरावजी यास व आम्हास सर्व सरदारास राग आला; आणि आम्हाबराबरी फौजा सञ्या देऊ(न) कडपियास रवाना केले, तो सिलीमखान वगैरे पठाण याणी गनीम मिया आबदूल माजिदखान याचा चुलत भाऊ यास पटावर स्थापिले. आबदूल मजिदखान आधीच सिबंदीच्या दंग्यामुळे सिदवटास पळून गेला होता. कडपे रिकामे पाहोन गनीमियास बसविले हें वर्तमान आम्हास पहिले मजलीस कळले, तेव्हा बरे जाहले. दोघा भावात दुही परिछिन्न जाहली. येकाकडे तरी सरकारचे काम साधले म्हणौन बरे. मागून कूच करून पुढे दुसरे मजलेस आलो तो वर्तमान ऐकिले की कोणी त्यास खबर केली की फौज येऊन पावली. तिकडून आबदूल मजीदखान, इकडून आम्ही याजमुळे धीर निघेना, मग जावेसे जाहाले [पुढील १ बंद गाहाळ] सर्व पठाण मेळऊन रात्रीचे जाऊन कडपियात सिरावे ऐसी तजवीज केली. तयार होऊन पाहाटेच्या प्रहर रात्रीस निघाला तो पाऊस अतिवृष्टी जाली. तेव्हा तसाच गावाबाहेर उभा राहिला. आम्ही चौकीबंदी करून उभे होतो. त्याचे वर्तमान आम्हास नाही. आम्हासहि पाहाटेस पाऊस लागला. आम्ही तसेच दिवस उगवे तो पाऊसाचेच कोटाच्या दरवाजियाजवळ गेलो. तमाम सरदार बलाऊ पाठविले. सिदवटाकडे बातमीस राऊत याचे पाठविले होते ते आले. त्याणी सांगितले की दोन हजार प्यादे व पाचसे राऊत बारीत आले आहेत सावधपणे राहाणे. त्याजवरून हरबास[1] पुढे पाठविले. आम्ही फौजत येऊन तयार होऊन गेलों. पुढे हरबाचे तोंड लागले. तो साराच आबदुल माजिदखानच आला. त्याची याची थडक जाहाली. हरबाचे लोकानी बरीच केली. मागोन फौजा घेऊन आम्ही गेलों. आवघ्यानी

१. हरि गोपाळ व आनंदराव गोपाळ सुपेकर देशपांडे, पुरंदऱ्यांचे तर्फेचे.

3969

गवगवा बहुत केला आहे. यास मिरजेहून निरोप दिल्हा पाहिजे. यास्तव तूर्त ल्हा मिरजेस अथवा पुणियाहून ८००० येथे स्वामीने रवाना करावे. लोकाची समजावीस करून सेवेसी येऊ. पुणियास आल्यावर बेगमी होईल म्हणोन धणी आज्ञा करीतील तर लोक मिरजेस राहतील. त्यास रोजमरा दीडमाही दिल्हा पाहिजे यास्तव सेवेसी विज्ञापना लिा आहे. यांत धणियाची मर्जी असल त्याप्राा आज्ञा करणार धणी आहेत. वर्तणूक केली जाईल. हली आज्ञापत्र छ २ सवाली जासुदासमागमें पाठविले ते पावलें. आज्ञेप्राो कललें. मुरारराव याजकडे येक जोडी रवाना केली. धण्याचे मर्जीचा भाव त्यास लिा आहे. सेवेसी श्रुत होई. मुजफरखान याजवल तुलसाजी नाईक व जोडी १ येणेप्रमाणे ठेविली आहे. कोणे रोखे जातो कोठे पावतो हे पुर्ते मनास आणून लेहून पाठवावे म्हणोन सांगितले आहे. हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat requests the Peshwa for funds to pay off his men in order to expedite his return to Poona ; he also mentions arrangements he has made to watch the movements of Muzaffarkhan.*

No. 145] [*8-10-1756*

पाा छ २२ सफर

श्री

सेवेसी विज्ञापना मुजफरखान येऊन पदरीं पडला त्यास ठेवावा कीं न ठेवावा हे लिहिणें म्हणून आज्ञा. त्यास ठेवावा न ठेवावा हा विचार कर्तव्य तो स्वामीनीच करावा. वडिलांचे बुधिपुढें आमची बुद्धि विशेष नाहीं. जे स्वामी करितील ते योग्यच करितील. राा छ २३ मोहरम. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Raghunathrao to Peshwa Nanasaheb, refusing to give a decisive answer to the query referred to him for opinion whether Muzaffarkhan, the artillery expert, should be engaged or not.*

No. 146] [*10-10-1757*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
महिपतरावजी गोसावी यांसी

श्नो विसाजी कृष्ण आसीर्वाद विनती उपरी. येथील कुशल ताा छ २९ मोहरम आस्विन वद्य १२ त्रयोदसीपावेतो मुाा कसबे कडपे सुखरूप असो विशेष. आप-

णाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान किमपि कळत नाही याजकरिता चित उदास आहे, तरी असे न करावे. सदैव येणारा माणसासमागमें पत्र पाठऊन संतोषवीत गेले पाा. आम्ही छावणीस राहिल्यापासून आपणास दोन च्यार पत्रें पाठविली ती पावली किंवा नाही हे न कळे. आपली दोन वेळा पत्रे मागें आली होती त्या आलीकडे स्मरण करून पत्र न पाठविले; तरी तुमचा आमचा श्नेह असा नाही. मनोमन साक्ष आहे. तरी सदैव पत्र पाठऊन परामर्ष करीत गेले पाहिजे. काटोकूल (कटकोळ?)च्या मुकामीहून सविस्तर वर्तमान राजश्री बळवंतरावजी याणी व आम्ही तुम्हास लिा होते त्यावरून कळले असेल. राजश्री शामराव भिवराव यास कडपियास वकिलीस पाा होतें, त्यास येथे न लिहिता लाख रुाो खंडणी कबूल केली; आणि बळवंतरावजीस लिहिले की आम्ही लाख कबूल केले. त्यावरून राजश्री बळवंतरावजी यास व आम्हास सर्व सरदारास राग आला; आणि आम्हाबराबरी फौजा सव्या देऊ(न) कडपियास रवाना केले, तो सिलीमखान वगैरे पठाण याणी गनीम मिया आबदूल माजिदखान याचा चुलत भाऊ यास पटावर स्थापिले. आबदूल माजिदखान आधीच सिबंदीच्या दंग्यामुळे सिदवटास पळून गेला होता. कडपे रिकामे पाहोन गनीमियास बसविले हें वर्तमान आम्हास पहिले मजलीस कळले, तेव्हा-बरे जाहले. दोघा भावात दुही परिछिन्न जाहली. येकाकडे तरी सरकारचे काम साधले म्हणौन बरे. मागून कूच करून पुढे दुसरे मजलेस आलो तो वर्तमान ऐकिले की कोणी त्यास खबर केली की फौज येऊन पावली. तिकडून आबदूल मजीदखान, इकडून आम्ही याजमुळे धीर निघेना, मग जावेसे जाहाले [पुढील १ बंद गाहाळ] सर्व पठाण मेळऊन रात्रीचे जाऊन कडपियात सिरावे ऐसी तजवीज केली. तयार होऊन पाहाटेच्या प्रहर रात्रीस निघाला तो पाऊस अतिवृष्टी जाली. तेव्हा तसाच गावाबाहेर उभा राहिला. आम्ही चौकीबंदी करून उभे होतो. त्याचे वर्तमान आम्हास नाही. आम्हासहि पाहाटेस पाऊस लागला. आम्ही तसेच दिवस उगवे तो पाऊसाचेच कोटाच्या दरवाजियाजवळ गेलो. तमाम सरदार बलाऊ पाठविले. सिदवटाकडे बातमीस राऊत याचे पाठविले होते ते आले. त्याणी सांगितले की दोन हजार प्यादे व पाचसे राऊत बारीत आले आहेत सावधपणे राहाणे. त्याजवरून हरबास[1] पुढे पाठविले. आम्ही फौजत येऊन तयार होऊन गेलों. पुढे हरबाचे तोंड लागले. तो साराच आबदुल मजिदखानच आला. त्याची याची थडक जाहाली. हरबाचे लोकानी बरीच केली. मागोन फौजा घेऊन आम्ही गेलों. आवघ्यानी

---

१. हरि गोपाळ व आनंदराव गोपाळ सुपेकर देशपांडे, पुरंदऱ्यांचे तर्फेचे.

तोंड लाविले; परंतु पठाण जोऱ्यानेच कडपियास चालिला. मग सर्वांनी नेट करून तोंड लाविले. दोन कोस भोई[1] सवा प्रहर पावेतो रण जाहाले. सेवटी खासा अबदूल मजिदखान यास गोळी लागोन ठार जाला. नव हती पाडाव जाले, व पाचसे घोडे आले. दोन च्यारसे माणूस त्याचे ठार आले; व दोनसे घोडे त्याचे ठार जाले, हजार पाचसे माणूस जखमी जाले. श्रीमंताच्या प्रतापे मोठी फते जाहली. आबदूल मजीदखान पाडाव मुरदा आणिला. श्रीमंताचे फौजेस येश आले. मोठे मोठे सरदार याचा वसवसा मानीत होते. तमाम करणाटक प्रांते पालेगारावर मोठ्या मोठ्या लोकावर त्याची इभ्रम(त) होती. तमाम सरदारानी आपल्या फार मेहेनती करून धाडस करून झुंजले. मातबर लोक जखमी जाहाले. संभाजी बाजी घोरपडे मातबर माणूस पडिले[2]. आम्हाकडील बाजीपंत यास गोळी लागोन ठार जाले. राजश्री बळवंतराव यास कोटाकुळास पहिले दिवस संकलित वर्तमान लिहिले होते, त्याणी तेथून पत्र संकलित लिा होते. आम्ही कडपियास होतो याजकरितां लिहिले नव्हते, म्हणोन आता लिा आहे. बाजीपंताने येंदा शर्त केली होती. मेहेनत तरवार दोन वेळा मारली; परंतु गोळी थोरल्या झुंजात लागली. येक दिवस होते, दुसरे दिवसी मृत्य पावले. मोठा घात जाला. आम्हास विसावा होता, बरे ईश्वर इछाप्रमाणे सरकार कामावर मोठ्या पडिला; चिंता काये आहे? श्रीमंत सर्व प्रकारे चालवितील, चिंता नाही. मजला हलकासा तीर डाव्या गुडग्यास लागला होता. हलका होता म्हणौन लिा नाही. माझे बसले घोडीस दोन तीर आहेत. वरकड आर्थे प्राणे मेहनत करावयास चुकत नाही. परंतु श्रीमंताच्या प्रतापेकडून येश मोठे आले. सर्वांनी मेहनत केली, त्याचे सार्थक जाले. झुंजाचे रात्रीस कडपे घेतले. तीनसे सवा तीनसे घोडे नऊ हती सरकारात आले व किरकोळ जिनस मालबाजी[3] नव्हे परंतु आला. सरकार उपयोगी होता तो सरकारात ठेविला, बाकी लस्करांत सरदारास वाटिला. आपल्या फोजेतील सात आठसे माणूस जखमी जाले. चालीस पनास ठार जाले. से सेवासे घोडे ठार पडिले. मोठ्या मोठ्या सरदारास जखमा लागल्या. याप्रो जाले. सर्व जखमा बऱ्या होत आल्या आहेत. से पनास माणूस जेर जखमी पाऊणसे पावेतो घोडे जेर जखमी आहेत कोण मरेल कोण वाचेल हे पाहावे. पुढे तहाचा मजकूर तरी निमे मुलूक व दाहा लाख रुो द्यावे, म्हणोन बोलत आहो. होता होईल तो मजकूर लिा पाठऊ. राजश्री बळवंतराव बहुत प्राक्तनवान, आणि त्याच्या शाहाणपणास जोडा नाही.

---

१ भुई. २ हे मुधोळकरांपैकीं काय? ३ मालबंदी=महत्त्वाचा माल.

श्रीमंताची कृपा, ईश्वर या मनसबियास आनकूल होत आहे. आम्ही त्याच्या मर्जी प्रा वर्तणूक करीत आहों. तेहि आम्हावर फारच कृपा करीत आहेत. सविस्तर वर्तमान आपणास कलावे म्हणौन लिा आहे. आपण उभयेता श्रीमंतास अक्षरशा निवेदन करितील. सविस्तर राजश्री बलवंतराव याणी श्रीमंतास व आपणास लिा आहे त्याजरून विदित होईल. पहिल्यापासून दया करीत आहा त्याप्रो दया करून विस्तारे पत्र पाठऊन परामर्ष करीत जावा. हे आपणास विहित आहे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसो दीजे हे विनंती.

राजश्री बच्याबां व रा धोंडाबा व रा शामजीबावा व रा बालजीबावा यास आसीर्वाद. लिा परिसीजे. रा आनंदराव, रा शामराव येथे सुखरूप आहेत. चिंता न करणे, बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶Visaji Krishna to Mahipatrao (Panse): writes an elaborate account of the battle of Kadappa in which Nawab Abdul Majid Khan was killed and a signal success was achieved by the Peshwa's forces. The letter is written in a very simple but eloquent style and can be taken as a good sample of eighteenth century prose. The short and simple sentences produce a striking effect on the reader.

No. 147] *[16-11-1756*

श्री

श्रीमंत राजश्री रामाजी बावा स्वामीचे सेवेसी

पोष्य मुकुंद श्रीपत साा दंडवत प्रा विनंती. येथील कुशल ताा कार्तिक वद्य नवमी मुा पुणे जाणऊन स्वकीये कुशलोतर लेखनआज्ञा करीत असिले पाहिजे विशष. आम्ही मिरजेहून लस्करात आलो, तेव्हा उभाउभी आपली भेट जाहाली. ते समई काही मजकूर बोलावयास अनकूल पडले नाही. गावामधे दप्तरी हिसेब कितेक होते ते तयार करऊन पुढा लस्करात यावें, आण आपले विचारे कितेक कामकाज करून घ्यावे हा अर्थ चिती होता. त्यास निघोन यावे तर शरीरास सावकास नाही * * * * जाहले. हिवताप येतो, आण उलटी होती, त्याणे काही खावत नाही. आणि काही खावे तर पोटात थारत नाही. दररोज हिवताप येतो, त्याणे काही शरीरी ताकत राहिली नाही. ऐशी अवस्ता आहे. वोशदउपाये करीतच आहो. परंतु श्रीमंत दरमजल मिरज प्रांत चालिले.

पागा श्रीमंतास दाखऊन चाकरीचा मजुरा घ्यावा हा हेत होता त्यास श्रीने आम्हास येथे ये अवस्थेने ठेविले. याउपर वडील आपण प्रसंगी आहेत. आमचे वर्तमान श्रीमंताचे कानावर घालावे, आण येक पालखी अनकूल करून तेथून पाठवावे. अथवा येथून देवावी म्हणजे लस्करात येऊ. घोड्यावर बसावयाची ताकद राहिली नाही, यास्तव आपणास लिा असे. आपले खासगत घोड्याकरिता दाणा खरीदी करावयाविसी लिा होते, त्यास मिरजेस रा नारोपंत यास लेहून पाठविले आहे व हाली त्यास पत्र लिा आहे ते मिरजेस रवाना करावे म्हणजे दाणा खरीदी होईल. आपण चिंता न करावी. आपणासिवाये आम्हास दुसरे अधिक नाही. येथे प्रज्येन पडला. गडगडले. त्यापासोन जखमांचे जागा तिडका बहुत लागल्या आहेत. नारायेण तेल उतम सरकारात आहे. ते आपण विनंती करून पुण्याहून ८८। येक पावसेर देवावे. सारांश आपले सिवाये दुसरा आश्रय नाही. बहुत काये लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Mukund Shripat to Ramji Bawa: begs to represent to the Peshwa to excuse his absence owing to his illness.*

No. 148]

[*20-12-1756 ?*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री नानासाहेब
साहेबाचे सेवेसी

विनंती. अज्ञाधारक भगवंत गणेश कृतानेक साा नमस्कार विनंती. सेवकाचे वर्तमान ताा छ २७ राावल मुाा चंदापूर नजीक गुजमटकल येथास्थित असे. दरबारचे वर्तमान छ २५ रो खंदारकराचे स्वार २०० दोनसे आले. छ २६ रो राजश्री हनमंतराऊ निंबालकर दाखल जाले. अजमासे अडीच तीन हजार फौज आहे. ते तो च्यार पाच हजार सांगतात; परंतु इतकी नाही. त्याचे डेरियास नवाबाकडून मुलाजमतीस आणावयास चवघ भले माणूस पातशाही बकसी असमाल-खान वगैरे जाऊन घेऊन आले. दरबारास मुलाजमत जाहाली. अकरा मोहरा नजर केली. जे लोक मातबार शाहाजी सुपेकर, तुकोजी चव्हान, घाटगे, माने वगैरे याणीही नजरा केल्या. दोन घटका बसून सर्वास विडे दिल्हे. येक घडीभर खलबत नवाबाचे व राऊ निंबालकर याचे खलबत शाहानवाजखान याचे विद्यमाने जाहाले. फिरंगी याणी भा(गा) नगरीहून कूच केले आहे. परशराम-पंती आमची व शाहानवाजखान याची भेट केली. त्यास वर्तमान सांगितले की

हे तिकडून आले आहेत म्हनून त्यास सांगितले. सेवेसी श्रुत व्हावे. राजश्री मुरारजी घोरपडेहि जमाव करून सत्वर येणार, ऐसी बातमी त्याची आली होती. त्यास याणीहि पत्रे पाठविली जे, आपणहि मजल दरमजल येतो. कडपे व कर्नूळच्या पठानास इनातणामे पाठविले की आम्ही सत्वर येतो; तर तुम्ही येऊन सत्वर शामील होणे. मागाहून जे वर्तमान होईल ते वरचेवर सेवेसी विनंती लिहीणें. श्रुत होये हे विज्ञात.

¶*Bhagvant Ganesh writes to the Peshwa, that the Nawab is mobilising forces with a view to lead an expedition in the Karnatak and has invited the Pathan Nawabs to join him.*

No. 149] [*18-9-1756* ?

पो छ २२ जिल्हेज

श्री

सां नमस्कार विनंती. श्रीमंत स्वामीकडून कासीदजोडी मुजरद सेवकास आज्ञापत्रें छ १७ जिलकादचें पत्री मजकूर रायाकडील वर्तमान लिहिले कळले व मुसफरखान इकडून घाटाखाले गेला. तहकिकात करून लेहने. राव राजकारण काये करितात, कोन्हाकडील वर्तमान काये, कचे लिहीत जाणे म्हणोन सेवकास पत्र कासीदजोडी माघारी जानार यासाठी सेवेसी पाठविली. आपण पत्रे देऊन इकडे कासिदास पाठविलिया येथून पत्रे देऊन रवाना करितो. रायाची फौज तयार करून सत्वर रवाना करवितो. छ २७ शौवालचे पत्र यैसे दोनी पत्रे स्वामीची आम्हाकडे आली, आनिकहि जोडी येणार सेवेसी लेहून पाठवितो. राजश्री सुभानराव घोरपडे गजेंद्रगडी वेढ लागले म्हणोन राव याही सांगितलेवरून लिहिले. सातापा व जासुदजोड्या दोनी पाठविल्या आहेत. येथून नवी जोडी मानकोजी नाईकाकडील पाठविली तर त्याचा रोजमरा देऊन आम्हाकडे पाठविली पाहिजे. राहोटीविशयी येक दोनी वेला सेवेसी लिहिले. त्यास राहोटी तयार करावी लागती. येथून कूच जालें तर पाहिजे म्हणोन सेवेसी लिहिले आहे, हे विनंती. मुसफरखान याचे वर्तमान कसे लेहून पाठवावे हे सेवकास लेहून पाठविले पाहिजे हे विनंती.

¶*Letter to the Peshwa reporting movements of Muzaffarkhan and asking for some messengers to carry letters.*

3973

No. 150] [1756 ?

४ पुरवणी[1] विनंती पत्र

फुलचरीस नवा कपितान आला होता तोही फिरोन आपले देशास गेला. वार्ता आहे जे गोरुंदर येथून हजूर जात होता. वाटेमधे, कोन्ही——पातशाहाजवल त्याचा मुरबी[2] आहे. त्याचे लिहिने पोहचले जे, 'तुम्ही जेथवर आले असाल तेथेच राहाणे, पुढे न येणे, तुमचे वर्तमान सविस्तर पातशाहास कलले. तुम्ही खरे आहा. तुमचा अपराध काही नाही. यैसे कलोन तुम्हास बहाल केले. माघाहून तुम्हास फिरोन जायाची आज्ञा येते,' यासाठीं गोरुंदर वाटेमधेच गुंतला आहे, हे वर्तमान मुसा भुसी सांगत आहे. खरे लटके म्हणवत नाही. माघे येकदा त्रिचनापल्लीची फतेची खबर आली. यानी येथे नगारे वाजविले ते खबर मी हुजुर लिहिली; परंतु ते खबर लटकी जाली. नवाब पटणास पावले. वकीलहि येऊन भेटले. रदबदल पडली आहे. यानी दफतरचा हिसोब बहुत करोडीचा काहाडिला आहे. पैकी करोड रुपये हाली घ्या म्हणतात. तेही विसापावेतो चढले आहेत. पाहावे कोठवर चुकोती होते. हे विनंती.

रा दिनानाथ गोविंद यानी भागानगरचे हिशाबा ५२०० रु. बावनसे रुपये खरीदी गालिचे वगैरे लिहिले आसेत. अशास गालिचे वगैरे याचा हिशेब हजूर पाठविला आसे, त्यावरून कलो येईल. बाकी रुपये जमाखर्चात दाखला येईल हे विनंती.

¶*News-letter from Pondicherry to the Peshwa, reporting that the French Governor returning to his country has been informed not to proceed further as he is to be reinstated.*

No. 151] [1756 ?

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री यशवंतराव पवार व राजश्री माहादोबा बाबाची फौज व सरलस्करची फौज आली म्हणोन यैकतों. हें सत्य मिथ्या नकले. हें लेखन करावयास आज्ञा करावी. तिन्ही फौजा आल्या असल्या तर तीन हजार फौज सडी आमचा जुना तल तेथे ठेवावयास आज्ञा करावी. गोपालराव व फत्तेसिंगबावाची फौज बंकापुरावर ठेवावी म्हणजे च्यारी नाकेबंदी जाले. सर्व गोष्टी त्याच्या बंद होतील. देसची फौज येती ते दगा खाती; तिच्या साहित्यास

---

१ पत्राचा हा ४ था बंद. पहिले तीन गहाळ. २ पक्षपाती.

दोन हजार फौज मुळगुंदावर ठेवावी. देसची फौज येईल तिनें नवलगुंदावर रहावी. येथें येक शहाणा माणूस दोनसें राऊत ठेवावा त्यानें त्या फौजेस तेथें रहावावें. पुढील फौजेस खबर करावी. त्यानीं जाऊन त्यास आणून लस्करास पोंहचवावे व फिरोन मुलगुंदावर जावे हे तजवीज. दोन च्यारशें येतील, त्यास हजार दोन हजार आले तर त्यास कांहीं भये नाहीं. येणेप्रमाणें बंदोबस्त करावा. रोज उठोन तोफा पुढें नेऊन मार देत जावा. फौजा आसपास आसाव्या. तोफावर गाडिदी अगर फौज चालून आली तर बेजरब घोडे घालून हत्यार लावावे यैसें येक मास जाल्यावर निवाडाच होईल. हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdev outlines a plan of campaign for the capture of Mulgund, Navalgund, etc.*

No. 152] [April 1756?

श्री

सेवेसी विज्ञापना ऐसी जे. काल शुक्रवारीं संध्याकाळीं सावनुराहून दिलावरखान पठाण व त्याचे समागमें दोघे भले माणूस ऐसे तिघे फकीर होऊन आले. शानवाजखानाची स्वारी मोर्च्याकडून लस्करांत आली तेसमई मार्गींच त्यास भेटले. त्याणी सांगितलें कीं डेरेदाखल जालियावर येणे. उपरांतिक डेऱ्यास आले. पत्रें पांच साहा जणास होती. नवाबास शानवाजखानास मीरमाामजकूर हुशेनखानास व आणिक कोणास होतीं तीं दिल्हीं. प्रतिउत्तर अद्याप जालें नाहीं. करीमखान गारद्याचा सरदार आहे त्याच्याजवळ राहिले आहेत. त्यास उत्तरे घेऊन या लस्करांतून निघतील. त्या बातमीस माणसें ठेविलीं आहेत. आमच्या माणसांस आढळलें तरी त्यास हस्तगत केल्यानें पत्राअन्वयें कलेल; परंतु सांपडले पाहिजेत. माणसें तरी ठेविलीं आहेत, परंतु उत्तर देतात न देतात हें कलत नाहीं. श्रुत होये. कांहीं लाकडाच्या पाट्या व कांही गोण्या उंटावर घालून मोर्च्यावर गेल्या. तोफा तरी आज जाता दिसत नाहीं. नवाबाकडील पांच सा तोफा उग्यां[१] लस्कराबाहीर काढून ठेविल्या आहेत. नवाबाच्या तोफा गेल्या म्हणजे फिरंगियाच्याहि जातील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter from the Nizam's camp, reporting the arrival from Savanur of Pathan Dilawarkhan on a visit to Shah Nawazkhan.*

---

१ उगीच,

No. 153] [July 1756

[पहिला बंद गाहाळ.]

हे आम्ही रायास बोलिलो जे, आपण पत्र श्रीमंतास ल्याहावे. त्याही उतर दिल्हे जे, आम्ही इतके बोलिलो तुम्ही लिहीणे त्यावरून सेवेसी लिहिले आहे. दिलावरखान याही कडपेकर पठान याचा मजकूर रायास लिहिला की, कोल्हार प्रांती येक जागा मातबर ठाणे होते, ते तैसच आहे. पेठ घेऊन मोर्चे लाविले, पठान याजपासी सरंजाम च्यार पाच हजार फौज व तोफखाना सावधपणे आहे. तेथून कोनीकडे जातील हे तहकात करून लेहून पाठवितो. साहेबाकडील व राजश्री सुबेदाराकडील मातबर येणार म्हणौन प्रतीक्षा करीत आहे. व रायास कितेक प्रकारे सांगावयास आलस करीत नाही. कोन्हे प्रकारे स्वामीकडे याही येऊन ममतेने आसावे. येथून वरचेवर पत्रे लेहून जोड्या पाठवीत आहे. तीन महिने जाले येकहि जोडी आज्ञापत्र घेऊन येत नाही म्हणौन चित स्वस्त होत नाही. राव म्हणत होते जे, आम्ही पुनियास येत आहो. तेथे आलियावर आमचे वडिलाचे कर्जदार गोसावी वगैरे येतील, उपद्रव करितील, आम्हापासी परस्तुत द्यावयास ऐवज नाही. थोडेबहुत होते, ते आवंदाचे दंगियामुळे लोकास व कर्जदारास देऊन दंगा वारला. याजकरिता राव म्हणो लागले जे, श्रीमंतास हा भाव लिहिणे, त्यावरून लिहिले आहे. आम्हासी दुसरा विचार करीत नाहीत. बोलने कितेक प्रकारेच बोलतात. पुनियास येऊ म्हणतात, परंतु याचे शाहानपण आदिक दिसोन येते. येथे कोन्ही कारभारी मातबर आहेत त्याचे ऐकत नाही. जे करणे ते रुबरू करावे सावनूरचा दंगा जालियावर लोकाची समजाविसी करून तयारी करून, इनसखानास रवाना करून आपण यावयास सिध आहेत. साहेबाकडील यावयाचा आव(का)श मात्र आहे, बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

साहेबाचे सेवसी निंबाजी नाईक चव्हान सां। दडवत

¶*A mutilated letter addressed to the Peshwa from Sondur referring to the proposed visit of Murarrao Ghorpade to Poona.*

No. 154] [May 1756

श्री

सेवेसी विज्ञापना. मुजफरखान यांस लोकानी तलबेकरिता घेरून बैसविले आहे. बेजहा बोलतात. लोकांनी हती घोडे उंट सोडून नेली. त्याची समजावीस करितात की, सोंडूरपावेतो तलबेचा दंगा करू नका तेथें गेलियावर

तुमची तलब झाडून देऊ. परंतु लोक यैकत नाहीं. राडा पडला आहे. मुरारराव याजकडे कारकून पाठविला आहे की आमची गत यैसी आहे. काही निकाल काढता तर बरी गोष्ट आहे, म्हणून बोलत आहेत. याउपर त्याचा निर्गम याणीं काये काढावा? याची त्याची गत येक आहे. गोविंदराव दिवाण मुजफरखान याचा त्याची बेआदत लोकानी केली. तो ताप घेऊन राहिला. खाली जाबसाल खाशावरच आहे. येथून आज डेरे पडोन मुकामास जाणे होईल तेव्हां खरे. सेवेसी श्रुत होये. मुजफरखान याची जासूद जोडी मुसा मुसीकडे आज गेली. विदित व्हावें या उपर होईल वर्तमान ते सेवेसी वरचेवर लेहून पाठऊ हे विज्ञापना.

¶*Report of a mutiny in Muzaffarkhan's force. His men are clamouring for their pay.*

No. 155] [*May 1756*

श्री

सेवेसी विज्ञापना. मुरारराव याणी सोंडुरास सत्वर जावे. आपले कामाचा उलगडा करून सेटिबाने व सेवकानी लस्करात दाखल सत्वर व्हावे यैसी मर्जी स्वामीची असल तर सेटिबाचे व सेवकाचे नांवे येक पत्र असावें कीं, मुरारराव यास सोंडुरास पोहचवावें. सरकारचे कामाचा गुंता उरकोन सत्वर लस्करास दाखल व्हावे यैसी आज्ञा तुम्हास आसता, अद्याप तेथेच बसला आहा हे कार्याचे नाहीं. याउपर मारनिलेचें कूच करऊन सोंडूरास नेऊन घालवणे आण आपला गुंता त्याजकडे आहे तो उरकोन घेऊन जलदीने येणे, कोणी तलबेकरिता दंगा करितील त्यास बरे वजेनें सांगणे, न यैकत तर हुजूर लेहून पाठवणे. पाच हजार फौज पाठऊन पारपत्ये केलें जाईल म्हणोन पत्र आल्यास हे येथून जातात. धण्याचे मर्जीस येईल तर आज्ञा करावी हे विज्ञापना.

¶*The Peshwa's agent to Murarrao Ghorpade, requesting orders for being relieved of his mission that he may join the main army.*

No. 156] [*June 1756*

श्री

सेवेसी विज्ञापना. इकडील सविस्तर वर्तमान वरचेवरी लिहीत जाणें म्हणऊन. त्यास सावनूरकर यांचे घरी सिबंदीकरितां सर्व सिपाई दंगा करून बसले आहेत,

त्या दंग्यामुळें दुसरी गोष्टी त्यास सुचत नाहीं. त्याहीमध्यें बुधि नीत सांगावयाचा येखत्यार रा सिवराव शंकर यांचा आहे. प्रातःकाळीं जाऊन खलबतास बसतात तें साहा तासपर्यंत बोलोन उभयेता भोजनास उठोन ठिकाणास जातात. त्या उपरी दोन तास निद्रा होऊन मागती येक जागां होऊन उभयेता येकांत स्थलीं बसतात, ते च्यार तास रात्रींपर्यंत बोलतात. काये हें कोण्हांस समजत नाहीं. पठाणाचा दंगा त्याजपासी गिरधरराव व मोरोपंत हे उभयेता त्याचे वाटणीस दिल्हें आहेत. आलीकडे ठाणी सरकारांत घेतली. त्याउपरी मोरोपंताचे व गिरिधरराव यांचे पत्र सेवकास आलें त्यात मजकूर, तह होऊन वाटणी जाहाली, यैसें असतां आपली ठाणीं बंकापूरकर याणीं घेतली याचा मजकूर काये, यैसे लिहिलें होतें. त्याचें उतर लिहिणें ते लेहून पाठविलें. केला करार तों तुम्हांकडून निभावला नाहीं याकरितां ठाणी घेऊन मुलुकाचा बंदोबस्त करून पैका सरकारचा वसूल करणें यैसी आज्ञा आहे म्हणऊन ठाणी घेतली; आणखीहि घेणें आहेत. तुम्हीं पैकियाची निशा करून दिल्हेयावरी ठाणीं कोंठें जातात म्हणऊन लिहिलें आहे. मोरोपंत व गिरधरराव यांची रवानगी करून राजश्री गोपालराव यांजकडे पाठवणार आहेत म्हणऊन वर्तमान आहे. बिदरूरकर याणीं देवापा यास देवापाच्या लेकांस जिवेंच मारिलें. त्याजवरी काये शब्द ठेविला हें कलत नाहीं. त्या संस्थानांत मातबर शाहाणा देवापाच होता. त्याची गति याप्रकारें केली. तेव्हां संस्थानास अपाय होणार यैसें दिसोन येतें. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*A news-letter to the Peshwa giving tidings about a mutiny in the army of the Nawab of Savanur for arrears of pay and the consequent consultation between him and Shivrao Shankar. The letter refers to Girdharrao and Moropant and their efforts to settle affairs in the province. The murders of Devappa and his son are also mentioned in the letter.*

No. 157] [*About 15-6-1756*

पौ छ २६ राखर

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना. वालानदीवरून आज्ञापत्र सादर केले ते प्रविष्ट होऊन सविस्तर कलले. मुजफरखान याणी कोणी येक मुदा न घालिता निरापेक्ष होऊन हुजूर यावे. पूर्ववत प्रा चालवावयास अंतर होणार नाही. येविसी पेशजीचे लिहिल्या बमोजिब बोलोन हुजूर घेऊन यावे. हरकोठे उसाली खाऊन

जातील तर जाऊ न द्यावे म्हणोन आज्ञा. ऐशास सावनूरचे तलावर आज्ञापत्र सादर जाहाल्यापासोन नित्ये जाऊन आज्ञेप्रा बोलतच होतो. त्यांचे जाबसाला-वरून अंतरभाव कलत कलत कलले. मुरारराव याचा त्याचा प्रेमा आधिकच पाहिला. नित्ये खलबत सोंडूरास आल्यावर मुरारराव गडीत जाऊन बसले तेथे-हि हे जाऊन खलबते करूं लागले. आम्हाजवल मुदे सांगो लागले. विचारावर न येत. उभयेतांचे चितांत परस्पर विकल्प पडलियासिवाई आमचे बोलणे रुचणे नाही. धणियाचेहि कार्य होणे नाही हे चितात आणून महद प्रेत्न करून उभयेतांचा आठा रोजात परस्परे हस्ते परहस्ते विकल्प पाडिला. याची त्याची अंतरंग कुरसाकुरस वाढली. नवे दिवसी मुजफरखान यांजवर मुराररायाने तोफा रोखिल्या. लोक जमा करून बंदोबस्त केला. त्याणींहीं आपले जागा खबरदारी केली. प्रातःकाली उभयेपक्षी नासाड व्हावी यैसा प्रार जाहल्यावर सेंटिबा आपण मुरारराव याजकडे जाऊन त्यांस च्यार गोष्टी सांगितल्या. शांत करून मुजफर-खान याजकडेहि गेलो. त्यास बोध केला. कजिया महकूब[1] केला. खानास येकांती सांगितले कीं राव बेइमान; तुमचा परिणाम येथे बरा दिसत नाही. येथे राहिल्याने तुमचा घात दिसतो. हे त्याचे भाव दिसतात. तुमचा आमचा घरोबा यास्तव येकांती सांगतो. आपले चितांत समजोन हरकोठें पलियास जाऊन पोहोचणे यांत तुमचें बरें; नाही तर राव तुम्हांस लुटतात. आम्ही दो चहू दिवसी पुणियास जाणार. श्रीमंताचे चिती तुम्ही यावे, सर्व प्रकारे चालवावे हे मर्जी आहे. आम्ही नित्ये बोलतो; परंतु तुमचेच चित विचारावर येत नाही हे काये? यांस तुम्ही भाव म्हणता याचा प्रकार यैसा. आम्हीं हे समई नसतो तर नासाड होती. हाली आम्हांस येकांती म्हणतात कीं श्रीमंतास अगत्ये ते आपणांस करणे. यास लुटून टाकितो. श्रावणमासीं हे पुणियास जाणार, आपले बरे करून घेणार यास्तव तुम्हासी याणीं बेइमानी केली आहे. याउपर तुम्हीं दुसरा अर्थ करूं नये. श्रीमं-ताकडे चलावे आण त्यांचे हातून याचे पारपत्य करावें. त्यांची स्थलें उतम आहेत. त्याचे पारपत्ये श्रीमंतास मनसबा देऊन करावे. त्या स्थलापैकी येक स्थल कबिले ठेवावयास मागोन घ्यावे. हा मनसबा करवावा. यैसे बोलल्यावर आपणास हुकूम केला तर आपण याची स्थले घेईन. धणियाची चाकरी करून दाखवीन. आपणास ते दरबार तुटावयास हेच. त्याउपर खानास याच मन-सबियांवर मुतवजी[2] करून खुलासा काडिला. त्याचे याचे करारनामे होते ते पाहिले. पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने त्याचे त्याचे चालावे यैशा शफता. आपले स्थलांतून येक

---

१ तहकूब. २ उद्युक्त.

स्थल राहावयास द्यावे यैसा करार. हे सविस्तर वाचून पाहिले. च्यार वाईट आम्हीं रायास बोलिलो त्याजमुळें त्यास घरोबा यैसा भासला, मग खुलासा कलो लागला. पुणियास यावे यैसा करार होऊन सिधांत केला. येथून निघोन वाफगावांस मल्हारबाकडे जावें. तेथे श्रीमंतानी हाती धरून घेऊन जावे यैसा मनोदये. आम्ही मान्य केले. सेटिबाकडे जाऊन त्यासहि सांगितले. या गोष्टीवर खानाची आड आहे. तुम्ही मान्ये करावी. हें येश तुम्हास सांगोन खानाजवल मान्ये करविले. विदित व्हावे हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat reports how very cleverly he brought about a cleavage between Muzaffarkhan and Murarrao Ghorpade and how in consequence Muzaffarkhan has been persuaded to accept the Peshwa's service.*

No. 158] [20-1-1757

पो छ २९ जमादिलौवल

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामीचे

सेवेसी

आज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ २९ रबिलाखर पावेतो मुाा गुती येथास्थित असो विज्ञापणा यैसीजे. साहेबी राजश्री राव ममलकतमदार यास पत्रें राजश्री गोपालरावजीचे जासुदाबरोबरी पाठविली. ते पत्रे रावजींनी पाहोन बोलिले जे, हे जागा रस्त्याची येणार जानार. आम्हास काये ठाऊक? लिहिल्यावरून त्या ग्रहस्ताचा सोध करू. प्रतिउतर पाठविले आहे. राव याही माघ सुद ५ सोमवारी मुहुर्त करून अंगप्रस्थान करून निघावे दरकूच येतात म्हणोन बोलिले आहे. राजश्री अमृतरावजींनी लिहिले आहे. धर्मवरास हे नसताना जे मोरचे लाऊन जेर केले आहें. रायेदुर्गकरानी राजश्री अमृतरावजीस पत्र पाठविले होते जे आम्हाकडील मातबर बोलीस पाठविती. त्यावरून राव ममलकतमदार यास विचारून रायेदुर्गास लेहून पाठविले आहे. स्वस्थानिक येथ आलियानंतर धर्मवराचे खंडणीचे विल्हे लावणार. येथून राव निघालियावर सविस्तर लेहून सेवेसी पाठविती. हे विज्ञापणा.

¶*Visaji Baburao informs the Peshwa that Murarrao is expected to march out of Gutti within a couple of days and that Dharamwar and Raidurg are being besieged and will shortly fall.*

3980

No. 159] [22-3-1751 ?

श्रीसुबराज

राजश्री सदासिवराव
गोसांवी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. राजश्री पंतप्रधान याणी व आपण राजश्री श्रीनिवासराव व नारो तुकदेव यांस इकडे पाठविलें. त्यास ते बेबलाहून यात्रे याअर्थें निघाले, यास्तव त्याच्या येण्यास विलंब लागला. छ ९ जमादिलावली राजश्री नारो तुकदेव येऊन पावले. भेटी जाली. मारानिलेच्या मुखतः सर्व अर्थ अवगत होऊन संतोश जाहाला. घोडी व वस्त्रें पाठविली तें पावली. याच प्रकारे सदैव पाठऊन परामर्ष करावा हे बंधुपणास उचितच असे. सारांश आपल्या भेटीची उत्कंठा लागली आहे, ते पत्री कोठवर ल्याहावी? आमचे मनोदय राजश्री केशवराव याच्या पत्रीं लिहिलें व राजश्री विठल अनंत याजसमागमें सांगोन पाठविलें ते पावोन अद्येंत अभिप्रायें निवेदन जाहाले असतील. तदनुसार समर्पक करून राजश्री केशवराव व विठल अनंत याची रवानगी अति सीघ्र करावी. आम्हीं गोसावियासिवाये नाहीं. वरकड अर्थ मशारनिले लिहितां कळों येईल. [1]नारोपंती सर्वहि लिहिल आहे. बहुत लिहिण तर सूज्ञ असा. हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade accepts the robes of honour sent to him by Sadashivrao Bhau and assures him of his loyalty.*

No. 160] [26-1-1757

श्रीसुबराज

राजश्री बालाजीराव पंडित
प्रधान गोसावी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेो मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री सदाशिवराव भाऊ व राजश्री केशवराव याणीं विस्तरे लिहिल्यावरून सर्व

---

१ येथून पुढें अक्षर निराळे वळणाचें.

भावार्थ कळों आला. पत्रीं दर्शविलें कीं, आपल्या श्नेहापेक्षा आम्हांस दुसरें अधिकोत्तर नाहीं. इतर लगाव सहसा धरणार नाहीत हा भरवसा आहे; व येथूनहि गोसांवियाचे मनोदयाप्रमाणे होऊन येईल. आपण भेटीस यावे म्हणून ममतायुक्त विस्तरेसीं लिहिल्यावरून बहुत संतोश जाहाला. अशास आपला श्नेह प्रमुख्य जाणून भेटीचा हेतु धरून आपण पूर्वी लिहिल्याप्रों रायेचूर प्रांतें मोकाम करून आपणास पत्र लिहिलें असतां इतर लगावाचा अर्थ दर्शविला तर चितापासून तो प्रसंग असता तर आजीपावेतो तो संदर्भ घडोनच येता, याचा भाव आपल्या चितीं येऊनच न घडेल हा भरवसा आहे म्हणून लिहिलें; त्याकडोन पत्रें आल्यामुलें प्रत्योतरें येथून ल्याहावीच लागली. आपण आम्हांस बंधू म्हणविलें आम्हीं आपणास वडील मानिलें त्याचे निदर्शन आमच्या मनोदयाप्रमाणे समर्पक करून परस्परे भेटीचा योग घडवाल हा चिताचा निशा जाणोन सांगणें ते राजश्री विठल अनंत यांस सांगून व राजश्री केशवराव यांस लिहून पाठविलें आहेत त्याची भेटी होऊन पत्रार्थ व मुक्ता कलोन भाव समर्पक होऊन उभयेताची रवानगी आम्हांकडे जालीच असेल. आम्हीं आपणासिवाये नाहीं. आमच्या मनोदयाप्रमाणें समर्पक करून उभयेपक्षीं भेटीचा योग घडे तो अर्थ केला पाहिजे. कितेक अर्थ उभयेता मारनिलेस लिहिला आहे ते सांगता कलेल. [१]आपण लिहिल जे, न येणार सरदार आले, आमच येण न जाहल याप्रकारे सुचविल. आमी रायचूर प्रांती मोकाम करून उतरच मार्ग लक्षीत मोकाम केला आसतां हरकोणी विदित आपणास विदित केले जे पागदरस (?) आले; मोगलाकडे जातात, याप्रकार वदंता उठविली. मजल दरमजल यणेस चिंता नाही; परंतु सधीचे प्रसंगामध्य मजल दरमजल आलेन आपले चितास कस वाटेल याकरितां रायचूर प्रांतीच मोकाम केला. आमच मानस हेच जे होणार राजकारणहि होतात; परंतु मुख्य आपली भेटी आमास होण हाच मोठा मनसाबा. आमास आपण वडील. आपले मनोधारण रक्षाव करिता कोणतेहि राजकारव कलापामध्य पडल नाही. ही बोलतल आमी आपले वडीपणास विहित ते करवले की कसा? जर करणेस वडील. आपण बहुत लिहिणें तर सूज्ञ आसा. हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade in reply to the Peshwa's letter states that he is encamped at Raichur to meet the Peshwa and denies the report of his having joined the Mughals.*

---

१ येथून पुढें अक्षर मुरारराव घोरपडे याचें हातचें असे.

No. 161] [26-1-1757

श्रीराम

श्रीमंत महाराज राजश्री राऊ साहेब
स्वामी याचे सेवेसी

आज्ञाधारक कासीराव अंमाजी देशपांडे परगणे कोल्हार व सरदेशपांडे सरकार सिरा कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना ऐसीजे. प्रकृत विद्यमान धातुनामसंवत्सर माघ सुा ७ सौम्यवासरे वास्तव्य प्रांत मजकूर श्रीमंत पुण्यश्लोकीयाचे कासवदृष्टीकडून सेवकाचे वर्तमान येथास्थिती असे. सांप्रत प्रकृत मनमंत्री (मन्वंतरीं) जैसे काही पूर्वी युगांतरी रामकृष्णादि आवतार चरित्र धर्मशासनसंस्थापनार्थ तैसेच याही प्रकृत मनमंत्री देवब्राह्मणसंरक्षणार्थ अवतार प्रसिद्ध श्रीमंत नामना विश्वतोमुख कीर्तिविस्तार तेथें हाहि देश कर्नाटक केवळ काटकजन्न मिलेंछयादिकरून अतिप्रबळ, त्यामुळें देव ब्राह्मण साधु सजन इत्यादि प्रजा क्षोभ सर्वज्ञ जेथे तेथे समस्तहि श्रुत असोन, अद्यापि पुराकृत विछेदन होतां आहे. तस्मात स्थालीपाकंन्याये द्रौपदी धावा श्रोत्रारूढ किंवा दुष्टजनसंहार कारणी विलंब अंतरसाक्षी तऱ्ही चातकंन्याये चित्त केवळ व्याकूळ होऊन आहे. सेवक पुरातन श्रीमंत स्थापित केवळ स्वामी सेवेसी अंकित एतद्विशईचा अर्थ चितारूढ जाल्याविना अविलंबे आगमन होऊन चर्मचक्षु दरुषणी संतुष्टेने होऊं सके, ऐसें जाणून सेवेसी राजश्री आपाजी बाळाजी हे आपले आप्त आणि सेवकहि पुरातन तीर्थरूप वडिलाचे स्थापित कारकर्दे श्रीमंताचे मनोगतांकित जाणून विनंतीपत्र देऊन पाठविले आहे. कितेक इकडील प्रसंग स्वामीसंनिध विज्ञापना करितील तेच सेवकाचे स्ववचन आहे. श्रीमंताचे स्थापित असतां योग्यानसार सेवकास जे आज्ञा ते सिरसा हे विज्ञापना.

¶This letter explains how Maratha rule was being welcomed in the Southern Karnatak. The flowery and artificial style of the letter is particularly noteworthy.

No. 162] [26-3-1751 ?

श्री

सेवेसी तुबाजी अनंत कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ ९ जमादिलवल दोन प्रहर मुा लस्कर तुंगभद्रातीर स्वामीचे कृपावलोकनेंकरून येथास्थित आसें विनंती. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालों,

ते मार्गी लस्करापासून सा कोसावरी गांव होता त्याणें कज्या केला; तेथें खंडोजा निंबालकर यास दूर उभे होतों तेथें उकाल गोली येऊन गुडघ्यावर लागली. तेथून पुढें येऊन च्यार कोस रानात राहिलों. रात्रीं घोड्यांस कांही दाणापाणी व लोकांस पीठमीठ मिलालें नाहीं. तैसेंच राहिलें. दुसरें दिवसीं तेथून कृष्णा उतरून उटनुरपलीवरी आलों. तेथें गावांत कांही दाणदुणां पोटाचा घेऊन संध्याकालपावेतों राहिलो. तेथून रात्रीं कूच करून सा कोस आलों, चांद मावलतां राहिलों. सोमवारीं संध्याकालीं लस्करांत पावलों. त्याणी पुढें राजश्री भुजंगराव यास पाठविलें. गोटास घेऊन आले. राजश्री मुरारराव याणीं सोमवारच्या पूजनास श्नान केले होतें. चौ घटकां रात्रीं भोजन जालें. मग आम्हांस व राजश्री केशवराव यांस बोलाऊं पाठविलें. जाऊन भेट घेतली. भेटींअंतीं च्यार गोष्टी बहुमानाच्याच जाल्या. "आमची व श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांची भेट जाली, त्या दिवसांपासून हेत होतां की श्रीमंतांची भेट घ्यावी. तो योग या समयांत घडोन आला. उतम आहे. आम्हांस त्याविरहित दुसरा आर्थ आहे यैसें नाहीं. साताऱ्याकडील व पनालियाकडील व मोगलाकडील पत्रें आली होतीं तितकीं येकीकडे ठेऊन, चौघां भावांसमेत भेटीचा मार्ग पाहात पंधरा दिवस या तलावरी मुकाम करून राहिलों. आमची निष्ठा श्रीमंताच्या पायांसी आहे. भेटून चिंताविरहित होवें. त्यांस आपण वडिलासमान मानितों. ते कांहीं करोत. आमचा दुसरा विचार नाहीं. आतां तों रात्र दाहा घटका जाली. तुम्हीं डेरियास जाणें. प्रात:कालीं बोलाऊ पाठवितो. येणें. जे श्रीमंतानी आज्ञा केली आसेल ते श्रवण करून मग कुचाचा निश्चये करणें तों करून," म्हणून बोलीन बोलिले. आम्हास व केशवराव यांस आज्ञा दिल्हीं. आम्ही डेरियास आलों. विदित जालें पाहिजे. बहुत काये लिहिणे, हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant reports to the Peshwa his successful mission to Murarrao Ghorpade. "Murarrao," he writes "declared himself wholly in support of the Peshwa's scheme and is encamped upon the Tungabhadra with all brothers waiting for the proposed meeting."*

No. 163] [*26-3-1751*

श्रीसुबाराज

राजश्री बालाजी पंडित प्रधान

गोसावी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लेखन

करीत असिलें पाहिजे. यानंतर राजश्री केशवराव रघुनाथ व तुबाजीपंत व विठल अनंत आले. यानी आपणाकडील सकल्यार्थ सांगितला व पत्र पाठविले ते पाऊन सकल अभिप्राय अवगत होऊन बहुत बहुत संतोष जाला. आमच्या मनांत जे होते तेच आपण सांगोन पाठविले. याहून विशेष काय ? भेटीस यावयाचा सिधांत होऊन जे सांगणे ते उभयेता व राजश्री नारो तुकदेव यास सांगितले आहे. हे लिहितील त्यावरून कलेल. गुरुवारी कूच करून रायेचुरानजीक मोकाम नेमिला आहे. शुक्रवारी काडलूरसंगमासमीप मुकाम होत आहे. पूर्णमा अगर प्रतिपदेस भेटी व्हावी. आपण आम्हास वडील बंधु. सर्व प्रकारें आपल्याठाई ममता ठेऊन आल्यास आमचा मनोरथ सिधीते पावणेस आपण सूज्ञ आहेत. रा। छ ९ माहे जमादिलोवल. मुख्य विचार भेटी होईल तो दिन सुदिन. बहुत लिहिण तर आपण सूज्ञ आसा हे विनंती. [पत्राच्या पाठीवर शिक्का]

राजते
लेखना-
वधि.

¶*Murarrao Ghorpade to the Peshwa saying that he is proceeding to Raichur and will await his arrival there.*

No. 164] *[30-1-1757*

पो छ १० जमोवल

श्री

पुरवणीं राजश्री त्रिंबकराव
गोसावी यांस

दंडवत विनंती उपरी. निंबाजी थोरांत मुजफरखानाकडील पत्रे घेऊन आले आहेत. त्या पत्राचा भाव सविस्तर * * * * * आम्हास कूच करून * * * अगर त्याच्या लिहिल्याप्रमाणें दोन चारसे गाडदी पाठवावयाचे आसले तरी तसेच उत्तर पाठवावे. गाडदींच रवाना करूं. आम्ही मजल दरमजल जातच होतो; परंतु निंबाजी थोरात आले त्याणीं सांगितलें कीं फौजचे कांहीं प्रयोजन नाहीं. फौज गेल्यानें मुजफरखानाकडे आवघे जमा होऊन आले आहेत ते आवघेच धास्त खावून परागंदा होतील. अवघाच मनसबा मोडून मुलुक उजाड होईल. याप्रमाणें वर्तमान सांगितले याजकरितां आम्ही येथें मुक्काम केला असे. राजश्री येशवंतराव पवार मांडवीवर आहेत त्याचाहि मुक्काम

तेथेंच करविला असे. आपण तिकडील पत्राचा मशारनिल्हे * * * चा भाव सविस्तर प्रविष्ट * करणे ते करावे छ ९ जमादिलावल बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶Probably Malharrao Holkar writes this to Trimbakrao Pethe in the matter of dealing with Muzaffarkhan who had turned a rebel.

No. 165] [January 1751 ?

श्री

कृतानेक सेवेशी विज्ञापना. रा। वजारतमाब याणीं अड घालोन बहुत प्रेत्नें-कडून तिन्हीं संस्थांने हुजुर ठेविलीं आहेत म्हणून संस्थानास पत्रें तयार करविलीं आहेत. सावनूरकरांची पत्रें हुजुर आली आहेत जे साल दरसाल त्रीपन हजार देतों. त्यासिवाय पंचवीस हजार रुपये जाजती देतों; परंतु तिकडे आपला दस्तावेज गुंतला आहे तो सुटून यावा म्हणून आशय; वकिलाचे पत्राची नकल सेवेशी पाठविली आहे. बिदरूरकरांकडील नरसिंगराव बरगे मनोलीस आला आहे. सारांष मुराररायांचा व तिन्हीं संस्थानकारांचा आशय बिलकूल स्वामींकडे मामलियत नसावी ये गोष्टीस दीर्घ प्रेत्न करीत आहेत. बाईसाहेबीं अद्याप हात राखिला आहे. प्रस्तुत बाईसाहेबांस शरीरीं समाधान नाहीं. सेवकांसी बोलतां उतम प्रकारें गोड बोलतच आहेत. इतबार पुरत नाहीं. मागाहून सविस्तर लिहितों किंवा निष्टंक करून येतों. रा। भगवंतराव व सांवंत याणीं मुडागड घेतला. पुढें मसुऱ्यास जाणार. मुराररायांचे फौजेंत दंगा बहुत. येथील देण्यांस घोडीं सें सवासें गाहाण ठेविलीं. कारकून बोल ठेऊन गेले. हुजुरची पागा पनास घोडी व निशाण समागमें घेऊन गेले. आपले तीर्थरूपाचे नांवे सरजाम होता तो आपले नावे करून घेतला आणि गेले. बिदरूरचे हेजीब रघुराव यांस समागमें मागोन घेतले. सोंधे बिदरूर सावनूर येथील तह नवे करून यैवज हुजुर पाठवितों म्हणून हुजुरचीं माणसें व मातबर व रामचंद्र नाईक समागमें नेले. येथून तळझाडा होऊन तेथून त्यांचे कूच जालियावरी सविस्तर सेवेशी लिहितों. सेवेशी श्रुत होये हे विज्ञापना.

¶The Peshwa is informed about the intrigues of Murarrao Ghorpade and the Nawabs of Savanur and Bednur to oppose the Peshwa's claims in the Karnatak.

No. 166] [3-2-1757

श्री

सेवेसी विज्ञापना येसीजे. खातीरजमा होऊन अमृतरावजीसी करार केला कीं प्राथकाली कूच कारितो. हाच करार होऊन मुहूर्त माघ सुद १४ गुरुवारी प्राथकाली डेरादाखल जाले. सरंजाम यावे याजकरिता दोनी दिवस मुकाम जाला. तिसरे दिवसी दरकूच कुडतनीस आले. रायाचा कारभार कोन्हावर येखतियार नाही. कोन्ही मातबर कर्ता मनुश नाही. राजश्री श्रीनिवासराव व आताजीपंत फडनीस उभयेता येथे प्रसंगी नाही. लाहान मानसानी चढ देऊन दिसगत लाविली. श्रीनिवासराव व फडनीस मातबर यास राव बोलाऊ पाठवणार. जाले वर्तमान सेवेसी लिहिले आसे हे विज्ञापणा.

साहेबाचे सेवेसी निंबाजी नाईक सा। दंडवत.

¶*This note gives news about the march of Murarrao as agreed upon with Amritrao. It further reports that Shriniwasrao and Antajipant Fadnis have been sent for by him.*

No. 167] [31-3-1751

श्रीसुबराज

राजश्री बालाजीराव पंडित
प्रधान गोसांवी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत असिलें पाहिजें विशेष. आपण सुतरस्वाराबराबरी छ ९ जमादिलावलचें पत्र पाठविलें तें छ १२ रोजीं प्रविष्ट जाहलें. व राजश्री तुबाजीपंत व राजश्री केशवराव यांस लिहिल्यावरूनहि कळों आलें. अशास आम्हीं आपला दर्शनाचा सिधांत करून स्वारासमागमें निश्चयोतर लिहिलें असतां व्यवधान होईल असे नाहीं. तदनसार दरकूच छ १३ शनवारी श्री नदीतीर काडल्लरचे खालतें दों कोसावर येऊन मुकाम केला आहे; परंतु गोसांवी यावयाचें आगमन अद्यापि न जाले. आम्हीं लिहिल्याप्रमाणें आलों. याउपरी विलंब न होतां उभये योग या या स्थलीं घडे तो अर्थ करावया सूज्ञ असां. येविशीं उभयेतां मशारनिले लिहितां चितास येईल. रा। छ १४ जमादिलावल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade comes as far as Kadlur and awaits the Peshwa's arrival.*

No. 168] [31-3-1751

श्रीसुबराज

राजश्री बालाजीराव पंडित
गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. बाबाखान व आपणाक(कडील) स्वार आले व पत्रार्थहि कलला. ये * * रोजांत उभये योग घडावा म्हणून लिहिले तरी या उद्येश्येच आमचे येणे * कडलुरावरी जालें आसतां विलंब काये? आप * * * रे न लिहिल्यावरून आम्हीं सोम * * कूच करून पुढें आलों. ऊभे * * * त्वरेने घडावावयास आपण सूज्ञ (आहा). येविशीं राजश्री तुबाजीपंत व (राजश्री) केशवराव व राजश्री नारोपंतहि लिहिताच * * येईल. रा छ १४ जमादिलोवल. बहुत लिहिणे तर सूज्ञ असा. हे विनंती.

¶*Murarrao expresses his desire to meet the Peshwa.*

No. 169] [7-2-1757

श्रीसुबराज

राजश्री नागोराव व श्रीनिवास
गोसावी यासीं

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो मुरारराव हिंदुराव घोरपडे ममलकतमदार सेनापति दंडवत उपर. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. दसऱ्याचे मुहुर्तें गावींहून स्वार होऊन पुण्यास पाऊन राजश्री पंतप्रधान यांची भेटी घेऊन इकडील सकलभाव सांगितलाच असेल. उतर प्रतिउतरे समर्पक सीघ्र पाठवणे. राजश्री पंतप्रधान यांजकडोन राजश्री गंगाधर बाजीराव आले. भेटी होऊन लिखितार्थ व मुक्तान्वये सांगोन पाठविला तो कलोन संतोष जाहाला. खास स्वारीची तयारी जाली, सीघ्र येऊन पावतो. आधीं आपली प्रयोजने करून यानंतर वरकड कर्तव्य करितों म्हणोन लिहिले आहे. ऐशियास आम्हीं सकलप्रकारें त्यांचे आहो; उचितास येईल तें करावे. सारांश खासा स्वारी लौकर व्हावी यांत बहुत प्रयोजने साधतात. शत्रूचें पारपत्य व कर्नाटकचा

बदोबस्त व आमची मनोभीष्टता शेखर होऊन त्यास येश येत. राजश्री गंगाधरपंताबाा पत्रे आली, तदउतरे लिहून पाठविली आहेत. आमची व राजश्री पंतप्रधान याची भेटी होईजेत व सनिध राहातात ग्रहस्त माकूल आहेत. इकडील वर्तमान पेशजी विस्तरे लिहिलेंच आहे. सारांश आमचा लक्ष राजश्री पंतप्रधान यांसिवाय नाहीं हे मनोमन साक्ष असतां उपरोध लिहिणें काये आहे? पाा घ्यावयाविषई लिहिले, त्यास आम्हांस त्यांच्या विचाराखेरीज इतर नाहीं. तुम्हीं परगण्यांची कची हकीकत त्यांस सांगोन ते ज्याप्रो मार्ग करून देतील त्यांप्रो समर्पक करणें. या दौलतीचा अभिमान त्यांस असतां विहित दिसेल तेंच करतील. हालीं जोडी पाठविली आहे, याजबाा सर्व वृत लिहून पाठवणें त्यासारखे केले जाईल. परगण्याची कची हकीकत सांगोन निदान विष्णुपंताचे कर्ज तरी वारेसे करावे. तेहि न होता तरी त्यांची मर्जी. तुम्हीं केवल त्यांची गैरमर्जी न करिता परगणा घ्यावाच म्हटल्या तुम्हीं आपल्या जिमे आहे तसा असो देणे. जाणिजे. छ १७ जमादिलोवल रुजु.

¶*Murarrao Ghorpade writes to the Vakil sent to Poona that he is very anxious about the intended arrival of the Peshwa, as the whole situation in the Karnatak will be brought under control by his presence. He also requests to settle the dispute about the possession of the Paragana.*

No. 170] [*12-2-1757?*

पो छ २९ जमादिलोवल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक तमाजी चंदो कृतानेक विज्ञापना. विनवावया प्रार्थना येसेजे. माघ बहुल अस्टमी स्वामीचे कृपाद्रिस्टीकडून सौंस्थानचे व सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. राजश्री दलवाई यानी कर्तुत्व केले ते पूर्वी सेवेसी विज्ञाप्ति लिहून पाठविले होते, त्यावरून श्रुत जाहाले असेल. त्याजवरी मध्ये प्रसंग जाहला तोहि परस्परें स्वामीस अवगत जाहाले असेल. श्रीमद्राजाधिराज राजश्री स्वामी यानी दलवाई यांसी जिंदगानीसुधा निरोप देऊन सौंस्थानाबाहीर केले-वरी दलवाई यांचे दुस्टाचे दुस्ट बाहीर होते. त्याणी पालती ठेऊन दगियाने प्राणनास केला. स्वामीद्रोह केल्यास ईस्वराने परभारे नतीजा दाखविला. केले कर्तुत्व पावला. यावरी सौंस्थानाची येथाप्रकारे बंदिस्ती जाहाली. परंतु तांब्राचा व राजश्री मुरारराव घोरपडे वगैरे * * * उपसर्ग लागोन

खेडीपाडी खराब होऊन पैका बेमबलग पडिला, यामुले सौंस्थानासी कोढी पडोन काही ताखत नाहीसारीखे जाहाली. स्वामी यानी सावणूरचे मुकामी करारमदार केला. तांब्राचा व राजश्री मुराररराव घोरपडे याचा नेहमी सिवाये वगैरे पालेगार इतकियाचा उपसर्ग लागो देत नाही. ज्याणी सौस्थान ताळूकातीची खेडीपाडी घेतली आहेत तेहि सोडविली जातील, यैसा इत्यार्थ जाहाला आसता कोणताहि निर्वेध जाहला नाही. सौंस्थान स्वामींचे पदरी पडिलियास यैसे होऊ नये. श्रीमंत राजश्री स्वामींचे चिती आपले पदरी पडिलियास सर्वस्व सौस्थानचे उर्जित करून घेऊन श्नेह सारोधार विशेषत्कारे चालावे हे मानस बहुत आहे. सांप्रती स्वामी यानी राजश्री गोपालराव गोविंद याजवरी कुल येक्तियार देऊन तोलदार फौज व तोफखाना सरंजामसुधा कर्नाटकच्या मोहिमेस रवाना केल्यास, राजश्रींनी तुंगभद्रापलीकडील अमित्रास तंबी पोहचाऊन मुलुक जतीस आणून, जागोजाग ठाणी घालून चौका बसऊन निर्वेध करून तुंगभद्रा आलीकडे तोलदारीनसी मुलुकात आले. सौंस्थानिकानी वस्त्रे व हती आम्हासामागमे देऊन राजश्रीकडे रवाना केले. वस्त्रे व हती ये (क) प्रविस्ट करून सौंस्थानचे अद्यांत वर्तमान सांगितलेवरी राजश्रीनी बहुत सन्मानेकडून श्नेहभावाच्या गोस्टी बोलिले. श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामी याचेहि आगमन होणार आहे. मनोगतानरूप समर्पक होऊन येतच आहे. सौंस्थानच साभिमानपूर्ण असता वारंवार सांगावे यैसा अर्थ काही नाही. अमित्रास तंबी पोहचाऊन निर्वेध करविला जाईल. याप्रकारे भरोसा दिल्हा. राजश्री हरि राम सौंस्थानास येऊन श्रीमद्राजाधिराज राजश्री स्वामी यासी पटाभिसेक करून श्नेहभावाच्या गोस्टी बोलोन, स्वार होऊन लस्करास गेले. स्वामीचे आगमन कृष्णातीरास होताच सौंस्थानिक आम्हास स्वामीचे सेवेसी रवाना करीत आहेत. सर्व अर्थ भेटीअंती निवेदन करीत असो. सौंस्थानिकाचे चिती आपले भेटीचा योग घडोन यावा, मनोगतानरूप कार्येभाग करून घ्यावा, यैसे मानस बहुत आहे. आगमनाचा मार्ग लक्षीत असतीलच. जे दिवसी स्वामीनी लिहून मुजरद जोडी रवाना केला अशास जेठियासी चालत आलेप्रमाणे येथाप्रकारे चालत असें यासी अंतर किमपि नाही. परस्परे स्वामीस श्रुत जाहालेच असे. त्याचे चालवावया कोणे गोस्टीची दिकत नाहीं. सुदामद बमोजीब चालत आहे. सूज्ञाप्रति विशेष लिहिणे शक्ती नव्हे हे विज्ञाप्ति.

¶*Tamaji Chando (probably Minister of a petty state in the Karnatak) asks for protection from the raiding activities of Murarrao and others. He also refers to the victories of Gopalrao Govind and of the dismissal of the minister Nandraj by his master, the Raja of Mysore and his subsequent murder.*

3990

No. 171] [13-2-1757

पो छ २९ जमादिलौवल

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ २३ जमादिलावल मुाा हिरालेपरियेंत येथास्तित असो विशेष. राजश्री राव ममलकतमदार याही गुतीहून कूच करून हिरालियास दाखल जाले. त्वरेने भेटीस यावे तर सिबंदी व कर्जाचा लोकाचा दंगा याजकरिता च्यार दिवस गुंता जाहला. आता काही गुंता नाही. कुडतनीस येक दोनी मुकाम करणे जरूर. घरचे लोकाची समजावीस व ठाणे याची बंदोबस्तीकरिता च्यार दिवस अदीक लागतील. कुडतनीहून कूच करून कनकगिरीच्या रोखे दरमजल येत आहेत. मागील लडा काही नाही. येथील विस्तार राजश्री अमृतरावजीनी लिहिला आहे; व राव ममलकतमदार याही पत्र लिहिले आहे त्यावरून श्रृत होईल. कुडतनीहून रायाचे कूच होऊन कनकगिरीच्या रोखे चालवावयाचे जाले म्हणजे जलद जोडी सेवेसी रवाना करितो. कुडतनीहून राजश्री नागोजीपंतास स्वामीकडे रवाना करणार. सेवेसी श्रृत होये हे विज्ञाप्ति.

¶*The Peshwa is informed that Murarrao Ghorpade has left Kudatni and is marching towards Kanakgiri.*

No. 172] [16-2-1757

पो छ २९ जमादिलौवल.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

अज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा माघ वद्य १३ त्रयोदसी बुधवार मुकाम कुडतनीत येथास्तित असो विज्ञापणा यैसी. राजश्री मुरारराव घोरपडे ममलकतमदार याही हिरलियाहून कूच माघ वद्य १२ मंगलवारी त्रितीये पाहरास कुडतनीस दाखल जाले. येथे तीन मुकाम करणार. स्वामीच्या भेटीस यावयाकरिता सोंडुराहून सरंजाम अनविला, व कुडतनीचा मामला आफतर ताा याजकरिता येथील कमाविसदाराचा व सिबंदी लोकाचा गवगवा करिता मुकाम करणें जरूर. फालगुण सुद १ प्रतिपदेस येथून राव

निघणार. कनकगिरीचे सुमारे दरमजल येणार. पुढे राजश्री नागोजीपंतास व सेवकास रवाना करणार. दरकूच स्वामीच्या भेटीस राव येणार. कोणते मुकामी भेटी व्हावी हा विचार स्वामी आज्ञा करतील त्याच रोखे येऊं, यैसे राव बोलिले. राजश्री गोपालरावजी रायेदुर्गाचे सुमारे दरकूच स्वामीचे आज्ञेवरून गेले. पेसजी रायाकडील ग्रहस्त यानी कितेक कल्पणा सवशेये नच जावे हाच करार करविला असतां, नागोजीपंतानी कितेक गोस्टी रायास येकांती बोध करून खातिरजमा करून निघावयाचा निश्चये केला. त्याचप्रमाने स्वामीस गुतीचे मुकामीहून दरशनास येत आहेत म्हणोन रायानी पत्रे पाठविली. तदनुसार माघ सुद ९ मुहूर्त डेरे दाखल जाले. राजश्री अमृतरावजी व सेवक व समस्त त्याच दिवसी रायासमीप मिसलीस जाऊन राहिलो. त्याच दिवसी माहदाजी राम सेनवी कितुर प्रांतीहून आले. त्याही रायाचे दरशन घेऊन खलबत रात्री केले. त्यावरून रायानी दुसरे दिवसी अमृतरावजीस व सेवकास बोलाऊन पाठऊन काही अपशेकुनाचे निमित्य सांगोन माघारे गुतीत गेले. राजश्री नागोजीपंतास वेथा माहाज्वराचा उपद्रव अतिशये जाला, त्यामुळें रायाकडील ग्रहस्त याही संध पाहोन रायास भर दिल्हा जे, येवढा महिना टाळावा. इतकियात सर्व कलल. ते हे वर्तमान सेवकास कललियावर दुसरे दिवसी नागोजीपंताकडे गेलो, यैसा मजकूर आहे. पंत मशारनिले बोलिले जे, राव येथे येणार त्यास च्यार गोस्टी निस्टूरपणें बोलोन कूच करवितो. संदेह न मानणे. दुसरे दिवसी राव नागोजीपंतास पाहावयास गेले. च्यार घटिका येकांती भाशन होत असता, राजश्री माधवराव दिा पाटोले हेहि स्वामीनी आज्ञा केल्याकरिता रायाकडे आले होते. वरकड ग्रहस्तास रायानी निरोप दिल्हा. त्रिवर्ग येकांती येक प्रहर बोलोन ज्या ज्या मनात कल्पणा इतरानी वाढविल्या होत्या तितक्या दूर करून राजश्री अमृतरावजीस व सेवकास प्राथकाली बोलाऊन त्याचे मुखे खरे करून उभयेता बोल्याप्रमानें खरेसे जाले तेव्हा रायाची [अपूर्ण]

¶*A fragmentary news-letter from Visaji Baburao : intimates the Peshwa that Murarrao Ghorpade has started for Poona notwithstanding advices to the contrary from his dependants.*

No. 173] [*17-2-1757*

" पो छ २९ जमादिलौवल

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ता माघ वद्य १४ गुरुवार मुकाम कुडतनीपरियेंत येथास्तित असे. विज्ञापणा

यैसिजे. राजश्री मुरारराव घोरपडे ममलकतमदार याही स्वामीचे भेटीस यावयास तयारी करीतात. फालगुण सुद १ येथून निघणार. दोनी दिवस गुंता सरंजाम करून निघावे याजकरिता मुकाम जाहला. गुती वगैरे देणियाचे लडे होते तितके उरकोन राव दरशनास येतात. कनकगिरीच्या सुमारे येणार. स्वामीचे भेटी कोनते मुकामी भेटी व्हावी येविशईची आज्ञा लेहून पाठविली पाहिजे. पेसजी पुजाजी जासुदाबराबरी सविस्तर सेवेसी विनंती लेहून पाठविलीच आहे. राजश्री अमृतरावजीची व राजश्री गोपालरावजीची भेटी येरंडगिरीच्या मुकामी भेटी होऊन आमृतरावजीस याही निरोप दिल्हा. तेहि सत्वरच येतील. जाले वर्तमान सेवेसी लिहिले असे हे विज्ञापना.

¶*Visaji Baburao informs the Peshwa that Murarrao Ghorpade had made preparations and was marching to visit the addressee and asks him to fix up the place for the proposed meeting.*

No. 174] [*19-2-1757*

पो छ १ जमादिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक सां नमस्कार विनंती येथील क्षेम ताा फालगुण सुद १ प्रतिपदा मंदवारपरियेत मुकाम कुडतनीपरियेत येथास्तित असो विज्ञापणा यैसीजे. राजश्री गोपालरावजीनी सेवकास पत्र पाठविले. राजश्री अमृतरावजीची भेटी होऊन येरडकीरेहून कूच करून बिदनुरचे रोखे गेले. राव ममलकतमदार हेहि सत्वरच स्वामीचे भेटीस येतात. अमृतरावजी रायेदुर्गाहून हिरालियास आले. उदयिक कुडतनीस दाखल जालियावर दुसरे दिवसी कूच राव करणार. पुढे राजश्री नागोजीपंतास व सेवकास रवाना करणार. रायापासी कोन्ही मातबर विवेकी नाहीत. जे कोन्ही आले ते लहान गोस्टीने रायाच्या चितात सवशयें बिंबून कितेक कलपणा वाढविल्या होत्या त्या दूर सेवकाने व नागोजी-पंताने दूर करून, अमृतरावजीनी कितेक ममतेनें रायाचे चित द्रवळून खामखा ये जावेसे करारवचण करून गुतीहून कूच करून दरकूच कुडतनीस आले. येथील गुंता वारून सेवेसी भेटीस येतात. राव येथून कूच करून येकमजल येतील तेव्हा सेवक व नागोजीपंत यैसे पुढे रवाना होऊन येऊ. रायेदुर्ग प्रांती धर्मवारास इनसखान याही मोरचे लाऊन बसले आहेत. रायानी आपलेंकडील राजश्री

खेडीपाडी खराब होऊन पैका बेमबलग पडिला, यामुळे सौंस्थानासी कोढी पडोन काहीं ताखत नाहीसारीखे जाहाली. स्वामी यानी सावणूरचे मुकामी करारमदार केला. तांब्राचा व राजश्री मुरारराव घोरपडे याचा नेहमी सिवाये वगैरे पालेगार इतकियाचा उपसर्ग लागो देत नाही. ज्याणी सौस्थान ताळूकातीची खेडीपाडी घेतली आहेत तेहि सोडविली जातील, यैसा इत्यार्थ जाहाला आसता कोणताहि निर्वेध जाहला नाही. सौंस्थान स्वामीचे पदरी पडिलियास यैसे होऊ नये. श्रीमंत राजश्री स्वामीचे चिती आपले पदरी पडिलियास सर्वस्व सौस्थानचे उर्जित करून घेऊन श्नेह सारोधार विशेषत्कारे चालावे हे मानस बहुत आहे. सांप्रती स्वामी यानी राजश्री गोपालराव गोविंद याजवरी कुल येक्तियार देऊन तोलदार फौज व तोफखाना सरंजामसुधा कर्नाटकच्या मोहिमेस रवाना केल्यास, राजश्रींनी तुंगभद्रापलीकडील अमित्रास तंबी पोहचाऊन मुलुक जतीस आणून, जागोजाग ठाणी घालून चौका बसऊन निर्वेध करून तुंगभद्रा आलीकडे तोलदारीनसी मुलुकात आले. सौंस्थानिकानी वस्त्रे व हती आम्हासामागमे देऊन राजश्रींकडे रवाना केले. वस्त्रे व हती ये (क) प्रविस्ट करून सौंस्थानचे अद्यांत वर्तमान सांगितलेवरी राजश्रींनी बहुत सन्माने-कडून श्नेहभावाच्या गोस्टी बोलिले. श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामी याचेहि आगमन होणार आहे. मनोगतानरूप समर्पक होऊन येतच आहे. सौंस्थानच साभिमानपूर्ण असता वारंवार सांगावे यैसा अर्थ काही नाही. अमित्रास तंबी पोहचाऊन निर्वेध करविला जाईल. याप्रकारे भरोसा दिल्हा. राजश्री हरि राम सौंस्थानास येऊन श्रीमद्राजाधिराज राजश्री स्वामी यासी पटाभिसेक करून श्नेहभावाच्या गोस्टी बोलोन, स्वार होऊन लस्करास गेले. स्वामीचे आगमन कृष्णातीरास होताच सौंस्थानिक आम्हास स्वामीचे सेवेसी रवाना करीत आहेत. सर्व अर्थ भेटीअंती निवेदन करीत असो. सौंस्थानिकाचे चिती आपले भेटीचा योग घडोन यावा, मनोगतानरूप कार्येभाग करून घ्यावा, यैसे मानस बहुत आहे. आगमनाचा मार्ग लक्षीत असतीलच. जे दिवसी स्वामीनी लिहून मुजरद जोडी रवाना केला अशास जेठियासी चालत आलेप्रमाणे येथाप्रकारे चालत असें यासी अंतर किमपि नाही. परस्परे स्वामीस श्रुत जाहालेच असे. त्याचे चाल-वावया कोणे गोस्टीची दिकत नाहीं. सुदामद बमोजीब चालत आहे. सूज्ञाप्रति विशेष लिहिणे शक्ती नव्हे हे विज्ञाप्ति.

¶*Tamaji Chando (probably Minister of a petty state in the Karnatak) asks for protection from the raiding activities of Murarrao and others. He also refers to the victories of Gopalrao Govind and of the dismissal of the minister Nandraj by his master, the Raja of Mysore and his subsequent murder.*

3990

No. 171] [13-2-1757

पो छ २९ जमादिलौवल

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ २३ जमादिलावल मु॥ हिरालेपरियेंत येथास्तित असो विशेष. राजश्री राव ममलकतमदार याही गुतीहून कूच करून हिरालियास दाखल जाले. त्वरेने भेटीस यावे तर सिबंदी व कर्जाचा लोकाचा दंगा याजकरिता च्यार दिवस गुंता जाहला. आता काही गुंता नाही. कुडतनीस येक दोनी मुकाम करणे जरूर. घरचे लोकाची समजावीस व ठाणे याची बंदोबस्तीकरिता च्यार दिवस अदीक लागतील. कुडतनीहून कूच करून कनकगिरीच्या रोखे दरमजल येत आहेत. मागील लडा काही नाही. येथील विस्तार राजश्री अमृतरावजीनी लिहिला आहे; व राव ममलकतमदार याही पत्र लिहिले आहे त्यावरून श्रुत होईल. कुडतनीहून रायाचे कूच होऊन कनकगिरीच्या रोखे चालवावयाचे जाले म्हणजे जलद जोडी सेवेसी रवाना करितो. कुडतनीहून राजश्री नागोजीपंतास स्वामीकडे रवाना करणार. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापि.

¶*The Peshwa is informed that Murarrao Ghorpade has left Kudatni and is marching towards Kanakgiri.*

[16-2-1757

No. 172]

पो छ २९ जमादिलौवल.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

अज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ता माघ वद्य १३ त्रयोदसी बुधवार मुकाम कुडतनीत येथास्तित असो विज्ञापणा येसी. राजश्री मुरारराव घोरपडे ममलकतमदार याही हिरलियाहून कूच माघ वद्य १२ मंगळवारी त्रितीये पाहरास कुडतनीस दाखल जाले. येथे तीन मुकाम करणार. स्वामीच्या भेटीस यावयाकरिता सोंडुराहून सरंजाम अनविला, व कुडतनीचा मामला आफतर ता याजकरिता येथील कमाविसदाराचा व सिबंदी लोकाचा गवगवा करिता मुकाम करणें जरूर. फाल्गुण सुद १ प्रतिपदेस येथून राव

निघणार. कनकगिरीचे सुमारे दरमजल येणार. पुढे राजश्री नागोजीपंतास व सेवकास रवाना करणार. दरकूच स्वामीच्या भेटीस राव येणार. कोणते मुकामी भेटी व्हावी हा विचार स्वामी आज्ञा करतील त्याच रोखे येऊं, यैसे राव बोलिले. राजश्री गोपाळरावजी रायेदुर्गाचे सुमारे दरकूच स्वामीचे आज्ञेवरून गेले. पेसजी रायाकडील ग्रहस्त यानी कितेक कल्पणा सवशेये नच जावे हाच करार करविला असतां, नागोजीपंतानी कितेक गोस्टी रायास येकांती बोध करून खातिरजमा करून निघावयाचा निश्चये केला. त्याचप्रमाने स्वामीस गुतीचे मुकामीहून दरशनास येत आहेत म्हणोन रायानी पत्रे पाठविली. तदनुसार माघ सुद ९ मुहूर्त डेरे दाखल जाले. राजश्री अमृतरावजी व सेवक व समस्त त्याच दिवसी रायासमीप मिसलीस जाऊन राहिलो. त्याच दिवसी माहदाजी राम सेनवी कितुर प्रांतीहून आले. त्याही रायाचे दरशन घेऊन खलबत रात्री केले. त्यावरून रायानी दुसरे दिवसी अमृतरावजीस व सेवकास बोलाऊन पाठऊन काही अपशेकुनाचे निमित्य सांगोन माघारे गुतीत गेले. राजश्री नागोजीपंतास वेथा माहाज्वराचा उपद्रव अतिशये जाला, त्यामुळें रायाकडील ग्रहस्त याही संध पाहोन रायास भर दिल्हा जे, येवढा महिना टाळावा. इतकियात सर्व कलल. ते हे वर्तमान सेवकास कललियावर दुसरे दिवसी नागोजीपंताकडे गेलो, यैसा मजकूर आहे. पंत मशारनिले बोलिले जे, राव येथे येणार त्यास च्यार गोस्टी निस्टूरपणें बोलोन कूच करवितो. संदेह न मानणे. दुसरे दिवसी राव नागोजीपंतास पाहावयास गेले. च्यार घटिका येकांती भाशन होत असता, राजश्री माधवराव दिा पाटोले हेहि स्वामीनी आज्ञा केल्याकरिता रायाकडे आले होते. वरकड ग्रहस्तास रायानी निरोप दिल्हा. त्रिवर्ग येकांती येक प्रहर बोलोन ज्या ज्या मनात कल्पणा इतरानी वाढविल्या होत्या तितक्या दूर करून राजश्री अमृतरावजीस व सेवकास प्राथकाली बोलाऊन त्याचे मुखे खरे करून उभयेता बोल्याप्रमानें खरेसे जाले तेव्हा रायाची [अपूर्ण]

¶*A fragmentary news-letter from Visaji Baburao : intimates the Peshwa that Murarrao Ghorpade has started for Poona notwithstanding advices to the contrary from his dependants.*

No. 173] [*17-2-1757*

पो छ २९ जमादिलौवल

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ता माघ वद्य १४ गुरुवार मुकाम कुडतनीपरियेंत येथास्तित असे. विज्ञापणा

यैसिजे. राजश्री मुरारराव घोरपडे ममलकतमदार याही स्वामीचे भेटीस यावयास तयारी करीतात. फालगुण सुद १ येथून निघणार. दोनी दिवस गुंता सरंजाम करून निघावे याजकरिता मुकाम जाहला. गुती वगैरे देणियाचे लडे होते तितके उरकोन राव दरशनास येतात. कनकगिरीच्या सुमारे येणार. स्वामीचे भेटी कोनते मुकामी भेटी व्हावी येविशईची आज्ञा लेहून पाठविली पाहिजे. पेसजी पुजाजी जासुदाबराबरी सविस्तर सेवेसी विनंती लेहून पाठविलीच आहे. राजश्री अमृतरावजीची व राजश्री गोपालरावजीची भेटी येरंडगिरीच्या मुकामी भेटी होऊन आमृतरावजीस याही निरोप दिल्हा. तेहि सत्वरच येतील. जाले वर्तमान सेवेसी लिहिले असे हे विज्ञापना.

¶*Visaji Baburao informs the Peshwa that Murarrao Ghorpade had made preparations and was marching to visit the addressee and asks him to fix up the place for the proposed meeting.*

No. 174] *[19-2-1757*

पो छ १ जमादिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक सां॥ नमस्कार विनंती येथील क्षेम ता॥ फालगुण सुद १ प्रतिपदा मंदवारपरियेत मुकाम कुडतनीपरियेत येथास्तित असो विज्ञापणा यैसीजे. राजश्री गोपालरावजीनी सेवकास पत्र पाठविले. राजश्री अमृतरावजीची भेटी होऊन येरडकीरेहून कूच करून बिदनुरचे रोखे गेले. राव ममलकतमदार हेहि सत्वरच स्वामीचे भेटीस येतात. अमृतरावजी रायेदुर्गाहून हिरालियास आले. उदयिक कुडतनीस दाखल जालियावर दुसरे दिवसी कूच राव करणार. पुढे राजश्री नागोजीपंतास व सेवकास रवाना करणार. रायापासी कोन्ही मातबर विवेकी नाहीत. जे कोन्ही आले ते लहान गोस्टीने रायाच्या चितात सवशयें बिंबून कितेक कल्पणा वाढविल्या होत्या त्या दूर सेवकाने व नागोजी-पंताने दूर करून, अमृतरावजीनी कितेक ममतेनें रायाचे चित द्रवळून खामखा येजावेसे करारवचण करून गुतीहून कूच करून दरकूच कुडतनीस आले. येथील गुंता वारून सेवेसी भेटीस येतात. राव येथून कूच करून येकमजल येतील तेव्हा सेवक व नागोजीपंत यैसे पुढे रवाना होऊन येऊ. रायेदुर्ग प्रांती धर्मवारास इनसखान याही मोरचे लाऊन बसले आहेत. रायानी आपलेकडील राजश्री

सिवाजीपंतास रायेदुर्गास पाठविले आहेत. तहरह जाला आहे. निशा पंतमशार-नुलेची जाली. येका दो रोजानी मोरचे उठोन लस्कर कूच होईल. त्याजकरितां गुंता नाही. रायासमागमें सरंजाम थोडकाच आहे. इनसखानाकडील कोन्ही राऊत व प्यादे यावयाचे नाहींत. सीघ्र रात्र निघतात. जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे हे विज्ञापना.

साहेबाचे सेवेसी निंबाजी नाईक सां दंडवत.

¶*Visaji Baburao reports the departure of Murarrao Ghorpade to meet the Peshwa.*

No. 175] [*19-2-1757*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

सेवेसी विज्ञापना विनंती. राजश्री मुरारायाकडील वर्तमान तरी खासा मडक-सिऱ्यात आहेत. फौज इनसखान म्हणौन मुसलमान आहे त्यास कुल कारभार सांगोन रवाना केले. फौज म्हणावी तरी च्यार हजार राऊत आहेत. येक तोफ नारलाप्रा गोल्याची आहे. लहान दाहा आहेत. फिरंगी पावणासे आहेत. गाडदी येक हजार आहेत. दुसरे बार म्हणोन दोन हजार आहेत. येकून तोफखानेची िा पाईचे माणसे देखील च्यार हजारपर्यंत आहेत. राऊत आहेत त्याजवर भर नाही. रोजमरा देत नाहीत. फार ममता फिरंगियावरी तोफखानेवरी आहे. तोफखानेमुले मुलुकात दहशत फार पडली आहे. या रानच्या प्यादेयानी आव टाकिला. फौज येताच ठाणे स्वाधीन करितात. मडकसिरेत आपण राहून फौज पाठविलेवरी गड होनूर म्हणोन रायदुर्गाचे पलीकडे आहे त्यावरी येऊन हला केली. येके रोजी तो गाव घेताच त्या खालील खेडियाचे प्यादे पलोन गेले. त्या प्रांतात मोकाम पंधरा रोजपर्यंत करून लाख रुपयेपर्यंत वसूल केले. रायदुर्ग प्रांतात आले. त्याचे दाहा पाच खेडी घेतली. त्यावर सवस्थानिकानी साठ हजार रुपयास खंडणी केली. तेथू(न) आदवानी प्रांतात आले. दाहा पाच खेडी मोक्याजवल होती ती घेतली. मोकेयाची पेठ मारिली. पंधरा हजार रुपये घेऊन किला मात्र ठाणे घातले नाही. तेथून येकायेकी सिदमहली म्हणोन बलारीचे आलीकडे आहे त्यास येऊन चौकी दिल्ही. दुसरे दिवसी फिरंगियानी हला करून गाव घेतला. गावात रयतेस कैद करून लाख रुपये करार केले. कुडतनी

म्हणोन भुईकोट होता तेथे जेठिगराज म्हणोन पालेगार होता. गुा बाहादूरबंडेस येऊन आमचे सवस्थान नातवानीस पडिले, आमचा उधार करावा म्हणोन दोन महिने किले मजकुरी होता. दोनेलीचा तलावरी बिदनूरचे सरदेस तिगस्ता वर्तमान निवेदन कुडतनीचा मजकूर या प्रकारचा आहे म्हणोन विनंती केली. त्यावरून आज्ञा कुडतनीची बंदोबस्ती करणे, त्या प्रांते स्वारी जाहाली तरी त्या खालील खेडीपाडी सोडविली जातील म्हणोन आज्ञा जाहाली. त्यावरून तेथे निशाण लाऊन पेशजी प्यादे होते त्याचे समाधान करून खर्चास देऊन पंनास प्यादे आपले निा घातले होते, कारकून सरकाराचा होता गुा आदवानीकर मोगलानेहि कजिया निशाण सरकारचे लाविले पाहून काजिया केला नाही. हाली मुराररायानी सिदमहलींचे ठाणे घेताच दुसरे दिवसी कुडतनीसहि ठाणे घातले. बाहादूरबांडेहून उपराला करावा तरी तुंगभद्रेस पाणी फार होते. इतकेयातहि उपराला केला, परंतु अगोधरच ठाणे त्याचे हातास गेले. बलारीची बोली लागली आहे. एकदोन दिवसा तह होईल. अनेगुंदीच्या प्रांतात उपद्रव केला जे तुम्ही त्याचे पदरी कसे पडिला? जुजावयाचे चितास येईल तरी जुजणे. सवस्थानिकाचा मजकूर कलतच आहे. उपराला समयास न पोहचे पाहून सला पंचवीस हजार रुपयास केला. रुपया द्यावयास जागा नाही. आदवानीचा तह जाहाला नाही. हरपनहली प्रांतात येणार आहेत. त्यास लगामी लावून नदीपार होऊन सावनूरकर व मुसाफरजंग येकत्र होऊन बाहादरबंडा व धारवाडासी काजिया करावा, पालेगार येकत्र व्हावे, फार आंगेजणी केली आहे. सध्या नानाप्रकारे तजवीजेंत आहेत. या रानी फौज पाच सात हजार असती तरी पायबंद बसता. ती गोष्ट नाही. कोपलकराचे साहित्य करावे त्यास ममतेस लावून आम्हासी कजिया केलेसारिखे दाखवून आपले ठाणे कोपलांत घालावे यैसेहि चितात आहे. लबाडीस चुकत नाही. फौजा सत्वरच रवाना जाहालेवरी सर्वहि आपले घर जतन करावे म्हणोन ठिकाणास जातात. फौजेत जीव नाही. दाहा हजार फौज सध्या जाहालियावरी ठिकाणास लावतील. श्रुत होये हे विनंती.

¶*The writer supplies the Peshwa information regarding the activities of Murarrao Ghorpade.*

No. 176] *[23-2-1757*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ता फाल्गुण सुद ९ बुधवारपरियंत घटिका रात्री पावेतो येथास्थित असो विज्ञापणा

यैसीजे. स्वामींनी आज्ञापत्र राजश्री आमृतरावजीस व राजश्री राव ममलकतमदार यास पत्र सांडनीस्वाराबरोबरी पाठविलें ते घटिका दिवसा राजश्री रावजीस प्रविस्ट करून प्रतिउतर राऊत निा आमृतरावजीचे स्वाराबराबरी पाठविले आहे. राजश्री आमृतरावजी प्रहरा रात्री येतील, तैसेच स्वामीकडे येतील. राजश्री रावजींचें गाव जागाजागा आहेत त्याची रखवालीचे लोकास ताकीद जाली पाहिजे. राजश्री नागोजीपंतास व आम्हासहि रवाना करतील. सेवेसी येऊन पोहोचतो हे विज्ञापणा.

¶*Visaji Baburao to Nanasaheb, informing him that letters addressed to Amritraoji and Mamlakatmadar have been handed over to them.*

No. 177] [*24-2-1757?*

छ ९ जाादिलावल+

श्रीरामचंद्रायनमः

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बाबा (दादा?) साहेबांचे सेवेसी

पोष्ये परशराम माहदेव सां. नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम ताा छ २४ जमादिलावल मुकाम आदोन जाणून स्वानंद लेखणार्थ आज्ञा लेखकास केली पाहिजे. विशेष यापूर्वी दोन पत्रें सेवेसी रवाना केली ती पावली असतील. येथील वर्तमान तरी मोगलाई कटक आदेनीस आले. पुढें नीट सिरियावरून श्रीरंगपटणास चालतील. आपले सैन्य कोठे आहे हे कलत नाही. तरी कोठे आहेत, कोण कोण ठिकाणी कसा कसा प्रसं(ग) जाला, काय चुकाती जाली, पुढें कोणे ठिकाणास जाणार हे वर्तमान वरचेवर कलले पाहिजे. राजश्री माहराय रुखसत होऊन पांचाशा स्वारानसी दुखणाईत म्हणोन गेले. गदवल दोन लाख रुपये व करनूल एक चुकलें; करनूलकराने रुपयाची निशा केली. भेटीसाठी लिहिले आहे जे सिबंदीचा दंगा आहे अवकाश होईल तरी येईन. अद्याप आला नाही. कडपेकराचा समाचार काही आला नाही. मुराराय व कडपेवालियाची लढाई जाली, मुरारराय मोडला ऐसे वर्तमान उडतें या वेलेस कोन्ही येके येऊन सांगितले. तहकीक बातनी जोड्या आल्या नाहींत. मागोन जे कलेल ते लिहून पाठउन देऊं. पाम नाईक आला होता त्याची चुकाती दोन लाख जाली. पैकी एक लाख रुपयाची निशा करून बीर्दे[१] होऊन गेला. किलीच नाईक सांगातेच आहे हे विनंती.

¶*Parashuram Mahadev, the Peshwa's Vakil with Salabatjang, informs Peshwa which tributes were recovered from the various Nawabs of the Karnatak and which were not.*

+ महिना जमादिलाखर पाहिजे, १ शरण येऊन.

No. 178] [February 1757 ?

श्री

राजेश्री बाळाजी बाजीराऊ
प्रधान गोसावी यासी

'॥ ६ सकसगुणालंकरण अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्नो श्रीमंन्माहाराज राजेश्री दळवाई वेंकटपति नाईक गिरापा नाईक दंडवत. उपरी: येथील कुशल जाणोन स्वकुशललेखन करीत असावे विशेष. रा। हरिबाबा व रा। बापू सखो फौजेसहित रवाना केलेले ते येऊन पावले. भेटी जाहाली. बोली-चाली करून पैके च स बि ले (?) करून दिल्हे अस. सौस्थानावरी मांदगी आहे, करिता दोनी दिवस अभ्यांतरेने पावले. सकळ विषई सांभाळून नेणेच भार आपले अस. सौस्थान आपले, आम्ही तुमचे असो. वरकड वर्तमान रा। उभयेतानी लेखन केले आहेत त्यावरून विदित होईल. सकलहि जाणता, सूज्ञप्रति विशेष लिहणे काये आहे!

¶*Venkatpati Naik begs to be forgiven for the delay in paying off the tribute he owed to the Peshwa.*

No. 179] [February 1757 ?

श्रीसुबाराज

राजश्री बलवंतराव गोसावी
यांसी

६ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे. यानंतर अलीकडे पाच सात रोज आपणाकडोन पत्र येऊन वर्तमान कलत नाही; तरी यैसे न करितां सर्वदा वार्तिकासमागमे मनसबा व कर्तव्य लेख केला पाहिजे. राजश्री खंडेराव घोरपडे व राजश्री भीवराव व गोपालराव यास फौजेनसी पाठविले ते पाऊन भेटी गोष्टी होऊन राजश्री मलार रघुनाथसह सडेस्वारीस रवाना केल्याचे वर्तमानहि कलले. उतम गोष्टी जाली. येथे फौज आहे, त्याची समजाविसी होत आली. दिल्याविना निघेनात हे वृत आपणासहि कललेंच आहे. दोनी च्यारी दिवसांत फौजेची रवानगी करून पाठवितो. येऊन पावेल. रतनगिरीकराकडे पत्रे देऊन वेदमूर्ति राजश्री बापूभट यास वसिरेचे स्वार कारकूनसह पाठविल्यास दरवाजा बांधून करावयाची खटपट करणेची केली;

परंतु कार्यभाग समपक न होतां राजश्री लक्ष्मण हरि याचे पत्र घेऊन वेदमूर्ति येथें आले. बजिनस पत्र देऊन मलोबा तेथे नाहीत, म्हणून राजश्री माहादाजी राम यास लिहिणे ते लेहून पाठविले आहे. आपण पाच गाव घेऊन देतो म्हणून वचन दिल्हेच आहे. ते खरे करून द्यावयाचे आपले चिती असलिया आपणाकडे रतनगिरीचा वकील आला आहे. त्यास परिछिन्न आस्पद न देतां खेडी दिल्याविना सुटत नाहीत म्हणून पष्ट सांगून आपणाकडील मातबर कारकून व पंचेवीस स्वार बापूभट याबा रतनगिरीचा वकीलसहित पाठविल्या संस्थानिक पाच गाव देतात. हे न होये तरी परिछिन्न देत नाहीत यास्तव लिा असे; तरी स्वार व कारकून व स्थलिकाकडील वकिलास वरजोर ताकीद करून बापूभट याबा पाठऊन गाव ठाणी पडेत, आपले वचन खरे होये ते करावयास आपण सूज्ञ असतां विषदे लिहिणे लागत नाही. रा छ ९ मोहरम. देण असल तर द्यावा. यावर आपणावर भार आमचा आहे. हे समर्पक करील हे विनंती.

¶*Murarrao writes to Balwantrao that he will pay off the arrears of the army and get it ready for march.*

No. 180] *[22-3-1757*

श्रीसुबाराज

राजश्री बलवंतराव गोसावी

यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिलें पाहिजे. यानंतर आपण पत्र पाठविले ते पावले. लगती ठाणी घेऊन द्यावी भेटीहि घ्यावी असा सिधांत आसता, राजश्री सुबारायानी ते गोष्टी राहविली. इकडोन अंतर नाही म्हणून दर्शविले. उभये पक्षी चितैक्य असतां परिहार ल्याहावासा नाही. लगती ठाणी व आठराची भरती व भेटी होऊन कितेक गोष्टी उपयोगी पडतील हा भरवसा आपला व आपणावर आमचा भार आसतां लिहून व बोलून सुचवावेसें नाही. आपणास आमचे आगत्य आहे, तेथें सर्वेहि चितानरूप घडोन येईल. राजश्री पंत प्रधान याचा आमचा स्नेह सारोधार चालावा हेच मानसविना इतर नाही. सदैव पत्र पाठऊन तोशविले पाहिजे.

आपला मुकाम कोठे? गुरमकोंडा हस्तगत जाला की नाही? व्हावयाचा
[शिक्का] विचार केला आसेल. पुढें कूच मुकाम कोणीकडे हे सर्वहि वरचेवरी लिहीत जावे. रा छ १ माहे रजब बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade to Balvantrao regretting his inability to render him any assistance in the campaign. He further makes inquiries whether Gurumkonda has fallen.*

No. 181] [*30-3-1751*

श्री

सेवेसी तुबाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागाईत छ १३ जमादिलवल दिवस आडीच प्रहरपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनें-करून येथास्थित असें विज्ञापना. सांडणीस्वार यांसमागमें छ ९ जमादिलावलचे आज्ञापत्र सादर जालें तें छ १२ जमादिलवलीं संध्याकालीं प्रहर दिवसा पावलें. लिहिलें वर्तमान आवगत जालें. तेथें आज्ञा जें. येतात न येतात हे कांहीच लिहीत नाहीत, याजवरून काये म्हणावें, म्हणून लिहिले. त्यास तीन पत्रें सेवेसीं लिहिलीं, त्याचें उत्तर न आलें. यानी कूच करून गुरुवारी स्वार जालें ते शनवारीं पौर्णिमेस देवसुगुरनजीक श्रीकृष्णातीर गाडलूर संगम दोन कोस डावेकडे येथें आले. स्वामीचा मार्गप्रतीक्षा करितात. यांचा अवलंब स्वामीखेरीज दुसरा आहे यैसें नाहीं. भेटीचा हेत धरून येऊन मार्गावरीच राहिले आहेत. यांची व स्वामींची भेटी येथें होये तो अर्थ करावया स्वामी समर्थ आहेत. मार्ग हाच आहे. येथे यांचे पदरीचे कितेक ग्रहस्त आहेत त्यानी बहुतांप्रकारे याच्या मनात विक्षेप घातला कीं, ते मार्गस्त आहेत, त्यानी काये देणे करणे आहे, म्हणौन विकल्प घातला; परंतु यानी कोणाचे यैकिले नाही. कितेक आर्थ भेटी होईल तेव्हा निवेदन करू. बहुत काये लिा, सेवेसी श्रुत होये, हे विज्ञाति.

¶*Tubaji Anant informs the Peshwa that Murarrao has encamped near Devsugur on the bank of the Krishna and has been waiting for an interview.*

No. 182]   [*May 1756*

(घडणी नं. ९८६.)

श्री

यादी तजवीजनामा याद मुरारराyaकडील जाबसाल.

सावनूरकरावर आम्हीहि रयात याउपर करावी. मुरारत्यानीहि करावी. त्याजकडे निमे ऐवज माफ करावा. निमे आम्हाकडे मुलुक आला. परंतु बहुत खराब जाहाला. लुटला गेला. तेथील सिबंदीच फिटत नाही. यास्तव तहकीक ऐवज असेल त्यापैकी निमे करार करून ती साला मुलकास लावणीचा इस्तावा दिल्हा आहे. ती साला पंचवीस पनास पाऊण लाख याप्राा पुढले सालापासून घ्यावा.

पटणचे पना(स) हजाराविसी सख्त ताकीद करून सरकारचा ऐवज वसूल होईल त्याप्राा मारनिलेचाहि करावा.

सिरे याचे तालुके यापूर्वी मारनिलेकडील असतील ते करार करावे. नवे सिन्याखाली चालत असेल त्यापैकी मागू नये. नवे ठाणे सरकारचे तेथे बसते त्याचा खर्च चालला पाहिजे. दिलावरखानास अबरूने ठेवावे लागते. मुराररायाचाहि अति स्नेहित त्यास कोलार जागीर द्यावे लागते. ते जरूर त्याकडे चालविले पाहिजे.

हरपनहलीचे गाव न मागावे.

चित्रदुर्गपैकी गांव वड वगैरे जरूर असेल ते दरोबस्त मोकासा द्यावा.

बिदनूर, सोंदे, कितूर येथील ऐवज सालाबाद, पहिल्यापासून पावत असेल त्याप्राो स्पष्ट ताकीद करावी.

कडप्यापैकी तहकीक करून तालुकियाची बेरीज काढली आहे तो सरंजाम द्यावा. मोगलाई व मोकासा सरदेशमुखी देखील.

अदवानी प्रांती सुदामत घेत असतील ते परिछिन देवावे, परंतु नवाबासी गुाा शफतपूर्वक स्नेह जाहला आहे याजमुले त्याकडील तालुका तूर्त देता येत नाही.

सरंजामात अमल बसे तो सरकारचे फौजेस रोजमरा पावेल त्याप्राा मारनिलेचे फौजेस गणतीचा अजमास पाहून द्यावा. अमल बसल्यानंतर रोजमरा देऊ नये.

येणेप्राा त्याचे करून दिल्हियावर त्यानी मन घालून फौजसुधा सरकारचे फौजेस माहीतगिरीने निःकपटपणे मेहनत करून हमेश फिरून विशेष पैका मिळे ऐसे

करावे. विशेष काम पडल्यास बोलाविले तर जिकडे काम पडेल ते येऊन करावे. संशये भेद मनात याउपर आणू नये. दोन वर्षे मेहनत करावी म्हणजे पदरी घेतल्याचा नफा वाटून पुढे दिवसेदिवस उतमच होईल.

¶*This paper, wholly in the handwriting of the Peshwa Balajirao, sets down the terms of an agreement effected with Murarrao Ghorpade, when he agreed to serve the Peshwa and help him to carry out the plans proposed by him in the region of the Karnatak.*

No. 183] *[4-5-1756*

पौ छ ९ शाबान

॥ श्री ॥

सेवेसी सेव्याजी खराडे विनंती विज्ञापना. येथील वर्तमान काल रात्री राजश्री मुरारराव घोरपडे मोगलाच्या लस्करांत गेले होते. साहनवाजखान व मुसा भुसी व हैदरजंग व राजश्री रामचंद्र जाधवराव व राजश्री आनंदराव निंबालकर याच्या भेटी घेतल्या. समागमे आपणहि घेऊन गेले होते. सर्वांचे येकांत जाहले. तेथे आपणहि होतो. शाहनवाजखान यासी भाशण जाहले कीं श्रीमंतानी कृपा केली तैसीच तुम्हीहि प्रीति असो द्यावी. शाहनवाजखानानी उतम प्रकारे यांचा गौर केला. राजश्री परसरामपंतहि सनिध होते. मुरारराव यानी मोगलाकडील किला व मुलुक घेतला होता, त्याच्या सनदा द्याव्या येसा करार शाहानवाजखानानी केला. उतम प्रकारे गौर करून सिरपाव घोडा व सिरपेच दिल्हा. मुसा भुसी व हैदरजंगाचा येकांत जाहला. तेथे मजकूर येसा जाहला. मुरारराव बोलिले कीं तुम्ही कोन्हे गोष्टीचा चितात विकल्प न आणावा. राजश्री सुभेदाराचा पाये दरमियान आहे; आण श्रीमंतासहि तुमचे आगत्य; आण तुमचे आमचेहि इष्टत्व आहे. आम्हावरहि श्रीमंतानी कृपा केली आहे. श्रीमंतानी या प्रांते काही कामकाज सांगितले तर तुम्ही आमचे साहित्य करावे येसे कितेक भाशण जाहले. बहुता प्रकारे उभ(येता) रहश्य भासेण जाहले. मुसा भुसी व हैदरजंग यानी मुराररांयासी भाशण केले कीं आपल्या पातशाहवर इंगरेज चालोन येतात; तर याजविसी आमचे साहित्ये करावे येसे वचन देणे म्हणून बोलिले. त्यास मुरारराव बोलिले कीं म्या आपले वचन येकास विकलें आहे. मजला काही वचन देता येत नाही. श्रीमंतासहि तुमचे आगत्यच आहे, ते जे आज्ञा करितील त्यास आपण अंतर करणार नाही. तुम्हीहि त्याचे आज्ञेत राहून वर्तणूक करावी यात तुमचेहि कल्याण

4001

आहे. मग ते बोलिले कीं आम्ही काही श्रीमंताच्या वचनाखेरीज नाही, जेणे-प्रमाणे वर्तणूक करू येसे भाशण जाले. येक घोडा व सिरपेच देऊन, बहुमाने वाटे लाविले. राजश्री जाधवरायानी येक घोडा व हती येक दिल्हा, व राजश्री आनंदराव निंबालकर यानी घोडा व सिरपेच दिल्हा. दोनप्रहर साह घटका रात्र जाहलियावर डेरियास आलो. ते जेथे येकांतास गेले तेथे आम्हासहि घेऊन गेले. आम्हासी भाशण रायानी केले कीं, आपण श्रीमंताच्या पायासी येकनिष्ठ मिठी घातली आहे. तीन वरसें पावोतो उर्जिताचे पाहून मग त्याजसी उतर करीन. तीन वरसे होयेत तो परयेत काही भाशण करीत नाही. जैसे ठेवतील तैसे राहीन, यैसे कितेक मायावादे बोलतात. आजी राजश्री मुराररायाकडील पांच स्वार व रायानी आपले स्वार येसे पुढें रवाना येवज व हती आणावयास रवाना केले. कितेक मजकूर राणोजी चासकर मुखोगत सेवेसी निवेदन करील त्याजवरून श्रुत होईल हे विज्ञापना श्रुत होये.

¶Setyaji Kharade, Holkar's Sardar, was sent to Murarrao and succeeded in winning him over to the Maratha cause. He reports the discussions that took place between Murarrao, Bussy and other magnates of the Nizam, every one vying with each other in his enthusiasm for the Peshwa.

No. 184] *[4-5-1757?*

श्री

सेवेसी आज्ञाधारक मुकुंद श्रीपत विज्ञापना. तागायत छ १९ शाबान बुधवार प्रातःकालपर्यंत स्वामीचे कृपेकडून येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. मागील वर्तमान सांडणीस्वारासमागमें काल दोन प्रहरा सेवेसी लेहून पाठविले आहे त्याजवरून विदित जाहालेच असेल. येथील रयेत व सावकार तमाम निघोन गेले. लस्कर येथें येतें म्हणोन आवाईमुळें मोगलाने निरोप दिल्हा. किल्या-नजिकचें तळें फोडून पाणी लाऊन तळें कोरडें केले. किल्याची बंदोबस्तीहि करीत चालला हें जाणून नरसिंगराव यासी बोलिलों कीं लस्करची आवाई मोगलानें बहुत खादली, मोठा तोफखाना साकोलानजीक आला. याच प्रसंगांत नेटून मोगलास सांगावें कीं लस्कर नजीक आलें. या प्रांतांत आल्यानंतर गांव लुटले जातील. मग तुमचें आमचें बोलणें काय कामाचें? करार कोठे राहतो? मुलकामुळें इतकें तुम्हांसी बोलणें. याजकरितां सरकारचें निशाण किल्यात घ्यावें, किला सरकारांत दिल्हा यैसे वर्तमान जाहालीवर गांव लुटले जाणार

नाहीं. श्रीमंतानी सांगितल्याप्रमाणें तुम्हीं यैकिलें यैसें होईल. श्रीमंताची ममता तुमचे ठाई विशेष होऊन तुमचें उतम * * * बरे होईल. याप्रमाणें भेटून बोलोन निशाण किल्यांत घेत यैसें करावें. उपरांत तुम्हीं श्रीमंताचे दर्शनास जावें. तुमचा त्याचा नवा करार जाहाला असेल तोहि श्रीमंत करार करून देतील. आम्हीहि विनंती करून तुमचें वचन जें जाहालें असेल तें करार करून देऊं. तुम्ही न जावें यैसें सांगत असतां विसरोन आले सेवेसी आले आहेत. मोगलाचे मनोदयानरूप जाहाल्यावर निशाण किल्यांत जाईल. आधी कैसे घेतो म्हणोन सेवकासी जाबसाल केला. आमचीहि गाठ बोलावयाची पडों देत नाहीं. मोगलाचा इतबार याजवर असतां यैसा प्रकार आहे. किला देतों म्हणोन मोगल बोलतो. दिसगतीवर तों लाविलें आहे. मोगलासी याणी काये करार केला असेल, तो स्वामीनें मान्य करून याची रवानगी जलदीनें केली पाहिजे. गाडदी येथें होते ते खजिन्यासमागमें लस्करांत गेले. त्याची आमची गाठ मार्गी पडली नाहीं; यास्तव त्यास ताकीद देऊन येथें सत्वर पोहचते करणार स्वामी समर्थ आहेत. सारांश, किल्यांत निशाण जलदीनें घेत यैसी नेटून ताकीद नरसिंगराव यास करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat from some fort in the Karnatak, asks the Peshwa to warn the Nizam not to interfere in the affairs of the Maratha capture of the place.*

No. 185] [11-5-1757

(कर्नाटक रुमाल नं. ८४९.)

श्री

तहनामा यादी राजश्री मुरारराव घोरपडे सुरु सबा खमसेन मया अलफ छ २२ साबान मुकाम सिरे :—

नदीपलीकडे कृष्णा तुंगभद्रा मध्यदेसी बंकापूर वगैरे मिळून रुपये १४२४०० त्यापैकीं घ्यावयाचा करार रुपये ६५००० पासष्ट हजार त्याचे यैवजी सरंजाम मुलगुंद समेत कसबा ठाणे व खेडी मिळून घ्यावे निमे

तुंगभद्रा दक्षणतीरी नेहमीचा येवज जागा जागा आहे त्यास ताकीद करून जेथील तेथें देववावा. ज्याजती काडीइतका उपसर्ग कोठे न करावा करार.

हरिहर बसवापटण बुकापटण सरकारची ठाणी तेथील यैवज तेथें पुरत

३२५०० साडेबतीस हजार बाकी साडेबतीस हजार ते हरि राम याजकडे तनखा निवल घ्यावा करार.

होनगुदे देवस्थानचा माहाल नेहमी देवस्थानचा यैवज परभारा देववावा करार.

रायेर हुबली पातशाही किलेदाराकडे व सरकार मजीदपूर मिळून होन ९५० दर ३॥। प्रमाणे रुपये ३५६२॥

तपसील

किलेदाराकडे सरकारमजीद रुपये १३१२॥. पूर रुपये २२५०.

३५६२॥.

गलाबाबत रुपये तेरासे साडेबारा परभारे देवऊन सरकारपैकी साडेबेवीसशे राहिले ते साडेबतीसहजार तनखियापैकीं मजरा सरकारात घ्यावे करार.

संस्थान बिदरूर येथील नेहमी रुपये २८००० अठावीस हजार व बाकी सनवात व (?) सालमजकूर देखील गोपालरायास सांगून संस्थानिकास ताकीद करून देववावे व त्याचे वकील हुजूर येतील त्यासहि ताकीद करून क्षेपनिक्षेप देववावा करार.

कर्ज वारावयाकरितां मुलुकगिरी करणें त्यास सिऱ्याचा तालुका सोडून अन्यत्र मुलकात मुलुकगिरी करावी, सिरेचे तालुकियात फौज न यावी दोन नाहीं याजकरिता निमे ऐवज होईल तो सिरे प्रांती देववावा करार.

कोल्हार व सिरे व बालापूर बुदरुख व चिक बालापूर वगैरा तालुका सरकारचा तेथील नेहमीचा येवज सालाबाद करार चालत आहे तो सालमजकूर सन सबा खमसैनात तेथील तेथे देववायाविसीं बलवंतराव यास ताकीद करावी. पुढील साली या यैवजाच्या समती सिरे प्रांते हरयेकजागा नेमणेयास खासा स्वारी आलियावरी नेमून द्यावा. परभारी फौज पाठवून वसूल न्यायाचा सोहलतीने वसूल होईल तो होईल, न होय त्यास बलवतरायानी ताकीद करावी क्षेपनिक्षेप यैवज देवावा करार.

अठरालक्षपैकी तेरालक्षाचा तनखा यंदा घ्यावा त्यास सध्या परगणे नेमिले त्याची याद अलाहिदा आहे ते वजा करून बाकी तेराचे भरीचे माहाल स्वारी खासा या प्रांते आलियावरी माहाल तनखा पाहून नेमून द्यावे. करार.

फौज तोफखाना बलवंतरायास भाद्रपदमासानंतर सामील जाहलिया आपले फौजेस रोजमरा फौजेस द्यावा तोफखाना व तोफा व गाडदी फिरंगियाचा महिना असेल त्यास हजिरी गणतीप्रमाणे बेरीज होईल त्यापैकीं निमे रोजमरा दीडमाही देत जावा फौज

महिने मात्र तूर्त मुलुकगिरी करून फौजेस फौज सामील करावी. सध्याहि काम वाडल्यास फौज सामील व्हावी करार.

रोजमरा आमचे फौजेस पावत जाईल त्याप्रमाणे देत जावा करार.

¶*This is a treaty of offensive and defensive alliance formed by the Peshwa with Murarrao Ghorpade at Shira after having won him over.*

No. 186] [16-6-1756

पौ छ २९ रमजान

श्री

सेवेसी विज्ञापना. मुजफरखान याची राजकारणे फिरंगी गोवेकर याजकडून इलायेतसी केले आहे; व महमद आलीखान सुभा आरकाट याचा वकील येथे आला आहे. त्याचा मजकूर फरासीस व इंग्रेज याची लडाई इलायेतास सुरू जाहाली आहे. फुलचरीचे पारपत्ये करावें. चिनापटणवाल्याची कुमक करावी म्हणौन इलायेताहून आपणास लिा आले आहे. पाच जाहाजे रवाना केली आहेत. तीहि थोड्याच दिवसी पावतील; तर तुम्ही आपले फौजसुधा येऊन सत्वर पोहचणे. सिबंदी देणे असल ते आपण वारू. वीस लक्ष रुपयाची जाहागीर तुम्हास करार करऊन वजिराजवळून जाहागिरीचे इनायेतनामे आणवितो. सलाबतजंग याणी पेशजी वीस लक्षाची जाहागीर दिली होती; त्याजपैकी दाहा लक्ष रुपयाची जाहागीर आपले तालुकि(या)त आहे. ते तूर्तच जिमे करितो; परंतु तुम्ही येणे म्हणोन पत्रे आली आहेत. त्यास जाबसाल देऊन रवाना केले. काये लिहिले न कले. सलाबतजंग याजकडून शाहानवाजखान याचे मारूफतीने राजकारण आहेच. हाली अंमृतराऊ तिकडें रवाना झाला आहे. मुसा भुसी याचा व खानाचा पेच पेशजी होता तो दूर होऊन त्याजकडील भला माणोस याजकडे आला होता कीं, पुढे तुम्ही आम्ही येकत्र व्हावे. फुलचरीकडे जावे, चिनपटणवाल्याची फुलचरीकराची लडाई सुरू होणार. तुम्ही आम्ही मिलोन तिकडे जाऊ. हेंहि राजकारण आहे. यातून कोणते सिधीस जाते पाहावें. सदरहू चहू राजकारणापैकी येकहि घडोन आले तरी स्वामीचे उपयागी नाहीं. यास थोडे बहुतानी पदरीच ठेवावे हे उतम. दुसरेकडे गेल्याने स्वामीचे स्वहित नाही, हे जाणून याजवल खरें लटके बोलोन, स्वामीचे सेवेसी घेऊन यावे येसा करार केला आहे. तूर्त खर्चास पाहिजे. पंचवीस हजार रुपये पुणियापावेतो तूर्त

आपणास पाहिजेत; द्यावे. त्यासिवाई आपले येणे घडत नाहीं म्हाणाले; व दंगा बहुत रुपया दिल्यासिवाई याचे येणे होत नाही, यैसे जाणून तूर्त च्यार हजार रुपये येथे द्यावे. बाकी दाहा पाचापावेतो बहादूरबिंडीयास द्यावे यैसा करार जाहाला. त्याजपैकी तीन हजार सेटिबाचे आमचे विचारे द्यावेसे जाहाले म्हणौन दिल्हे. आण येथून कुचाचा नगारा त्याणी व आम्ही केला. आमचे बुलगे राऊत पुढे येके मजलीवर गेले. याजकडे लोकांचा देणेकराचा दंगा जाहाला, त्याजमुले खानाचे राहाणे जाहालें. आम्हीं येथे राहून सेटिबा+ पुढे मजलीवर गेले. आज जेष्ट वद्ये चतुर्थीसहि याचे कुचाचा नगारा जाहाला. आजहि राहाणे जाहाले. लोकाचा दंगा कठिण. रुपया दिल्यासिवाई सोडीत नाही. यास्तव आज कोणास हती, कोणास घोडे, जवाहीर देऊन देऊन कजिया फारीक करीत आहेत. बाकी लोक कदीम आहेत ते समजले आहेत. पंचमीस कूच करून दर कूच बहादरबिंडीस जावें. तेथे तोफखाना वगैरे ठेवावे आण सडे पुणियास यावें यैसा करार जाहाला आहे. स्वामीचे पुण्येकडून घडावे यैसे आहे; परंतु हा चालला आहे. समई काये बुध होईल न कले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat writes to the Peshwa how Muzaffarkhan was being lured in their service by the French to fight against the English and how the writer foiled the attempts.*

No. 187] *[16-6-1756*

पौ छ २९ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

सेवक मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत सेवेसी विज्ञापना. ताा जेष्ट वद्ये चतुर्थी मो कनवेहाली नजीक सोंडून, (सोंडूर) स्वामीचे कृपादृष्टीकडून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. तुंगभद्रापार जाहाल्याचे वर्तमान सेवेसी लेहून पाठविलेच होते. त्याआलीकडे येथे येऊन येक मास जाहाला. जाहाली बातमी वरचेवर

+ शेटीबा खराडे होळकराचा सरदार मुज्फरखानाचे व्यवहारांत होता.

सेवेसी लेहून पाठवावी, त्यास जासूद जावयास पाई घेत नाही. मुरारराव घोरपडे यांची जोडी सावनुराहून येत होती ते तुंगभद्रे आलीकडे वाटेस लुटली (गेली). हे वर्तमान आपले जासुदाने यैकिले. त्याजमुले कोणी जावयास पाई न घेत, यास्तव बातमीस अंतर पडले. हाली सविस्तर आलाहिदा पत्री लिा आहे त्याजवरून विदित होईल. लस्करचे कूच होऊन येथून आज दोन रोज गर्गेवर मुकाम केला. आम्ही सडे दाहा राऊत ठेऊन घेऊन राहिलो आहो. मुजफरखान यासी घेऊन उदयेक पंचमीस येथून कूच करून दर मजल बहादरबिंडियास पोहचतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. रा विसाजी बाबूराव याची रवा(न)गी स्वामीने केली. ते येथे येऊन सुध सप्तमीस दाखल जाहाले. जासूद जोडया आम्हाजवल आहेत, त्या याचे जवल ठेऊन यावे म्हणौन स्वामीची आज्ञा. त्याजवरून जासुदास ठेवीत होतो; परंतु राहात नाहीं. चहू महिनायाची तलब आपली येणे ते द्यावी म्हणौन आड घातला. येक महिना रोजमरा देतो, राहाणे म्हणून म्हणत असता राहिले नाही. तूर्त याजवल दोन जोड्या आहेत. आणखी तीन जोड्या हुजूरने पाठवणार धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Mukund Shripat informs the Peshwa that the army has encamped near Garga, and that Visaji Baburao has reached there. He also writes that he could not dispatch letters earlier as no mail-runners could undertake the journey owing to disturbance on the road.

No. 188] *[16-6-1756*

३

पौ छ २९ रमजान

श्री

सेवेसी विज्ञापना. मुजफरखान यास रुपया देऊन आणावा हे स्वामीची आज्ञा नवती; परंतु रुपया दिल्यावाचून येणे घडत नाही, हे जाणून व हे दुसरेयाचे पदरी गेल्याने मनसबा उतम नाही, हे जाणून रुपये दिल्हे. पुढे बाहादरबिंडयास गेल्यावर दाहा हजार पावेतो द्यावे यैसा करार केला आहे; परंतु तोफा नव वगैरा भारबारदारी किलियास ठेवावी, आण सडे पुणियास जावे यैसे बोलोन ठीक केले आहे. तोफा तेथ ठेविल्या आण रुपया दिल्यास चिंता नाही, यैसी स्वामीची मर्जी असल तर तैसीच जलदीने पत्री आज्ञा करावी. आठ च्यार रोज यांस आणखी पैसा देत नाही. घोलीत घोली आणितो. इतकियात स्वामीचे आज्ञापत्र सादर केल्याप्रा वर्तणूक होईल. महमद अलीखान य॑जकडील राजकारण यास आले होते; परंतु हे कबूल करीत नाही. पेशजी फुलचरीकराचे चाकर

होऊन त्याचे बापास[+] लडाईत मारिले, त्याजमुळें त्याचा याचा पेच आहे. हे चितात आणून मान्ये केले नाही. याउपर स्वामींचे पायांजवल यावें. तख्त पादाबुद म्हणावे धणी चिताप्रा ऊर्जित करितीलच. हे न व्हे तर खर्चाची बेगमी करून ज्याहाजावरून मकेस रवाना करावे म्हणोन म्हणावें. यैसा यास बोध करीत आहो. सदरहूप्रा तुम्ही म्हटल्यास धणी थोर आहेत. मकेस रवाना करणार नाही. पहिल्यापेक्षा उर्जित आधिक होईल. तुम्ही मर्द उमदे माणोस हे धणियास कलले. याउ(पर) दुसरा अर्थ चिती न आणावा; हर कोठून राजकारणे तुम्हास आली असिली तरी ते सिधीस जाणे कठिण आहे. याचा विचार तुम्ही पाहाणें. त्याजवरून खानहि बोलिले की, हें खरेच आहे. दिलीपासोन रामेस्वरपावेतो लिहिली गेली आहेत की, मुजफरखान यास कोणी न ठेवणे. उतम यातच लौकिक आपला आहे. आपण या उपर कोणाची चाकरी करावी! जरकरितां नानासोहेबी आपली फकिरी उतरोन उर्जित केले तर उतम. नाही तर फकिरीच सही आहे म्हणूनहि बोलिले. सुमीरसिंग, सिदी मसूद व महमद अलम याणी सरकारात चाकरीस यैसा करार केला आहे. त्याचे येणे पुणियास होई व आणखी लोक याजवलून फुटत ते करणें म्हणोन पेशजीचे पत्री आज्ञा. त्याजवरून ते हातीं घेऊन यांस सला पुणियास जावे म्हणौन देवऊन घेऊन येत आहो. जरकरिता हें पुणियास न येत तर आपण जमावसुधा पुणियास येतो म्हणौन करार केला आहे. सिदी मसूद तो तुंगभद्रेच्या तलावरून निघोन बहादरबिंड्यास सेभर लोकसुधां गेले. सेभर बंदुखा, च्यार घोडीं, खानाची घेऊन गेलें. ते पुणियास पावलेंच असतील. आणखी फोडाफोडीचे तलाशात आहोच. याची जितकी सिबंदी कमी जाहाली तितकी कार्याची आहे, हे जाणून तलाशात आहेत. सेवेसी श्रृत होई हे विज्ञापना.

¶*The writer describes his efforts to persuade Muzaffarkhan, the artillery expert trained by Bussy, to join the Peshwa's service. The letter illustrates the Peshwa's anxiety to secure the service of trained gunners, Sumersing being one of them.*

No. 189] [*30-6-1756*

पौ छ ३ सवाल.

श्री

सेवेसी मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना. छ १ सवाल मुा दरुर कृष्णातीर सेवकाचे व पागेचे वर्तमान येथास्थित असे विशेष. सोंडूरचे मुकामींहून राजश्री मुरारराव घोरपडे याजकडील मजकूर व मुजफरखान याचा भावगर्भ वीस पंचवीस हजार रुपये बाहदूरबांडियास गेल्यावर द्यावे, तूर्त तीन हजार रुपये दिल्हे, आण

+ अन्वरुद्दीखान.

मशारनिलेस पुणियास घेऊन यावें याप्रो करार राजश्री सेटीबाचे आमचे विचारें जाहला हे वर्तमान तपसीलवार सेवेसी जासूदजोडी समागमें लेहून पाठविलें होते, त्याजवरून विदित जाहालेच असल. आलीकडील वर्तमान मुजफरखान याणी आम्ही समागमेंच निघावें यैसा करार होऊन सोंडूराहून कूच केले. आमचे बुनगे-फौज पुढे गेली. सडेच दोन प्रहर पावेतों राहिलो. लोकाचा तलबेचा दंगा बहुत जाहाला त्याजमुळे ते दिवसी राहणें जाहले. तुंगभद्रेस नवें पाणी येत हे वर्तमान यैकोन सेटीबा फौजसुधा तुंगभद्रापार जाहले. आम्ही दाहा राउतानसी खानाजवळ राहिलो. त्यास पाच दिवस कुचाचे नगारे होतच होते. लोकांचा दंगा नित्य पडतच होता. त्याजवरून लोकासी कितेक गोष्टी बोलोन सोंडुराहून कूच करून दोन मजली नारायेण किरें तुंगभद्रानजीक येथे खानास घेऊन आलो. तेथून कूच करून नदीपार व्हावे तो लोकानी तलबेचा दंगा केला, म्हणू लागले की आपली तलब नदी आलीकडे देणे, आण पार होणे. म्हणोन कजिया बहुतच जाहला. लोक न समजत तेव्हा खानाने मजकूर केला की लोक कजियास आले याची तलब पावणा लाख रुपये तूर्त द्यावें लागतात. यासिवाई आपली सुटका होत नाही. आपला बेटा व भाचा व गोविंदराव दिवाण त्रिवर्ग तुमचे समागमें देतों. बाहदरबिंडियास नेऊन ठेवावें, आण सदरहू पावणा लाख रुपये घेऊन यावें. लोकाची समाजावीस तुम्ही आम्ही करावी आण नदीपार व्हावें. याप्रो मजकूर आम्हासी केल्यावर जाबसाल जैसे करावयाच तैस धणियाचे मर्जीनरूप केले. रुपया दिल्यावाचून येणें घडत नाही, हे पुर्तें जाणून त्यासी जाबसाल केला की नदीपार जातो. सेटिबा आम्ही बोलोन त्याचा विचार लेहून पाठवितो. यैसे विचारें बोलोन आपला हात तीन हजारास गुंतला होता तो उरकोन घेऊन आपले लस्करात नदीपार आलो. सेटिबाची भेट जाहली. पावणा लाख रुपये धणियाचे आज्ञासिवाई कैसे कबूल करावे हा दिसता अर्थ जाणून खानास पत्रें लेहून पाठविलीं कीं रुपयावर नजर न धरावी. धणियाचे आदरावर दृष्ट देऊन स्वार होऊन यावें. पेशजीच कराराबमोजीब यैवज पदरी पडल म्हणोन कितेक ममतेच आदर्श दर्शऊन लेहून पाठविले. दोन मुकामें बाहदरबिंडियासहि केली; परंतु येणें त्याचे जाहले नाही. आम्हा उभयेतास पत्रें आली ती बजिनस सेवेसी पाठविली आहेत त्याजवरोन विदित होईल. खानाच कूच होऊन आदवानीच्या रोखे चालिलें त्याजवरून आम्हीहि दरकूच येथे आलो. आदवानीचें रोखे चालिले तेव्हा सलाबतजंग याजकडेच चालिले यैसे दिसे ते विदित व्हावे.

¶*Mukund Shripat from the banks of the Krishna writes to the Peshwa of his failure to pacify Muzaffarkhan's troops and in consequence of his having left the latter's camp.*

4009

No. 190] [21-7-1757

श्री

श्रीमंत राजश्री बळवंत
राऊजी स्वामीचे सेवेसी

पोष्य राघो बावाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील ता। श्रावण शुध पंचमी मुकाम चंद्रापटण येथास्थित असे विशेष. राजश्री कृष्णराव तमाजी हे राजश्री जंगनाथराव श्रीनिवास दिवाण दिमंत रुस्तुम दीलखान बाहादर गाडदी यांचे मेहुणे. मारनिले यांचे घर आजपर्यंत कसबे बेंगरूळ येथे आहे, सांप्रत हुसकोटे सरकारांत सर जाहाले. यैशास बेंगरूळ हुंसकोटयाहून साहा कोसावर आहे, यामुळे लस्करचा उपसर्ग लागतो. सबब मारनिले कुटुंब सहवर्तमान हुंसकोटयास येऊन राहणार. तरी किल्यांत येखादे घर जागा यांस अनुकूल करून देवावा. हे पदरचे आहेत यांचे हरयेकविसी साहित्य केलें पाहिजे. राजश्री जगनाथराऊ यांचें वर्तमान तरी मुजफरखान व आलीखान हे उभयेता फुलचरीस फिरंगी याजकडे होते; त्यासमई मारनिले तेथं उभयेतापासी होते. उपरांत रामदासपंताचे कारकीर्दीस मुसा भुसीजवळ पांच हजार गाडदी यांचे तालुकेयास होते. मातबर शाहाणा चौकस ग्रहस्त; परंतु ते मनवंतर अवघे गेले यामुळे येंदा श्रीमंत सिरेयांस असतां त्यांचे भेटीचे उदेशें आले परंतु गांठ पडली नाहीं. स्वामीचे दर्शन व्हावें तेहि गोस्ट घडोन न आली. याकारितां येथे चंद्ररायेपटणी आलीखान याणीं आपणाजवळ ब्राम्हण कोणी मातबर नाहीं याकरितां घेऊन आले आहेत; परंतु त्याचे चिती कीं स्वामीजवळ असावें, सेवाकरून स्वामीपासून उर्जित करून घ्यावें यैसे आहे. स्वामीनी कृपा केलियास समीप आहेत. भेटीनंतर सविस्तर सेवेसी श्रुत होईल. सेवकाचें वर्तमान तरी आपण वरात बिदनुरचे यैवजीं देविली ते ता। श्रावण सुध दशमी पावेतों पैसा नाहीं. सतरासे अठरासे फौज व गाडदी वगैरे सोलासे माणूस तीस हजार आपण कर्ज घेऊन दिल्हे. पटणीहून दुहत्राचे व्याजे दाहा हजार रुपये आणिले. इतके जाले तरी रमजानचा रोजमरा गाडदी यांस नाहीं. साबानचा रोजमरा दिला. हालीं राऊतांस व सर्वांस पोटास नाहीं, यैसें संकट आहे. मुलखांत प्रजन्य नाहीं यामुले पेराहि नाहीं; यैसे वर्तमान आहे. आपण धणी आहेत. भेट होईल तो सुदिन, यैसा प्रसंग आहे हे विनंती.

¶*Ragho Babaji wites to Balvantrao Mehendale, recommending Krishnarao Tamaji to his attention and requesting a residence for him in the fort of Hoskota. The writer gives antecedents of Krishnarao.*

4010

No. 191] [*Recd. 26-8-1756*

पाा छ २९ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामी

साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक साा नमस्कार विज्ञापणा यैसीजे. मडकसिरियाहून हती व राजश्री भाणाजीपंत येथे आले. सरकारचे सावनूरचे हवालेचे रुाये पनास हजार याचे हती द्यावेसे करार, त्याजवरून हती च्यार अनिले व आनीकहि हती आनावयास मनुश्ये गेली आहे. येथून राजश्री सेटियाजी खराडे व नागोजी श्रीनिवास वकील यासमागमे लाख रुा भरणा व जवाहीर हती सोने पाठविले, त्यास तेथे तोटा होतो म्हणोन राव बोलिलें. आम्हास सांगितले जे सावनूरचेमुले खराबी जाली असताना संकट पडले म्हणोन हवाला घेतला. त्यास कसे तरी करून निर्गम करून द्यावे हे तो येथे काही ताकत राहिली नाही. दांगियामुले श्रीकुंवरस्वामीच्या दरशनास जावयास फावत नाही यैसा लोकाचा दंगा. राहिले पनास हजार रुा याचे हती पाठवितो म्हणोन बोलिले. कुडतनीस याचे ठाणे होते तेथे वाडा मातबर बांधितात. इनसखा बलारी व आनेगोंदीस जात आहे. रायास रुबरू सांगितले जे आनेगोंदीस उपद्रव न द्यावा, ते स्थल पहिले आपल्या राज्याचे आहे. राव म्हणतात जे तेथील दळवीचा अधिकार आम्हास आहे, नेहमी घेतो त्याप्रमाने घ्यावेसे म्हणतात. आदीक घेत नाही. तेथील वकीलहि आले आहेत. चित्रदुर्गाकडे याची बाकी राहिली होती, त्यापैकी यास दुर्गकरानी दाहा हजार रुा पाठविले. सिरियाहून दिलावरखान याही पत्र लिहिले ते बजिनस व स्वामीचे पत्र रायानी आम्हास दोनी पत्रें दाखविली. त्यात भाव लिहिला आहे, जे सिरे प्रांतीची चौथाई व सरदेशमुखीचा अमल राजश्री नरसिंगराव केशव वकील पाठविले याचे विद्येमाने करून देणे म्हणोन लिहिले होते. पत्रे वाचोन पाहिलियावर आम्हास व मल्हारपंत चिटनीस यास बोलाऊन येकांती च्यार घटिका बोलत होते जे उभयेता मिलोन दरमियाने मल्हारजी होलकर याही आभिमान धरून दौलतीचा व फौजेचा व गड किले वगैरे बंदोबस्त करून द्यावा, त्यास सा हजार फौजेचा सरंजाम अठरालक्ष रुा कैसे पुरतात. त्यास पंचवीस लक्ष बोलिले, परंतु करार जाले नाहीत. पुढे पुनियास यावे यैसा करार-मदार जालियावर, चहूकडून पत्रे येतात. दिलावरखान म्हणजे आम्हास ठाऊक आहे. त्याही परिछिन यैसे लिहिले. यावरून कैसे यावे? नदीपलीकडे आपण

बंदोबस्ती केली. नदी आलीकडे यैसी पत्रे येतात. यास आम्हास कोठे ठिकाण नाहीसे दिसते, त्यावरून आमचे जागा ममता नाही. पुनियास येऊन आपण सांगितले तैसेच वर्तावे तरच मरजी राहती. इतके चितात दिसोन (अपूर्ण).

¶*Visaji Baburao reports news about Murarrao Ghorpade.*

No. 192] [*17-8-1757*

श्रीसुबराज

राजश्री बलवंतराव

गोसांवी यांसी

सकलगुणालकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. राजश्री सुबराव श्रीनिवास चिटणीस व राजश्री विसाजी बाबूराव आले. यासमागमे पत्र व यादी व मुक्रा(?) सांगोन पाठविल्यावरून सकल भावार्थ विदित होऊन परम समाधान पावलो. आमच्या कसालियाकरितां आपणास लेहून व उभयेताबाा सांगून पाठविल्यावर आपण वोढीत वोढ करून तूर्त पंधरा हजार रुा सिरेवर राजश्री लक्ष्मणपंत व यादवराव याकडे देविले. दाहा हजार रुा महिनेचे वाईदेने लस्करात देऊं केले तेहि पावतील. सिरेसहि कारकून स्वार पाठऊन पैके आणविले आहे व येतील. आम्ही लिहिलियास खाली न केले हेंच आम्हास समाधान वाटले. आम्हावरील कसाला परस्परे ऐकण्यात येत असेल. या दौलतेचा व आमचा भार आपणावर मध्यस्थीस बसो दिला आहे. राजश्री पंतप्रधान व राजश्री भाऊ यास कोणे प्रकारे लेहून पाठवावे त्याप्राा लेहून व सांगोन पाठऊन पोख्ता सरंजाम होऊन येई ते करावे. त्याच्या आगमनानंतर चितानरूप समर्पक करावे. गुती प्रांते आपले आगमन कधी होणार, आमची फौज कधी पाठवावी हे लिहिले पाहिजे; तदनरूप पाठऊ. गुती लगते ठाणी घेऊन याचे जिमे करावी, रतनगिरीकराविसी राजश्री विसाजी बाबूराव यास पत्र लक्ष्मणरायानी पाठविले होते ते बजिनस पाठविले आहे. त्यास व संस्थानिकास बरजोर ताकीद पाठऊन पाच गावची ठाणी दुमाला होत ते करावे. न होत तर आपले आगमन जालियावर आपण ठाणी घेऊन द्याल हे निशाच आहे. इकडोन करार केल्यास इतर विचार काये आहे? वरकड अर्थ राजश्री मल्हारराव रघुनाथ यास लिहिला आहे, हे सांगतील

व राजश्री विसाजी बाबूराव लिहितील त्यावरून कलेल. सर्वदा पत्र पाठऊन परामर्ष करीत जाणे. सांप्रत आपला मुकाम कोठे आहे? कडपेकरावर शा दिल्यास काये मजकूर घडला ते लिहीत जावे. मल्हारराव तो लिहितील. आपण च्यार रोजा येक जोडी पत्रे देऊन पाठवीत जावी. रा। छ १ माहे जिल्हेज आमचा भार आपणावर; उचित ते करीत जाव. वरचेवर मनसबा कळवाल हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade acknowledges the receipt of money from Balwantrao Mehendale for the expenditure on his troops and requests him to settle the matter with the Peshwa and Sadashivrao Bhau regarding the grant of a saranjam for the maintenance of his troops.*

No. 193] [*6-9-1757*

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब व तथा राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी. आज्ञाधारक विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २९ जिल्हेज पावेतो मुकाम मोजे तवलंद नजीक पा। दुबल स्वामीच्या कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. सांप्रत लस्कर कडप्याच्या सरदेस आहे. आटा चौ दिवसांत स्वामीच्या प्रतापेकरून कडप्याचा गुंता उरकून घेऊन पुढे पटणकराची मुदत जाहली आहे व चित्रदुर्ग व बिदनूर वगैरे तिकडील संस्थानाच्या खंडण्या करावयाच्या आहेत, त्याजकरिता आटाचो रोजात इकडील गुंता उरकून त्या प्रांती जाऊ. पुढे वर्तमान होईल ते सविस्तर सेवेसी लिहून पाठवूं. वरकड राजश्री बलवंतराव याणी सेवेसी लिहीत आहे त्यावरून श्रुत होईल. दल+वई देवराज यावयाचे वर्तमान आले आहे. ते आले तरी थोडाबहुत निकाल होईल. ते येत नाहीत तरी पहिली ठाणी आहेत ती आहेत. आणखी मुल्क बांधोन घेणे लागेल. नंदराज यांच्याने तो पेकियाचा निर्वाह होत नाही हे परिछिन समजले आहे. तेच दोलतेस बेजार आहेत. चित्रदुर्गकरानी तो फारच ताल टाकिला आहे व बिदनुरी स्त्रीनाइकी बहुनाइकी जाली आहे. वीरमांजीने बसवलिंगापास दूर केलें. सिवलिंगापास सर्वाधिकार दिल्हे आहे व राजेहि ठिकाणी लागले. दुसरे बंकापुरच्या सेख्याचे मूल आणून सरकारचे

+ येथून अक्षर निराळें.

आज्ञेविरहित त्यास येथेहि न कलता राजी बसविले आहे. बंकापुरचा सेव्या विरमाजीचा मामा, त्याचा लेक साता वरसाचा आहे. त्याचे नांव सोमशेखर नाईक ठेविले आहे म्हणोन वर्तमान आले आहे. गतवर्षी देववर (?) या ठिकाणी लागले तेव्हां कोणी काही पुसले नाही, याजमुळें या प्रकारे घडत आले आहे, त्यास प्रस्तुत त्या प्रांते जावून त्यास बरेवजीने दबवून काम केलियास सरकार किफायेतच आहे, व चित्रदुर्गचेहि पारपत्य जरूर जाले पाहिजे. याजकरिता इकडील गुंता उरकला म्हणजे तिकडे जाण्याचा विचार केला आहे. स्वामीची आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक करूं. राजश्री बाळाजीपंत व नरसापा नाईक व रामापा नाईक सुभेदार येथे लस्करात येवून पावले. पेकाहि त्याजकडील बहुतेक वहिद्याप्रा[१] जाला. विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Krishna Binivale writes to the Peshwa details of the situation at Kadappa, Seringapatam and Bednur. The revolution at the Court of Bednur is also explained.*

No. 194] [*9-9-1757*

श्री

गंगाजलनिर्मल वीरमाजी सवस्थान बिदरूर यासी

श्नो बलवंतराव गण(पत) आशीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेहवीत जाणें विशेष. आलीकडे पत्र येऊन वर्तमान कलेत नाही तरी सविस्तर लिहिणें. चेनबसवापा नाईक राजे यास देवाज्ञा जाहाली आणि तुम्ही पटणसेट बंकापूरकर यांच्या पुत्रास राजी बसविलें हे वर्तमान परस्पर यैकिलें परतु तुम्ही लिहिलें नाहीं यावरून अपूर्व भासलें. राज्यास कोण्ही दायाज गोत्रज नाहीं, यैसे असोन श्रीमंतास विदित न करितां मदचेमध्यें सवस्थानी बखेडा करून नवा राजा केला हे गोष्ट उतम न केली. व बसवलिंगापाकडे कारभार होता. सबब त्याणे सरकारच्या यैवजाचा हवाला घेतला व कारभारामुले कबूल केला. त्यास त्याचा कारभार काढिला, याकरिता त्या यैवजाचा निकाल पत्रदर्शनी करून देणें व साल माारचे खंडणीचा निर्गम फौज दूर या प्रांते आहे तोच केलिया मुलकाचा बच्याव होईल व सवस्थान कुशल

---

१ वायद्याप्रो.

राहील. येत्रिशीचा अर्थ राजश्री रामापाजवल सांगितला आहे. हे लिहितील त्याप्रो निर्गमात आणून देणे. विलंब लागला म्हणजे तिकडे फौजा येऊन मुलकाची खराबी होईल. हे दुरंदेशीने चितांत आणून सत्वर गुता उरके ते गोष्ट करणें. गुदस्तां ज्याप्रो निकालांत आणून मुलकाचें संरक्षण करून घेतलें तैसे येंदाहि फौज न येतां निकाल पडल्यास उतमच आहे. इकडील अरकाट वगैरे सवस्थानच्या खंडण्या घेऊन गुंते उरकले. याउपरी त्या प्रांतेच येत असो. रा छ २४ जिल्हेज.

¶*Balavantrao Ganapat Mehendale writes a strong reprimand to the Dowager queen of Bednur calling upon her to pay the stipulated tribute without loss of time.*

No. 195] [*17-9-1757*

श्रीसुबाराज

राजश्री बलवंतराव गोसावी यासी.

॥ सकलगुणालकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत असिले पाहिजे विशेष. होसूरची जकायेत व बाकीसाठी पेसजी राजश्री वेंकटराव नरहरि याजसमागमे आपणास पत्रे लेहून पाठविल. यास आपण होसूरच्या अमलदारास ताकीदपत्रे पाठविली. त्यास तो ग्रहस्त जकायेतीचा अमल सुरलीत चालवीत नाही. सांप्रत अमलदार आपणाकडे आले आहेत; तरी आपण आमलदारास सांगोन जकायेतीचा अमल सुरक्षित चालेस करवणे. सांप्रत वेंकटराव नरहरीस आपणाकडे पाठविले आहे. अमलदारास ताकीद करून सुधामद चाले ते गोष्टी करवणे. वरकड आर्थ [शिक्का] राजश्री मल्हारराव रघुनाथ यास लिहिले आसे. सांगता कलेल. सर्वदा पत्र पाठऊन तोशवीत जाणे. रा छ २ मोहरम समरपक कराल हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade requests Balwantrao to issue orders to the officers at Hosur to pay off the octroi duties.*

No. 196] [2-10-1757

श्रीसुबराज

राजश्री बलवंतराव

गोसावी यासी.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष. हरकारे व बाणदार च्यार जोडिया-बरोबर पत्र सविस्तर लेहून पाठविले आहे ते पाऊन वर्तमान कलले असेल. आपले आगमन कडपियास होऊन तेथील बंदोबस्त व कर्तव्यार्थ करणे तोहि घडोन येईल. आपण चिती धरिलेवरी कोणते अगाध आहे ? लगते ठाणियाचा करारमदार जाल्याप्राा आपणहि घेऊन द्यावयाचे वचन दिल्हे आहे. त्यास फौज पाठविल्या मुलुक खराब होईल यास्तव आपल्याकडील फौज काही व आम्हाकडील काही व बार तोफा देऊन पाठऊन राजश्री विसाजी बाबूराव यांस रवाना करून गुती लगती ठाणी घेऊन द्यावी. आपले वचन सत्य करावे, येविसींचा अर्थ राजश्री त्रिवर्ग व मलोबा व विसाजी बाबूराव यास स्वदस्तुरे लिा आहे. हे सांगतील तदनुरूप फौज बार तोफा विसाजी बाबूराव आम्हाकडील कोणी येतील त्यांसह पाठऊन गुतीलगती ठाणी हस्तगत करून देऊन गुतीवालेची रसीद येऊन पावे ते करावे. रतनगिरीच्या पाच खेडियाच्या मजकुरास वेाा बापूभट माहुलीकर यास पाठविलें आहे ते पाऊन सविस्तर कलले असेल. रतन-गिरीकराचा वकील आला असलिया त्यास ताकीद करून त्यास व संस्छानिकास पत्र व पंचेवीस स्वार देऊन पाठविल्या आम्ही पाठवणारास पाठऊन त्याची दारकोंड करून ठाणी घेतली जातील. लिा प्राा बापूभटाची रवानगी करावी. टेंगिलभीचे (?) व निंबालकर व करोल इत्यादि येथें राहिलेली फौजेची मनोती करून सिध करून आपले पत्राचा मार्ग पाहात आहो. फौज पाठवणे म्हणून आपले पत्र सीघ्र पाटऊन देणे ते क्षणीं फौज रवाना करून पाठवीत आहो. कुठाकोली तोफ व नगारा आहे, घेऊन जाणे, म्हणून राजश्री विसाजी बाबूराव यानी लिा होते. तेथील ठाणेदारास परभारे पत्र व आम्हाकडे येक पत्र व आम्हास पत्र पाठविलियां आणऊन घेऊ म्हणून लिहिले होते. उतर आले नाही तेहि उतर काये ते पाठवावे. आमचा व दौलतेचा भार व मध्यस्ती आपणावर आहे. उचित ते करावे. पेस्तर मनसबा व कर्तव्य काये ते वरचेवरी लिहून पाठवावे.

4016

लढाईमधें लोक व घोडी जखमी व जाया आहेत त्याचा व रोजमरियाचा परामृश करून व हाली फौज पाठऊन त्याचा परामृश करून चालवावे हा भार आपणावर आहे. रा छ १७ मोहरम बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade requests Balwantrao to despatch a contingent to capture the villages in the neighbourhood of Gooty and to collect the revenue of Gooty. He also consents to send when so requested his own troops at any time.*

No. 197] [10-10-1757?

श्री

पुा राजश्री बलवंतराव गणपतस्वामी गोसावी यांसी.

विनंती उपरी. पटणकराकडील मजकूर बनाजी माधवराव लिहितात कीं दलवाई आणावयास गेले आहेत; ते आलियावरी निर्गम होऊन येईल. न होऊन येईल तरी मी काही झुंजत नाही. तुम्हाजवल येईन. संस्थान तुमचे, खातरेत येईल ते करावे असे म्हणता पैका नाही, मुदती टलून गेल्या. आमची ठाणी-ठुणी मजबूद आहेत म्हणोन विस्तारे लिहिले ते कलले. ऐशियास खासा स्वारी श्रीरंगपटणावर होती तेव्हां त्याणी मालियेत चुकऊन कालहरण केले. दिवस डोईवर आले हे मनात आणून पैका न दिल्हा, वोढले. आता मातबर फौज येईल तोपर्यंत वोढावे. ठाणीठुणी आहेत ती काही पैका दिल्हाखेरीज सुटत नाही. तेव्हाच पैका प्राप्त व्हावया येंदाचे साल घालवावे. यंदास जागा नाही असे प्रकारे मोगलाचे खंडणीचे देणियाचा प्रकार त्याणी आणिला आहे; आणि वकील तेथे आहे तो त्यास भरवसा आहे की कारभार नासणार नाही. यामुले हातपाई लाऊन गोडमात्र बोलतात. त्यास गोड बोलणे आमचे कामाचे काय? पैका म्हणावा तर नंजराजाचे घरी पैका काये उणा आहे? राज्याचे घरी काये उणा? हा प्रकार सर्व तुम्हास अवगत आहेत. विना * * * * * सालियाखेरीज ते मलमलीत सोडून सारा * * निकाल व पुढील बोली बोलतील असे काही केले पाहिजे. दलवाई येऊन निकाल करितील तर बरे. ते न येत हे गोड बोलतील तर ते कामाचे नाही. त्यास साफ सांगावे की मुदत टललियाउपरी मुलकात उपसर्ग लागेल. आता आम्ही वाट पाहात नाही. मग भारी पडेल असे सांगावे. आतील बाहेरील राजकारणे सर्व चालावी. मागे राजकारण करीत होता ते पहावे. दलवाईयाचे त्याचे न बनले तरी त्यासी राजकारण लाऊन

त्याजकडून तिकडून उपसर्ग करवावा. आपणहि इकडून करावा. त्यास श्रीरंगपटणात बसून राहाणे पडे अगदी हातपाय गुंडालेत याप्रकारे करावयाचा प्रकार वाटतो. तुम्ही तिकडील माहीतगरीने सत्वर सरकारचा पैका मागील येऊन पुढीलहि बोली होऊन पैका हाती लागे हा प्रकार करावयाचा विचार करणे. येविसी पेशजी सर्व लिहिले असे. वारंवार आंतील बाहेरील बातमी लिहीत जाणे म्हणोन तेथे बातमीवर आहेत त्यास ल्याहावे. हुजूर वर्तमान लिहीत जाणे. छ २९ मोहरम हे विनंती.

¶Balwantrao Mehendale is instructed to speed up the work of realising tribute from the Raja of Mysore giving him no quarter.

No. 198] *[10-10-1757*

श्री

पुा राजश्री बळवंतराव गणपत स्वामी गोसावी यांसी.

विनंती उपरी. तुम्ही कुटाकुळास बुनगेसुधा राहून सडिया फौजानसीं राजश्री सोनजी भापकर, इंद्रोजी कदम, व नरसिंगराव व विसाजी कृष्ण, हरबा बापू, भगवंतराव कदम यास सडे फौजेनसी कडपियास पाठविलें, तो वाटस खबर आली कीं अबदुल मजीदखान सिधोटास[1] गेले आहे. गंनीमिया व सीलिमखान आहेत. ते काही लाखाहून ज्याजती देत नाही, परंतु हेहि पळून गेले. त्याजवरून सरदारानी जाऊन मोर्चे दिल्हे; हे खबर अबुल मजीदखान यास अवगत होताच ते तेथून कडपियास यावयाकरितां आले. यास खबर कळून सारियानें विचार करून त्याजवर चालून गेले. ती कोसावर गाठ पडली. झुंज मातबर जाहाले. आपले लोकानीं फारच शर्त केली. खासियाने निकड करून मिठ्या घातल्या. अबुल मजीदखान यास गोळी लागून ठार जाहाले, फते जाहली; नव हाती सरकारात सापडले; हरबानी खासियाचा हती आणला. खासे खासे सरदार थोड थोडे जखमी आहेत; संभाजी घोरपडे यास मात्र जखम भारी लागून ठार जाहले. वरकड सर्वहि क्षेम आहेत. तेथून कडपियास आले. येथील प्यादियानें कोल घेतला. ठाणे बसले. ठाणियात हती सात सापडले. पैका नाहीं. तोफा च्यार पांच चांगल्या मातबर आहेत. गनुमिया व सीलिमखान करनोलास गेले. पुढें ते लबाडी करतील तर त्याचे हित कशात आहे ही खबर आलिया उपरी कडपियास जाऊन तेथील बंदोबस्त करू म्हणोन लिहिले ते कळले. ऐसियास कडपेवाले त्या प्रांतात फारच मातबर. जर पहिल्यापासून खबरदार

---

१ सिधोट कडप्यापासून सुमारे २० मैल.

असते तर तुम्हासहि अवघड पडते; परतु त्याणी ठाणे सोडून गेले आणि पुन्हा आले हेच करणे त्याचे हराष काळाचे; परतु तुम्ही मागे राहून सड्या फौजा पुढें पाठविल्या हे काम केले, फार उत्तम गोष्ट. फौजेचे राहणियाचे व तुमचे कराणियाचे यागोष्टीने सार्थक जाहले. याउपरी सर्व लोकांचे उत्तम प्रकारे समाधान करणे. ज्याणी ज्याणी कामकाजे केली असत त्यासहि उमेदवार करणे. सर्वा सरदारांस पत्रे नावनिसीवार पाठविली आहेत व डौलेंहि दहा पाठविली आहेत. ज्यास देणे असतील त्याची नावें भरून त्यास देणें. याउपरी पुढें मनसुबा कोणता करणार काय विचार तो सविस्तर लिहिणे. +कडपे प्रांत मोठा आहे. येवढें यश आल्यासारखें मुलुक हाती लागून बंदोबस्त होऊन येई ते जरूर करणे. च्यार दिवस अधिक लागले तर लाऊन बदोबस्त करून, मग आदोनीचा बंदोबस्त अमलाचा रगडून करून, बलारी आली तर घेऊन चित्रदुर्गचे पारपत्यास येणे. तुम्ही समयोचि (त) समजून फार चांगले करितां. मग विस्तार काय लिहिणे ? छ २९ मोहरम हे विनंती.

¶Peshwa Nanasaheb to Balawantrao Mehendale at Kadappa, heartily congratulating the latter on his victory over Nawab Abdul Majid Khan, who was killed in action with the Marathas (24th September 1757). Congratulations are also extended to all those who made special exertions in the fight.

No. 199] *[21-10-1757?*

श्री

पुा राजश्री बलवंतराव गणपत स्वामी

गोसावी यासी

विनंती उपरी.

हती सात, पंधरा सवा पंधरा हजारास घेतले म्हणोन लिहिले ते कळले. यैशियास अमृतराव गेले तिकडे हता कडूर, बाणावर नागमंगल ह्या दोन्ही पद्या मिलोन दीडमाही दीड पाव (णे) दोन लाख रुपये लागतात.

\+ येथून अक्षर खुद्द नानासाहेबाचें.

फारच स्वस्थ आहेतसे दिसते. घेतले ते बरे केले त्यास आम्हास स्वारीलायक अंबारीजोगे चागले चालणार बेऐयब असे च्यार हती जरूर पाठवणे. बालाचे रिशेचा येक दुसरा छावा चांगला मिलाला तर जरूर पाठवणे.

गाडदी तिकडील आपल्यापेक्षां चांगले कमसेरीयाचे पडतात यामुले आम्ही ठेवितो; व आपले या सेरियावरी आणून येतील त्यास निरोपहि देऊ म्हणोन विस्तार लिहिला; तर उतम आहे. सरकार कामाची गोष्ट असे; बरीच आहे. हुजूरहि असे गाडदी ठेऊन येथीलही सेरा बिघडला असेल तो नीट करीत करीत करावा लागेल. तुम्ही तेथे केले, येथील गाडदी यास दबवावयास गाडदी या सेरीयाचे आणले म्हणजे करावयास येईल. कमसेरा परंतु चांगले गाडदी मिलाले तर ठेऊन, त्यास ठाण्यास पाठऊन तेथे आहेत ते तुम्ही आपले जवल आणने. गंगाधर राघो बापूजी खासे तेथेच असले पाहिजेत.

अमृतराव शंकर याची पत्रे तुम्हास आली तीच पाठविली, त्याजवरून सर्व कललें. तिकडील प्रकार माहितगारीने करणे तो तुम्ही करावा, लिहित जावा. येथून विशेष लिहिणे ते लेहून पाठऊ.

छ ७ सफर हे विनंती.

इतके दिवस आम्ही जवल होतो तो हर कसे चालविले. या उपरी आम्हास लाब जाणे आणि खर्च चालला पाहिजे. लांब मुलुकगिरीस जाऊन याचा खर्चहि चालवावा हे कसे बनेल, याविसीची आज्ञा व तरतूद काये कसी ते करावी म्हणोन लिहिले ते कलले. या गोष्टीस इलाज नाहीं. जरूर यैवज तुम्हास तो दिल्हाच पाहिजे.

ठाणीं फौज कमाविसदार वकील कोण कसा वर्ततो हे चवकसी करून फेर मोबदला केलिया तुम्हावर यख्तियारच आहे. ज्यात सरकार किफायेत, स्थलाची मजबुदी, जेथे जे दृष्टीस उपयोगी दिसेल ते करणे. दूर पथ हुजूरचे आज्ञेचा उजूर धरीत न जाणे.

¶*The purchase of elephants, the enrolment of Guards at a lower scale and the administration of Kadur, Banavar and Naglamal are some of the duties entrusted in this letter to Balvantrao Ganpat Mehendale, probably by Sadashivrao Bhau.*

4020

No. 200] [21-10-1757

श्री

पुा राजश्री बलवंतराव गणपत स्वामी गोसावी
यासी

विनंती उपरी. कडपेकराचे पारपत्य केले. ही सिकार अवचित न व्हावयाची झाली. येश कीर्त आणि त्या प्रांती शत्रू आहेत त्याजवर विशेष दबाव की याचे पारपत्य नवाबास न जाहले. मातबर फौजा मागे जात होत्या; परंतु न घडले ते ईश्वर घडविले. त्यास याचा बाहेरहि दबाव, याचे प्रकारास वजन फार वाढले. यामुले सर्वावर दबावाने कामे करावीच व (क)रालच. त्यास मुख्यत्वे पाहाता विसा लाखाचा मुलुक त्याचा खाली होणे, मातबर किले ठाणी जिवट जागे त्याजकडेच आहे. ते हाती लागल्याखेरीज हे जाहले तर आपले उपयोगी किती ते पाहणे, जरूर पाहिजे की दोन तीन जागे मातब्र राजकारणाने या जबरदस्तीने घ्यावे, सारा मुलुक निर्वेध करावा; नाही तर दाहा बाराचा तऱ्ही क्षेपनिक्षेप सोडवावा, दोन तीन जिवट जागे हाताखाली घालावे, तरीच हे केले ते पायासुध चांगले जाहले असे होईल. नाही तर काही उपयोग ? जितके मेलविले येश त्या अनुरूप सरकार किफायेतीचा नाही असा प्रकार आहे. याची तजवीज तुम्ही केलीच असेल; तर काये केली ते लिहिणे. पुढे काय करणार ते लिहिणे. +कडपे प्रांत मोठा, लाहान मोठे पालेगार बहुत. अमल बसणे व प्रत्येक तालुके माफक खंडणी घेणे. यश मिलाल्याचे सार्थक संसाराचे रितीने मुलुक हाती लागावा. अमल बसावा हे काम करावयास बहुत दिवस लागतील. जे होईसे असेल ते करावे. मोगलासी आम्हासी कलह वाढला तर गदवाल कर्णाल प्रांती असावे. बहुता प्रकारे कलह वाढणार नाही. मग तुम्ही आदवानीस निमे अमल चांगला माणूस मल्हार नाईकाचे दिमतीची म्हणून करून ठेऊन अमल बसवावा. मागील बाकी वसूल करावी. तदोतर बलारी जरूर येईसी दिसली तर घ्यावी. मग चित्रदुर्गास जावे. इतके होय तो तीन महिने पाहिजेत. इतक्यात मोगलाचा कजिया वारेल. गोपालराव मल्हार नाईक येतील. सर्वांनी मिलोन येक काम माघ फाल्गुनात दोन महिने झुंझून करावेच करावे. सारांश कडपे अदोनी प्रांती अमल बसविता उसीर लागेल. अमल बसवावयास फौज ठेवावी लागते, थोडे फौजेने काम होत नाही. फार ठेवावी तर आधीच फौज थोडी, ठेवावी कोठे, किती, हे कलतच आहे. यास्तव तालुके माफक जेथे जसी साधेल

+ एथून अक्षर पेशव्याचें.

तैसी खंडणी रोख घ्यावी हाहि येक प्रकार आहे. तुम्हास नफा तोटा फार कलतां. ज्यात पैका आकारे सिबंदी लटकी आंगावर न पडे यैसे करालच. छ ७ सफर हे विनंती.

¶Balwantrao Ganpat Mehendale is congratulated by the Peshwa on his brilliant victory over the Nawab of Kadapa. Suggestions are made to him how he should proceed about the revenue settlement of the newly conquered territory.

No. 201] [*28-10-1757*

श्री

पुा राजश्री बलवंतराव स्वा-
मी गोसावी यासी

विनंती उपरी.

श्रीरंगपटणास नजराज दलवाई यास आणीत होते ते येत नाही. पैका हातास यावयाचे दिसत नाही. ठाणी-ठुणी सरकारचे लोकानी घेतली व पुढेहि त्यास दबावयाविसी विस्तारे लिहिले ते कलले. ऐशियास येविसी तुम्ही सर्व तेथील प्रकार व येथील लिहिणे ते वारंवार लिहीले असे. त्याजवरून तिकडील कर्तव्यार्थ करणे.

अरकाटचे रुपये आणावयास राऊत पाठविले आहेत. येतील. फरासी-साची नवी ज्याहाजे येऊन चेनपटणावर येतात, यामुले महमदआली व चेनपटणवाले फार घाबरे जाहाले. अमृतराव यास येऊ देत नाहीत. दोन हजार फौज पाठवा म्हणतात; परंतु आम्ही केवल येकपक्षी करावयाचा प्रकार घडणार नाही. याअन्वये त्यास लिहीले असे म्हणोन लिहीले ते कलले. उतम आहे.

बापू सरनाईकाचे घर बाबा सरनाईक उपसर्ग न करीत ते करावे म्हणोन. तरी मनास आणून वाजवी केले जाईल.

बीडची सरदेशमुखीची, राजश्री सोनजी भापकर याजकडे मामलियेत द्यावयाचा करार केला. ती द्यावी म्हणोन लिहिले ते कलले. ऐशियास

मोगलाची गडबड आहे. येंदा तो
मामल्याची रसद घेतली असे. पुढे
जे करणे ते केले जाईल. येविसी
पेशजीहि लिहिले असे

+बहुत काये लिहिणे रा छ २१ सफर हे विनंती.

¶Sadashivrao Bhau writes in answer to Balvantrao about Nandraj of Seringapatam, about the arrival of French ships and consequent terror it has created among the English and Muhammadali.

No. 202] *[11-11-1757*

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब व ता
राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी कृष्ण कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना. ता छ २८ सफर पावेतो मुकाम कडपे स्वामीच्या कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून छ २९ मोहरमचे आज्ञापत्र पाठविले ते पावोन मस्तकी वंदून सनाथ जालो. तेथे आज्ञा की श्रमसाहयास करून महदे येश मेळिवले. त्यास येश आल्यासारिखा पुढे तेथील बंदोबस्त उतम प्रकारे करावा म्हणोन आज्ञा. यैशास, येश येणे हा प्रताप स्वामीचा आहे. आम्ही सेवक लोक जी चाकरी येकनिष्टपणे करणे ते करीतच आहो. इकडील वर्तमान तरी कनोलकर वकील येथे आले. नवाबानी कितेक मायाममतेच्या गोष्टी सांगोन पाठविल्या होत्या; व कितेक हलाखी सांगोन सला करावा हेच त्याचे मानस आहे. त्यावरून येथून वकील कनोलास पा. त्यास सर्व करण्याचा प्रकार त्यास सांगोन पाठविले. त्यावरून कनोलास जाऊन तेथे बोलोन चालोन त्याजकडील वकील सखोपंत आपल्याकडील श्रीपतराव विठल फिरोन आले. राजश्री सोनजी भापकर याच्या विद्यमाने बोली होती. त्यास यैन सवा लक्ष व दरबारखर्च दाहा हजार व हती तिन व घोडा येक येणेप्रों करार केला. कनोलचा प्रकार पाहाता ते केवल फक्त पठाण, त्याच्या पदरी पैक्याचा प्रकार नाही, हे स्वामीस विदित आहे. त्यावरून येक हिसा यैन दोन हिसे जिनस कापड हाती घोडे वगैरे जिनस

+ पत्र भाऊसाहेबांचें.

घ्यावा, याप्रो महिन्यानें निशा करून द्यावी याप्रो करार करून कारभार उरकिला. वरकड इकडील संस्थानचे व पालेगराचे वकील आले आहेत. यास ज्या जागा फौज न पाठविता काम होणे ते करून घेतच आहो. फौज पाठवावी लागत्य येशास प्रस्तुत फौज पाठवावयास बनत नाही. इकडील शाह उरकल्यावर, तिकडे फौजा पाठऊन गुंता उरकून घेतो. वरकड फौजाचा अर्थ व पुढील कर्तव्याचा आर्थ रा। बलवंतराव याणी सेवेसी लिा। आहे त्यावरून विदित होईल. बिदरूरच्या प्रकाराविसी स्वामीनी आज्ञा केली होती. येशास पहिली स्वामीची मर्जी होती, त्या मर्जीपेक्षा संस्थानिकाकडे च्यार आन्याये त्याचे पदरी लाऊन त्याजपेक्षा आधिक च्यार गोष्टी सांगण्याच्या प्रकारे सांगितल्या, त्यावरून निदान बारा पावेतो खंडणी कबूल जाले होते. तेव्हा आम्ही त्यास म्हटल की बारा तो यैन खंडणी; परंतु राज्याची घालमेल केलीत, याजमुले नजर द्यावी, नजर दिल्याखो। खंडणी करीत नाही. त्यावरून रा। नरसापा नाईक व बालाजीपंत व रामापा सुभेदार बोलिले जे, नजर कबूल करणे ते येथे होत नाही. आम्ही बिदरुरास जाऊन जी नजर खंडणीपक्षा येक दोन तीन जे करार होतील ते करार करून लिा। पाठवितो. असे कबूल करून त्रिवर्गाची रवानगी बिदरुरास केली. त्याजकडील जाबसाल अद्याप आला नाही. इतके दिवस न यावयास कारणे मिर्जे म्हणोन त्याचे ठाणे सोधे बिदरूरच्या सरदेस आहे. तेथील सूत्र बालापुरास राजश्री नारायेणराव कृष्ण याजकडे आले. त्याणी हजार राऊत व काही प्यादे पाठविले, याजमुले प्रस्तुत त्या प्रांती दंगा आहे, यास्तव जाब यावयास विलंब लागला. पुढे जाबसाल लौकरच येईल. तिकडील जाबसाल काये येईल त्याप्रो सेवेसी लिहून पाठऊ. राजश्री बलवंतराव याच्या मर्जीप्रमाणे वर्तणूक करीत आहो. वरकड सरदार राजश्री बलवंतराव याच्या मर्जीप्रमाणे वर्तणूक करीत आहेत स्वामीच्या प्रतापेकरून सर्वहि गोष्टी उत्तमच घडोन येतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna to the Peshwa, informing him of the levy of tributes from Karnool and Bednur; the former, he adds, is paid in and the latter is under negotiation.*

No. 203] *[12-12-1757?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी नारायण कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम ता। मार्गसीर सुध १ पावेतो स्वामीच्या कृपेदृष्टीकडून येथास्थित आहे विशेष.

इकडील सविस्तर वृत लिहून सेवेसी पाठविले त्यावरोन विदित जाहले असेल. आदवानीस बातमी पाठविली होती ती आली. किला ठाणे द्यावयाचा करार करून खाली करितातीं. हिदायेंद मोदीखानाचे बाइकोस मानवी कविताल जागीर करून दिली. येक दोन दिवसात स्थळ हस्तगत होणार असे वर्तमान आलें. येंदा खास स्वारी या प्रांते होत नाहीं असे मोगलास व तमाम पाळेगार व नाडगीर यास भासले आहे. येकास येक जथ मिळोन साहित्य पाडावे या कुचोंद्यांत[1] आहेती. मोगल इतके दिवस शाहास गुंतला होता. कोणासी स्पर्धा केली नव्हती. ठाणे जाहलेवरी बाहीर निघोन येणार. अनेगोंदी संवस्थान व कुडतीनी दोनी स्वामीच्या पदरीची त्याचा अभिमान पूर्ण आहे असे सर्वत्र प्रसिद्ध जाहलें आहे. त्यावरी मोगलांचा पेच आहे. त्याहीवरी संस्थानांतील कितेक बाहीर पडिलेत तेथे गेले आहेती. छद्र सांगोन इजाडे (?) संवस्थानास उपद्रव देणार म्हणोन वर्तमान आले आहे. या गोस्टीस न्यामतुलाखान यास पत्रे व कारकून व जोडे[2] रवाना करून संवस्थानास उपद्रव न होतां केल्या शाची वाट होऊन सुरळीत पावे ते करावया स्वामी समर्थ आहां. खास स्वारी इकडे जाहलेवरी मोगल बाहीर निघतच नाहीं. कदाचित * * चितास येत नाहीं येविसी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत याप्रमाणे जाहलेने सेवेचा परिणाम * * अज्ञानपणे लिा आहे. क्षमा करणार धणी आहेत. येंदा दोन हजार फौज या ठिकाणी असती तरी कोपळहि विलेस लागते. पेठेत जाऊन बसतो म्हणजे आदवानीची गति होती. आणि याप्रमाणें दूर बसलेने थोडियाचे हातून काही होत नाहीं. मेळऊन मसलत करावी तरी आज्ञा नाहीं. येजमानहि रागास येतील. यास्तव घडले नाहीं. फौज असती तरी आदवानीच्या दोन किल्यांतील एक स्थळ तरी हाती लागते. राजश्री नागोजीपंत आले ते परस्परे चरणासंनिध गेले. सुचला अर्थ सेवेसी विनंती लिहिली आहे. कृपा करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter from Visaji Narayan to the Peshwa, reporting the aggressive attitude of the Nizam and proposing the capture of Koppal.*

No. 204] *[20-12-1757*

पौ छ १ जमादिलावल

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब व ताा

राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी आज्ञाधारक विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ १९ राखरपावेतों मुकाम केाा पोदलें पाा रापुर वेंकटगिरी

---

१. कारस्थानांत, दुर्मंत्रांत. २ जासूद जोड्या.

स्वामीच्या कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील साद्यांत पेशजी केाा काते कोठे पाा नोसूम येथील मुकामाहून सेवेसी विनंतिपत्रे पाठविली आहेत त्यावरून सविस्तर निवेदन होईल. त्या आलीकडे जेला म्हणोन संस्थान आहे तेथील पस्तीस हजार रुाा खंडणी जाहली पुढे खममास आलो. खममची खंडणी येथास्थित होईना, यास्तव खाममात ठाणे घाल्लून पुढे रापुर वेंकटगिरच्या सरदेस आलो. यैशास त्याणे वकील पाठऊन साडे तीन लक्ष रुाा खंडणी चुकऊन दिल्ही. पुढे नेल्लर सर्वेपली, कालहस्ती वगैरे दोन च्यार पालेगार आहेत, तेथील गुंता उरकून पुढे मटलेवरकर, मुसलनायेड, सिधवटासन्निध आहेत. खासा नायेड बराबरच आहे त्याच्या सरदेस जाऊन तेथील गुंता उरकून घेऊ. सिदवटाहूनही फिरोन कागद आले आहेत. हतखान सिदवटाहून निघोन लस्करास येणार आहेत स्वामीच्या मर्जीप्राो सिदवटाचा तह जाहला तरी उरकून घेऊ. पुढें आज्ञापत्रे येतील त्याप्रमाणे वर्तणूक करू. वरकड पुढील कर्तव्याचा अर्थ राजश्री बळवंतराव याणी सेवेसी विनंति पत्रें लिहिली आहेत त्यावरून साद्यांत विदित होईल. याजउपरी सिदवटचाही प्रकार स्वामीच्या मर्जी प्राो उरकून घेऊन आदवनीच्या सुमारे लौकरच येतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति

¶*Visaji Krishna renders an account of the tributes exacted from Karnatak polygars to Nanasaheb and Bhausaheb.*

No. 205]

[*29-12-1757*

श्री

पुाा राजश्री बलवंतराव गणपत
गोसावी यासी.

विनंती उपरी पटणचा मजकूर सर्व कलला. ऐशियास ते पैका देत नाहीत. ते ती ठाणी राखावी, तेथील सिबंदी तेथे उगवावी. वरती पडली तरी सोडता येत नाहीं. त्यास गुदस्ता जे लोक आहेत त्यात ज्यास सोईस येईल ते राहातील. ज्यास न येई त्याचे मोबादला दुसरे अथवा कांही नवे ठेवावे व कांही इकडून गोपालराव, मल्हार नाईक याजकडील येतील. यापैकी मिलोन त्याची मजबुदी उत्तम प्रकारे करावी, असे करिता जसे बनेल तसे तिकडील कर्तव्यतेनरूप करावे. मोगलाचा सल्लक जाहाला. याउपरी मल्हार नाईक व गोपालराव यास तिकडे रवाना करितो. हे तिकडे येतील. तुम्ही कडपियाचे कामातून निघोन रिकामे जाहालाच असाल. यासी हे तिकडे येताच तुम्ही व हे मिलोन जरब येक महिना दोन महिने दुर्गकरास देऊन, मातबर पैका साधावा. याप्राो हे करावे. भागानगराकडे जावयाची फार उमेद लिहिली. ऐशियास तुम्ही इकडील शहास

साहित्य करावयाचा प्रकार बराच मनात आणिलात. परंतु सांप्रत तह जाहाला. मुसा भुसीसीहि स्नेहच आहे. तेव्हां हा प्रकार काही करावयाचा नाही. तूर्त आपली कामे असतील ती जरूर करावयाचे करणें. कडप्याचे मुलकाचा जमाखर्च हो+ऊन, सिबंदी आंगावर पडे ऐसे न करणें. तेथील सिबंदी वारून दोन तीन हातास येत ऐसे करणें. छ १७ रबिलाखर हे विनंती.

¶*Nanasaheb advises Balwantrao Mehendale to complete his task at Kadappa and not to deflect his course towards Hyderabad with which state a treaty of peace has been signed. He further informs that Gopalrao Patwardhan and Raste have been instructed to advance in the Karnatak to support the addressee.*

No. 206] [26-1-1758?

श्रीसुबराज.

राजश्री बाळाजीराव पंडित

प्रधान गोसावी यासी.

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशलातिशये लेखन केले पाहिजे विशेष. शुतरस्वाराबराबर प्रत्युत्तर पाठविले होते त्यावरून अवगत जाले असेल. तदनुरूप चिरंजीव राजश्री सिवरामबाबा घोरपडे व खान इनिसखान नागड यांजसमागमे नामांकित सरदार व उतमलोक व तोफखाना व गारदी व फिरंगी सरंजामासहित रवाना केले. राजश्री गोपाळराव राजश्री मल्हारराव यासंनिध दरमजल जाऊन पावतील. येथील वोढीतोडीमुळें लोकाच्या समजाविसीकरितां फौजेच्या रवानगीस कांही दिवस आलस्य जाहाला होता. आपण नेणता अर्थ काये आहे! आपले मनोगत रक्षिल्यांत सर्व कार्य जाणून इकडील रवानगी परगणियाची बंदोबस्ती राहती करोन रवानगी केली. उभयेतां रावजीच्या चितानुसार प्रवर्त होयेसें चिरंजिवांस व खानांस बहुत प्रकारें सांगितलें आहे; त्याविषयीं किमपि आंतराये येणार नाहीं. राजश्री विसाजी बाबूराव राजश्री सुबराव श्रीनिवास चिटनीस फौजेबराबर पाठविले आहेत. फौज तोफखाना येऊन पावलि-

---

\+ पत्र नानासाहेबांचें.

याचा व प्रर्वताचा अर्थ उभयेता रावजी परोक्षी आपणांस लिहितील. आम्हांस आपल्या मरजीसिवाय दुसरे आधिकोत्तर किमपि नाहीं. इकडील प्रवर्त आविनाभावे असतां दौलतेची पुरोवृधि आपण करतीलच. वारंवार लेखनांश किमर्थ ? राजश्री नागोराव श्रीनिवास यांस लिहिले आहे. आपणास विदित करितील. रा छ १९ माहे जमादिलोवल. आमास आपली मरजीच कारण; परंतु आज्ञुनी आमचा कसाला जात नाही. सर्व भार आपणावर आहे. वडीलपणास विदित ते कराव. बहुत काय लिहिण हे विनंती.

¶Murarrao Ghorpade informs the Peshwa that as desired his troops have been despatched under Shivrambawa Ghorpade and Khan Iniskhan with instructions to join Gopalrao and Malharrao.

No. 207] *[1757*

श्री

श्रीमंत राजश्री बाबा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोविंद शामराऊ साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येसीजे. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते राजश्री मुरारराव याचे लस्करात कोटगिरीवर पावलो. भेटी घ्यावी त्यास त्याचे येथे फौजेच्या दंगा; करिता भेटी जाली नाही. त्याणी सांगूण पाठविले की फौजेची दंगा वारलियावर भेटीस बोलाऊ, फौजेचा दंगा वारला. भेटीहि आज उदईक होईल. भेटीनंतर सविस्तर सेवेसी लिहून पाठऊं. आपले लस्कर माघारे गेलियावर यांची फौज चित्रदुर्ग हरपनहलीस येणार. येथे वर्तमाण आहे कीं नवाब सलाबतजंग श्रीरगपटणाची खंडणी करूण माघारे फिरले. याच्याच प्रांतातूण जाणार. बहुत काये लिहिणे हे विज्ञापणा.

¶Govind Shamrao writes that he would soon be called for an interview with Murarrao Ghorpade, the mutinies in his army having been quelled. He also informs that Salabatjang has received tribute from Seringapatam and is on his way back.

No. 208] *[1757*

श्री

श्रीमंत पंतप्रधान

रावअजम बळवंतराव साहेबजी सलमुलाहुताला साहेब मुशफक मेहेरबान कदरदान फैजबकश फैजरखान अजजानीबसेख गुलाम मोहिदिन किल्लेदार किल्ला रटेहली सलाम बादज सलाम मारूज अंकी येथील खैरबानजर जाणून साहेबीं आपली खुशवख्ती कलमी करऊन इजानहाची मुरादहाशील करवावी. मेहरबान सलामत ईजानीबाची जाहगीर बमोजीब फर्मान हुमायुन परगणे

मजकूरचीं खेडीं पाऊणशें अशीं दरोबस्त ईजानहाकडे मुदतीपासोन् चालत असतां मधें ईजानीबाच्या नांतवानी मुळे सावनुरकर नवाबांनीं आपला जोरा पोहचाऊन चाळीस पंचेचाळीस खेडीं बांधोन घेतलीं, त्याबादज आम्हाकडे जुज खेडीं सतरा अठरा राहिलीं. तितक्याचमधें बहुत बेहाल[1] करून गुजराणी करीत असतां सावनुरकर साल दरसाल च्यार पांच गांव मारून लुटून दरज देऊं लागले म्हणून यासबब दरसाल दोन तीन हजार रुपये खंडणी करार करून देत असतांहि गुदस्तां आपला दिवाण केशवराव यासमेत फौज आमच्या तालुक्यांत पाठऊन तमाम गांवखेडीं खराब करून कुल पायेमाली केली. त्यावरून आम्ही राजश्री मल्हारराव मुकुंद व रामचंद्रबावा यांचा आसरा घेतला. त्यास उभयेतांनीं बहुत वेळां आमचा उपराळा करून बचाव केला. बादज सैद इसुफ फौजदार आम्हांकडील यानें सावनुरकरांकडे अंग देऊन बेइमान होऊन तमाम किल्ल्यांतील लोक फोडन दंगा करून आम्हांस धरून कैद करून किल्ला सावनुरकरांकडे द्यावासा मनसुबा करून आम्हास कैद करून तमाम आमचा मवेशी[3] माल लुटून घेऊन आम्हास बहुत बेहाल करून कैदेंत ठेविलें. बादज आम्ही आपले ज्यान व इजरा मात्र राखणेंबदल अजम साहेबाचे सरकार आला[4] जाणून राजश्री रामचंद्रबावा व मल्हारराव यांचा पन्हा[5] घेतला. त्यास उभयेतांनीं फौजदाराची बदफैली मनास आणून आपल्या मर्दुमीनें फौजसुद्धां येऊन माच देऊन किल्ला घेतला आणि आमचा बंद खलास केला. दरींविला सावनुरकर किल्ला मजकूर आपला तालुकेचा म्हणून हजूर रदबदली करितात म्हणून खबर ऐकिली. त्यास येथें सावनुरकरांचें नातें काय आहे? आमचा तालुका मुदतीपासोन अलाहिदा आहे, याबाबें सावनुरकर हजूर लिहून रदबदली करितील तर साहेबीं त्यांचें मंजूर न करावें, ते आमजे मुद्दई[6] दुष्मान आहेत. आम्ही आपले खुशरजावंदीनें आपला तालुका किल्लासमेत सरकारांत दिल्हा असे. तूर्त आमच्या गुजराणी माफिक राजश्री मल्हारराव चालवितात. कदाचित साहेबीं या गोष्टीचा इनसाफ खातरेस न आणितां हा तालुका सावनुरकरांकडे जाऊं दिल्हा तर आम्हावरी मोटा गहजब होईल. आम्ही फकीर होऊन मुलकावरी जाणें पडेल. साहेब इनसाफ करतील तर आम्हास हुकूम आलीया हजूर येऊन जाबसाल करूं. गरीबावरी मेहबानगी करणार साहेब थोर आरीफ[7] आहां. ज्यादा लिहिणे यहतिर्याज[8] नाहीं, हें किताबत.

¶*Gulam Mohidin, Killedar of Ratehalli, to Balwantrao Mehendale : complains strongly against Said Isuf Fouzdar who attacked the writer and made him a prisoner. The writer asks redress for his grievances.*

---

१ निकृष्ट दशा. २ दुःखार्त, दुर्दशाग्रस्त. ३ गुरेढोरे. ४ अत्युच्च, श्रेष्ठ. ५ आश्रय.
६ दावेदार. ७ सुज्ञ. ८ जरूर.

No. 209] [13-1-1758

श्री

श्रीमंत राजश्री बलवंतराऊजी स्वामीचे सेवेसी

पोष्यं रामचंद्र बावाजी सां। दंडवत प्रा। विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २ जमादिलौवलपर्यंत येथास्थित जाणून स्वकीये कुशललेखन केलें पाहिजे विशेष. आपणाकडील पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तरी यैसें नसावें. निरंतर प्रेशित पत्रीं कुशलवृतलेखनें सांभाळिलें पाहिजें. श्रीमंतांची आज्ञा व आपलीं पत्रें पेशजीं आलीं कीं बिदरुर प्रांतीचा राजा नवा निर्माण होऊन बंड जालें तें मोडून त्यास हाताखालीं घेऊन हुजूर येणें. यैसियास इकडील प्रथमारंभापासून जें वर्तलें तितकें हुजूर लेहून पाठविलें. हजारों लोक मलाड प्रांतीचे नाईकडे द्रव्यानिसीं प्राणानिसीं सामील जाले. येकायेकीं संस्छानचें बूडस्थल (?) करावें यैसें जालें असतां आम्हीं सरकारकार्यावरी नजर देऊन, हरपनहलीकर विचारांत घेऊन, नानाप्रकारें युक्तीनें रक्षिलें. संस्छानिकांस लिहिलें; ते सारेंच व्यर्थ होउन दरबारीं आमचा गिला लिहिणारानी व सांगणारांनी केला जे सरकारचें लक्ष सोडून वर्ततात, हें बंड त्यांणीच उभें केलें त्यावरून, आम्हांस वरचेवर ताकिदी येतात. यैसियास आमचें सामर्थ्य किती? इतकें बंड उभें करावयास पैका कोठील? अधार काये? हें कोण्हीं ध्यानांत न आणितां निमित्य घालविलें, तरी यांत आमचा उपाय काये? श्रीमंतांचे ठाईं निष्ठेनें वर्तलों, आणि पुढेंहि अंतर न करितां सेवा करावी हेच उमेद आहे. ये गोस्टीचा प्रत्यय आल्यास प्रमाण. सध्या पत्रीं लिहिल्यानें परिहार भासतो. राऊजी सर्वहि सोडून या हरिहर क्षेत्रीं जैसें ठेविलें तैसे राहिलों असतां मिश्यारोप मस्तकीं येतो. बरें श्रीमंत व आपण कदरदा आहेत. या बंडाचेविसीं काये मेहनत केली असेल ते श्री जाणें. हाली हरपनहालीकराची फौज त्याजपासून काहाडविली. फितूर लोकांस सरकारचे आज्ञेचा दबाव घालून तेहि निघावयाचें केलें. घेतलीं ठाणीं सोडून देविलीं. राजश्री कृष्णापा नाइकांची भेटी घेऊन त्यांचे विचारें जे पैरवी करणें ते करीत आहों. हरिपंत व अगडबंब अंतोबा येथें येऊन मनस्वी वलगना करितात, यामुलें त्या राज्यास अविस्वास निर्माण होऊन दुर्गकराचे प्रांतात गेला. श्रीशंकराचार्य स्वामी तेथें आहेत त्यांचे अभय घेऊन श्रीमंतांचे विचारें स्छापना करून घ्यावी या विचारांत आहे. आम्हीं दूर्गकरासहि लिहिलें जे, तुम्हीं त्यांचे साहित्य न करणें. त्यावरून त्यांणीहि आम्हाकडें संदर्भ लाविला आहे. श्रीकृपे युक्तीनें त्यास हाताखालीं घेतों. खरें खोटें पाहाणें स्छापना करणें अगर पारपत्य करणें हें

सर्वहि करावयास श्रीमंत समर्थ आहेत. आमचा येत्न आहे तितका करितों. आम्हांस अधार आपला आहे. जें करणें ते आपल्या आज्ञेशिवाय होणे नाहीं हे निश्र्या असावी. मुख्य गोष्ट आहे तसा कारभार लिहीन म्हणतां पक्षपात दिसतो. याकरितां सरकारचे लक्षावरी लक्ष ठेऊन आपले आज्ञेप्रमाणें वर्तणुकेस कदापि अंतर होणार नाहीं. बहुतांनी सांगितलें तऱ्हीं आपण ते गोष्टीचा पुर्ता शोध घ्यावा. सेवकापासून आज्ञेसिवाय वर्तणूक जाली व सरकार किफायतीस अंतर पडिले, तरी बेउज़ुर पारपत्य करावें. आज्ञेप्रमाणें इकडील ठीक करून येतों. कृपा असावी हे विनंती.

¶*Ramchandra Bawaji reports to Balvantrao Mehendale the affairs of Bednur and the revolution that took place there. The writer disavows any hand in the affair.*

No. 210] *[21-1-1758*

पौ छ २८ जावल

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब
व ता राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १० जमादिलावल मुकाम कसबे खंमम स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित आसे विशेष. पेशजी वेंकटगिरीचे साडे तीन लक्ष रुपये भंगार याचक नायेड याच्या तालुकियाची खंडणी करून पुढे पूर्वसमुद्र तटाक वंगोल व नेल्लूर सर्वपली व कालहास्ती येथील खंडण्या होणे होत्या त्याजबद्दल पुढे जातो म्हणोन सेवेसी लिहिले होते. त्यास स्वामीच्या प्रतापे पुढे पूर्व समुद्रपर्यंत जाऊन समुद्रस्नाने लस्करसहवर्तमान केली व वंगोलची खंडणी साठ हजार रुपये व येक हाती केला व नेल्लूर सर्वपली वगैरे तालुका नजमुलाखान याचे येक लाख रुपये केले व कालहास्ती येथील पस्तीस हजार रुा केले. किरकोल चालीस पनास हजार किरकोल दोन च्यार पालेगार मिळोन केले. इकडील गुता उरकला. त्यास पुढे श्रीवेंकटश उजवा घालून आरकाट प्रांतातून बेमराजपाले वगैरे खंडण्या घेत घेत जावे त्यास ये गोष्टीस महिना दोन

महिने पाहिजेत. त्यास मागे कामे काजे फार आणि स्वामीचे मर्जीचे लक्ष आदवानीकडे. कडपियाचा गुता लवकर उरकून यावे. तिकडेहि आदवानीचा कारभार व बलारी, आनंतपूर, रायेदुर्ग, कंचनगुड हे कारभार व्हावयाचे आहेत व चित्रदुर्गचे पारपत्य येथास्थित जाले पाहिजे. हे लक्ष चितात आणून मागती माघारे सिधवटास जावयास आलो. आज खममचा मुकाम आहे. येथून दर-कूच साहावे रोजी सिधवटानजीक जाऊ. सिलीमखानहि सिधवटास आले आहेत व त्रिमलराव दिवाण लढाईतून जखमी होऊन पळून गेले होते त्याचेहि प्रस्तुत त्याणी समाधान करून आणिले आहे. त्यास आबदूल मोचेमिया नवाब याणीहि लिहीले होते की, सिलीमखानास व त्रिमलराव दिवाण यास पाठऊन देतो, आणि कलेल त्या रीतीने हे दौलतेचा बंदोबस्त करावा म्हणोन लिहून पाठविले होते, व उभयेताचीहि पत्रे याच प्रमाणे येतो म्हणोन आली होती. राजश्री बलवंतरावजी याणी येणे म्हणौन लिहून पाा आणि दरकूच तेथेच जाऊन जसा निकाल निघेल तसा काहाडून तह करून पुढील कार्यास जाऊ याप्रमाणे सिधांत करून चालिलो आहो. ज्या ज्या रीतीने प्रयत्न करावयाचा तो तो करून सरकारकार्य येथास्थित होये आणि तह होये तेच करितो. कदांचित तह नच करीत तरी कडपियाचा व मुलुकाचा बंदोबस्त करून स्वामीचे आज्ञेप्रमाणे त्या प्रांतास येतो. स्वामीच्या प्रतापेकरून तहच या वेलेस होईलसा दिसतो. या मुलुकात आलियाने तमाम स्वारीचे लोक मछलीबंदरापावेतो व कृष्णा उतरून भागानगर प्रांतात धामधूम केलिया फौजेची दहशत तमाम भागानगरापासून मछलीबंदर आदीकरून आरकाटपावेतो पार पडली आहे व मुलूकहि तमाम पळून वोस होऊन गेला आहे. ह्या गोष्टीने मुसा भुसी यास मोठा पायेबंद बसला, याजमुले मुकाम करीत करीत चालिले आहेत. याचे येणे लौकर न जालें येणे करून उपयोगीच पडिले आसेल. मुसा भुसी याचे पत्र येथेहि तेरावे दिवसी आले होते. मुलुकासाठी फार तपसिले लिहिले होते. त्याच जोडीने सागितले की सला जाला. परतु स्वामीकडील पत्रे फार दिवस न आली येणेकरून फार चित उद्विग्न आहे तरी साकल्य लिहावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. श्रीरंगपटणकर याचे डोले आद्यापवर उघडत नाहीत. प्रथम दिवसच आहे. सरकारचे लोक जागा जागा नवी ठाणी वेऊन बंदोबस्त करितात. परंतु तेहि गोष्टीचे त्यास काही नाही. रा बनाजी माधवराव आद्याप तेथेच आहेत. येक दोन पत्रे पाा की तुम्ही उठोन येणे, परतु आद्याप आले नाहीत. याजउपरी येतील तेव्हा तिकडील आर्थ काये आहे तो कलेल. वरकड इकडील तपसीलवार वर्तमान जाले ते व पुढील कर्तव्यार्थ राजश्री बलवंतरावजी याणी सेवेसी लिहिला

4032

आहे त्याजवरून विदित होईल. स्वामी कारणे शंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले आहेत, स्वीकार करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Visaji Krishna reports to the Peshwa and to the Bhausaheb the splendid results of the expedition in the Karnatak down to the east coast where the writer says the territories of the local chiefs were completely subjugated and they were forced to pay tribute to the Peshwa. This letter is written in a vigorous style, worthy of the splendid achievements of the gallant writer.*

No. 211] *[22-1-1758?*

श्रीसुबराज

**राजश्री गोपालराव व राजश्री
मल्हारराव गोसांवी यासीं**

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नों मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती उपरी: येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत जावे. राजश्री माणकोजी निंबालकर याच्या सुटकावास्तव राजश्री भगवंतपंत यांस च्यारपांच पत्रे लिहिलीं तरी त्यानी मान्य न केलें. हे वर्तमान परस्परे राजश्री पंतप्रधान यांस विदित होऊन त्यानी राजश्री नागोराव श्रीनिवास यांस विचारून मारनिलेच्या सुटकेविषई ताकीद लिहून दिली ती नागोराव यानी इकडे पाठविली. हाली तें पत्रसह राजश्री विसाजीपंत व राजश्री मल्हारराव सुबराव यांस लिहिणें तें लिहून पाठविले आहे; तरी आपण भगवंतपत यांस त्रिवर्ग सांगतील त्याप्रमाणें पत्र लिहून देऊन निंबालकर मारनिले याची सुटका होऊन सुतलीचा तोडा जराबांजरा[१] सुटोन ये तो अर्थ केला पाहिजे. त्याचे जरूर आम्हास परम आहे यास्तव आपणास लिहिले आहे. येविषईंचा आगत्यवाद धरून उत्तम प्रकारे पत्र लिहून मारनिलेचा सुटका होऊन येथे येऊन पावेसें करावें. रा छ ११ माहे जमादिलोखर त्याची सुटका होय ते करण; यावर आपणास विदित ते करल. बहुत काय लिहिण हे विनंती.

¶*Murarrao to Gopalrao and Malharrao, requesting them to write to Bhagvantpant and to arrange for the release of Mankoji Nimbalkar.*

---

१ सामानसुमान.

No. 212] [23-1-1758 ?

पौ छ २९ जमादिलौवल.

श्री

सेवेसी विनंती सेवक येशवंतराव लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता॥ छ १२ जमादिलोवल मो॥ हायग्रीव नदी कुडदरहाल स्वामीचे कृपेद्रिष्टीकरून सेवकाचे व कारखाने मजकूरचे येथास्थित असे. कृपा करून संक्रमणाचा तील शर्करायुक्त पाठविले ते स्वीकारून चित हर्ष बहुत पावले. येणेकरून येश आयुर्दायासी वृधि जाली असे. येथील वर्तमान तर आदवनी प्रांतीचा गुंता निर्गमात आला म्हणजे आज्ञेप्रो॥ फौजा बिदनूर प्रांते जात असत. राजश्री मुरारराव मोहर्तेकरून बाहेर निघालियावर मागती शकुनास विरोध जाला म्हणून माघारे गेले. आज चतोर्दसीच्या मोहर्तेकरून निघणार. सरदाराचे भेटीस येणार आहेत. कळावें. धर्मवारास मारनिलेची फौज वेढा घालून बसली होती. त्यासी रायेदुर्गकरांनी आंतून बाहेरून उपराला लोकाचा करून से पनास मारून जाया करून वेढा उठऊन दोन तोफा सोडविल्या. येणे प्रो॥ वर्तमान आलें आहे. चित्रदुर्गवालियानें अद्याप तहाप्रो॥ निर्गमात आणिलें नाही. फौज जवल गेलिया निर्गम होईल. बिदनूरचे वकील आले नाहीत. सोंदियांचेहि तैसेंच आहे. या प्रांतात फौजेची सलाबत उतम बसली. पैका मात्र मिळला नाही. किरकोल तीनच्यारपर्यंत जमा होतील. परंतु तूर्त वसुलास वेला मात्र आहेत. सेवेसी कळावे. आम्ही सर्वत्र येक्या विचारें स्वामी सेवा करीत आहोत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Yashvantrao Lakshman Panse sends news of the movements of Murarrao Ghorpade and his engagements with the enemy at Dharmwar.*

No. 213] [25-1-1758

श्रीसुवराज

राजश्री बालाजीराव पंतप्रधान
गोसांवी यासी.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री॥ मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार[१] दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून

१ राज्याचा आधार.

स्वकीये कुशलातिशये लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण रविसंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले ते स्वीकार करून अतिसंतोष जाहाला. सदैव पत्र पाठवून चित तोषविले पाहिजे. रा छ १४ माहे जमादिलाखर +हरघडी पत्र पाठवाव. बहुत काये लिहिण हे विनंती.

(शिक्का मुराररावाचा.)

(राजते लेखनावधि.)

¶*Murarrao Ghorpade acknowledges the receipt of "Tilgul" sent as season's greetings on the Makar-Sankrant day.*

No. 214]

पौ छ २८ जौवल.

श्री

+सेवेसी विसाजी कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापना सिधवटचा तह लौकरच मनायोग्य जाला तरी दोन विचार आहेत. डावे हाते होऊन गुमनाड पुंगनूर चिकबालापूर वगैरे संस्थाने येथील सन समानची खंडणी जाताजाता करून बेंगरूलाइतके जाऊन पटणास शह देऊन तेथील जसा निकाल पडल तसा काहाडावा, म्हणजे गुदस्ताचा पैका उगवेल व सालमजकूरची खंडणी होईल आणि सरकारची सिबंदी फारच खर्च खाऊन बसली आहे त्याचीहि मोकलीक होईल, अथवा तह न होय तरी दोनच्यार स्थले बेंगळूर वगैरे घेतली म्हणजे कावेरी आलाकडे त्याचा आमल तरी होणार नाहीं. दोनच्यार पाहाडी किले मात्र राहातील इतके आहे व सिऱ्याखालील चिलर लाहान पालेगार आहेत त्याच्याहि जाताजातां खंडण्या होतील आणि मग चित्रदुर्गच्या रोखे यावे तो स्वामी फौज पाठवितील तेहि येऊन पोहचेल आणि तेथील कारभार उरकून घेऊ याप्रमाणें येक विचार आहे. त्यास सिधवटचा तह लौकर न जाला, दिवसगत लागली तरी पटणाकडे जावयास बनणार नाहीं. कडपियाचा बंदोबस्त करून आदवानीच्या सुमारे येतो. दोनतीन हजार फौज गुमनाड व पुंगनूर व बालापुर इकडे पाठऊन खंडण्या चुकऊन घेऊ. यात जे बनेल आणि स्वामीच्या प्रतापे

+ मुरारराव घोरपड्याचें हस्ताक्षर.

होईल ते करीतच आहो. हरपनहलीची तो खंडणी जालीच आहे. बिदरूरचा मजकूर तरी स्वामींनी मिरजनगड त्याचा त्यास देविल्याप्रमाणे त्याचा त्यास पावला. गुदस्ताची बाकी साडेतीन लक्ष रुा याची निशा राजश्री बालाजीपंती करून घेतिली. साल मजकूर साडेपंधरा लाख खंडणी जाली आहे. त्यास मुदती आमलशा लांब जाल्या आहेत म्हणोन परभारे बालाजीपंता आज्ञा आली होती व येथूनहि लिहिले होते, त्यास मुदतीचा कांहीं होईल तो पालट करून पहिला हप्ता वसूल चाली लावितो म्हणोन कागद आला होता त्याप्रमाणे वसूल घेतील. येंदा बिदनूरचा वसुलांचा संशय धरावासा नाहीं. कडपियाची खबर येकूण बहुत भयाभीत जाले आहेत, परंतु पैका बेरीज फार आणि वरसाच्या वरसास भारी पडत चालिले आहे, याजकरिता दोन दिवस आलीकडे पलीकडे करून घेऊन सावकारी निशा व मुदती करून लिहून पाठवितील त्याप्रमाणे सेवेसी लिहून पाठवितो. रात्रदिवस सेवकास जे चाकरी सांगतात ते व आपणास सुचती तीं करितो. विदित होये हे विज्ञप्ति.

¶*Visaji Krishna to the Peshwa : announcing his intention of proceeding against Seringapatam after having effected the settlement of Sidhout.*

No. 215] [*8-3-1758 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. भगवंत त्रिंबक कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान ता। छ २७ जमादिलाखर बुधवार प्रातःकाळ सिवरात्र मो गुरुमकोंडा स्वामींचे कृपेदृष्टीकरून येथास्थित असे. येथील वर्तमान हा कालपरियेत एकवीस दिवस जाहले, किले गुरुमकोंड्यावर निशाण होत नाहींत. किलेदार लटका * * * * सिबंदीचा करितो. त्याची नजर आणखे प्रकारची परिछिन आहे. किलेदारानें नवाब कडपेकर यास नकळत नवाब सलाबतजंग व निजामअली व बसालतजंग या तिघा * * * रवाना केली आहे * * * नवाबा (चा हु) कूम मानीत नाही आणि या नवाबासहि स्वामिसुख कोणते ? या लोकाचे कोण्हेहि गोष्टीचा इतबार धरतां येत नाहीं. खावंदानी कुली मुल्क जप्त करून ठाणी बसविली असतां सिलीमखान त्रिमलराव यानी मध्येस्त होऊन तह केला. त्याचा परिणाम * * प्रकारें. तेव्हा कडपेकराचे कोणे प्रकारें बरे नाहीं, हा अर्थ सेवकास कळलाच आहे. केले कर्म सेवटास न नेलिया त्याचे त्याकडेच दूशण राहिले. स्वामी खावंद. पुन्यप्रभावें होणे ते होईल. च्यार

पाच विनंतीपत्र पा। त्याचे एकहि आज्ञोतर आले नाहीं. स्वामीची आज्ञा मात्र पाहिजे. किला तो धणियाचे पुण्यप्रतापें फते होईल. खावंदानी मदत पाचसे स्वार व बारवाले तीनसें रवाना केले पाहिजेत. काम शीघ्रच होईल. खावंदानी मदत तेथून पाठवावया अभ्यंतर केले तरी सेवकास तरी बार ठेवावयाची आज्ञा करावी. व राऊतहि मिळतील ते ठेवावया आज्ञा करावी. हे खावंदाचे मर्जीस नये तरी ज्याप्रमाणें सेवकास आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. रा। शामराव आम्हापासी आले यामुळें त्यानी किलियांतील फूट फार केली आहे. आम्हाजवळ प्यादे भ * * * * * चे हजारभर त्याचा इतबार पुरेना याजस्तव सिबंदीचे जरूर लिहिणे लागले. हासनापूर दिनपाड खावंदानी पठाणाचे वाटणीत दिल्हे. त्या तालुकियांतील पाळेगार आम्हापासून चौकोसांत आलीकडे किली * * * * * कोस प * सेजस नावनिसी नागणगुंठेवाला त्या अलीकडे * * * कोंडा त्या अलीकडे तुमलगोंदी त्या अलीकडे * * टला डोगर वर पाणी आहे. येथून दीड कोस हे अवघी हासनापूर दिनपाड त्याकडे दिल्हे, यामुळे एक होऊन किलियास अनकूळ. आम्हासी लबाडी मांडली आहे * * अलीकडे खावंदानी येवढा मातबर कजिया ठेविला. नागणगुंठेवालियाने दतोपंताकडील घोडी छेपा घालून नेली. ते घालवडचे ठाणे घेऊन सोडविली व नागणगुंठ्यावरहि जरब पोहचऊन नजर साहासे रुा करार केले. परंतु त्याने कर्म केले त्याप्रमाणे पारपत्य न जाहले. हाली दोन्ही परगणे पठाणाकडे दिल्हे, ऐसे वर्तमान त्यास कळून गेले. त्यावरून आधीच लबाड पाळेगार विशेष, त्यांनीं फंद मांडले. रंगा प्यादा याचा अभिमान पठाणानी धरून दोन महाल त्याचे हवाली करून खावंदाच्या मुलकांत कजिया राखला, आण धणियानी हे गोष्टीचा चितात अर्थ न आणिला. धणी सर्वज्ञ आहे- ती विज्ञापना.

¶*Bhagwant Trimbak to the Peshwa : reporting the siege of Gurrum Konda, and asking more help, without which, he adds, that place would not surrender.*

No. 216] [*7-3-1758*

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब
व तथा राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे शेवेसी.

आज्ञाधारक विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २६ माहे जमादिलाखर मुकाम का। जमलमडू नजीक गंजीकोट येक कोश पिनाकी

उतरतीर स्वामीचें कृपाद्रष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. पेसजी सांडनीस्वाराबाा सविस्तर वर्तमान सेवेसी लिहिलें आहे त्यावरून सविस्तर कललेच असेल. त्याजवर सिदवटाहून निघोन आलो. नोसुमाकडे साल-माारची बाकी येणे होती व बेगणपली येथील खंडणी घ्यावी याजकरितां मजल दरमजल करून आलों. नोसुमाकडे रुाा सवा दोन लक्ष करार केले होते, त्यास खंडणी भारी जाहाली. वसुलाचा झाडा न होई यास्तव कांही सोड रुाा पसतीस हजार देऊन बाकीचा निशा करून घेतली व बेगणपलीची खंडणी पसतीस हजार करार करून वोलीस मातबर माणूस घेऊन ठेविला आहे. पंधरा रोजात तोहि पैक्याची निशा होईल. पुढे ताडपत्रीवरून राजश्री मुरारजी घोरपडे याचे मुलकातून ताडपरीस जावें तों राव माारनिले याजकडून राा सुबाराव श्रीनिवास येऊन रदबदल केली कीं आपल्या मुलकांतून आलियावरी मुलुकाची खराबी होईल यास्तव गंजीकोट नजीक कसबे जमलकडु या मार्गे ताडपरीस गेलो. ताडपरीचा गुंता लौवकरीच उरकोन उप्रांत राजेश्री मुरारजीराव घोरपडे याचा राजश्री बलवंतरावजी याचे भेटीचा आग्रह बहुत आहे, भेट जाहालियावरी पुढे गुमनाडास जावे, तेथील गुता उरकून चिकबालापुरास जाऊ. येविसीचे पुढील कर्तव्याचे जाहालियाचे सविस्तर वर्तमान राजश्री बलवंतरावजी यांणी सेवेसी लिहिले आहे त्यावरून विदित होईल. पुढें पर्जन्याचे दिवस जवल आले. त्यास या प्रांती फौजा येणार, आण दिवस तो थोडके राहिले. पटणचा निकाल काढणे आहे, आणि चित्रदुर्गचेहि पारपत्य जाहालें पाहिजे. तरी फौज लौकर येऊन पोहचे ते आज्ञा करणार स्वामी समर्थ आ(हे)त. फौज आलियावरी पटणचाहि निकाल सर्वांचे मते ज्या रीतीने काढावा त्या रीतीने काढून चित्रदुर्गाचे पारपत्यास जावे लागेल. तरी स्वामीनी फौजेची रवानगी करावयास सत्वर आज्ञा केली पाहिजे. बिदरूरच्या यैवजावर स्वामींनी वराता केल्या व राहिला यैवज हुजूर पाठवणे म्हणजे राा बालाजी देवराव यास आज्ञा आली आहे म्हणौन यैकिले, त्यास हे फौजेस इतके दिवस नालबंदी नाही. छावणीस राहिलेली फौज फार आबलली आहे, त्यास फालगुण मास आला, लोकाचा आन्याये नाही. याजकरिता तूर्त बिदरूरचा यैवज लोकास राा बलवंतरावजी याणी देविला त्याप्राा बालाजीपंती दिला. थोडा-बहुत राहिला त्याच्याहि वराता जाल्या आहेत, त्यास पावला आसेल. स्वामीचे मर्जीनरूपच येथील करणाराचे लक्ष आहे. खंडणी दडणीहि स्वामीच्या प्रतापे-करून आदमासेच जाल्या आहेत व राहिल्या आहेत त्याहि करून घेतो. आगोटीस येऊ लागो ते वेलेस पाच सात निदान दाहापर्यंत उरऊन आणावे हे आहोरात्र मानस आहे. फार फार जपोन संसार करितात. याप्राा येथील प्रकार

करीत आहो. दुरून कोठवर लिहावे? सेवेसी आलियावर निवेदन करून तेव्हा सर्व चितास येईल. राजश्री बलवंतराव धणियाच्या कामास फार जपतात हे स्वामच्याहि ध्यानास येतच आसेल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Visaji Krishna reports Balvantrao Mehendale's victorious march in the far South and informs that the latter is awaiting reinforcements from Poona to attack Seringapatam.*

No. 217] [21-3-1758

पो॥ छ २२ रजब सु॥

समान खमसैन मया

अलफ

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

त्रिंबकराव विश्वनाथ स्वामी गोसावी

यांसी

पो॥ बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. राजश्री अमृतराव अरकाट प्रांती गेले होते तेथून चिदूरास आले. तेथे मेलवामेलवीची फौज मेलऊन तीर पातुरास मोर्चे लाविले. त्यास राजश्री बलवंतराव यांणी वारंवार लिहिले कीं या भरीस न भरणे. असे असतां मोर्चे दिल्हे. फौजेस रागे भरून हला केली. फौज प्यादे मेलवामेलवीची होती ते फौज पलाली. नीट चालून गेले. आंतून हजार पांचसे माणूस आंतून आले. त्यांचे याचं तोंड लागले. खासा हे नीट चालोन गेलें. गोल्याचा मार जाला तेव्हां यांस गोळी लागून घोड्याखाली आले. जीव असतां त्याणी येऊन दाटी केली. सेवटी पाडाव करून गांवात नेले. परंतु मांडीस गोळीची जखम व कंबरेत तरवारेची जखम होती. पौष अमवाशेस जखमा लागल्या. दुसरे दिवसी देवाज्ञा जाली म्हणून बलवंतराव यांचे पत्र आले. यैशास अमृतराव याजसारीखा माणूस होणे नाही. ईश्वरे फार फटकाल केले. होणार गोष्टीस उपाये नाही. त्यांचे नातू राजश्री हैबतराव शंकर यांस पत्र लिहिले असे. तरी तुम्ही त्याजकडे जाऊन बहुताप्रकारें समाधान करणें. घरी आणखी कोणी नाही. नाइकाचा विचार कलतच आहे. यास्तव समाधान उत्तम प्रकारे करावे. अमृतरायानी राज्यांत श्रम साहस बहुत दिवस केले.

मुलांचे चालवावें इतकी योग्यता त्याणी करून ठेविली; व प्रस्तुत सरकार कामास आले. त्यांचे नातवाचें चालवणे सर्व प्रकारे अगत्य आहे. त्याचे घरी जाऊन पाठऊन विवेक करवणे. छ ११ रजब हे विनंती.

¶This is a letter from the Peshwa to Trimbakrao Pethe requesting him to offer on his behalf condolences to Haibatrao Shankar, grandson of Amritrao Shankar, on the death of his grandfather in a skirmish at Arcot. The Peshwa extols the splendid services of Amritrao for the Empire.

No. 218] *[4-4-1758*

श्री

श्रीमंत राजश्री बावा
स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक मुकुंदराव श्रीपत दंडवत प्रणाम. विज्ञापना येथील सेवकाच वर्तमान तागायत छ २९ माहे रजब मुकाम बेंगूर नजीक बेंगरूल जाणून येथास्थित असे. स्वामीस च्यार जोड्या पाठविल्या, परंतु येकहि उत्तर न आलें. त्यावरून चिंता प्राप्त फार जाली आहे. हलीं पटणाहून वेंकटराव बारकी फौजसुधां बाहेर निघाला आहे. बराबर खूपशा व अमरसिंग जमातदार आहेत. फौज दोन हजार व हजार गार्दी दोनसें फिरंगी पाचसात तोफा आहेत. हुली दुर्गास येऊन तेथील मोर्चे उठऊन बेंगरुलास येणार म्हणौन राजश्री खंडेराव निंबाजी यानी पत्र आम्हांस लिहिलें आहे. तीं पत्रें बजिनस सेवेसीं पाठविलीं आहेत त्यावरून विदित होईल. स्वामीनी कृपा करून फौज पाठविली तर उत्तम आहे. गै केली तर पांच महिने मेहनत केली ते व्यर्थ जाती आणि बदनक्ष होतो. आम्ही जालें वर्तमान ल्याहावें त्याची पैरव करणे ते आपण करावी. बेंगरुलासभोंवतीं तेरा चवदा ठाणीं घेतलीं आहेन. त्यांचा बंदोबस्त करून नित्य बेंगरूलकरासी लडाई करावी लागती. यैसा प्रसंग येऊन पडला आहे. आमच्या लोकांत कांहीं जीव राहिला नाहीं. जखमी कितीक आहेत, घोडीं जखमी फार आहेत, यैसें जालें आहे. मैसूरकर दिसेंदिवस बलावत जात आहेत. याजकरितां वारंवार स्वामीस विनंती लिहितों, परंतु आपल्या खातरेस येत नाहीं. तेथें उपाये आमचा नाहीं. नक्ष आण बदनक्ष स्वामीचा. आम्ही सेवक लोक. आमचा गुंता काय आहे? आम्ही वारंवार लेहून पाठवितों. आपले खातरेस न येतां जाबहि येत नाहीं हें अपूर्व आहे! हरयेक मनसबा व दुरंदेसी स्वामीचे चित्तांत

येते, तैसी कोठेहि नाहीं. परंतु आम्ही इतकें लेहून पाठवितों त्याचें उत्तरहि येत नाहीं हें काय आहे. याउपर आपण फौज पाठवावयास दिसगतीवर घातल्यास सेवकाचा आब राहत नाहीं. बेंगरूळकर आम्हांस भारी जाहाले. आम्हांजवळ जमेत थोडी, पैसा खर्चास नाहीं, याउपर आमचा केवळ सेवट पाहावा हें धणियास उचित नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat sends a very urgent demand to Balvantrao Mehendale for troops to save the situation at Bangalore where he is hard pressed.*

No. 219] [*29-4-1758*

पो छ १२ रमजान मंदवार.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे
सेवेसी

विनंती सेवक बनाजी माधवराऊ कृतानेक सां नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता छ २० माहे शाबानपावेतों मुकाम लस्कर देवहनहली कृपाकटाक्षें जाणून स्वानंदातिशये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. सेवकाचें वर्तमान तर आज्ञापत्र सादर जाले कीं पटणकर सरकारच्या यैवजाचा निर्गम करून देत नाहीत, तर तुम्ही तेथें न राहणें. राजश्री बलवंतरावजीचे लस्करास जाणें. म्हणून आज्ञेप्रमाणें पटणाहून निघून मेलकोटियास आलों. तेथें या प्रांतीचे ठाणेदार अवघे जाले. त्यासमयीं कडप्याहून रावजीनी कूच करून खमम वगैरे प्रांतास गेले. व हजूरहि दंग्यामुळें नानाप्रकारें वर्तमानें उठू लागलीं. त्या समयीं ठाणेदार म्हणू लागले जे, रावजी तिकडे चालिले, तुम्हीहि रावजीच्या लस्करास चालिला, आमची आवस्था काये? खर्चाची वोढ फार. या समयीं आमची बेगमी करून रावजीकडील व श्रीमंत स्वामीकडील फतेचे वर्तमान आलियावर जाणें म्हणून. तेव्हां नागमंगलीं राहून कर्जवाम पटणातून आती संकटे काढून आणून साठ सतर हजार रुपये पावेतों करून देऊन, च्यार दिवस त्यांस खर्चाचा उमग पडे यैसे करून पटणकरानी येक दोनदां बाहेर निघावयाचा उपद्वाप केला त्या समयींहि बातमी राखून ठाणेदाराकडूनच त्याचें पारपत्य करऊन, श्रीमंताचा प्रताप ठाणेदाराचे मस्तकीं आहे यैसें सर्वांस कळो आलें. दोनवेलहि फौजा निघाल्या, पारपत्य जाले. ठाणियांत ह * * ह काचा खर्चावेचाचा परामर्ष थोड्या बहुतानें करून नागमंगलीच होतो. राजश्री रावजी कडप्याकडून

दिग्विजेय संपादून या प्रांतास आले. आम्हासही आज्ञा आली. आज्ञेप्रमाणें हजीर जालों. आता देवनहली फते केली. पुढें काय आज्ञा करतील त्याप्रो सेवक हजीर असों. मार्गसीर्ष पुष्य माघ मासीं या प्रांतास आलियास कार्यभाग घडावा. त्यास वैशाख मासीं येथे आले. गतवर्षी फौजा छावणीस राहिल्यामुलें फौजेस धीर नाही. पटणकराचा विचार तों स्वामीस विदित आहे. दीर्घसूत्री फार. वेंकटपतिआपासहि नंजराजानी बोलाऊन आणिले आहे. त्यास कारभार दिल्हा नाही. त्यास कारभार जाला तर स्वामीची कृपा संपादून घ्यावयाची उमेद करितात. दलवाईहि मैसुरास येऊन पावले. परंतु अद्यापहि पटणास यावयास किती दिवस लागतील न कले. दलवाई पटणास आलियावांचून व्येंकटपतीस अधिकार घेतां येत नाही. उभयता बंधु[१] येकचित होऊन अधिकार देतील तर निर्वाह करील यैसें आहे. इतके होऊन यावयास किती दिवस लागतील पाहावें. रावजीस देशास यावयाची त्वरा फार दिसते. जे * * * घडून येईल तें सेवेसी विनंती लिहून पाठवीत असे * * कृपा निरंतर असू दि्धली पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Banaji Mahadeo sends news to the Peshwa that after strengthening Maratha outposts near Seringapatam he joined Balwantrao Mehendale at Devanhalli. After a pretty long absence of a year and more the army under Mehendale is eager to return home. The writer explains the attitude of Nandraj, the Diwan of Mysore.*

No. 220] *[3-5-1758*

छ २९ साबान

श्री

श्रीमंत राजश्री राऊजी

स्वामीचे सेवेसीं

विनंति सेवक राघो बावाजी कृतानेक नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान. तागायत चैत्र बहुल येकादसी सौम्यवासर मुकाम हुलीदुर्ग क्षेमरूप असो. यानंतर राजश्री नारो गोपाल व सदाशिव मुरार हजिरीस पाठविले ते आले त्याजबद्दल आज्ञापत्र सादर जाहालें तें पावलें. हजिरीविसीं लिहिलें तरी हजिरीस उजूर

१ नंदराज व देवराज,

काय आहे. दोनसें राऊत जागांजागां ठाणेयानी आहेत. वरकड सेवका-समागमें आहेत. या प्रकारें गाडदी सर्व जागांजागां गुतले आहेत. येथील हजिरी होऊन उभयेतां पंत वैशाखी पूर्णिमइतकीं सेवेसीं येऊन पोहोंचतील. येक जागां असते तरी लौकरीच येते. हिंडावयाचें फार याकरितां गुंता आहे. इकडील वर्तमान तरी दलवाई आले ते मेहसुरास आहेत. शरीरीं सावकाश नाहीं. कमरेपावेतों अंग सुजलें आहे. त्यास उभयेतांचे मध्यस्तीस खंडेराव दिमत हैदरआली व आणखीं कितेक माजमादार मातबर आहेत, तेहि नित्य जात येतात. परंतु हा कालपावेतों येक विचार होऊन यावयाचा सिधांत जाहाला नाहीं. कारभारी वेंकटपति तों आल्याखेरीज वस्त्रें घेत नाहीं. स्वामी या प्रांतें येऊन देवनहली घेतलियाचें वर्तमान पटणास येऊन पावले तरी त्यांचे नेत्र उघडत नाहीं. राजश्री बनाजीपंत सेवेसी आले, साद्यंत वर्तमान निवेदन केलेंच असेल. उभयेतां दलवाई येक जाहल्याखेरीज येथून कोणी रवाना होत नाहीं. आमचे वराते यैवजीं लाख रुपये श्रावणमासापासोन देत आहेत ते हा कालपावेतों देतच आहेत. येकदां विरंणाचे मारफतीनें लाख रुयये यांची निशा राजश्री बनाजीपंताचे विद्यमानें केली ते सर्व मोडलें. त्यावर येक जूज जाहलें. दाहावीसा हजाराची आम्हां-कडीलच घोडीपिडी पडलीं. याखेरीज चौदा घोडीं ग्रामवाले याणी नेलीं. छपा हेरगाजवळ घातला. च्यार हजार प्यादा जमा केला आहे. हेरगावर येणार. सभोंवताहि गाव सर्व उज्याड केले. याउपरी आम्ही इकडे गुतलों. तिकडे धामधूम मांडली. ब्रह्मसमुद्र (?) निसबत थोरात याजवर येऊन सिड्या लाविल्या. तीन दर्वाजे गढीचे पैकीं दोन दरवाजे घेतले, परंतु स्वामीचें पुण्य समर्थ त्याणेकडून मारून काहाडिले. याचप्रकारें बाणावरकरावर युध्य आहेच. बाणावरचे गांव नांवगल व गरडगिरी गढी दोन राहिल्या, त्याणी धूम केली. येणे प्रमाणे जागाजागा हर्शामर्ष. कांहीं उमजतच नाहीं. हिसेबाचा प्रकार कडून बाणावर येथील आला नाहीं. येथून चिठ्या गाडदी लोकांस वगैरे दिल्या आहेत, त्यांत आदा गैरआदा नकले. चंद्राई पटण व बारनहलीचा हिसेब सिध आहे, तितका घेऊन येत होते तों हजिरीचा प्रसंग नूतन आला. बरें तेहि चालीस लाऊन हिसेब रवाना करितों. लाख रुपये याचा प्रकार, हालीं पनास हजार तूर्त विरंणाची निशा केली, व पनास हजार येक महिन्यानी द्यावे त्याचे वोळीस बाळाजी आको वकील दिल्हे आहेत. आण आम्ही व सर्वांही आपले स्थलीं जावें यैसा करार केला आहे. परंतु पैका पदरीं पडेल तेव्हां खरा. आमचे तिकडे धामधूम करिता ते येकादे गढीवर जरब बसविली तरी सर्व गलाटा होईल, या करितां अम्हांस जरूर यैकावें सारिखें जाहालें. स्वामीचें येणे पुढें कोठपावेतों

होणार याचा भावगर्भ काही कलत नाहीं. पटणावर यावयाचा प्रकार असता तरी आम्ही येथेंच असतो. तो प्रकार कांहींच कलत नाहीं. याकरितां सर्वहि आपले स्थलीं जावें यैसें केलें. पटणास पैकियाकरितां कारकून रवाना केले आहेत, पदरीं यैवज पडतो किंवा नाहीं हेंहि कळेल. येक गोष्टीचें शासवत नाहीं. वेंकटराव बारकी फौज सुधां पटणास जाणार यैसा प्रसंग करून सर्वहि जावें यैसें जाहालें. ठाणेयानी राऊत लोक आहेत त्यांचा धीर स्वामी देशास जाणार याकरिता धीर सुटला. राऊताचा धीर सुटतो यामुळें गाडदी लोकांसहि धीर पुरत नाहीं. पोटाचाहि गवगवा; सालझाडा आला. देसीं धारण महर्गता मोठी, सर्वांचे घरचीं माणसें आलीं तोहि गवगवा आहे. येथील सर्व बंदोबस्ती जाहाली पाहिजे. सिंदघट बासोल ही ठाणी पटणाचे नजीक दोन, बेनेहलीचे नजीक दोन सारतहली व उरुदहली हीं दोन, हसनग्रामचे समीप हेरग, हीं केवल त्यांचे आहारीं आहेत. पूर्वीं येविसीं लिहिलेंच होतें. परंतु त्याचें उत्तर आलें नाहीं. याकरितां तैसीच आजपावेतों राहिली. स्वामी म्हणतील कीं ठेवायास कारण काय तर आमचा व त्यांचा मुलूक घेतला तो रक्षिला पाहिजे याकरितां ठेवणे जरूर जाहालें. किकरी मात्र दरम्यान आहे ते उपद्रव करिते. पुढें याचा अर्थ सर्व चितांत आणून आज्ञा कर्तव्य ते करावी. आम्ही सेवेसीं कोणे मुकामी दर्शनास यावें ते आज्ञा केली पाहिजे. इकडे त्याची फौज सर्व पटणाजवल जमा आहे तैसेच नरसीपूर हसनवेद्दर येथें प्यादे फार जमा आहेत. आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करून. भेटीनंतर साद्यंत वर्तमान सेवेसीं निवेदन होईल. सेवेसीं श्रुत होय. पागेस स्थल हा कालपावेतों नाहीं. श्रीमंतास पत्र दिल्हे तरी पुढें रवाना करून हे विज्ञापना.

¶*Ragho Babaji from Hulidrug to Balvantrao Mehendale deputed by the Peshwa for the conquest of Mysore : gives local news and describes the difficulties in the subjugation of the various places.*

No. 221] [*25-6-1757*

पो छ १३ जिल्काद

श्री

सेवेसी विज्ञापना यैसीजे. सांप्रत बिदरूरचे वर्तमान जे आशाढ शुध आस्टमी दिवसीं रा॥ बसवलिंगपा यांचा कारभार तगीर होऊन रा॥ शिवलिंगपा म्हणून कारभारी जाहाले. यास कारण जे गतवरसीं देवापास जिवेच मारावा असी काही

मातुश्रीची आज्ञा नवती. असें असोन येंवढा कर्ता माणूस जाया केला. पुढा बसवलिंगपाची कन्या राज्यास नेमस्त केली आहे. लग्न जाहाल्यानंतर स्वशुर ज्यामात येक होऊन जी गत देवापाची केली तसीच आप(ली) करतील असी धास्त खाऊन बसवलिंगपाचा कारभार दूर करून शिवलिंगपास कारभारी केला. तोहि वयोवृध आहे. या मागा याणेहि काही दिवस कारभार केला होता. परंतु ते मनवंतर आणीक होते. हालीं या मनवंतरांत निभावणी होता कठिण आहे. याचें निमित्य जे संस्थानात ताकत नाही व आम्हास पैका दिवसें दिवस आधिकच पाहिजे. याकरितां परिणाम कठिण दिसतो. बरें जसें लावितील तसें पावतील. जाहाले वर्तमान श्रुत व्हावयाकरितां विनंती लिहिली असे हे विज्ञापना.

¶*News-letter from Bednur, mentioning that Basavalingappa has been dismissed owing to apprehensions that he would prove too powerful after his daughter's marriage with the young prince and that he has been succeeded by Shivalingappa.*

No. 222] *[19-7-1758*

श्रीगणराज

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
बनाजीपंत स्वामी गोसावी यांसी

सेवक गोपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जाणें विशेष. पटणकराकडील कालीं पत्रे आलीं त्याजवरून तिकडील मार सविस्तर कळला. पूर्ववत प्रोच मार आहे. इकडील वर्तमान तरी आम्ही कालीं तलकाडून कूच करून मधरीस आलो. आजी येथून कूच करून बिरूरास जातों. तेथून कूच करून मजल दरमजल कंदीकिरे चिकनायेकहालीकडे जातो. त्यानंतर पुढें कर्तव्य ते केले जाईल. सारांश संस्थानिकानी मुलकाची खराबी जाली नाही तों सरकारचे पैकियाची विल्हे करून द्यावी. येणेकडून त्याचेच कल्याण आहे. सरकारचा पैका तों येईल. परंतु मुलक खराब न होये ते करणें रा छ १२ जिलकाद बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Gopalrao Govind and Malharrao Bhikaji to Banajipant, giving him their marching route. They ask him to settle the affair of the tribute with the Raja of Mysore, if he is anxious to save his country from being overrun.*

No. 223] [2-8-1758

पो छ २८ माहे जिलकाद

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बनाजीपंत स्वामी गोसावी यांसी

सेवक गोपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे. विशेष. भवानजी नाईकाकडील जासुदासमागमें तुम्ही पत्रें पाठविलीं ती पावलीं. त्याची उतरे विस्तारे लिहिली आहेत त्याजवरून कलेल. मुख्ये गोष्ट तुम्ही पत्रें लिहितां तेथे बाकीचे ऐवजपैकी नऊ लक्षाची निशा जाली व रोकड यैवज येणे त्याची निशा करून घेतो म्हणून लिहितां. सन समान व तिसां दुसाला खंडणीचा मजकूर लिहीत नाही याचा विचार काय आहे? दुसाला खंडणीचा मजकूर तुम्ही संस्थानिकासी बोलिला की नाही, ते काये म्हणतात. दुसाला खंडणीचे यैवजाची निशा कोणते प्रकारे करणार? संस्थानिकाचा दीर्घसूत्री कारभार. आम्ही दोन महिने पत्रें पाठवितो. तेहि वकील पाठवितो म्हणून लिहितात. परंतु घडोन येत नाही. तुम्हासहि येथून जाऊन पंधरा वीस रोज जाले. अद्यापि कांही दिसोन येत नाही. सुस्तीचा मजकूर त्यास काये करावें? तुम्ही तेथे बोलीकरितां गेला. फार ठाणी न घ्यावी, या विचारे आम्ही येक दोन मुकाम जागा जागा करून ठाणी घेतली. कंदीकिरे व चिकनायेकनहली व होनेहली ही तीन ठाणी घेतल्याचे वर्तमान पेशजी तुम्हास लिहिलेंच आहे. तुर्वीकिरे घ्यावयास फौज पाठविली होती ते ठाणे घेतलें वगैरे किरकोल ठाणी होती ती घेतलीं. याउपरी कोठे मुकाम करावयास गांठ पडणार नाही. येथून कूच करून बिरुर (?) वगैरे ठाणी आहेत ती घेऊन पुढें जात आहो. याउपरी विलंबावरी घालावयाचे दिवस नव्हेत. तुम्ही प्रतिपदे इतकें जरी निघाला तरी पुढील मातबर ठाणियाचा भ्रम राहून प्रांतहि उद्वस होणार नाहीं. आमचे मनोदयानरूप पैक्याचा निर्गम तुम्हास सांगितल्याप्रो संस्थानिकानी केला तरी सन सबांत ठाणी घेतली ती ठा(णी) हाली सन तिसात घेतलीं तीहि सुटतील यांत संशये नाही. आम्ही पटणकरांची ठाणी मात्र घेतली. मुलूक सरकारचाच खराब केला. पटणकरांचे ठाणे येक येक कसबा मात्र होतो, तेवढा घेऊन रक्षण केले. आमचे प्रांताची खराबी बहुत जाली. लस्कर अनिवार याउपर आणखी दोन तीन मजली प्रांत आमचा आहे. पुढे दरोबस्त पटणकराचा आहे. याउपर तरी पटणकर

कारभारी ज्यागृत होऊन संरक्षण केल्या उतम आहे. न होत तरी त्याचे भवितव्यानरूप होणे ते होतच आहे. यात तुमचा इलाज काय? छ २७ जिलकाद बहुत काये लिहीणे हे विनंती.

¶Gopalrao Govind and Malharrao Bhikaji to Banajipant : enquire how he settled the question of the two years' arrears due from the Raja of Mysore. The writers threaten the Raja with punishment in case of failure to satisfy Maratha demands within a short time.

No. 224] [18-8-1758?

श्रीगणराज

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बनाजीपंत
स्वामी गोसावी यांसी

सेवक गोपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही येथून जावयाचे समई जें सांगावयाचे ते सांगितलेच आहे. छ १२ रोजीं श्रीमंताचे पत्र छ २० जिल्कादचे आलें ते काली संध्याकालीं छ १२ मिनहूस प्रविष्ट जालीं. तेथें आज्ञा जे आधी तो लक्षां वाव्यानी प्रांत नच सोडावयाची आज्ञा. कदाचित सोडणेच ते पक्षीं मागील बाकी व दुसाला खंडणीची मातबर बेरीज ठराऊन सारा यैवज रोकड हातास येईल तरी प्रांत सोडणें. बोली बनत नसली तरी कावेरी आलीकडे बेंगरूल आदींकरून सारा प्रांतात ठाणी बसवणे. इतकीहि जालियाउपरहि तह नच करीत तरी कावेरीचे पाणी उतरलियाउपरी कावेरी पलीकडे जाऊन तिकडील प्रांताची खराबी होऊ लागली म्हणजे तुम्ही म्हणाल तितका पैका देतील अगर प्रांतच तहामुळें देतील. जर तूर्त पैकाच घ्यावयाचे तुमचे विचारास आले तरी बाकीची बेरीज व दुसाला खंडणी मिलोन धमक फार लिहिली. असों. श्रीमंतानी लिहिलीं ते खावंद आहेत. आतां बोली आम्ही चुकविली. त्यापेक्षा जाजती म्हणावी तरी घटकेस येक बोलणे दिसते यास्तव आम्ही बोली ठरविली तेच ठराविली. पैकाहि दुसाला आर्जीच घ्यावा म्हटले तरी आमचे वचनांत अंतर पडतें. आम्ही वचनाविसीं दुसरेयास शब्द ठेवितो ते लोक आम्हास ठेवितील. यास्तव तेहि गोष्टी आम्ही नवी बोलत नाहीं. दुसाला खंडणीचे येवजाचे हुंडीचा प्रकार तों आम्ही तुम्हास येथेच असतां सांगितला आहे हे संस्थानिकाकडील आले ग्रहस्तास सर्वत्रांसहि ठावकें आहे. येविसी तुम्ही संस्थानिकास सांगावयाचे प्रकारे

सांगोन दुसाला खंडणीच्या येवजाच्या हुंड्या तुम्ही मुदती ठराविल्या त्याच मुदतीच्या वेगल्या हुंड्या करून पाठवणें. अगर तिही मुदतीची येकच मुदत करून तुम्हास सांगितल्या मुदतीस साऱ्याच येवजाची हुंडी दिली तरी कबूल करणें. हुंडीच्या प्रकारचा मजकूर तुम्हास सांगितला आहेच. इतकेहि असोन संस्थानिकाचे चिती हुंडी द्यावयाचा विचार होत नसला तरी उतमच जालें म्हणजे आम्हाकडेहि अप्रमाणिक नाहीं. आणि श्रीमंतानी सांगितल्याप्रमाणे वर्तलो असेंहि जालें. चेनापटण व बेंगरूल ही ठाणी घेऊन पुढें मुलुकगिरीस जाऊ. महिना दोन महिने मुलुकगिरी दवाब खाल्हन करून आलियाउपर तों पावेतो नदीचे पाणीहि उतरते. मग पलीकडे जाऊन प्रांतात उपद्रव केलियाने तह करून पैका येकदाच देतील. पाहिजे तरी प्रांत सोडऊन घेतील. अगर रुपये न देतील तरी मुलुकाचा तह करून देतील. म्हणजे श्रीमंताचे मनोदयानरूपच जालें. श्रीमंताचे मनोदयानरूप जाल्यानें आम्हावरीलहि शब्द दूर होतो. मुख्य गोष्टी आजी तह जाला असा दुसरेयाने होणार नाहीं. येवजहि क्षेपनिक्षेप देणेच. मग हुंडी द्यावयास अनमान संस्थानिकानी कशास करावा? हुंडी दिलियानें आजीपासोन चवदा महिने निरोपाधि राज्य करावें. निरोपाधि राज्य केलियाने पेस्तरसालीची खंडणी द्यावयास प्रांत असुधा[१] राहील. आमचे चिती हुंडी दिलियानें सर्व प्रकारे संस्थानचे कल्याण व आम्ही केल्या कारभारावरी दोष येत नाहीं यास्तव इतके लिहिणे लागले. कदाचित तुम्ही म्हणाल कीं आपले मतेच लिहिले तरी आजी पुण्याहून पत्रें आली. तुम्हाकडील ग्रहस्त येथें आहेत त्यासही दखल आहेत. वरकड श्रीमंतानी लिहिला प्रकार येकीकडे ठेऊन आम्ही केल्या कारभारास बल वाल्हन निभाविल्याने आमचे वचनाची प्रमाणिकता कोणीहि मानील. यास्तव आम्ही केल्या कारभाराप्रमाणेच निभावावें. पुढे आम्हावर बदनाम आली तरी सोसून घ्यावी. श्रीमंताजवल विनती करून क्षमा करवावी, परंतु केला कारभार सिद्धीस न्यावा या उदेशे इतके तपसीलवार लिहिणे लागले. मुख्य गोष्ट बाकीची निश्या संस्थानिक करितात त्याच गोष्टीस आम्ही कबूल आहो, परंतु पुढील दुसाला खंडणीच्या येवजाची निशा तुम्ही मुदती करार केल्या त्याचप्रमाणे हुंड्या क्षेपनिक्षेप पुण्याच्या करून द्याव्या. सेवट कार्तिक मासचे मुदतीची हुंडी न आली तरी येथे येवज घेऊ. परंतु फालगुन चैत्र या दोनी मुदतीच्या हुंड्या क्षेपनिक्षेप घेऊन येणे. आधी तो तिनी मुदतीच्या हुंड्याच द्याव्या. न होये त्यापक्षीं लिहिलेप्रमाणे दोन मुदतीच्या हुंड्या खामखा तुम्ही घेऊन येता अस असलिया येक दिवस माणूस ठेऊन घेऊन

---

१ मोकळा.

उतर पाठवणे की हुंड्या घेऊन येतो. अगर हुंड्या देत नसेल्या साफ लिहिणे की हुंड्या द्यावया प्रकार घडत नाहीं म्हणजे तह होणे राहिला जाणोन वर्तणूक करू. विना हुंड्या दिलियावाचून तह परिछिन होत नाही. जर आजी श्रीमंताचीं पत्रे नच येती तरी हरकसे करितो. तथापि पत्रे न येताहि तुम्हास सांगावयाचा तो हुंड्याचा प्रकार सांगितला होता. पत्रे आलियावरी वरकड लिहिलेप्रमाणे न होये तरी याच प्रकारास बल घालून हुंड्या क्षेपनिक्षेप करून घ्याव्या. न देत त्यापक्षी तह करू नये. येणेप्रमाणे निश्चये सर्वांनी बसोन करून तुम्हास लिहिलें असे. येविसीचा जाबसाल सर्वास निखालस कलेसा असा जलदीने लिहून पाठवणे. हुंड्या येतात असे तुम्ही लिहिले तरी तुम्ही येथे वाइदा करून गेल्या-प्रमाणे मुा करू. हुंड्या यावयाचा प्रकार तुम्हास दिसतासला तरी साफ लिहिणे. कोणे गोष्टीचा किल्मेष चितात न आणणे. इतका प्रकार श्रीमंताचे आज्ञापत्रा-वरून लिहिणे लागला. हुंड्या देऊन तह केला तरी जसे कलेल तसे श्रीमंतासी बोलोन अवकृपा जाली तथापि कृपा संपादन करू. न होये त्यापक्षी अनियासे आज्ञेप्रो वर्तणूक केलीसी होती. आज्ञेप्रमाणे वर्तणूक केलिया तुम्हावरील आम्हावरील शब्द उठतो. संस्थानिकासी खडखडीत बोलोन निश्चय कोणताहि येक करून उतर मंदवारी अगर रविवारी पावेसे पाठवणे. आम्ही मंदवारी या तलावरून कुली तोफखानेयाचे पलीकडे कोसावरी मोकाम करितो. रा छ १३ जिल्हेज. हे पत्र धातुपोषणाचे नव्हे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶Gopalrao Govind and Malhar Bhikaji to Banajipant : give details of a despatch from the Peshwa asking them to adopt vigorous measures against the Raja of Mysore and capture some of his posts in case the payment of arrears is delayed. The writers ask the addressee to speed up and settle the tribute and secure hundis from the Raja.

No. 225] *[19-8-1758*

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बनाजीपंत स्वामी गोसावी यासी

सेवक गोपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. तुम्ही गेला तेच दिवसीं

संध्याकाळीं छ १२ जिलकादचीं पत्रें श्रीमंतानी पाठविली ते पावली. त्याचा आशयेहि लिहिला व आम्ही वचनास गुंतलो यास्तव श्रीमंत रागें भरलें तरी भरोन घ्यावें परंतु केला कारभार सिद्धीस न्यावा. यास्तव हुंड्याचा प्रकार तुम्हास जाताना सांगितला होता. त्यास हुंड्या दुसाला खंडणीच्या दिलियानें कारभार विल्हेस लावावा. पुढें जसें होईल तसें पाहातच आहों म्हणून तुम्हास पत्रें लिहून कालीच शुक्रवारी प्रातःकाली रवाना केली. तीं संध्याकाली कालीच तुम्हास पावलीं असतील. ती पत्रे आली त्याउपरी काली पौर्णिमेचे दिवसीं दोन प्रहरा श्रीमंताचीं पत्रें आलीं तीं येथें वाचून संध्याकालच्या साहा घटिका दिवसास काली शुक्रवारी संध्याकालचे तुम्हाकडे रवाना केलीच आहेत. तीहि पत्रें आजी मंदवारीं दोन प्रहरपावेतों तुम्हास पावतील. दोन पुरवण्या तुम्हाकडे पाठविल्या आहेत. त्यांतीलहि आशयें तुम्हास कलेल; मुख्य गोष्टी श्रीमंताचीं पत्रें याप्रो येत असतांहि केला कारभार सिद्धीस न्यावाच म्हणतों, परंतु आपणावरी लटिकवाद आणून घेऊं नये. पुढें श्रीमंत खावंद आहेत रागे भरले तरी पाहातच आहों. तुम्हास श्रीमंतानी पत्र लिहिले आहे म्हणून खटे न होणे. हा कारभार आम्ही लिहिल्याप्रमाणे हुंड्या देऊन संस्थानिकानी विल्हे लाविला तरी तुम्ही आम्ही येकाच टोकऱ्यांत बसलो आहो. संस्थानिकाचे चितास हुंड्या द्यावयाचे येत नसलें तरी ईश्वरें तुम्हावरी आम्हावरी अनियासें निमित्य वारिलें. पुढें होणे ते संस्थानिकांचे अदृष्टानसार होईल. मुख्य गोष्टी हुंड्याचा प्रकार होत असला तरी तसेंच लिहिणे. होत नसले तरी तसेंच लिहिणें, म्हणजे पुढील कर्तव्यार्थ योजूं. हुंडी दिलियाखेरीज दुसरा विचार होत नाही. हुंड्याहि क्षेपनिक्षेप द्याव्या. नवाबाच्या फिरल्या तश्या फिरो नयेत. यास्तव बलकटी करून घेणे. फार काये लिहावें. श्रीमंताचे पत्रावरून तेथील आशये कसा आहे आणि आम्ही कोणे प्रकारची रयात करितों हे दोन्ही प्रकार संस्थानिकांस समजावणें. रा छ १४ जिल्हेज. बहुत काये लिहिणें हे विनंती.

¶*Gopalrao Govind and Malharrao Bhikaji to Banajipant saying that they have received a despatch from the Peshwa intimating that he is not inclined to exchange the ceded territory for treasure from the Mysore Raja. As the writers however have given their word they will abide by it if the Raja accepts the proposals.*

No. 226]

[*20-8-1758*

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री बनाजीपंत स्वामी गो

सेवक गोपलराव गोविंद व मल्हारराव भिकाजी नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुम्ही येथून गुरुवारी

गेला. शुक्रवारी तेथें पावलाच असाल. ते दिवसीं तों कारभाराच्या गोष्टी कांहीच जाल्या नसतील. तुम्ही गेला ते दिवसींच श्रीमंताची पत्रे छ १२ जिलकादची आली. त्याउपरी पौर्णिमेच्या दिवसीं दुसरी पत्रें छ १४ जिलकादची आलीं. त्यांतील दोन पुरवण्या तुम्हाकडे पाठविल्या. पावल्याच असतील. त्यावरून श्रीमंताचे चितांतील दृढ विचार कलेल. मुख्य गोष्टी आम्ही केला कारभार व तुमचा श्रम व्यर्थ होतो. यास्तव आपण केला कारभार सिध्धीस न्यावा. यास्तव पेशजीच बोलिल्याप्रमाणे कारभार सिध्धीस न्यावा म्हणून तुम्ही गेल्यापासोन या पत्रासकट च्यार पत्रे पाठविली. श्रीमंताची पत्रे आली म्हणऊन गोष्टी कोणतेहि बोलिलो नाहीं. हुंड्याचा प्रकारहि तुम्हास निरोप देतेसमईच सांगितला आहे. संस्थानिकांचे विचारास हे गोष्टी येत असेल. उतमच जाले. तिनी मुदतीच्या हुंड्या करून पाठवणे. हुंड्या करावयास येखादा दिवस लागेल यास्तव तूर्त यावयाचा यैवज पुढे पाठऊन देणे. हुंड्या क्षेपनिक्षेप तेथे दिकत न पडेश्या करून घेऊन येणे. जे मुदतीस यैवज द्यावयाचा करार आहे त्याच मुदतीच्या हुंड्या या कार्यास येतील. आलीकडे मुदतीच्या द्या म्हटल्याने नवा करभार होतो. जर हुंड्याचा करार संस्थानिकाचे चितास येत नसला तरी उतर तसेंच लिहिणें. परवाचे दिवसी पत्रे लिहिली होती त्याची उतरे रविवारी पावेतसी पाठवणे म्हणून लिहिले होतें. आजी रविवारी प्रहर रात्र पावेतो आलीं तरी उतमच जाले. नाही तरी उद्याचा दिवस वाट पाहून परवाचे दिवसी तुमच्या पत्राचा मार्ग पाहात नाहीं. हुंड्या दिल्या तरी क्षेपनिक्षेप पष्ट सांगोन पुसोन घेणे. हुंड्या देत नसले तरी सल्ला होत नाहीं. यांत तिलमात्र संशये नाहीं. उतराचा मात्र मार्ग लक्षितो. या तलावरून कूच केले नाहीं. आणखी प्रांत खराब होईल घरे जलतील यास्तव उतर सत्वर पाा. बहुत काये लिहिणे. राा छ १५ जिल्हेज साहा घटिका दिवस प्रात:कालचा हे विनंती.

¶Gopalrao Govind and Malharrao Bhikaji send an ultimatum to the Raja of Mysore through their envoy Banaji Madhav that in case of non-compliance with their demands within 36 hours they will invade his territory.

No. 227] *[24-8-1758*

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बनाजीपंत स्वामी गोसावी यांसी

सेवक गोपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी नमस्कार विनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. तुम्ही बुधवारी

प्रात:कालचीं पत्रें पाठविलीं ती गुरुवारी दोन प्रहरा पाऊन लेखनाभिप्राये अवगत जाला. दुसाला खंडणीची निश्या हैदरनाईक व व्यंकटपतिअय्या यांची चिती हरकसें जालें तरी करावी, परंतु अप्रमाणिकता न घ्यावी. त्यास निश्येचा प्रकार बाराजण साहुकारांखेरीज होत नाहीं. बाराजणांचे मन मनावावयास दोन च्यार दिवस लागतील. त्यास आपली आज्ञा जाली तरी राहून गुंता उरकोन येऊं अगर उठोन येणे म्हणून आज्ञा जालिया उठोन येऊं म्हणून लिहिलें. यैश्यास तुंम्ही मंगळवारची मुदत केली होती त्यास आंम्ही मुदतीप्रमाणे वाट पाहिली. त्यास सोमवारीं लस्करची कही दोन अडीचश्ये घोडी नेली. आदितवारीहि कही नेली. असेंहि असतां बुधवारचा दिवस वाट पाहिली. बुधवार सारा गुदरोन गुरुवारी चेनपटणास तोफा लावाव्या असा निश्चये केला. तों बुधवारी तिसरे प्रहरी तुमची पत्रेंहि आलीं. त्यातील आशये कलला. दिनेक (?) लागून मागती निश्चयेहि नाहीं हे येक. तश्यांत आम्ही ठाण्याठुण्यास तिलमात्र उपसर्ग न करिता अगर तह विघडल्याची संभूत नाहीं, तोच लस्करची कही नेणे आणि ते गोष्टी आम्ही साहावी हे अश्लाघ्य. यास्तव गुरुवारी प्रात:काली प्रजंन्य लागत होता तश्यांतच तोफा लागू केल्या. खंदकावर गुढेकरी होते त्याणी वस्तभाव तो गांवात लाऊन दिलीच होती. पांच च्यार हाजार गुरे मात्र बाहेर होती ती लस्करानें लुटिली. तोफा लागू व्हावयास दोन घटिका लागल्या. सात आठ तोफांची येक रंजक होतांच आतील लोक गडबडून पालऊ लागले तो दुसरी सलक जाली. तसीच हला पडकोटावरी चढली. तों मा(ग)ती पालऊ लागले. मग लस्करांत ताकीद करून लोक मारून काढिले. गांवांत सरकारचे लोक घातले. तिमदय्या राजबिंडा बाहेर भेटीस आला होता. मागती गावांत लाऊन दिल्हा. गांवांत हाती दोन व घोडी लाहान थोर से दीडश्ये पावेतो आहेत. गांवांतील कुलें देखील पटणास बाहेर आणून खंडणी करितों, उदैक कूच करून मदुरास जाऊन मदूर मनगोली वगैरे स्थलें घेतों, तुम्ही तहाचा निश्चये करून लिहिणें, आज्ञा जाली तरी दोन च्यार दिवस राहून उरकोन येऊं, अगर न उरकितां येणे म्हणून लिहिले तरी येऊ म्हणून लिहिले. यैश्यास येक प्रथम सात दिवस आठ दिवस वाट पाहिली. बोलीचाली उरकावयास तीन दिवस येकूण अकरा दिवस लागले. आणखी दोन च्यार दिवस वाट पाहावयास गांठ पडत नाहीं. मागती बोली बनत नाहीं म्हटलें तरी काये करावे? मागती हीच ठाणी घ्यावी? यास्तव आम्ही आजी चेनापटणचे ठाणे घेतलें. राहिलीहि घेतों. तुम्हास संस्थानिकानी राहाविलें तरी राहाणे. दोन तीन दिवसात बोली उरकोन दिली तरी करार करून. लागलाच पैका समागमे घेऊन व हुंड्या घेऊन

साहुकारहि कोणी जे आणावयाचे असतील त्यास घेऊन येणें. दहोंम च्यार दिवसांत उरकूण दिलिया उतम आहे. आम्ही अद्यापि नाकबूल येत नाही. परंतु बोली उरकोन तुंम्ही आम्हाजवल या तोंपावेतो आम्ही ठाणी घेतां राहात नाहीं. ठाणी घेऊन खंडणी करू ते दुसाला खंडणीच्या यैवजात मजुरा देणार नाहीं. तेहि मागणार नाहींत. मागीलहि मजेरा[1] दिलीं नाहीं. पुढील कश्यास मागतील? आम्ही कां देऊं? परंतु अगोधरच बोलले असावे. याउपर उ र ता येक बेगरूलची मात्र राहिली. वरकड ठाणी तीं सहजातच आहेत. त्याणी बेगरूल जो घेतले नाही तो धावत करावी. ते करीतच आहेत. बेगरूल घेतल्यावर मग त्याणी तह करणे आणि आम्ही ठाणी सोडणे हे गोष्टी तश्याच सारिखी आहे. मुख्य गोष्टी तुम्हास दोन च्यार दिवस राहाविलें तरी राहून उरकोन येणे. आम्हाकडून होणे ते होतच आहे. ते जागृत होत नाही. आम्ही त्याजप्रमाणे निद्रा केलियात कुंभकर्णाचे भाऊ. बोलणे मानभावाचे करणी कसाबाची. तहाच्या गोष्टी बोलाव्या लस्करची कही मारून न्यावी. तेव्हा त्याणी मनापासोन तह करणे कलतच आहे. जाणिजे छ १९ जिल्हेज संध्याकाल बहुत काये लिहिणे हे विनती.

¶*Gopalrao Govind and Malhar Bhikaji ask Banajipant to speed up the settlement of the question of the payment of tribute due from the Raja of Mysore; in the meanwhile, they say, they will be capturing the places as there is no knowing when the Raja and Haider would turn on them. They doubt the sincerity of the Raja's desire for peace as he is using the interval for warlike preparations.*

No. 228] *[31-8-1758*

पौ छ २८ जिल्हेज

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बनाजीपंत स्वामी गोसावी यासी

सेवक गोपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. तुम्ही अष्टमी

---

१ वजा.

शनिवारची पत्रें पाठविलीं त्यांत कांही गुंता नाहीं. याजउपर गढियांस उपसर्ग न द्यावा म्हणून लिहिलें, त्यावरून आम्ही मदुरानजीक होतो. तेथून कूच करून बेंगरूलचे रोखें चालिलों; व नदीस पाणी होते. केवल तुमच्याच लिहिल्यावरूनच कूच केलें असेंहि नाहीं. श्रावण वद्य येकादसीची पत्रे पाठविलीं त्यांतील आशयें येक प्रकारचा, अष्टमीच्या पत्रांतील मजकूर येक प्रकार, येकादसीचा मजकूर येक प्रकार; तस्मात् क्षणभंगुर कारभार दिसतो, असे असतां तुम्ही तेथें कश्यास राहिले निघोन यावे. त्यास पाहिजे तरी आपणच येऊन निश्या करून देतील. याउपरी तुम्हीं निघोन येणें, येक क्षणभर न राहाणें. हैदरखान याणी झंडे आलीकडे दिल्हे; तेहि निघोन येणार, फार धमकेच्या गोष्टी सांगतात, सिपाईगिरीची गोष्टी बोलतात, म्हणून लिहिले. यैश्यास खासा हैदरनाईक आपले जमावसुधां बेंगरुलांत येत असले आम्हीं वाट देतों. ते आंत गेल्याउपर मग बेंगरूलास मोर्चे लाऊं म्हणजे त्यांचा पुरुषार्थ तरी कलेल. जाब वल्गना कश्यास पाहिजेत ? ते आपलें जागां मनस्वी बोलिले तरी काये चिंता ? मुख्य गोष्टी मदूर पाण्यामुलें राहिलें. वरकड मदूरचा विचार सर्वांस दखलच आहे. तुम्हीं याउपर क्षण न राहातां निघोन येणें. त्यांचा विचार क्षणभंगुर; अविंध प्रामाणिक मनुष्य म्हणून तुम्हीं सांगत होता, त्यास मद्यप्राशन करून क्षणक्षणा येक विचार करितात. वरकडाची प्रामाणिकता कलली. कोणी आपलें पदरचा पैका देऊन तूर्त प्रांत सोडवील तो सोडवील; अगर बेमुर्वत होऊन सर्वांस वढून पैका घेईल तो सोडवील. हे मोकदम्यांच्याने प्रांतहि सोडवत नाहीं आणि यांत न सोडवल्या संवस्थानाचे कल्याणहि नाहीं; अगर रुपये देणे न होये तरी प्रांत तरी तहामुलें द्यावा. यांत कल्याण तें न होतां, घेतला प्रांत तो घेतला; राहिला प्रांत बादजबरसात तोहि घेऊं, ते कश्यास पाहिजें. पुढे होणार काली होऊ, तूर्त बेंगरुलावर आपण आहें. ईश्वर कायें करितो ते पाहू. आमचा तोटा नाहीं. बेंगरूल कनिष्ट पक्षीं बारा लाख रुपये तो आम्हास देईल. निदानी निमेस तो खत्ता नाहीं. याउपर तुम्ही उठोन येणे. जाणिजे, छ २६ जिल्हेज गुरुवार हे विनंती.

¶*Gopalrao Govind and Malhar Bhikaji to Banajipant asking him to return as no useful purpose would be served by his remaining there on account of the wavering attitude of the Raja of Mysore. "We shall let Haider enter Bangalore"—they further write—"and then raise our batteries and see how he faces them."*

4054

No. 229] [4-9-1758

पा छ ३ मोहरम

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बनाजीपंत स्वामी गोसावी यांसी

सेवक गोपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे. विशेष. तुम्ही शुक्रवारची पत्रें पाठविली ती काली रविवारीं संध्याकाली प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाला. पैक्याचा निर्गम न होये व आपले सिपाईच्या कसबास्तव हैदरनाइकानी च्यार गोष्टी अधिक उण्या बोलून चालून पैक्याच्या निर्गमास लाविले. दो चौ दिवसीं निर्गम करून घेऊन मी सेवक रिकामा कदापि येणार नाही म्हणून कितेक प्रकारें लिहिलें ते सविस्तर कलले. येश्यास तुमचे हातची गोष्टी असती तरी हरकसे करून तुम्ही मागेच उरकिली असती. बरे ते गोष्टी न जाली. हाली तुम्ही लिहिले बहुत उतम आहे. परंतु या गोष्टीस दिसगत न लागावी. जोपर्यंत बेंगरूल घेतले नाही तों पावेतों पूर्वींच संस्थानिकानी व तुम्ही निकड करावयाची करून पैका सुधां व हुंड्या सावकारसुधां आल्यानें उतम आहे. आम्ही काली तोफा नदीपार करून आजी सोमवारीं कूच करून खनखनहली आलीकडे मोकामास गेलो. उदैक खनखनहलीस जातो. जो पावेतो बेंगरुलास न पोहचून बेंगरूल न घेतले तोंपावेतों आल्यात उतम आहे. बेंगरूल आम्ही घेऊन मग तुम्ही आला तरी आजी पावेतों जितके श्रम केले तितके व्यर्थ जातील. बेगरूल घेतल्याउपरी विना श्रीमंतांची आज्ञा आणिल्यासिवाय ठाणी सोडावयाचा विचार होणार नाही. बेगरूल नामांकित जागा. श्रम ते(व)ढ्या मात्र स्थलाचा राहिला. ते घेतल्या-उपर मग प्रांत कां सोडावा? यास्तव जि(त)का प्रेत्न होईल तितका करून हें पत्र पावताच तुम्ही निघोन दो चौ कोसावर पैका व सावकार सुधां येऊन आम्हाकडे पत्र पाठवणे. मग येखादा दिवस वाटहि पाहावयास येईल. तुम्ही पैका साहुकार-सुधा निघाल्याचे पत्र येत नाही. तरी लटक्या होपले[१] गोष्टीवर आम्ही वाट पाहात नाहीं. संस्थानात खरे बोलणे थोडे. लकेरी[२] फार आहे. आजी ताा बोलले खरे कोणते जाले? तें हेंच खरे असें मानावे. यास्तव तुम्ही निघाल्याचे वर्तमान येईतों पावेतों आम्ही करावयाचे करितो. मुख्य गोष्टी सल्लख बिघाडास अवध

---

१ सैल, पोकळ. २ लबाडी.

बेगरूल मात्र आहे. हे संस्थानिकास समजाऊन सांगणे. उपरांतिक त्याचे विचारे कल्याण दिसेल तें करितील. आम्ही व्यर्थ लेहून फाईदा काये? रा। छ ३० जिल्हेज इंदुवार बहुत काये लिहिणें हे विनंती. साहुकारानी हुंड्या देणे त्या बहुत बलकटीने द्याव्या. मग लबाडी करितील तरी कार्याची नाही. हे साहुकारास पुर्ते समजावणे. हे विनंती.

¶Gopalrao Govind and Malhar Bhikaji inform Banaji Madhavrao that they have commenced marching upon Bangalore and would refuse terms once Bangalore falls.

No. 230] *[5-9-1758*

छ ३ सफर ऊर्फ आश्विन
सन तिसा

श्रीसुबाराज

राजश्री सदासिवराव
गोसावी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशले लिहीत असिले पाहिजे विशेष. आपले मनोगतानसार पुण्याचा यावयाचा सिधांत करून, राजश्री पंतप्रधान यांस व आपणास लिहिले असतां, सदुतरें अद्यापि आली नाहीत. यास्तव सांप्रत राजश्री पंतप्रधान यांस व आपणास पत्रें लिहून पाठविली असेत त्यावरून व राजश्री नागोरा(व) श्रीनिवास सांगतील तो सकल अर्थ ध्यानास आणौन त्याप्रो समर्पकोतरे पाठवावी म्हणजे आमच्या येण्यास किमपि विलंब नाही. तेथे आल्यावर सर्व प्रकारे मनोगतनसार करून द्यावयाचा भार आपणांस अंतःकरणपूर्वक असतां वारंवार ल्याहावें यैसे नाही. रा। छ १ मोहरम. वरकड मजकूर, नागोजी श्रीनिवास यास लिहिला आहे त्यावरून कलेल. आमचा भार आपणावर आहे, परंतु आजी-
[शिक्का] परियंती काही घडल नाही. किंचित घडून आल तर तेणकरिता निभाव नाही. आता जाहली तरी गोपाळराव यास लिहून रतनगिरीचे पाच गाव ठाणी पडेत ते कराव. आमची मध्यस्ती आपणाकडे

आलियावर या प्रकार विलंबावर न पडावा; परंतु आमचा भार आपणावर, आपणच निभून द्याल हे भरवसा आहे. पुणेस यणेस उजूर नाही. खर्च वेच व पुढ सर्व ससूत्र पक (पक्के) करण आपले हाती. बहुत काय लिहिण? हे विनंती.

¶Murarrao Ghorpade informs Sadashivrao of his desire to come to Poona for an amicable settlement of his disputes with the Peshwa.

No. 231] [*13-9-1758*

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बनाजीपंत स्वामी गोसावी यासी

सेवक गोपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही ढलाईताबराबरी पत्र पाठविले, पावोन लिहिलें वर्तमान कललें व सखोपंताबराबरी सांगोन पाठविलें तेंहि कललें. यैश्यास जवाहिर सावकारास द्यावें; साहुकारानी पैक्याची निश्या करावी असें आजीपावेतो होतें. हाली सखोपंताबराबरी सांगोन पाठविलें कीं जवाहिर सरकारांत घ्यावे. यैश्यास रोज नवेंच बोलणें बोलू लागला. तस्मात् सल्लख होऊन पैका संस्थानिकानी देणे घडतच नाहीं. जवाहिर घ्यावयास गरज कायें? तथापि जवाहिर देणेंच तरी येथें आम्ही चौघे बसून किमत करूं, त्याप्रमाणें देतील तरी घेऊं, अगर पुण्यास जवाहिर पाठवावें. पुण्याचे साहुकार किमत करितील त्याप्रमाणें पटणकर साहुकारानी द्यावें; न दिल्हे तरी पटणकर साहुकारानी रुपयांची निशा पुण्यांत करून द्यावी. येणेंप्रो होत असालिया जवाहिरहि घेऊं, परंतु हे गोष्ट पटणकर कबूल करीत नाहीं. आधी तों आम्ही जवाहिर कबूल करीत नाहीं. ते नित्य येक बोलणें बोलतात. आजी चौ महिनियांत जवाहिर आम्ही घ्यावयाची बोली आजीच यैकिली. नित्य नवें बोलणें बोलतात; तस्मात् बोली बनतच नाहीं. आम्हास लिहिता कीं तातड न करावी. बेंगरूलास गेल्याउपर केले कर्म निर्फल होईल. यैश्यास तुम्हास जाऊन येक महिना जाला, तऱ्ही तातडच करितां म्हणून लिहितां. आजी कूच करून जाणार

होतो परंतु संखोपंताची भेटी रात्री जाली नव्हती. हे काय सांगतील ते यैकावें म्हणून आजी मोकाम केला, तों मारनिलेनी जवाहिराचा प्रकार सांगितला. त्यावरून निश्चये जाला कीं पटणकरांपासून पैसा प्राप्त होणे नाहीं हें पुर्ते कललें. उदैक कूच करून पुढें जातो. बेंगरूलचें ठाणें घेतों. खंडणीहि बेंगरूलचे स्वरूपानसारच होईल. घेतल्या प्रांताचा बंदोबस्त करून तूर्त घाटबंधारीस जाऊन बाजतबरसात कावेरी उतरून मागती पैठणकराचे मुलूकांत जाऊन तूर्त पैका जमा केला आहे हा त्या प्रांताबदल घेऊन. हा प्रांत सरकारांत राहील. येवंच प्रांताचा प्रांत कोणी आलीकडील जाऊन, मागती रुपये पटणकरांस देणे सुटणार नाहीं हे पुर्ती खातरजमा असो देणे. तुम्ही पुर्ते वाकीफ असोन जाबाला आम्हास महिनाभर गुंता केलात; असो. तुमचे माहितगारीस व निष्ठेस भुलोन राहिलो असो. याजउपर देखतपत्र निघोन येणे अगर राहाणें. जें तुमचे चितास येईल ते करणे. याउपरी आम्ही कोठें न गुंततां बेंगरुलास जातो. याजउपरी आम्ही वाट पहात नाहीं. रा छ ९ मोहरम. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Gopalrao Govind and Malharrao to Banajipant: write expressing their resentment at the dilatoriness of the Raja of Mysore in the payment of dues. They say they would accept jewels instead, provided they are offered at the price at which they will be assessed by the Poona bankers.*

No. 232] *[28-9-1758*

पौ छ २२ सफर
सुा तिसा

श्रीगणराज

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा छ २४ मोहरम मुकाम बेंगरूल स्वामीचे कृपावलोकनेंकरून येथास्थित असों विशेष. स्वामीनी छ २२ जिल्हेजी आज्ञापत्रें पाठविलीं ती छ १६ मोहरमी पावलीं. तेथें आज्ञा कीं पटणकराकडील बाकी वगैरे मिलोन तीस बतीस लाख व साल मजकुरची खंडणी वीस लाख येकूण पंनास लाख रुपये झाडून येक वर्षात पावते करावे ऐशी निशा जाली

म्हणजे ठाणी सोडावीं. पुढे साल दरसाल तीस लाख रुपये देत जावे; याप्रो निशा करून घ्यावी म्हणजे त्याचे संस्थानास उपद्रव लागणार नाही. दुसरा प्रकार पंधरा लाखाचा मुलुख सरकारात आहे तो मागू नये आणि दरसाल पंधरा लक्ष रुपये खंडणी देत जावी याप्रो करणें. हेहि न होये तरी मुलुक सोडवणे म्हणून आज्ञा. ऐशास पटणकरास ऐवजाचा निर्गम करून द्यावयाचें होत नाही. सुप्रयुक्तीनें मुलुकहि देत नाहीत. हाली पटणकराकडून राजश्री बनाजीपंत व भवानी नो आले आहेत; हे येथास्थित बोलेत नाही. कदाचित निर्गमाचा मजकूर जाला तरी आज्ञेप्रो करितों. प्रस्तुत बेंगरुलास मोर्चे लाविले आहेत. ठाणे जेर जाले आहे. अविलंबे फते होईल. यानंतर सविस्तर वर्तमान सेवेसी लेहून पाठऊ. वरकड मजकूर पुरवणी पत्री लिहिला आहे त्याजवरून विदित होईल. विदित होये हे विज्ञापना.

¶*Gopalrao Govind and Malharrao Bhikaji report to the Peshwa that the Raja of Seringapatam is not willing to accept the terms proposed to him by the Peshwa and that Bangalore has been invested in consequence.*

No. 233] [*10-9-1758*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
बनाजीपंत स्वामी गोसांवी यासीं

सेवक गोपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी नमस्कार विनंती. उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणें विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें छ ९ मोहरमी पाऊन लेखनार्थ अवगत जाला. तुमचे हातचा कारभार नसता तरी मागेच उरकिले असतें. याउपरी तऱ्ही साहुकारी हुंड्या घेऊन सत्वर येणे म्हणून आपण लिहिले; त्यास, आम्ही मनुशयेत्न होता तितका केला, परंतु निर्गमाचा विचार न होई तेव्हा उपाये काये? आपण येशस्वी आहेत. कोण्ही-कडून तऱ्ही येश येईल. आम्ही आपला निरोप घेऊन आलों त्यादारभ्य येथ दिवस रिकामें नाही. जे श्रम करावयाचे ते केले. पटणकरापासी ऐवज नाही. हरप्रयत्ने निर्माण करून तिसाची भरती सावकाराची करावी. त्याजकडून च्यालसाची निशा आपली करवावी म्हणऊन येत्न करितात. पंचवीस वीस

पावेतो जमा जाले, आणिकहि तरतूद करीत आहेत. जलदीने होऊन यावे म्हणून आम्ही गुतल येथे आलों. गुरुवारीं संध्याकालपावेतों आपाजीपंत व भवानी नाा याची पत्रें आली कीं साहुकारी निशा जाली, तुम्ही येणें. ऐशास पटणास जाऊन याप्रो जाले तरी करून घेऊ येत असो, नाही तरी आपणाकडे येतो, म्हणौन विस्तारें लिहिलें ते कलले. ऐशास पटणकराचे निशेचा व बोलण्याचा भरोसा पुरत नाहीं. कदाचित त्याचा कल उतम असला आणि निशा करून देत असले तरी सत्वर करून घेणें. बेंगरूल घेतलियावरी सला होणे संकट आहे. बेंगरूल घेतले नाही तोपरयेंत निर्गम जाला तरी बरेच आहे नाही तरी मग मुल्क सुटणार नाही. त्याचा दीर्घसूत्री कारभार. बहुनायेकी क्षणक्षण नानाप्रकारचे विचार होतात. कोण्ही कोण्हाचे कल्ह्यात (कह्यात) नाहीं. कालानरूप संस्थानिकांस बुधिभ्रंश जाला, यास उपाये काये? आम्ही कर्तव्य ते करीतच आहो. इकडील वर्तमान तरी छ ३ रोजी खानकनहलीस आलों, ते दिवसी ठाण्यावरी गेलो नाही. दुसरे दिवसी फौज तयार करून गेलो, तोफाहि आल्या, इतकियात गावकरी कौलास आले. ठाणे सरकारांत घेतलें. येथील बंदोबस्त केला. तोफखाना नदीआलीकडे उतरोन आला. याउपरी येथून कूच करून बेंगरूलास अविलंबेच जातों. पटणकर कारभारी जलदी करीत नाही तरी

*(पत्राचा यापुढील बंद गहाळ आहे.)

¶*Gopalrao Govind and Malharrao Bhikaji to Banajipant negotiating the payment of money due from the Raja of Mysore.*

No. 234] [*Recd. 3-11-1757*

पौ छ २० सफर

श्री

पुा सेवेसी विज्ञापना. अरकाटाहून राजश्री अमृतरांव[१] याची पत्रे आली तेथील ऐवज आणावयास रणसिंगाचे पथक पाठविले आहे ऐवज घेऊन दो चौ दिवसीं येतील. वरकड फुलचरीकरास, दाहा जहाजें जंगी सामानाचीं फुलचरीस आलीं, त्यावरून त्यास बहुत हिमत होऊन कांहीं जमाव खुषकीनें उतरला व जहाजे चेनापटणावरी उतरलीं. फरासिसाचा दुरोख शह होऊन महमदअलीखान इंग्रेज

---

१ अमृतराव शंकर, बळवंतराव मेहेंदळ्यांचा दिवाण.

बहुत डांवाडोल होऊन घाबरे जाले आहेत. अमृतरायास म्हणतात जे, तुम्ही गे (त्यास) आम्हास दम रिवेत नाहीं ऐसे म्हणोन निरो * * * त्यावरून अमृतरायानी लिहिले कीं, दोन हजार फौज रवाना करावी. तेव्हा मााारनिलेस लेहून पाठविलें की, या लढाईत लोक हजारबारासे जखमी, इकडील पठाणाची गडबड अद्याप वोरत नाहीं, इकडील बंदोबस्त जाल्याविना कसे बनेल? तशाहि मध्ये एकाची कुमक करावी तेव्हा पुढें येश घ्यावें; नाही तरी कुमकच कोण्हाची करू नये. त्यांची लढाईची लाट एकाएकीं मिटावयाची नव्हे. हे एकदोन पर्याये लेहून पाठविले आहेत. तुम्ही दाबानें धमकावणीनें तूर्त होईल तेथवरी करणे, पुढें पहातच आहों, म्हणून लिहिलें आहे. पुढें सोई पाहून बनेल तसें करूं. स्वामीनी याप्रमाणे लिहिलें आहे ते प्रमाणच आहे. त्याप्रमाणे वर्तणूक करूं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balvantrao Mehendale reports to the Peshwa that the arrival of the French fleet on the East Coast had terrified the Nawab of Arcot who on that account asked for Maratha help. No help, the writer adds, could however be sent in the present circumstances.*

No. 235] [*28-9-1758*

छ २२ सफर सुाा तिसा

श्रीगणराज

सेवेसी गोपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. पेशजी पटणाहून राजश्री बनाजी माधवराव व रामराव पटणकराकडील वकील ऐसे उभयेतां येऊन दुसाला खंडणीचा व बाकीचा करारमदार करून संस्थानास गेले. परंतु त्यास ऐवजाची सावकारी निशा न होये. सावकाराची मैनोती[१] केल्याविना ते निशा न करीत. संस्थानिकाच्याने सावकारीची होत नाही. ऐसे कललियावर आम्ही बेगरू (ल) चा रोख धरिला व बनाजीपंत यास उठोन यावयाविसीं पत्रें लिहीत गेलो. ते उठोन येत होतीं परंतु संस्थानिकानी राहाऊन घेतलें. सेवटी काही न जाले. यानंतर मााारनिले व भवानजी नाा छ १८ मोहरमी येथें लस्करात आले. वीस लाख नख्त व पंधरा लक्ष रुपयाचे जवाहीर व रंगसेटी याजकडे दोन लक्ष रुपये व नील चिकया म्हणून सावकार आहे त्याची

---

१ व्याजाव्यतिरिक्त सावकाराला ऋणकोकडून मिळणारी एक विशिष्ट रकम.

दोन लक्षाची निशा व दोन लक्षाच्या वरात परगणियावर याप्रमाणें संस्थानिक निशा करून देतात. याप्रमाणे मान्ये करावे म्हणून उभयेतानी फार रदबदली केली. ठाणी सोडून द्यावी. त्यानंतर जवाहीर आणून देतों याप्रो बोलिले. त्यास जवाहीर नजरेने पाहिल्याविना त्याची किंमत कसी होती ? व सरकारचे उपयोगी आहे नाही हें कसे कलते ? याजकरितां ते मान्ये न केलें. याप्रमाणे होत नाही म्हणून साफ सांगितलें. बेंगरुलास मोर्चे लाविले आहेंत. हे ठाणे फते जालें म्हणजे तहाचा मजकूर सहजेच राहिला. खानकनहाली नजीक आप्रमेयेदुर्ग म्हणोन पटणकराकडील पाहाडी किला फार सरस, वर्ती पाणियाची तीन टाकी, पाणी पुर्ते, बेलाग जागा, फौजेचा इलाज नाही, तोफाचाहि नाही, थोडक्या माणसानी राखावा, याप्रमाणे होता. परंतु तेथील किलेदारानी सरकारचा कौल घेऊन किला दिल्हा. आपले लोक वरते चढले. आप्रातिम स्थल हस्तगत जालें. स्वामीस कलावें यास्तव विनंती लिहिली असे. सेवेसी विदित होय. हे विज्ञापना.

¶*Gopalrao Govind and Malharrao Bhikaji speak of the settlement of tributes from Mysore effected by Banaji Madhavrao and Ramrao. They also refer to the capture of Aprameyadurga, a very strong hill-fort near Kankanhali.*

No. 236]

[*Recd. 25-10-1758*

छ २२ सफर सुा तिसा

श्रीगणराज

सेवेसी गोपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी कृतानेक सा नमस्कार विज्ञापना. दुर्गकराकडील खंडणीपैकी बाकी राहिली होती, त्या ऐवजास हिरूर व आहीमंगल दोन ठाणी वोलीस घेतलीं होती आणि दीड लाख रुपये आले म्हणजे ठाणी सोडून द्यावीं याप्रो करार करून ऐवजाचे वसुलातीस माहादसेट दिा माहादसेट वीरकर यास पाठविलें होतें. त्यास त्याणी सदरहू रुपये वसूल करून घेऊ(न) ठाणे मजकुरास आला आणि दोन्ही ठाणी सोडून देविली. त्यानंतर रुपये घेऊन लस्करात आला. बाकी रुपये राहिले ते हसेबंदी प्रो येतील गुंता पडणार नाही. दुर्गकर फार येकनिष्ठेने आहे. कदाचित बाकीचा निर्गम कराराप्रो करून न दिल्हा तरी माघारे फिरतेसमई वसूल करून घेऊन. बहुत करून रुपये ठेवणार नाही ऐसे दिसतें. विदित होय हे विज्ञापना.

¶*Gopalrao Govind and Malharrao Bhikaji write about the two villages—Hirur and Ahimangal—being released on payment of the remaining portion of the tribute by Durgakar.*

No. 237] [Date of despatch 28-9-1758?

छ २२ सफर सुा तिसा [Recd. 25-10-1758

श्रीगणराज

शेवेसी गोपाळराव गोविंद व मल्हारराव भिकाजी कृतानेक साा नमस्कार विज्ञापना ऐशीजे. घाटाखालील वर्तमान तरी फरासिसानी चंदावरास येऊन वेढा घातला होता. किला फार जेर जाला होता. तेहि हला करावयाचे तरतुदेत होते. परंतु चंदावरकरानी तमाम पालेगारास सामील करून त्याची रसद बंद केली. तेव्हा फरासिसानी सल्याचा संदर्भ आपण होऊन लाविला. याणीहि सला केला च्यार लक्ष रुपये द्यावयाचा करार करून पंनास हजार रुपये दिल्हे. इतकियात त्यास गलाहि येऊन पोहोचला. तेव्हा मागती त्याणी बिघाड केला. यानंतर चंदावरकरानी फौजसुधा बाहेर निघून मोर्चे मारिले. त्याचे लस्करावरी जाऊन पडले. तीन च्यारसे फरासीस जिवे मारिले. त्यास पिटून घातलें. याप्रमाणें तिकडील बातमीची पत्रें आली आहेत. चंदावरकराचे व इंग्रेज व महमदअलीखान याचें मानस आहे की आम्हास कुमकेस नेऊन त्याचे पुर्ते पारपत्य करावे. याप्रो त्याचे संदर्भ आले आहेत. बेंगरूल हस्तगत जालियावरी घाटा(खा)ली जावयाचे करितों. यानंतर तेथील मनसब्यासारिखी ज्याची कुमक करावयाची ते करून आपले उपयोगी पडे सारिखे करितों. आथवा दोन्हीकडे भये प्रदर्शन करून सरकारचे कार्य सोईसारखे करितों. विदित होय हे विज्ञापना.

¶*Gopalrao Govind and Malharrao Bhikaji describe how the French tried to attack Tanjore and how they were repulsed with a loss of some 400. They also write that the Raja of Tanjore, the English and Muhammadali desire to take the writer's help and to rout them completely.*

 [October 1758

No. 238]

छ ९ राखर सन तिसा.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना. ताा छ सफर सुा येलवक ताा बेंगरूल स्वामीचे कृपेदृष्टिकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीने कृपाळु होऊन आज्ञापत्र सादर केले ते प्रविष्ट होऊन संतोष

जाहाला. तेथे आज्ञा की, कोलार व होसकोटे व देवनहली व बेंगरूळ वगैरे तालुकियाचा येवज, सिबंदी नेमून दिल्हे याप्रमाणें खर्च करून, बाकी येवज पुणियास हुजूर पाठवणे म्हणोन पेशजी आज्ञा असता, ऐवज अद्याप येऊन पावला नाही हे गोष्ट कार्याची नाही. याउपर जलद येवज पाठवणे म्हणोन आज्ञा. ऐशास, राजश्री बलवंतरावजी देशी जातेसमई सदरहू तालुके सेवकाकडे करार करून देऊन सरकारच्या सनदा जमिदारास वगैरे इजारदारास करून दिल्या. त्याजप्रो अमल तालुक तालुकियाचा सुरू करीत असता रा गोपाल गिरधर याणी सरकारचे पत्र राजश्री बलवंतरावजीकडून सेवकाचे नावे आणिले की, प्रो कोलार सालगुदस्ता सन समानचा वसूल गोपाल गिरधर याजकडे सांगितला आहे, हे वसूल करितील. तुम्ही खलल अमलास न करणे म्हणोन. त्याजवरून आज्ञेप्रो सालगुदस्तापौ नजर व इजारदाराकडील ऐवजाविशी ताकीदपत्रे देऊन यैवज त्याजकडे देविला. सालमजकूरपैकी येवज आम्हाकडे वसूल होऊन पुणियास रवाना करावा म्हणोन येथून कारकून व स्वार वसुलास पाठविले. श्रावणमासाचा हप्त्यापैकी पाच सात हजार रुपये वसूलहि जाले. इतकियामध्ये सरकारची पत्रे राजश्री गोपालराव गोविंद याचे मारफातीने चित्रदुर्गाचे मुकामीहून गोपाल गिरधर याणी आमचे नावी आणिली की कोलार प्रांतीची मामलत यास सांगितली आहे. तुम्ही प्रांत मजकुरचा वसूल न करणें, कारकून वसुलास पाठविला तो माघारे घेऊन येणे म्हणोन. त्याजवरून राजश्री रावजीस लेहून पाठविले की, गुदस्ताचा वसूल मशारानिलेकड हुजरून सांगितला. सालमजकुरचा वसूल आम्ही करावा म्हणोन आज्ञा आहे तेणे प्रो करीत आहो. लेहून पाठविले असता फिरोन सरकारची आज्ञापत्र पाठविले की कारकून उठऊन घेऊन जाणे, खलल न करणे. त्याजवरून कारकून आणिला आण चिनपटणचे मुकामी येथून स्वार होऊन जाऊन राजश्री गोपालरावजींची भेट घेतली. सरकारचीं पत्रे रावजीचे नावे होती व जमीदार व इजारदार याचे नावे होती ते कुल दाखविली. त्याजवरून गोपाल गिरधर यास आणऊन मनास आणून येथास्थित करून देऊ म्हणोन उतर दिल्हे. परंतु आजपावेतों गोपाल गिरधर यास आणऊन त्याच्या आमच्या सनदा पाहून मामलत सुरलीत करून दिल्ही नाही. त्याजमुळें वसूल बंद जाला. इकडील लोक लबाड; त्यामध्ये इतका आश्रय जाहाल्यावर पैसा कोण देतो ? त्यामध्ये ऐवज वसूल करून आज्ञेप्रो पुणियास आम्ही पाठवणार. हे वर्तमान रावजी गोपाल गिरधर याणी सांगितले आण मामलत आपणाकडे करार करून घेऊन वराता आपणावर कराव्या, आपण पैका देतो म्हणोन बोलोन मामल्याची घालमेल केली. नाहाक पैका मामले-

दाराकडे राहिला. रावजीजवळ बहुताप्रकारे समजाऊन विनंती करीत आलो. परंतु राजश्री बलवंतरावजीन केले ते सुरक्षित नसावे हेच मर्जी दिसते. मामलतीस खलल पडली नसती तर श्रावणमासीचे लाख रुपयाची हुंडी पुणियास पाठविली असती. समयास पोहोंचून आमचे चाकरीचा मजुरा धण्याजवळ जाहला असता. घडोन न आले. प्रस्तुत छ मजकुरी गोपाल गिरधर येथे आले आहेत. याउपर कोलारचे मामलतीचा विचार रावजीचे मर्जीनरूप कैसा होतो त्याप्रो सेवेसी विनंतपित्र पाठविले जाईल. सदरहू येवजावर वराता कराव्या म्हणोन फडनिसास आज्ञा केली आहे. वराता करणार ऐसे दिसते. प्रो देवनहलीचा मजकूर कुल मामलत करून आम्हाकडे दिल्ही आज्ञेप्रो चनरायेपटण व बुधगिरे इजारदारास सवाईने देऊन तूर्त पाच हजार रुपये आधी इजारदार याजवळून रसद घेतली. पुढे मामलत सारी इजारियाने देऊन सरकार किफायेत करावी हा विचार करीत असता, धोंडो माणकेस्वर याजकडे पाच समता+ देखील बुधगिरे व चनरायेपटण सवाईने करार करून देऊन आमचे नावे सनद सादर जाहाली, त्याजवरून वडगेनहली वगैरे तीन समता त्याजकडे दिल्हा. दोन समता आम्ही इजारियाने सवाईस पाचसे रुपये आधी करार करून देऊन दिल्ह्या आहेत. त्याकराराप्रो आपणाकड ठेविल्या काहेत. कैवार व तीन समताचा ऐवज इजारपट्याप्रो आम्हाकडे द्यावा ते न करिता म्हणतात की आपण ऐवज हुजूर पाठऊन देऊ, तुम्हाकडे देत नाही म्हणोन धोंडो माणकेस्वर बखेडा करून बैसल आहेत व चिनरायपटण आम्हाकडे आहे त्याजपैकी बेवीस गाव त्याजकड आहेत ते देत नाही. कजिया करून गाव घ्यावे तर राजश्री गोपालराव याचे ताकीदपत्र घेऊन आले त्याजमुले त्यासी बोलता न ये. साहा समता देवनहलीपैकी राहिल्या. त्यास मोरो नारायेण यांसी इजारा करून सवाईप्रो राजश्री बलवंतरावजीन करार करून देऊन सरकारची सनद सादर आमचे नावे जाहाली, येवज आम्हाकडे देविला. आज्ञेप्रा मामलत त्याचे स्वाधीन केली. त्याजपैकी राजश्री लक्षुमण हरि निा राजश्री विसाजी कृष्ण याजकड सतेचालीस खेडी आहेत ती त्याणी अटकाविली आहेत. मोरो नारायण याजकडे देत नाहीं. धोंडो माणकेश्वर याणीच खलिस खेडी अटकाविली आहेत. तेहि देत नाही. त्याचा वसूल ते घेतात. त्याजमुले मशारनिलेचे मामलतीस खलल पडोन श्रावण-मासचे हत्याचे रुपये साडे आठ हजार येणे त्याजप्रो हजार रुपये मात्र वसूल जाहाले. बाकी पैसा येत नाही. आपले मामलतीचे ठीक करून दिल्हे तर पैका देऊ म्हणत आहे. त्याजवरून राजश्री गोपालरावजीजवळ विनंती केली की सनदेप्रो ज्याची मामलत त्याकड करार करून देऊन ताकीदपत्रे देवावी

+ समता=तर्फ, a territorial division.

म्हणोन विनंती केली. परंतु मर्जीस येत नाही. याप्रो दोनी मामलतीचा मजकूर. बेंगरूलचे तालुकियाची ठाणी आम्हाकडे आहेत त्याजपैकी काही पैका येणे तर गाव व ठाण्याच्या पेठा देखील कुल लुटिल्या गेल्या व घरे बरोबर जाहाली. अजमासे साठ हजार घ्यावे म्हणोन बेहडेयास लेहून दिल्हे आहे त्याची गत हे आहे. साठ पैसे मिलणे मुस्कील. होसकोट्याचा परगणा याचा मजकूर तर पिनाकिनी नदी कसबेयाजवल जवल आहे. त्या अलीकडील मुल्क पनास हजाराचा लस्करचे कहीने सेते व घरे व पेवे कुल लुटून रयेतहि लुटली गेली. गुरे चरतात. हाली नदीपलीकडे निमे मुल्क व कसबा राहिला आहे त्याची गत काये होते ते पाहून सेवेशी विनंतीपत्र लिहिले जाईल. जामदारीचे+ स्वारहि मागोन घेतले. हरघडी विनंती रावजी जवल करीत आलो की होसकोटी सरकारचा मुल्क; तिकडे कही पाठऊ नये. पटणवाल्याचा नवा मुल्क नलवगल व सोंडेकोप वगैरे घेतला आहे, येथून दीड कोस आहे, तिकड कही पाठवावी. पुढे तह होऊन पटणवाल्याचा मुल्क तुम्ही सोडून देणार तो राखून घरचा मुल्क लुटवावा, उचित नाही, परंतु आजपावेतो कही देवनहली व होसकोटे प्रांत जाऊन वर्तुलाकार मुलकाचा जाहाला. पुढे पैका येणे नाही. ठाणी राखणे तर पुणियाहून येवज आणऊन ठाणी राखावी ऐसे दिसते. आम्ही सेवक लोक जाहालेल वर्तमान धन्यास ल्यावे. आमचा येत्न नाही. येणे प्रो चहू तालुकियाचा प्रकार आहे. सिबंदीस पैका नाही. धण्यास विदित व्हावे म्हणोन विज्ञापना केली आहे. वरकड वर्तमान राजश्री बलवंतरावजी यांचे पत्री लिा आहे. सेवेसी विनंती करिता विदित होईल. बहुत काय लिहिणे? कृपा निरंतर करणार धणी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat communicates to the Peshwa his difficulties in the matter of collecting tributes in the newly occupied provinces of Bangalore, Kolar, Devanhalli and Hoskot.*

No. 239]

पौ छ २९ सफर. [*Recd. 12-11-1757*

श्री

पुा श्रीमंत राजश्री भाऊ-
साहेबाचे सेवेसी

विज्ञापना यैसीजे. राजश्री सखोबा नाईक माहायात्रेस जाऊन आले. याच स्थली भेट जाहाली. राऊत समागमे देऊन दोनच्यार मजली पोहचाविले.

+ जामदारखान्याचे=रत्नशाळेचे.

चंजावरास पोहचले. राजश्री मानाजीरायाचे त्याचे असारश्य आहे. कासिदाची जोडी त्यासमागमे होती ते आली आहे, याजसमागमे आज्ञापत्रे बुधिवादाची सेवकास सादर करावी. नवाब महमदअलीखान याणी गुलाबी अतराविसीं बजींदी करून सांगितले कीं, पाच तोलेपावतो अतर उंच बेस श्रीमंतास अर्जी लिहून आणवावें. सरकारांत अधिक असिल्या पाठवावें. सेवकाजवळ आल्या सेवक पोहचावील. महमदअलीखान कार्याचे सेवा करून दाखवावयाचे आहेत. हे सेवा करितील. स्वामी याजवरी कृपा करितील. प्रस्तुत चेनापटणात पेचात आहेत. आपली फौज कांही आल्यास तेहि येथे येऊन त्याचे आमचे रिफाकतीने कामकाज करून मुलकाचा बंदोबस्त केला जाईल. तूर्त देवब्राम्हणाचे साह्य जाहाले पाहिजे. माहाराजानी छावणीचा विचार केला होता, परंतु तिकडील अनेक कार्यभागामुले जाणेच लागले. राजश्री बलवंतराव व राजश्री विसाजी कृष्ण यास ठेविले. याणी येथाबुधि बंदोबस्त बराच केला व करीत आहेत; परंतु माहाराजाच्या आगमनाची सलाबत आणीकच. सूर्योदयें कोठे आणि किरणें कोठे? औघी प्रजा व ब्राम्हण तोंडे पसरून मार्ग पाहात असेत. याच्या धावण्यास धावले पाहिजे. सेवक तो उपायात असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*A news-letter communicating to Bhausaheb that Sakhoba Naik has returned from pilgrimage and has reached Tanjore, that Muhammadalikhan requests the Peshwa to send him excellent rose perfume. The letter further describes the difficulties of Muhammadalikhan at Madras and the succour he is soliciting from Balvantrao Mehendale.*

No. 240] [*November 1758*

श्रीसुबाराज

राजश्री बालाजीराव पंडित
प्रधान गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. बहुत दिवस जाहाले, आपणाकडोन पत्र येऊन परामर्ष होत नाहीं. उभयेपक्षीच्या श्नेहास व बंधुत्वास विहित आहे की काये? गोसावी यास स्मरण व्हावे याकरितां राजश्री श्रीनिवासराव

यांस येथोन आपणापासी पाठविलें तरी पत्राभावच दिसो अला. यैसे नसावें. हे दौलतेचा भार व उस्तवारी करावयाचा प्रसंग अपणास मिलाला असतां येतद्विषई ल्याहावेसे काये आहे? वरकड अर्थ माारनिले यांस लिहिला आहे ते सांगतील ते ध्यानात आणून तदनसार करून अपले विभागास यश ये तो अर्थ करावया सूज्ञ असा. बहुत काय लिहिण? हे विनंती. [शिक्का]

¶*Murarrao Ghorpade requests the Peshwa to write to him frequently.*

No. 241] [*Recd. 5-12-1758*

छ ३ रबिलाखर सन तिसा

श्रीमंगलमूर्ति

सेवेसी विज्ञापना यैसीजे. नवाब अबदुल मांसमखान याची व गनीमियाची भेटी जाल्या. सिलिमखानहि होते. परंतु बेबनाव सिलिमखानासी जाला. छ १० रबिलावलीं गंजीकोट्याच्या समीप भेटी होऊन येकत्र जालियाचे वर्तमान तहकीक रायास आलें. गनीमियाच्या भावानें स्वारी करून ताडपत्रीचीं गुरेंढोरें वळून नेलीं, म्हणून ताडपत्रीहून कमावीसदार यांनीं रायास लिहिलें. कनुमडूस सिबंदीचे पंधरा हजार रुपये रायानीं सिलिमखानाची निशा केली. कनुमडूस राजश्री राव ममलकतमदार याचें ठाणें छ ९ रबिलावलीं बसलें. ऐथल पाडकर यांनीं गनिमियासी राजकारण केलें. आउमवाले यांनीं तीनशें प्यादे रायाकडे याडकीस कुमकेस पाठविले आहे. बैंगनपलीकडे फाजलअलीमहमद यानें कुमक केली. सिलिमखान याजवर नवाबाची इतराजी आहे. राजश्री गोपाळराव व राजश्री मल्हारराव यांनीं राजश्री रायास पत्र लिहिलें. पटनकर हैदर नाईक चेनपटणांत कोंडला आहे. फौज सत्वर पाठवावी. रायाची फौज याडकीस मोर्चे लाविले. अदियाप याडकी कौलास आली नाहीं. कौलास येईल अथवा हल्ला करून घ्यावी, त्यांतून दोन्ही होत नाही. फौज गेली पाहिजे. याजकरितां रायास कितेक प्रकारें सांगितलें आहे. हल्ला करून घेणें तरच सत्वर याडकी येईल; नाहीं तर येत नाही. दोनी महिने पाहिजे. मग फौज जाऊन काय कार्याची? वज्रकरूर ठाणे सरकारचें राजश्री लक्ष्मणपंत यांनीं बेनुरांत शेंपन्नास

प्यादे ठाणियांत ठेविले. काटक व देशाई मिलोन राजकारण करून तीनशें पैदे अनूतून फितूर करून बेनुरचें ठाणें बळकाविलें. करितां राजश्री भगवंतपंत व राजश्री नागोजीपंत यास पत्र लक्षुमणपंतीं लिहिल्यावरून उभयेतां फौजेनिसी छ १० रबिलावलीं दाखल करूरास जाले. बेनुरकर देशाई याचीं मुलेमाणसें इडपनलालांत आहेत. च्यारशें प्यादे जमाकरून गावास पानी नाहीं, येक तलें गांवापाशी गोलीच्या टपियांत आहे, येक विहीर आहे, तें पानी पुरत नाहीं यैसें आहे. याजकरितां रायास राजश्री त्रिवर्गांनीं पत्रे लिहिलेवरून दोनशें प्यादे व गोलंदाज ४ च्यार यैसें घेऊन सेवक करूरास गेला. मागून आनखी राव प्यादे व गाडधी व सरंजाम पाठवीत आहेत. फौज जावी तो याडकीस फौज गुतले आणि कांहीं फौज जमा करून पाठवीत आहे. स्वामींचे प्रतापें देसक पराभवता पावतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*News-letter from the Karnatak to the Peshwa giving news of the activities of Murarrao Ghorpade near Gooty.*

No. 242] *[14-10-1758*

छ ९ राखर सन तिसा

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना. स्वामींने सेवकावर कृपा करून पालखीची सनद पाठविली ती पावली. स्वामीचे आज्ञेप्रा विज्येयादसमीचे मुहूर्ते पालखींत बसलो. सेवेसी वृत्त होय. पत्री आज्ञा की, राजश्री मल्हारराव रास्ते व राजश्री गोपालराव याचे वर्तमान, कोठे आहेत, काये मनसबा करितात, बारीक मोठे वर्तमान सविस्तर लेहून पाठवणे म्हणोन आज्ञा. येशास, उभयेता फौजसुधा छ १९ मोहरमी बेंगरुलास येऊन मोर्चेबंदी केली. किला जेर फार केला. तोफाचा मार बहुत केला. त्याजमुले दोन अडीचसे माणोस व पनास साठ घोडे गोल्याने ठार जाहाले. दोती दिवसीं किला कौलास यावा यैसा अर्थ जाहला होता. मोर्चेहि खंदकावर गेले होते. इतकियात हैदर नाईक पटणाहून दोन अडीच हजार स्वार व दोन हजार बार व साठ सतर फिरंगी पंधरा तोफा लहान व दोन हजार कानडे प्यादे येणेप्रा जमावसुधा ठाणे मतूर येथे येऊन मुकाम करून सातसे स्वार व हजार बार चीनपटणास रात्रीचे पाठविले ते येऊन सिड्या लाऊन

किल्यात उतरले. मारामार करूं लागले. तेव्हां सरकारचे लोक सावध जाहाले. कितेक दस्त केले. कितेक जखमी जाहाले. दोन च्यार ठारहि जाले. ते वर्तमान येथे कलताच दुसरे रोजी राजश्री बनाजी माधवराव पटणास तहाकरितां पाठविले ते जाऊन चीनप(ट)णास पावले. हैदरनाइकाची भेट घेतली. कितेक बोलणे जाहले. त्याणी उतर केले की आम्ही सेवक लोक. धण्याची आज्ञा की, बेंगरुलास जाऊन लडाई घ्यावी. त्याप्राा आम्ही तो बेंगरुलास जातो. तुम्ही पटणास जाऊन काय बोलणे ते बोलावे. तेथून आपणास हुकूम येईल त्याप्राा वर्तणूक करूं म्हणोन उतर जाहाले. पेशजी बोली त्याचे मारुफतीनें होती. हाली उतर यैसे जाहाले. हे वर्तमान कलताच हैदरनाइकाजवल सदरहू लिहिल्याप्राा भारी फौज येणार, बेंगरुलास श्रीनिवासराऊ दोनी सेह सोसणार नाही हे जाणून राजश्री गोपालरावजीने मोर्चेमध्ये रात्री छ २८ मोहरमी उठून छ २९ मोहरमी कूच करून ठाणे येलवक व बाणावर दोनीमध्ये बेंगरुलापासून दीड कोसावर मुकाम केला. विज्येयादसमी जाहाली. दुसरे रोजी कूच करून नीलवगलावरून मागडीचे सुमारे मुकाम जाहाला. तेथे थोर तोफा ठेऊन बाकी लान तोफा समागमे घेऊन हैदरअलीचे पारपत्यास दरकूच जाणार. स्वामीचे पुण्यप्रतापेकडून त्याचे पारपत्ये सत्वरच होईल. बेंगरूलचे तालुकियाची ठाणी सरकारात आहेत त्याचे बंदोबस्तास आम्हास सांगोन दोनसे स्वार राजश्री दौलतराव घोरपडे याजकडील आमचे ताबिनांत देऊन आमचे दीडसे स्वार येकूण साडेतीनसे स्वार समागमे आहेत. ठाण्याचा बंदोबस्त करीत आहो. श्रीनिवासराव आठसे स्वार हजार बार साडेपाच हजार प्यादा जमाव बेंगरुलात आहे. आम्हाजवल सामान थोडे, परंतु धण्याचा पुण्येप्रताप थोर आहे. चिंता नाही. श्रीनिवासराऊ भारी जमावानसी आहे. आम्हाजवल जमाव थोडा परंतु आम्हास पुर्ते जाणत आहे. धण्याचे पुण्येकडून आजपावेतो त्याचे पारपत्येच करीत आलो. पुढे हेच उमेद आहे. जैसी निष्ठा ते सफल प्राप्त होतच आहे. सेवेसी वृत्त होये हे विज्ञापना.

¶*News-letter to the Peshwa reporting the fighting with Haidar near Bangalore. Bangalore was assaulted and would have capitulated but for the arrival of Haidar with a strong force which changed the situation. Gapalrao Patwardhan is reported to be trying his utmost to dislodge Haidar from his stronghold.*

4070

No. 243] [Despatched about 14-10-1758
[Recd. 11-12-1758

पो छ ९ रबिलाकर सन तिसां.

श्री

श्रीमंत राजश्री बाबासाहेब
स्वामीचे सेवेसी.

सेवक मुकुंद श्रीपत कृतानेक साष्टांग दंडवत विज्ञापना. तागायत छ सफर-पर्यंत स्वामीचे कृपेंकडून सेवकाचें व पागचें व परगणे हुसकोटें व देवनहली वगैरे प्रांताचें वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान, राजश्री गोपाळराव फौज सुधां येऊन बेंगरुलास मोर्चेबंदी केली हें वर्तमान पेशजीं सरकारचे कासिदासमागमें सेवेसीं लिहिलें होतें, त्याजवरून विदित जाहालें असेल. आलीकडील वर्तमान, बेंगरुलास मोर्चे दिल्ह्यापासोन राजश्री रावजीस सांगत आलों कीं, तुम्हांस बेंगरूल घेणे तर तोफा च्यारपांच पूर्वेचे दरवाजेस पेटत नेऊन जिभीवर[१] मार च्यार दिवस करावा, आण दक्षणेकडे पाणदरवाजा आहे तेथें पांच तोफा लावाव्या. दोनी जिभ्यावर मार केल्यानें कोणी माणूस जिभीत ठरणार नाहीं. इमारत जिभीची कची आहे. जिभी पडलियावर दोहींकडून हला करून दोनी जिभ्या घ्याव्या म्हणजे कौल घेतात, कार्य होतें, म्हणून बहुता प्रकार सांगितलें, परंतु खातरेस न आलें. जेथें तोफा न लावाव्या तेथें लाऊन नाहक दारूगोली खर्च जाहाली. माहाराज राजश्री येकोजी राजे याचे हातची इमारत चुनेगची, जिभीची इमारत मैसुरवाल्याचे हातची कची आहे म्हणोन हा प्रकार माहितगिरीनें सांगितला व लोकहि कितेक सांगत होते परंतु कोणाचेही ऐकिलें नाहीं. आम्हांस जाबसाल केला कीं, आमचे विचारें येईल तैसें करूं. तुम्हांस सांगो त्याप्रमाणे वर्तणूक करणें म्हणोन इतराजी होऊन बोलले. त्यावरून आम्हीं बोलावयाचें टाकिलें. पूर्वेकडील पेटेचा दरवाजियास आम्हास सांगितल्याप्रमाणें तीन दिवसांत हात दगंडावर+ मोर्चे भिडविले. वरकड मोर्चे या प्रमाणेच नजीक गेले. परंतु आम्हीं सांगितल्याप्रमाणें दोनी जिभीस तोफाचा मार दोन दिवस जाला असता तर चहू दिवसीं बेंगरुल हातास आले असतें तें न जालें. येविसीं राजश्री मल्हारराव याणी सांगावें तर ते कोणी कारभारांत येकंदर मन घालीत नाहीं. यांचा कारभार येककली, मनास आलें तें करावें. आम्ही सेवटपावेतों सांगोन बदमर्जी करून घेतली. कारण काय, धण्याचें कार्य जलद व्हावें, नक्ष व्हावा. बेंगरूल

---

१ पुढें आलेला भाग. + हातानं दगडफेकीच्या अंतरावर.

किल्यात उतरले. मारामार करू लागले. तेव्हां सरकारचे लोक सावध जाहाले. कितेक दस्त केले. कितेक जखमी जाहाले. दोन च्यार ठारहि जाले. ते वर्तमान येथे कलताच दुसरे रोजी राजश्री बनाजी माधवराव पटणास तहाकरितां पाठविले ते जाऊन चीनप(ट)णास पावले. हैदरनाइकाची भेट घेतली. कितेक बोलणे जाहले. त्याणी उतर केले की आम्ही सेवक लोक. धण्याची आज्ञा की, बेंगरुलास जाऊन लडाई घ्यावी. त्याप्रा आम्ही तो बेंगरुलास जातो. तुम्ही पटणास जाऊन काय बोलणे ते बोलावे. तेथून आपणास हुकूम येईल त्याप्रा वर्तणूक करू म्हणोन उतर जाहाले. पेशजी बोली त्याचे मारुफतीनें होती. हाली उतर यैसे जाहाले. हे वर्तमान कलताच हैदरनाइकाजवल सदरहू लिहिल्याप्रा भारी फौज येणार, बेंगरुलास श्रीनिवासराऊ दोनी सेह सोसणार नाही हे जाणून राजश्री गोपालरावजीने मोर्चेमध्ये रात्री छ २८ मोहरमी उठून छ २९ मोहरमी कूच करून ठाणे येलवक व बाणावर दोनीमध्ये बेंगरुलापासून दीड कोसावर मुकाम केला. विज्येयादसमी जाहाली. दुसरे रोजी कूच करून नीलवगलावरून मागडीचे सुमारे मुकाम जाहाला. तेथे थोर तोफा ठेऊन बाकी लान तोफा समागमे घेऊन हैदरअलीचे पारपत्यास दरकूच जाणार. स्वामीचे पुण्य-प्रतापेकडून त्याचे पारपत्ये सत्वरच होईल. बेंगरूलचे तालुकियाची ठाणी सरकारात आहेत त्याचे बंदोबस्तास आम्हास सांगोन दोनसे स्वार राजश्री दौलतराव घोरपडे याजकडील आमचे ताबिनांत देऊन आमचे दीडसे स्वार येकूण साडेतीनसे स्वार समागमे आहेत. ठाण्याचा बंदोबस्त करीत आहो. श्रीनिवासराव आठसे स्वार हजार बार साडेपाच हजार प्यादा जमाव बेंगरुलात आहे. आम्हाजवल सामान थोडे, परंतु धण्याचा पुण्येप्रताप थोर आहे. चिंता नाही. श्रीनिवासराऊ भारी जमावानसी आहे. आम्हाजवल जमाव थोडा परंतु आम्हास पुर्ते जाणत आहे. धण्याचे पुण्येकडून आजपावेतो त्याचे पारपत्येच करीत आलो. पुढे हेच उमेद आहे. जैसी निष्ठा ते सफल प्राप्त होतच आहे. सेवेसी वृत्त होये हे विज्ञापना.

¶*News-letter to the Peshwa reporting the fighting with Haidar near Bangalore. Bangalore was assaulted and would have capitulated but for the arrival of Haidar with a strong force which changed the situation. Gapalrao Patwardhan is reported to be trying his utmost to dislodge Haidar from his stronghold.*

[*Despatched about 14-10-1758*

No. 243] [*Recd. 11-12-1758*

पो छ ९ रबिलाकर सन तिसां.

श्री

श्रीमंत राजश्री बाबासाहेब
स्वामीचे सेवेसी.

सेवक मुकुंद श्रीपत कृतानेक साष्टांग दंडवत विज्ञापना. तागायत छ सफर-पर्यंत स्वामीचे कृपेंकडून सेवकाचें व पागचें व परगणे हुसकोटें व देवनहली वगैरे प्रांताचें वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान, राजश्री गोपाळराव फौज सुधां येऊन बेंगरुलास मोर्चेबंदी केली हें वर्तमान पेशजीं सरकारचे कासिदासमागमें सेवेसीं लिहिलें होतें, त्याजवरून विदित जाहालें असेल. आलीकडील वर्तमान, बेंगरुलास मोर्चे दिल्ह्यापासोन राजश्री रावजीस सांगत आलों कीं, तुम्हांस बेंगरूल घेणे तर तोफा च्यारपांच पूर्वेचे दरवाजेस पेटत नेऊन जिभीवर[1] मार च्यार दिवस करावा, आण दक्षणेकडे पाणदरवाजा आहे तेथें पांच तोफा लावाव्या. दोनी जिभ्यावर मार केल्यानें कोणी माणूस जिभीत ठरणार नाहीं. इमारत जिभीची कची आहे. जिभी पडलियावर दोहींकडून हला करून दोनी जिभ्या घ्याव्या म्हणजे कौल घेतात, कार्य होतें, म्हणून बहुता प्रकार सांगितलें, परंतु खातरेस न आलें. जेथें तोफा न लावाव्या तेथें लाऊन नाहक दारूगोली खर्च जाहाली. माहाराज राजश्री येकोजी राजे याचे हातची इमारत चुनेगची, जिभीची इमारत मैसुरवाल्याचे हातची कची आहे म्हणोन हा प्रकार माहितगिरीनें सांगितला व लोकहि कितेक सांगत होते परंतु कोणाचेही ऐकिलें नाहीं. आम्हांस जाबसाल केला कीं, आमचे विचारें येईल तैसें करूं. तुम्हांस सांगो त्याप्रमाणे वर्तणूक करणें म्हणोन इतराजी होऊन बोलले. त्यावरून आम्हीं बोलावयाचें टाकिलें. पूर्वेकडील पेटेचा दरवाजियास आम्हास सांगितल्याप्रमाणें तीन दिवसांत हात दगडावर+ मोर्चे भिडविले. वरकड मोर्चे या प्रमाणेच नजीक गेले. परंतु आम्हीं सांगितल्याप्रमाणें दोनी जिभीस तोफाचा मार दोन दिवस जाला असता तर चहू दिवसीं बेंगरुल हातास आले असतें तें न जालें. येविसीं राजश्री मल्हारराव याणी सांगावें तर ते कोणी कारभारांत येकंदर मन घालीत नाहीं. यांचा कारभार येककली, मनास आलें तें करावें. आम्ही सेवटपावेतों सांगोन बदमर्जी करून घेतली. कारण काय, धण्याचें कार्य जलद व्हावें, नक्ष व्हावा. बेंगरूल

१ पुढें आलेला भाग.   + हातानें दगडफेकीच्या अंतरावर.

घेतल्यानें पंचवीस तीस लक्ष रुपये खंडणी होऊन पैका सरकारांत येतो हें आम्हांस पूर्ण ठावके, हें रावजीस निवेदन करीत आलों. परंतु आम्ही तुमचे पदरचे स्थापित, तुमचे ठाई याची ममता ज्याप्रमाणें त्याचप्रमाणें आम्हांवर. अधिकोत्तर कृपा करितात त्याचा अर्थ कोठवर ल्याहावा? वरकड मजकूर अलाहिदा पत्रीं लिहिला आहे त्यावरून शेवेसीं विदित होईल. बेंगरुलचे तालुकियाची रयेतेस कौल देऊन थोडी बहुत वसाहत केली होती. सेवेसी विज्ञापना. लस्कर आल्यावर देखील ठाण्याची पेटा लुटून बराबर केल्या. त्याजवर रावजीजवळ विनंती केली, ठाणी कोणाचे स्वाधीन करणे ते करावी, आम्हांजवळ पैका नाहीं, ठाणी आपले स्वाधीन करून घ्यावीं किंवा सिंबंदीस पैका सरकारातून देणें, म्हणोन आजपावेतों बोलत आलों. आम्हास उत्तर देत आले कीं, बेंगरूल घेतल्यावर काय सांगणें तें सांगोन तूर्त जतन करणे. त्याजवरून आम्हीं उत्तर दिल्हें कीं, मुल्क व ठाण्याच्या पेठा तुम्हीं लुटितां, सिबंदीस पैका कोठून द्यावा? त्याजवर, आम्हांस धण्याचा हुकूम आहे कीं रावजी आल्यावर ठाणीं तमाम त्याचे स्वाधीन करणे. त्याजवरून आम्ही हमेशा विनंती करीत असतां, ठाणी स्वाधीन करून घेतली नाहीं, बेगमीहि करून देत नाहीं. याजउपर आम्ही आपले लोक उठऊन आणितों ऐसें निक्षूण बोलत आहों, परंतु येकहि निरगम होत नाहीं. दुसरा मजकूर, देवनहली हुसकोठ्याच्या मुलकांत कही घालून रागींचीं सेतें व धानमळ्या कापून आणून गांव लुटून आणितात. होसकोठ्याच्या कसब्याचे तल्यापावेतों मुल्क कुल लुटिला. जामदारीसहि स्वार घेतले होते. जामदारीचा पैका देऊन मुल्क लुटित गेले. च्याळीस हजार रुपयाचें नुकसान जालें. पुढेंहि किती होईल हें न कले. बहुत काय लिहिणे? हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat to Balvantrao Mehendale complaining against the obstinate conduct of Gopalrao Patwardhan at the siege of Bangalore.*

No. 244] [*Recd. 11-12-1758*

छ ९ रबिलाकर सन तिसा

श्री

श्रीमंत राजश्री बलवंतराव बावा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक भगवंत त्र्यंबक कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागायत छ प्रो मलफलचिंतकुटे कसबा मलफल येथें स्वामीचे कृपेदृष्टी-

करून प्रांत मजकूरचें व सेवकाचें येथास्थित असे विज्ञापना. श्रीमंताचे व व स्वामीचें दोन आज्ञापत्रें कासिदाबराबरील नवाब मोहसेनखान याच्या थैल्या बराबर सेवकास पाठविली ते छ १२ सफरी हेच मोकामी पावली. स्वामीच्या पत्रांत आज्ञा जे, यैवज जमा असल त्यास हुंडणावली भारी पडती म्हणोन लिहिलें. तरी हुंडणावल न देणें. यैवज सिऱ्याकडून रवाना करणें. आज्ञेप्रमाणें आहे यैवज त्याची रवानगी करित असों. देवाब्राम्हणाचें सुदामतप्रकारें चालवावया सरकारची सनद नाहीं. ते सदरहू सनद सरकारची करून पाठविली म्हणोन पत्रीं आज्ञा जाली. परंतु सनद पावली नाहीं. पठाणाकडील करारमदार ठरला. त्यासी व सिलीमखान वगैरे याकडील खंडणीचा यैवज येणे त्याचा वसूल आदेपि आला नाहीं. त्यास नवाबास व इतरास सरकारचीं पत्रें पाठविलीं याउपरी सिलिमखानाकडील वगैरे याकडील यैवज सत्वर वसूल करून पाठवणे व करारमदार प्रमाणें जगदेवगडचा प्रांत व ठाणी येणे वगैरे कामे विल्हे लाऊन घेणे म्हणोन आज्ञा केली. यैसियासी प्रस्तुत आम्ही स्वारीस निघून घोलवडचे मोकामास आलों. राजश्री नागोरामहि आपले पथकानसी ते मुकामी पावले. त्यावरी असल्या सामानांत कुमारलालवे नंदीमगल पुलंबिहाळ येथें मोकाम करून वेमन-वकटनायडे व लोहपटनुतक येथील पालेगार या दोघांचें पारपत्य करून दोनी ठाणी फते करून या मुकामास येऊन आज पंचवीस दिवस होत आले हें वर्तमान सविस्तर बयाजवार मुजरद जासूदजोडी बराबरी विनती लेहून पेसजीं रवाना केलें. विनंतीपत्रें सेवेसीं पावतील. सर्व अर्थ विदित होईल. सांप्रती येथें इतके दिवस मोकाम करणेचें कारण आबाजी जिवाजी यांनी लिहिलें कीं पठाण याकडील करारमदार प्रमाणे निकाल पडत नाहीं. कागदीं पत्रीं बहुत लिहिलें व सिलिमखान याकडील यैवजाचा निकाल येकंदर बारवाले पाठविले याचे हातून होत नाहीं व आम्ही सिलिमखानास बहुत साम दंड भेद लेहून पाठविला व आबाजीपंतींहि प्रेत्न केला. सेवट आबाजीपंतीं आम्हांस लिहिलें पाठविलें. जरीकरितां तुम्ही दोन मजली कूच करून पठाणाच्या तालुकियांत मलयालपावेतों याल तरी सिलिमखाना-कडील पैकाहि बारबालीयाच्या वराताप्रमाणे पावेल; व करारमदारपैकीही कामकाज कांहीं विल्हे पडल, सत्वर या रोखें यावें, म्हणोन वकील याचें लिहिलेवरून येणें जरूर पडलें. यैसियासी आम्हीहि ध्यानांत आणिलें. गनिमियाचा व नवाबाचा घरकलहो शह दिलिया काम विल्हे लागल जाणून येथें आलों. पंचवीस दिवस जाहाले. गनीम मिया पसकोल येथें हजार फौज दोनहजार प्यादे बार मिलोन आहे. नवाब मोहसेनखानहि पसकोल नजीक दोन कोसाचें आंतर आहे पोहचून तेथें माकाम केला आहे. आम्ही दोहीकडील बातमी राखून दोहीकडेहि सूत्र खेलऊन

4073

येथं आहों, परंतु प्रस्तुत गनीम मियाचा मजकूर लाच्यार, पुरी पडतां दिसत नाहीं. नवाव मोहसेनखान मूळ वडील जागा, त्याची गनीम मियाची भांजगड लागली आहे. नबाबाजवळ दोन हजार फौज सिबंदीची व उमेद्वार हजार दीड जमा जाली आहे. प्यादेहि तीनच्यार हजार जमा जाले आहेत. सारांष त्याची भांजगड होणार. कर्नूलकर मनवरखानहि नवाबानें बोलाविला आहे. येणार आहे. मनवारखान यानें गनीचें ठाणे येथें खंडोपंत त्याचा पहिला व मेव्हणा होता त्यास ते बदले होते, त्यावर गनीचे ठाणियाजवळ येऊन खंडोपंतास इमान देऊन भेटीस बोलाविलें आणि कैद केलें. ठाणें जुजत आहे, हातास आदेपि मनवरखानाच्या आलें नाहीं. मनवरखानहि नवाबाकडे पोहचणार आहे. येके जागा होऊन पुढें मनसबा काये करतील पाहावा. आम्हास हा काळ पावेतों आबाजी जिवाजी याचीं लिहिलीं येत होती कीं दम धरणें. सिलीमखानाकडील मोहरमचा चांद तेरिखेस तीस हजार रुपये नागमंगळाचे व रावो बावाजी याजकडील हरवालियाच्या पदरीं पडतील. बाकीची मुदत फुरसत करणार, लाच्यारमुळें दिवसगत लागली, सिलीमखानाचें दिवाळें निघालें. यैवज तुम्ही दम धरलिया तीस हजार सध्या उगवल व नवाबाची तुमची भेटीचा योग घडवावा यैसे करार नवाबाच्या चित्तांत आहे. आपणासहि दढतर कलेल, तुम्ही च्यार दिवस मोकाम करणें. उतावळी न करणे यैसीं वकिलाचीं पत्र रोज दीन येत होती. हालीं पंचवीस रोज मोकाम करूनहि नवाब यानी पठाणी काम करून पसकोला आलीकडे साहा कोस होते तेथ आम्ही जावें. त्यानी त्रिमलराव सिलिमखान सामोर पाठविला, भेटीस न यावें व भेट जालियावर नवाबास आमच्या डेरियासी आणावें यैसा नवाबाचा करार करून आम्हास रोज पत्रें वकिलाचीं येत होती व नवाबाचा सेवट नवाब यानी कूच करून पसकोल नजीक कोसा दोनीवर डेरे करून गनिमीयासी भांजगड लाऊन आपलें घरकृत्य समजावें. मनवरखान अलि-यापुढें जो मनसबा करणे करावा. चित्तांत आणून कूच केलें. आमच्या कामाचा किमपि निकाल पडला नाहीं. हालीं आबाजीपंतीं पत्र पाठविलें, पठाणाच्या मनांतील आम्हांस काये केले दिसतें व नवाब बोले तें वर्तमान लिहीत गेलों. सिलीमखानाकडील पैसा उगवतां दिसत नाहीं, करारमदारचीं कामहि प्रस्तुत विल्हे पडतां दिसत नाहीं, यैसें लिहिलें पाठविलें. यावर वकिलास आम्ही काये म्हणावें (?) वकील हुजरून ठेविले आहेत. सरकारकाम नुकसानी होणें जाणे श्रीमंताचे पुन्य समर्थ आहे. येथें मोकाम बहुत दिवस जाहालामुळें हा परगणा व हा गांव खराब आपदहशतीनें वोस गनीमीयाचे लस्करचे दहसतीने होते. आम्ही आलियावर वोस गांव वैरणीकाडीमुळें खराबीच जाली. पुढें जावें तरी नवाबाचा मुलूक खराब

गनीमियाचे कजियामुळें वोस जाला. आमचें लटकें नांव होऊन लस्करचा उपद्रव लागलिया नवाबाच्या करारांत आंतर दिसल. त्याचे गुण दिसनात. स्वामीची आम्हांस ताकीद बहुत कीं त्याचे दाहा पांच अन्याय होऊं देणें मग पाहून घेणे. यैसियासी आम्ही राचोटींत, तोच घाटाखालील वानंबडीचे सरकारचें ठाणें अजीजखानानें त्याच्या घेतल. पठाणी कावा. अजीजखान आपले स्वाधीन नाहीं म्हणतात. वकील पाठविला ठाणे तुमचे सोडील यैसे जाब नवाब पाठवितात. नवाबाच्या चित्तांत सला बिघाड करूं नये, परंतु सलीमखान व इतर मुतसदी पठाण त्रिमलराव यानी परिछिन बेमानी मनी धरून याप्रमाणें वर्तन करितात. बरें, त्याचे त्यास कामास येईल. प्रस्तुत आम्ही येथें गुंतोनहि कांहीं युक्तीस पडत नाहीं. आपला प्रांताचा बंदोबस्तास ताटकरी आनंतपूर नडमदुडीकडे जातो. तैसेच कुटाकुलाकडून घटच्या ठाणियासी घटचे पालेगार मूल व बाइको गुंजानडचा आश्रा करून तस्ती करितात त्याचें पारपत्य करून पुरनूरचा मोकदमा मनास तिसाचा आणून पिलेरीवरून तिरपतीस श्रीचें दर्षण घ्यावया जाणार. याप्रमाणें चितांत मनसबा आणून आस्विन वद्य प्रतिपदेस येथून कूच करून जाणार. सारांष गोष्ट स्वामीनी ताकिदा पाठविल्या. सामदंडभेद तरी जगदेवगडची वाटणी पठाण देत नाहींत. वानंवडीचें ठाणें सोडीत नाहींत. कितेक करारमदार कामहि विल्हे लावीत नाहींत. सिलिमखानहि पैसा बरवे प्रकारें देत नाहींत. याउपरी तजवीज हेच कीं, हासनापुर दिनपाड हे परगणे साठी हजार निवल वसुली गुरूमकोंडापावेतों दोही परगणियाचे गांव व पालेगार सरमिसल यामुळें कितेक या दोहीं परगणियामुळें सरकारची नुकसानी हे परिछिन. आम्ही राचोटीस इकडील बंदोबस्त करीत तिकडे गेलियावर जप्त करितों. यामुळें सला बिघडला तरी पाहून घेऊं. श्रीमंताचे पुन्य समर्थ आहे. विना हे केलियाविना किमपि कांहीं करारमदारप्रमाणें निकाल काकळती येऊन मागीतलियानें होत नाहीं यैसें परिछिन आहे. यैसियासी आपण धणी. सेवकास आनमोदन मात्र देऊन आज्ञापत्र सादर करणार समर्थ आहेत. दिसतो अर्थ सेवेसीं विनंती केली. जैसी मर्जी असेल तैसी आज्ञा करावी. सांप्रत राजश्री गोपालरावजी यानी आमच्या तालुकियांत तमाम पालेगारावर रोखे मसाले करून वकील स्वार पाठविले. याची तपशीलवार विनंती पेशजीं विनंतीपत्रांत केली आहे. हा तालुका स्वामीचा. पालेगार याजकड येक येक पालेगार याजखालीं सरकारचे वसुली गांव दाहापांच गुतकियांनी+ पेशजीपासून करीत आहेत. त्याहि गांवचा वसूल पालेगाराकडे येणें, याप्रमाणे मजकूर असतां रावजीनी यैसी दुही करून आमच्या वसुलास व साल-मजकूरचे खंडणीस डोहणा मांडिला आहे. तमाम पालेगार याचे बोलीचालीची

+ गुतका= exclusive right.

सूत्र येत असतां हा प्रसंग यैसा रावजीनी केला. आम्ही रावजीस विनंतीपत्रें बहुत पाठविली व हालीं वकीलहि पाठविला आहे. परंतु रावजी तो मजकूर गाळून पालेगारास ताकीद पाठवितात. आम्हांस मजकूर गाळून पत्र पाठवितात. हाली आमची जोडी मुजरत आली त्याबराबरी रावजीचें पत्र आले कीं, तमाम पालेगाराच्या तिसाच्या खंडण्या व हमीचा पैका तुम्हांकडे पाठविला यैसें पत्र पाठविणें. आम्ही त्या यैवजावर तुम्हांवर वराता लोकांच्या करूं. यैसा कागद रावजीचा आला. त्यास आमची मुजरद जासूद जोडी बेंगरूळच्या मोकामीहून आली. त्यास आमच्या आतविषई ग्रहस्तानें आम्हांस पत्र लिहिलें कीं रावजीची मर्जी येथास्थित नाहीं. यास कोणे प्रकारें चवंढाळे करून पैसा मिळेल तो हाताखालीं घ्यावा व रावजीनी आवाई खाऊन हैदर नाईक म्हणून पटणकराचा दीड हजार स्वार व दीड हजार बारव प्यादे, दोन हजार, फिरंगी दोनसें यैसे चेनपटणचें ठाणें रावजीनी घेतलें होतें. बेंगरुलापासून बारा कोस आहे तें हैदर नाईक याने दग्यानें पहाटे सिड्या लाऊन घेतलें. ठाणियांत दोनसे स्वार व प्यादे बार मिलोन आडीचशें होते. काही पळाले. काही सांपडले, आमचे आत नारो गोपाळ पोतेनीस हुजुरातची आसामी राजश्री धाकटे नाना पुरंदरे यास ठाऊक आहे तें त्या ठाणियांत ठेविले होते व आणखी यैख्तियारी सरदार रावजीनी कोण ठेविला होता कळता जिवानसी मात्र लस्करास पावलेवर बाडबिशाद लोकांची व यांची ठाणियांतच राहिली. त्या आलीकडे ठाणे रावजीने खणखण-हलीचें बसविलें होतें तें उठऊन आणिले आणि रावजीनी दहशत खाऊन बेंगरूलचे मोर्चे उठऊन दसरियाचे दिवशीं बेगरुलाजवळ कोसाभरावर मोकाम केला. मोर्चे उठवितांना बेंगरुलकरानी सतम+ केली ते पत्रीं लिा नये, यैसे आमच्या आत विशाई याचे पत्र लेख आला रावजीनी आम्हांस कांहीं लिहिले नाही. बालाजीपंत वकील यानी या वर्तमाना अगोधर सला करून, च्यालीस लक्ष खंडणी करार करून, वीस लक्ष सध्या द्यावे, वीस लक्षाचें जवाहीर अगर सावकारी हवाला द्यावा, ऐसा आठा दिवसाचा करार करून गेले तों हैदरनाईक चेनपटणचें ठाणे घेतलें याजवर येणार, छपा घालणार यैसें वर्तमान रावजीनी यैकतांच यानी मोर्चे उठविले. हैदर नाईकावर स्वारी सडी पाठवावी यैसे तजवीज होती म्हणून आमची जासूदजोडी जबानी सांगतात. कागदीं पत्रीं लिहिलें नाहीं. कचें वर्तमान सेवेसीं कळावें म्हणोन लिहिलें. हें वर्तमान पटणकरानीं ऐकिलिया दीर्घद्रिष्ट पाहून पैकियाचा मार्ग खंडणीप्रमाणे करतील तर उत्तम, नाहीं तर गोष्ट तूर्त पेचाखालीं पडली यैसें आहे. म्हणोन आम्हांस बातमी लिहिलें आमच्या ग्रहस्थाचे आले. हें वर्तमान परस्परहि आपणास कलल. कलते प्रमाण आम्हास कले तें सेवेसी लिहिले. सारांष

+ सतम=कहर.

स्वामीचा स्थापित आण मी स्वामीच्या चिरंजिवाचा मुतालीक. या प्रांतीचा बंदोबस्त श्रीमंताच्या पुन्यप्रतापे येथामति करावया आंतर पडणार नाहीं. येक वरीसपर्यंत पालेगारामुळें व कितेक प्रसंगाबदल येक हजार फौज व पांचसे सिबंदी पायेदल नेहमी आसलिया हा प्रांत पुणेप्रमाणे धणियाचा होईल आणि राजश्री गोपालराव-जीनीं पालेगारावर आमच्या तालुकियांत रोखे केले हे मना जालिया आमची सलाबत राहून सर्वहि धणियाचे केल्याप्रमाणें येथास्थित चालेल. कीर्ति आपली आहे. मजकडे गुंता काये ? केल्याचा सेवट लावणार आपण समर्थ. त्वरेने रावजीस श्रीमंताचीं पत्रें सादर होऊन आम्हांकडील पालेगारास रावजीची ताकिदी येते कीं त्याकडे रुजू राहून वर्तणूक करणें येसें जालिया उत्तम आहे. जैसी माहाराजाची यांत मर्जी असेल तैसी सेवकासहि आज्ञा करावी.

¶Bhagwant Trimbak, probably a Kamavisdar, narrates to his master Balwantrao Mehendale his difficulties in collecting chauth from Kadapa province.

No. 245] [*Despatched 14-10-1758.*

छ ९ रबिलाखर सन
तिसा.

श्री १/३

सेवेसी विज्ञापना. बेंगरुलाहून कूच करून कोसावर राहिले. त्यास आठ दिवस जाले. पेशजीं बनाजी माधवराव व निराजी अनंत व धोंडो माणकेस्वर पटणास तह करून रुपये आणावयास गेले होते त्यास राजश्री रावजीनीं+ हैदर नाईकाची सलाबत खाऊन बेंगरूलचे मोर्चे उठऊन कूच केलें तें वर्तमान पटणास गेलें. त्याजवरून पटणकर सेर जाले. पेशजी बनाजीपंतासी करार करून पाठविलें होते. फिरोन आले. त्याजवर मागती पंताची रवानगी केली. पंत पटणास गेले. पेशजीची बोली सोडून दिल्ही. बनाजीपंतास दर्शनाचें संकट जालें. लडाईच्या गोष्टी सांगो लागले. त्यावरून राजश्री पंत मशारनिले यानीं पत्र पाठविलें कीं तुम्हांस बोलून गेलों होतों. त्याणीहि करार केला होता. परंतु मोर्चे उठून कूच करून गेला ती आवाई येथें आईकोन हे बदल जाहाले. तह राहिला. ऐसी पत्र आलियावर दोन तीन दिवस दसरा पुढें होता याजकरितां

+ गोपाळराव पटवर्धन.

मनसबा न केला. दुसरा जालियावर चेनपटणास जाऊन हैदर नाईकाचें पारपत्य करावें, हैदर नाइकाची गाठ न पडे तरी चेनपटण घेऊन पुढें श्रीरंगपटणास जावें, तह करावा, अथवा युध्य करावें ऐसा मनसबा केला. तोफा वगैरे बुनगे नलवगलास ठेऊन स्वारीच्या कार्यायुक्त तोफा व बुनगे व बाजार अगत्य पाहून घेऊन जावे, बेंगरूलच्या तालुकियाचीं ठाणी वगैरे जेथें रखवाली असावी, यैसें चित्तांत आणोन तदोत्तर आम्हांस बोलाऊं डेरियास पाठविलें. नंतर पुसों लागले कीं काये कैसे करावे? पटणास जावे किंवा न जावे? आम्ही उतर दिल्हें कीं धणी आहां. आपल्या विचारास येईल ऐसें असेल ते करावें. आम्ही चाकर लोक जी चाकरी सांगाल ती करूं. त्यावरून आम्हास उत्तर केलें कीं तुम्हांसमागमें पांचसें स्वार देतों. ठाणियाचा बंदोबस्ती करणें. ठाणीठाणियांत गाडदी पाठविले आहेत. तुम्ही तलवियास फिरत असावें. जिकडे न्यून पडेल तिकडे सांभालावें. त्यास आम्ही उत्तर दिल्हे कीं आपण सरकारांतून राऊत देता त्याची बेगमी आपण करितील. परंतु आम्हांजवल स्वार प्यादे आहेत त्याची बेगमी करावी. आम्हांजवल ऐवज नाहीं. बेगमी केली तर राहूं. नाहीं तर राहणें होत नाहीं. ठाणीं कोणाच्या स्वाधीन करणें ती करावी. व दुसरा जाबसाल केला कीं श्रीमंताचीं पत्रें येतात कीं यैवज पेशजीचा पाठवावा. तो न पाठविला तर हालीं जलद पाठवणे. त्यास आम्हीं यैवज पाठवावा तर तुम्ही गोपाल गिरधर यास ताकीद पत्रें दिल्हीं. मामल्यास सख्य केलें. पैका जमीदाराकडे व प्रांत मजकुरीं मुलकांत राहिला. आमचे स्वाधीन इजारदार करावे. गोपाल गिरधर यास निक्षेप सांगावे की गुदस्ताचा यैवज उगऊन वरातदारास देणे. सालमजकूरचे कारभारास समंत नाही. यैसे गोपाल गिरधर व जमीदार कसबे मजकुरी आले आहेत त्यास ताकीद करावी कीं मुकुंदजी वसूल करितील. तुम्ही त्यास पैका देणें. गोपाल गिरधर याजकडे न देणे. याप्रमाणे ताकीद करावी म्हणोन विनंती केली व देवनहलीचे गांव राजश्री लक्ष्मण हरीने घेतले आहेत ते मोरो नारायेण याजकडे देवावे. यैसे दोन चार जाबसाल करून द्यावे. पैका देवनहलीचा तटला आहे. मोरो नारायेण पैका देत नाहीं, याजकरितां सुरलीत मामलती करून द्याव्या. त्यास त्याहीं जाबसाल केला कीं कोलारपैकीं तूर्त वीस हजार रुपये देवितों. तुम्ही सिबंदीस खर्च करावा. आम्ही विनंती केली कीं कोलार प्रांतीचा यैवज पुणियास पाठवावा म्हणोन आम्हांस आज्ञा. आपण खर्च करावा म्हणोन सनदा देत आहां, तर आम्ही जाले वर्तमान सेवेसीं निवेदन केलें. यैवज तोच द्यावा ऐसें जाहलें तर सुखरूप द्यावा. त्यावरून वीस हजार रुपये कोलार प्रांतीं देविले. गोपाल गिरधर याचा कजिया

तुटक न केला. दोन महिने तुम्ही व त्यानी कजिया न करावा. उगच असावें. यैवज आम्ही कमावीसदाराकडील व जमीदाराकडील नजरच घेतों. तुम्हांस पत्रें दिल्हीं व गोपाल गिरधर यासहि पत्रें दिल्हीं आहेत. आम्हांस कांहीं उमजत नाहीं. आम्हीं पत्रें पाठऊन तेथोन जाब आणून मग तुम्हांस सांगणें तें सांगूं. तोंपर्यंत आपले जागीं राहणें. त्याचा पक्ष सर्व करीत आहेत. दरबार खर्च त्यानी फार केला आहे. आम्हांस पैसा द्यावयास मिलत नाहीं, याजकरितां आमचा अनादर करून याचा प्रतिपक्ष श्रीमंतानी वगैरे ग्रहस्तानी केला. आम्ही जीद करावी, कजिया करावा तर रावजीची मर्जी जलद व दुसरे तुमचे स्थापित याजकरितां आमचे ठिकाणी त्यांची अनास्था. दुसरा मजकूर राजश्री लक्ष्मण हरीस ताकीदपत्र देऊन देवनहलीचे तालुकियाचीं खेडीं कुदाणा (?) सिवाई घेतलीं, तीं देणे म्हणोन ताकीद द्यावी. मोरो नारायेणाचे मामलेयाचा बंदोबस्त करावा, ऐवज घेणें लागतो, म्हणोन विनंती केली. परंतु खातरेस रावजीचे कांहींच नये. राजारामपंताकडे हिसब घेणे; त्याजकडे बाकी शाबूत दाहा हजार रुपये निघत आहेत, ऐसें सांगत असतां, ते गोष्टी न धरतां राजाराम प्राणनाथ यानें घोरपडि-याकडील ग्रहस्त वकील सुभराव व मलोबा त्याचा आश्रा करून त्यानीं रावजीस फार कांहीं सांगोन राजारामपंतास जगम (?) कोठें सांगितलें. आपण राजश्री जगजीवनराव कृष्ण यास धंदा सांगितला होता, त्याकडून दूर केलें. सवाईचे चडानें राजारामपंतास दिल्हे. पैका येणे संकट सालास साहा महिने जाहले. परगणेयाची लावणीसंचणी मशारनिलेने येथास्थित केली होती. हलीं प्रस्तुत जगजीवनरायास लस्करांत समागमें नेलें आहे. निरोपहि देत नाहीं. ऐसे नानाप्रकारचे बखेडे आमच्या मामल्यात करितात. परंतु आम्ही काहीं दबून अर्जव करीत नाहीं. येकाचें म्हणोन घेतलियावर दुसरेयाचे अर्जव करणें हें आम्हांस होत नाहीं. जाबसाल करणें तों येथाप्रकारें करीत आहों. दबत नाहीं. आम्हीं त्यास बोलिलो कीं आदावतीमुलें आगदीं मामलत दूर केली, तरी सुखरूप करावी, परंतु अर्जव करणे कदापि घडणार नाहीं. धण्यासी निमकहरामी करणार नाही. जमीदार वगैरे त्यासी मिलोन च्यार रुपये आपण खावे. जमीदारानें खावे. तैसें आम्हांपासोन होत नाहीं. जमीदारासी पुरवल कैसें ? याजकरितां आम्हांस राजी नाही. गोपाल गिरधर यास राजी आहेत, त्याचा परिणाम पुढें स्वामीस कलेल. सरकारचा यैवज वसूल नाहीं ऐसें म्हणतात. रुपया तो निमे घेतला आहे. याप्रो कोल्हारप्रांतींचा विचार आहे. श्रीमंत राजश्री गोपालराव यानी दसरा जाहालियावर कूच केलें. बेंगरूल तालुकियांत ठेवलें. राजश्री दौलतराव घोरपडे याचे स्वार दोनसें आम्हांबराबर दिल्हे आहेत. आपण नल-

वगलास गेले. तेथें भारी सरंजाम तोफा वगैरे ठेऊन हलक्या तोफा घेऊन बाजार बुनगे सुधां चिनपटणाकडे गेले. छ १० रोजीं नलवगलापलीकडे चहूं कोसांचे मुकाम होता. कोलार प्रांतीचे जमीदार व कमाविसदार व गोपाल गिरधर समागमें आहेत. काय मनसबा करितील हें नकलें. येक बालखानाची मामलत आपण करार करून दिल्ही आहे, त्याजवर चड करून जलदीनें गोपाल गिरधर करणार आहे. पुढें फौज पटणाकडे जात आहे. तेथील वर्तमान जें होईल तें सेवेसीं लेहून पाठऊं. आम्हांसी जिद करावयास कारण काय, ऐसें आपण म्हणतील, त्याचा प्रकार हाच कीं ह्या मुलुकांतील लोक व त्याचे लस्करचे लोक आबालवृध म्हणत आहे, कीं मुकुंदराव दोहाशा स्वारानसीं बेंगरुलकरास बाहेर पडों देत नव्हते. च्यारच्यार वेल माडून (मोडून) बेंगरूलच्या किल्यांत घातले, बेंगरूलकरांवर सलाबत बसविली असतां थोरली फौज येऊन बेंगरूलास मोर्च्ये लाऊन फिरोन हैदर नाईकाचें धास्तीनें मोर्च्ये उठऊन कूच करून दीड कोस मागें सरोन राहिले. बेंगरूलकराची सलाबत याजवर बसली. तमाम ठाणी पलों लागलीं तेव्हां त्याचे सरदारीस काये म्हणावे ? त्या गोष्टी कितीकानी त्याच्या रुबरू बोलले. त्यामुलें आम्हांवर जिद धरून हरकोठें फजित पाडावें हाच भाव आणिला. कांहीं मामलतींत रुपये खादले नाहीं. मोठा अभाव[1] हाच आहे. आम्हांपुढें याची प्रशासा सागता काये निमित्य ? परंतु आम्ही काही लोकांस सिकवीत नाहीं, कीं तुम्हीं बोलत जाणें. ऐसें नाहीं. लौकिकांत जालें त्यास आम्हीं काये करावें. याप्रमाणे तपसीलवार वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे, त्यावरून विदित होईल. सारांष तुमचे म्हणवींत आहों दुसरें जाणत नाहीं. अभिमान असों द्यावा. पत्रें वाचून फाडून टाकावीं बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*This long letter, probably by Mukund Shripat to Balavantrao, makes a complaint against Gopalrao Patwardhan and explains his disagreement with him.*

No. 246] *[7-3-1751*

श्रीसुबाराज

राजश्री सदासिवराव गोसावी

यासी.

॥ सकलगुणालंकरण आखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाहब दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून

१ श्रम.

स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे * * * * * * पत्र पाठविलें तें सुसमई प्रविष्ट होऊन संतोश जाहाला. राजश्री श्रीनिवासराव व नारो तुकदेव पाठविले त्यांच्या भेटीनंतर व राजश्री केशवराव विशदे लिहितील त्याजवरून कलेल. ये प्रसंगी खामखा येऊन महत् कार्यसिधी संपादावी. येणेकरून इतके दिवस तुम्ही सर्व प्रकारें आपले हा अर्थ प्रत्ययास येतो म्हणून लेख केला तर उभयेता येऊन पावले नाहीत. लवकरीच येतील, साकल्यार्थ आवगत होईल. सांप्रत लिहीणे ते राजश्री पंतप्रधान यांस पत्र लिहिले आहे. उर्वरितार्थ मारनिलेच्या पत्री साद्यंत लिहिला आहे त्यावरून कलेल. तदनरूप [शिक्का] उभयेपक्षी योग घडऊन येशास पात्र होणे. त्याप्रसंगी आपण असतां लेखनाडंबर किमर्थ? आमचा व या दौलतेचा भार गोसावी-यांस मिलाला आहे. आम्ही आपणासिवाय नाहीं, आपण बंधु म्ह(ण)विल्यास आमच्या मनोदयाप्रमाणें निदर्शन घडे तें करावें. रा छ १९ रबिलाखर बहुत लिहिणे तर सुज्ञ आसा.

¶*Murarrao to Sadashivrao, assures him of his loyalty and brotherly feeling.*

No. 247] [*1758?*

श्री

सेवेसी विज्ञापणा यैसीजे. राजश्री गोपालरावजी यानी रायास दोनी च्यार वेला लिहिले जे, श्रीमंताचे भेटीस आपण सत्वर जावे. आमचा हेत की आपले दरशन व्हावे. यैसे लिहिल्याकरिता राव गुतीहून मदगिऱ्यास आले. दुसरे दिवसी गोपालरायाकडे भेटीच्या मजकुराकरिता नागोजीपंतास व सेवकास समागमे स्वार व साडनीस्वारसहित रवाना केले. गोपालराव बलारीवर आहेत यैसी बातमी होती. त्याजकरीता आम्ही उभयेता दरमजल राजश्रीकडे गेलो तों अधले रोजी दाह कोसाचे कूच केलेच होते. त्याही दरकूच करून रायेदुर्गाचे सुमारें गेले. लस्कर नाटेपे, करिता सांडनीस्वार पुढे रवाना करून राजश्रीकडे पत्रे लिहिली जे, मुकाम (क) राया आम्ही येऊन पावतो, पुढे रायाची आपली भेटी होऊन कितेक मजकूर घडावा लागतो यैसे लिहिले होते. त्याजवरून त्यानी

मुकामाचा निश्चये केला. इतकीयात त्याच रात्री स्वामीकडील सांडनीस्वार व आज्ञापत्र येऊन पोह (च) ताच सवच कुचाचा निश्चये केला. दुसरे दिवसी कूच करून गेले. आम्हा उभयेतास सांडनीस्वारासमागमे उतर लिहिले जे, श्रीमंत स्वामीची आज्ञा जे बिदनूर प्राते तुम्ही जलद जाणे, दिसगतीवर न घालणे, यैसी आज्ञा आली. श्रीमंत स्वामीचा सला याप्रमाने असता अम्हास गुंतायास न ये म्हणून प्रतिउतर लेहून आम्हास पाठविले. त्यावरून आम्ही माघारे रायाकडे हवलगीचे मुकामास आलो. रायास प्रकार भाशले. नागोजीपंती समजाऊन निकालसता दाखविली. राजश्री गोपालराव याही रायेदुर्गासमीप मुकाम केला हे बातमी रायास आली. स्वस्थानिक लबाड नसता भर भरून धर्मवारचे कार्ये साधतील म्हणोन रायानी राजश्री अमृतरावजीस व सेवकास व नागोजीपंत त्रिवर्गास बोलाऊन कितेक धर्मवाराविसी सांगितले. तेव्हा राजश्री अमृतरावजी सडेच गोपालरायाकडे गेले. दुसरे दिवसी रायाही दरकूच करून कुडतनीस आले. अमृतरावजी आजीउदिया येतात म्हणजे याचे कूचहि होईल. कूच जालियावर नागोजीपंत व सेवक पुढे येत असो. स्वामीस मुखपत्री कितेक अर्जा लिहिले आहेत ते चितात येऊन प्रतिउत्तरास आज्ञा न करावी. सेवकास पत्र व पुरवनी त्याहवयास आज्ञा होत असती त्याप्रमाने आज्ञापत्र पाठविल्या चिता नाही. जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे हे विज्ञापणा.

¶*The news-writer Visaji Baburao informs the Peshwa of the movements of Gopalrao and Murarrao Ghorpade and their proposed visit to Raidurg.*

No. 248] [*August 1758*

श्री

श्रीमंत राजश्री महिपतराऊ दादा स्वामीचे सेवेसी

सेवक मुकुंदराऊ श्रीपत साष्टांग दंडवत प्रा। विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. बहुत दिवस स्वामी-कडून पत्र येऊन सांभाल होत नाही याकरिता चित सचिंत असे, तरी यैसे नसावें. सदैव पत्र पाठऊन सांभाल करणार आपण वडील असेत. आम्हाकडील वर्तमान तरी चिरंजीव राजश्री राऊबानी निवेदन केलेच असेल त्यावरून सविस्तर विदित जाहाले असेल. हाली हे प्रांतीचे वर्तमान तरी राजश्री गोपालराऊजी कंदीकिरे

चिकनाईकहली घेऊन निजगलदुर्गास आले. असेत. पुढे तेथून बेंगरूलास येणार यैसे असे. बेंगरूलचा प्रांत सर्व आम्हाकडेस असे. निवल येक ठाणे फख्त राहिले असे. ठाणे हातास आले म्हणजे सर्व केल्याचे सार्थक असे. श्रीमंत राजश्री बलवंतराऊजी येथून स्वार होऊन देसी गेले. श्रीनिवासराऊ वेंकटेश बेंगरूलकर याणी फौज पटणाहून आणऊन आम्हासी दगाबाजी करून येक ठाणे घेतले. लोक जाया केले. त्या दहशतेमुले तीन ठाणी आम्हाकडील लोक टाकून पलाले. कानडे लोक नामर्द! काये करावे ? त्याणी जमाव भारी आणिला. आठसे गाडदी, हजार स्वार, चार हजार प्यादे, च्यार तोफा जेजाला बाण वगैरे सरंजाम करून आम्हावर फार सेर जाहले. आम्हाजवल दोन अडीचसे स्वार, पाचसे प्यादा त्या हंगामी यैन समयास बालोजी सिंदे पागा घेऊन गेले. बेंगरूलकर तो बेलाशक ठाण्याच्या गली पडावे, आमचे गली पडावे हा विचार आरंभिला. त्याजमुले नवी सिबंदी स्वार व प्यादे गाडदी येकून साडेच्यारसे स्वार व तीनसे गाडदी सातसे प्यादा, तीन तोफा, जेजाला बाण वगैरे सरंजाम करून खबरदार राहिलों. इतकियांत बेंगरूलकर देवनहली ठाणेयावर जाऊन ठाणे घ्यावे म्हणोन फौज सुधां बागेतलापासून दोन अडीच कोस गेले. हे बातमी आम्हास कलताच आम्ही सडे तोफा ठेऊन त्याजवर गेलो. त्याची आमची गाठ पडोन धण्याचे नाव घेऊन लढाई सुरू केली. बेलाशक घोडी घालून मोडिले. ते माघारे फिरोन बागेतलाकडे चालिले. त्याचा पिछा करीत बागेतलास आणून पोहचविले. पंधरा माणसे ठार व तीस पस्तीस माणसे जखमी, च्यार घोडी ठार, दाहा बारा घोडी जखमी, दोन घोडी पाडाव येणेप्रा त्याजकडील जाहले. आम्हाकडील च्यार आसामी ठार पधरा वीस माणसे जखमी बारा तेरा घोडे जखमी दोन घोडी ठार. आमचे बसते घोडीस तीराची जखम, येणेप्रा होऊन धण्याचे पुण्येप्रतापें जाते जाहली. ते फार, आम्ही थोडे, परंतु धण्याचे पुण्येकडून थोर येश आले. त्याचा खातरजमा चागला जाहला. परंतु लढाई मोठे आंगेजीची जाहली. यैसे काम धण्याचे तहात जाहले असते तर फारसे ऊर्जित होते. बरे लाभकालास कार्य करावे त्यास वर आठ दाहा दिवस जाऊ दिल्हे. येक दिवसी बागेतलचे पेठेवर जाऊन त्याची आमची लढाई चागली जाहली, परतु धण्याचे पुण्येकडून तेहि दिवसी मोडून पेठेत नेऊन घातले. किल्यापावेतो जाऊन किल्याचा मार आम्हावर होऊ लागला. मग फिरोन मुकामास आलो. ते दिवसी त्याजकडील आठ प्यादे ठार व कितेक जखमी व घोडी जखमी व येक सरदार स्वाराचा मातबर होता तो ठार केला. आम्हाकडील दोघे ठार येक घोडे ठार पाच साहा घोडी जखमी व दाहा बारा माणसे जखमी जाहले. मुकामास येऊन पाच तोफा फतेच्या

मारिल्या. त्या दिवसापासून आजपावेतो पेठ सोडून बाहेर निघत नाही. प्रस्तुत राजश्री गोपालरावजी चित्रदुर्गाकडील गुंता उरकोन कंदीकिरे चिकनायकेनहली दोन ठाणी घेतली. पुढे बागेतलावर येणार म्हणोन लिा आले आहे. आम्हीहि येथील कचे वर्तमान वरचेवर लेहून पाठवीत असतो. येथे येऊन बागेतल घेतील तेव्हा खरे. येथील वर्तमान सविस्तर स्वामीस लेहून वरचेवर पाठवीत आहो. कारण काये, आम्ही सेवक लोक, जाहली चाकरी सेवेसी निवेदन करावी. येंदा कसाला फार केला. दाहा महिने लढाईसी प्रसंग परस्पर स्वामीस निवेदन जाहले असल, ते खरे. याउपर उर्जित करणे आपणाकडे. पुढे कोणे रीतीनें वर्तावे, काये आज्ञा करिता, हा दुरंदेस, सर्व कुटुंब ते प्राते, दुसरा मजकूर शरीर अशक्त पहिल्या अंगांत जखमा, त्यांणी आग तिडकते. आलीकडे येथे येऊन दोन जखमा त्याजमुले शरीरात बाकी नाही. यास्तव विनंतीपत्र लिा आसे. तर कोणे रीतीने वर्तणू(क) करावी हे आज्ञा केली पाहिजे. येक घडीचा अवकाश करून पत्री आज्ञा करावी. हे प्रांते राजश्री गंगाधर परशराम, रावो बावाजी, भगवंतपंत यैसे ठेविले आहेत. परंतु आम्हाप्राा चाकरी कोणाचीहि जाहली नाही. आम्हाप्राा लढाया कोणांवर पडल्या नाही. परस्पर स्वामीस विदित जाहले असल. आणी पटणात भवानजी नाईक व आपाजीपंत सरकार तर्फेने आहेत त्याजकडून खबर आणावावी की पटणात याचे लडाईची खबर कैसी आहे? आजपावेता लढाया किती जाहल्या? ठाणी किती घेतलीं? माणसे किती मारिली? याचे अंगेज या हिंमत येविसीचे वर्तमान कैसे आहे म्हणोन आपण लेहून पाठविल्यास ते सर्व लेहून पाठवितील कीं, कोणाची चाकरी कैसी जाहाली, त्याजवरून स्वामीस विदित होईल. इतके आम्ही लेहून नये, परंतु ल्याहवे लागले. कारण काये, धण्याजवल आम्हा लोकांचे चाकरीचे वर्तमान कोणी सांगणार नाही. आपणांस मात्र कलावे यास्तव लिा असे. चिरंजीव रावबा तेथे पाठविले आहेत. बालोजी सिंदे याची दिवाणगिरीची आसामी आम्हास होती, ते चिरंजीवाचे नावे करार करून देविती, म्हणोन श्रीमंत राजश्री बलवतराऊ बावा याणी आज्ञा केली आहे, त्याजवरून आपणास विनती लिा असे. वडील आहा, कलल तैसे करावे. श्रीमंतास विनंतीपत्रे लिा आहेत, प्रविष्ट करावी, यैसी आपली मर्जीस आले तर करावी. मुख्ये राजश्री बलवंत रावजीस वर्तमान कलावे, यास्तव कचे वर्तमान लिा असे. बहुत काये लिा, लोभ असो दिल्हा पाहिजे, हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat to Mahipatrao Chitnis, describing the sharp engagement he fought near Bangalore and informing the addressee how very assiduously and zealously he was sacrificing himself in the cause of duty entrusted to him.*

No. 249] *[April 1758*

श्रीराम

पुरवणी सेवेसी विज्ञापना आज्ञापत्रें आलीं तीं पावोन संतोष जाहाला.

फुलचारीस वकील ठेऊन चौथाई मागत असावी. मुसाबुसीच्या तालुकियांत उपद्रव करूं नये म्हणून आज्ञा. यैसियास वकील रहिमतुला तेथें आहेतच. चवथाई मागतात हत्ती जीन (स) मात्र तूर्त येईल यैसें दिसतें. चौथाईचा तगादा करणें म्हणून लिहिलें आहे. च्यार तोफा, दोन उत्तम, दोन मध्येम, राजश्री मलाररायाचे स्वाधीन नेहमीं करणें म्हणोन आज्ञा. यैसियास आज्ञाप्रो करूं. गोपालराव मलारराव यांचीं पत्रें गुदगलाचे मुकामीहून आली ती पावलीं. लौकर येतील तरी उत्तमच आहे. पटणचा किला तरी जबरदस्त, दिवस थोडे राहिले याकरितां बेंगरूल वगैरे पेठ्याच्या खंडण्या घ्याव्या. चैत्रमासीं दोन्ही फौजा येक होऊन चित्रदुर्गास जरब द्यावी म्हणौन आज्ञापिले, यैसियास बेंगरुलास तों मोर्चे लाविलेच आहेत. तीं फौज आली मिलाली म्हणजे सव(ड) पाहून चित्रदुर्गाचें काम घडेल तें करूं. फौजा नयेत अगोधर * * केंतर होईल तें करूं.

सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

बनाजी माधवराव यांस तिकडे न ठेवणें, घेऊन येणे, म्हाणोन आज्ञा. यैसियास येतील. नागमंगलास आले आहेत. कोणत्या कार्यास गुंतोन राहिले नकले. येतील तेव्हां घेऊन येऊं.

कोचे [फाटले]

अरकाटाकडे अमृतरायाचें[१] काम फारसें नसिल्यास त्यांस बोलाऊन गोपालरायाजवल आणणें म्हणोन आज्ञा. त्यास त्याचें वर्तमान पेशजीं लिहिलें आहे त्यावरून अवगत होईल. हालीं बाकी साकी अरकाटीं राहिली आहे, त्याचे वसुलास तूर्त राजश्री कृष्णराव भगवंत[२] यांस सांगितलें आहे. वसूल जाल्यास करितील; नाहीं तरी निघोन येणे म्हणोन लिहिलें आहे. सुमार पाहून येतील.

¶*The writer accepts the orders received regarding the affairs of Pondicherry, Arcot and Seringapatam.*

---

१ मेहेंदळ्याचा कारभारी. २ अमात्य.

No. 253] [1747?

श्रीसुबाराज

पुरवणी राजश्री बालाजी पंडित
प्रधान गोसावी यासी

विनंती उपरी. आम्ही कितेक मनसबियाचा आर्थ तपसिलेसी आपणास लेहून राजश्री केशवराव यांसहि विशदें लिहिलें होतें. तेणेंप्रमाणें ध्यानास आणोन राजश्री केशवरायासी जो जाबसाल केला तो आगदी माारनुलेच्या पत्रावरून कलो आला. आणि आपणहि पत्री दर्शविले जे, उभये मनसबा येकच आहे. आपणासी सहसा द्वैत करणें नाहीं. सकल प्रकारीं साहितेस व उभारणीस चुकतों यैसें न समजावे. ज्या गोस्टीस राजकारण जुमस न खाये, पोख्ता मनसुबा होये, तोच आर्थ योजावा. उतावली न करावी. गत वरषाप्रमाणेंच करावें यैसें दर्शविले. त्यावरून परम संतोष पावलों. आम्हास आपणापेक्षा सहितेस आगर हरयेक प्रयोजनास दुसरे कोण आहेत? पूर्वीपासून वडील वडिलानी परस्परे साहिताच करून उभारणी केली आहे. तद्वत आपलीहि ममता आम्हांठाई पूर्ण आहे. आम्ही हरयेक प्रयोजन आगर मनसबा योजू, ते आपल्या प्रत्ययास ये, लौकिकीं उतम दिसे आणि यश ये तोच आर्थ केला जाईल. आम्ही तालेदारीनेंच बिदरूरचे सरदेस आलो. बिदरूरकर, हरपनहली, रायदुर्ग या त्रिवर्गास येकत्र करून आपले कुटांत घेत आहों. आसपजा याणी आवदाचा मनसबेचा येख्तियार आदवानीकरास देऊन त्याचे तैनातीस दाहा बारा हजार फौज केली. आम्हासहि सामील करून घेणे यैसे नबाब आसपजा याणी आदवानीकरास सांगितले होतें. त्याणी आम्हाकडे पत्रे रवाना करून पाठविली जे, गुदस्ता मनसबेस यशाधिकारी जाला. साल मजकुरी उभयेपक्षीं येकत्र होऊन गनिमास नसियेत करावी यैसें लिहिल्यास आंम्हीहि समर्पक उतरे लेहून पाठविली. सर्वहि बरेच आहे. तरतुदेस आंतर करीत नाहीं. राजश्री केशवरायासी करार ल्याप्रमाणें सत्वर फौजेची साहिता होऊन यावी. आपणास यश ये तोच आर्थ करूं. परंतु इतर विचार होणार नाहीं. आमचा दौलतेचा भार श्रीवर, त्याच्या आनुग्रहें सर्व दुरित सहजी सहज परिहार होत आहे. मनसबाच्या प्रसंगास भरोसा आपला आहे. विहित ते कीजे. बहुत लिहिणे तर सुज्ञ आहा.

¶*The writer Murarrao Ghorpade assures the Peshwa that he would never act in a way detrimental to his interests and that he is trying to win over the Chieftains of Bidnur, Harpanhalli and Raidurg to the side of the Peshwa. The letter refers to an earlier date.*

No. 254] [13-1-1759?

श्रीरघुनंदन

तीर्थस्वरूप राजश्री दादा
वडिलांचे सेवेसीं

अपत्यें रामचेंद्रें कृतानेक साष्टांग दंडवत प्रणाम विनंती. येथील वर्तमान तागायत छ १३ जमादिलोवल पावेतों वडिलांचे आसीर्वादें येथास्थित असे. यानंतर आपण येक आसीर्वादपत्र कासीदजोडीसमागमें पाठविलें तें पाऊन बहुत आनंद जाहाला. पत्रीं आज्ञा जे, हे दिवस श्रम साहास करावयाचे आहेत. हमेशा खावंदापासीं राहून श्रम करीत जाणें म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें श्रमास अंतर करीत नाहीं. रात्रंदिवस समीप असतों. दीड पावणे दोन महिने सडी स्वारी चेनपटणांवरी जाली होती ते समईं मीहि समागमेच होतों. रावजी गोटांत राहावें म्हणत होते परंतु तेथेंच राहिलों. माणसाची तारंबल, आपलेपासीं व गोटांत याप्रमाणें पाहीत. परंतु तैसीच च्यार दिवस वाट सोसून होतों. हालींहि स्वारीसिकारींत असतों. श्रमास किमपि अंतर होत नाहीं. कळावें. पटणकराचा तह जाला. ठाणी सोडिलीं. त्यास ठाणी जफ्तीदाखल होती. पत्रें आपलेकडील असावी त्याजविसीं रावजीस विनंती केली, परंतु रावजीनें फडणिसी-कडील म्हणोन आज्ञा केली. आम्ही विनंती करावयाची ते केली. श्रीमंत राजश्री मल्हाररावजीसही वर्तमान निवेदन केलें. त्याणी आज्ञा केली कीं तटास न लावणें. तुमचे कोण ऐकतो? समयानरूप वर्तणूक करावी. याप्रमाणें बोलिले. मीहि त्याप्रमाणें वर्तणूक केली. आपणांस कलावें. ही पत्रें कोण्हाकडील न्यांवीं तें लिहिलें पाहिजे. याचप्रकारें कितेक पत्राचा गुंता पडतो त्याचा मजकूर कोठवरी ल्याहावा? नालिसीचा प्रकार दिसतो. कलावें. पटणचे कारभारांत आनंदराव गोपाल आहेत ते आम्हांस पांचसें रुपये कारकुनी घ्यावी म्हणत होते. आम्ही प्रत्योतर केलें कीं पस्तीस लाखाचा कारभार तेथें पांचसें कसे घ्यावे? तीर्थ-स्वरूप दादा व रावजी समजून घेतील. माझा गुंता काय आहे? याप्रमाणें बोलिलो. रावजीचेहि मतें याच प्रकारें से दोनसें अधिक उणे या प्रमाणे आहे. त्यास आपला आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. येदां प्रांतीचा विचार आहे नाहीं तो सर्वतोमुखें कलेल. मर्जी येक प्रकार आहे. श्रृत व्हावें हे विज्ञापणा. पटणचें कसें करावे ते आज्ञा खामखा करावी हे विनंती.

¶*This letter, probably addressed to Mahipatrao Chitnis, announces that the Maratha commander Gopalrao has halted for nearly two months at Chenapattam and that negotiations with the Raja of Mysore are in progress.*

4089

No. 255] [15-1-1759

श्री

राजश्री रघुनाथराव दादा गोसावी यांसी

ϑ सकलगुणालंकरण आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. राजश्री पंतप्रधान यांहीं राजश्री गोपाळराव व राजश्री मल्हारराव यांजकडे फौज व तोफखाना पाठवावा याविषई सुतरस्वारासमागमे लिहिल्यावरून आम्ही फौज व तोफखाना गा * * फिरंगी व मातबर सरदार सरंजामसहित चिरंजीव राजश्री सिवराम बावा घोरपडे व खान इनीसखान नागड या समागमे देऊन रवाना केले. मुख्य+ गोष्टी आम्हास पंत प्रधान यांच्या मरजीविना अधिकोतर नाहीं. मरजी रक्षणे जरूर जाणून रवानगी केली. त्यास फौजहि लौकरी उभयेता रावजीकडे जाऊन पावेल. सांप्रत मकरसंक्रमणप्रयुक्त तिळशर्करा पाठविली आहे: स्वीकारली पाहिजे. इकडील सर्वार्थ राजश्री नागोजीराव श्रीनिवास यांस लिहिला आहे त्यावरून कळों येईल. रो छ १९ माहे जमादिलोवल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade assures Raghunathrao of his full co-operation in the policy of the Peshwa and of his having despatched troops to Gopalrao and Malharrao.*

No. 256] [January 1759?

श्रीरामो जयति

पुरवणी राजश्री महिपतराऊ दादा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. पटणकरानी तमाम धूम मांडली आहे. चिरंजीवाचीं पत्रें कडबाहून वरचेवरी जमावाविसीं येतात. पटणकराचा जोर फार आहे. सर्वांस

+ येथें डावे बाजस चौकोनी शिक्का.

आपलाली ठाणीं जतन करावयाची फिकिर लागली आहे. राऊजीचा प्रकार बराच आहे. चिरंजीवावर या गडबडींत गारद्याच्या वराता करून कडबांत बखेडा मांडला आहे तो अर्थ पत्रीं कोठवर ल्याहावा? ठाणी जतन करावीं की वरातदारासी भांडत बसावें ऐसा पेंच पडला आहे. उपाय नाहीं. जैसें होईल तैसें पाहून घेतों. कांहीं मामलतीचा करार करावा तरी वराता केल्याचें उचित तेंहि नाहीं. येकायेकीं वरातदार घरीं बसविल्यास काये म्हणावें येविसीं काये ते आज्ञा करावी. श्रीरंगपटणकरानी चेनपटण घेतलें. रावजी बेंगरूल सोडून निघाले. त्याणी यांचे बाजारबुनगें गलाव्यांत आणिलें. प्रांत सारा अफरातफरीक जाला आहे. यांत गाडद्यांच्या वराता चिरंजीवावरी करून प्राणघाताचा प्रसंग आरंभिला आहे. आपण ताबडतोब ये गोष्टीचा उपाय करून चिरंजीवाचा बच्याव होये तें करावें. त्यांचीं पत्रें आली तींच बजिनस आपणांकडे पाठविलीं आहेत. या प्रांतें त्वरेनें खासा स्वारी अगर राजश्री बलवंतरावजी येतात तरीच सर्वांची स्थीत राहाते. नाही तरी कांहीं उबार राहतां दिसत नाहीं. याणी श्रीमंताचे प्रतापें श्रीरंगपटणकरांस पराभविलें तरी आम्हां सर्वत्रांचा बच्याव नाहीं असा अर्थ आहे. बहुत काय लिहिणें, लोभ असावा, हे विनंती.

¶*The news of the capture of Chenapattan by the Raja of Mysore and consequent disorder in the Maratha ranks is communicated to Mahipatrao.*

No. 257] *[3-4-1758*

श्री

शेवेसी दाजी नारायेण विनंती विज्ञापना यैसीजे येथील वर्तमान ताा छ २४ रजब सोमवार मुाा सासवडपावतो स्वामींचे कृपेकडून येथास्तित आसे. यानंतर राा बलवंतरावजी याणी सेवकासमागमे हाती व घोडी वगैरे जिनस किरकोली देऊन पाठविले. त्यासी खासास्वारी गंगातीरी आहे म्हणून यैकिल; यांजकरिता पंथ लांब आणि वाटेने हाती घोडी आणखी फारच हैराण होतील याजकरिता गंगातीराकडे खावंदाकडे न येता छ १७ जााखरी लस्कराहून मुाा बैगनपली प्राा कडपे येथून निघालो ते छ २२ रजबी सासवडास दाखल जालो. तदनंतर उदईक कूच करून कवडीचे पागेस जाऊन मुाा करितो. तेथे घोडियासी ठाण चांगले पाणी गवत उतम प्रकारें आहे आणि लस्कराहून रोा इंद्राजी कदम आम्ही समागमेच आलो. वाटेने इंद्रोबानी मजली दाहा कोस बारा कोस नित्य चालले याजकरिता घोडी मोगली सकुमार हैराण फार जाली, यास्तव तेथे राहून निगादास्त चांगली उतम प्रकारे करितो. यैसियासी येकपक्षी तिकडे खावंदाकडे

परभारेच यावे तर मागती धणियाची आज्ञा नाही यास्तव येथच राहातो. पुढे ज्याप्रो आज्ञा होईल त्याप्रो वर्तणूक करू. वरकड तिकडील लस्करचे वर्तमान तर रो रायानी सिवेसी परभारे लिा होते त्याजवरून निवेदन जालेच आसेल. प्रस्तुत श्रीरगपटण याचे मुलकातच जाणार होते. श्रीरंगपटणकरानीहि प्रस्तुत यैवजाचे येत्किंचित तरतुदेस लागले होते. सेवक लस्करात आसता कागद बातमी आली होती की तमाम सावकार बसऊन चैपाची (चौत्राची?) लक्षा रुो याची मुरलीदास वगैरे पटणचे सावकार याजकडे तरतूद केली आहे, म्हणून खबर आली होती. त्या आलीकडील वर्तमान सेवेसी आलेच आसेल त्याजवरून निवेदन होईल. आम्हाबराबर हाती सुमार १६ आहेत त्यापौ जुने आपले येथील समशेरा जाचकाबाा १ नागीन लाडी नगारियाची १ येाा दोन. बाकी हाती १४ व घोडी खासी कोतल २२ आहेत. त्यात चांगली उतम प्रतीची खावंदाचे रझेयोगी सुमार ७ सात आहेत. त्यातहि दोन घोडे फारच चागले आहेत. चंदन व शामकर्ण घोडे २ त्याचे गुण खावंदाचे आवलोकन जालिया-नंतर प्रत्यास सर्वहि येतील. परंतु घोडे सारेहि लगामावीण त्याचे रूप नाही. हातीत पाच हाती चांगले आहेत. आसल्या पदार्थात बरेच आहेत. वाजीद-खानाचा बसता हुसेनी हाती आहे तो चांगला आहे. सेवेसी निवेदन जाले पाहिजे. आम्हासमागमे वाट खर्चास रुो ४००० च्यार हाजार दिल्हे होते त्यात सेवकाने युक्तीनेच कसोसी करून येत किंचित यैवज सिलीकच ठेविली आहे. सेवेसी निवेदन जाले पाहिजे. वरकड वर्तमान खावंदाचे पायेदर्शण जालियानंतर सेवेसी निवेदन होईल हे विज्ञापना.

¶*Daji Narayan informs the Peshwa of his having brought horses and elephants from Seringapatam and desires to know where he should meet the master.*

No. 258] *[Date of receipt 1-5-1758*

पो छ २३ साबान

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. कासीदजोडी समागमी आज्ञापत्र सादर जाहालें तेथ आज्ञा जे बिदरुर संस्थान येथील गुदस्ताची बाकी साडे तीन लाख रुपये वसूल घेतला.

---

* पत्र कर्नाटकस्वारींतलें. गोपाळराव पटवर्धनाबरोबर बलवंतराव मेहेंदळे, त्रिंबकराव पेठे वगैरे होते, त्यांपैकीं कोणाचें तरी पेशव्यास हें पत्र आहे.

त्यापैकी येक लाख दाहा हजार रुपये तनखेदार किले मर्दनगड व बंकापूर किला यास आदा वजा करून बाकी दोनी लाख च्यालीस हजार रुपये राजश्री बलवंतरावजी यांकडे देणे. सालमजकुरचा पहिला हप्ता मार्गसीर मासाचा साडेतीन लाख रुपये त्याणी लस्करास नेले असिले तर बरेच जाहाले. न नेले तर कुली साडे पंधरा लाखाचा भरणा मार्गसीर व माघ व वैशाख हा येवज नख्त व अखेर भाद्रपद मासाची हुंडी पत्र व रा नरसपा नाईक यांचा जातरोखा व कार्तिक मासाचा रा शिवलिंगपा कारभारी याचा रोखा समेत हुजूर पुणियास तूर्त रवाना करणे म्हणून आज्ञा सादर जाहाली. येसियासी बाकी पैकी सिलक व पहिला हप्ता वसूल जाहला तो तपशील हुजुर विनंतीपत्री लिहिलाच होता, त्याप्रा लस्करास राजश्री रावजी यांसहि लिहून पाठविलेच होतें. त्यास तेथून लिहून आले जे बाकीपैकी सिलक व सालमजकूर मार्गसीर माघ दोनहि हपते वसूल करून पैका मोजदाद करून थैल्यावरी आपली मुद्रा घालून बंकापुरी राजश्री नरसपा नाईक यांच्या दुकानी ठेवणे. रखवालीस राजश्री गोविंद सखदेव यांसी सरकारचे ताकीदपत्र पाठविले जे पंचवीस प्यादे विश्वासू नेहमी ठेवले म्हणून पत्र १ आणि सेवकास सरकारचे आज्ञापत्र जे बाकीचे सिलक व सालमजकुरचे दोनहि हप्ते बंकापुरी जमा करून ठेवणे. लस्कराहून वराता व तनखेदार येतील त्यास सनदेप्रा येवज बिलाकुसुर पोहचता करणें येसी ताकीदपत्रें आली. तेव्हा त्याप्रा करणेंच लागलें. आलीकडे तडका वराताहि होऊ लागल्या. दर्शनी हुंडीस काही तरी येका दिवसाचा वाइदा मुदत असती. परंतु लस्करच्या वरातदारास अवकाशच नाहीं. पुढां वैशाख मासाच्या वसुलास आजच लिहून पाठवितात जे वसूल निकडीने घेणे. त्यायेवजीं तनखेदार यांची रवानगी मागून होते आहे येसी येथील निकड लागली आहे. हुजूरची आज्ञा तर सालमजकुरचा येवज झाडून पुणियासच पाठवावा येसें दोहीकडील पेंच सेवकानें कसे सांभाळावे ? सालमजकुरचा येवज पुण्यासच न्यावा येसी हुजूरची मर्जी असेलच तरी राजश्री बलवंतरावजी यास आज्ञापत्र सादर व्हावे जे बिदरुरचा येवज सालमजकुरचा हुजूर आणविला आहे. परभारे वराता न कराव्या. याप्रकारें वरातांचा बंद करविलेया काही राहिला येवज वैशाख मासाचा हप्ता तरी हुजूर पोहचता होईल. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*The Peshwa's agent at Bednur solicits his orders as to how he should despatch the amount of the tribute to be realized from Bednur, whether send it direct to the Peshwa or to Balwantrao Mehendale.*

4093

No. 259] [Received 23-4-1759

छ २९ शौबान तिसा

श्रीत्र्यंकटेश

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामी गोसावीयासी

विनंती उपरी. तावरगिरे येथे ठाणे घातले होते. त्यास अदवानीकर सफदरजंग फौजसुधा या प्रांतात येऊन अनेगोंदी व कनगिरी (कनकगिरी) येथे उपद्रव करू लागले. आम्हाकडे वकील पाठविले कीं तावरकीर सोडून देणे. राजश्री गोपालराव यानी अदवानीची खंडणी केली आहे त्याप्रमाणे ठाणे सोडलिया ऐवज पावल. ठाणे सोडीत नाही तरी ऐवज वसूल होणार नाहीं; व मारानिले-कडील वकीलहि बापू नारायण आहेत, त्यानीहि लिहिले की ठाणे सोडिलियासिवाये ऐवज देत नाही. ठाणे ठेवावे तरी मुलुख अगदी बेचिराक दाहा पाच गाव मात्र आहेत. वरकड सर्वत्राने जागा जागा घेतले असत, ऐसा प्रकार आहे. मोगलाकडील वकीलहि आले असत. अनेगोदी व कनकगिरी येथे उपद्रव देऊ नये. रा। गोपालराव यानी खंडणी केली त्याप्रा। ऐवज सुरलीत घ्यावा ऐसा प्रकार ठीक जालिया ठरल त्याप्रा। उलगडून सेवेसी लेहून पाठवितो. फौजेस परवानगी देऊन निरोप देतो. मर्दनगडाची व गोमांतकाची सीव नजीक खेडी-पाडी आहेत त्यांस सावतांकडील कुमक करावी म्हणोन आज्ञा जाली होती. त्यास सावंताचा मुलुक खराब होणार नाही. होता इकडीलच मुलुक खराब होईल. घाट बंद जालिया जकात वगैरे हसील बुडतो. फिरंगियासी सखेत्व आहे तेहि तुटते, यास्तव विनंती लिहिली असे. बिघाडच मर्दनगडकरी याने करावा ऐसेच जालिया आज्ञेप्रमाणे वर्तणूक होईल. फिरंगियाकडील वकील व रा। विष्णु नाईक सेवेसी पाठविले असत. सर्व वर्तमान विनंती करितील. राजश्री उधव वीरेश्वर मर्दनगडची चौकसी करून परभारे गेले. बंदोबस्ती कोणे प्रकारे जाली हे कलले नाही. मारानिलेस स्वामीनी विचारून आम्हास आज्ञा करणे ते करावी. बहुत काये लिहिणे? लोभ असो दिला पाहिजे हे विनंती.

¶*The Peshwa's permission is sought to hand over Tavargire to Safdarjang who has made it a condition for the payment of the tribute. As regards sending help to the Sawant a policy of neutrality is recommended as the Portuguese are not, says the writer, likely to invade the Sawant's territory for the present.*

No. 260] [26-4-1759

पो ११ रमजान

श्री

पुरवणी बाबूराव सदाशिव
स्वामी गोसावी

विनंती उपरी पत्रें पाठविली ती पावली. तालेकोट वगैरे ठाणीं घेऊन बंदोबस्त केला. राजश्री आपाजी रामचंद्र याजकडील तालुका याजकडेच असो द्यावा, दुसरियाकडे न द्यावा म्हणोन लिहिले ते कलले. यैसियासी आपाजी रामचंद्र याजकडील मुदेहालच्या तालुकियाची ठाणीठुणी होती तो सरंजाम मुदेहाल * * राजश्री सोनजी भापकर याचे लोकाचे स्वाधीन सनदाप्रमाणे करवणे. तालेकोट वगैरे ठाणी तुमच्या दबावानीं नवी ठाणी आली आहे त्यास आपाजी रामचंद्र याजकडील आनंदराव येथें आले आहेत. जाबसाल होणे तो होईल, तदनरूप तुम्हास लेहून पाठविले जाईल. जाणिजे छ २८ शाबान सुा तिसा खमसेन मया व अलफ हे विनंती.

¶*The writer to Babuji Naik communicating how far he has executed the task entrusted to him of handing over the Taluka of Buddhehall.*

No. 261] [2-5-1759

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामींनी सांडणीस्वारासमागमे पत्र पाठविलें तें पावलें. कर्नोलचे कार्याचे काय केले तें लिहिणे म्हणोन आज्ञा, ऐसियास श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांणीं पत्र पाठविले कीं कर्नोलचे जमीदाराचे राजकारण आहे, तरी त्या प्रांते जाऊन तेथील जमीदाराचे गावास कर्नोलवालियाचा वेढा आहे, त्याचे पारपत्य करून मुलुक हस्तगत करावा म्हणोन. त्यास आज्ञेप्रमाणें मजल दरमजल कर्नोलसमीप पाच सहा कोसावर कृष्णातीरी नजीक पाटकूर येथे आलो. आठ मुकाम केले, परंतु जमीदाराकडून कोण्ही आले नाही. आम्हाकडील फौजेचा शह व तिकडोन राजश्री गोपाळराव याचे फौजेचा शह यास्तव कर्नोल-वालियाने जमीदाराचे गावास वेढा घातला होता तो उठोन गेला. जमीदाराचा मतलब होता तो जाला, आणि पाहतां त्याचे हातीहि कांहीं नाहीं. वेढा पडला होता, यास्तव आपले कार्याकारितां च्यार गोष्टी तेथे बोलिले असतील. येथे

निदर्शनास कांहीच आले नाही. मुलकांत जाऊन धामधूम करावी, तर दिवस नाहीत व तेथील घासदाणियाची चुकोतीहि राजश्री गोपाळराव यांजकडे जाली आठ दिवस जमीदारांचा मार्ग पाहोन वैशाख सुध शष्टी बुधवारी कृष्णातीरीहून कूच करून गंगातीरचे रोखे भागानगर प्रांती आलों. कृष्णातीराहून दोन मजली आलियावर लस्करांत मरी आली. दोन च्यारसें माणूस मेले. आणखींहि नित्य तोच प्रकार आहे. स्वामीचे पुण्यप्रतापेकरून सर्व परिहार होईल. हे पीडा निवारण जालियावर सेवेसी लेहून पाठवितों. भागानगर प्रांते आलो. येथें कांहीं घासदाणा घ्यावा तरी नवाबाचें खालशाचा मुलुख त्यांचा स्वामीचा श्नेह, यास्तव विशेष घासदाणा घेता नये. आगत्याआगत्य चालते मजलीखालीं थोडे बहुत येते तितकें घेतों. पुढें गंगातीरास जाऊन इंदुर बासवाडा वगैरे लाख पंनास हजाराची जागा होती, त्यास नवाब निजामअलीखान भागानगरास जावयाकरितां बोधनावर आले आहेत म्हणोन वर्तमान आहे. ते आठच्यार दिवस त्या प्रांते राहिले म्हणजे तिकडील रुपया येणे तो सहजेच राहिला. त्यांचे बातमीस सांडणी स्वार लस्करांत पाठविले आहेत. त्याजकडील व * (पुढें पान मिळालें नाहीं.)

¶*Probably Malharrao Raste writes this to the Peshwa, explaining the condition of the Nawab of Karnol, his own difficulties in collecting Ghasdana and other dues and his journey towards Bhaganagar. The letter shews how the Marathas had nearly completed their designs in the southern region.*

No. 262] [*1-6-1759*

छ १९ सवाल

श्रीगणराज

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोपाल गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ ९ सवाल मेाा नरेंद्र स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे. विशे(ष). स्वामीचे पत्र खंडेराजुरीच्या तळावरील जासुदाबाा सादर जाले. ते आजी छ मारी पावले. तेथे आज्ञा जे, फिरंगी मर्दनगडास आल्याचे वर्तमान तुम्हास कळून, तुम्ही कुमक न केली; म्हणून आज्ञा. यैश्यास फिरंगी गोव्यातच आहे. यावयाची तयारी करणार * * * * * श्री येसाजी राम याणी गडबड केली. यैश्यास त्याचे पत्र येतांच गाडदी तयार करून पाठविले. त्यास ते दो महिनियाची तलब मागों लागलें. गयाल आसामी काढिल्या त्या करार

कराव्या येसें मनस्वी भाषण करू लागलें. त्यास आलीखान असावा तरी तोहि प्रसंगी नाहीं. गाडदी शंभर घरचे शंभर भाषणें करूं लागले आणि खर्चाची बेगमी आम्ही करावी तरी ऐवजाची तरतूद कोठेहि कर्जवाम मिळेना. राजश्री हरिपंताकडील ग्रहस्थ धारवाडी आहेत. तेहि काही कर्जवामदेखील मेळऊन देईनात यास्तव गाडदी जावयाचे राहिले. आमच्या लोकानी रवानगी तकुबाविसी पडल्या घोड्याविसी गवगवा केला होता; तो हे वर्तमान मर्दनगडाहून आल्याउपर जसा कलेल तसा वारून, चिरंजीव नारायेणराव याजबा पांच सातसे स्वार देऊन, घाटमाथा पाठवावे म्हणून तयारी केली. प्रस्थानदेखील ठेविले. इतकियांत राजश्री येसाजी राम याजकडून संतोषाचे वर्तमान आले जे, फिरंग्यानीं किल्यावर दोन तीन येलगार केले होते परंतु फिरंगी मारून काढिला. तो माघार फिरून कवलेजवल नदी उतरून गोव्यास जावयास गेला. फिरंगीयाकडील दाहा वीस फिरंगी मारिले, पांच सात माणूस फिरंगी धरून आणिले म्हणून लिहिलं धारवाडास आले. त्याणी याप्रा आम्हास लिहिले. त्यावरून मग फौज पाऊसाची हैराण कश्यास करावी; म्हणून पाठविली नाही. काली वर्तमान मागती आले जे, आपणांकडील लोकानीं फिरंगियाच्या साहा तोफा पाडाव केल्या. फिरंगी मोडून नदीपलीकडे घातला; म्हणून वर्तमान आले. त्यास फिरंगी नदी उतरून नामोहरम होऊन गेला हे येथार्थ * * * * परंतु तोफ घेतल्याचें प्रमाण वाटत नाहीं. आणखी वर्तमान येईल ते वरचेवर सेवेसी लिहून पाठवितों. आम्ही येथें आल्याउपर सावनूरकरांचे व सिरहटीकरांचें व सोंदेकरांचे वगैरे सविस्तर वर्तमान दो पत्री सेवेसी लिहिले आहे. त्यास प्रथम पत्र तों स्वामी पुण्यास दाखल जाले असतील म्हणून पुण्यासच जावयास सागितलें होते. ते पत्र प्रविष्ट जाले नसले तर दुसरे मागाहून पाठविलें. त्यास सेवेसी जाऊन पत्रे द्यावयास सांगितले आहे. तीं पत्रें सेवेसी दाखल होतील. सावनूरकर व सिरटीकर पैका देत नाही. त्यास सावनूरकरांचे परगणे जप्त करावयास आज्ञा असावी म्हणून विनंती लिहिली आहे. आज्ञा येईल त्याप्रों वर्तणूक करू. काली शनवारापासून पाऊस अतिशय लागला आहे. आणखी मर्दनगडाहून पत्रे आलियावर चिरंजीव नारायेणराव यांची रवानगी करितों. फौज जाऊन करणे काय ते विदि(त)च आहे. परंतु घाटमाथापावतो पाठवितों. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

¶*In reply to a communication from the Peshwa asking why he did not send help to Mardangad when it was attacked by the Portuguese, Gopal Govind explains that he could not secure money with which to pay the army. He however prepared an expedition under Narayanrao when he learnt that the Portuguese attack had been repulsed.*

4097

No. 263] [August 1758

श्रीसुबराज

राजश्री सदासिवराव भाऊ
गोसांवी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. सुतरस्वाराबराबर पत्र लिहून पाठवले होते तदनुसार राजश्री सिवराम बावा घोरपडे व खांन इनिसखान नागड यासमागमे नामांकित सरदार व उत्तम लोक बार फिरंगी व तोफखांना सरंजामसहित रवाना करून उभयेता रावजीच्या मनोदयानुरूप प्रवर्तणे येसें सांगून राजश्री विसाजी बाबूराव व राजश्री सुबराव श्रीनिवास चिटनीस यांसह रवाना केले. दरमजल जाऊन पावतील. इकडील वोढीमुळे गुंता पडिला होता. रवानगी परगणेची बंदोबस्ती राहती करून आपल्या मरजीनच सर्व प्रयोजनें समजोन, लोकाची समजावीस (करू)न रवाना केले; तेथील प्रवर्तहि उभयेतां रावजी परोक्षीं लिहितील त्यावरून आवगत होईल. आम्हास आपल्या मरजीविना अधिकोतर कांही नाहीं. दौलतेची पुरोवृद्धि होऊन आपल्या मध्यस्तीस येश ये, तो अर्थ करावा. वरकड अर्थ राजश्री नागोराव श्रीनिवास यांस लिहिला आहे. आपणास सांगतील त्यावरून कलेल. आमचा भार आपणावर; वडीलपणास विहित ते कराव. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade communicates to Sadashivrao Bhau that as desired he has despatched a strong well-equipped force to reinforce Gopalrao Patwardhan and Malharrao Raste.*

No. 264] [August 1759?

१

खान अजम हैदर अली खांजी
दाम मोहबत हू

ॐ मोहीबान-पन्हा मखलीसान दस्तगाहा अजी मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब सलाम महवल मकसूद आंकी येथील खुसी जाणून आपली खुसी कलमी करणे दिगर. मा। दौलत बालाजीराव प्रधान याचे लस्करास वीस

स्वार रवाना केले आहेत यांस हमराह अदमी देऊन लस्करास पोहचाऊन देणे. तिकडोन येताना माणसे देऊन इकडे पावत करणे. लस्कर कोणे जागा येऊन उतरले आहे हे खबर तुमच्या माणसाबरोबर खत देऊन पाठवणे. जियादा[1] काये लिहिणे?

¶*Murarrao Ghorpade to Haidar asking for a free passage for the 20 horsemen proceeding to the army of the Peshwa.*

No. 265] [*3-8-1759?*

छ १६ जिल्हेज

श्रीसुबराज

राजश्री विसाजीपंत

गोसावी यांसीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिले पाहिजे विशेष. राजश्री श्रीनिवासराव व राजश्री विसाजी बाबूराव * * बरा व आपला निरोप घेऊन * * * * * न भेटून सर्व अर्थ सांगितला व * * * ष्ट केली त्यावरून सर्व मजकुर कलला फौज व तोफखानासह राजश्री सिवराव घोरपडे व इनसखांन यास पाठऊन द्यावे, आम्हीं आपणासिवायें नाहीं यैसें कितेक जाणविले. त्यास उभये-पक्षीचा ऋणानुबंध सामान्य नव्हे. फौजसह चिरंजीवास आपल्या भरवस्यानें पाठवावें. फौजेचा खर्च चालऊन तोफखान्याचा खर्च तटूं न देतां सर्व प्रकार परामृष कराल या गोष्टीची निशा जाणून चिरंजिवास पाठवावयाचा सिधांत केलाच आहे. प्रस्तुत शेरीरीं स्वस्छ नव्हते त्यामुले रवानगीस कांहीसा विलंब लागला. सर्व प्रकारें आपण निभावणार असता याच्या रवानगीस उजूर नाहीं, येतद्विषईचा मजकूर विसाजी बाबूराव यास सांगावयाचा सांगितला आहे. व श्रीनिवासराव मारनिले लिहितील त्यावरून कलेल. तदनुसार समर्पक उतरें पाठऊन द्यावी. सारांश आम्हीं आपणासिवाये नाहीं. चिरंजिवास तोफखाना व फौजसह खर्चवेच चालावयास आपलाच भरवसा मानून रवाना करीत आहों. पुत्र * * * * * वर्तमान आईकून बहुतच * * * * * वस्त्रेसह पत्र पाठविल्यावरून वि * * * यानी समारंभेकडून

---

१ ज्यादा, ज्यास्त.

प्रविष्ट केली; पाठविल्याप्रमाणे पावली. उभयेपक्षी दुसरा विचार नाहीं. हा हर्ष आपल्या घरचा आहे. वर्कड अर्थ राजश्री मल्हारराव रघुनाथ यांस लिहिला आहे; ते सांगतील त्यावरून कलो येईल. सर्वदा कुशलार्थ लिहून चित तोष्टवीत असिले पाहिजे. रा छ ९ जिल्हेज. * मुख्य विचार आमचे ठाई आपली प्रीत आसावी. फौज तोफखाना पाठवितो. च्यार रोज आधिक उण वोडीकरिता व शरीर उपाधीकरिता; वितर नाही. मुलुकची रखवाली करावी हे उतम होत; परंतु चितास येईल ते समर्पक. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade writes to Visajipant that he offers to send Siwarao Ghorpade with an army and a park of artillery to support Gopalrao Patwardhan and Raste, on the assumption that the expenditure for the army will be borne by them.*

No. 266] *[11-9-1760*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालकोबा तात्या स्वामी गोसावी यासि

पो विसाजी कृष्ण कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी यैसे न करिता सदैव पत्र पाठऊन संतोषविलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तरी श्रीरंगपटणची खंडणी गुदस्ता राजश्री गोपालरावजीच्या कराराप्रो द्यावयास संवस्थानिक रुजू असतां हैदर नाईक त्याचें काही येक चालूं न देतां गतवर्षी गोपालरायाजवल लडाई दिल्ही होती त्यामुलें फारच शेर होऊन बेहोष जाहाला होता आणि खंडणी न द्यावी यैसा विचार करून आपलें सामानसुमान तयार करून खबरदारीने पटणच्या शुक्रवारपेठेत बसला होता. दारू गोली वगैरे सरंजाम बेमबलग यास्तव केवल त्यासी झुंजेनच म्हटल्यास ठीक पडणार नाही, बरसातीचे दिवस व माणूसहि जाया कां करावे, सामदामेकरूनच कार्य करावे या अर्थे संवस्थानिकांसहि थोडे बहुत सांगून पाठवावयाचें ते पाठविले व मागाहून तीन च्यार हजार फौज निवडक घावडावाखाले पारपत्ये उतम प्रकारें करावें या उद्येश पाठविलीं, तों फौज पोहचताच सरकारची फौज आली. संस्थानिक व हे येक जाले. याउपरी आपला प्राण वांचत नाहीं यैसी दहशत खाऊन आवसान न धरवतां येकटा बाइकामुले

टाकून रात्रीचा पळून बेगालुरास गेला. तेथेंहि जाऊन पारपत्य करावे या पैरवीत आहों. होईल ते करीतच आहों. सारांश शेर तों जाहाला होताच, परंतु धण्याच्या प्रतापापुढें त्यास टिकाव धरवतो यैसे नाही, त्यामुळें भयभीत होऊन पळून गेला. जाहालें वर्तमान आपणास कळवें म्हणून लिहीलें असें. सविस्तर वृत सरकारांत व राजश्री बळवंतराव बाबास लिहिलें आहे त्यावरून कळेल. संवस्थानिक दुसाला खंडणी गोपाळरावजीच्या कराराप्रों व त्यासिवाय घासदाणा तीन लक्ष याप्रो द्यावयाचा करार करून व नवी ठाणी त्याणी घेतली होती ते माघारी करून देऊन सरकारांत रुजू जाहाले. पुढें होईल वर्तमान ते लिहिले जाईल. प्रस्तुत आम्ही हुसकोटियावर आहो व फौज पट(णा)सच आहे. पैका व हुंड्या व ठाण्याच्या चिठ्या घेऊन लौकरच येतील. पुढे घाटाखालील राजकारणेहि फार आली आहेत. होतां होईल ते करितो. मुख्य गोष्ट श्रीमंताचे कृपेकरून हे महदकार्य होऊन सेवक लोकास येश आले. संतोषाचे वर्तमान (आपणा)स कळावे म्हणोन लिा आसे. तिकडील सविस्तर वर्तमान हिंदुस्तानचे सविस्तर लिहून परामर्ष करीत जावा. रा छ १ सफर बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Visaji Krishna to Balkoba Tatya informing him of the writer's victory over Haider Naik and the submission of the Raja of Seringapatam.*

No. 267] *[30-11-1759*

पौं छ १ जमादिलोवल—
पौश सुा सितैन

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री नानासाहेब
व ताा राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ९ माहे रबिलाखर मुकाम मडकसिरे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे विज्ञापणा यैसीजे: राजश्री भाऊसाहेब याजला मुसफर-खानाने समत करून दगा करून कटार मारिली ते डावे बगले खालती जखम लागली, ईस्वरे खैर केली. स्वामीच्या प्रतापे क्षेम जाले. राजश्री राव ममलकत-मदार यास स्वामीनी पत्र लिहिले जे, राजश्री भाऊसाहेबास खफतियाने कटारी

चालविली. खुब्या खालती जखम कटारीची थोडकी आहे. क्षेम आहे. जखमहि सत्व(र)च बरी होईल म्हणौन स्वामीनी पत्र, मुदाईम जासूद जोडीबरोबर पाठविले ते पत्र छ २९ रबिलाखरी मडकसिरियास पावले. पत्र पाहोन राव बहुत श्रमी जाले. राज्यात भाऊसाहेब म्हणता आनीक कोन्ही नाही. ईस्वरी क्षेम केले म्हणौन वारंवार राव श्रमी होत होते. आम्हा लोकास रुसावयास व बोलावयास अगाध नव्हते. हरकसे आम्ही राजश्री भाऊसाहेबास बोलिलो परंतु आमची भीड फार करून त्याही म्हणौन राखत गेले. आम्हास आनीक कोण आहे? त्याजवरच रुसावे त्यानीच आमचा गौर केला म्हणौन आम्ही आपले जागा हे फिकीर आहे. मोठे अरिस्ट चुकले. तुरुकाने बेइमानी केली. त्यास नसीयेत जाली. जो जैसी कर्म करील तो तातकाल फल पावल. त्याची वर्तनूक चांगली नाही म्हणौन रायानी खेद खेद केला. श्रीस नवस केले आहे. श्नान केले, वस्त्रे श्रीमंत स्वामीनी राजश्री भाऊसाहेबास दिधली हे वर्तमान रायास आले म्हणजे ब्राह्मणभोजन करून तोफा कराव्या म्हणौन राव बोलिले आहेत. चितापासून हेच राव म्हणतात. येथून राजश्री रायानी राजश्री भाऊसाहेबास वस्त्रे नग ५ पांच पाठविले. स्वामीनी रुबरू राजश्री भाऊसाहेबास वस्त्रे रायाकडील द्यावी. वस्त्रे दिधली म्हणजे रायास पत्र येताच येकवीस तोफा कराव्या व ब्राह्मणभोजन करावे. राजेश्री नागोजीराव यासी रायानी पत्र लिहिले आहे. राजश्री लक्षुमनपंत सिरियाहून पत्र सेवकास पाठविले त्यावरून राजश्री रायाचा निरोप घेऊन सिरियासी जाताना राव बोलिले जे, त्याच्या चितात की, भेटी घ्यावी. त्यास मडकसिरे सिरे दोनी नाही. उभये पक्षी दुसरा विचार नाही. भेटीस यावयास अनमान न करावे. याजकरिता राजश्री श्रीनिवासराव यास व सेवकास राजश्री राव सिरियास पाठवणार. भेटी जाल्याचे वर्तमान सेवेसी लेहून पाठवितो. सिरियाचे आसपास लाहान रत्नगिरी, मिडसिंगी, पावगड, नीलगड वगैरे स्वस्थानिकानी सिरियात रुजू होऊन सरकारचे पैके द्यावे. त्यास रायाकडील कमावीसदार व हर कोन्ही उपद्रव करतील त्यास राजश्री रायानी ताकीद केली आहे. रत्नगिरीचे पाच गाव याविशई राव काही बोलत नाहीत. मुबदला श्रीमंत स्वामी करून देतील हे रायाची निशा आहे. दोन तीन वेला सेवक सिरियास राजश्री लक्षुमनपंताकडे गेलो होतो. सरकारकार्याकरिता कितेक गोस्टी रायासी बोलिलो. राव बोलिले जे, आधी गुती, मग मडकसिरे, मग सिरे. दुसरा विचार नाही. आम्ही श्रीमंत स्वामीची मिर्जी राखने जरूर. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Baburao congratulates Bhausaheb on his narrow escape from the fatal attack of Muzaffarkhan. He sends robes of honour to the Bhausaheb on behalf of Murarrao Ghorpade.*

No. 268] [1760?

श्री

श्रीमनमहाराज राजपूजित राजमान्ये देवमान्ये गोत्राप्रतिपालक द्रुष्टजेननिग्राहा: सदा येशवंत अखंडितलक्षुमी श्रीमंत राजेश्री बालाजी बाजीराऊ प्रधान ममलकतमदार पुण्येश्लोक रायेक्रुपानिधि स्वामीचे चेरण सो।

॥ऽ सेवक पोष्यवर्गवैभवअपेक्षित नारो अनंत क्रुतानेक त्रिकाली सिरसां नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम जाणून महाराजानी आपले सांम्राज्येवैभव अखिलांडकोवि(द) सर्वदा लिहिती अनुज्ञा दिधली पाहिजे विशेष. पत्रिका सनाथ केल हेत जे करनाटक प्रांते खासा स्वारी येताहे तरी दरुशनास येणे म्हणून अज्ञापिलेवरून परम आल्हाद पावलो. पत्रिका सिरसा वंदून क्रुतार्थ जाहलो. सेवेत सत्वर येऊन पावावे म्हणून वासना होती, परंतु स्वारीचे घोडा हजार राचे कुरकुरी उठून येकायेकी वाखा जाहले यास्तव येणेस विलंब पडिले. याकरिता विज्ञापना केल जाते जे येथील चेना म्लेंछपां बैगनपली व चेंचलमलाचे किलेदार फजअलीखानजीचे नामे पत्रिका इनायेत सादीर करणे जे नारोपंती तुमचे तारीफ स्तुतिवाद लिावरून कलले. यैसा यांस सांप्रत नारोपंतीस हजूर बोलाविले आहे. करनाटकचे प्रयोजन त्याचे ते घेणे आहे, तरी तुम्ही माकुल स्वारी देऊन बंदरका+ देऊन सैन्यस लवकरी पाविजेसे रवाना करणे म्हणून इनायेतनामा दया करून त्यासी निरोपिले पाहिजे. आम्ही ततक्षण विलंब न लावितां स्वारी घेऊन सेवेत येऊन पोहोचतो. दरुशणानंतरी या प्रांतचेहि कार्येभाग-उमदे करून देवितो. पुढे मैसुरासी गेले उपरांतिक मनमान ते लाखानिसा पैदा करून देऊ. संदेह नाही. जवळी लस्कर आहे. सेवेस यावे तरी लस्करचे फौज झुंड झुंड चारो तर्फा फिरताहे. यैसियास आम्ही क्षेम कुशल कडून सुरक्षित चेरण दरुशण लाभ घडावे यास्तव विज्ञापना केलं जाते जे. सरकारचे जोडी भैचक (?) दया करून पाठविनेस निरोपिले पाहिजे. सेवेसी येऊन पावतो. दरुशणानंतर सर्व प्रयोजन महाराजाचे विजेये जाणावे दस्तगिरीचे अभिमान स्वामीचा आहे. मी सेवक असे. करनाटकाचे प्रयोजन मजकडून घेतली पाहिजे. विनंति चित्तास अणऊन तदानुसार किलेदाराचा नावी इनायेतनामा[१] पाठउन मजला बोलावून घेणे. सर्व जाणते सर्वज्ञासी लिा शेक्त नाहीं. हे विनंति.

¶*Naro Anant writes to the Peshwa asking letters of recommendation to the Killedar to allow the writer to go with an escort to visit the addressee. The letter has more of a peculiar literary character than historical significance.*

+ Escort. १ आज्ञापत्र.

No. 269] [Received on 23-1-1760

छ ४ जाखर माव
बुधवार सितैन

श्रीभवानी

**पुरवणी श्रीमंत राजश्री बाबा साहेबांचे+-
सेवेसी**

विज्ञापना. या प्रांतीचे वर्तमान नवाब बसालतजंग याचे लस्कर तालुकेस येऊन दोन महिने कडपे प्रांती राहून कडपेकरापासोन दीड लाख रुा कबूल करऊन तेथोन लस्कर कूच करून उपालवाडे जवली उतरून उपालवाडावरी हला करून बनगनपली(?)ला येऊन मिळाला. त्याने कुयुक्ती केली. याकरिता उपालवाडच्यावर बावडीस धरून गाव लुटून येक लाख पसतीस हजार रुपये कबूल करविले. तेथोन पुढे जमलमडा वगैरेस येऊन बनगनपलीकरानी नवाब बसालतजंग याच्या कुमकेने घ्यावे. इतक्यात सरवरखान येऊन सरकारच्या लस्करात दाखल जाहला. रा भगवंतरावजीसी भेटला हे आवाई यैकताच नवाब बसालतजंगाच लस्कर मुसुमावरी होते, तेथोन कूच करून तिमानायेच्या पेठेवरून बडकणमीहून याडकीस लस्कर दाखल जाहले. तेथोन आद्वानीस जाऊन तेथोन रायेचुरावरून नवाब निजामअलीखान कलबरगेस येणार. त्याच्या भेटीस नवाब बसालतजंग जाणार. परंतु बसालतजंगासहि सरकारचे लस्करचे व रा भगवंतरावजीची दहशत जाहली. नवाब निजामअलीखान हैदराबादेहून कूच करून जनवाडावरून शहर बेदरावरून कुडेरास दाखल जाहलियाची वदंती आहे. तेथोन मल्हारगेस येऊन पुढे राजकारण करावे, सर्वत्रास येक जागे मिलवावे या प्रयेत्नात आहे, म्हणून त्याच्या सैन्यातून सवस्थानिकासी पत्रे येतात. मुसाबुसी येथोन जाऊन आरकाटास पाऊन तेथे जुलपकारजंगासी ठेऊन आपण पुलचेरूस गेला. पुलचेरूस दाखल जाहला. चेनपटाणकरानी वेदवासीचा किला नामधारक असता आडीच रोज वेढा घालोन किला घेऊन तेथे नवाब खासा अलीखान वगैरेचे मातबर लोक असता ते चेनपटणकराच्या हातास लागले. तेथोन अरकाटी जुलपकारजंग उतरले असत व त्यावरी छापा पडोन जुलपकारजंगाची घोडी तटे वगैरे नेली, बहुते(क) लोकास जखमी करून जुलपकारजंग मोड खाऊन आरकाटचा आसरा धरिला आहे. मुराररावबाची फौज इनसखान कडपनाथाच्या घाटीने उतरून गेली.

+ विसाजीपंत बिनीवाले.

फौज आठसे हजार फौज पुलचरीपलेकडे गेली आहे. त्यासहि चेनपटणकरानी रोज घोडी तटे नेऊन उपसर्ग दिल्हा आहे. श्रीरंगपटणवालेकडील वर्तमान हैदरखानास नंदीराजास पत्र न येता तेथेहि राजकारण आरंभ होऊन हैदरखानानी मैसुरपटणी आपले लोक व मोर्चेबंदी केली आहे. तेथेहि कजियाच आहे. कर्नूळकर कडीपीचे नवाब अबदुल महसनखान कर्नूळास आहेत त्यास—

¶*News-letter from Ambaji Jivaji from the Karnatak reporting the movements of Nizam Ali, Basalatjang, Haidarkhan, Bussy and others.*

No. 270]. [*May 1756*

श्री

सेवसी मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना. छ १२ शाबानपर्यंत सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. आज्ञापत्र जासुदासमागमे पाठविले ते पावले. आज्ञेप्राा वर्तमान वरचेवर लेहून पाठवीतच असतो. हाली इकडील वर्तमान मुजफरखान याजकडील मजकूर मुसाभुसी याजकडे सांडणीस्वार छ ११ रोजी पाठविला होता. तो संध्याकालींच काल येथें दाखल जाहाला. आज फिरोन जासूदजोडी पाठविली आहे. गोवियास फिरंगी याजकडे मोहिदीनखान चिकोडकर पेशजी फिरंगी वगैरे दारू बंदुखा आणावयास पाठविला होता, तो येथे आठ दाहा दिवस आला आहे. त्याची हाली फिरोन गोवियास रवानगी जाहाली आहे. समागमे जासूदजोड्या दोन दिल्ह्या आहेत. मुसाभुसीकडे तों दाटच राजकारण आहे. फकिरी घेतली आहे. हे परिछिन्न मकरी[1] आहे. सेंडूरपावेतो मुराररात्र याजसमागमे जावे यैसा विचार आहे. लौकिकात आपण दरगियास जातो म्हणौन बोलतो. विदित व्हावे. मुरारराव याजकडील मजकूर बिदनूरकर याच्या जासूदजोड्या पत्रे घेऊन आल्या होत्या त्या आज रवाना जाहाल्या. राा सुभेदार याजकडे स्वस्ताक्षर पत्र लेहून पाठविले. कारकुनाने न पाहाता आपले हाती लाखोटा करून दिल्हा. माानिलेकडील यैवज येणे त्याजकरिता माणसे त्याची आमची गेली आहेत. परंतु महिना सवा महिना माणसे फिरोन यावयास पाहिजेत. च्यार दिवस याचे येथून कूच होत नाही. काल लोकांचे डेऱ्यास फिरोन समाधान केले. करीतच आहेत. विदित व्हावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat to the Peshwa saying that Muzaffarkhan has opened negotiations with Bussy and the Portuguese.*

---

१ कपटी.

No. 271] [30-6-1760

पौ छ २६ रमजान.

श्रीकृष्णो जयेती

श्रीमंत माहाराजाधिराज, प्रतापोर्जित
विश्रामधाम, परउपकारार्थ आवतरण
राजश्री पंडित प्रधान स्वामीजीचे सेवेसी.

कृपांकित राव मुकुंदराऊ कृतानेक सां। नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम जेष्ट वद्य प्रतिपदा जाणून स्वकुशललेखन आज्ञा करजेल विशे(ष). तीर्थरूपजीची पत्रे तीन पृथक पृथक अजुरदार कासिदासमागमे * * सीहून औरंगाबादेस पावली ते अजुरदारापासी देऊन चरण सेवेसी (पा)ठविली जातात व पूर्वी पत्रे पाठऊन दिधली त्याची यादी व आताची पत्रे त्याच यादीत लेहून येकंदर पाठविली जाते. यैसियासी जे पत्र पावती होऊन प्रतिउतरे आली सुचविली असेत. राहिली पत्रे सुरक्षित आताच्या पत्रासहित पावतील. प्रतिउतरे सर्वाची येतील ते तीर्थरूपजीजवल पाठऊन देऊन. तीर्थरूपजी लिहीत असतात की माहाराजाचे आवतरण विद्यमानकाली धर्मसंरक्षणार्थ प्रजापालनार्थ आहे म्हणून येकनिष्ठेकरून वर्त(मान) लेखन करीत आहे. उदासीन न होता राज्यदंडप्रतापयुक्त ज्यामधे (य)श कीर्ति आचंद्रार्क राहे ते माहाराजाही करावे. औरंगाबाद प्रांतीचे वि(शे)ष वर्तमान दौलताबाद दुर्ग घेतलियाचे पूर्वी लेखनात आले आसे. माहाराजाही सिरा प्रांत दुर्गासहित घेतला. तेथे स्वकीये पराक्रमी ठेविले जातील त्यास आमचे उपजीविकेचे ग्राम व आणिक वेव्हार त्या प्रांतीत पूर्वापर चालत आला आसे ब्राह्मण शुभचिंतिक आहेत. माहाराजाही इतिहास राजनीतीचे बहुत श्रवण केलें आहेत. देश हस्तगत परराज्याचा जालिया ब्राह्मण जाती * व इतर शुभचिंतकाच्या उपजीविवृत्ति येथास्थित चालवाव्या हे स्मरण करून विनंती केली आसे. यैसियासी तेथे जे अधिकारावरी राहती(ल) त्याजला आज्ञा जाली पाहिजे की उपद्रव न करीत. ठाई ठाई हास्तके आम्हाकडू * * * ते राहून उपजीविका त्यांची व आमची चालत जाये व ये विषई आज्ञापत्रे कृपावंत होऊन दिधली पाहिजेत. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Rao Mukundrao to the Peshwa entreating the latter to spare the writer's villages and property in the region of Daulatabad recently captured by the Peshwa.*

No. 272] [5-11-1760

पौ छ २६ रबिलाखर
ईहींदे सितैन

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना ताा छ २६ रबिलावल-पर्यंत स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे व प्रांत मजकूरचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. पेसजी स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा जे, श्रावण मासचे दक्षणेकरिता लाख रुोची हुंडी करून यैवज पाठवणे. यैशास ते समईच हुंडी करून पाठवावी तर विसाजी कृष्ण फौजसुधा सवादोन मासपर्यंत किल्या-जवल मुकाम केला. त्याजमुले मुलुकाची तमाम पायमाली जाली. यास्तव हुंडी करून पाठवायास आनकूल पडले नाही. तेविसीचा मजकूर पेसजी माारनिलेनी सेवेसी विनंतीपत्री लिाा होता व सेवकानेहि विनंतीपत्र लिहिले होते त्यावरून सेवेसी विदित जालेच आसेल. हाली देव भुकणजी कासीदास याचे दुकानावर हुंडी रुो ५०००० पनास हजार रुोची केली आहे. हुंडी पावलियावर येक महिनियाचे मुदतीने यैवज घेतला पाहिजे. यैवजास तपसील आर्काट रुो सततीस हजार व तेरा हजार रुो चेकवणी बागलकोटी व सावनुरी आहेत. येथे यैवजास कुल रसद फलमी(?) येत आहे. नख्त रुो मिलत नाहीं. फुलचरी व अर्काट इकडील रुाा येत होते तेथे आज दीड वरिसापासून कजिया लागला आहे. याजमुले नख्त रुाा मिलत नाही. याजकरिता चकवणी रुाा मिळाले ते सेवेसी पाठविले आहेत. प्रविष्ट जाहाल्यावर सदरहू जाब पाठवावयास आज्ञा करणार धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat to the Peshwa saying that he could not arrange to despatch the sum of a lac of rupees as desired for the Shravan Dakshana owing to the disturbed state of the country and the presence of Visaji Krishna's army. He further says that he is sending a draft for Rs. 50,000.*

No. 273] [26-11-1760

श्री

श्रीमंत राजश्री महिपतराव
दादा स्वामीचे सेवेसी

सेवक मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना ताा छ १७ राखरपावेतो मुाा मिरज येथास्थित असे विशेष. श्रीमंतानी बागडकोटास मोरचे लाविले ते समई

सेवकास आज्ञा जाली जे पागासुधा येणे. त्यास सेवकाचे शरीरी समाधान नाही. याजकरिता लोकाची रवानगी पुढ करीत असतां लोकानी नालबंदीकरितां सात आठ दिवस गवगवा फारच केला. त्याजवरून दीड हजार दोन हजार रुा कर्ज करून बारगीर लोकास व पोरग्यास थोडीबहुत समजाविशी करून पागा धण्याच्या कामावरी समयास जाऊन पोहचावी म्हणून कर्ज करून रवाना केली आसतां, धण्याजवल जाऊन रुजू व्हावी ते न होतां राजश्री सिवाजीपंत याणी बगरहुकूम पागा बागडकोटात ठेऊन घेतली. रा नारो भिकाजी सेणवी कारकून पागेस आहेत त्यास कितीयेक सांगितले. धण्यावरी हा समये तुम्ही जाऊन धण्याजवल जलदीने जाऊन पोहचावे. आम्ही मेहनत करून घोडी ताजी केली आहेत. पागा धण्यास दाखवावी. हजूर सेवा करून आपले ऊर्जित करून घ्यावे. यैसे सांगितले आसता इतकेहि येकीकडे ठेऊन त्याचे व त्याजवल कारभारी सेणवी आहेत त्याचे यैकून पागासुधा तेथे राहिले म्हणोन कळले. त्यावरून सेवकाची सर्वांगाची आग्न जाहाली. घोडे ताजे च्यार लोक धडधडीत आठ दाहा आसाम्याच पागेत त्यास काजाकामाविसी उमेदवार करून रवाना केले आसतां याणे आम्हास सर्व प्रकारे घालविले. आमचे शरीरी आवस्था यैसी. तिघे कारकून आहेत त्याची रीत आहे ती कोठवरी ल्याहावी? याजकरिता राजश्री सिवाजीपंतास येक पत्र व नारो भिकाजी यास नैसीहतपत्र[१] पाठऊन पागा हुजूर नेविलियाने सेवकाचे मनोरथ सिधीस गेले. स्वामी आमचे दैवत्य आमचे मनोरथ सिधीस नेहणे हे स्वामीसिवाई दुसरेकडे नाही. सविस्तर रामजी नलवडे बारगीर सेवेसी पाठविले आहेत, ते सांगता विदित होईल. सेवकाचे शरीरी स्वस्त वाटलेवरी सेवेसी हाजिर होतो. सेवकाचा भोग सबल. बरे, सर्व प्रकारे धणी वसिला स्वामी आहेत. बहुत काये लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती. श्रीमंतांचे सेवेसी पत्र लिा आहे. त्याजमध्ये पागेचा मजकूर आपणास लिा आहे तो नाही. आपण सविस्तर सांगावा लिा कार्य करावे. राहिला यैवज व पुढील बेगमीविसी सनद रा सिवाजीपंतास घेऊन पाठवावी हे विनंती.

¶*Mukundrao Shripat to Mahipatrao Dada: regrets he has been detained owing to illness and that the squadron dispatched by him with all possible haste has been prevented from reaching the Peshwa's camp at Bagalkot through an unfortunate mistake of his clerk. The writer wonders how his clerk Bhikajipant could allow this to happen.*

---

१ शिक्षाशासन,

4108

No. 274] [27-11-1760

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

सेवक मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत सेवेसी विज्ञापना छ १८ रबिलाखरपावेतो स्वामीचे कृपादिष्टीकडून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. सेवकाचे शरीरी आडीचमास समाधान नाही. हिमज्वर येतो. पागा स्वामीनी लस्करात आणविली. आज्ञेप्रमाण पागा रवाना केली आहे. सेवकाचे शरीरी काही स्वस्तता वाटलेवरी सेवेसी हाजीर होतो. पागेकडील लोकाचे दीडमाही रोजमुरेचा यैवज व चंदीचा यैवजाविसी राजश्री सिवाजीपंतास सरकारची सनद सादर जाहाली आहे त्याप्रमाण देत आले. आजी आडीच महिने बेगमीचा व रोजमुरेचा यैवज रुो २२५० सवादोन हजार पावेतो तटला आहे. देत नाही. आजी पावेतो कर्ज करून चालविले. हाली मौजे नागजेस पनास पंचावन घोडी आहेत. त्याचे चंदीचे नित्यकृत्य चालले पाहिजे. राजश्री सिवाजीपंत याचे कारभारी त्रिंबकपंत येथे आहेत त्यास हाटकावे. ते म्हणतात जे बावाचे आज्ञेसिवाये देत नाही. स्वामीने दोन गाव पागेकडे दिले आहेत त्याचा यैवज म्हणावा तरी चवदा पंधरासे रुा पावतो होईल तो यैवज आखेर सालापर्यंत वसूल होईल. सदरहू यैवज लागवडाचेच बेगमीस पाहिजे. हजार रुाची नेमणूक लागवडाची दरसाल आहे यास्तव राहिला यैवज व पुढील बेगमीची आज्ञा राजश्री सिवाजी-पंताकडून करवणार स्वामी समर्थ आहेत. हे चाकरीचे दिवस आण सेवकाची अवस्था यैसी. चाकरी करून धण्याजवळून उर्जित करून घ्यावे हा हेत असतां सेवकाचे प्राक्तनास उपाये काये ? याउपर स्वामीचे चरण दृष्टीस पडतील तो सुदीन असे. सेवेसी श्रुत होई हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat writes to the Peshwa about his illness and complains about the dilatoriness of Shivajipant in making the payment for the expenses of his detachment as instructed by the Peshwa.*

No. 275] [13-1-1758

श्रीमंगलमूर्ति.

श्रीमंत राजश्री बाबासाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी बाबूराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल छ २ माहे जमादिलावल मुकाम गुती स्वामीचे कृपेंकरून सेवक येथास्थित

असे. विज्ञापना ऐसी जें. स्वामींनीं राजश्री मुराररराव हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यासी पत्र मुदाईम काशीदजोडी बरोबरी पत्र पाठविलें तें सेवकानें रायास प्रविष्ट केलें. पत्र पाहोन बोलिले जें यापूर्वी मोगलांनीं बिवाड केले त्याचा परिणाम कोठें लागला ? आतांहि लागणार नाहीं. आम्हीच यावें म्हणोन लिहिलें त्यासी आम्हास तुंगभद्रा उतरणेंच नाहीं, कृष्णा तों आम्ही कधीं उतरोन त्या प्रांतास फौज घेऊन गेलोंच नाहीं. हसकोटें घेतलें म्हणोन आपली फौज पाठवावी तर आमचा निभाव होणार नाहीं. मडकशिरें या प्रांतीं त्यांहीं आले तर मुलुकाची आशा आम्हांस नाहीं. गड किले आमचीं स्थळें मजबूत आहेत. सरकारची फौज दोनी च्यार हजार आली असती तर फौजेस फौज सामील होऊन पठाण पाळेगार यांसी तंबी करुंये, आम्हीच त्यांस तंबी करावें तर सरंजाम थोडका. रायास उत्तर दिल्हे जे, पूर्वी आपणच बोलत होता. शाहाजादे आले तर टकर घेऊं ऐसे म्हणत असतां तें बोलणें कोठेंच नाहीं. समयास फौज पाठवावी, उपरालाहि करावा हें उचित म्हणोन रायाशीं भाषण केलें. सरकारची फौज आली म्हणजे सर्वत्राचें पारपत्य होऊन येईल. तिकडे फौजा गुंतल्यामुळें यांस संद जाली आहे. गुरुमकोंडा पाहडी किल्ला त्यासहि कडपेकर यांनीं वेध लाविला आहे. शिरियास बसालतजंग व हैदरनाईक मिलोन आले आहेत. पेठ तों झांबडली, रत्नागिरीची पेठहि झांबडली. शिरें प्रांतीं तमाम मुलुक लुटिला. रायाच्या तालुकियांत उपद्रव देणार म्हणोन रायांनीं नवाब बसालतजंग व हैदर नाइकास व मोहदिनखान यांसी पत्रें लेहून पाठविलीं. आमचा आपला स्नेह, त्याहीमध्यें आम्हांस कोठें जानच नाहीं, आपली मर्जी रक्षणें जरूर, याजकरितां वकील पाठविले. फौज पाठऊन देणें म्हणोन लिहिलें तर फौजेचे समजावीस जालियानंतर फौज पाठऊन देतों म्हणून लिहिलें आहे. अनुसंधान राखिलें आहे. कोल्हारचे दिलावरखान यास नजरबंद करून कोल्हार मीर फैजुला यासी दिधलें. अलाबत खैरखान या समागमें फौज देऊन वज्रकरूर उदरीफ कोब्यास पाठविणार. कडुर व उदरिफ कोब्यांत जकिरा, दारूं गोळी सरंजाम राजश्री लक्ष्मणपंती मजबुदी केली, तीनच्यार महिने दम धरितील. राजश्री मुकुंदरावजीपाशीं च्यारसें मावळे व तीनशें स्वारनिशी हैदर नाइकाच्या गोटांतच आहेत, त्यांस निरोप जाला नाहीं. इसकोटें मीर फैजुला यासी दिल्हें. अबसकुलीखान पळोन बाळापूर बळकाऊन सरंजाम करून दोनीच्यार महिने दम धरून जुजणार, याकडे गेले नाहींत. तूर्त शिरियासच महसरा दिल्हा. रायास कितेक प्रकारें सांगितलें परंतु रायाच्या चितास येत नाहीं. इनसखान यास बोलाऊन तालिमरीचे शेडदुर्गास मोरचे लाविले आहे, आपले कार्यास तत्पर आहेत. चहूंकडून फितुरच आहे. यामुळें पठाण पाळेगार

वरकडांनीं पायें पसरले आहेत; त्यांचे पारिपत्य श्रीमंत स्वामीच्या पुण्यप्रतापें होऊन येईल. फरासाची जहाजें आलीं हें वर्तमान इंगरेजास कळलियावर हेहि जहाजें घेऊन दरियांत गेले. फराशिसाशीं इंगरेजांशीं जुंज होत आहे. महमद अलीखान यांनीं येल्लूर जेर केलें आहे. खंदकांसी मोरचे गेले. जेर जालें म्हणोन बसालतजंग व हैदर नाईक यांनीं जावें म्हणोन निश्चय केल्यास फिरंगी भारी सरंजाम पाहोन जाण्याची होईना म्हणोन शिरियाकडे आले; शिरेंहि दोनीच्यार महिने जुंजले. दारुगोळी सरंजाम मातबर आहे, इतकियांत फौजाहि येतील, पारपत्यें होऊन येईल. इसकोटें तों येक प्रकार जाला, गुरुमकोंड्याहून राजश्री भगवंतपंत यांनीं रायास पत्र लिहिलें जें तीन महिनेपर्यंत उपराळा होत नाहीं. तर या समयांत उपराळा करावा. सरवरखान याजपाशीं हजार राऊत गाडदी हजार आहेत. पेंठेचे बाणाचे आंत राये राहेले. गुरुमकोंड्याभवत्यां चौकिया आहेत. रोज जुंज होत आहे. या समयास फौज आली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Baburao informs Babasaheb (Balvantrao Mehendale) that Murarrao Ghorpade is unwilling to proceed against Haidar in spite of the latter's raiding activities.*

No. 276] [*September 1760 ?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
लक्ष्मणपंत आणा स्वामी गोसावी यांसि.

पौष्य विसाजी कृष्ण कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकील कुशल लिहीत असिले पाहिजे. विशेष. आपणाकडील बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. तरी यैसे न करावे. सदैव पत्रीं परामर्ष करीत जावा. यानंतर इकडील वर्तमान तरी श्रीरंगपटणची खंडणी गुदस्तां राजश्री गोपालरावजीनी करार केला होता, त्याप्रों द्यावयास संवस्थानिक रुजू असतां, हैदर नाईक त्यांचे कांही येक चालू न देतां गतवर्षी गोपालरायाजवल लढाई दिल्ही होती, त्यामुलें फारच शेर होऊन बेहोष जाहाला होता आणि खंडणी न

द्यावी यैसी विचार करून आपले सामानसुमान तयार करून खबरदारीने पटणच्या शुक्रवार पेठेत बसिला होता. दारू गोळी वगैरे सरंजाम हे मबलग. यास्तव केवल त्यासी झुंजेनच म्ह * * * * * ठीक पडणार नाही. बरसातीचे दिवस व माणूसहि * * का करावे, सामदामेकरूनच कार्य करावे या अर्थे सवस्थानिकासहि थोडे बहुत सांगोन पाठवावयाचे ते पाठऊन मागाहून च्यार पाच हजार फौज निवडक धावडावाखाले * * * * * उतम प्रकारें करावें. या उद्येशे पाठविलीं. तों फौज पे * * * * च सरकारची फौज आली. याउपरी आपला प्राण वाचत नाही व झुंजल्यानीहि पुरी पडणार नाही यैसे आवसान सोडून बाइकामुले टाकून रात्रीचा येकटा पळून बेंगळूरास गेला. तेथेहि जाऊन पारपत्य करावें या पैरवीत आहो. होता होईल तें खरें. सारांश शेर तो जाहाला होता खराच. परंतु धण्याच्या प्रतापापुढें त्यास टिकाव धरवतो यैसे नाही. त्यामुलें भयभीत होऊन पळून गेला. जाहालें वर्तमान आपणास कलावे म्हणोन लिहिले असे. सविस्तर वृत सरकारात व राजश्री बलवंतराव बावास लिहिलें आहे त्यावरून कलेल. दुसाला खंडणी व घासदाणा व सरकारची ठाणी जगदेव सरकारचे नव माहाल व किले आनेलाल ही ठाणी सोडून द्यावी याप्रा संस्थानिकानी करार केला आहे. प्रस्तुत फौज पटणास आहे. भूकणजी हरिपंतहि तेथे गेले आहेत. सन सितैन व इहिदे दुसाला राजश्री गोपालराव यानी खंडणी केल्याप्रा व तीन लक्ष रुा घासदाणा व ठाणी सोडून घेऊन फौज लौकरच येईल. आम्ही हुसकोटियावर आहो. हैदर नाइकास साहा कोसाची तफावत आहे. परंतु उगाच दहोसाने (?) बसला आहे. * सरंजाम आहे व घाटाखाली याची फौज फुलचरीवाल्यास कुम(क) * * * होती त्यातील आरधी फौजे इंग्रजानी बुडविली व पटणकर आम्ही येक जालो याजमुले कोणीकडे इलाज चालेनासा जाहाला आहे. नाही तरी उगाच राहावयाचा माणूस नव्हे. श्रीमंताच्या प्रतापे मोठे येश आले. संतोषाचे वर्तमान आपणास कलावे म्हणोन लिा असे. निरंतर पत्र पा परामर्ष करीत आसिले (पाहिजे) बहुत काये लिा * * * * * * * * * लोभ असो दिल्हा पाहिजे. राजश्री भिकाजीपंत आपले लोकसुधा घोडीपढी खुशाल आहेत. चिंता न करावी. त्याचेहि चालवावयास चुकत नाही. कलेल तसे चा * * * बहुत काये लिा हे विनंती.

¶*Visaji Krishna to Lakshmanpant Anna (Panse ?) announcing his victory over Haidar Ali, who retreated towards Bangalore in disorder.*

4112

No. 277] [15-2-1761

पौ छ २५ रमजान सन इहिदे
मुा अरणी प्रां सावनूर

श्री

राजश्री विसाजी कृष्ण व हरि गोपाळ गोसावी यांसी

सुा इहिदे सतैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्र पाठविलें ते पावलें. श्रीरंगपटणचे खंडणीचा सारा ऐवज व आणखीहि संस्थानें खंडाल त्याचा ऐवज हुजूर पाठवावयाविसीं आज्ञा, त्यास पटणचा सुस्त कारभार. ऐवजाची विल्हे व्हावयास दिवसगत लागली. याजकरितां हुशकोटियावर तीन महिने राहोन खराब जालों. महर्गता फार, दोन दीड पायलीची धारण. पहिली बिजापूरपरियेंत लूट मिळत होती, तेव्हा एकदोन रो(ज)मरे देऊन चालविले. आषाढमासापासोन आजताा दरमहा तीन रोजमरे सिवाय अर्जबाब कोण्हास दिल्ही तऱ्ही पुरे पडत नाहीं. घोडीपिढी मेली. खराबी फार जाली. पटणचे खंडणीचे ऐवजपौ साडेसा लक्षाच्या हुंड्या पेशजी पाठविल्या आहेत. बाकी पाच लक्ष यावे त्याचा हवाला भुखणजी हरिदत्त यांणी घेतला, त्यापौ दोनसवादोन लक्ष वसूल जाले ते दरमहाचे खर्चांत पडले. फौजेस अद्यापि रवानगी तकूब दिल्हे नाहीं. व नालबंदीहि मागतां लोकांनीं सरदारचे घरी नित्य उठोन गवगवा आरंभिला आहे. पाच लक्षांपैकीं बाकी येणे त्या ऐवजीं रवानगी व तकूब देतो व नालबंदी पौ कांहीं न दिल्हे तरी लोक उठोन जातील, सरकारकामास धका बसेल, याजकरितां मागील बाकीसाकी मुलकांत राहिली आहे त्याऐवजी थोडीबहुत नालबंदी देऊन चालीस लावितां नालबंदीचा झाडून ऐवज देत नाहीं. स्वामींचे आज्ञेचे लक्ष राखून वर्तणूक करितों. सदासिव सखाराम याचा गुदस्ताचे नालबंदीचा ऐवज वगैरे वरातचा देणे आहे त्याप्रमाणे वोढीचा प्रकार येथे नसता तरी आज्ञेप्राो दोच्यार लक्ष रुपये रोकड पाठवितों म्हणून विस्तारें लिहिलें ते कळले. ऐशास फौजेस नालबंदी व तकूब देणे ते तूर्त नच द्यावें ऐसी तुम्हास आज्ञा गेली असतां, लोकांनी गवगवा केला, तन्मुळें तुम्ही लोकांची समजावीस थोडे बहुत देऊन हुजूरच्या लक्षाप्रमाणें वर्तणूक केली असली तर उत्तम आहे. सारांश येंदा फारच वोढ जाहाली. तुम्ही जाणतच आहां. जे करणे ते फार विचारें करावें. छ ९ रजब बहुत काय लिहिणे ?

¶*Visaji Krishna Biniwale and Hari Gopal (Supekar Deshpande) are ordered to remit all collections of revenue to Poona and not to expend them on the armies in the Karnatak.*

यथास्थित करून ज्यांत सरकारकाम आणि तुमचे चाकरीचा मजुरा ते गोष्ट करावी. वरकड सविस्तर आमणाजीबावाच्या पत्रावरून कळेल. सर्व एकचितेकरून राहोन सरकार कुम(क) करणे. रा। छ २३ सवाल सन इहिदे सितैन. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Visaji Krishna to Bhikaji Govind, informing him of the writer's despatch of letters to several officials to render succour to the addressee against the inroads of Aziz Khan.*

No. 281] [*10-6-1761*

छ २८ जिलकाद इसने

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेशी

विनंती शेवक मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना. ता। छ ६ जिलकादपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकडून शेवकाचें वर्तमान व प्रांत मजकुरचें येथास्तित असे विशेष. इकडील वर्तमान राजश्री विसाजी कृष्ण कूच करून तुंगभद्रजवल गेलियावर इकडील पालेगार वगैरे यानी नानाप्रकारें आवया उठऊन सरकारचे जागे आहेत तेथें केवल मर्यादा टाकून वर्तणूक करू लागले आहेत. कडपे प्रांती कडपेकर पठाण याणें दुरबुधीस प्रवर्तून दीनपाड व हसनापूर दोनी किले मातबर घेतले व कंदकूर तालुक गुरूमकोंडा येथील ठाणें गुमनाड पालेवाल्यानें मोर्चे देऊन घेतले. हाली कडपेकर पठाण जमाव मातबर करून राचोटीवर येका दोहां दिवसी येऊन वेढा घालावा; त्यानंतर गुरूमकोंडेयास यावें यैसा मनसबा केला आहे. कितेक पालेगार त्यास सामील होऊन राजकारण करणार; ऐसियासी कुमकेविशीं हुजूर लिहिणें ते लेहून पाठवावें आणि तुम्ही जमावसुधां जलदीनें यावें म्हणोन राजश्री भगवंत त्रिंबक पत्रे वरचवर पाठवीत आहेत. जगदेव सरकार येथील वर्तमान अजीजखान हैदर नाईक याजकडून रुसकत घेऊन आलियाचा बाहना करून अमुरास येऊन पांचसे स्वार व साहासें बार व दोन तोफा व सामान सिध करून राजश्री आमनाजी भीमराव वंनबाडीत आपल्या जमावानसी असतां याजवर चालून गेला. लडाई जाली. आमनाजी भीवराव सिकस्त खाऊन किल्यांत गेले. अजीजखान आपल्या सामानानसी फौजसुधा पेठत राहून किल्यास मोर्चेबंदी केली त्याजवरून मशारनिलेनी दोन तीन कारकून व पत्रे पाठविली आहेत. त्याणीं येऊन जलदीने कुम(क) करावी. नाही तर

आमनाजी भीवराव जिवानसी जातांत आणि धन्याचे जागे राहात नाही म्हणोन सेवकाजवल निकड करीत बैसले आहेत. वज्रकरूराकडील वर्तमान नवाब बसालतजंग येक दोन महिनेपासोन बालापूर वगैरे प्रांती राहून कालक्रमणा केली. त्यानंतर कूच करून रायदुर्गाचे सुमारे जाऊन तेथून येकायेकी करून वज्रकरूचे तालुक्यास जाऊन हडप नगल वगैरे ठाणी घेतली. उदपरकोंडा वज्रकरूर दोन किल्याची मजबुदी करून रा। लक्ष्मण वेंकाजी बैसल आहेत. अविध्यांकडील वकील येऊन लक्ष रुपये रोख देणें ठाणी सोडून जातों म्हणोन सांगितलें. जाब मशारनिलेनी दिल्हा की आपल जवल ऐवज नाही म्हणोन पष्ट त्यास सांगितलें, त्याजवरून पुढें राजकारण काये करणार हे कलत नाही. या गोष्टीस तेथील कुमकेस राजश्री विसाजी कृष्ण देशास गेले त्यावरून सेवकाचे नांवी मशारनिलेचें लिहिलें आले आहे कीं येकामेंकास कुम(क) जाहाली पाहिजे. जलदीने कुमक करावी म्हणोन दोन पत्रें आली. सेवकाकडील वर्तमान घंटममुदी मडगू व सुनकलकर पालेगार मर्यादा टाकून कोल्हार तालुकियांतील गांव खेडी लुटून कितेक गांवची गुरे नेली. त्यावरून रयत धाशत खाऊन मुलुक सोडून जाऊ लागली. त्याच्या पारपत्यास पाच सातसें फौजेचें सामान असल्यासिवाय गांठ पडत नाही. येथे राजश्री विसाजीपंत यांही पागांसुधां सवासें स्वाराची नेमणूक करून दिल्ही आहे. सदरहू जमावसहित चिरंजीव राजश्री रावजी माहादेव याजसमागमे देऊन पालेगाराचे सरहदेस पाठविले आहेत. हे जाऊन नित्य उठून त्याजकडील बातमी आणून स्वारी सिकारी करून आपले तालुक्याचा बच्याव करून तेथील शेहास गुंतले आहेत. हैदरनाईक यांजकडील वर्तमान अलीकडे जमाव पाच हजार स्वार व आठ हजार बार व च्यालीस तोफा व सामान मातबर करून पटणकराची ठाणी तमाम घेतली. फख्त पटण मात्र कर्तच(?) व खंडेराव बनाजी याजकडे आहे. हाली नाईक मजकूर पटणाजवल येऊन उतरून तेथील लोकांस फितूर करणार आहे. हैदरनाईक याजकडील मिर्जा कबीरबेग बेंगरूली राहातो. त्याजकडे जमाव पाच साहासें स्वांर व पाचसें बार व तीन तोफा व कर्नाटकी प्यादे दोन हजार येणेप्रो सामान करून नेलवंगल वगैरे ठाणी खंडेराव बनाजी कडील तमाम घेतलीं. देवनहलीत कर्तराचें ठाणें होतें तेहि घेतलें. देवनहलीचे तालुकियाचे ठाणे मातबर बुदीगिरा येथून येक कोसावर आहे; तेथे कबीरबेगचा अमल आहे. पूर्वीपासोन हैदरनाईकाचे व सेवकाचें अंतरंगी कटाक्ष आहे ते सेवेसी श्रुतच आहे. ते काबूवर आहेत. त्याच्या चितांत मनसबा आहे कीं होसकोटें पाहून बाहेर पडतांच बातमी राखून दगा करावा म्हणोंन हे वर्तमान परस्परें बातमी येत आहे. कडप्याकडे व जगदेव सरकार याजकडे व वज्रकरूरा-

4117

No. 278] [13-3-1761

पो छ ६ रमजान चइत्र
मास इहिदे सितैन

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री विसाजी कृष्ण व हरि गोपाल
गोसावी यांसी

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सुाा इहिदे सितैन मया व अलफ. राा भास्करराव दादाजी नरगुंदकर याणी बलवंतराव आपाजी यांची ठाणी घेतली आहेत व किला घेतला आहे. याजमुले बलवंतराव तुम्हाकडे येऊन किला व ठाणी याविसीं सांगोन उपद्रव ठाणियास द्यावयाचा मजकूर करितील तरी न आईकावा. याकरितां पत्र सादर केलें असे. तरी तुम्हीं भास्कररायाचे ठाणियास व किलयास उपद्रव येकंदर न लावणें. जाणिजे छ ९ साबान बहुत काये लिहिणे. (लेखनसीमा.)

¶*Raghunathrao instructs Visaji Krishna and Hari Gopal not to molest the territory and fort belonging to Bhaskarrao Nargundkar.*

No. 279]

पौ छ २१ रजब [13-4-1761

श्रीसुबाराज

राजश्री व्यंकटराव नारायेण
मामलेदार पाा हुबळी गोसांवी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलफतमदार राम राम उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करणे विशेष. तुम्ही परगणे मजकूरची मामलत केलीसे हुजूर विदित जाले. उतम केले. तेथील सरकारचा यैवज प्रतिवरषी सुरलित पावत आला. तुमच्या मारफतीचा कारभार आसोन यैवजास दिनमेक न व्हावा. राजश्री पंतप्रधान याची सनद

तुमच्या नावची सालाबादप्रो यैवज द्यावयाविषी आली ती पेशजी तुम्हाकडे रवाना केली होती. पावलीच आसेल. तुमचे घराणे पुरातनपासोन पदरचे. तुम्ही सरकारकामास आंतर न करिता सनदप्रा यैवजाची विल्हे करून दिलीच आसेल. राजश्री गोपाळराव श्रीनिवास याजकडे पा मजकूर बा यैवजाची रवासुदगी जाहाली आहे. तरी राजश्री नरसिंगराव चंदो याचे विद्यमाने यैवज झाडेनिसी मारनिलेकडे पावता करणे. येविषई दिवसगत न करणे. येतद्विषई राजश्री श्रीनिवासराव चिटनीस लिहितील त्यावरून कळेल. यैवज तूर्त पोहचवणे. रा छ ७ रमजान बहुत काय लिहिणे ?

[शिक्का]

पैवस्ति छ २८ रमजान सन
इहिदे सितैन मया आलफ+

¶*Murarrao Ghorpade asks Vyankatrao Narayan to administer the province of Hubli in pursuance of the Peshwa's sanad and to send in the amounts collected.*

No. 280] [29-5-1761

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
भिकाजी गोविंद स्वामी गो यांसि

पोष्य विसाजी कृष्ण नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. तुम्हाकडून सांप्रत पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी ऐसे न करितां निरंतर पत्र पाठऊन साकल्य वृत्त लिहीत जावें. यानंतर तुमच्या तालुक्यास अजीजखान उपद्रव देणार म्हणोन राजश्री त्रिंबकराव मामा आले त्यांही सांगितले त्यावरून तुमची कुमक करावयाविसी सरकारच्या मामलेदारास व संवस्थानिकास सरकारचीं पत्रें पाठविलीं आहेत. ज्याचीं त्याजकडे पाठऊन देणे. तुम्ही व राजश्री आमणाजीबावा उभयताहि शहाणे मनुष्य आहांत. बहुत सावधतेने राहून किल्याचा व ठाण्याठुण्याचा व मुलकाचा वगैरे बंदोबस्ती

+ पत्र ७ रमजानचें असल्यामुळें ही पैवस्ती बरोबर असावी. आरंभीं २१ रजब मूळांत दिलेली चूक आहे.

यथास्थित करून ज्यांत सरकारकाम आणि तुमचे चाकरीचा मजुरा ते गोष्ट करावी. वरकड सविस्तर आमणाजीबावाच्या पत्रावरून कळेल. सर्व एकचितेकरून राहोन सरकार कुम(क) करणे. रा। छ २३ सवाल सन इहिदे सितैन. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Visaji Krishna to Bhikaji Govind, informing him of the writer's despatch of letters to several officials to render succour to the addressee against the inroads of Aziz Khan.*

No. 281]

छ २८ जिलकाद इसने [*10-6-1761*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेशी

विनंती शेवक मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना. ता। छ ६ जिलकादपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकडून शेवकाचें वर्तमान व प्रांत मजकुरचें येथास्तित असे विशेष. इकडील वर्तमान राजश्री विसाजी कृष्ण कूच करून तुंगभद्रजवळ गेलियावर इकडील पालेगार वगैरे यानी नानाप्रकारें आवया उठऊन सरकारचे जागे आहेत तेथें केवल मर्यादा टाकून वर्तणूक करू लागले आहेत. कडपे प्रांती कडपेकर पठाण याणें दुरबुधीस प्रवर्तून दीनपाड व हसनापूर दोनी किले मातबर घेतले व कंदकूर तालुक गुरूमकोंडा येथील ठाणें गुमनाड पालेवाल्यानें मोर्चे देऊन घेतले. हाली कडपेकर पठाण जमाव मातबर करून राचोटीवर येका दोहां दिवसी येऊन वेढा घालावा; त्यानंतर गुरूमकोंडेयास यावें यैसा मनसबा केला आहे. कितेक पालेगार त्यास सामील होऊन राजकारण करणार; ऐसियासी कुमकेविशीं हुजूर लिहिणें ते लेहून पाठवावें आणि तुम्ही जमावसुधां जलदीनें यावें म्हणोन राजश्री भगवंत त्रिंबक पत्रे वरचवर पाठवीत आहेत. जगदेव सरकार येथील वर्तमान अजीजखान हैदर नाईक याजकडून रुसकत घेऊन आलियाचा बाहना करून अमुरास येऊन पांचसे स्वार व साहासें बार व दोन तोफा व सामान सिध करून राजश्री आमनाजी भीमराव वंनबाडीत आपल्या जमावानसी असतां याजवर चालून गेला. लडाई जाली. आमनाजी भीवराव सिकस्त खाऊन किल्यांत गेले. अजीजखान आपल्या सामानानसी फौजसुधा पेठत राहून किल्यास मोर्चेबंदी केली त्याजवरून मशारनिलेनी दोन तीन कारकून व पत्रे पाठविली आहेत. त्याणीं येऊन जलदीने कुम(क) करावी. नाही तर

4116

आमनाजी भीवराव जिवानसी जातांत आणि धन्याचे जागे राहात नाही म्हणोन सेवकाजवल निकड करीत बैसले आहेत. वज्रकरूराकडील वर्तमान नवाब बसालतजंग येक दोन महिनेपासोन बालापूर वगैरे प्रांती राहून कालक्रमणा केली. त्यानंतर कूच करून रायदुर्गाचे सुमारे जाऊन तेथून येकायेकी करून वज्रकरूचे तालुक्यास जाऊन हडप नगल वगैरे ठाणी घेतली. उदपरकोंडा वज्रकरूर दोन किल्याची मजबुदी करून रा लक्ष्मण वेंकाजी बैसल आहेत. अविध्यांकडील वकील येऊन लक्ष रुपये रोख देणें ठाणी सोडून जातों म्हणोन सांगितलें. जाब मशारनिलेनी दिल्हा की आपल जवल ऐवज नाही म्हणोन पष्ट त्यास सांगितलें, त्याजवरून पुढें राजकारण काये करणार हे कलत नाही. या गोष्टीस तेथील कुमकेस राजश्री विसाजी कृष्ण देशास गेले त्यावरून सेवकाचे नांवी मशारनिलेचें लिहिलें आले आहे कीं येकामेंकास कुम(क) जाहाली पाहिजे. जलदीने कुमक करावी म्हणोन दोन पत्रें आली. सेवकाकडील वर्तमान घंटममुदी मडगू व सुनकलकर पालेगार मर्यादा टाकून कोल्हार तालुकियांतील गांव खेडी लुटून कितेक गांवची गुरे नेली. त्यावरून रयत धाशत खाऊन मुलुक सोडून जाऊ लागली. त्याच्या पारपत्यास पाच सातसें फौजेचें सामान असल्यासिवाय गांठ पडत नाही. येथे राजश्री विसाजीपंत यांही पागांसुधां सवासें स्वाराची नेमणूक करून दिल्ही आहे. सदरहू जमावसहित चिरंजीव राजश्री रावजी माहादेव याजसमागमे देऊन पालेगाराचे सरहदेस पाठविले आहेत. हे जाऊन नित्य उठून त्याजकडील बातमी आणून स्वारी सिकारी करून आपले तालुक्याचा बच्याव करून तेथील शेहास गुंतले आहेत. हैदरनाईक यांजकडील वर्तमान अलीकडे जमाव पाच हजार स्वार व आठ हजार बार व च्यालीस तोफा व सामान मातबर करून पटणकराची ठाणी तमाम घेतली. फख्त पटण मात्र कर्तेच (?) व खंडेराव बनाजी याजकडे आहे. हाली नाईक मजकूर पटणाजवल येऊन उतरून तेथील लोकांस फितूर करणार आहे. हैदरनाईक याजकडील मिर्जा कबीरबेग बेंगरूली राहातो. त्याजकडे जमाव पाच साहासें स्वांर व पाचसें बार व तीन तोफा व कर्नाटकी प्यादे दोन हजार येणेप्रो सामान करून नेलवंगल वगैरे ठाणी खंडेराव बनाजी कडील तमाम घेतलीं. देवनहलीत कर्तराचें ठाणें होतें तेहि घेतलें. देवनहलीचे तालुकियाचे ठाणे मातबर बुदीगिरा येथून येक कोसावर आहे; तेथे कबीरबेगचा अमल आहे. पूर्वीपासोन हैदरनाईकाचे व सेवकाचें अंतरंगी कटाक्ष आहे ते सेवेसी श्रुतच आहे. ते काबूवर आहेत. त्याच्या चितांत मनसबा आहे कीं होसकोटें पाहून बाहेर पडतांच बातमी राखून दगा करावा म्हणोंन हे वर्तमान परस्परें बातमी येत आहे. कडप्याकडे व जगदेव सरकार याजकडे व वज्रकरूरा-

कडे येकापेक्षा येकान निकड केली आहे. कुमक करावी तो येथील विचार या प्रकारचा; कुमक न जाहाली तर जागे जातात: तूर्त आमनाजीराव याजकडील निकड पाहातां उपाये दिसत नाही. राजश्री विसाजीपंत याहीं सिबंदीची नेमणूक व बंदोबस्त या रीतीने केली आहे, तो मजकूर कोठंपर्यंत सेवेसी विनंती करावी? याउपर हुजरून जलदीने फौजेची रवानगी जाहाली तरीच इकडील मामलेदार याचा परिणाम लागतो, नाही तर धण्याचें पुण्य सामर्थ्य मस्तकी असतां जे होणार ते होईल. सेवकाचें वर्तमान सरकार कामावर जीवापेक्षा अंगेजी करून तरतुदीस चुकणार नाही. निदान समई सरकार कामावर जीव खर्चून उतराई व्हावें हाच निश्चय केला आहे. येथे नूतन सिबंदी ठेऊन जमाव करून जावे तरी इकडील चाकरीचे लोक तमाम पेशजींचे हैदरनाईकाकडे चाकरीस गेले. कर्नाटकी थोडे बहुत प्यादे मिलतात त्यांकडून परिणाम लागणार नाही. हुजुरून फौजेची रवानगी जाहल्यासिवाय मुलुकांतील फितूर जात नाहीं; येविशी आज्ञा करणार धणी समर्थ आहेत. चौकडील तालुक्यांत दंगा जाहला आहे त्यामुळें वसुलास खलेल पडिलें आहे. आमणाजी भीवराव येथून च्यार मजली; त्याचे कुमकेस जावें तर च्यारसें स्वार पाहिजेत. आपले तालुकियांत सुभता असावी तेव्हा तेथे बेलाशक जावे ते नाही. दोन कोसावर आम्हास शत्रू कबीरबेग बेंगरूलकर दिा हैदरनाईक समये पाहात आहे; आण कजिया येकयेक दिवस लटकाच उत्पन्न करीत आहे. आम्ही समयावर दृष्ट देऊन क्षमा करीत आहो. किले मजकुरीहून बाहेर पडोन पाच सात कोसावर गेल्यास माघारे येऊन किल्यात दाखल होणे भरवंसा नाहीं. अस्तंनींत आग असते तैसा प्रकार प्राप्त जाहला आहे. हजार स्वार देसीचे येथे असते तर कोणेहि गोष्टीचे संकट न पडते. गुरूमकुंडा सरकार जगदेवगड वज्रकरूर हे सरकारचे तालुके; येथे राजकारण कोणेहि ठिकाणी प्राप्त होते. तेथे सेवक जाऊन कुमक करिता अजीजखान याची बिशाद काये? त्याणीं येऊन बेकैदी केली; आम्ही तमाशा पाहावा यापेक्षां मरण बरें. परंतु धण्याचा बदनक्ष पाहाणे हे जिणे व्येर्थ आहे. स्वामीकडून येरूतेयारी फौजा घेऊन सरदार येतात, त्याणीं हे अर्थ पुढील ध्यानांत आणून फौजेची बेहबुदी करून देऊन माणोस पाहून त्यास हे काम सांगावे ते होत नाही. तेणेमुळे धण्याचे कामास धका बैसोन बदनक्ष व अनिहित धण्याचे होते. हे प्रांते राहणाराचे जीवावर येते. त्याहीमध्ये येंदा हिंदुस्थानाकडील वर्तमाने पालेगाराने नानाप्रकारे उठऊन सेर जाहाले आहेत तो प्रकार सेवेसी कोठवर ल्याहावा? आम्ही सेवक लोक आमचा प्राण आहेपावेतो अंगेजीस न चुकावे. धण्याचे कामावर निमकहरामी न करावी इतकी निष्टा असावी. पुढे

धण्याचे प्रत्यास येईल ते खरे. सारांश पाच हजार फौज जलदीने पाठविली तर सरकारचा अमल राहातो. सविस्तर वर्तमान राजश्री मल्हारराव रास्ते व महिपतराव कवडे याजकडे वर्तमान लेहून पाठविले आहे ते येऊन पावल्यावर उतम आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat to the Peshwa, writing from the south mentions, among other items, the rising of some of the petty chieftains soon after the departure of Visaji Krishna, the fighting between Aziz Khan and Amnaji Bhimrao and the capture of some places by Basalatjang. The writer also complains about the inadequate arrangements made by Visaji Krishna for the defence of the conquered country and requests the addressee to send more men and money without which he adds the aggressive attitude of Haider and others could not be checked.*

No. 282] [(*Dasara*) *8-10-1761*

* * * * * *

(पहिला कांहीं भाग गहाळ).

ला आहे, म्हणोन पत्रें आलीं. आम्हाकडील वर्तमान तरी विजयादशमीच्या मुहूर्ते डेरा बाहेर दिल्हा. लोकांची तयारी केली. अंगप्रस्थानें निघावें तरी धारवाडाकडील मजकूर कोणे रीतीचा हा पाहून निघावें, इतका गुंता. हजार स्वार ठेविले. चांगलीं पतकें ठेविलीं. नालबंदी स्वामीनी देविली ती विदितच आहे. रसदेचे ऐवजीं कोपलचे रुपये देविले. त्यास पन्नास रुपयांस राऊत मिळत नाहींत. माणूस चांगलें असावें. सरकारची चाकरी व्हावी. मागील गुदस्तांच्या नालबंदीच्या वराता देविल्या, त्या अद्यापि पावल्या नाहीत. बाकी गुदस्तांची व सालमजकूर मिळोन लाख रुपये तूर्त लागेल. हरकैसें करून तयारी केली. गुंता म्हणावयासी धारवाडची फौज व रसद घेऊन अति सत्वर यावें. याजकरितां माणसें जलदी पाठविलीं आहेत. त्याजकडील उत्तर येतांच निघोन येतों. त्याचें निघणें होत असिलें तरी च्यार दिवस वाट पाहातों. नाहीं तरी आम्ही निघोन येतों. त्यास कोणत्या सुमारें यावें ते ल्याहावें. आमचा खाजगत गुंता काडीचा नाहीं. त्याजकडील उत्तर येतांच निघोन येतों. दसरेस निघावें ऐसा करार करून आलों होतों, त्याप्रमाणें आज निघावयास तयार जाहालों. परंतु राजश्री तात्याकडील मजकूर समजला नाहीं, यास्तव गुंतोन पडलों आहे.

त्यांचें उत्तर येतांच येतों. कोणें सुमारें यावें तें आज्ञा करावी. राजश्री उदाजी चव्हाण यांस घेऊन यावें म्हणोन आज्ञा, त्यास त्यांजकडें कारकून पाठविले आहेत, त्याजकडील उत्तर कलतें, तदनंतर अथणीस जातों. भेटी घेऊन त्यांस घेऊन येतों. सध्यां राजश्री रताजी चव्हाण व उदाजी या उभयेतांस गोटेकरितां कजिया लागला आहे. परस्परें कलह जाहाला आहे. उभयेतांची समजाविशी करून समागमें घेऊन येतों. त्याणेंहि हजारपर्यंत फौज ठेविली आहे. करवीराकडेहि राजकारण लागलें आहे. उदबाचे मतें फौज ठेवावी, करवीरवासीयांनीं लाख दोन लाख रुपये द्यावे. परभारें फौज ठेवावी, सरकारचें बोलणें जाहालें आहे. तिकडें येतों म्हणोन तालामाला पाहावया तरतुदेंत आहेत, त्यास आम्ही जाऊन येत्न करणें तो करून समागमें घेऊन येतों. राजश्री मुरारराव यांजकडील वर्तमान तरी करवीरचे दोन च्यार कारकून व कोंडाजी भोसले गेले आहेत. च्यार महिने जाऊन जाहाले येतों म्हणोन ठेऊन घेतले आहेत. कडपेकर व कनोलकर यांस बोलोन बसालतजंग यांसी राजकारण करून साऱ्यांचें येक चित्त करून घडोन आलें तरी मोगलांकडील पेंच पाहून इकडे लबाडी करावी या तजविजेंत आहेत. करवीरवासिनी पनालेस जाऊन राजा निर्माण केला आहे. त्यास घेऊन करवीरास विजयादशमीचे दिवशीं सर्वांचे जोहार आपले निसबतीचे करविले. दोन च्यार दुकानें लुटविलीं. आपल्या आनंदांत राज्यकारभार करीत आहेत. या रानीं साऱ्यांनीं मिळोन आपले जागां बळ धरिलें आहे. राजकारणें करावयास आळस करीत नाहीं. तदुतर रायाकडील राजश्री नागोजीराव तेथें आले आहेत. त्यासी च्यार गोष्टी कार्याकारण बोलोन ते म्हणतात तें ध्यानास आणून च्यार दिवस कालहरणावरी घालवावे. नागोजीराव ममतेचे आहेत. परंतु त्याचे यजमान कुचेष्टेंत आहेत. यास्तव त्याच्या यजमानाचे मुदे असतील ते देतों घेतों म्हणोन बोलोन ममतेस गुंतवावें. साऱ्यांची मिलोन दृष्टी मोगलाकडें आहे. साऱ्याचें मतें पेशवाई दौलत पेंचास आली ऐसें समजोन घरोघर मनसबे करितात. आपली बाजी हातीं येईपर्यंत सर्वांसी कार्याकारण बोलोन ममतेस रक्षावें. इतकें असोन मुरारराव लबाडी करूं लागलें तरी फौजहि पाठवावी लागेल. तूर्त इतका मनसबा नाहीं, परंतु सुचली विनंती लिहिली आहे. [पुढील पांच सात ओळी फाटल्या.] न लबाड बोलावें परंतु जमाव फोडावा म्हणजे राजकारण तुटतें. म्हणजे शिंदे व नरगुंदे दोनहि पतकें मोकळीं होतील. मामलतीतील बखेडा मोडेल. नवलगुंदकर देसाई यांणीं लबाडी केली आहे. पुढें मनसबेनसार पारपत्य करावें या विचारें कारकून आणविले आहेत. जमाव त्याचा न फुटला तरी मामलत बुडाली. ठाणीं मात्र जतन करावीं इतका मजकूर आहे. आमचा जमाव तयार

जाहाला होता. आणखी मेलविणें तें मेलऊन नरगुंदकर व हे दोघांमधें जाऊन राहून तोंड फोडावें; परंतु स्वामीकडे यावयाची निकड, आणि आज्ञेखेरीज करतां न ये. मामलत व दोन्हीं पतकें येणेंचीं बुडालीं, असा प्रकार घडला आहे. शिंदे मनोलीकर याणी लबाडी मांडिली आहे. वाटेसहि कजिया करितात. इतकें व्हावयास कारण काय? मामलेदार यांचें वजन हलकें पडलें. रयतेची रजावंदी नाहीं या विचारें या थरास आलें. कोपलची रसद आम्ही कर्जवाम करून घेतली. परंतु कर्नाटकांत जागा म्हणावयास कोपल इतर स्थलें सहजांतील आहेत, तेथील बंदोबस्ती पाहिजे. पेसजी नेमणूक आहे ती विदितच आहे. त्याखेरीज दोनशें माणूस आम्ही ठेऊन पाठविलें, परंतु त्या जाग्यास माणूस फार पाहिजे. जागा नाजूक आहे. माणूस ठेवावें तरी विश्वास नाहीं. याजकरितां तिकडील सरकारचे निसबतीचे दोन च्यारशें माणूस पाठविल्या जाग्याचा बंदोबस्त होईल. आम्ही करावयाचे रीतीनें केलाच आहे. घडोन आल्यास कांहीं माणूस पाठऊन द्यावें. चहूंकडे खर्चच जाहाला आहे. कैसा परिणाम लागतो हें न कळे. स्वामीच्या पुण्येंकरून सर्वहि परिहार होईल. आम्ही शेवक लोक आपल्या जीवापेक्षां कजियांत पडलों. सालमजकूरचे नालबंदीस तीस हजार पर्यंत कर्ज केलें. सामान चांगलें ठेविलें आहे. दर्शनांतीं कळेल. आपल्या वचनावरी जें करणें तें केलें आहे. शेवा मात्र करावी. ऊर्जित करणार स्वामी धणी आहेत. च्यार दिवस दोनहि पतकें व रसदेची तरतूद करून या म्हटल्यास तसें करूं, अगर यावयाची आज्ञा जाहाली तरी येतों. इतकियांत धारवाडाकडील मजकूरहि कळतो; परंतु तेथील विचार पाहतां लौकर उलगडा होईलसा दिसत नाहीं. आठ च्यार रोजांत उलगडेसारिखे असलियास राहून घेऊन येतों, नाहीं तरी शेवक सेवेसी येत आहे. राजपत्नी करवीर याच्या मतें जें आहे तें आपणच आहों. वरकड कलतच आहे. मुरारराव याचा कारकून करवीरास आणऊन आपलीं पत्रें व राजपत्नीचीं जाधवराव व मोगल यांस पाठविलीं; तिकडून वस्त्रें यांस आलीं. याप्रमाणें धावतींत आहेत. होणें कलतच आहे परंतु येत्न करणार करितात. राजश्री शेषोपंतांची रवानगी करवीराहून जाहाली आहे. लौकरीच येऊन पोंहचतील. यांसी चित्त शुद्ध नाहीं. आम्ही आल्यास वीस रोज जाहाले, परंतु माणूस देखील कोणी न पाठविला. याप्रमाणें त्यांचा राग आहे. आम्ही होऊन पत्र पाठविलें होतें; उत्तर मात्र आलें ऐसा प्रकार आहे. समय पाहातात. होईल वर्तमान तें मागाहून लिहितों. धारवाडचीं पत्रें आलीं तीं यैनजिनस राजश्री विष्णुपंताकडे पाठविलीं आहेत. त्यावरून सविस्तर कळेल. तेणेंप्रमाणें रवानगी करणाराची करावी. तात्याची मामलत लक्ष्मणपंताची दोनहि बुडतात. शिबंदी मनस्वी ठेविली आहे. पैसा

सरकारचा येणार नाहीं. भलता कोणी आला तरी ठांणीं जातील. तमाम देसक बदलेलें आहेत. रायानी पांच हजार प्यादा स्वार मेळऊन बखेडा मांडिला आहे. बाईचा मजकूर क्षणिक. आम्ही जाऊन साऱ्यास ठिकाणीं ठेवावें तरी स्वामीकडे यावयाची निकड. करवीरचा राजा विजयादशमीस * ?

¶*This incomplete letter gives news from various quarters in the south, viz. a quarrel between Udaji and Rataji Chavans regarding the claims for Gote, the progress of affairs between Murarrao and the Raja of Kolhapur, the plans of Jijabai for installing a new Ruler on the Kolhapur Gadi and the efforts of several men to supplant the influence of the Peshwa under the impression that his power was gradually coming to an end, and other affairs in the south regarding the Desais of Nargund and others. The letter mentions that Jijabai is installing a new King at Kolhapur and that the Peshwa's rule is seriously threatened. This must determine the date of the letter to be after Sambhaji's death (20-12-1760) and the disaster of Panipat.*

Selection No. 28

INDEX

[N.B.—Figures indicate the numbers of letters]

A

A—contd.

B

B—contd.

B—contd.

B—contd.

C

D

D—contd.

E

F

G

K—contd.

L

M

M—contd.

M—contd.

N

N—contd.

P

R

R—contd.

S

S—contd.

S—contd.

S—contd.

T

U


V

V—contd.

V—contd.

Y

Z



Map referring to selection No 27.
EXPANSION OF THE MARATHA POWER INTO KARNATAK 1740·60"
0 63 126 Miles
Nasik
Vaijapur
Puntambe
Aurangabad
Nevasa
Gandapur
Sangamner
Paithan
Ahmednagar
Ghod R.
Bhir
Dharur
Kandahar
Godavari R.
Siruri
Shrigonda
Poona
Parenda
Dharaseo
Tuljapur
Nira R.
Phaltan
Satara
Bidar
Pandharpur
Naldurg
Bhima R.
Akalkot
Sangola
Gulbarga
Karad
Khamamet
Jath
Sangli
Miraj
Bijapur
Gurmatkal
Panchganga R.
Kolhapur
Shahpur
Krishna R.
Deodurg
Bagalkot
Gadwal
Mudgal
Tungabhadra R.
Torgal
Belgaum
Kurnool
Goa
Dharwar
Nawalgund
Adoni
Gadag
Anagundi
Haliyal
Hubli
Mulgund
Dambal
Kundgol
Sirhatti
Hospet
Bellary
Saonshi
Sandur
Guntakal
Savanur
Bankapur
Tadpatri
Harpanhalli
Sonda
Haveri
Raydurga
Ranibennur
Harihar
Cuddapah
Nellore
Rapur
Chitaldurg
Venkatgiri
Madaksira
Gurrumconda
Kalahasti
Sira
Madagiri
Tirupati
Chandragiri
Chiknayakhalli
Chik Balapur
Punganuru
Dod Balapur
Kolar
Harnhalli
Devanhalli
Hoskote
Arcot
Bangalore
Vellore
Conjeeveram
Seringapatam.
Gingee
MYSORE
Dharmapuri
PONDICHERRY
Chidambaram.
G.P.Z.O. Poona, 1932.
74
76
78
80
20
18
16
14
12
66